KÂVYASANGRAHA. 52.

THE MAHÂBHÂRATA

OF

MOROPANT,

THE GREAT POET OF THE MAHÂRÂSHTRA.

13. ANUS'ÂSANPARVA.

EDITED WITH

CRITICAL AND EXPLANATORY NOTES,

PREFACE AND APPENDICES

BY

BÂLKRISHṆA ANANT BHIDE, B. A.

AND

DATTÂTRAYA KESHAV JOSHI.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRṆAYA-SÂGARA" PRESS.

Bombay.

1905.

Price 12 Annas.

काव्यसंग्रह. ५२.

महाराष्ट्रकविवर्यमोरोपंतकृत

महाभारत.

जनपदभाषेला त्वां स्वकृतीनें चढविलेंस उच्च पदा ।
नानालंकाररसीं सजवुनि नेलीस दूर तद्विपदा. ॥
—सी० बा० गुर्जर.

१३. अनुशासनपर्व.

हें

बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.
व
दत्तात्रय केशव जोशी

यांनीं

अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन व प्रस्तावना आणि परिशिष्टें जोडून, अनेक हस्तलिखित प्रतींच्या आधारें तयार केलें,

तें

मुंबईंत जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१९०५.

किंमत १२ आणे.

“मोरेशमानससमुद्भवमौक्तिकांचे
हे घोंस सुंदर लसद्द्युतिपुंज साचे;
वेंचोत यांस रुचिनें रसिकावतंस,
सारज्ञ, कल्पक, भले, बुधराजहंस. ॥”

काव्यसंग्रहकार.

प्रस्तावना.

१. मोरोपंती आर्याभारतांतील अनुशासनपर्व आज आम्ही मराठी वाचकांस सादर करीत आहों. महाभारतांतील अनुशासनपर्व हें तेरावें पर्व आहे. यांत आपले भाऊ व इतर गोत्रज, असंख्य राजे व क्षत्रिय, आणि प्रत्यक्ष गुरुश्रेष्ठ द्रोणाचार्य यांचा आपल्या हातून वध झाला म्हणून कष्टी व उद्विग्न झालेल्या धर्माला धर्मानुशासन (=धर्मोपदेश) सांगून, भीष्मांनीं त्याचें समाधान केलें व त्याला कर्तव्यपर बुद्धीनें राजदण्ड स्वीकारण्यास लाविलें म्हणून यास अनुशासनपर्व हें नांव अगदीं यथार्थ आहे. त्यांत मुख्य विषय दानधर्म आहे. वस्तुतः अनुशासन हें निराळें पर्व न गणितां, त्याचा भीष्मांनीं सांगितलेल्या इतर धर्मांबरोबर शांतिपर्वांतच अंतर्भाव होणें सयुक्तिक दिसतें, व आमच्याजवळील एका जुन्या हस्तलिखित भारती पोथींत तसें केलेंही आहे.

२. मूळ भारतांत हें पर्व फारच विस्तृत आहे. यांत एकंदर १६८ अध्याय अ-

---

१. मुक्तेश्वरानें अनुशासनपर्व स्वतंत्र न गणितां, त्याचा शांतिपर्वांतच समावेश केला असावा, अशी शंका घेण्याला सबळ कारण आहे, हें आम्हीं शांतिपर्वाच्या प्रस्तावनेंत नमूद केलेंच आहे. शुभानंदस्वामींनीं अनुशासनाला शांतिपर्वाचेंच अंग मानिलें आहे, हेंही शुभानंदकृत भीष्मपर्वांत स्पष्ट दाखविलें आहे (शुभानंदी भीष्मपर्व पृ० १२९ टी० ३ पहा). नाझरेकर श्रीधरानें आपल्या पांडवप्रतापग्रंथाच्या शेवटीं भारताच्या अठरा पर्वांची नामावली दिली आहे, त्यांतही अनुशासनाचें नांव आढळत नाहीं. त्यानें शांतिपर्वांवरील आपल्या मराठी टीकेंत पुढें दिलेल्या चार ओंव्या प्रस्तुत मुद्यासंबंधानें दिल्या आहेतः—यावरी कथिले आपद्धर्म । सांगितले दानधर्म सुगम । राजधर्म उत्तम । तोची आधीं कथियेला. ॥ ८५ ॥ चौथा सांगितला मोक्षधर्म । जें अद्वैत ज्ञान निःसीम । अनुशासनपर्व उत्तम । याचेंच (=शांतिपर्वाचेंच) अंग जाणिजे. ॥ ८६ ॥ राजधर्म आपद्धर्म । दानधर्म मोक्षधर्म । अनुशासनासहित उत्तम । शांतिपर्व एकच. ॥ ८७ ॥ पंचदशसहस्र श्लोक, बोलिला व्यास पुण्यश्लोक । समुद्रातुल्य ग्रंथ सुरेख । टीका न करवे सर्वथा. ॥८८॥ (पांडवप्रताप, अ० ५७). यावरून अनुशासनपर्व स्वतंत्र न गणण्याचा कांहींचा संप्रदाय होता, हें निःसंदेह आहे. याशिवाय श्रीधराच्या वरील ओंव्यांत आणखी एक मुद्दा विचार करण्यासारखा आहे, तो हा कीं श्रीधराजवळील भारती पोथींत भीष्मांनीं प्रथम राजधर्म, आपद्धर्म व दानधर्म सांगून अखेर मोक्षधर्म सांगितला असें होतें. परंतु हल्लींच्या छापी व हस्तलिखित प्रतींत प्रथम राजधर्म, आपद्धर्म, मोक्षधर्म व शेवटीं दानधर्म हा क्रम आढळतो. यावरून आपण हल्लीं पाहतों ती भारती पोथी व मुक्तेश्वर, शुभानंद व श्रीधर यांजवळील भारती पोथ्या, यांत बराच फरक होता, हें उघड आहे.

सून, त्यांत ब्रह्मचर्यादि आश्रमांतील धर्म, चातुर्वर्ण्यधर्म, पतिपत्नीधर्म, पुण्यकर्म, ब्राह्मणेतरांस ब्रह्मत्वप्राप्ति, ब्राह्मणमाहात्म्य, स्त्रीस्वभाव, कन्यादान, दानविचार, शिवमाहात्म्य इत्यादि अनेक महत्वाच्या विषयांचा ऊहापोह आहे. परंतु पंतांनीं या सर्व विषयांना फांटा देऊन, केवळ काव्यविषयास साजतील, हरिदासादिकांस उपयोगीं येतील व सामान्य जनांस मनोरंजक होतील असेच कथाभाग निवडून, आपल्या आर्याभारतांत गोंविले आहेत. एकशें अडसष्ट अध्यायांपैकीं केवळ सहा अध्यायच पंतांनीं वेंचिले आहेत, व त्यांत शिवमाहात्म्य (अ० १४–१६), दुर्वासोभिक्षा (अ० १५९) व भीष्मनिर्याण (अ० १६७–१६८) एवढेच विषय आले आहेत. या सहा अध्यायांवरील पंतांची टीका चांगली विस्तृत आहे व मूळांतील महत्वाचा कोणताही भाग त्यांनीं सोडला नाहीं, इतकेंच नव्हे, तर कित्येक ठिकाणीं विस्तारही केला आहे. उदाहरणार्थ, दुर्वासोभिक्षा या प्रकरणाचे मूळांत केवळ त्रेपन्न अनुष्टुप् श्लोक आहेत, परंतु पंतांनीं या प्रसंगीं आपली संक्षेपाची आवड बाजूस ठेऊन, या प्रकरणावर एकशें दोन रसभरित गीती रचिल्या आहेत, व त्यांतील वर्णनविषय जरी भारतांतील उसना आहे, तरी वर्णनाची धाटणी अगदीं स्वतंत्र–मोरोपंती शिक्याची–आहे.

३. पंतांना आपल्या काव्यांतील गुणदोष स्पष्ट कळत होते, व आपल्या काव्यांतील दोष केवळ बाह्य स्वरूपांत आहे, परंतु अंतरंग निर्मळ गुणाचें भांडार आहे, अशी त्यांची खात्री असल्यामुळें, त्यांच्या मनांत आपल्या कृतीविषयीं सदभिमान नेहमीं जागरूक असे. बऱ्याच आक्षेपकांच्या मतानें पंतांच्या काव्यांतील ढोबळ दोष म्हणजे तिचें संस्कृत शब्दप्राचुर्य, दीर्घ समासघटितत्व व यांमुळें उत्पन्न होणारें क्लिष्टत्व हे होत. परंतु हे दोष केवळ बाह्यांगाचे आहेत, आणि ज्यांना व्युत्पत्तीचा संस्कार लाभला नाहीं, त्यांनाच हे दोषरूप भासणार आहेत, नाहीं तर, ज्यांचा मराठी वाचनाशीं चांगला परिचय आहे, संस्कृताची थोडीबहुत माहिती आहे व ज्यांनीं पंतांचीं एकदोन काव्यें लक्ष्यपूर्वक वाचलीं आहेत, त्यांच्या दृष्टीला या गोष्टींचें दोषरूप झडून जाऊन, त्या भाषेला प्रौढत्व, ओज व दमदारपणा आणणाऱ्या उपकारक गोष्टीच आहेत, असें खात्रीनें आढळेल. मराठीच्या अंगीं संस्कृताची ऐट, माधुर्य व तेज आणण्याची पंतांची मोठी उमेद होती व त्या हेतूशीं सुसंगत अशीच त्यांनीं रचनापद्धती स्वीकारिली आहे. याबद्दल पंतांच्या कवितेवर त्यांच्याच काळीं पुष्कळांनीं आक्षेप घेऊन नाकें मुरडलीं होतीं असें दिसतें, परंतु सुसंस्कृत रसिकाला आपलें काव्य पसंत पडणारच अशी पंतांना धम्मक असल्यामुळें त्यांनीं

अशा आक्षेपकांची मुळींच पर्वा केली नाहीं. या संबंधें एक मुद्याची गीति प्रस्तुत पर्वांत आहे, ती हीः—

रामसुत मयूर म्हणे, "जाणेल निका मनीं चमत्कृतिला, ।
नुमजुनि कथे! न मानिल तुज तेविं निकाम नीच मत्कृतिला." ॥ ७।१०७

पंतांच्या या रचनाविशेषामुळें त्यांच्या काव्यांतील मर्म उडाणटपू वाचकांना मिळणें दुर्घट झालें आहे. आस्थापूर्वक श्रम घेऊन वाचणारालाच तें लाभणार आहे. म्हणून पंतांनीं आपल्या मंत्ररामायणांत वाचकांना विनंती केली आहे, कीं—

गीर्वाण शब्द पुष्कळ, जनपदभाषाचि देखतां थोडी, ।
यास्तव गुणज्ञ लोकीं याची घ्यावी हळूहळू गोडी. ॥ १७ ॥
प्राकृत संस्कृत मिश्रित, यास्तव कोणी म्हणेल जरि कंथा, ।
भवशीतभीतिभीतस्वांताला दाविला बरा पंथा. ॥ १८ ॥ मंत्ररामायण—उपोद्घात.

या दिशेनें विचार केला असतां, कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपल्या गद्यग्रंथद्वारें मराठीं वाङ्मयांत जी कामगिरी बजाविली आहे, तीच पंतांनीं आपल्या पद्यग्रंथद्वारें बजाविली आहे.

४. प्रस्तुत पर्वांत खुबीदार व मोहक संवाद जरी थोडे आहेत, तरी इतर रसिकतादर्शक, प्रतिभापूर्ण, रसाळ व मनोवेधक स्थळांची वाण मुळींच नाहीं. इंद्राचें सोंग घेऊन येणारा शंकर (अ० ३, गी० ९–१४), नंदीचें स्वरूप (३।५५–६०), उपमन्यूस झालेलें पार्वतीपरमेश्वरदर्शन (३।६१–६९), कृष्णाला झालेलें उमामहेश्वरांचें दर्शन(५।२१–३६)ह्या प्रसंगींचीं तिसऱ्या व पांचव्या अध्यायांतील वर्णनें वाचलीं म्हणजे पंतांच्या श्रेष्ठ काव्यशक्तीचा प्रत्यय वाचकांस आल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच तिसऱ्या अध्यायांतील उपमन्यू व इंद्रवेषधारी शंकर यांचा संवादही फार चटकदार आहे व तो वाचीत असतां कुमारसंभवांतील पार्वती व यतिवेषधारी शंकर यांच्या संवादाचें स्मरण झाल्यावांचून राहत नाहीं. दुर्वासोभिक्षा सातव्या अध्यायांत आहे, व तें सबंध प्रकरणच अत्यंत हृदयंगम आहे. भीष्मांच्या अंत्यसंस्काराचें वर्णन (८।५८–६५), गंगेचा शोक (८।७०-८२) व कृष्णांनीं केलेलें गंगेचें समाधान (८।८४–९६) हे प्रसंगही उज्वल प्रतिभेचे द्योतक आहेत.

५. पंतांचीं मातापितरें अनुशासनपर्व रचण्यापूर्वींच वारलीं होतीं, असें पर्वसमाप्तीच्या गीतीवरून उघड होतें. पंत स्वतःच या वेळीं बरेच वृद्ध झाले होते व त्यांचा उत्साह कमी पडला होता असें त्यांच्या पत्रांतील शांतिपर्वरचनेसंबंधाच्या पुढील उताऱ्यावरून स्पष्ट दिसणार आहेः—"शांतिपर्व राजधर्मपर्व प्रारंभ जाला आहे. सांप्रत वर्षाकाळीं बुद्धीस आळस आला. राहिलें, खोकला जाला आहे. आपणही चार

दिवस धीर धरावा. वर्षाकाळीं असें बुद्धिमांद्य किंचित् येतें. वृद्धपणीं शक्त्युत्साह उणा पडतो." मोरोपंतांनीं विठोबादादा चातुर्मासे, अनवेकर, यांस धाडलेल्या एका पत्रांतील हा उतारा आहे. (केसरी, ता० २८ जानेवारी १९०२ यांतील रा० रा० ल० रा० पांगारकर यांचें पत्र पहा.) असें जरी आहे, तरी त्यांचा उत्साह कमी झाला होता असें त्यांच्या ग्रंथरचनेंत मात्र दिसून येत नाहीं. त्यांच्या भारताचीं शेवटचीं पर्वें आरंभींच्या पर्वाप्रमाणें जोरदार व रसभरित आहेत.

६. या पर्वावर मूळ सुबोध करण्यापुर्त्या टीपा देऊन, परिशिष्टांत अधिक टीपा, पाठभेद, मुख्य मुख्य अलंकार वगैरे दिले आहेत. त्याप्रमाणेंच एक सुभाषितांचें परिशिष्टही जोडिलें आहे.

७. हें पर्व तयार करितांना रा० रा० **बाळकृष्ण सीताराम जोशी** (मुरूड-जंजिरा) व **महादेव केशव जोशी**, बी. ए. (धुळें) यांनीं जें साहाय्य केलें त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहों.

मुरूड-जंजिरा,
१५ जुलई १९०५.

काव्यसंग्रहकार.

मोरोपंती अनुशासनपर्वाची अनुक्रमणिका.

परिशिष्टें.

मोरोपंतकृत महाभारत.

१३ अनुशासनपर्व.

(गीतिवृत्त.)

अध्याय पहिला.

विंदुवर[1] नदीनंदन[2] सांगे बहु दानधर्म[3] धर्मांतें, ।
व्हावें कृतकृत्यें[4] सुखें[5] जीवांहीं ज्या[6] करूनि कर्मांतें. ॥ १
पर्वीं परमोदारीं[7] या घडतां श्रवण आनुशासनिकीं, ।
बहु सांपडती स्वहितें सुकरें श्रद्धालु मानुषास निकीं. ॥ २
भीष्म म्हणे 'कृष्णा! नृप[8] पुसतो माहात्म्य शंभुचें देवा! ।
बा! तूंचि सांग, त्याची तुज बहु घडली युगींयुगीं[9] सेवा.' ॥ ३
श्रीकृष्ण म्हणे 'महिमा विश्वेशांचा[10] अपार[11] अर्णव[12] तो, ।
लेशें[13] यथाशक्ति यथामति कथिन, अनंत[14] काय वर्णवतो?' ॥ ४
प्रक्षालुनि करचरण, स्वच्छें उदकें करूनि आचमना, ।
शिवयश सांगे, सुखवी ज्याचा पहिलाचि बहु उवाच[15] मना. ॥ ५

---

१. ज्ञान्यांमध्यें श्रेष्ठ. 'श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति' या मंत्रापैकीं तेरावें अक्षर 'विं' हें आहे, आणि 'अनुशासन' पर्वही तेरावें असून त्याचें आद्याक्षर 'विं' हेंच आहे. २. गंगापुत्र भीष्माचार्य. ३. व्यासांनीं या पर्वांत दानासंबंधीं फारच विस्तृत विचार केला आहे. परंतु पंतांनीं तो बहुतेक गाळूनच टाकिला आहे. ४. धन्य, पूर्णकाम. ५. सहज. ६. ज्या दानधर्मकर्मांतें. अन्वयः—ज्या कर्मांतें करूनि जिवांहीं (मनुष्यांनीं) सुखें कृतकृत्य व्हावें. ७. अत्यंत उदात्त. अन्वयः—श्रवण घडतां (ऐकिलें असतां), या परमोदारीं आनुशासनिकीं (उपदेशासंबंधाच्या, ज्यांत उपदेश आहे अशा) पर्वीं श्रद्धालु मानुषास (भक्तियुक्त मनुष्याला) सुकरें (होण्याजोगीं, शक्य) निकीं (रोकडीं) स्वहितें बहु सांपडती. ८. धर्मराज. ९. प्रत्येक युगामध्यें. १०. जगतपतीचा, शिवाचा. ११. अगाध. १२. समुद्र. १३. अणु. १४. अन्वयः—अनंत (ज्याचा अंत नाहीं असा) काय वर्णवतो (वर्णिला जातो?) अर्थात् त्याचें वर्णन होणें शक्य नाहीं. १५. पहिलाच शब्द, वर्णनाचा प्रारंभ. अन्वयः—ज्याचा (शिवयशाचा) पहिलाचि उवाच मना बहु सुखवी (सुख देतो). ह्या गीतींत योजिलेला 'उवाच' शब्द हें 'वच्' ह्या संस्कृत धातूचें भूतकाळीं तृतीय पुरुषीं एकवचनी रूप आहे. परंतु त्याचा उपयोग पंतांनीं नामासारखा केलेला आहे. सूतः उवाच (सूत म्हणता झाला) या संस्कृत वाक्याचें अपभ्रष्ट रूप '**सूतोवाच**' असें मराठींत झालें आहे, व त्याचा उपयोगही या गीतींतील 'उवाच' प्रमाणेंच हुबेहूब होतो.

[1]श्रीकांत म्हणे, क्षितिवरि ठेउनि शिर, तो 'नमः शिवाय' असें; ।
वर्णी माहात्म्य परम विनयें विभुचें भरूनि भक्तिरसें. ॥ ६
'जी[2]च्या विपक्षवदनें केलें प्रिय मित्र पक्क जांबव, ती ।
भैष्मीसुतरत्नतसें मागे मज पुत्ररत्न जांबवती. ॥ ७
गरुडीं बैसुनि गेलों शि[3]वभजनाद्भुतरसें हि[4]मागातें, ।
सु[5]क्षेत्र पावलों, जें म्हणे, 'प्रिय असो कसेंहि, मागा तें.' ॥ ८
तेथें आश्रममंडल, शशिमंडल जेविं [6]अंबरीं [6]अमळीं; ।
उ[7]पमन्यु सुमुनि नां[8]दे ज्यांत, जसा हंस मानसीं कमळीं. ॥ ९
परम प्रमुदित झालों, त्यातें त्या आश्रमांत मी नमुनी, ।
वदला प्र[9]सन्नमानस तो शु[10]द्धतपःसमुद्रमीन मुनी. ॥ १०
'बा! आमुचीं तपें त्वां केलीं प[11]द्मालयावरा! स[12]फळें, ।
अस्मद्यो[13]गास तसें तव संदर्शन, जसें शरास [14]फळें. ॥ ११

---

१. अन्वयः—क्षितिवरि शिर ठेउनि तो श्रीकांत 'नमः शिवाय' असें म्हणे; व भक्तिरसें भरूनि (भक्तिरंगांत दंग होऊन) परम विनयें विभुचें (शिवाचें) माहात्म्य वर्णी. २. अन्वयः—जिच्या विपक्षवदनें (=शत्रूच्या मुखानें) पक्क जांबव (=पिकलेलें जांबूळ) प्रियमित्र केलें, ती जांबवती भैष्मीसुतरत्नतसें (=रुक्मिणीच्या सुंदर मुलासारखें) पुत्ररत्न मज मागे (=मागती झाली). जांबवनाची मुलगी जांबवती कृष्णाची पत्नी कशी झाली, ह्यासंबंधें पंतकृत कृष्णविजयांतील स्यमंतकोपाख्यान व केकावलींतील केका ३५ पहा. जांबूळ मित्र करणें=जांभळाप्रमाणें निळें काळें होणें, लज्जेनें काळवंडणें. ३. शिव+भजन+अद्भुत+रसें=शंकराचें आराधन करण्यांत असणाऱ्या विलक्षण गोडीमुळें. ४. हिमालयपर्वताप्रत. ५. अन्वयः–[मी] सुक्षेत्र पावलों, जें (क्षेत्र) म्हणे 'प्रिय कसेंही असो; तें मागा' ('तुमची इष्टवस्तू कशाही प्रकारची असली तरी खुशाल मागून घ्या, देतों' असें म्हणतें). अर्थात् त्या ठिकाणीं सर्व इच्छित काम परिपूर्ण होतात, असा भाव. ६. निर्मळ आकाशांत. ७. उपमन्यु हा व्याघ्रपादमुनीच्या दोन पुत्रांपैकीं ज्येष्ठपुत्र असून तंडीऋषीचा शिष्य होय. ह्यानें शिवाराधनानें क्षीरसागरीं अक्षय्यवास मिळविला. (पुढें अध्याय २ पहा.) हा मोठा शैव असून ह्याजपासूनच श्रीकृष्णांनीं शैवदीक्षा घेतली. ८. आनंदित. ९. स्वच्छ व शांत मनाचा. १०. पवित्रतपोरूपसमुद्रांतील मासा. महान् तपस्वी. ११. पद्म (कमल) आहे आलय (स्थान) जीचें अशी लक्ष्मी तिच्या वरा (पते)! लक्ष्मीपते! १२. परिपूर्ण. १३. आमच्या समाधीला, चित्स्वरूपध्यानाला. 'चित्तवृत्तिनिरोधो योगः' अशी 'योगा'ची व्याख्या पतञ्जलि करतात. १४. लोखंडी पातें, पान. सर्वसंग्रहकारांची 'धनुष्याची मूठ' अशी टीप आहे, परंतु ती योग्य दिसत नाहीं.

महिमा[1] अतर्क्य तव त्या, जो तर्क करील नित्य नव लक्ष; ।
पूज्यहि पूजिसि मज, हें एक तुझें यशचि, गांग न वलक्ष. ॥ १२
ज्ञानें ज्यासि पहावें, तो तूं मज इच्छिसी पहायास, ।
वंदिसि मजला, ज्याच्या करि पादरजोर्थ[2] विधि महायास[3].' ॥ १३
ऐसें गौरविता[4], म्यां पुसिलें सर्वत्र कुशळ सन्मुनितें[5], ।
जेणें केलें[6], जें जें वेदगुरुप्रोक्त[7], सर्व जन्मुनि तें. ॥ १४
मदभिप्राय[8] ज्ञानें समजुनि उपमन्यु मज म्हणे 'कृष्णा! ।
सत्सुतलाभें होइल परिपूर्णा निश्चयें तुझी तृष्णा[9]. ॥ १५
शंकरवरप्रसादा[10] भाजन, येथें करूनि सुतपा, हो, ।
भैष्मी तसि जांबवती क्षिप्र त्वत्तुल्यशील[11] सुत पाहो. ॥ १६
या आश्रमांत करितो नित्य सपत्नीक[12] तो प्रभु क्रीडा, ।
यच्चरणयशें[13] धरिती चिंतामणिसुरभिसुरतरु व्रीडा. ॥ १७
आराधितां[14] सुदुर्लभ वर येणें बहु दिले पदनतातें[15], ।
अर्पावें[16] या एकें श्रीसांबें आपुलें पद, न तातें. ॥ १८

---

१. अन्वयः—जो नित्य लक्ष नव (नवे) तर्क करील (=जो अत्यंत कल्पक आहे), त्या-(ही) तव (तुझा) महिमा अतर्क्य (=बुद्धीस अगोचर) [आहे]; [तूं] पूज्यही (पूजा करण्यास योग्य असून सुद्धां) मज पूजिसि; हें तुझें यशचि (एकटें, फक्त) वलक्ष (धवल, शुभ्र;) गांग (गंगोदक) [वलक्ष] न. भावार्थः—तूं स्वतः पूजार्ह असून सुद्धां माझी पूजा करितोस, तेव्हां ह्या तुझ्या शालीनतारूप यशासच शुभ्र म्हणावें; प्रत्यक्ष गंगोदक सुद्धां ह्या यशापुढें शुभ्र नव्हे. यशाचा रंग शुभ्र आहे हा कविसंकेत. २. पाद+रजस्+अर्थ=चरणधूलीकरितां. ३. फार प्रयास, विलक्षण दगदग. ४. बहु मान दिला असतां. ५. उपमन्यूलों. ६. आचरिलें. ७. वेद आणि गुरु ह्यांनीं सांगितलेलें. ८. मत्+अभिप्राय=माझा हेतु. ९. इच्छा. १०. अन्वयः—येथें सुतपा (चांगल्या तपश्चर्येला) करुनि शंकरवरप्रसादा (शिवाच्या वररूप अनुग्रहास) भाजन (पात्र) हो. ११. त्वत्+तुल्य+शील=तुझ्यासारखा स्वभाव आहे ज्याचा असा. १२. भार्येसहवर्तमान, उमेसह. १३. अन्वयः—यच्चरणयशें (यत्+चरण+यशें=ज्याच्या—शंकराच्या—चरणाच्या थोरवीपुढें) चिंतामणिसुरभिसुरतरु (चिंतामणि, कामधेनु व कल्पवृक्ष) व्रीडा धरिती (लाजतात). शंकरचरणापुढें या सर्वांचें औदार्य फिकेंच आहे, हा भाव. १४. प्रसन्न केला असतां. १५. पायांशीं लागलेल्यास अर्थात् शरणागतास. १६. अन्वयः—या (ह्या) एकें श्रीसांबें आपुलें पद अर्पावें; तातें न. आपली मालमत्ता आपल्यामागें आपल्या मुलाला मिळावी अशी व्यवस्था सर्व वडील करितात. परंतु ते हयात असतांना मालमत्ता मुलांच्या हवालीं करीत नाहींत किंवा मुलाला सर्वस्वीं आत्मतुल्य लेखीत नाहींत. पण शिवमात्र आपल्यासमक्ष भक्तांना सर्वस्वीं आपल्या स्वतःच्या पदवीला पोहोंचवितो.

[१]सर्वां मनोरथांचें **भ**वभजनअसें न पूर्तिकर कांहीं, ।
ताप नुरवि, जाड्य न करि, गावि न कां **शं**भुमूर्ति करकांहीं ? ॥ १९
प्रभुनें [२]नेले बहु ऋषि, बहु सुर, बहु असुर, उच्चपदवीतें; ।
[३]अपरिमित यश, परि [४]किमपि पैरिस, प्रेमचि बळेंचि [५]वेदवीतें. ॥ २०
जो ख्यात **मे**रु[६]कंपन अरि[७]घूकांचा [८]**हि**रण्यकशिपु रवी, ।
परिस, तयाची [९]दुर्घट वांछा श्री**मन्**महेश कशि [१०]पुरवी. ॥ २१
[११]सर्वसुरैश्वर्यातें अर्बुदसंख्याकें[१२] पावला वर्षें, ।
श्रीहरवरप्रसादें तो [१३]अद्भुतशक्ति नांदला[१४] हर्षें. ॥ २२
मंदर[१५]नामा [१६]पुत्रप्रवर [१७]तयाचाचि समर **श**क्राशीं ।
करिता झाला [१८]अर्बुद [१८]अब्द, जसा मत्त नक्र नक्राशीं. ॥ २३
वज्रें झाला त्याचा [१९]**ई**शवरें एकही न वक्र [२०]कच; ।
[२१]**च**क्रहि होय वृथा, जें [२२]गिरिदारुविदारणीं [२३]नव [२३]क्रकच, ॥ २४
त्यासचि माराया जें **प्र**भुनें तेजेंचि सर्वथा [२४]खचिलें, ।
प्रथम स्वयें [२५]स्वकौशलसुयशास्तव [२६]परम [२६]आदरें [२७]रचिलें. ॥ २५
एका **पि**नाकिवांचूनि [२८]नोहे इतरासि शक्य देखाया, ।

---

१. भवभजनअसें (=शंकराच्या सेवेसारखें) सर्वां मनोरथांचें पूर्तिकर कांहीं न; [हें] ताप नुरवि (राहूं देत नाहीं); जाड्य न करी; [तरी] शंभुमूर्ति करकांहीं (गारांनीं) कां न गावी ? अर्थात् गावी असा भाव. 'ताप नुरवी' ही गोष्ट दोहोंतही साधारण आहे; परंतु करकासेवन जाड्य (शैत्य) करितें, आणि शिवसेवन जाड्य (बुद्धिमांद्य) करीत नाहीं, तेव्हां करकांनीं शंभुमूर्तीचे गुणानुवाद गावे हेंच योग्य होय. २. येथें सर्वसंग्रहाचा 'केलें' असा अपपाठ आहे. ३. अगणित. ४. लेशमात्र ऐक. ५. बोलावयास लावितें. अर्थसादृश्यः—प्रेमा **भी**ष्मा भगवत्स्तवन, म्हणे जेवि **रा**म शीक रण. (शांतिपर्व ७।९.) ६. मेरुपर्वतास कांपावयास लावणारा. ७. शत्रुरूप घुबडांचा. ८. कश्यपास दनूपासून झालेल्या दानवांपैकीं एक. ९. दुःसाध्य. १०. तृप्त करिता झाला. ११. सर्व+सुर+ऐश्वर्यातें=सर्व देवांच्या राजपदाप्रत. १२. दहा कोटी गणती आहे ज्यांचीं. हें 'वर्षें' ह्या शब्दाचें विशेषण. १३. अपूर्व सामर्थ्यवान्. १४. सुखानें राहता झाला. १५. मंदरनांवाचा. १६. पुत्रश्रेष्ठ. १७. हिरण्यकशिपुचाच. १८. दहा कोटी वर्षें. 'जसा नक्र नक्राशीं' या उपमेनें मंदर इंद्राच्या तोलाचा होता हें सुचविलें आहे. १९. शंकराचा वर असल्यामुळें. २०. केश. एकही कच वक्र न झाला=कांहींएक नुकसान झालें नाहीं. २१. (सुदर्शननामक) चाक. २२. गिरि+दारु+विदारणीं=पर्वतरूपी लांकूड कापण्याचें कामीं. २३. नवी करवत. २४. परिपूर्ण केलें; भरलें. २५. आपल्या अंगच्या चातुर्यानें लाभणाऱ्या उज्ज्वल कीर्तीच्या प्राप्तीसाठीं. २६. परम आदरें=अत्यंत आस्थेनें. २७. बनविलें. या गीतींतील 'जें' चा संबंध मागील गीतींतील चक्राकडे ध्यावयाचा. २८. (तें) देखाया शक्य नोहे=त्याच्याकडे पाहवत नव्हतें.

[1]लोपवि रविला, [2]इतरा तेजांचा सांग काय लेखा या? ॥ २६
[3]पाहों न शकति कोण्ही जन, डोळे भानुतें जसे चिपडे, ।
तेव्हां '[4]सुदर्शनं भव' त्यासि म्हणे देव, नाम तेंचि पडे. ॥ २७
[5]होतां न्यून सहस्रीं एक, नयननीरजें यथाविधिनें ।
पूजन करितां, दिधलें पूर्वीं जें काय तुज दयानिधिनें, ॥ २८
जीर्णतृण[6]सम प्रतिहत चक्र सुदर्शन महारणीं झालें, ।
सामर्थ्य असें मंदरदेहीं प्रभुदत्त[7]वरबळें आलें. ॥ २९
वर देउनि [8]विद्युत्प्रभ केला लक्षाब्द [9]सर्वलोकेश; ।
न भजे अशा प्रभुसि जो, [10]कुळदुग्धामाजि होय तो केश. ॥ ३०
'माझाचि नित्य [11]अनुचर होसील' असेंहि शिव तयाशि वदे, ।
पुत्र[12]सहस्रायुतही दे; बहु, [13]चरणासि शिवतया, शिव दे. ॥ ३१
त्यासि कुशद्वीपींचें राज्यहि करुणा करूनि दे हावी, ।

---

१. दिपवी, निस्तेज करीत असे. २. अन्वयः—इतरा तेजांचा (=दुसऱ्या ग्रहनक्षत्रादिकांचा) या (ह्या चक्रास, अर्थात् ह्या चक्रापुढें) काय लेखा (मातबरी, पाड)? सांग. अर्थात् सर्व प्रकारचें तेज ह्या चक्राच्या तेजापुढें फिकें पडलें असा भाव. 'लेखा' हा शब्द कानडी भाषेंतील असून त्याचा अर्थ 'हिशोब' असा आहे, व मराठी भाषेंतही 'अमक्यापुढें अमक्याचा हिशोब काय?' असा प्रचलित प्रयोग आढळतो. संस्कृत भाषेंत 'गणना' व इंग्रजी भाषेंतही 'Account' ह्या शब्दांचीही योजना अशाच अर्थीं दृष्टीस पडते. ३. अन्वयः—जसे चिपडे (दुखरे व पिचकुडे) डोळे भानुतें, [तसें] कोण्ही (कोणीही) जन [ह्यातें] पाहों न शकति. ४. 'सुदर्शनं भव'=चांगलें दर्शन आहे ज्याचें असें हो. ५. अन्वयः—सहस्रीं एक न्यून होतां (नेहमीं नियमानें वाहावयाच्या एक हजार कमळांत एक कमळ कमी भरलें असतां), नयननीरजें (=नयनरूप कमळ वाहून) यथाविधिनें (=यथासांग) पूजन करितां (=केलें असतां) तुज दयानिधिनें (=दयाळू शंकरानें) पूर्वीं जें काय दिधलें. ह्या गीतींतील 'जें' हें संबंधी सर्वनाम असून त्याचा संबंध २९ व्या गीतीच्या पूर्वार्धांतील 'चक्र' ह्या नामाकडे आहे. ६. वाळलेल्या गवताप्रमाणें निःसत्व. प्रतिहत=मागें हटविलेलें. ७. शंकरांनीं दिलेल्या वराच्या सामर्थ्यामुळें. ८. विद्युल्लतेसारखा तेजस्वी. ९. स्वर्ग, मृत्यु व पाताल ह्या तीन लोकांचा ईश म्हणजे राजा. १०. कुल हेंच दूध त्यांत पडलेला केंस. दुधांत केंस पडल्यानें दूध जसें नासतें, त्याप्रमाणें अशा प्रकारच्या प्रभूस म्हणजे अर्थात् शंकरास न भजणारा मनुष्य कुलांत निर्माण झाल्यास त्या कुलाचा नाश होतो. शांतिपर्वांत 'भोजनांत केश' असा लोकवाद पंतांनीं योजिला आहे:—'ज्यां होय, जो अपुत्रिकजन, नाकीं भोजनांत तो केश'. ॥ (४।२१.)
११. पार्षद. १२. दहाहजार मुलगे. १३. अन्वयः—चरणासि शिवतया (हात लावणाऱ्याला, अर्थात् पायाची सेवा करणाऱ्यास) बहु शिव (कल्याण) दे.

[1]भक्तांचि प्रीति बहु प्रभुला, जीवासि जेंवि देहाची. ॥ ३२
[2]शतमुख एक महासुर [3]करि शतवर्षें [3]स्वमांसहोमातें, ।
तो [4]उग्रप्रकृति म्हणे '[5]भगवान् उग्र प्रसन्न हो [6]मातें.' ॥ ३३
होय प्रसन्न ईश्वर, 'वर माग' म्हणे तयासि, तो याची, ।
'दे योगशक्ति, जीणें [7]ग्रहघनभूम्यादिसृष्टि [8]होयाची. ॥ ३४
[9]दे ब्रह्मज्ञानोद्भव बळ शाश्वत' हें अगा! रमागेहा! ।
ऐसें प्रभुला, होउनि वर प्रसादा अगार, मागे हा. ॥ ३५
[10]क्रतुहि शतत्रयवर्षें [11]सूत्रात्मध्यान धरुनियां भजला, ।
तो जाउनि शरण म्हणे 'शंभो दशशत सुपुत्र दे मजला.' ॥ ३६
[12]भेटुनि 'वर माग' असें, प्रथम अभय दे, वदे वच क्रतुला, ।
पुत्रसहस्र सुदर्शन दे, जैसें देवदेव चक्र तुला. ॥ ३७
[13]जेणें मुक्त करावे नत, मदवायसलुलाय शापावे, ।
तो याज्ञवल्क्य मुनिवर शिवभजनें [14]गततुला यशा पावे. ॥ ३८
व्यासहि महेश्वरातें आराधुनि पावला यशा [14]अतुला, ।
[15]कथितों भक्तिप्रेमें, बा! विदित रहस्य काय गा! न तुला? ॥ ३९

---

१. ह्या गीत्यर्धांत ईश्वराचें भक्तांवर किती अलोट प्रेम असतें, तें एकाच उपमेनें पण पूर्णपणें व्यक्तलेलें आहे. २. नामविशेष. ३. आपल्या आंगाच्या मांसानें यज्ञ करता झाला. ४. तामसवृत्ति आहे ज्याची असा. ५. भगवान् शंकर. उग्र=शंकर. ६. मजला. हो=होवो. कदाचित् येथें 'भगवन्नुग्र! प्रसन्न हो मातें' ['=हे भगवंता! शंकरा! मला प्रसन्न हो.'] असा मूळपाठ असावा. ७. ग्रह (=सूर्यचंद्रादि), घन (=मेघ), पृथ्वी वगैरे, वस्तुजात. ८. व्हावयाची, सहज उत्पन्न करितां येईल. ९. अन्वयः—'ब्रह्मज्ञानोद्भव (ब्रह्मज्ञानापासून उत्पन्न होणारें) शाश्वत बळ [मज] दे,' हें ऐसें, अगा! रमागेहा! (=कृष्णा!), हा (=शतमुख) वरप्रसादा (वराच्या अनुग्रहाला, वरदानाला) अगार (स्थान) होऊनि प्रभुला (शंकरातें) मागे. १०. नामविशेष दैत्य. ११. सूत्रात्मन्+ध्यान=आत्मविचार. ध्यान धरणें=एकाग्रतेनें विचार करणें. सूत्रात्मन्=आत्मा. १२. अन्वय—क्रतुला प्रथम भेटुनि अभय दे [व] 'वर माग' असें वच वदे. देवदेव (महादेव) जैसें तुला सुदर्शन चक्र दे [मागें गीति २८.] [तैसें क्रतुला] सुदर्शन (सुंदर) पुत्रसहस्र दे. १३. अन्वयार्थ—जेणें नत (शरण आलेले) [जन] मुक्त करावे, [व] मदवायसलुलाय (=कावळ्याप्रमाणें किंवा टोणग्याप्रमाणें माजलेले दुर्जन) शापावे, तो याज्ञवल्क्य इ०. १४. ज्याला तुलना नाहीं अशा; अलौकिक, अप्रतिम. १५. अन्वयः—बा! भक्तिप्रेमें (भक्तीच्या आनंदभरांत) कथितों; गा (अगा)! तुला (श्रीकृष्णाला) काय (=कोणतें) रहस्य (गुह्य) विदित न? (माहीत नाहीं?) अर्थात् तुला सर्व माहीत आहे पण मी भक्तीच्या आनंदभरांत सांगतों, असा भाव.

अवमानिले बळमदें पूर्वीं मुनि वा[1]लखिल्य जे शक्रें, !
ते वदले 'हा शंभो! केला [2]अमृतोपहास कीं तक्रें.' ॥ ४०
कृष्णा! प्रमाण, ज्यांच्या अल्पत्वें, होय आंगठा का[3]याः ।
[4]ते प्रभुचरणासि करुनि देती पदपीठ आंग ठाकाया. ॥ ४१
[5]समजुनि सुधा शिवाच्या, इतरांच्या फार सपक रीतीतें, ।
काय कथूं, ते देहें अल्प परि अनल्प तप करीती, तें? ॥ ४२
[6]दे अमृतहरखगेंद्रोत्पादनवर देव वालखिल्यांतें, ।
'कर्मासि' म्हणे, 'भज कां जरि अंतर देववाल खिल्यांतें?' ॥ ४३
पूर्वीं महेश्वराचीं रोषें होतांचि लोचनें [7]कलिलें, ।
सर्वत्रही विनष्टें झालीं तत्काळ सर्वही सलिलें. ॥ ४४
[8]सप्तकपाळें यजितां देवांहीं सुप्रसन्न शिव होय, ।
तो यज्ञभाग भोगुनि मग सर्वत्र [9]प्रवर्तवी तोय. ॥ ४५

---

१. **वालखिल्यः**—या ऋषींचे देह आंगठ्याएवढेच उंच होते. यांचीं संख्या ६०,००० असून, ते सर्व ब्रह्मयाच्या शरीरापासून उत्पन्न झाले. ते सूर्याच्या रथाला वेष्टून असतात असें रघुवंशांत वर्णन आहे (रघुवंश, सर्ग १५ श्लोक १०). यांचा इंद्रानें अपमान केल्याची कथा अशी आहे:—'सौती म्हणे 'हो! जी! ऐका। कश्यप सृष्टीचिया जनका। संततिकामनेस्तव देखा। याग करितां पुत्रेष्टी,॥ शक्त्यनुसारसामग्रीसी। साह्य झाले देव ऋषी। शक्रें पर्वततुल्य राशी। समिधांचिया आणिल्या.॥ देखोनी अंगुष्ठप्राय ऋषी। साठी सहस्र वैखानसी। वितस्तिमात्र एक सायासीं। पलाशसमिधा तोडिली.॥ खांदीं वाहून समस्तीं। शनैः शनैः आणितां पथीं। गोष्पदप्राय अपांपती। तैसा पुढें भासला.॥ पाय निसरोनी अवचितें। अवघे पडले त्या आतौतें। बुचकळ्या खात एकमेकांतें। कवळूनियां झोंबती.॥ हें देखोनि तये काळीं। इंद्र हासे पिटोनि टाळी। 'पहा चोज गोष्पदजळीं। ब्राह्मण कैसे बुडाले!॥ ऐसें जीव जे देखती। त्यांसी हासावयाचे अर्थीं। ब्रह्मयानें निर्मिलें निश्चितीं। विनोदार्थ जगातें.'॥ (मुक्तेश्वरकृत आदिपर्व, ६।१५-२१). २. अमृताची थट्टा. ३. शरीराला. ४. अन्वयः—ते प्रभुचरणासि (शिवाच्या पायास) ठाकाया (टेंकण्यास्तव) आंग (स्वदेह) पादपीठ (पाय ठेवण्याची तिवई वगैरे) करुनि देती. ५. अन्वयः—शिवाच्या रीतीनें सुधा (अमृत) समजुनि [आणि] इतरांच्या (इतर देवांच्या) रीतीनें सपक (स्वादरहित, बेचव) समजुनि, ते, (=वालखिल्य) देहें अल्प परि (परंतु) जें अनल्प (मोठें) तप करिती, तें काय कथूं? (=तें किती वर्णूं?). ६. सार्थान्वयः—वालखिल्यांतें अमृतहरखगेंद्रोत्पादनवर (अमृत हरण करणारा गरुड उत्पन्न करण्याचा वर) देव (शंकर) दे, [व] म्हणे जरि खिल्यांतें (=निष्फळ गोष्टींना, व्यर्थ व्यापारांना) अंतर देववाल (=दूर करूं इच्छीत असाल) [तरि] कर्मासि (=यज्ञयागादि कर्मकांडास) कां भज (=कशाला भजावें)? [मला नुसतें शरण आल्यानेंच, माझी सेवा केल्यानेंच सर्व इच्छा पूर्ण होतील, हा भाव.] पाठभेदः—'भजकां.' ७. मिश्रित, युक्त. ८. सप्तकपालनामक यज्ञानें. ९. निर्माण करता झाला.

शौरे[1]! अत्रिवरि भरे अनुसूया ब्रह्मवादिनी[2] रागें, ।
जें न कधींहि घडावें, घडलें दैवें[3] तसेंहि तें मागें. ॥ ४६
दुरितक्षयार्थ[4] सत्कवि त्या साध्वीचें पवित्र यश गाती, ।
क्षोभोनि म्हणे 'यांवरि[5] होइन न कदापि अत्रिवशगा[6]' ती. ॥ ४७
त्यजिती साध्वी कां, जरि न[7] त्यजितां श्रीमदत्रि नयनातें ? ।
जाय[8] शरण, कीं नाहीं लवहि तपःश्रीमद त्रिनयनातें. ॥ ४८
निजलि शतत्रयवर्षें[9] रचुनि करें काष्ठकीलशयनातें[10], ।
करि सुप्रसन्न शर्वा[11] तप तीचें पुंडरीकनयना[12]! तें. ॥ ४९
अनुसूयेतें देव स्मित करुनि म्हणे 'पतिव्रते! रुचलें[13], ।
आलिस मज त्रिलोकी पतिस शरण, हें भलें तुला सुचलें. ॥ ५०
होईल[14] तुज पुत्र, वदे हा मिथ्या न वच रुद्र; वापी हो ।
अमृताची कीर्ति तुझी; स्मरुनि मला नवचरुद्रवा पी हो ! ॥ ५१
विख्यात तुझ्या नामें होइल तव पुत्र मान्य विश्वास[15]; ।
अनुसूय त्यासि म्हणतिल सुकवि, असोंदे मदुक्ति विश्वास[16].' ॥ ५२
शाकल्य[17] मनोयज्ञें[18] नववर्ष[19] शतें शिवासि आराधी, ।
'हो ग्रंथकार' त्यातें देव म्हणे, देउनि स्वंसारा[20] धी. ॥ ५३
'लोकत्रयांत[21] तव यश अक्षय हो, पुत्र सूत्रकर्ता हो,' ।
झाला प्रसन्न ऐसा शाकल्यास त्रिलोकभर्ता[22] हो! ॥ ५४

---

१. हे श्रीकृष्णा! २. वेदान्तमतानुयायी. ३. दुर्दैवानें. ४. पापक्षालनार्थ. ५. ह्यापुढें. ६. अत्रिऋषींची अंकित. ७. नीतीचें उल्लंघन न करितां. ८. अन्वयः—[ती अनुसूया अत्रीला सोडून मग] त्रिनयनातें (शंकरातें)= शरण जाय; कीं, (कारण) शंकराचे ठायीं [उन्मत्त अत्री-प्रमाणें] तपःश्रीमदलवही नाहीं. ९. तीनशें वर्षें. १०. लांकडी खिळ्यांच्या किंवा सुळ्यांच्या शय्येला. ११. शंकरातें. १२. पद्मनेत्रा श्रीकृष्णा ! १३. मानवलें. १४. अन्वयः—तुज पुत्र होईल; हा रुद्र मिथ्यावच न वदे; [तुझी] कीर्ति अमृताची वापी हो (होवो); मला स्मरुनि नव–चरु–द्रवा (नूतन पुरोडाशाच्या रसातें) पीहो (पी बरें). 'पी हो' ह्या प्रयोगावरून विशेष कळकळ व्यक्त होते. १५. जगास. १६. भरंवसा. १७. एक ब्रह्मर्षि होता. हा नउशें वर्षें शिवाराधन करून मोठा ग्रंथकार व सूत्रकार झाला. १८. मनोभावानें अर्थात् एकाग्र भक्तिमार्गानें. १९. नउशें वर्षें. २०. आपला अंश आहे जीमध्यें अशी. हें 'धी' (बुद्धि) ह्या शब्दाचें विशेषण. २१. अन्वयः—तव यश लोकत्रयांत अक्षय हो, [आणि] तव पुत्र सूत्रकर्ता हो (=होवो). टीपः—सूत्रशब्दाची व्याख्याः—'स्वल्पाक्षरमसंदिग्धं सारवद्विश्वतोमुखम् । अस्तोममनवद्यं च सूत्रं सूत्रविदो विदुः ॥' याचा मराठींत मतलबः—जें स्वल्पाक्षर, ज्याचा भाव असे स्पष्ट, अर्थ बहु खोल, । व्यापक जें, निर्दूषण, वागडंबरहीन, 'सूत्र' तें बोल. ॥ २२. जगत्पति.

करि [1]षट्सहस्र वर्षें तप, [2]उग्रा [3]प्रभुसि भाटसा वर्णी, ।
[4]तो ग्रंथकृदजरामर केला थापटुनि पाठ **सावर्णी**. ॥ ५५
[5]**वा**राणसींत आहुति विधिनें अग्नींत दे [6]वैराज्याच्या, ।
[7]झाला **शि**वप्रसादें **श**क्र पदा योग्य देवराज्याच्या. ॥ ५६
तो जाणे [8]सार किमपि **शि**वभजनाहूनि [9]आन **ना**रद न, ।
ज्याचे गुण शोभविती [10]संद्वृंदा, जेंवि आनना [11]रदन. ॥ ५७
न [12]विचिंतुनि दाराधन, आराधन **शं**भुचें करी नमुनी; ।
होय [13]कृपास्पद होउनि [14]चरणार्पितवाङ्मनःशरीर मुनी. ॥ ५८
श्री**शं**भु म्हणे 'वत्सा! लोकीं झालासि **ना**रदा! धन्य, ।
त्वत्सम न होइल जन ज्ञानें, तेजें, तपें, यशें अन्य. ॥ ५९
[15]भक्तिसती न करिल, तुज सदना सोडुनि, बहिः [16]पदन्यास; ।
प्रिय मानुनि, न भजो तव मति, जसि न भजे **उ**मा [17]मदन्यास. ॥ ६०
विश्वगुरुत्वाचा म्यां दिधला अधिकार तुज [18]अनन्यास, ।
[19]समुचित होय वदान्या परमवदान्यालयीं धनन्यास. ॥ ६१
वाजउनि मधुर वीणावेणुमृदंगादि सर्व वाद्यांतें, ।

---

१. सहा हजार वर्षें. २. महादेवास. ३. भाटाप्रमाणें. भाट हा राजे वगैरे थोरांची स्तुती करणाऱ्या लोकांचा एक वर्ग आहे. ह्या वर्गाची बोलण्याच्या व वर्णन करण्याच्या कामीं इतकी प्रसिद्धि आहे कीं मराठी भाषेंत 'भाटासारखा बोलतो' अशी म्हण रूढ आहे. ४. अन्वयः—तो सावर्णी (नामविशेष—मनु] [शंकरांनीं] पाठ थापटुनी ग्रंथकृदजरामर (=ग्रंथकार व चिरंजीव) केला. ५. वरुणा व असी ह्या नद्यांच्या संगमावर असणारें क्षेत्र; हेंच काशीपुरीचें मूळ ठिकाण. ६. साजुक तुपाच्या. ७. अन्वयः—शिवप्रसादें शक्र (=इंद्र) देवराज्याच्या पदा योग्य झाला. ८. खरें, उत्तम. ९. दुसरें. १०. साधुसमुदायास. ११. दांत. १२. मनांत धरून, इच्छून. १३. कृपा+आस्पद=कृपेचें स्थान, कृपापात्र. १४. (शंकराच्या) चरणाच्या ठायीं समर्पिलीं आहेत वाचा, मन आणि शरीर ज्यानें असा. १५. भक्ति हीच कोणी साध्वी स्त्री. १६. पाय ठेवणें. पाऊल टाकणें. तुज सदना सोडुनी= त्वद्रूपी वरास सोडून, तूं हेंच कोणी घर त्याला सोडून. १७. माझ्याहून दुसऱ्यास. अन्वयः—मदन्यास प्रिय मानुनि जसी उमा न भजे, [तसि] तव मति न भजो. १८. नाहीं अन्य (दुसरा, मज शंकराहून इतर) ज्याला, त्यास. अर्थात् मद्व्यतिरिक्त भक्तिस्थान ज्याला नाहीं, अशा नारदास. १९. अन्वयः—वदान्या (=उदार मनुष्याला) परमवदान्यालयीं (=आपल्याहून अतिशय उदार अशा मनुष्याच्या घरीं) धनन्यास (=द्रव्याची ठेव ठेवणें) समुचित (=यथायोग्य) होय. हे नारदा! देण्याची वासना आपल्याहूनही ज्याला अधिक आहे अशा गृहस्थाच्या घरीं ठेव ठेवणें हेंच उदार पुरुषाला योग्य. ह्या व्यवहारास अनुसरून, लोकांस सदुपदेश करून तारण्याची तुझी माझ्याहूनही अधिक उत्कंठा पाहून अवघ्या जगाच्या गुरुस्थानीं तुझी योजना मीं केली, हें माझें करणें योग्यच झालें, असा भाव.

प्रेमें सुस्वर गाउनि, डोलविशिल याहि[1] विष्टपाद्यातें.' ॥ ६२
वर्णावें एकमुखें म्यां प्रभुयश किति, कसें रमेशा तें? ।
ऐक, सदा मन्मानस भगवद्भजनीं जसें रमे शातें[2]. ॥ ६३

अध्याय दुसरा.

मी व्याघ्रपाद[3]मुनिचा सुत, माझा बंधु धाकटा सौम्य[4], ।
उपमन्यु नाम माझें, त्याचें अभिधान[5] माधवा! धौम्य. ॥ १
कथितों सविस्तर, प्रभु[6] तारी मज परममुग्ध भक्ता, तें. ।
पाहें बाळक[7] मी ऋषिशिशुभक्षित[8] रम्य दुग्धभक्तातें. ॥ २
मातेसि म्हणें 'तैसें दुग्धौदन[9] मज यथेष्ट[10] दे खाया' ।
बहुदुःखभरें[11] उघडुनि दृष्टि न शकली मदास्य देखाया. ॥ ३
मग माझी ती माता पिष्ट जळीं कालवूनि तें कढवी, ।
ठकवी किति दिवस[12] असें, दारिद्र्यचि[13] कपट तीस तें पढवी. ॥ ४
[14]पोषिलि होती चुंबुनि जी शांतिसुरभि तदूधभा तातें ।
शोषलि, दुःखें मायचि, तैशा वाढून दूधभातातें. ॥ ५

---

१. याहि विष्टपाद्यातें=सर्व जगाचें आदिकारण जो मी शंकर, त्या ह्या मलाही. २. सुखानें. शात=सुख. पूर्वार्ध—अर्थसादृश्य—'जगदंबेचें एकानन कवि वर्णील काय सोहाळे? ॥' (मोरोपंतकृत विनायकमाहात्म्य २।८.) ३. एक वसिष्ठकुलोत्पन्न ऋषि. ४. शांत स्वभावाचा. ५. नांव. ६. शंकर. मुग्ध=मूढ. ७. लहान वयाचा असा मी, लहानपणीं मी. ८. ऋषिपुत्रानें भक्षिलेल्या सुंदर दूधभातातें. ९. दूधभात. १०. पोटभर. ११. सार्थान्वयः—बहुदुःखभरें (अत्यंत दुःखावेगामुळें, अतिशय दुःख होऊन) दृष्टि उघडुनि मदास्य (मत्+आस्य=माझें मुख) देखाया न शकली. १२. बहुत दिवसपर्यंत. १३. अन्वयः—दारिद्र्यचि तें कपट तीस [स्वभावतः निष्कपट अशा माझ्या आईस] पढवी (शिकवी). १४. सार्थान्वयः—तैशा दूधभातातें वाढुनि, जी शांतिसुरभि (=शांतिरूप कामधेनु) पोषिली होती, तदूधभा (=तिच्या ओटींतील तेज, ओटींतील तेजस्वी दूध) चुंबुनी तातें शोषिली (=सुकी, रिती केली) [व] दुःखें मायचि शोषिली (=रक्तहीन, फिकट व अशक्त केली). दारिद्र्यामुळें जी माझ्याबरोबर चाललेली फसवणूक पाहून, माझ्या बापाची शांति मोठ्याच कसोटीला लागली व आई तर दुःखानें करपलीच्च, हा भाव. येथें संकटकाळीं पुरुष कशीबशी तरी शांति संभाळतात. पण स्त्रिया होरपळूनच निघतात हें दर्शविलें आहे. तसेंच पित्यापेक्षां मातेच्या अंगीं अधिक कोमलपण व कमी धीर असतो, हेंही सुचविलें आहे. ऊधन्=ओटी.

झांकी[1] जी दुग्धकपट, बा! करि उघडेंहि तीच ममता तें; ।
ज्ञातिकुळीं यज्ञातें जातां, नेलें मलाहि मम तातें. ॥ ६
घडलें[2] तेथें कृष्णा! दिव्यसुरभिदुग्धपान; रस[3] मजला ।
समजे सत्यानृत[4], गुरुभक्त जसा काय बा! नर समजला. ॥ ७
सेवविला[5] मातेनें श्रुतिनें जो 'सेव्य' म्हणुनि विष्टरसा, ।
विषया ब्रह्मज्ञ, तसा भुललों दुग्धज्ञ मी न पिष्टरसा. ॥ ८
यदुवीरा! बाळपणें ऐसें उपमन्यु हा वदे तीस[6]; ।
'माते! क्षीर[7] नव्हे हें; नलगे; ठेवूनी नांव[8] देतीस.' ॥ ९
या मद्वचनें कृष्णा! अंबा[9] बहु गहिंवरे[10], असुख[11] पावे[11], ।
वाटे[12] तीस[12] असें कीं, 'जन्म विफळ, आपुले[12] असु[12] खपावे[12].' ॥ १०
कृष्णा! मज आलिंगुनि मस्तक[13] हुंगुनि, असें म्हणे माता, ।
'मागसि[14] तें दुग्धौदन कैचें या तापसाजना? ताता! ११
वाताहार[15] करावा, प्यावें जळ, शाकमूळफळ खावें; ।
सुखभोग[16]विहीनत्वें बा! आम्हां तापसांसि वळखावें. ॥ १२

---

१. अन्वयः—बा! जी ममता (माया) दुग्धकपट (दुधाविषयीं केलेलें कपट) झांकी, तीच [ममता] तें उघडेंहि करी. कारण जेव्हां नातेवाईकांच्या घरीं यज्ञ सुरू झाला, तेव्हां तेथें खरा दूधभात चार दिवस खावयास मिळेल म्हणून माझ्या बापानें मला मोठ्या प्रेमानें बरोबर नेलें व खरोखरचा दूधभात भरविला. तेव्हां कपटाचें कारण जें प्रेम, त्यानेंच तें कपट उघडकीस आणलें! २. दिव्यसुरभिदुग्धपान घडलें=कामधेनूचें दूध मला पिण्यास मिळालें. ३. गोडी किंवा आनंद. ४. सार्थान्वयः—बा! जसा काय गुरुभक्त नर (=गुरूचे ठिकाणीं निष्ठा ठेवणारा मनुष्य) सत्यानृत रस (=खरा व खोटा आनंद; ब्रह्मानंद व ऐहिकविषयानंद) समजला, [तसा] मजला सत्यानृत रस (=खरें व खोटें दूध किंवा त्यांचा स्वाद) समजे. ५. सार्थान्वयः—जो [ऐहिकविषय] विष्टरसा (=दर्भमुष्टीप्रमाणें) 'सेव्य' म्हणुनि श्रुतिनें (=वेदांनीं) सेवविला, [त्या] विषया [जसा] ब्रह्मज्ञ [न भुले], तसा, जो [पिष्टरस] मातेनें [सेव्य म्हणुनि] सेवविला, [त्या] पिष्टरसा दुग्धज्ञ मी न भुललों. जसा ब्रह्मवेत्ता वेदांनीं सांगितलें तरीही ऐहिकविषयाचा आस्वाद घेत नाहीं, त्याप्रमाणें खऱ्या दुधाची गोडी अनुभवलेला मीही आईनें भरविलेलें तें पीठ खाईनासा झालों, असा उपमन्यूच्या भाषणाचा भाव. ६. मातेस. ७.दूध. ८. दूध म्हणून. दूध नसून त्यास दूध असें म्हणून. ९. आई. १०. सद्गदित झाली. ११. तिला वाईट वाटलें. १२. प्राण जाईल तर बरें असें तिला वाटलें. १३. मस्तक हुंगणें हें प्रेमाचें द्योतक आहे. १४. सार्थान्वयः—ताता! (बाळा) [जें] मागसि, तें दुग्धौदन या तापसजना कैचें? तें आपल्यासारख्या दरिद्री तापस्व्यांकरितां नव्हे, असा भाव. १५. वायुभक्षण. १६. सार्थान्वयः—बा! आम्हां तापसांसि सुखभोगविहीनत्वें वळखावें (ओळखावें). सुखोपभोगाचा अभाव हेंच तापसांचें लक्षण होय.

बा! आम्हांऐशांची[1] परमा[2] गति शिव, तया सदाराध्या[3], ।
क्षीरौदन[4] किति? पुरविल सकळेच्छित, ईश्वरा सदारा[5] ध्या[6]. ॥ १३
वत्सा! सांबपदाश्रित[7] तरले बहुसंख्य[8] वन्य[9] तापस रे; ।
ताप[10] सरे शिवभजनें, ब्रह्मांडामाजि[11] धन्यता[12] पसरे.' ॥ १४
मी कर जोडुनि पुसता झालों 'माते[13]! कसा सदाशिव तो? ।
कोठें असतो? कैसा दास तया स्वामिच्या पदा शिवतो? ॥ १५
शिवदर्शनकर[14], निश्चितफळ[15] जो सदुपाय तापसां गमला, ।
तो जननि! मन निवाया, जाया निःशेष ताप, सांग मला.' ॥ १६
या मद्वचनें मोहविहसा[16] सहसा मदीयजननीला ।
आला पुष्कळ गहिंवर, 'अहिवरशयना[17]! अकाळ[18] घननीळा! ॥ १७
सांगों काय प्रेमें भेटुनि मज, मस्तकासि हुंगी तें? ।
मातेतें[19] सदपत्य प्रिय बहुतचि, सुमधु जेविं मुंगीतें. ॥ १८
उपदेशी जें श्रीशिवतत्वमहावाक्य[20] मज मदंबा, तें ।
मातें बहु धन्य करी, कृष्णा! तेंव[21] जेविं पदें[21] कदंबातें[21]. ॥ १९
माय मज म्हणे 'वत्सा! बहु दुर्ज्ञेयस्वरूप[22] शिव सांचा[23], ।

---

१. आम्हांसारख्यांची. २. मोठा थारा. ३. तया सदाराध्या=साधूंनीं आराधन करण्यास योग्य अशा त्याला. ४. क्षीरौदन किती?=दूधभाताची मातबरी ती काय? ५. पार्वतीनें युक्त अशा. ६. स्मर. ७. शंकराच्या पायाचा आश्रय केला आहे ज्यांनीं असे. ८. पुष्कळ. फार आहे संख्या ज्यांची असे. ९. वनांत राहणारे. १०. आधिभौतिक, आदिदैविक व आध्यात्मिक असा त्रिविध ताप. अथवा जन्ममरणाचा ताप, चवऱ्याशीचा फेरा. ११. त्रैलोक्यांत. १२. कीर्ति वाढते. १३. अन्वयः—'माते! तो सदाशिव कसा [व] कोठें असतो? दास तया स्वामिच्या पदा कैसा शिवतो? (त्या प्रभुच्या पायाचा स्पर्श भक्तांस कोणत्या प्रकारें लाभतो? अर्थात् प्रभुचरणाशीं भक्त कोणत्या उपायानें जातो?). १४. श्रीसांबाचें दर्शन करून देणारा. १५. निःसंशय फल देणारा. हें व 'शिवदर्शनकर' हीं दोन्हीं 'सदुपाय' ह्याचीं विशेषणें. १६. मूर्च्छा आणणारा असा. १७. सर्पश्रेष्ठ जो शेष त्यावर शयन करणाऱ्या (हे कृष्णा!). १८. अवेळीं, योग्य प्रसंग नसतां. मीं शिवप्रसाद साधण्याचा उपाय विचारला, यांत तिला रडण्यासारखें किंवा गहिंवरण्यासारखें कांहीं नव्हतें, हा भाव. १९. अन्वयः—जेंवि मुंगीतें सुमधु [तेविं] मातेतें सदपत्य (उत्तम मूल) बहुतचि प्रिय [असे]. हें सुभाषितरूप आहे. २०. श्रीमत् शंकराच्या व्यापकतेच्या महासिद्धान्ताचा उच्चार. २१. कृष्णावतारीं कालियामर्दनसमयीं प्रभूंनीं यमुनेच्या कांठीं असणाऱ्या कळंबवृक्षावर चढून तेथून यमुनेंत उडी टाकली. गोपींचीं वस्त्रें घेऊनही प्रभु श्रीकृष्ण कळंबाच्याच झाडावर बसले होते. ह्या गोष्टी येथें अनुसंधेय होत. २२. जाणण्यास कठीण आहे स्वरूप ज्याचें असा. २३. खरोखर.

जीवा[1] दुर्लक्ष्य[2] सदा, दिवसांधा जेविं नाथ[3] दिवसाचा. ॥ २०
[4]सुज्ञमहर्षिसभेची ऐसी[5] म्यां स्पष्ट मात आयकिली; ।
[6]पावे तो गुरुरूप, श्रीशिव देतो जयासि पायकिली. ॥ २१
[7]दुर्ज्ञेय जसें निर्गुण, शिवरूप तसेंचि सगुणही बा! गा! ।
विश्वांत विश्वरूपें वसती; विरळा[8] दिसे महाभागा. ॥ २२
श्रीशिव निर्गुण सगुणहि दुर्ज्ञेय, तथापि भक्तवश गा! तो; ।
[9]त्याला सुलभ, प्रेमें जो आत्मार्पण करूनि यश गातो. ॥ २३
[10]ब्रह्मादिपुत्तिकांतें निर्मुनि, वे तो म्हणोनि ओतारी ।
आपणचि आपणातें, प्रभुची प्रणतां म्हणोनि 'ओ'तारी. ॥ २४
[11]नसतां सद्भक्ति बृहस्पतिमुनिशिष्याहि वासवा गोते, ।
जडहि तरति, म्हणति 'मति न शास्त्रीं, सोडुनि शिवास, वागो' ते. ॥ २५

---

१. प्राणिमात्रास. २. दिसण्यास कठीण. ३. सूर्य. दिवसांध=वाघूळ. ४. विद्वान् व महातपोनिष्ठ अशा लोकांची. ५. अशी (=पुढील गीत्यर्थांतील) गोष्ट. ६. सार्थान्वयः—जयासि (ज्याला) श्रीशिव पायकिली (चरणरूप इंगित) देतो, तो गुरुरूप पावे (=तो गुरुरूपाप्रत पावतो, शिवस्वरूप होतो). ७. परमेश्वराचीं साकार व निराकार अशीं दोन्हीं रूपें समजावयास कठीण आहेत. ८. विरळा महाभागा दिसे=जगांत क्वचित्‌च दिसणारे जे महाज्ञानी पुरुष, त्यांनाच मात्र हा दिसतो. 'महाभाग' याचा 'भाग्यवान् पुरुष' असाही अर्थ होईल. ९. अर्थसादृश्य—स स्थाणुः स्थिरभक्तियोगसुलभः । विक्रमोर्वशी. अन्वयः—जो आत्मार्पण करूनि, प्रेमें यश गातो त्याला [तो] सुलभ. १०. सार्थान्वयः—ब्रह्मादिपुत्तिकांतें (=ब्रह्मदेवादि मूर्तींना, पुतळ्यांना) निर्मुनि, तो [शिव] आपणचि आपणातें ओतारी (=ओतींव काम करणारा, मूर्तिकार) म्हणोनि (म्हणवून वे;) म्हणोनि (=तेव्हां, यास्तव, या कारणामुळें) प्रभुची 'ओ' प्रणतां (=भक्तांना) तारी. सर्वसंग्रहांत या गीतीच्या प्रथम व तृतीय चरणांची उलटापालट आहे. परंतु त्या पाठांत निष्कारण दूरान्वय होतो. ११. सार्थान्वयः—सद्भक्ति नसतां बृहस्पतिमुनिशिष्याहि वासवा गोते [वसति] (इंद्र हा देवांचा राजा आणि पुनः बृहस्पतींचा शिष्य परंतु केवळ सद्भक्ति नसल्यामुळें, त्याला सुद्धां हिसके खावे लागतात, मग इतरांची कथा काय?) [परंतु जे] म्हणती [कीं] शिवासि सोडुनि शास्त्रीं मति न वागो (=न वावरो) ते जडहि तरती. येथें 'जड' व 'तरणें' हे शब्द श्लिष्ट आहेत. जड=(१) मंद बुद्धीचे, (२) फार वजनाचे. तरणें=(१) मोक्षपदाला जाणें, (२) पाण्यांत तरंगणें. प्रभुनामस्मरणाचा महिमा पंतांनीं इतरत्र असाच वर्णिला आहे:—न लगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती । वैकुंठ पेठ मोठी नामावर हीन दीन खट पटती. ॥

होईल सुभक्तिनें तें पूर्ण मनीं इच्छिसील वत्सा! जें. ।
दु:सह तेजस्वित्वें शिवभालदृगग्निकीलवत् साजें.' ॥ २६

अध्याय तिसरा.

उपमन्यु म्हणे 'हितकर जननीचा सदुपदेश, तो याचा, ।
ग्रीष्मीं तृषिता पांथा दाखविला जेंवि देश तोयाचा. ॥ १
बाळाहि दिल्हा साधुनि उपदेशें परम लाभ जननीच्या. ।
घडलें, बहु उच्चासहि अतिदुर्घट, पर मला भजन नीचा. ॥ २
बुडतां मनोरथीं, ने बोध तिचा धरुनि हात पार मला ।
शिवचरणाब्जीं अलिसा अल्पवया करुनि हा तपा रमला. ॥ ३
काय शिवभजन, असल्या लालाश्रुभरें नहात, पोराशी? ।
झाला बाळपणांतचि, बा! व्हावा जरि न हा तपोराशी. ॥ ४
वर्षे सहस्र वामांगुष्ठाग्रीं मी हरे! उभा राहें, ।

---

१. सार्थान्वयः—वत्सा! (उपमन्यो!) जें मनीं इच्छिसील तें सद्भक्तीनें पूर्ण होईल. दु:सह तेजस्वित्वें (=सहन करण्यास कठीण अशा तेजानें युक्त होत्साता) [तूं] शिवभालदृगग्निकीलवत् (शिव+भाल+दृक्+अग्नि+कीलवत्=शंकराच्या कपालावरील नेत्राच्या अग्निज्वालेप्रमाणें) साजें (शोभावेंस). २. उपमन्यु म्हणे जननीचा (आईचा) सदुपदेश (उत्तम उपदेश) हितकर; तो [तेंवि] याचा (मागा, मागें लागून 'दे' म्हणा) जेंवि ग्रीष्मीं (उन्हाळ्यांत) तृषिता पांथा (प्रवाश्यास) दाखविला (दाखविलेला) तोयाचा देश (पाणी ज्या ठिकाणीं आहे तो प्रांत). आईच्या उपदेशाची केवढी योग्यता आहे, हें येथें स्पष्ट दर्शविलें आहे. ३. अन्वयः—जननीच्या उपदेशें [मला] बाळाही (लहान असतांनाच) परम लाभ साधुनि दिल्हा; [कारण] बहु उच्चासही (फार मोठ्यास सुद्धां) अति दुर्घट (साधण्यास फार कठीण); पर (परंतु) मला नीचा (क्षुद्रास, यःकश्चितास) भजन घडलें. ४. सार्थान्वयः—मनोरथीं बुडतां (आपली इच्छा सफल होत नाहीं म्हणून मी निराश झालों असतां,) तिचा बोध हात धरुनि मला पार ने (नेता झाला. अर्थात् आईच्या उपदेशाच्या बलावर माझे मनोरथ पूर्ण झाले). अल्पवया (लहान वयाचा) हा (मी उपमन्यु) तपा करुनि शिवचरणाब्जीं अलिसा (भ्रमराप्रमाणें) रमला (रममाण झाला). शंकरपदसेवेंत सानंद निमग्न झालों, असा भाव. ५. सार्थान्वयः—लालाश्रुभरें (लाळ व अश्रु ह्या दोहोंच्या ओहोळांनीं) नहात असल्या (भिजून जाणाऱ्या, लडबडणाऱ्या) पोराशी शिवभजन काय? (=कसचें साधणार?) [पण] बा! (हे कृष्णा) बाळपणांतचि जरी तपोराशी न व्हावा तरी] हा (=मी उपमन्यु) झाला. ६. डावे पायाच्या आंगठ्यावर. ७. श्रीकृष्णा!

[1]मंदसु परस्पर ह्मणति 'न अपयश हो, वपु अरे! उभारा हें.' ॥ ५
शतवर्षें फळभक्षण[2], शतवर्षें अशन शीर्णपर्णांचें[3], ।
शतवर्षें मग कृष्णा! तृष्णाशमनार्थ पान अर्णाचें[4]. ॥ ६
[5]सप्तशताब्द [6]मरुदशन करुनि, शिवासि, न [7]ह्मणोनि 'हाय,' नमीं. ।
ऐसें करिता झालों [8]उग्र तप [9]सहस्र दिव्यहायन मी. ॥ ७
[10]प्रभुवर मातें [11]निजपदपद्मासवपानमत्त पाहून, ।
होय प्रसन्न, मानी अन्यतप [12]स्वल्प [13]मत्तपाहून. ॥ ८
[14]मत्सत्व परीक्षाया [15]हरिच्या वे [16]वामदेव सोंगातें. ।
[17]कृष्णा! 'होय, नव्हे' हा संदेह मनीं नदे वसों गा! तें. ॥ ९
[18]सर्वामरगणवेष्टित, ऐकत गंधर्वगीत[19] यश कानीं, ।
मिरवित[20] पवितें, [21]भ्यावें ज्या चवरा सर्वशत्रुमशकांनीं, ॥ १०
[22]केयूरकिरीटकटककुंडलवररत्नहारपदकांहीं ।
[22]भूषित होउनि, करित स्मित [23]अतिशयितप्रसादपद कांहीं, ॥ ११

---

१. सार्थान्वयः—'अपयश न हो (होवो), अरे! हें वपु उभारा' असें मदसु परस्पर ह्मणति. माझे प्राण आपसांत ह्मणूं लागले 'अरे बावांनो! हें शरीर ताठ ठेवा, नाहींपेक्षां प्राण गेल्यामुळें शरीर खालीं पडून तपश्चर्येचा भंग झाल्यास, तो अवघा दोष आपणांकडे येईल, तो न येवो.' प्राण पांच आहेत ह्मणून अनेकवचनी प्रयोग आहे. 'परस्पर' हें क्रियाविशेषण. २. भक्षण. ३. वाळलेल्या पानाचें, गळून पडलेल्या पानाचें. ४. उदकाचें. ५. सातशें वर्षें. ६. मरुत्+अशन=वायूचें भक्षण. ७. हाय न ह्मणोनि=दुःखोद्गार न काढितां; न त्रासतां. ८. खडतर, कडक. ९. देवांचीं हजार वर्षें. १०. समर्थश्रेष्ठ शंकर. ११. निज+पद+पद्म+आसव+पान+मत्त=आपले चरण हेच कमलें त्यांतील (भक्तिरूप) मधूच्या प्राशनानें धुंद झालेला असा; अर्थात् अनन्यभावें चरणसेवेंत गुंगलेला. १२. कमी. १३. मत्+तपाहून=माझ्या तपापेक्षां. १४. माझा निश्चय कसोटीस लाविण्याकरितां. १५. इंद्राच्या. १६. महादेव. १७. सार्थान्वयः—कृष्णा! तें (सोंग) 'होय [कीं] नव्हे' हा संदेह (संशय) मनीं वसों नदे. शिवानें इंद्राचें सोंग असें बेमालुम घेतलें होतें कीं हा इंद्र होय कीं नाहीं अशी तिलप्राय शंका सुद्धां उद्भवली नाहीं. १८. सर्व देवपरिवारासह. १९. गंधर्वांनीं गाइलेलें. हें 'यशा'चें विशेषण. २०. डौलानें धारण करून. २१. ज्या चवरा (=ज्या वज्ररूप चवरीला) शत्रुरूप मशकांनीं भ्यावें. चवरी ढळत असतां माशी फिरकत नाहीं, तद्वत् वज्र परजत असतां शत्रु तोंड काढीत नसे. दहापासून तेरापर्यंतच्या गीतींतील 'ऐकत', 'मिरवित,' 'करित,' 'देत', 'देखत देखत,' व 'देत' या अपूर्णक्रियावाचक कृदंतांचा संबंध चवदाव्या गीतींतील 'आला' या क्रियापदाकडे आहे. २२. बाहुभूषण, मुकुट, कडीं, कर्णभूषण (कुडक्या), उत्कृष्ट रत्नहार व त्यांतील पदकें यांनीं अलंकृत. २३. अत्यंत प्रसन्नतेचें स्थान, अर्थात् ज्यांत प्रसन्नता स्पष्ट बिंबली आहे असें. हें 'स्मित' ह्याचें विशेषण. 'स्मित'=गालांतल्या गालांत हसणें. कांहीं=ज्याचें वर्णन करितां येत नाहीं असें.

चि[१]त्तांत आतपत्रें बहु लज्जा देत शारद शशीतें, ।
[२]करुणामृतें शतें निजनयनाचीं करुनि फार दश शीतें, ॥ १२
मार्गीं वराप्सरांच्या देखत देखत स[३]लील लास्या[४]तें, ।
आ[५]स्यातें अवलोकुनि, न[६]र्मरसें पुष्टि देत हा[७]स्यातें, ॥ १३
आला स्कंधीं बैसुनि सां[८]त्वित ना[९]गा सुधा[१०]वदाता, तें ।
[११]केलें कपट, परि दिल्ही ठकउनि बाळा सुधा वदा तातें. ॥ १४
[१२]शक्र म्हणे 'वर देतों, जो तुज हित विप्रसत्तमा ! गमला, ।
झालों बहु तुष्ट तपें, आलों मी वरदराज, माग मला.' ॥ १५
ऐसें ऐकुनि, कृष्णा ! जेंवि घनें दावपावक, वि[१३]झालों, ।
[१४]जो मी प्रार्थुनि म्हणतां 'शंभो ! पद दाव, पाव' कवि झालों. १६
वदलों शक्रासि 'महादेवावांचूनि तों मला कांहीं, ।
तुजपासुनि कीं अन्या देवापासूनि मागणें नाहीं. ॥ १७
तुज कथितों सत्य, रुचे, शंभु नसे जींत, ती जनकथा न. ।
[१५]साचें कीं चित्रींचें वद शिशुच्या तृप्तिचें जनक थान ? ॥ १८
पशुपतिवचनें होइन तत्काळ वि[१६]शाळ वृक्ष कीं कीट[१७], ।

---

१. सार्थान्वयः—आतपत्रें (छत्रांनीं) शारद शशीतें (शरदृतूंतील स्वच्छ चंद्रास) चित्तीं बहु लज्जा देत. 'आतपत्रें' ही तृतीया आहे. २. सार्थान्वयः—करुणामृतें (दयारूप अमृताच्या योगें) निजनयनांचीं दशशतें (=दहा शेंकडे, हजार) फार शीतें करुनि. (दयार्द्र दृष्टीनें युक्त होऊन हा भाव). ३. हावभावासहवर्तमान. ४. नृत्यातें. ५. मुखातें. ६. क्रीडारसानें, शृंगार—चेष्टांनीं. ७. हास्यातें पुष्टि देत=हंशीं पिकवीत. ८. चुचकारीत. ९. ऐरावतास. १०. अमृताप्रमाणें शुभ्र अशा. ११. सार्थान्वयः—तें कपट केलें, (सोंग घेण्याची लवाडी केली) परि तातें (पित्यानें) बाळा ठकवुनि सुधा (अमृत) दिल्ही [असें] वदा (म्हणा). १२. सार्थान्वय—हे विप्रसत्तमा (=ब्राह्मणश्रेष्ठा !) जो वर तुज हित (=कल्याणप्रद) गमला (=भासला) तो देतों, मी वरदराज (=वर देणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ) तपें तुष्ट झालों [व] आलों, मला (=माझ्यापाशीं) माग. १३. निस्तेज झालों. १४. सार्थान्वयः—जो मी 'शंभो ! पद दाव, पाव' [असें] म्हणतां कवि (=ज्ञानी, सत्य ज्ञानवान्) झालों, [तो मी] ऐसें [इंद्राचें भाषण] ऐकुनी, जेंवि घनें (=मेघानें, जलवृष्टीनें) दावपावक (=वणवा) [तेंवि] विझालों [=निस्तेज झालों]. १५. सार्थान्वयः—वद, साचें किं चित्रींचें (खरोखरीचें कां चित्रांत काढिलेलें) थान (स्तन) शिशुच्या तृप्तिचें जनक (उत्पन्न करणारें) ? सांग पाहूं, मुलाचें समाधान चित्रांतील स्तनपान केल्यानें होईल कां खरें स्तनपान केल्यानें होईल ? १६. प्रचंड, मोठा. १७. किडा.

[1]स्वात्म्यापरीस बहुमत मज सर्व स्वच्छ विप्र [2]वरदास. ॥ ३६
[3]या भक्तिनें मुदित मी झालों वरदेश **सो**म, वत्सा! जें ।
हित, तें घे, स्वयशें हा निववुनि वर देश, **सो**मवत् साजें.' ॥ ३७
या **प्र**भुवचनश्रवणें वाहे प्रेमाश्रु लो[4]चनावाटे, ।
दाटे कंठ, जगीं मी धन्य, असें बं[5]धमोचना! वाटे. ॥ ३८
[6]करमस्तकचि न शिवले क्षितिसि, म्हणति 'नमन हो बरें' गुडघे, ।
बहुहर्ष तो म्हणे **प्र**भु बहुदुर्गतशिशुसि, 'खोबरें गुड घे.' ॥ ३९
कृष्णा! करी मदंगीं [7]एकैका [8]परम हर्ष पद लोमीं, ।
बहु[9]कंपसंपदास्पद होउनि, ऐसें नमूनि वदलों मी. ॥ ४०

---

१. प्राणांपेक्षांही. २. वर देणाऱ्यास. अर्थसादृश्यः—भक्तीनें वश सत्पतीस करिती साध्वी, मला मज्जन; । प्रेमांभोनिधि संत, त्यांत करितों मी मीनसा मज्जन; ॥ त्यांला मीच, मलाहि तेच रुचले; ते हंस, मी मानस; । श्री त्यांहींच मला, मदीय भजनें त्यांचें सुखी मानस. ॥ ६३ ॥ सर्वस्व मी सज्जनांचें, माझें सर्वस्व सज्जन; । पावेन मी, न पावेल कधीं मज्जन मज्जन. ॥ ६४ ॥ इ० मोरोपंत–भक्तभूषण. ३. सार्थान्वयः—वत्सा! मी वरदेश (वरद+ईश=वर देणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ) सोम (स+उम=पार्वतीसहवर्तमान असणारा असा), या भक्तिनें मुदित (प्रसन्न) झालों; जें हित तें घे; [व] हा वर देश (उत्तम प्रांत) स्वयशें निववुनि (शांत करून) [तूं] सोमवत् (चंद्राप्रमाणें) साजें (शोभायमान हो). चंद्राचे ठायीं शीतलता व सतेजता असे दोनही गुण आहेत; व हे उपमन्यो! त्वां संपादिलेल्या यशानें तुझ्या अंगीं आलेलें तेज प्रखर नसून दुसऱ्याचा ताप हरण करणारें आहे; असा भाव. टीपः—संस्कृतामध्यें 'वत्' प्रत्यय लागून क्रियाविशेषण होतें. तेव्हां 'सोमवत्' हें विशेषण नसून क्रियाविशेषण आहे; ह्याचा संबंध 'साजें' ह्या क्रियापदाकडे. ४. डोळ्यांतून. ५. संसाररूपी बंधापासून मुक्त करणाऱ्या श्रीकृष्णा! ६. सार्थान्वयः—करमस्तकचि (हात व माथा हेच केवळ) क्षितिसि (भूमीस) न शिवले; तर गुडघे[ही] बरें नमन हो म्हणति (चांगला प्रणिपात घडो असें म्हणूं लागले. अर्थात् साष्टांग नमस्कार मीं घातला असा भाव). 'खोबरें गुड घे' (हें गुळ खोबरें घे=हा खाऊ घे) [असें] तो बहुहर्ष (=आनंदानें भरलेला, आनंदरूप प्रभु) बहुदुर्गत शिशुसि (=अगदीं कनिष्ठ स्थितीस गेलेल्या मुलास, दुःखानें बुजबुजलेल्या भक्तास) म्हणे. ७. एकैका लोमीं=केंसागणिक. ८. परमहर्ष पद करी=अत्यानंद पाऊल ठेवी. हा प्रयोग केवळ संस्कृतपद्धतीचा आहे. एकैका लोमीं परम हर्ष पद करी=हर्षानें माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले, आनंदानें अंगावर कांटा उभा राहिला. जसा आश्चर्यानें किंवा आकस्मिक भीतीनें तसाच हर्षानेंही अंगावर कांटा उभा राहतो; त्याला 'लोमहर्षण' असें संस्कृतांत म्हणतात. उदाहरणार्थ— इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः । संवादमिममश्रौषमद्भुतं **रोमहर्षणम्** ॥ गीता १८।७४. श्रीवासुदेवपार्थांचा हा संवाद महाद्भुत । राया! आयकिला अंगीं कांटे अद्यापि माझिया ॥ वामन-पंडित,—गीतासमश्लोकी. ९. बहु+कंप+संपत्+आस्पद=पुष्कळ जी कंपरूप संपत्ति तिचें स्थान. °संपदास्पद होऊन=थर थर कांपत.

'झालों[1] धन्य, मजपुढें तो कीं तूं प्रभु उभा; सुरासुर ज्या ।
परम गुरु म्हणति, वंदिति यच्चरणाच्या सुभासुरा सुरजा. ॥ ४१
धन्यतर कवण मदितर? हे सुरही, करुनिही महायास[2], ।
ज्याचे पाय न पाहति, त्या प्रभुला पात्र मी पहायास. ॥ ४२
या जगदवनाकरितां[3] द्रुत गिळिता होय जो अज[4] गरातें[5], ।
त्या तुज मी देखतसें साक्षात् काळाखुच्या[6] अजगरातें[7]. ॥ ४३
क्षम[8] दक्षवामपार्श्वांपासुनि[9] जो विधिसि[10] हरिसि[11] निर्माया[12], ।
त्यां[13] तुज पाहें, बा! हें नवल भवलयार्थ करिसि निर्माया! ॥ ४४
त्यांचा[14] रचिता तूं कीं, सूर्या, चंद्रा, यमा, मरुद्राजा ।
जो दुःसह, किंबहुना कांपे ब्रह्मांडधाम रुद्रा ज्या.' ॥ ४५
ऐसें[15] बोले, हांसे, उद्धरिला तो जसा करी, नाच ।
ब्राह्मण हा ब्रह्मण्या! देवा! तैसा पुरे करीनाच! ॥ ४६
कृष्णा सजलजलदहरिनीलनिभानंदकंदनवदेहा[16]! ।

---

१. सार्थान्वयः—धन्य झालों (कृतार्थ झालों) कीं (कारण) ज्या सुरासुर (देव व दैत्य) परम गुरु (श्रेष्ठ गुरु) म्हणति [व] यच्चरणाच्या (ज्याच्या पायाच्या) सुभासुरा (अत्यंत तेजस्वी) सुरजा (उत्तम रजःकणाला) वंदिती, तो तूं प्रभु मजपुढें उभा. २. अतिश्रम. ३. जगाचें संरक्षण व्हावें ह्या हेतूनें. ४. जन्मरहित, ईश्वर. ५. कालकूटविषातें. ६. काळरूप उंदिराच्या. ७. सर्पविशेषातें—सर्प उंदीर गिळून टाकतात हें सर्वत्र प्रसिद्ध आहेच. ८. समर्थ. ९. उजव्या आणि डाव्या बाजूपासून. १०. ब्रह्मदेवास. ११. विष्णूस. १२. उत्पन्न करण्यास. १३. अन्वयः—त्या तुज [मी] पाहें; बा! निर्माया! (=मायारहिता! ज्ञानस्वरूपा!) [तूं] हें (=माझ्या सारख्या अज्ञ व क्षुद्रबाळकालाही दर्शन देणें इत्यादि) नवल [केवळ] भवलयार्थ (=संसाराचें निर्मूल व्हावें म्हणून) करिसी. १४. सार्थान्वयः—सूर्या, चंद्रा, यमा, मरुद्राजा (मरुद्देवांचा राजा—इंद्र—त्याला) जो दुःस्सह (अर्थात् ज्याच्या पुढें सूर्यादि देवांचा निभाव लागत नाहीं) किंबहुना (सारांश) ज्या रुद्रा (रुद्रावतारास) ब्रह्मांडधाम (ब्रह्मांडरूप गृह) कांपे (भितें) त्याचा (त्या रुद्रचा) रचिता (उत्पन्नकर्ता) तूं कीं (खास, निश्चयें तूंच आहेस). टीपः—युगाचा अंतकाल आला असतां सर्व स्थावर जंगम सृष्टीचा संहार करण्यासाठीं महादेव रुद्रावतार उत्पन्न करितो. १५. सार्थान्वयः—हा ब्राह्मण (मी उपमन्यु) [हे] ब्रह्मण्या! (श्रीकृष्णा!) देवा! ऐसें बोले, हांसे, [आणि] जसा [त्वां=कृष्णानें] उद्धरिला (=उद्धरलेला) तो करी (=तो प्रसिद्ध गजेंद्र), तैसा हा ब्राह्मण नाच पुरे करीनाच! गजेंद्राचा उद्धार झाल्यावर तो जसा नाचेत सुटला, तसाच शिवदर्शन झाल्यावर उपमन्यू जो नाचत सुटला, तो मुळीं थांबेच ना, हा भाव. १६. सजलजलद+हरिनील+निभ+आनंदकंद+नव+देहा=पाण्यानें भरलेले काळे ढग+इंद्रनीळ+समकांति+आनंदाचें मूळ+अपूर्व+शरीरा=काळे ढग व इंद्रनीळ यांप्रमाणें श्यामसुंदर, अत्यंत आनंद देणारा व अपूर्व असा आहे देह ज्याचा अशा श्रीकृष्णा!

वरदा स्मरदाहकरा विश्वेशा करुनि वंदन वदे हा. ॥ ४७
'देसि[2] यशाचें दासा जरि आजि, करुनि अनुग्रहा, चवर; ।
तरि भव्य भक्ति दे मज, द्यावा घ्यावा अनुग्र हाच वर. ॥ ४८
जाणावें सुज्ञानें म्यां भूतभविष्यवर्तमानातें, ।
स्वप्नीं न सांपडावें दुस्तरविपदंधगर्तमानातें[3]. ॥ ४९
क्षीरौदन[4] भक्षावें म्यां अक्षयसर्वबांधवांसहित, ।
त्वत्सान्निध्यें व्हावा माझा आश्रम सदा जगन्महित[5].' ॥ ५०
संप्रार्थिला[6] चराचरगुरु[7] विश्वेश्वर मला म्हणे 'साधो ! ।
बाधो आधि[8] व्याधि[9] न; जें त्वद्वांच्छित[10] असेल, तें साधो[11]. ॥ ५१
अजरामर[12] हो; होतिल तेहि, जसा तूं, तसे तव ज्ञाती[13]. ।
अनिवार्या[14] काळाची गति; परि न करिल तुझी अवज्ञा ती. ॥ ५२
दिव्यज्ञानसमन्वित[15] होसिल सन्मुनिजनासि सत्कार्य; ।
बहुमत यशासि हो तव नाम, जसें सन्मनासि सत्कार्य. ॥ ५३
दिव्यतपस्तपनाच्या[16] तेजा तव देहसुरनग[17] न सोडू[18]; ।

---

१. सार्थान्वयः—हा (मी उपमन्यु) वरदा (वर देणाऱ्यास) स्मरदाहकरा (मदनाचें भस्म करणाऱ्यास) विश्वेशा (जगत्प्रभूस) वंदन करुनि (नमस्कार करून) वदे (बोलता झाला). २. सार्थान्वयः—अनुग्रहा करुनि (कृपाळु होऊन) आजि (आज, सांप्रत) जरि दासा (भक्ताला) यशाचें चवर (चवरी) देसि (देतोस—अर्थात् दासावर जर यशाची पाखर घालणार असलास तर) भव्य (उत्कृष्ट—अर्थात् दृढ) भक्ती दे (तुझे ठायीं माझी अचल भक्ति राहो असा भाव). हाच अनुग्र (=सौम्य, ज्यांत लेश मात्रही भीति नाहीं असा) वर [कोणींही देणारानें] द्यावा [व घेणारानें] घ्यावा. कारण जर वर अशा सौम्य प्रकारचा नसेल, तर तो वरही अनिष्टावह होतो, ही गोष्ट रावण, भस्मासुर, सिंदूर, हिरण्यकशिपू वगैरेंच्या इतिहासावरून अगदीं उघड आहे. ३. दुस्तर+विपद्+अंध+गर्त+मानातें=तरावयास कठीण अशा विपत्तिरूप अंधेऱ्या खळग्याच्या विस्ताराला, आटोक्याला. अर्थात् विपत्ति स्वप्नांतसुद्धां नसो, असा या अर्धाचा भाव. ४. दूधभात. ५. जगानें मानिलेला असा, जगाच्या आदरास पात्र असा. ६. विनविलेला. ७. स्थावर व जंगम सृष्टीचा जनक. ८. मनस्संताप, दुःख. ९. रोग, दुखणें. १०. त्वत्+वांच्छित=तुझा मनोरथ, तुझें प्रिय. ११. सफल होवो. १२. वृद्धापकाळरहित व मृत्युरहित. १३. आप्त, बांधव. १४. सार्थान्वयः—काळाची गति अनिवार्या (मृत्यु कोणाक्यानेंही चुकवितां येणार नाहीं;) परि (परंतु) ती (काळगति) तुझी अवज्ञा न करील (काळाचा पगडा तुजवर बसणार नाहीं). १५. सार्थान्वयः—दिव्यज्ञानसमन्वित (दिव्य ज्ञानानें युक्त) [तूं] सन्मुनिजनासि सत्कार्य (आदर करण्यास, मान देण्यास योग्य असा) होसिल; जसें सत्कार्य (सत्कृत्य) सन्मनासी (सुजनांच्या अंतःकरणास) [बहुमत] [तेविं] तव नाम यशासि बहुमत (प्रिय) हो (होवो). तुझ्या नांवाचा महिमा सर्वत्र पसरो, असा भाव. १६. कडक अशा तपश्चर्यारूप सूर्याच्या. १७. देहरूप मेरुपर्वत. मेरूवर सूर्य सर्वकाळ तळपत असतो. १८. सोडो.

शोभो बहु मुनिपद हें त्वां, द्विजराजें[1] जसें गगन सोडु[2]. ॥ ५४
तुज भेटोनि निवाया येतिल सुकृतक्रियापर[3] महर्षी, ।
वाहुनि मस्तक चरणीं, होतिल, करुनि प्रिया, परमहर्षी. ॥ ५५
आहे आलिंगुनियां मजला मच्छक्ति[4] हे जसी अतुला[5], ।
राहेल यौवनश्री आलिंगुनि सर्वदा असीच तुला. ॥ ५६
वत्सा! उपमन्यो! म्यां तुजला दिधलाचि राशि दुग्धाचा, ।
बहुमत मज भक्ताचा, ताताला जेविं बोल मुग्धाचा[6]. ॥ ५७
तूं इच्छिसील जेथें, तेथें दुग्धाब्धिचें[7] सदा तुजला, ।
सान्निध्य घडो; टकळा[8] घालुनि न वत्स सुरभिचा सुजला. ॥ ५८
श्रुतिवक्त्या[9] मज 'वे' या उच्चारण कठिण काय वाणीचें? ।
घेणें रुचतें, परि बा! देणें न रुचे कधींहि वाणीचें. ॥ ५९
[10] जें अल्पदान, नोहे प्रभुस प्रभुयाचकासही शुभ तें, ।
यास्तव या स्तवनार्हें म्यां तुज दुग्धाब्धिचें दिलें दुभतें. ॥ ६०
आकल्प क्षीरौदन अमृतोपम साप्तवर्ग[11] जेव, रहा; ।
[12] ते काय? स्वजनाच्या विश्लेषें म्हणवितील जे वर 'हा!' ॥ ६१

---

१. चंद्रानें (पक्षीं) ब्राह्मणश्रेष्ठानें. २. नक्षत्रयुक्त असें. ३. पुण्यकृत्यास वाहिलेले. ४. माझी स्त्री, पार्वती. ५. अनुपम. ६. शिशूचा, बालकाचा. ७. या षष्ठीचा संबंध 'सान्निध्य' या नामाकडे. ८. अन्वयः—सुरभिचा वत्स टकळा घालोनि (ध्यास धरून) न सुजला (आतुर झाला नाहीं). सुरभि ही कामधेनु असल्यामुळें तिच्या वासराला कोणत्याही गोष्टीचा घोष घेऊन आतुर होण्याचें कारणच पडत नाहीं. तेव्हां शंकर म्हणतात, मी कामधेनूच आहें, आणि माझे भक्त हे वत्सासारखे आहेत; तुम्हीं कोणतीही इच्छा केलीत, कीं ती लागलीच पुरी होईल, तुम्हांला काळजी म्हणून कशी ती शिवूं देणार नाहीं. टकळा=ध्यास, घोष, स्मरणी. ९. सार्थान्वयः—श्रुतिवक्त्या (=वेद बोलणाऱ्यास—परमेश्वरमुखांतून वेद निघाले हें सुप्रसिद्ध आहेच) मज 'वे' या वाणीचें (=वररूप भाषणाचें) उच्चारण कठिण काय? (अर्थात् नाहीं.) बा (=हे उपमन्यो!) वाणीचें (कमीपणाचें) घेणें रुचतें (चालतें), परि (परंतु) वाणीचें (कमीपणाचें देणें कधींही न रुचे). थोडें घेतलेलें मला पुरवतें व पण जें द्यावयाचें तें मात्र थोडें कधींही पुरवणार नाहीं. थोर मनाच्या मनुष्याच्या वृत्तीचें चित्र पंतांनीं एका गीत्यर्धांतच अप्रतिम काढिलें आहे. १०. सार्थान्वयः—जें दान अल्प (थोडें), तें प्रभुंस (=समर्थास, थोरामोठ्यास) [व] प्रभुयाचकासहि (=थोरा मोठ्यांजवळ याचना करणाऱ्यांनाही) शुभ (हितप्रद) नोहे (होत नाहीं). अपुऱ्या दानाविषयीं पंत वामनचरित्रांत लिहितातः—जरि याचितार्थ न पवे सुखरोमांचाढ्य आंतवरि काय। तत्काळ याचकाचा जें न करी दान तेंहि तरि काय? ॥—गी० ९५. ११. आपल्या बंधुवर्गासहवर्तमान. १२. सार्थान्वयः—जे वर (प्रसाद) स्वजनाच्या विश्लेषें (वियोगानें) हा (हाय) म्हणवितील (म्हणावयास लावितील) ते काय? (त्यांची किंमत काय?)

कल्पांतीं पाव[1] मला; तों वस सेवीत दुग्धभक्तातें; ।
न विसंबें[2], न उपेक्षीं[3] मी सामान्याहि[4] मुग्ध[5] भक्तातें. ॥ ६२
बांधववृंद तुझें कुळगोत्रहि आकल्प मुदित राहेल, ।
कृतलोककवळ[6] काळ क्रोधकुटिलदृष्टिनें न पाहेल. ॥ ६३
दिधली प्रसन्नचित्तें तुज शाश्वतभक्तिसंपदा साची[7]; ।
म्यां भक्तत्व दिल्यावरि, मति कां पावेल कंप दासाची? ॥ ६४
बा! या त्वदाश्रमीं मी सान्निध्य करीन सर्वदा साचें, ।
स्थळ कैलासाहुनि मज बहुमत उटजादि[8] सर्व दासाचें. ॥ ६५
स्वस्थ यथाकाम[9] रहा, उत्कंठेतें[10] करूं नको लेशें[11], ।
बुडतां उद्धार करी क्षितिचर[12] दंष्ट्रेंकरून कोलेश[13]. ॥ ६६
संरक्षिले शिशु पशुहि, धरिला मंथाद्रि पाठिवरि; कां म्यां[14] ।
भेटि न द्यावी? मजला इच्छा होतांचि आठिव रिकाम्या.' ॥ ६७
यापरि[15] महाप्रसादें करुनि त्रिजगांत धन्य हा विप्र, ।
तत्काळ गुप्त झाला रविकोटिसमप्रभ प्रभु क्षिप्र. ॥ ६८
कृष्णा! विलोकिला म्यां यापरि भगवान् समाधि साधूनी[16], ।
याचि[17] उपायें केला नाहींच भवश्रमाधि साधूंनीं. ॥ ६९

म्हणूनच परेश्वरानें 'साप्तवर्ग जेव, रहा' असें म्हटलें. आप्तजनांच्या अभावीं कोणत्याही सौख्यांत गोडी वाटत नाहीं. 'ज्या वैभवानें शत्रु झुरत नाहीं, व मित्र संतोष पावत नाहीं तें काय कामाचें' ह्या अर्थाचें संस्कृत सुभाषित सुप्रसिद्ध आहेच.

१. भेट, मज सन्निध ये. २. विसरत नाहीं. ३. हेळसांड करीत नाहीं. ४. साधारण. ५. अज्ञ, साध्याभोळ्या. ६. जगाचा केला आहे घांस ज्यानें असा. ७. खरी. ८. पर्णकुटिकादि. हें 'स्थळ'ह्याचें विशेषण. पहा, 'माझ्या वाडे नाहीं कामाचे, साधुची झोंपडी बरी ॥ उद्धवा! चल जाऊं विदुरा घरीं.' ९. मन मानेल त्याप्रमाणें. १०. काळजीला. ११. लवभरही, किंचित् सुद्धां. १२. प्राणिमात्र. १३. विष्णूचा वराहावतार. (पंतकृत अवतारमाला गीति १-१२ पहा.) १४. सार्थान्वयः—म्यां भेटी कां न द्यावी? (=मीं भेट कां देणार नाहीं? मी तूं म्हणशील तेव्हां भेटेन.) [बा! उपमन्यो! तुला भेटीची] इच्छा होतांच, रिकाम्या मजला (=भक्तांना भेटी द्यावयाला जो मी नेहमींच रिकामा आहें, त्या मला) आठिव, [मी आपला ठेवलेलाच म्हणून समज]. संरक्षिले शिशुपशुहि धरिला मंथाद्रि पाठिवरि काम्या—हा सर्वसंग्रहाचा पाठ, व 'काम्या'वर 'मनोरथ पूर्ण करणारी' अशी टीप. १५. अन्वय—यापरि (ह्याप्रमाणें) महाप्रसादें (मोठ्या वराच्या योगानें) हा विप्र (उपमन्यु) त्रिजगांत धन्य (कृतार्थ) करुनि, रविकोटिसमप्रभु (कोटिसूर्यांप्रमाणें तेज आहे ज्याचें असा) प्रभु शंकर तत्काळ (त्याच वेळीं) क्षिप्र (सत्वर) गुप्त झाला. १६. समाधि साधूनी=भगवच्चिंतन किंवा तप संपादून. १७. सार्थान्वयः—याचि उपायें (=समाधिच्या जोरावर) साधूंनीं (=संतांनीं) भवश्रमाधि (=संसा-

झालें प्राप्त सकळ जें, दे [1]अनुकंपा करूनि मज भव तें; ।
आहे, पहा, कसें हें ब्रह्मज्ञ ब्रह्मवृंद मजभवतें. ॥ ७०
गंधर्व, सिद्ध, विद्याधर, किन्नर, अप्सरा, पहा, गा! या ।
येतां इकडे, न म्हणे [2]शतमख, 'जावूं नका, रहा गाया.' ॥ ७१
तरु गुल्म लता देती सर्वऋतूंच्या फुला, फळा, सुरसा; ।
[3]हा आश्रम शतमखसा, ताप सकळ यापुढें बळासुरसा. ॥ ७२
हें वन मदाश्रमीचें, [4]तरुपंचक जेविं नंदववनीं तें; ।
विपुळें सुखें मज प्रभु पोषी, तुज जेविं नंद नवनीतें. ॥ ७३
हा उपमन्युमुनि [5]पयोनिधिच्या सेवूनि अक्षय दुधाला, ।
[6]जेविं तव यश प्राशुनि, तृप्त करुनि साधुलक्ष, यदु धाला. ॥ ७४
[7]या स्थानीं लक्ष्मीचें माहेर क्षीर, हात यादानें— ।
तैसें न जोडितां म्यां, आहे, रक्षी रहातया दानें. ॥ ७५
[8]या आश्रमीं अनुभउनि विविधा अवलोकनीं चमत्कारा, ।
सर्व स्वर्गस्थ म्हणे 'हा वासवलोक नीच मत्कारा.' ॥ ७६

राची दगदग) नाहींच केला (=अजीबात नष्ट केला). साधुसंत जे संसाराच्या त्रासांतून मुक्त होतात, ते ह्याच समाधिसाधनाच्या जोरावर होत, असा भाव.

१. दया, कृपा. २. इंद्र. ३. अन्वयः—हा आश्रम शतमखसा (इंद्राप्रमाणें) [व] सकळ ताप यापुढें बळासुरसा (बलदैत्याप्रमाणें). बळदैत्यास इंद्रानें मारिलें. ४. अन्वयः—जेविं नंदनवनीं तें तरुपंचक (पांच कल्पवृक्ष) [तेविं] हें मदाश्रमीचें वन. ५. क्षीरसागराच्या. ६. सार्थान्वयः—जेविं [तुझा पूर्वज] यदु तव (=तुझें, श्रीकृष्णाचें) यश [स्वतः] प्राशुनि [व] साधुलक्ष (=लक्षावधि संतांस) तृप्त करुनि धाला (तृप्त झाला). यदुचेच वंश यादव होत; व परमात्मा श्रीकृष्ण त्या कुलांत उत्पन्न झाले. म्हणजे अर्थात् परमात्म्याच्या कीर्तिरूप अमृतानें यदु स्वतः तृप्त झाला व त्यानें हजारों संतांसही तृप्त केलें. वंशजाच्या सत्कृत्यामुळें व सुकीर्तीनें पूर्वजांचा उद्धार होतो व इतर लोकांचेंही त्यांत हित होतें, हें येथें पर्यायानें सुचविलें आहे. ७. सार्थान्वयः—लक्ष्मीचें माहेर [जें] क्षीर (=क्षीरसमुद्र) [तें], [जसें] यादानें (=जलचरानें), तैसें मी[ही] हात न जोडितां (=जलचराप्रमाणें मीही प्रार्थना करीत नसतांही) या स्थानीं आहे; [व तें] दानें (=क्षीरदानें) रहातया (=येथें राहणाऱ्या प्रत्येकाला) रक्षी (=पोशितें). ज्याप्रमाणें जलचरांनीं कोणत्याही तऱ्हेची विनवणी केली नसतांही, त्यांस जलाशय लाभतात, त्याप्रमाणें प्रभुकृपेनें येथें मला क्षीरसागर आयताच लाभला आहे, हा उपमन्यूच्या भाषणाचा मतलब. ८. अन्वयः—या आश्रमीं, विविधा चमत्कारा अवलोकनीं अनुभउनि (=पाहून) सर्व स्वर्गस्थ (=स्वर्गांत राहणारे, देवप्रभृति सर्व) म्हणे 'हा नीच वासव लोक (=इंद्रलोक) मत्कारा [होय]' (हा आमचा इंद्रलोक केवळ बंदीखाना आहे).

शोभो बहु मुनिपद हें त्वां, द्विजराजें जसें गगन सोडूं. ॥ ५४
तुज भेटोनि निवाया येतिल सुकृतक्रियापर महर्षी, ।
ग्राहुनि मस्तक चरणीं, होतिल, करुनि प्रिया, परमहर्षी. ॥ ५५
आहे आलिंगुनियां मजला मॅच्छक्ति हे जसी अतुला, ।
राहेल यौवनश्री आलिंगुनि सर्वदा असीच तुला. ॥ ५६
वत्सा! उपमन्यो! म्यां तुजला दिधलाचि राशि दुग्धाचा, ।
बहुमत मज भक्ताचा, ताताला जेविं बोल मुग्धाचा. ॥ ५७
तूं इच्छिसील जेथें, तेथें दुग्धाब्धिचें सदा तुजला, ।
सान्निध्य घडो; टकळा घालूनि न वत्स सुरभिचा सुजला. ॥ ५८
श्रुतिवक्तया मज 'घे' या उच्चारण कठिण काय वाणीचें ? ।
घेणें रुचतें, परि बा! देणें न रुचे कधींहि वाणीचें. ॥ ५९
जें अल्पदान, नोहे प्रभुस प्रभुयाचकासही शुभ तें, ।
वास्तव या स्तवनार्हें म्यां तुज दुग्धाब्धिचें दिलें दुभतें. ॥ ६०
आकल्प क्षीरौदन अमृतोपम सौप्तवर्ग जेव, रहा; ।
ते काय ? स्वजनाच्या विश्लेषें म्हणवितील जे वर 'हा!' ॥ ६१

...ानें (पक्षीं) ब्राह्मणश्रेष्ठानें. २. नक्षत्रयुक्त असें. ३. पुण्यकृत्यास वाहिलेले. ४. माझी ... ५. अनुपम. ६. शिशूचा, बालकाचा. ७. या षष्ठीचा संबंध 'सान्निध्य' या नामाकडे. ...–सुरभिचा वत्स टकळा घालोनि (ध्यास धरून) न सुजला (आतुर झाला नाहीं). ...कामधेनु असल्यामुळें तिच्या वासराला कोणत्याही गोष्टीचा घोष घेऊन आतुर होण्याचें ...डत नाहीं. तेव्हां शंकर म्हणतात, मी कामधेनूच आहें, आणि माझे भक्त हे वत्सा...त; तुम्हीं कोणतीही इच्छा केलीत, कीं ती लागलीच पुरी होईल, तुम्हांला काळजी म्ह... ती शिवूं देणार नाहीं. टकळा=ध्यास, घोष, स्मरणी. ९. सार्थान्वयः–श्रुतिवक्त्या...गान्यास–परमेश्वरमुखांतून वेद निघाले हें सुप्रसिद्ध आहेच) मज 'घे' या वाणीचें ...ाषणाचें) उच्चारण कठिण काय? (अर्थात् नाहीं.) बा (=हे उपमन्यो!) वाणीचें (कमी-... रुचतें (चालतें), परि (परंतु) वाणीचें (कमीपणाचें देणें कधींही न रुचे). थोडें घेतलेलें ... व पण जें द्यावयाचें तें मात्र थोडें कधींही पुरवणार नाहीं. थोर मनाच्या मनुष्याच्या वृत्तीचें ...ं एका गीत्यर्धांतच अप्रतिम काढिलें आहे. १०. सार्थान्वयः–जें दान अल्प (थोडें), तें ...मर्थास, थोरामोठ्यास) [व] प्रभुयाचकासहि (=थोरा मोठ्यांजवळ याचना करणाऱ्यांनाही) ...द) नोहे (होत नाहीं). अपुऱ्या दानाविषयीं पंत वामनचरित्रांत लिहितातः–जरि याचि-... सुखरोमांचाढ्य आंतवरि काय। तत्काळ याचकाचा जें न करी दान तेंहि तरि काय? ॥– ११. आपल्या बंधुवर्गासहवर्तमान. १२. सार्थान्वयः–जे वर (प्रसाद) स्वजनाच्या विश्लेषें ...हा (हाय) म्हणवितील (म्हणावयास लावितील) ते काय? (त्यांची किंमत काय?)

मुनि मज म्हणे, 'मुकुंदा! [1]निकटचि तव [2]अभ्युदय [3]मना दिसतो. ॥ ६

[4]तूं देखसिल असंशय देवांमाजी महायशा, साव्या, ।
कीं प्रभुनें विघ्नचमू भजकां होउनि सहाय शासाव्या. ॥ ७

देइल शिव आठ, [5]शिवा आठ, पुन्हा तीच आठ वर; हा तो ।
[6]भगवत्प्रसाद; जेणें कळतो सर्वार्थ, आठव रहातो. ॥ ८

[7]स्वस्वाश्रमीं तपें अवलोकाया कामदा श्रमतयातें ।
द्रुत सिद्धिप्रद नसता, तरि रुचता कां मदाश्रम तयांतें? ॥ ९

हे मुनि [8]सहस्रशः [9]प्रभुकरुणेला पात्र जाहले असती. ।
होइल मदाश्रमींची विफळा कृष्णा! तुलाचि कां [10]वसंती. ॥ १०

[11]कठिनींच कठिन, मृदुलीं मृदुल, तुझें हृदय बा! जसें तोय; ।
देवांसि तुजअशासी श्लाघ्य समागम यदूत्तमा! होय. ॥ ११

[12]ब्रह्मण्य श्रद्धावान् तूं, शीलविजित[13]सुरापगातोया! ।

१.समीप.२. वृद्धि, भाग्य. ३.माझ्या (उपमन्यूच्या) मनास. ४.सार्थान्वयः–देवांमाजी (देवांमध्यें) महायशा (मोठी आहे कीर्ति ज्याची त्यास) [व] साव्या (भोळ्यास) तूं असंशय (खास) देखशील; कीं (कारण) भजकां (भक्तजनांस) सहाय होऊनि (मित्र होऊन) विघ्नचमू (विघ्नांच्या सेना, पुष्कळ विघ्नें) शासाव्या (दंडाव्या, मथाव्या–अर्थात् विघ्नपरंपरा दूर करावी). टीप–'सावा' हें विशेषण असून ह्याचा अर्थ 'निष्कंटक' असा आहे. ह्यावरून लक्षणेनें 'भोळा.' शंकराची भोळेपणाबद्दल किती प्रसिद्धि आहे, हें सांगणें अनावश्यक आहे. ५. पार्वती. ६. पूर्वार्धांतील 'हा तो' ह्या शब्दांसहित सार्थान्वय–हा तों भगवत्प्रसाद; जेणें (ज्या प्रसादाच्या योगानें) सर्वार्थ (सर्व गोष्टी) कळतों [व त्याचा] आठव (स्मृति) रहातो. ७. सार्थान्वयः–कामदा (=सर्व इच्छा पुरविणाऱ्या शंकरास) अवलोकाया स्वस्वाश्रमीं (=आपापल्या आश्रमांत) तपें श्रमतयांतें (=तपाचे थोर आयास करणाऱ्यांस) [जर हा मदाश्रम] द्रुत सिद्धिप्रद(=अल्पावकाशांत शिवदर्शनरूप सिद्धि करून देणारा)नसता, तरि तयांतें मदाश्रम (=माझा–उपमन्यूचा–आश्रम) कां रुचता (=आवडता)? तेव्हां माझ्या आश्रमांत ताबडतोब सिद्धि प्राप्त होतेच, असा भाव. सर्वसंग्रहपाठः–स्वस्वाश्रमीं तपें अवलोकाया कामदा श्रमत यातें, । ८. हजारों. ९.शंक[र]च्या दयार्द्रतेस. १०.राहणें. तुझें वास्तव्य विफल होणार नाहीं, म्हणजे तुला प्रभुदर्शन खास घडेल, असा गीतीचा भाव. ११. सार्थान्वयः–बा! (हे कृष्णा!) जसें तोय [तसें] तुझें हृदय, कठिनींच कठिन (कठोराशीं कठोर), मृदुलीं मृदुल (मऊ असेल त्याचें ठायीं मऊ) [असें आहे;] [तेव्हां] तुज अशासी (=तुझ्यासारिख्या बरोबर) समागम देवांसि [ही] श्लाघ्य (=कीर्तिप्रद) होय. 'देवासि'–असा सर्वसंग्रहाचा पाठ. अर्थसादृश्यः–वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि । लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति. ॥ (उत्तररामचरित्र.) गारेच्या रूपानें पाणी अत्यंत कठिण असतें, परंतु तेंच द्रवरूपानें अत्यंत मऊ असतें, म्हणून येथें त्याची कठोरांत कठोर, पण मृदूंत मृदू अशा कृष्णाच्या मनाला उपमा दिली आहे. १२. ब्राह्मणांसंबंधें आदरपूर्ण. १३. शील+विजित+सुर+आपगा+तोया=स्वभावानें जिंकिलें आहे भागीरथीचें उदक ज्यानें अशा. भागीरथीचें

बहु शुचि तव यश, कृष्णा! व्हाया निर्मळ [1]सुराप गातो [2]यो. ॥ १२
कथितों सर्वार्थप्र[3]दें [4]जप्य महामंत्र मी तुला, [5]एणें ।
[6]वश होइजेल देवें, जेंवि मधुरगीतमोहितें एणें.' ॥ १३
[7]नमुनि मुनिप्रति वदलों 'भगवंता! हा तव प्रसादास ।
पावो, घनास समयीं व्हाया सुसमृद्ध वप्रसा, दास.' ॥ १४
[8]झाले मुनिवाक्श्रवणें मज एक मुहूर्त आठ वासर ते, ।
देहाच्या गेहाच्या होउं न देतांहि आठवा सरते. ॥ १५
सांगे 'सहस्रनाम' प्रभुचें, [9]प्रकटी [10]जयांसि [11]तंडी, तें, ।
जें दूर [12]अविद्येतें करि, जेविं [13]ज्वलनतेज थंडीतें. ॥ १६
दी[14]क्षा देउनि [15]सुदिनीं स्तवराजाचा करूनि उपदेश, ।
सांगे सांबाराध[16]न, कीं ज्यां व्हावें [17]सुसिद्धिसुपदेश. ॥ १७
[18]दीक्षित [18]होउनि झालों त्या मुनिवृंदांत [19]आगतप्रथ मी, ।

उदक शीतता, स्वच्छता व शुचिता ह्याबद्दल प्रसिद्ध आहे; पण हे तीनही गुण तुझ्या स्वभावांत इतके आहेत, कीं त्यांयोगें तुझ्या स्वभावानें भागीरथीच्या उदकास मागें सारिलें आहे.

१. मद्यपी, दारू पिणारा. २. ह्या तुझ्या यशातें. ३. सर्व कल्याणातें देणारा. ४. घोकण्याचा, मनांतल्यामनांत म्हणण्याचा. ५. ह्यानें. ६. देवें वश होइजेल=प्रभु महादेव वश केला जाईल. प्रयोग ध्यानांत धरण्यासारखा आहे. 'वश होणें' हें संयुक्त क्रियापद आहे; व ही वश होण्याची क्रिया 'देवें' (प्रभूच्या हातून) 'एणें' (ह्या मंत्राच्या जोरावर) घडून आली जाईल. उत्तरार्धाचा सार्थान्वयः-जेंवि मधुरगीतमोहितें एणें (हरिणानें) [तेविं] एणें (ह्या मंत्रानें) देवें वश होइजेल. ७. सार्थान्वयः-नमुनि मुनिप्रति (उपमन्युऋषीस) वदलों 'भगवंता! घनास वप्रसा (शेताप्रमाणें), हा दास (=मी कृष्ण) सुसमृद्ध (=कृतार्थ; पक्षीं धान्ययुक्त) व्हाया, समयीं (=वेळेवरच) तव प्रसादास पावो (=तुझा अनुग्रह मिळवो). ८. सार्थान्वयः-मुनिवाक्श्रवणें (उपमन्युऋषीचें बोलणें ऐकण्यानें) देहाच्या (स्वशरीराच्या) [आणि] गेहाच्या (=घराच्या) आठवा (=आठवणीस, स्मृतीस) न होऊं देतांही सरते (=सरणारे) ते आठ वासर (=आठ दिवस) मज एक मुहूर्त (=एका क्षणासारखे) झाले. ते आठ दिवस एका पळासारखे केव्हांच गेले व त्यांत स्वतःचें भानही मला राहिलें नाहीं व घरचीही आठवण झाली नाहीं. पहा, 'अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत्' उत्तररामचरितम्. ९. लोकांत प्रथमच प्रसिद्ध करी. १०. ज्या सहस्रनामाला. ११. उपमन्यूचा गुरु. १२. अज्ञानातें. १३. अग्नीचा कडकपणा. १४. शिवदीक्षा. १५. सुमुहूर्तावर. १६. शंकर प्रसन्न होतील अशी त्याची भक्ति. १७. चांगली सिद्धि (=यश) ज्यांत आहे, अशा उत्तम पदाचा (=स्थानाचा, अवस्थेचा) ईश (=स्वामी); पूर्णपणें यशस्वी. १८. दीक्षित होउनि=दंड, कुश, मेखला इत्यादि घेऊन, मी यथाविधि दीक्षा घेऊन. १९. मिळाली आहे प्रसिद्धि ज्याला असा, विख्यात.

करुनि[1] फळाशन होतों मासीं नियमांत जागत प्रथमीं. ॥ १८
उदकाशन द्वितीयापासुनि[2] संपूर्ण पांचवा मास[3]; ।
कीं[4] परमार्थपरां तप 'मीच' म्हणे, 'हित; न सांचवा मास.' ॥ १९
शंभुपदीं शिर होतों[5] एक पदावरि उभा वहायास, ।
परमार्थेच्छु कवण बुध न करिल सुतपीं शुभावहायास[6]? ॥ २०
षष्ठारंभीं[7] दशशतरवितेजाचा[8] विलोकिला पुंज[9], ।
जो विविधवर्णशतमखचापशतद्युतिविलासिनीकुंज[10]. ॥ २१
बहु[11] चपला, बहु नीलश्वेतारुण मेघ रेखिले होते, ।
कोणीही अत्यद्भुतदर्शन[12] नसतील देखिले हो! ते. ॥ २२
त्यांत सुनीळ सुनिर्मळ तेजाचा भव्य[13] देखिलीं[14] राशी ।
मन्नयनासि[15] तसें, शुभ देश जसें भव्य दे खिलाराशी. ॥ २३
त्या नीळवर्णतेजोराशींत प्रभु दिसे सदार[16] मला, ।

---

१. अन्वयः-प्रथमीं मासीं (पहिल्या महिन्यांत) फळाशन (फलांचें भक्षण)करुनि नियमांत जागत होतों (तपश्चरण करीत होतों). २. दुसऱ्या महिन्यापासून. ३. महिना. अन्वयार्थः-द्वितीयापासूनि (दुसऱ्या महिन्यापासून) संपूर्ण पांचवा मास (=पांचवा महिना संपे तों) उदकाशन [करण्यांत आलें]. ४. सार्थान्वयः-कीं(=कारण) परमार्थपरां (=परमार्थ साधूं इच्छिणारांस, मुक्ति मिळविण्यासाठीं खटपट करणारांस) तप म्हणे, 'मीच हित (=कल्याण करणारें), मास न सांचवा (=अंगावर बोटभर मांस वाढविल्यानें परमार्थप्राप्ति होणें नाहीं, तरी शरीर पुष्ट करण्याच्या भरीस पडूं नका).' सर्वसंग्रहाचा पाठः-कीं परमार्थपरंतप. ५. एक पदावरि उभा होतों=अतितत्पर, उत्सुक होतों. हा शब्द-समूह श्लिष्ट आहे, व मी एक पायावर उभा राहून कांहीं दिवस तपश्चर्या चालविली होती, हेंही यांत सुचविलें आहे. ६. शुभावह+आयास=कल्याणप्रद श्रम. ७. सहाव्या महिन्याचे प्रारंभीं. ८. सहस्रसूर्यांच्या प्रभेचा, सहस्रसूर्यांचें तेज ज्यामध्यें आहे असा. ९. गोळा. १०. विविध+वर्ण+शतमख+चाप+शत+द्युति+विलासिनी+कुंज=शेंकडों रंगीबेरंगी इंद्रधनुष्यांची प्रभा हीच कोणी क्रीडा करणारी स्त्री तिचा लतामंडप. गोपींसहवर्तमान मुकुंदानें यमुनेच्या कांठीं क्रीडा केली त्यासंबंधीं रामजोशी बुवांनीं केलेलें वर्णन 'तो कुंज रसाचा पुंज इ०' सर्वश्रुत आहेच. तेव्हां विलासवती स्त्रियांस कुंज फार प्रिय असतो. ११. अनेक विजा व अनेक निळे, पांढरे, तांबडे असे ढग. १२. जे पाहून मन थक्क होईल असे देखावे, अलौकिक चमत्कार. १३. सुंदर. १४. दृष्टी पडलेला पुंज. 'राशि' शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे व त्याच लिंगीं पंतांनीं योजिलेला आहे. १५. सार्थान्वयः-जसें खिलाराशी (गाईच्या संमूहास) शुभ देश (सुपीक, हिरवा गार असा प्रदेश) भव्य (सुख) दे, तसें [हा राशी] मन्नयनासि (माझ्या डोळ्यांस) [दे]. उत्कृष्ट गवतानें भरलेलें रान पाहून जसा गाईंना आनंद होतो, त्याप्रमाणें हा तेजोराशी पाहून माझ्या नेत्रास समाधान झालें. १६. स्त्री(उमे)सह.

ज्याच्या स[1]दापदाहरपदभजनीं [2]दास हा सदा रमला. ॥ २४
होतां उमामहेश्वरदर्शन, मन बहु निवो[3]नियां रमलें; ।
[4]युगपत्समुदितजलदस्थित शशिभास्कर, असें मला [5]गमलें. ॥ २५
शोभवित तेज होती निजतेजें भगवती उमा पतिचें, ।
[6]ब्रह्मांड भरुनि उरलें ऐसें सौभाग्य तें उमाप तिचें. ॥ २६
झालों उत्फुल्लनयन रोमांचितकाय परम लाभानें, ।
[7]सोडुं नयेचि पळ, क्षणभरि सोडियलेंचि पर मला भानें. ॥ २७
शरणागतिनें दिसला देव [8]शरच्छशिसुधारसवलक्ष, ।
[9]जो दुर्लभ करितां बहु करिकरसमघृतसुधार सव लक्ष. ॥ २८
वर्णील अळंकारा, आकारा, कोण आयुधा? त्याचें ।
सर्वहि अत्यद्भुत; तें गायां अत्यल्प [10][11]आयु धात्याचें. ॥ २९
अत्यद्भुत मुकुट शिरीं, अत्यद्भुत कुंडलें, [12]कुरुक्ष्मापा! ।

---

१. सत्+आपदा+हर+पद+भजनीं=साधूंची विपत्ति दूर करणाऱ्या चरणाच्या सेवेंत. २. मी कृष्ण. ३. तृप्त होऊन. ४. युगपत्+समुदित+जलदस्थित=एकाच वेळीं उदय पावलेले व मेघांमध्यें राहिलेले (मेघाच्छादित); हें 'शशिभास्कर (चंद्रसूर्य)' ह्यांचें विशेषण. ५. भासलें. उमेचें मुख चंद्रासारखें व शंकराचें सूर्यासारखें दिसलें हा मतलब. ६. अन्वयः—तिचें तें सौभाग्य ब्रह्मांड भरुनि उरलें, ऐसें उमाप (उदंड, पुष्कळ) [आहे]. ७. सार्थान्वयः—[भानें मला] पळभर[ही] सोडुं नयेचि, पर (परंतु) मला भानें (देहस्मृतीनें) [तेव्हां] क्षणभरि सोडियलेंचि. टीपः—२॥ घटका= ६० मिनिटें व ६० पळें म्हणजे १ घटका; तेव्हां १ पळ म्हणजे २ मिनिटें होत. आतां १ क्षण म्हणजे मुहूर्ताचा १२ वा अंश म्हणजे ४ मिनिटें होत. ह्यावरून पाहतां 'पळभर' ही वेळ 'क्षणभर' ह्या वेळेहून कमी आहे. वरील गीत्यर्धांत श्रीकृष्णाच्या बोलण्याचा भाव असा आहे कीं, 'देहभान पळभर सुद्धां जाऊं नये; परंतु माझें (श्रीकृष्णाचें) देहभान त्याहून जास्त वेळपर्यंत नाहींसें झालेंची.' ८. शरत्+शशि+सुधारस+वलक्ष=शरदृतूंतील चंद्र व अमृत ह्यांप्रमाणें शुभ्र. ९. सार्थान्वयः—जो (जो देव) करिकरसमघृतसुधार (हत्तीच्या सोंडेसारखी आहे तुपाची धार ज्यामध्यें असे) लक्ष (लाखों) सव (यज्ञ) करितां[ही] बहु दुर्लभ [आहे.] (अर्थात् ज्याचें दर्शन महायज्ञांनींही घडत नाहीं.) १०. वर्णन करण्यास. ११. 'धात्याचें (ब्रह्मदेवाचें) आयु (आयुष्य) अत्यल्प' असें म्हणून कवीनें परमेश्वराच्या अद्भुतत्वाची केवढी उदात्त कल्पना वाचकांच्या समोर उभी केली आहे! पहा, प्रथमतः पाहिलें तर 'वेद' हे ब्रह्मदेवानें केले, ह्यावरून त्याचें वर्णननैपुण्य व्यक्त होतें. शिवाय इहलोकींच्या एकदिवसाहून हजारोंपटीनें ब्रह्मदेवाचा एक दिवस मोठा आहे. अशा स्थितींतसुद्धां जर वर्णननिपुण ब्रह्मदेवाचें आयुष्य श्रीशंकराचे गुणानुवाद गाण्यास पुरें पडत नाहीं, तर मग इतरांबद्दल बोलणें नको, हें उघडच आहे. १२. कुरुदेशाधिपते धर्मराजा!

अत्यद्भुत अंग[1]दयुग, अत्यद्भुत हार, पांडवा! बापा! ॥ ३०
शूलगदावज्रपरशुचापप्रमुखें महायुधें धरिते[2] ।
बहु भुज विलोकिले, जे भजकांसि[3] भवार्णवांत[4] उद्धरिते[5]. ॥ ३१
[6]जोतो प्रभुच्या शुद्धा सत्वाआंतील शुद्ध भुज गाभा, ।
आहे, पदाश्रित म्हणुनि केवळ न त्यजुनि शेषभुजगा, भा. ॥ ३२
[7]जो विशद यश प्रकटुनि, करितो कल्याण चिर विभु जगाचें, ।
यज्ञोपवीत वीतक्रिय विप्रयशोर्थ मिरवि भुजगाचें. ॥ ३३
दिव्या अनेकवर्णा भव्या आ[8]गुल्फलंबिनी माळा, ।
पडुनि गळां[9], पाय धरूनि[10], म्हणती जाणों, 'स्वदास सांभाळा.' ॥ ३४
यश वस्त्रांचें मिरवी शार्दूळाचेंचि अजिन[11], वलयांचें[12] ।
अहि[13], भस्म चंदनाचें; वर्णावें काय अजि! नवल यांचें? ॥ ३५
प्र[14]मथपरिवृत प्रभुचा झाला, सत्प्रेक्षणीय परि, वेष ।

---

१. बाहुभूषणांची जोडी. २. धारण करणारे. ३. भक्तांस. ४. संसारसागरांत. ५. मुक्त करणारे, वर काढणारे. बुडणाऱ्यास हात देऊन वर काढतात हा सार्वत्रिक प्रघात आहे. ह्यामुळें 'उद्धरिते' हें विशेषण फार योग्य आहे. ६. सार्थान्वयः—जोतो भुज (त्या भुजांपैकीं प्रत्येक) प्रभुच्या शुद्धा सत्वाआंतील शुद्ध (निवळ) गाभा; भा(कांति), केवळ पदाश्रित म्हणुनि शेषभुजगा न त्यजुनि, आहे. गाभा=गर्भ, नार, साड. श्रीशंकराचा प्रत्येक हात म्हणजे त्याच्या अंतःकरणाच्या शुद्धतेंतील निकोप असा मध्यभाग होय. ते हात इतके सरळ, पुष्ट व तेजस्वी होते कीं, त्यांनीं जगांतील सर्व सर्पांवर आपल्या शोभेनें ताण केली होती. त्यांच्यापुढें सर्व सर्प फिके पडले होते. फक्त एक शेष मात्र अद्याप भग्नतेज झाला नव्हता. याचें कारण इतकेंच कीं, तो शंकराला शरण येऊन, त्यानें शिवचरणांचा आश्रय केला होता; एरव्हीं त्याच्यावर सुद्धां शिवभुजांजी कडी होती, यांत शंका नाहीं. ७. सार्थान्वयः—जो विभु (शंकर) विशद यश प्रकटुनि (उज्ज्वल कीर्ति दाखवून) जगाचें चिर (निरंतर) कल्याण (हित) करतो, [तो] वीतक्रिय (टाकलीं आहेत कर्में ज्यानें असा) भुजगाचें यज्ञोपवीत विप्रयशोर्थ (ब्राह्मणांच्या कीर्तीसाठीं) मिरवी (ऐटीनें धारण करतो). यजनादि क्रियांच्या साधनीभूत जें यज्ञोपवीत त्याची शंकरांस मुळींच जरूर नव्हती, कारण ते त्यक्तकर्म आहेत; पण त्यांनीं केवळ यज्ञोपवीतधारी ब्राह्मणांची महती वाढावी, ह्याच हेतूनें सर्पाचें जानवें घातलें होतें; असा भाव. ८. पायांच्या घोट्यापर्यंत लोंबणाऱ्या. ९. गळां पडुनि=गळ्यांत मिठी घालून, पक्षीं अति आग्रहानें. १०. पायां पडून=विनंतिपूर्वक. ह्या उत्तरार्धांतील उत्प्रेक्षा फारच बहारीची आहे. ११. चर्म. १२. कड्यांचें. १३. पूर्वार्धासह सार्थान्वयः—शार्दूलाचें अजिन (व्याघ्रचर्म) वस्त्रांचें, अहि (सर्प) वलयांचें (कड्यांचें), भस्म चंदनाचें यश मिरवी; अजि (अहो) यांचें नवल काय वर्णावें? १४. सार्थान्वयः—प्रभूचा सत्प्रेक्षणीय (उत्तम व डोळ्यांस आनंद देणारा) परि (परंतु) प्रमथपरिवृत (प्रमथगणांनीं—पिशाचसमूहानें—वेढिलेला) वेष (मूर्ति, स्वरूप) [तसा] दुष्प्रेक्ष्य (दिसण्यास कठिण) झाला, जसा

दुष्प्रेक्ष्य, शरत्कालीं चंडकर जसा, जयासि परिवेष. ॥ ३६
[1]एकादशशत रुद्र प्रभुतें [2]सद्भक्तवज्रवर्मातें ।
होते स्तवीत, गाउनि मधुर प्रभुच्याचि भव्यकर्मातें. ॥ ३७
[3]आदित्यसाध्यविश्वेदेववसुप्रमुख सर्वसुरसहित, ।
वर्णन करीत होते, [4]जें हृतपीयूषगर्व सुरस हित. ॥ ३८
इंद्रोपेंद्र ब्रह्मा हे मधुर [5]रथंतराख्य सामातें ।
बहु निकट गात होते, ज्यां प्रभुचि म्हणे 'विशंक गा[6] माते[7].' ॥ ३९
आले होते योगी, देवर्षि, महर्षि, सिद्ध, [8]घटसारे. ।
तो समुदाय उदधिसा, मी[9] [10]मुनिसा, [11]देवदेव [12]वटसा, रे! ॥ ४०
[13]खनिमेषहि आले, मग येतील न यज्ञवृक्ष दर्भ कसे? ।
सकळ पदार्थ मिळाले, प्रिय[14]दपितृपदासमीप [15]अर्भकसे. ॥ ४१
बा! [16]पल्वलेंहि आलीं, यावें धांवूनि केविं न घनांहीं? ।
[17]होउनि मूर्त मिळालें विश्व, तयामाजि एक अघ नाहीं. ॥ ४२
गंधर्वांच्या भरिलें होतें नभ सर्व मधुर [18]तानांहीं, ।
वाटे गानीं तैसी कोणाहि रसांत मधुरता नाहीं. ॥ ४३
[19]नृत्यांत अप्सरांचे तोडिति हृत्सहचि सर्व थाक थवे. ।

शरत्कालीं जयांसि परिवेष (तेजाचें कडें, खळें) आहे, [तो] चंडकर (सूर्य) दुष्प्रेक्ष्य [होतो]. शरदृतूंत आकाश निरभ्र असतें व म्हणून सूर्यमंडळ स्वच्छ, सतेज व प्रेक्षणीय दिसतें. परंतु असा सूर्यही खळें पडलें असतां, जसा अस्पष्ट व दिसण्यास कठिण होतो, तसाच प्रमथांचा पाळा सभोंवतीं पडल्यामुळें शंकर दुष्प्रेक्ष्य झाला, हा भाव. प्रमथ हे पिशाच्च असून शंकराचे अनुचर व परिचारक होत.

१. अकराशें. २. उत्तम भक्तांचें वज्रासारखें दृढ (=अभेद्य) चिलखत (=रक्षण करण्याचें साधन). ३. देवविशेष. ४. अन्वयार्थः—जें (वर्णन) हृतपीयूषगर्व (परिहार केला आहे अमृताच्या गर्वाच्या ज्यानें असें) सुरस (गोड) [व] हित (कल्याणप्रद) होतें. ५. या संबंधानें मागें अ० ३ गीति ८४ पहा. ६. वर्णन करा. ७. मजला. ८. एकून एक, झाडून सारे. ९. श्रीकृष्ण. १०. मार्कंडेय ऋषी. प्रलयकाळीं मार्कंडेय ऋषि वटवृक्षाचा आश्रय करून आपलें रक्षण करिता झाला, या कथेवर येथें कटाक्ष आहे. ११. देवाधिदेव, शंकर. १२. वटवृक्षाप्रमाणें. १३. खनि+मेष=रत्नांच्या खाणी व बोकड. १४. आवडती वस्तु देणाऱ्या बापाच्या पायाजवळ. १५. मुलांप्रमाणें. १६. लहान सरोवरें, तळीं. १७. सार्थान्वयः—विश्व (अखिल सृष्टि) मूर्त होऊन (रूप धारण करून, मूर्तिमंत) मिळालें, तयामाजि (त्यामध्यें) एक (फक्त) अघ (पाप) नाहीं. सर्व जग त्या ठिकाणीं एकत्र झालें, पण त्यांत पाप मात्र आलें नाहीं. १८. एकच खडा सूर लांबविला असतां, त्यास 'तान' म्हणतात. १९. सार्थान्वयः—नृत्यांत अप्सरांचे सर्व थवे (समुदाय) हृत्सहचि थाक (अवसान) तोडिति. गवई कोणतीही एखादी चीज गात असतां, त्यांत अमुक

[1]ऐवं प्रभुप्रसादें जो उत्सव, तो [3]न [2]सर्वथा [3]कथवे. ॥ ४४
सांब सदाशिव जेव्हां वर द्याया मजपुढें उभा राहे, ।
ब्रह्मादि विश्व सर्वहि माझ्याचि मुखांबुजाकडे पाहे. ॥ ४५
शक्ति मज महादेवा देखाया कीं स्तवावया नाहीं, ।
ऐसें झालें, धर्मा! [4]गजबजलों, बा! सुचेचिना कांहीं. ॥ ४६
[5]समजे सर्वज्ञत्वें मच्चित्तांतील सर्व नरपा! हें, ।
देव मज म्हणे 'कृष्णा! स्तव वद' होउनि विशंक वर पाहें. ॥ ४७
[6]आराधिलों असें त्वां पूर्वी शतशः, सहस्रशः स्पष्ट, ।
न गणुनि याहुनि बहुशत वर्ष तपस्याग्रहें महाकष्ट. ॥ ४८
त्वत्सम कोण्ही अन्य प्रिय या लोकत्रयांत मज नाहीं; ।
[7]बहु असति भक्तरत्नें, तुळितां पुरतिल तुझ्या न वजना हीं.' ॥ ४९
वदतां असें प्रसादें, प्रभुच्या केलें पदा शिरें नमन, ।
[8]झालों मग्न स्तवनीं, म्हणतचि होतें सदा 'शिरेन' मन. ॥ ५०
अंजलि करुनि, '[9]नमस्ते' म्हणुनि, समस्तेश्वरासि 'तूं सर्व,' ।
ऐसें स्तवनीं वदलों; तेणें संतुष्ट जाहला [10]शर्व. ॥ ५१

एका ठिकाणापासून तालाची उठावण ठेविली असते, अशा ठिकाणीं चीज आल्यावर मग ती आरंभ केलेल्या लईपेक्षां अधिक जलद किंवा सावकाश म्हणतात, व अशा ह्या ठिकाणास 'अवसान' असें नांव आहे. ह्या अवसानावर तालास धरून तंतोतंत चीज उतरली म्हणजे ऐकणाराची चित्त-वृत्ति तन्मय होऊन त्यास आनंदाचें भरतें येतें. ह्या ठिकाणीं अप्सरांच्या नाचण्यांत तालाचें अवसान बरोबर आल्यामुळें अंतःकरण आनंदानें उंचबळून जाई; असा भाव.

१. ह्याप्रमाणें. २. यथासांग. ३. वर्णन करतां येत नाहीं. ४. भांबावलों, गोंधळलों. ५. सार्थान्वयः—नरपा! (धर्मराजा) हें मच्चित्तांतील (मत्+चित्तांतील=माझ्या अंतःकर-णांतील) सर्व (अर्थात् माझी कायस्थिती झाली ती सगळी) सर्वज्ञत्वें (सर्व जाणण्याच्या शक्ती-मुळें) देव (शंकर) समजे [व] मज म्हणे, 'कृष्णा! विशंक होऊनि (न भितां) स्तव (स्तुति) वद; वर पाहें (खालीं मान न घालतां मजकडे पहा).' ६. अन्वयार्थः—बहुशत वर्ष (शेंकडों वर्षें) तपस्याग्रहें (तपश्चरण नेटानें करून) याहुनि महाकष्ट न गणुनि (ह्याच्यापेक्षां अधिक त्रास झाला असतां त्यास न जुमानतां) पूर्वी [मी] त्वां शतशः सहस्रशः (शेकडों व हजारों पर्यायांनीं) स्पष्ट (प्रसिद्धपणें) आराधिलों असें. ७. अन्वयार्थः—भक्तरत्नें बहु असति, [परि] हीं (रत्नें) तुळितां (तुलना केल्यास) तुझ्या वजना न पुरतील (तुझ्या पासंगासही तोलणार नाहींत). ८. अन्वयार्थः—स्तवनीं मग्न झालों; [अशा स्तवनीं] 'शिरेन' असें मन म्हणतचि होतें. ९. तुला नमस्कार असो. १०. महादेव.

रज्जूंत[1] सर्प, कीं जळ किरणीं श्रुतिसन्मतें विवर्ततसे ।
बहु जेविं, तुझ्याठायीं पाउनि जग जन्म तेंवि वर्ततसे. ॥ ५२
तूं तप, सत्वरजस्तम, **विधि**, **रुद्र**, **ज्वलन**, **वरुण**, **रवि**, **धाता**, ।
त्वष्टा[2], **मनु**, **देव** सकळ, यज्ञ, तदंगेंहि[3], तत्फलविधाता[4]. ॥ ५३
सकळार्थप्रद[5] तव पद चित्तें ध्याताति संत तत्वरतें[6], ।
सर्वप्रणतोद्धारीं सदय तुझें हृदय संतत[7] त्वरतें[8].' ॥ ५४
इत्यादि स्तव करितां, झाला संतुष्ट अंधकाराती[9], ।
परम प्रसन्नता करि दूर गुहास्थाहि[10] अंधकारा ती. ॥ ५५
नमुनि[11] निवाले सकळहि, जेव्हां मज **सर्व** तापहर पावे; ।
चंद्र चकोरीं द्रवतां विश्वाचे सर्व ताप हरपावे. ॥ ५६
'जय जय' म्हणुनि, मम शिरीं सुरसंहति[12] वर्षली प्रसूनांहीं[13], ।
तो काय जन? जयाच्या धन्यत्वें हर्षली प्रसू[14] नाहीं. ॥ ५७

---

१. सार्थान्वयः—जेविं रज्जूंत (=दोरीच्या ठायीं, दोरीवर) सर्प (=साप, सापाचा आभास) किं किरणीं (=सूर्यकिरणीं) जळ (पाण्याचा आभास, अर्थात् मृगजल) श्रुतिसन्मतें (=श्रुतीच्या मतानें) विवर्ततसे (=मिथ्या भासाप्रमाणें) [वर्ततसे], तेविं तुझ्या ठायीं जग बहु जन्म पाऊनि (=अनेक प्रकारचीं रूपान्तरें लाभून) [मिथ्या भासाप्रमाणेंच] वर्ततसे (राहत आहे, नांदत आहे). दोरी पाहून साप असेल असें वाटणें किंवा कडक उन्ह पडलें असतां सपाटीच्या प्रदेशावर पुढें पाणी असावें असें भासणें, अर्थात् मृगजल दिसणें, ह्या गोष्टी जशा मिथ्या असून खऱ्या भासतात, त्याचप्रमाणें हें जग म्हणजे केवळ भासमान असें तुझें रूपान्तर असून, केवळ मायेचा खेळ आहे व वस्तुतः तूं एक कैवल्यसत्त्व ब्रह्म आहेस. २. त्वष्टा=विश्वकर्मा. हा देवांचा शिल्पकार होय. ३. यज्ञांगें. ४. त्यांचें (यज्ञांचें) फल देणारा. ५. चारही अर्थ साधून देणारें. हें 'पद' ह्याचें विशेषण. ६. सत्याचे ठिकाणीं रममाण झालेल्या. 'चित्तें' ह्याचें विशेषण. ७. एकसारखें. ८. त्वरा करितें. कालावधि सहन करीत नाहीं. ९. शंकर. अंधकासुराचा शत्रु. शंकरपार्वती क्रीडा करीत असतां, अंधक नांवाचा दैत्य पार्वतीस हरण करण्यास प्रवृत्त झाला. शंकरांनीं त्यास जिंकलें; व त्यानें केलेल्या करुणस्तवानें प्रसन्न होऊन त्यास जीवदान दिलें व त्यास आपला गण केलें. १०. दऱ्याखोऱ्यांत असणाऱ्याला सुद्धां. ११. सार्थान्वयः—तापहर सर्व (दुःखातें हरण करणारा सर्व=शिव) जेव्हां मज पावे (प्रत्यक्ष दर्शन देऊन मजवर प्रसन्न झाला), [तेव्हां] सकलहि [त्यातें] नमुनि निवाले (समाधान पावले); चकोरीं चंद्र द्रवतां (चंद्रानें आपल्या उदयानें चकोरपक्ष्यावर कृपा केली असतां) विश्वाचे सर्व ताप हरपावे (नेहमीं नाहींसे होतात, सर्व जगास सुख होतें). परमेश्वराचें दर्शन मजलाच घडलें असें नाहीं, तर तेथें असणाऱ्या सर्वत्रांस घडलें, व त्यांस समाधान झालें. १२. देवसमुदाय. १३. पुष्पांनीं. 'सुरसंहति प्रसूनांहीं वर्षली' हा प्रयोग लक्ष देण्यासारखा आहे. देवांनीं पुष्पवृष्टि केली, असा भाव. १४. माता.

देवीतें, शक्रातें, मातें, विजिता[1]मृतातिवृष्टीनें ।
दृष्टीनें पाहे प्रभु कृतरक्षित[2]हृतसमस्तसृष्टीनें. ॥ ५८
चरणरजें देवांच्या[3] जो बहु देणार लाज अगमातें[3], ।
[4]वात्सल्यें करुनि म्हणे ऐसें तो देवदेव मग मातें. ॥ ५९
'कृष्णा! माझ्याठायीं उत्कृष्टा भक्ति जी तुझी आहे, ।
ईतें प्रसिद्ध सुज्ञ ब्रह्मादि समस्त जाणती बा! हे. ॥ ६०
मत्प्रीतिहि प्रसिद्धा तुझियाठायीं असे सदा परमा, ।
न विसंबे पळमात्रहि तुज, माता जेविं बाळका [5]चरमा. ॥ ६१
[6]आराधिला तुवां बहु, देतो [7]वरदेश आठ वर हा, या ।
[8]माग स्वश्रेय सुखें; न गमो परदेश आठव रहाया. ॥ ६२
देतों सुदुर्लभहि, वर माग, तुज करिन सुखी [9]अदेयशतें.' ।
ऐसें म्हणे प्रभु मला, [10]विश्वास तसेंच कीं वदे यश तें. ॥ ६३
मी त्या [11]तेजोराशिस्थितभक्तमयूरमूर्तवर्षातें ।
भगवंतातें ऐसें वदलों पावोनि परमहर्षातें. ॥ ६४
'धर्मी सुदृढत्व असो; व्हावा समरांत शत्रुचा घात; ।
यश बहु, विमळ मिळावें, [12]लाजावा मज महाबळा वात; ॥ ६५
[13]हो त्वद्भक्त असावा अचळें योगें सदैव संपन्न; ।

---

१. विजित+अमृत+अतिवृष्टीनें=जिंकिली आहे अमृताची अतिवृष्टि जिनें, अशा (दृष्टीनें). २. कृत+रक्षित+हृत+समस्त+सृष्टीनें=उत्पत्ति, स्थिति व लय अवघ्या सृष्टीचा केला आहे जिनें, अशा (दृष्टीनें). ३. देवांच्या अगमातें=सुरवृक्षातें; कल्पतरूतें. ४. प्रेमानें. ५. शेवटच्या. आयांची ममता शेंडेफळावर सर्वांत अधिक असते. कवीस जगांतील गोष्टी किती उत्तम माहीत असतात, ह्याचें हें उदाहरण आहे. ६. आराधिलेला. ७. वर देणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ. शंकरासारखा वर देणारा दुसरा कोणी नाहीं, ही गोष्ट अनेक असुरांनींही शंकरास प्रसन्न करून हवे ते वर मागितले व ते शंकरांनीं दिले, ह्यावरून लक्ष्यांत येणारी आहेच. ८. सार्थान्वयः—या (ह्या मला, शंकराला) स्वश्रेय (स्वतःचें हित, जें तुला हितप्रद असेल तें) सुखें (आनंदानें) माग; आठव (आठवण रहाया परदेश न गमो—आपल्यास काय पाहिजे आहे त्याची आठवण होण्याचे बाबतींत तुला परदेशाचा भास न होवो.) नवख्या ठिकाणीं मनुष्य गेला म्हणजे तो भांबावतो व कांहीं वेळ त्याची स्मृति नष्ट झाल्यासारखी होते. ९. देण्याजोग्या नव्हेत अशा शेंकडों गोष्टींनीं. १०. अन्वयः—तें यश (प्रभुयश) विश्वास (जगास) तसेंच (मजप्रमाणेंच) वदे कीं. ११. तेजोराशिस्थित+भक्तमयूर+मूर्तवर्षातें=तेजःसमूहामध्यें असलेला अर्थात् तेजोमय, व भक्तरूप मयूरांस प्रत्यक्ष मेघाप्रमाणें, असा त्यातें, हें 'भगवंतातें' ह्याचें विशेषण. परमेश्वर तेजःस्वरूप असून कृपावंत आहे असा भाव. १२. अन्वयः—मज महाबळा वात (वायु) लाजावा. १३. मी कृष्ण.

[1]व्हावें ग्यां विश्वाला परम प्रिय सर्वदा जसें अन्न; ॥ ६६
घ्यावें पुत्रशतांचें शत, या विश्वास [2]आठवायास; ।
तव सन्निधान, हा वर बा! वरदा! देच आठवा [3]यांस.' ॥ ६७
वरयाचना असी जी केली, शंकर म्हणे 'तथास्तु' तिला. ।
[4]सेविल न सुधा किंवा भेदिपशुश्रुतिच या कथास्तुतिला. ॥ ६८
[5]त्रिजगन्माता [6]सुयशःकर्पूराची अनादि जी [6]कदली, ।
दिव्यतपोनिधि देवी [7]धात्री मज सर्वपावनी वदली. ॥ ६९
'कृष्णा तुज भगवंतें सुतरत्न दिलें [8]अनर्घ्य अनघातें, ।
मज गुहसा यश देइल जांबवतीस [9]स्वशत्रुजनघातें. ॥ ७०
'सांब' असें नांव तया ठेवावें, सविधि बारसें करुनी; ।
विश्वासि विधु तसा तव हृदया निववील बा! [10]रसेंकरुनी. ॥ ७१
[11]मद्वात्सल्यें माझी 'तूंही दे' म्हणुनि [12]पुरविली [12]पाठ, ।
आठ प्रिय वर माग, [13]प्रभुपरि मजलाहि 'घे' असे पाठ. ॥ ७२
जें वंदिलें विधीनें, [14]तत्सुतसुतवंशसंभवांनीं, तें ।

---

१. सार्थान्वयः—विश्वाला (जगाला) जसें अन्न परम प्रिय [तसें] ग्यां सर्वदा व्हावें. यावरून जनप्रियता ही अमूल्य वस्तु आहे हें सिद्ध आहे. २. जगानें ज्यांचें नांव घ्यावें असे. ३. मला, श्रीकृष्णास. ४. अन्वयार्थः—या कथास्तुतिला (=या कथेला आणि स्तुतीला) सुधा किंवा भेदिपशुश्रुतिच (=भेदवादी जे पशुतुल्य मनुष्य त्यांचा कान मात्र) [मत्सरयुक्त होऊन] न सेविल. कथा व स्तुति या अत्यंत मधुर व अमृतपद देणाऱ्या असल्यामुळें, सुधा त्यांचा मत्सर करील हें उघड आहे. जे भेदवादी आहेत, त्यांनाही हें देव व भक्त यांमधील प्रेम व एकरूपत्व, पसंत पडणार नाहीं. केवळ सगुणवादी किंवा भेदवादी यांना श्रुतीनें 'पशु' ह्मटलें आहे. यासंबंधें पुढील यथार्थदीपिकेंतील उतारा वाचनीय आहेः—'दोहींत केवळ सगुणवादी । त्यांची निष्ठा अखंड भेदीं । जयांचें भजन वर्णिलें वेदीं । पशुतुल्य ॥ ७० ॥ श्रुति—अथ योऽन्यां देवतामुपास्तेऽन्योऽसावन्योऽहमस्मीति न स वेद यथा पशुः ॥ श्रुत्यर्थ—देव अन्य मी अन्य । ऐसा भेद अन्योन्य । दाटोनी आणिती जघन्य । त्यांस ही श्रुति निंदिते.॥७१॥ यथार्थदीपिका, अध्याय १ ला. ५. पार्वती. ६. कापूर हा पदार्थ केळीच्या झाडापासून निघतो अशी समजूत आहे. शिवाय 'कदली' हा शब्द स्त्रियांसंबंधानें योजिला असतां त्यांच्या अंगयष्टीचें सौंदर्य व्यक्त होतें. पार्वती ही उत्तम यशातें देणारी आहे, असा भाव. ७. माता. ८. बिनमोल. ९. आपल्या शत्रुवर्गाच्या नाशानें. १०. रस=चंद्रपक्षीं अमृतरस; सांबपक्षीं आनंद. ११. माझें भक्तांवर असणारें जें प्रेम त्यामुळें. १२. पाठ पुरविली=सारखा हट्ट घेतला, पिच्छा पुरवला. १३. अन्वयः—प्रभुपरि (शंकराप्रमाणें) मजलाहि 'घे' ('घे' असें ह्मणणें, हा शब्द) पाठ असे. १४. तत्सुत+सुत+वंश+संभवांनीं=ब्रह्मदेवाच्या नातवाच्या वंशांत उत्पन्न झालेल्यांनीं, अर्थात् मानवांनीं.

चरणसरोजयुग शिरें नमुनि, असें बोलिलों भवानीतें. ॥ ७३

'विश्वजननि! विप्रांच्या ठायीं तिळमात्रही नसो रोष; ।
व्हावा [1]पितृप्रसाद प्राप्त, परम [2]भोगें भोगितां तोष; ॥ ७४

[3]शत सद्गुणपुत्रांचें; प्रीति असावी कुळीं सदा माते! ।
मातृप्रसाद; दाक्ष्यहि; शमही, जेणें न जन कदा माते.' ॥ ७५

देवी म्हणे 'दिल्हें हें कृष्णा! [4]अमरप्रभाव होशील; ।
सत्य वदावें, ऐसें माझें तैसें तुझेंहि हो शील; ॥ ७६

षोडशसहस्र भार्या त्यांच्या ठाईं असो प्रियत्व सदा; ।
धनधान्याद्यर्थाला व्यय करितां, क्षय तुझ्या नसोचि कदा; ॥ ७७

तुज बांधवांकडून प्रीति सुविपुला दिल्ही घनश्यामा! ।
तैसीच [5]काम्यता तव देहीं बहु लाजवावया [6]कामा; ॥ ७८

[7]सप्ततिशत अतिथि तुझ्या सदनांत सदा सुतृप्त होतील, ।
तत्कांचनपात्रीं बहु [8]पायस तव [9]सूदवर्ग ओतील.' ॥ ७९

देवानें आठ दिल्हे, देवीनें वर दिल्हे असे [10]सोळा, ।
केले म्यां चोवीस प्रेमें [11]तत्पादरेणुसे गोळा. ॥ ८०

यापरि परमेश्वर वर देउनि तत्काळ जाहला गुप्त, ।
विस्मित झालों, स्वप्नीं [12]अद्भुत पाहोनियां जसा सुप्त. ॥ ८१

हें अत्यद्भुत कथिलें वंदुनि उपमन्युला नृपा! धर्मा! ।
तो सात्विकभावांहीं [13]परवश होवूनि पावला शर्मा. ॥ ८२

उपमन्यु म्हणे, 'दाता कीं करिता शूर शर्वसम यज्ञ ।
कोणी देव नसे, बा! कैंचे सर्वत्र सर्व [14]समयज्ञ.' ॥ ८३

---

१. वडिलांची कृपा. २. सुखसाधन, विषय. ३. सार्थान्वयः—माते! सद्गुणपुत्रांचें शत [असावें]; कुळीं सदा प्रीति असावी; मातृप्रसाद; दाक्ष्यहि (प्रामाणिकपणा); [व] जेणें (ज्यायोगें) जन कदा (केव्हांही) न माते (माजत नाहीं, चढून जात नाहीं), [तो] शमहि [असावा]. श्रीकृष्णांनीं आठ वर मागितले ते ह्या व मागील गीतींत दिले आहेत. ४. देवासारखा प्रभाव आहे ज्याचा असा. ५. सौंदर्य. ६. मदनास. ७. सत्तरशें, सात हजार. ८. खीर. ९. वाढपी. १०. गीती ७४–७५ व ७६–७९ ह्यांत सांगितलेले. ११. त्यांच्या पायांच्या धूळीच्या कणांप्रमाणें. १२. चमत्कार. १३. दुर्बळ, व्याकुळ. १४. काळवेळ जाणणारे.

अध्याय सहावा.

व्यास म्हणे, 'पुत्रा! हो प्रीत महादेव, या स्तवा पढ गा!
या[1] पाठकताप सुजय, मेघांच्या जेविं बर्हिताप ढगा. ॥ १
यां[2] स्तवराजें जैसा पीयूषरसें पिपासुताप सरे, ।
ब्रह्मांडीं कीर्ति, जसी शारदशशिचंद्रिका, सुता! पसरे. ॥ २
मेरुनगीं सफळ करी माझें स्तवराज सुतप हा, यांस[3] ।
कीर्तित होतों प्रेमें तापस मी योग्य सुत पहायास[3]. ॥ ३
होतां[4] मनोरथ स्तवराजावांचूनि सिद्ध आशु[5] कसा? ।
झाला, शिवप्रसाद न होतां, कवणासि पुत्र बा! शुकसा[6]? ॥ ४
धर्मा! या स्तवराजें सर्व तुझे काम सिद्ध[7] होतील, ।
शिवकरुणामुदिर[8] भजक[9]चातकवदनांत अमृत[10] ओतील. ॥ ५
मग सर्वदेवसंमत[11] सांख्याचार्य[12]हि म्हणे 'मला[13] कपिला ।
ज्ञान[13] दिल्हें जगदीशें, अति दुर्लभ अमृतफळ जसें कपिला. ॥ ६
बहुजन्में तप तपलों, जपलों[14], झालों उदास[15] सुज्ञा! न; ।
केलों[16] धन्य प्रभुनें; पावे यांचा[17] सुदास सुज्ञान. ॥ ७

---

१. सार्थान्वयः—मेघांच्या ढगा जेविं बर्हिताप (मोरांस होणारा त्रास), [तेविं] या (ह्या शिवस्तवाला) पाठकताप (पठन करणाऱ्यांचा त्रास) सुजय (सहज नाहींसा करण्याजोगा) [असे]. २. सार्थान्वयः—जैसा पीयूषरसें (अमृतरसानें) पिपासुताप (तान्हेल्याचा संताप) सरे (नाहींसा होतो), [तैसा] या स्तवराजें (महास्तोत्रानें) [जनताप सरे]. [व] [हे] सुता! (धर्मराजा!) जशी शारदशशिचंद्रिका (शरदृतूंतील चंद्राची प्रभा), [तशी] कीर्ति ब्रह्मांडीं (सर्व जगभर) पसरे. येथें कीर्तीस दिलेली उपमा फारच समर्पक आहे; कारण, शुभ्रता, मनोहरता व व्यापकता हे तीनही गुण शरच्चंद्रप्रकाश व कीर्ति ह्या उभयतांस सारखेच लागू पडणारे आहेत. ३. अन्वयः—मी तापस योग्य सुत पहायास (योग्य पुत्र व्हावा ह्या हेतूनें) यास (या स्तवराजास) प्रेमें कीर्तित होतों (गात होतों, पाठ म्हणत होतों). ४. झाला असता. ५. सत्वर. ६. शुकसा=शुकाचार्यासारखा; (पक्षीं) पोपटासारखा बोलका, हुशार. ७. पूर्ण. ८. महादेवरूप दयेचा मेघ. ९. भक्तरूपी चातकांच्या तोंडांत. १०. पाणी, पक्षीं मोक्ष. ११. सर्व देवांस मान्य असा. १२. सांख्यदर्शनप्रवर्तक कपिल मुनि. १३. सार्थान्वयः—अतिदुर्लभ (मिळण्यास कठीण) अमृतफळ (मधुरफळ) जसें कपिला (माकडाला), [तसें] मला कपिला (कपिल ऋषीला) जगदीशें [अतिदुर्लभ] ज्ञान दिधलें. कपिल व सांख्यदर्शन यांसंबंधीं मागें ४ थ्या अध्यायांतील १८ व्या गीतीवरील टीप पहा. १४. जप केला किंवा एकाग्रवृत्तीनें राहिलों. १५. निराश. १६. प्रथमपुरुषी कर्ता असतां, येथें कर्मणिप्रयोग आहे, हें ध्यानांत धरण्याजोगें आहे. १७. शंकराचा.

शक्राचा दयित सखा, '[1]आलंबायन' असें जया म्हणती, ।
तो [1]चारुशीर्ष करुणामय बोले, करुनि शंभुला [2]प्रणती. ॥ ८
"म्यां शतवर्षें केलें [3]गोकर्णीं उग्र सुतप, कीं [4]शांत, ।
व्हावे [5]अयोनिज, [6]अजर, [7]लक्षायू, [8]ज्ञानसिंधु, सुत [9]दांत. ॥ ९
धर्मा नावडती सुत, सुंदरहि कदापि, जे न [10]कोविद रे ! ।
तैसेचि पंडितहि परि बापा ! कोणासही नको [11]विद्रे. ॥ १०
[12]नसतां शांत, सुताचें बहु तापचि दे [13]वपु; [14]त्रपाकारी ।
[14]काय न अदांत कश्यपमुनिसि तसा देव पुत्र [14]पाकारी. ॥ ११
[15]सर्वहि सद्गुण सोडुनि जातात तया नरा, जरा ज्याला, ।

---

१. नामविशेष. २. नमस्कार. ३. हें शिवक्षेत्र दक्षिणेमध्यें आहे. शंकरांनीं प्रसन्न होऊन आत्मलिंग रावणास दिलें; तें जमिनीवर ठेवूं नको असें रावणास सांगितलें होतें. तें लिंग रावण घेऊन जात असतां वाटेंत त्यास विघ्न करण्याकरितां देवांनीं गणपतीस त्याजकडे पाठविलें. वाटेंत रावणास नित्यकर्में करणें असल्यामुळें त्यानें कांहीं वेळपर्यंत तें घेऊन उभें राहण्यास गणपतीस सांगितलें; गणपतीनें कांहीं नेमक्या वेळेपर्यंत तें शिवलिंग हातीं धरण्याचें पतकरिलें व नेमलेली वेळ टळतांच तें खालीं ठेविलें. नंतर रावणानें तें जमिनीवरून उचलून घेण्याकरितां यत्न केला, त्या वेळीं जोरानें पिळून वर उचलल्यामुळें त्या लिंगास गाईच्या कानाचा आकार प्राप्त झाला, पण तें जमिनींतून वर निघालें नाहीं. हेंच ठिकाण गोकर्ण म्हणून प्रसिद्ध आहे. ४. विवेकी व समाधानी. ५. गर्भस्थ स्थिति प्राप्त न होतां जन्मलेले. ६. वार्धक्यरहित, जराहीन. ७. लक्षवर्षें आयुष्य ज्यांचें आहे असे. ८. ज्ञानाचे समुद्र. ९. जितेंद्रिय. हीं सर्व विशेषणें 'सुत' ह्याचीं असून, प्रत्येक विशेषणाच्या आवश्यकतेचीं कारणें खालील पांच गीतींत दिलीं आहेत. १०. शहाणे. ११. विद्रूप, कुरूप. १२. [सुत] शांत नसतां=[मुलगा] उच्छृंखल असल्यास. १३. शरीर. कुपुत्रनिंदाः—"जेविं बहु कुपुत्राचें, न फणीचें तेविं दे वपु त्रास । देता झाला कैसा ऐशा मज देवदेव पुत्रास ? ॥ ३४ ॥ गृहशून्य अपुत्राचें न, कुपुत्राचेंचि शून्य गृह लोकीं । इत्यादि विलाप करी तो गौतम, मग्न होय बहु शोकीं ॥३५॥" (मोरोपंतकृत कृष्णामाहात्म्य, अध्याय ४.) १४. सार्थान्वयः—तसा देव पाकारी (तो प्रसिद्ध देव व पाकासुराचा शत्रु इंद्र) [परि] अदांत (ज्यांच्या मनोवृत्ति स्वाधीन नाहींत असा) पुत्र कश्यपमुनिसि त्रपाकारी (लाज आणणारा) न काय? इंद्र तेजस्वी पराक्रमी आहे, तेव्हां त्यायोगें त्याच्या वडिलांस म्हणजे कश्यप मुनीस संतोष व्हावा; पण इंद्र अदांत म्हणजे उच्छृंखलवृत्तीचा आहे, हें पाहून कश्यप मुनीस फारच ताप झाला, असा भाव. ह्या ठिकाणीं पंतांनीं 'अदांत' पदानें इंद्राच्या 'अहल्याजारत्वाची' आठवण दिली आहे. १५. सार्थान्वयः—ज्याला जरा (वृद्धपण), तया नरा सर्वहि सद्गुण सोडूनि जातात; प्रबळारिचमूशत (बलाढ्य शत्रूंच्या शेंकडो सेना) मथित्या (कुटणाऱ्या) राजराजाला (राजश्रेष्ठाला, थोर राजाला)[ही] ही (जरा) न आटे (आटोपत नाहीं, पराभूत करितां येत नाहीं).

आटे प्रबळारिचमूशत, मथित्या ही न राजराजाला. ॥ १२
[1]पुरुषास कानकोंडेपण बा ! करितांचि बायको येतें, ।
न दिसे तरुत्व म्हणवुनि गेलें सोडोनि काय कोयेतें ? ॥ १३
झाले प्राप्त विपुलगुण सुत, तत्संबंधयोग परि टांचा[2], ।
[3]तो तैसा लज्जाकर, जेविं [4]परपटोपभोग परिटांचा. ॥ १४
[5]ऐसें मनीं विचारुनि सुविचारें, आयतें वदान्यातें ।
मागितलें म्हणत्या 'जें इष्ट असे काय, तें वदा; न्या तें' ॥ १५
[6]दुर्घट काम पुरविता दीनाचा आप्तकाम पुरविल या; ।
नेताचि समर्थ जगीं कोण दुजा आप्त कामपुर विलया ?" ॥ १६
मग **वाल्मीकि** मुनि म्हणे "पांडित्यें जाहला मला गर्व, ।
वेदविरुद्धचि वदलों, **अग्निसह** महर्षि कोपले सर्व. ॥ १७
मज 'तूं ब्रह्मघ्न' असे वदले ते **अग्निसहित** मुनि सारे, ।
तत्काळ [7]त्या अधर्में झालों आविष्ट [8]**पांडवा**! बा ! रे! ॥ १८
गेलों शरण [9]अमोघा [10]अनघा [11]परमेश्वरासि बा ! [12]राजा ! ।

---

१. सार्थान्वय–बा ! बायकोकरितांचि (=बायकोमुळेंच) पुरुषास कानकोंडेपण (=मनःसंकोच, लाजवटपण) येतें, तरुत्व न दिसे म्हणवुनि कोयेतें (फळांतील आठळीस) सोडोनि गेलें काय ? जसें तरुत्व गुप्तरूपानें कोईंत असतें, तसेंच लाजिरवाणेंपण स्त्रींत असतें, व तीशीं संबंध जडतांच तें पुरुषालाही पिच्छाडतें. म्हणून चारुशीर्षानें 'अयोनिज' पुत्र मागितले. २. थोडा, अपुरता. ३. पुत्रादिकांचा संबंधयोग. ४. पर+पट+उपभोग=दुसऱ्यांच्या वस्त्राचा उपभोग. दोन दिवसच हातीं आलेल्या दुसऱ्यांच्या कपड्यांचा उपभोग घेऊन केलेला नटवेपणा जसा परिटाला लाज आणणारा आहे, तसाच दोन दिवसांनींच ज्यांचा वियोग दुर्दैवानें व्हावयाचा आहे, अशा अल्पायू मुलांचा संबंधही उसना उसना व लाजिरवाणा वाटतो. उपमा फारच बहारीची आहे. पंतांनीं ह्या दोन गीतींत लोकव्यवहार फार मार्मिकपणें वर्णिला आहे. ५. सार्थान्वयः–ऐसें सुविचारें मनीं विचारुनि [ह्याप्रमाणें मनाशीं योग्य विचार करून] 'जें काय इष्ट असे तें वदा; तें न्या.' [असें] म्हणत्या (म्हणणाऱ्या) वदान्यातें (उदारातें) आयतें (ज्याबद्दल खटपट करण्याचें उरलें नाहीं असें, सर्व इष्ट प्रकारांनीं युक्त असें) मागितलें. ६. सार्थान्वयः–दुर्घट (=दुःसाध्य) काम (=मनोरथ) पुरविता (=पूर्ण करणारा) आप्तकाम (=परमेश्वर) या दीनाचा (काम) पुरविल; [कारण] जगीं कामपुर (=वासनासमूह) विलया नेताचि (=खास नाहींसा करणारा; पूर्णपणें पुरविणारा) दुजा आप्त (=सोयरा) कोण ? वासनांचा बींमोड करणारा असा श्रीशंकरावांचून, ह्या जगामध्यें, दुसरा कोणी नाहीं, हा भाव. ७. त्या धर्मविरुद्धाचरणानें झपाटलों. ८ धर्मराजा ! ९. वायां न जाणाऱ्या; अर्थात् अचूक फल देणाऱ्या. १०. निष्पाप. ११. शंकरास. १२. धर्मराजा !

पाप पळालें, पुरते प्रायश्चित्ता न अब्द बारा ज्या[1]. ॥ १९
यास्तव दुःखविनाशन ऐसा कोणी नसे सुरांमाजी, ।
झाली[2], हो! ती आख्या सुजना ग्राह्या जसी सुरामा, जी. ॥ २०
मज[3]करवीं देवानें[4] धर्मा! करयुग्ममात्र[5] जोडविलें; ।
परमेश्वरें सुदुस्तर[6] पापापासुनि पळांत सोडविलें. ॥ २१
"तुज[7] 'कविवर' म्हणतिल बुध, यश गातिल सकळ;" वरद वर दे हा; ।
किंबहुना 'धन्य' म्हणति अमरवरहि शंभुदासनरदेहा." ॥ २२
भृगुराम[8] म्हणे "वधिला नीचांहीं[9] श्रेष्ठ मज्जनक[10] राया! ।
गेलों शरण शिवाला, जेविं नदा तप्त मज्जन[11] कराया. ॥ २३
करितों[12] झालों प्रभुच्या नामांहीं सत्य पांडवा! स्तुतिला; ।
मुख्या हेचि, दुजी जी श्रुति न म्हणति सत्यपांडवास्तु तिला. ॥ २४
मज[13] देवदेव सत्फळ दे सहदिव्यास्त्र परशु भजनाचें; ।
सद्यः[14] प्रभु हाचि करी, तैसें न करीच पर[15], शुभ[16] जनाचें. ॥ २५

---

१. सार्थान्वयः–ज्या (=ज्या पापाला) प्रायश्चित्ता (=प्रायश्चित्तासाठीं, प्रायश्चित्त घेण्याला) बारा अब्द (संवत्सर) न पुरते(=पुरेसे झाले नसते). २. सार्थान्वयः–हो! जी आख्या (=कीर्ति) झाली, ती जशी सुरामा (=चांगली स्त्री) [तशी] सुजना ग्राह्या (=स्वीकारण्यास योग्य) [आहे]. ३. माझ्याकडून. ४. श्रीशंकरानें. ५. करयुग्म मात्र जोडविलें=नुसते दोन हात जोडावयास लाविले; नमस्कारापलीकडे कांहींच जास्त करावयास लाविलें नाहीं. ६. खडतर. मी केवळ हात जोडले आणि शंकरानें मला तत्काळ पापमुक्त केलें, हा गीतीचा मतलब. ७. सार्थान्वयः–'सकळ बुध (=ज्ञाते) तुज 'कविवर' (=कविश्रेष्ठ) म्हणतील [व] यश गातील; हा वर वरद (=वर देणारा, श्रीशंभु) दे (=देता झाला); किंबहुना (=फार काय सांगावें; सारांश) अमरवर (=श्रेष्ठदेव) हि शंभुदासनरदेहा (=शंकराची सेवा करणाऱ्या पुरुषाच्या शरीरास) धन्य म्हणती. ८. परशुराम. ९. हलकट व दुष्ट अशा कार्तवीर्यपुत्रांनीं. १०. माझा बाप, जमदग्नि. ११. स्नान. १२. सार्थान्वयः–[हे] पांडवा! (धर्मराजा!) नामांहीं (नांवांनीं, शिवसहस्रनामानें) प्रभुच्या (शंकराच्या) सत्य (अंतःकरणपूर्वक; खऱ्या) स्तुतीला करिता झालों. हेचि (हीच स्तुति) मुख्या [श्रुति]; जी दुजी श्रुति (=वेदविद्या) तिला सत्यपांडवास्तु (ब्रह्मांडाचा आश्रय, विश्वाचें आधारस्थान) न म्हणति. विश्वाचें रक्षण करण्यांत शिवसहस्रनामापुढें प्रत्यक्ष वेदसुद्धां कांहीं नव्हे, असा भाव. सत्यपांडवास्तु=सत्यप+अंड+वास्तु= सत्यलोकपति (=ब्रह्मा)+अंड+वसतिस्थान. १३. अन्वयः=सहदिव्यास्त्र (=तेजस्वी अस्त्रांसह) परशु [हें] भजनाचें सत्फल देवदेव (=महादेव) मज दे. मी स्तुति केली, त्यायोगें श्रीशंकर प्रसन्न झाले व त्यांनीं मला परशु व अस्त्रें दिलीं, असा भाव. १४. तत्काळ. १५. दुसरा. १६. कल्याण.

'[1]पापा न शिव खळांच्या; यांच्या मोडुनिहि कापिल्या माना, ।
रे सुरहो! या माज्या मत्सम, सोडुनि हिका, पिल्या माना. ॥ २६
वत्सा! [2]रामा! [3]अजराजेयामर [4]दिव्यकाय होशील.' ।
ऐसें वदे महेश्वर, याचें स्तववेल काय हो! [5]शीलें. ॥ २७
धन्य प्रसाद पावुनि झालों, [6]भजतां [6]भवा, असा राया! ।
[7]सारत्व सुखें येतें भगवद्भजनें भवा असारा या." ॥ २८
विश्वामित्र म्हणे 'मी क्षत्रिय [8]कुरुकुळविभूषणा! पहि[9]ला, ।
भोगित होतों होउनि [10]अभिषिक्त पर[11]परागता [12]महिला. ॥ २९
[13]जीची कास म्हणे, 'गे! पावलिस वृथाचि तूं सुधे! नुतिला;' ।
होतों हरित बळें, जी वसिष्ठमुनिकीर्तिसी सुधेनु, तिला. ॥ ३०
तेव्हां वसिष्ठतेजें धर्मा! मी पावलों परि[14]भवातें; ।
स्पष्ट बुडालों होतों, बा! गेलों शरण मी [15]परि [16]भवातें. ॥ ३१
होतें आंगीं [17]भटपण, त्याचा आला [18]उमाप [19]तिटकारा, ।
त्यांतचि मला दुसरिया देता झाला उमापति '[20]ट'कारा. ॥ ३२
[21]ब्राह्मण्य सुदुर्लभ, परि झालें प्राप्त प्रभुप्रसादानें. ।
[22]अभिलषित पदार्थांचीं देतो सत्स्वर्द्रु एक हा दानें. ॥ ३३

---

१. सार्थान्वयः—खळांच्या पापा न शिव (दुष्टांस लागणारें पाप तुजला न लागो). यांच्या (खळांच्या) माना मोडुनिहि कापिल्या. हे सुरहो! या माज्या (माझ्या) पिल्या (वत्सास) हिका सोडुनि (हट्ट सोडून) मत्सम (माझ्याप्रमाणेंच) माना (मान द्या.) टीपः—ह्या गीतींतील पूर्वार्ध परशुरामास उद्देशून आहे; व उत्तरार्ध इतर देवांस संबोधून आहे. पुढील गीतींतील पुन्हा पूर्वार्ध परशुरामास उद्देशून आहे. तेव्हां ह्या २४ व्या गीतींत पूर्वार्ध तो उत्तरार्ध व उत्तरार्ध तो पूर्वार्ध असा क्रम असता तर बरें. २. परशुरामा. ३. अजर+अजेय+अमर=जरारहित+अजिंक्य+चिरंजीवी. ४. तेजस्वी देह ज्याचा असा. ५. सुस्वभाव, सौजन्य. ६. भवा भजतां=शंकराची भक्ति करून. ७. या (ह्या) असारा (मिथ्या) भवा (संसारास) भगवद्भजनें सुखें (सहज) सारत्व (सत्यमयता) येतें (प्राप्त होतें). ८. कौरवश्रेष्ठा धर्मा! ९. मूळचा. १०. अभिषेक पावून, राज्याभिषेक लाभून. ११. वडिलार्जित, चालत आलेल्या, पिढीजाद. १२. पृथ्वीला. १३. सार्थान्वयः—जीची (ज्या सुधेनूची) कास [सुधेला] म्हणे, 'गे सुधे! तूं वृथाचि नुतिला (स्तुतीला पावलीस) [अर्थात् जिच्या दुधापुढें प्रत्यक्ष अमृताचीही थोरवी व्यर्थ होती]व जी सुधेनु (नंदिनी)वसिष्ठमुनिकीर्तिसी (वसिष्ठऋषीच्या कीर्तीप्रमाणेंच) [होती],तिला बळें (बळात्कारानें)हरित होतों (हरण करण्याचा यत्न केला). १४. पराभवाला, मानहानीला. १५. परंतु. १६. शंकरातें. १७. क्षत्रियत्व. १८. फार. १९. कंटाळा. २०. 'ट' ह्या अक्षरास. मी भट (योद्धा) होतों; प्रभूनें मला त्यांतच(=भटांतच) एक 'ट' दिला म्हणजे अर्थात् मी 'भट्ट'(ब्राम्हण) झालों, असा भाव. २१. ब्राह्मणत्व. २२. सार्थान्वयः—हा एक सत्स्वर्द्रु (हा एकटाच भक्तजनांचा कल्पवृक्ष) अभिलषित पदार्थांचीं दानें देतो (इच्छित गोष्टी देतो).

[1]अनुभवितो रंक, वरुनि अभिषेकातें, विशंक राज्याला; ।
पाउनि शव अमृतरसा, हा गाधिज तेविं शंकरा जाला.' ॥ ३४
हरिसख [2]गृत्समद म्हणे "गेलों होतों म[3]हेंद्रसत्रास. ।
[4]चुकलोंसा मी झालों [5]मनुसुतशापेंकरूनि [6]संत्रास. ॥ ३५
[7]चाक्षुषपुत्र म्हणे 'रे! केला कीं [8]सत्रघात तूं पापी, ।
[9]ऐक अयुत अष्टादशशत वर्षें हरिण हो' असें शापी. ॥ ३६
होती पूर्वस्मृति, मज तृणसम जन्हि उडविलें [10]अशुभवातें; ।
गेलों शरण, नरेशा! शापें होवूनि मी पशु भवातें. ॥ ३७
[11]स्वमति मज म्हणे, 'वारुनि चित्तांतिल हानिलाभगलबा, गा; ।
तारिल भावें, न रुचे लवहि उमाजानिला भगल बा! गा! ॥ ३८
[12]वळवावया करावें काय पतितपावना तप शुभ जनें? ।
द्रवला स्वयेंचि पशुपति देव अतितपा वनांत पशुभजनें. ॥ ३९
भेटुनि देव मज म्हणे 'अमरत्वें [13]जिष्णुसींच [14]तुळेशील; ।

---

१. सार्थान्वयः–[शंकरप्रसाद झाल्यानें] [जेविं] रंक (दरिद्री) अभिषेकातें वरुनि राज्याला विशंक अनुभवितो (निर्धास्तपणें राज्योपभोग घेतो) [व] शव (मृतदेह) अमृतरसा पावुनि [जेविं होतो; अर्थात् सजीव होतो] तेविं हा गाधिज शंकरा [पावुनि] जाला (झाला). टीपः–'शव' शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे तसाच तो येथें योजिला आहे. २. हा मूळचा अंगिरसकुलोत्पन्न शुनहोत्राचा मुलगा. परंतु नंतर इंद्राच्या इच्छेनें हा भृगुकुलोत्पन्न शौनकाचा मुलगा झाला. ऋग्वेदाच्या द्वितीय मंडळांत हाच प्रधान ऋषि आहे. हा इंद्राचा परम मित्र होता. ३. इंद्रानें आरंभिलेल्या यज्ञास. ४. चुकल्यासारखा. वेद वगैरे पठन करीत असतां 'संचार जातो' हें सर्वत्रांस माहीत आहेच. ५. चाक्षुष मनूच्या मुलाच्या शापानें. चाक्षुष मनु हा १४ मनूंपैकीं ६ वा मनू. याच्या मुलाचें नांव वर्षिष्ठ होतें. ६. त्रासयुक्त. हें 'मी' ह्याचें विशेषण. ७. मनूचा मुलगा. ८. यज्ञनाश. ९. दहाहजार, अठराशें अर्थात् अकराहजार आठशें वर्षें. १०. अशुभ+वातें=अकल्याणरूप वायूनें, दुर्दैवाच्या वाहुटळीनें. ११. सार्थान्वयः–मज स्वमति (=माझें मन) म्हणे 'चित्तांतील हानि-लाभ-गलबा (नुकसान किंवा फ़ायदा ह्यायोगें होणारी अस्वस्थता) वारुनि (नाहींशी करून) [शंकरातें] गा; [तो] भावें (=भक्तीमुळें, तुझ्या मनांत खरी निष्ठा असेल तर) [तुला] तारील, [परंतु] उमाजानिला (उमा आहे जाया ज्याची असा शंकर त्याला), बा! गा! (अरे बाबा), लवहि (रतिमात्र सुद्धां) भगल (ढोंग) न रुचे (आवडत नाहीं). १२. सार्थान्वयः–पतितपावना (पतितांचा उद्धार करणाऱ्या शंकरास) वळवावया (आपलासा करण्याकरितां) शुभ (=पवित्र, पुण्यवान्) जनें काय तप करावें (=करण्याची जरूरी आहे?); अतितपा (थोर तपस्वी) [व] पशुपति देव (शंकर) स्वयेंचि (आपण होऊन) वनांत पशुभजनें (हरिणरूपी जो मी, त्या माझ्या भक्तीनें) द्रवला. येथें 'पशुपति' 'अतितपा' व 'पशुभजन' ह्या शब्दांची योजना फारच खुबीदार आहे. १३. इंद्राशीं. १४. बरोबरी पावशील.

चुकशील नच कधीं, हो जितवाणीपाणिवर्तिशुकशील.'[1] ॥ ४०
बापा! धर्मा! कोणी विद्येनें मजअसा कवी नाहीं. ।
प्राचीनांहीं[2] जैसे, तैसे कर जोडिले नवीनांहीं. ॥ ४१
वत्सलवर[3] हर, उपमा नच कोठें राजपुंगवा[4]! यास; ।
प्रेमें[5] बहु चाटवाया कीं लावी इतर हुंगवायास. ॥ ४२
पुनरपि कृष्ण म्हणे 'मी पूर्वी साहूनि ताप सत्वानें[6], ।
प्रभुतें[7] प्रसन्न करितां झालों निर्दोष तापसत्वानें[8]. ॥ ४३
वदला शंभु, 'असे त्वां शुचि तप केलें धरूनि विश्वास[9]; ।
होसील, अंतरात्मा जैसा, प्रिय तूं तसाचि विश्वास[10].' ॥ ४४
पूर्विल अवतारीं मी बहुतचि भणिमंतपर्वतीं जपलों[11], ।
शरद[12]युतसहस्रांचे सहस्रशत सुदृढ निश्चयें तपलों[13]. ॥ ४५
भगवान् प्रसन्न होउनि, भेटुनि, मज बहुत आदरि[14] द्रवुनी[15], ।
सुख[16] पावलों प्रसादीं, हेमंतीं जेविं बा! दरिद्र उन्हीं. ॥ ४६

---

१. प्रत्यक्ष सरस्वतीच्या हातावर बसणाऱ्या [आवडत्या] शुकाच्या [=पोपटाच्या] शीलावर (=कंठमाधुर्य व भाषणचातुर्य यांवर) ज्यानें ताण केली आहे असा. सरस्वतीच्या आवडत्या व बोलक्या पोपटाचा शांतिपर्वांतही पंतांनीं उल्लेख केला आहे:—मग आयकवी कृष्णा निजसूक्तिकलाप लाडकी राजा, । प्यावें वाणीकर्णें, करुनी बहुकल पलाड कीरा ज्या ॥ अ० ३ गी० ५९. २. सार्थान्वय:—जैसे प्राचीनांहीं (=प्राचीन कवींनीं किंवा पंडितांनीं) तैसे नवीनांहीं कर जोडिले (=माझें श्रेष्ठत्व कबूल केलें आहे). ३. ममत्वानें संरक्षण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ, अत्यंत मायाळू. ४. नृपश्रेष्ठा धर्मराजा! 'पुंगव' 'शार्दूल' इत्यादि शब्द कर्मधारय समासाच्या अंतीं योजिल्यास त्याचा अर्थ 'श्रेष्ठ' असा होतो. ५. सार्थान्वय:—कीं, (कारण) बहु प्रेम चाटावयास लावी, इतर (=त्याहून कमी दर्जाचें प्रेम) [नुसतें] हुंगावयास [लावी]. पशूंची अशी रीत असते कीं जेथें जास्त ममत्व तेथें ते पशु चाटतात, पण तेंच बाताबेताचें दिसल्यास ते नुसतें हुंगतात. ही गोष्ट गाय वगैरे पाळींव जनावरांमध्यें नित्य पहावयास सांपडते. येथें गृत्समद ऋषी शापामुळें हरिण झाले होते व त्या स्थितींत त्यांनीं शंकरास प्रसन्न करून घेतलें आहे, तेव्हां अशा वेळीं साजेल अशीच उपमा व शब्दयोजना पंतांनीं केली आहे, हें मार्मिक वाचकांच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं. ६. धैर्यानें, उत्साहानें. ७. शंकरातें. ८. शुद्ध तपश्चरणानें. ९. भरवसा. १०. जगाला. ११. जप करीत बसलों. १२. शरद्=वर्ष. पूर्वी शरदृतूपासून वर्षारंभ असे, त्यामुळें 'शरद्' म्हणजे 'वर्ष' असा अर्थ झाला असावा असा विद्वानांचा तर्क आहे. हल्लीं मराठी व्यापारीवर्ष आश्विनाच्या अखेरीपासून म्हणजे शरदृतूच्या अखेरीअखेरीला सुरू होतें. १३. तपश्चरण केलें. १४. बहुमान देता झाला. १५. दयेनें पान्हावून, कळवळून. १६. ह्या उत्तरार्धांतील उपमेस 'दरिद्र' शब्दानें बहारी आली आहे. हिंवाळ्यांत रात्रीं पांघरूण नसल्यामुळें थंडीनें काकडलेल्या दरिद्री मनुष्याला सकाळचें ऊन्ह किती गोड लागेल, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

[1]शंभु म्हणे 'न तव तपीं पाहें मी [1]वामदेव [2]विवरातें; ।
मत्प्रेमा मजकरवीं, पुरवाया काम, देववि वरातें. ॥ ४७
चित्तीं असेल, तें तूं माग सकळ [3]शुद्धभक्तवशगा [4]यां.' ।
वदला असें, [5]दयामृतनद [6]लावाया [6]कवींस [6]यश [6]गाया. ॥ ४८
नमुनि शिरें पद, वदलों, '[7]त्वच्चरणप्रियनिवासदारा हो ।
मद्भक्ति, तुझ्याठायीं श्रीमदुमासी शिवा! सदा राहो.' ॥ ४९
देव म्हणे 'दिधलें हें मद्ध्यान समुद्र होउं, मासा हो, ।
[9]मन्मूर्तिसीं जडो बहु दयिता तव भक्ति हो, उमा साहो.' ॥ ५०
तों [10]जैगीषव्य म्हणे, सुलभ प्रभु, [11]काय [11]कष्ट [11]गुण [11]गाया? ।
कथितों स्वानुभव, दिलें '[12]अणिमाद्यैश्वर्य [12]अष्टगुण गा! या.' । ५१
ध्याया [13]अजातरिपुला विपुलानंद स्वयें म्हणे [14]गर्ग, ।
'देता झाला अद्भुत सकळकळाज्ञान कीं मला [15]भर्ग. ॥ ५२
तैसेंचि [16]सविनयांचें, [17]धर्मज्ञसभाप्रपादितनयांचें, ।

---

१. शंकर. ह्या विशेषणांतील श्लेष फार मौजेचा आहे. मी वामदेव (=वक्रदेव, वांकडा देव) असतांही, मला तुझ्या तपश्चर्येंत कोठेंही उणेपणा दिसत नाहीं. 'वाम' शब्दाचे दोन अर्थ आहेत, (१) वांकडा, विरुद्ध, शत्रुत्व करणारा; (२) सुंदर. २. विवर=छिद्र, न्यून, कमीपणा, उणेपणा. ३. पवित्र भक्ताला वश असणाऱ्याला हें 'या' ह्याचें विशेषण. ४. या मला, महादेवाला. ५. करुणारूप पाण्याचा नद. नद व नदी ह्यांमध्यें श्रीसूरीमल्लिनाथ ह्यांनीं असा फरक दिला आहे कीं, 'नर्मदेवांचून इतर ओघ उगमाजवळ नद्या होत व मुखाजवळ नद होत.' ह्यावरून 'नद' शब्दांत विशालत्वाची कल्पना आहे, हें उघड आहे. हें पद 'वदला' ह्याचा कर्ता. ६. सूज्ञांनीं [परमेश्वराचे] धन्यवाद गावेत म्हणून. ७. सार्थान्वयः—[हे] शिवा! (शंकरा) मद्भक्ति त्वच्चरणप्रियनिवासदारा (त्वत्+चरण+प्रिय+निवास+दारा=तुझे चरण आवडतें वसतिस्थान जिचें अशी भार्या) हो (होवो) [व] श्रीमदुमासी (श्रीउमेप्रमाणें) तुझ्या ठायीं सदा राहो (नांदो). ८. होवो. ९. सार्थान्वयः—तव भक्ति मन्मूर्तिसीं जडो [व] बहु दयिता (आवडती भार्या) हो (होवो), [व हें] उमा (पार्वती) साहो (सहन करो). स्त्रियांस लोण्याचीसुद्धां सवत खपत नाहीं, या संसारांतील अनुभवावर येथें रोंख आहे. १०. जैमिनि. ११. मग त्याचे धन्यवाद गाण्यास श्रम कसले? अर्थात् नाहीं. श्रमाचें फल प्राप्त झालें, म्हणजे श्रम करण्यास उत्साह येतो. दगदग वाटत नाहीं. पहा 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते' कुमारसंभव सर्ग ५. १२. आठ गुण ज्यांत आहेत, असें अणिमादि सिद्धीचें ऐश्वर्य. अणिमा=अतिसूक्ष्मरूप धारण करण्याचें जें सामर्थ्य असतें तें. अष्टसिद्धिः—अणिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशत्व आणि वशित्व. १३. उत्पन्न झाला नाहीं शत्रु ज्याला त्याला; धर्मराजाला. १४. यदुकुलाचा उपाध्याय. १५. महादेव. १६. विनयसंपन्नांचें. १७. धर्मज्ञ+सभा+प्रपादित+नयांचें=धर्म जाणणाऱ्या विद्वान मंडळास संमत आहे आचरण ज्यांचें अशांचें. मागील व हें हीं दोन्हीं उत्तरार्धांतील 'तनयांचें' ह्या नामाचीं विशेषणें होत.

एक सहस्र दिलें मज बा! धर्मा! ब्रह्मवादितनयांचें[1]. ॥ ५३
वर्षशतायुत[2] दिधलें ससुतास मला युधिष्ठिरा! आयू, ।
बा[3]! युद्धीं, वरदानीं अतुलचि हा योगवन्हिचा वायू. ॥ ५४
त्यावरि पराशर म्हणे, 'मद्वचनातेंहि पैरिस[4] अनराते[5], ।
शिवचरण सुरां, असुरां, बहुवरद[6] नरां, तसेच अनरां[7] ते. ॥ ५५
पाहे[8] हाही, पसरुनि प्रभुसि तपःपदर, विप्र भव्यास; ।
झाला सुत सुज्ञ, अजर, अमर, तपःपद[9], रविप्रभ[10], व्यास. ॥ ५६
'कौंतेया[11]! या लोकीं सत्यवती होय अदिति, हा साचा ।
विष्णु स्वयें प्रकटला, कर्ता जगदिष्टसदितिहासाचा.' ॥ ५७
मांडव्य[12] म्हणे, "धर्मा! मी नृपदूतासि भासलों चोर, ।
केलों शूलप्रोत[13], व्यसन[14] असें प्राप्त जाहलें घोर[15]. ॥ ५८
व्यसनीं वदलों, 'शंभो! अंत पहातोसि काय? बा! धावें, ।
दीनासि[16] दीनबंधो! दुःख, स्मरतां न पाय, बाधावें.' ॥ ५९
प्रभु दे अभयवर जसा बुडतां अवलंब[17] बाप दे हातें, ।
कळवळुनि म्हणे, 'वत्सा! बाधो तुझिया न ताप देहातें. ॥ ६०

---

१. ब्रह्मविद्येचा खल करणाऱ्या मुलांचें. २. दहा लक्ष वर्षांचें. ३. अन्वयार्थः—बा! युद्धीं [तसाच] वरदानीं (=वर देण्याच्या कामीं) हा योगवन्हिचा वायू (=योगरूपी वन्हीला पूर्ण दशेस नेणारा वायू, महायोगी शंकर) अतुलचि (=अनुपमेय, ज्याच्या तुलेस, पासंगास, कोणीही पुरणार नाहीं असा.) वायू हा अग्नीचा साहाय्यकर्ता होय. ४. श्रवण कर. ५. अजातशत्रो धर्मराजा. ६. पुष्कळ वर देणारे. ७. मानवेतरांस, पशुपक्ष्यांस. ८. सार्थान्वयः—हाही विप्र (मी पराशर ब्राह्मण) प्रभुसि (शंकरास) तपःपदर पसरुनि भव्यास (कल्याणाला) पाहे. ९. तपश्चर्येचें स्थान, तपाचें माहेर. १०. सूर्यासारखा तेजस्वी. ११. सार्थान्वयः—कौंतेया (कुंतिपुत्रा धर्मराजा) या लोकीं (मृत्युलोकीं) सत्यवती (व्यासमाता) अदिति (देवमाता) होय; [आणि] हा (व्यास) जगदिष्टसदितिहासाचा (जगत्+इष्ट+सत्+इतिहासाचा=जगाचें कल्याण करणाऱ्या, अशा उत्कृष्ट इतिहासाचा) कर्ता साचा (खरोखर) स्वयें (स्वतः, प्रत्यक्ष) विष्णु प्रगटला (अवतरला). अर्थात् श्रीमद्व्यास म्हणजे विष्णूचा अवतार होय असा भाव. पहा, 'व्यासो नारायणः साक्षात्.' व्यासांनींच अठरा पुराणें व भारत हीं रचिलीं. १२. एक ब्रह्मर्षि. हा महातपस्वी होता. चोर म्हणून ह्यास सुळावर चढविलें होतें; पण खरा चोर सांपडून हा निरपराधी ठरला. १३. शूल+प्रोत=सुळावर चढविलेला. १४. संकट. १५. भयंकर. १६. सार्थान्वयः—[हे]दीनबंधो (गरीबांच्या कैवाऱ्या, गरीबांच्या वाली), पाय न स्मरतां (तुझा धांवा केला नसेल तर) दीनासि दुःख बाधावें. [परंतु धांवा केला असतांही माझें दुःख दूर न व्हावें, हें दीनबंधुत्वास कमीपणा आणणारें आहे.] १७. आधार, टेंका, धर.

सत्वर शूळापासुनि होइल माझ्या वरें तुझी सुटका, ।
तुज कर्म[1]विपाकाचा, मज यां[2]या शरण, दाविला चुटका[3]. ॥ ६१
आधिव्याधि न शिवतिल तुज, बहु[4]तीर्थाभिषेक घडतील; ।
स्वर्ग दिल्हा अक्षय; तव तेजें[5] भंगोनि षडरि[6] रडतील. ॥ ६२
अर्बुद[7] वर्षें वत्सा ! मत्पद[8]सेवापरा ! सुखें वांचें, ।
घे सुख, जें अमृताच्या वरि भूदेवा ! परासु खेंवांचें[9]. ॥ ६३
शूळ[10]प्रोतीं, दर्शन देवुनि, करुणा असी करी राया ! ।
पीडा, व्रीडा[11] पावुनि, गेलिच सोडूनियां शरीरा या." । ६४
भगवत्प्रसादकथनें सर्वांहुनि अधिक तोष गालव[12] दे[13]; ।
स्वानु[14]भवातें; अमितें हर्षें उत्फुल्ल करुनि गाल, वदे. ॥ ६५
"धर्मा ! परिस प्रभुची कथितो तुज शक्ति[15], चाल[15] गालव हा; ।
कोणां[16]सहि न म्हणों दे ज्याच्या पदभक्तिचा लगा लव 'हा.' ॥ ६६
श्रीगाधिजमुनिजवळी श्रुतिशास्त्रें[17] सांग[18] सर्वही पढलों; ।
श्रीगुरुपदप्रसादें पदवीस[19] प्राज्ञमंडळीं चढलों[19]. ॥ ६७
गेलों गृहासि, माता धाउनियां माझिया गळां पडली, ।
'असता[20] तव तात, सुखी होता;' ऐसें म्हणोनियां रडली. ॥ ६८

---

१. दैवदुर्विलसिताचा, दैवाच्या तडाख्याचा. २. यावेंस म्हणून. ३. चुणूक, मासला. ४. पुष्कळ तीर्थांचीं स्नानें. ५. प्रतापानें, सामर्थ्यानें. ६. सहा शत्रु; काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर. भंगोनि=पराभव पावून, हताश होऊन. ७. दाहा कोटी. ८. माझ्या चरणाच्या सेवेंत गढलेल्या. ९. सार्थान्वयः [हे] भूदेवा! (ब्राह्मणा ! मांडव्या!) परासु (=पर+असु=गतप्राण, मृत) अमृताच्या खेंवांचें (आलिंगनाचें, वर्षावाचें) जें सुख वरि (घेतो, मिळवितो), [तें तूं] घे(उपभोग). १०. सुळावर चढविलेल्या मनुष्यावर. ११. लज्जा. १२. विश्वामित्र ऋषीचा शिष्य. १३. देताझाला. १४. सार्थान्वयः—अमितें (पुष्कळ) हर्षें (आनंदानें) गाल उत्फुल्ल करूनि (गाल फुगवून) स्वानुभवातें वदे (आपणास आलेला प्रत्यय सांगता झाला.) टीपः—गाल फुगविणें ही गोष्ट आनंदाची तशी रागाचीही द्योतक आहे. पहा महाभारत स्त्रीपर्व. अ० ४. गीति २० व नामरसायन गीति १०९. १५. सामर्थ्य व वर्तनक्रम. १६. सार्थान्वयः—ज्याच्या (ज्या प्रभूच्या) पदभक्तिचा (चरणसेवेचा) लगा (आश्रय) कोणास लवही (यत्किंचित्सुद्धां) 'हा' (हाय हाय) म्हणों न दे (म्हणूं देत नाहीं). १७. वेद व शास्त्रें. १८. शाखा, उपशाखांसुद्धां; समग्र. १९. मान्यतेस पावलों. २०. तुझा बाप जिवंत असता, तर सुखी झाला असता. पुत्र शहाणा झालेला पाहून मातापितरांस आनंद होणें साहजिक आहे.

स्वाधिकसाक्षरपुत्रप्रेक्षणजन्यें[1] महासुखें [2]धाता, ।
[3]म्हणता, 'यश वदतों, मज देता जरि काय बहु मुखें धाता.' ॥ ६९
[4]धैर्यातें अश्रुसहचि ती, करुनि विलाप चिर विविध, वेची; ।
[5]अर्चि घृतासि, तसि दशा माझ्या हृदयासि विरवि विधवेची. ॥ ७०
गेलों शरण शिवाला, भजलों मी सर्व ताप साहून, ।
बहु मानिलें प्रभुवरें मज त्या त्या सर्व [6]तापसांहून. ॥ ७१
म्हणतां 'माग,' म्हणें मी, 'द्यावें [7]मज्जनकदान; होतां तें, ।
सर्वहि असो; मज मृतें शोकीं मज्जन कदा न हो तातें.' ॥ ७२
'जा भेटेल पिता तुज [8]गुरुभक्तिपरा सुता, [9]तदा नातें ।
निर्वेविल बहु' वदुनि असें, दे देव [10]परासुतातदानातें. ॥ ७३
आज्ञा होतां, प्रभुतें वंदुनि, आलों गृहासि [11]लवलाहें, ।
[12]लवलाहे हर्षभरें, [13]कीं [14]श्रीपदपद्मधूळिलव [15]लाहे. ॥ ७४
गेलों गृहासि मी जों स्मरत [16]स्मरतमइना [17]शरण्यातें, ।

---

१. स्वाधिक+साक्षर+पुत्र+प्रेक्षण+जन्यें=आपल्यापेक्षां अधिक विद्वान् अशा पुत्रास पाहून उत्पन्न होणाऱ्या. हें 'महासुखें' ह्याचें विशेषण. २. संतोष पावला असता. ३. सार्थान्वयः–[व] म्हणता (म्हणाला असता) [कीं] 'जरि काय (=जर का) धाता (=ब्रह्मदेव) मज बहु मुखें देता (=ब्रह्मदेवानें जर मला पुष्कळ तोंडें दिलीं असतीं तर) [तुझें] यश वदतों (कीर्ति गाइली असती). आपल्या पुत्राची आपल्याहून अधिक विद्वत्ता पाहून बापाला नुसता संतोषच होऊन राहता न,तर त्या आपल्या पुत्राच्या विद्वत्तेची महती वर्णन करण्यास जर अधिक मुखें मजला ब्रह्मदेवानें दिलीं असतीं तर बरें झालें असतें, असें त्यास वाटलें असतें. 'जरि काय' या शब्दसमूहांत 'काय' हें संभावनार्थी आहे. ४. सार्थान्वयः–अश्रुसहचि (डोळयांतील पाण्यासह) धैर्यातें वेची (नाहींसें करी). अर्थात् सर्व धीर सुटला व रडून रडून डोळ्यांचें पाणीही आटलें, असा भाव. ५. विधवेची दशा माझ्या हृदयासि तसि विरवि (=वितुळवी) [जशि] अर्चि (अग्निज्वाला) घृतासि (तुपातें) [विरवि] (=वितुळविते). माझ्या आईची स्थिति पाहून माझ्या काळजाचें पाणी झालें, हा भाव. ६. सर्व सुप्रसिद्ध ऋषिवर्यांपेक्षां. ७. मत्+जनक+दान=माझा पिता हेंच दान. अन्वयार्थः–[प्रभूनें]'माग' म्हणतां, मी म्हणें [कीं], मज्जनकदान द्यावें; तें (=जनकदान) होतां (=लाभलें असतां) [इत्तर] सर्वहि असो (=बाजूस राहो). मृतें तातें (=बापाच्या मरणानें) मज कदा[ही] शोकीं मज्जन न हो (=होवो). ८. पितृसेवेस वाहिलेल्यास. ९. भेट झाली म्हणजे पितापुत्रसंबंध तुम्हांला फार संतोष व सुख देईल. १०. मृत पित्याचे दानाला. ११. झटकर, सत्वर. १२. [हा] लवला आहे, [मी] नम्र झालों आहें, ओथंबलों आहें. १३. कारण. १४. श्री+पदपद्म+धूलि+लव=[देवाच्या] मंगल चरणकमलाच्या रजःकण. १५. लाभे. १६. कामरूप अंधःकाराच्या (म्हणजे त्यास नाहींसें करणाऱ्या) इना (=सूर्याला). १७. आश्रयदात्या शंकरास.

तों आला तात, जसा पूर्वीं जावूनि ये अरण्यातें. ॥ ७५
[1]इष्टि करूनि, वनातें जावुनि, घेउनि फळादि [2]वन्यातें, ।
आला, बा! अत्यद्भुत, कथितां न गमेल सत्य अन्यातें. ॥ ७६
जितुकें वय, जो वर्ण, ज्ञान जसें, जेंविं [3]काय होता, तें ।
सर्व [4]यथास्थित; [5]वाटे, ठकलों कुतुकार्थ काय हो तातें. ॥ ७७
द्रवला प्रेमें बहुतचि तात मज [6]चिरागतास पाहून, ।
वदला, 'नसेल कोठें तप पूजित माझिया तपाहून.' ॥ ७८
'ये वत्सा! ये वत्सा!' ऐसें मज गहिंवरूनि [7]बाहूनी, ।
[8]नमितां, माथा हुंगुनि, आलिंगी कडकडोनि [9]बाहूंनीं. ॥ ७९
ऐसें हें [10]अत्यद्भुत **धर्मा**! **प्र**भुचें [11]वदान्यपण [12]साचें, ।
शं[13]भुयशें रोमांचित होउनि, वपु होय मित्र पणसाचें. ॥ ८०
[14]बहु शोक ताप तैसे सोडुनियां काय **गा**लवा जावे ? ।
स्तव जप न कळो, केवळ '**ह**र! **ह**र! **ह**र!' म्हणत गाल वाजावे." ८१
श्रीकृष्ण म्हणे, "**धर्मा**! वदला **उ**पमन्यु मुनि असें तो कीं, ।
'**प**रमेश्वरपदभजनें सकळहि [15]पुरुषार्थ [16]सुलभ या लोकीं. ॥ ८२
शरण **शि**वासि न जाती, जे [17]तामस पापमलिन, [18]राजस जे;
जो शुद्ध चरित सात्विक **भ**वभजना तोचि [19]साधुराज सजे. ॥ ८३
[20]शक्रत्व, **ब्र**ह्मत्वहि, **वि**ष्णुत्वहि, [21]भक्तितुष्ट [22]**भ**व देतो; ।

---

१. होम. २. फळादिक रानांतील पदार्थ. ३. शरीर. ४. जसेच्या तसेंच. ५.अन्वयः—कुतुकार्थ (=विनोदास्तव) तातें (पित्यानें) ठकलों काय हो? [असें] वाटे. पित्यानें जीवंत असून आम्हास मौजेनें फसविलें कीं काय असें वाटलें. ६. फार दिवसांनीं आलेल्यास. ७. हांक मारून. ८. मीं नमस्कार केला असतां. ९. भुजांनीं. १०. अलौकिक. ११. औदार्य. १२. खरें खरें, कळकळीचें. १३. सार्थान्वयः—शंभुयशें वपु (शरीर) रोमांचित होउनि, पणसाचें मित्र होय. फणसावर कांटे असतात त्याचप्रमाणें माझ्याही अंगावर हर्षानें कांटा आला, त्यामुळें माझें शरीर व फणस ह्यामध्यें मित्रत्व (=साम्य) उत्पन्न झालें. ही कल्पना पंतांनीं आपल्या काव्यांत वारंवार योजिली आहे:—स्त्रीपर्व, अ० ५, गीति २, पहा. १४. सार्थान्वयः—बहु शोक [व बहु] ताप गालवा सोडुनियां तैसे जावे काय? (गालवऋषींचा शोकातिशय व मनःक्षोभ जसा आतां नाहींसा झाला तसा नाहींसा होण्यासारखी वस्तुस्थिति होती का? नाहीं. पण केवळ शंकराचें आराधन करून त्यास प्रसन्न करून घेतल्याचें हें फळ होय). १५. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ही पुरुषार्थांची (=जीवितकर्तव्यांची) चौकडी. १६. साध्य. १७. तमोगुणी, अज्ञान. १८. ऐहिक सुखाची इच्छा करणारे. १९.सज्जनश्रेष्ठ; उत्तम, सत्पुरुष. २०. इंद्रपद. २१. भक्तीनें प्रसन्न झालेला. २२. शंकर.

वरदवर[1] दयासागर 'नाहीं' ऐसें कदापि न वदे तो. ॥ ८४
इतरें[2] असो कसातरि आचरणें, सर्वथा भवीं तरतो, ।
जो परमेश्वरभक्त, व्यक्त महामुनिसमान बा! नर तो. ॥ ८५
प्रभुसि मनेंचि शरण जे गेले, ते[3] सर्व अमलनय[4] नाकीं ।
सेविति[3] सुरस महित सुरसम हित होवूनि कमलनयना! कीं. ॥ ८६
मारिल[5] तृषिता, न मिळों देउनि, फोडुनि तडाग, तोय, जना, ।
पापें लिप्त नव्हे, बा! प्रभुच्या जरि काय करिल तो यजना. ॥ ८७
पीडूं[6] जना, कळि जसा लाउनि दावा नला, समग्रा, मी ।
जाणें त्या शिवयजनें शुचि, जो दावानलासम ग्रामीं. ॥ ८८
न[7] म्हणे शिव प्रपन्नां माजी संसारचक्रवशग मती; ।
कीं स्मरहरचरण हरि, ब्रह्मवधाद्यखिल दोष शश, गमती.' ॥ ८९
यदुनाथ म्हणे, 'धर्मा[8]! श्रीशिवपदभजन विश्वपावन गा, ।
सोडुनि यासि, सुरांच्या कोण सुधी जन म्हणेल 'पाव' नगा. ॥ ९०

---

१. वर देणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ. २. सार्थान्वयः—इतरें आचरणें [मनुष्य] कसातरि (=कोणत्याही प्रकारचा) असो, परि बा! जो परमेश्वरभक्त, तो नर व्यक्त (=स्पष्ट) महामुनिसमान सर्वथा भवीं (=संसारांत) तरतो. पाठभेदः—इतर असो कैसातरि आचरणें सर्वथा भवा तरतो. । ३. सार्थान्वयः—ते सर्व अमलनय नाकीं सुरसम (देवांप्रमाणें) महित (संमानित) होवूनि [हे] कमलनयना! हित (हितावह) सुरस (अमृत) सेविति कीं. ४. शुद्ध नीतिमान्. ५. सार्थान्वयः—[जरि] तडाग (तळें) फोडुनि, तोय (पाणी) न मिळों देउनि, तृषिता जना मारिल, बा! [तरि] तो [मनुष्य] पापें लिप्त नव्हे (=होणार नाहीं) जरि काय (=जर का) तो प्रभुच्या (शंकराच्या) यजना (भक्तीतें) करील. सर्वसंग्रहपाठः—मारिल तृषिता न मिळोंदे उनि फोडुनि तडागतोय जना । पापें लिप्त नव्हे बा प्रभुच्या जरि काय तो करी यजना. ॥ शंकरभक्तीचें सामर्थ्य असें आहे कीं, त्या योगें सर्व पापें भस्म होतात, असा सिद्धान्त या व पुढील दोन गीतींत प्रतिपादिला आहे. ६. सार्थान्वयः—जसा दावा लावुनि नला कळि, [तसा]ग्रामीं (=गांवांत) दावानलासम (=वणव्यासारखा) [एकादा मनुष्य] समग्रा जना पीडूं, मी त्या (=त्याला) शिवयजनें शुचि (=पवित्र) जाणें. ७. सार्थान्वयः—'माजी (=माझी) मती (=बुद्धी) संसारचक्रवशग (=संसार+चक्र+वश+ग=संसाराच्या फेऱ्यांत सांपडलेली, ऐहिक व्यवहारांच्या आधीन झालेली) [आहे] [असें] शिव प्रपन्नां (=आसऱ्यासाठीं आलेल्या दुःखी प्राण्यांना) न म्हणे (=म्हणत नसतो), कीं (कारण) स्मरहरचरण (=शिवपद) हरि (=सिंह), [व] ब्रह्मवधाद्यखिलदोष (=ब्रह्महत्येसारखीं सर्व पापें) शश (=ससे) गमती (=दिसतात, भासतात). सिंहापुढें सशाचें कांहीं चालत नाहीं त्याप्रमाणें शंकरचरणापुढें अवघ्या पापांचें भस्म होतें, त्यांचा कांहीं एक परिणाम घडत नाहीं. ८. अन्वयः—धर्मा! विश्वपावन (=जगास पवित्र करणारें) श्रीशिवपदभजन (=शंकरचरणाची स्तुति) गा. यासि (शिवपदभजनास) सोडुनि सुरांच्या नगा (देवांच्या वृक्षाला, अर्थात्

शिव चंद्र, चकोरचि, कीं शिव मुदिर, मयूर साधु चातक वा; ।
शिव जीवन, यावांचुनि लवहि न देहांत साधुच्या तकवा. ॥ ९१
आम्हां तुम्हां समस्तां भक्तां द्यावीं अभीष्ट वरदानें, ।
हेंचि वैर व्रैत वेउँनि, उद्धरिले नैत अनंत वरदानें.' ॥ ९२
ऐसें अद्भुत केलें श्रीकृष्णें प्रकट सद्यश तपानें, ।
जेणें शुद्ध करावें, घडलीं असतांहि मद्यशतपानें. ॥ ९३
वैदले साधु मयूरा, 'शुकसम गमसी बरा शिशो! भावें;' ।
हरिहरपदार्पित दळहि होउनि जितरत्नराशि शोभावें. ॥ ९४

अध्याय सातवा.

ज्यांतिल कथांहुनि सुधावृष्टि गमे हर्षदा न धर्मातें, ।
हें [10]पर्व, यांत सेविति बुध पावुनि हर्ष दानधर्मातें. ॥ १
[11]अन्नोदकभूवस्त्रच्छत्रोपानत्सुवर्णगोदात्या ।
जें पुण्य, म्हणे [12]स्वाधिक गंगा, यमुना, शतद्रु, गोदा, त्या. ॥ २

कल्पवृक्षाला) कोण सुधी (=शाहणा) जन 'पाव' (प्रसन्न हो) म्हणेल? [कोणीही म्हणणार नाहीं. शिवपदापुढें कल्पवृक्षही तुच्छ होय, असा भाव.]

१. सार्थान्वयः—शिव चंद्र, साधु चकोरचि; कीं (किंवा) शिव मुदिर (मेघ), [साधु] मयूर वा (किंवा) चातक, शिव जीवन (=प्राणचेतनशक्ति), यावांचुनि (ह्याशिवाय) साधुच्या देहांत लवहि (रतिमात्र) तकवा (सामर्थ्य) न. २. ह्या गीतींत, श्रीकृष्णांनीं इतर शिवभक्तांतच आपली गणना केली आहे, त्यावरून श्रीशिवाची थोरवी व कृष्णाची नम्रता चांगली व्यक्त होते. ३. उत्तम. ४. बाणा अंगीकारून. ५. शरण आलेले. ६. अगणित. ७. वर देणाऱ्या शिवानें. ८. सार्थान्वयः—जेणें (ज्या यशानें) [मनुष्याला] मद्यशतपानें घडलीं असतांही (मद्यपान शतवेळां झालें असतांही) शुद्ध करावें. ९. सार्थान्वयः—'शिशो! (बाळा) भावें (भक्तीनें) शुकसम बरा गमसी (दिसतोस), [ऐसें] साधु (सत्पुरुष) मयूरा (मोरोपंतास) वदले. हरिहरपदार्पित दळहि (विष्णु व शिव ह्यांच्या पायांवर वाहिलेलें तुळशीचें व बेलाचें पानसुद्धां) जितरत्नराशि (मागें सारला आहे रत्नांचा समुदाय ज्यानें असें) होउनि शोभावें. १०. 'पर्व' शब्द याठिकाणीं श्लिष्ट आहे; पर्व=(१) अनुशासन पर्व; यांत दानधर्माचें विवेचन आहे. (२) संक्रांत्यादिक पर्वकाळ; अशा पर्वणींत दानधर्मादि पुण्यकर्में करावींत अशी शास्त्राज्ञा आहे. ११. अन्न+उदक+भू+वस्त्र+छत्र+उपानत्+सुवर्ण+गो+दात्या=अन्न, पाणी, जमीन, प्रावरण, छत्री, जोडा, सोनें व गाई ह्यांचें दान करणाऱ्यास. १२. अन्वयार्थः—त्या (त्या पुण्यास) गंगा, यमुना, शतद्रु (=सरयू) [व] गोदावरी स्वाधिक (आपल्याहून अधिक) म्हणे.

ब्राह्मणमाहात्म्य बहु श्रीमद्गंगातनूज[1] वदला, हो! ।
कीं[2] जन याच्या श्रवणें जोडुनि शुचि सुकृत, उच्च पद लाहो. ॥ ३
"अयश[3] न आलें, न स्त्री लक्षिलि, रक्षिलि यथोक्त महि म्यां, तें ।
द्विजभजनबळ; नृपा! किति वर्णूं मी भूमिदेवमहिम्यातें? ॥ ४
श्रीकृष्ण ब्रह्मण्य[4] ब्राह्मणमाहात्म्य जाणतो; या[5] तें ।
पूसें, म्हणे जेविं तृषित चातक जलदासि, 'आण तोयातें.'" ॥ ५
धर्म म्हणे, 'श्रीकृष्णा! कथितो तुज शांतनव पुसायास, ।
वदतां[6] व्हावें याचें बहु मानस शांत, न वपु सायास.' ॥ ६
कृष्ण म्हणे, "म्हणतो जो 'गर्व मजपुढें करूं नको' पविला,[7] ।
प्रद्युम्न भूसुरांहीं[8] कांहीं विप्रियें[9] करून कोपविला. ॥ ७
तो प्रद्युम्न मज म्हणे, 'आहे गुण कोण विप्रभजनांत? ।
'जी! जी!'[10] म्हणुनि मुनिस, कां व्हावें दोंटूनि[11] विप्रभ[12] जनांत? ॥ ८

---

१. श्रीमद्गंगेचा पुत्र (भीष्म). २. सार्थान्वयः--कीं (कारण) याच्या (ब्राह्मणमाहात्म्याच्या) श्रवणें जन शुचि (पवित्र) सुकृत (पुण्य) जोडुनि (संपादन करून) उच्चपद (श्रेष्ठस्थान) लाहो (पावो). ३. सार्थान्वयः--[मला] अयश (अपकीर्ति) न आलें, म्यां स्त्री न लक्षिली (स्त्री कामेच्छेनें पाहिली नाहीं), [व म्यां] महि रक्षिली (पृथ्वीचें पालन केलें), तें [सर्व] द्विजभजनबल (ब्राह्मणभक्तीचें सामर्थ्य); नृपा! भूमिदेवमहिम्यातें (ब्राह्मणमाहात्म्यातें) मी (भीष्म) किती वर्णूं! ब्राह्मणमहिम्याचें वर्णन करावें तितकें थोडेंच, असा भाव. ४. ब्राह्मणाविषयीं आदरबुद्धि बाळगणारा. ५. सार्थान्वय--जेविं तृषित (तान्हेलेला) चातक जलदासि (मेघासि), 'तोयातें (जलातें) आण,' म्हणे, [तेविं] या (श्रीकृष्णातें) [तूं] तें (ब्राह्मणमाहात्म्य) पूस (विचार). ६. सार्थान्वयः--[अशाकरितां कीं, तूं] वदतां (ब्राह्मणमाहात्म्य सांगत असतां) याचें (माझें, धर्माचें)मानस बहु शांत व्हावें, [व] वपु सायास (आयासयुक्त, सव्यथ, (कळावेदना लागलेलें) न [व्हावें]. माझी आधि व्याधि दूर व्हावी म्हणून भीष्म मला तुझ्या तोंडून ब्राह्मणमाहात्म्य श्रवण करण्यास सांगत आहेत; तरी तूं तें सांगावेंस, हा धर्माचा भाव. आमच्या जवळील दोन्ही हस्तलिखित प्रतींत या गीतीच्या उत्तरार्धांतील 'मानस' शब्द गाळलेला आहे, परंतु त्याच्या ऐवजीं दुसरा कोणताच शब्द घातलेला नाहीं, त्यामुळें चार मात्रा कमी येऊन छंदोभंग होतो. एका पोथींत मात्र 'वदतां' पूर्वीं 'कीं' शब्द घातला आहे; तरी पण तेथेंही अखेर दोन मात्रांची वाण पडतेच. ७. वज्राला. वज्र इंद्राचें आयुध असल्यामुळें, 'गर्व करूं नको असें पविला म्हणे' या वाक्यांतून प्रद्युम्न इंद्राहून बलिष्ठ होता असा ध्वनि निघतो. ८. ब्राह्मणांनीं. ९. न रुचणारें आचरण, अपराध. १०. हांजी हांजी करून, मनधरणी करून. ११. जाणूनबुजून, बुद्ध्या. १२. नष्टतेज, हीनदीन.

वदलों मी, 'प्रद्युम्ना! सुज्ञा! [1]बापा! असें कसें वदसी? ।
आम्हां मुख्य जयप्रद विप्राशीर्वाद, नच असा [2]सदसी. ॥ ९
[3]आधीं [4]पात्र ब्राह्मण सर्वांच्या वंदनास दैवत रे! ।
[5]संसारीं सुख भोगुनि, विप्रभजक, नंदना! सदैव तरे. ॥ १०
[6]कुळपूज्य तुझा आजा वसुदेवहि, देवकीहि आजी, जीं ।
विप्रांसि करिति, जैसे चातक मेघांसि, करुनि 'आ' 'जी! जी!' ॥ ११
सुख द्यावया समर्थ ब्राह्मण, अत्यंत दुःख अथवा; हे ।
सर्वांहीं पूजावे, [7]हा धडक अनादि राजपथ [8]वाहे. ॥ १२
पुत्रा! ब्राह्मणपूर्वक सर्वहि जे लोक आणि [9]लोकेश. ।
[10]सत्याज्यपात्रदूषक, जो विप्राभक्त, होय तो केश. ॥ १३
पहिली भस्म कराया, [11]क्षिप्रं रचायाहि नूतना सृष्टी, ।
जाण यथार्थ समर्था विप्राची [12]ईशशक्तिसी दृष्टी. ॥ १४
आयुष्य, कीर्ति, यश, बळ, फळ हें द्विजपूजनीं सुता! आहे; ।
[13]साहे न क्षिति यांच्या अहिता, जरि नगशता सदा वाहे. ॥ १५
प्रद्युम्ना! मी 'आपण ईश्वर.' ऐसें मनांत आणून, ।
कैसा आदर न करूं, विप्र तपोनिधि समर्थ जाणून? ॥ १६

---

१. 'बापा'! 'बाबा!' 'ताता!' हे शब्द प्रेमदर्शक आहेत व ते थोरांनीं लहानास लाविलेले आढळतात. बापा!=बाळा! २. सत्+असी=उत्तम तरवार. शस्त्रबलापेक्षां विप्राशीर्वादच जयाचें बीज होय. तेव्हां क्षत्रियांना ब्राह्मण पूज्य असले पाहिजेत, हा गीतीचा मतलब. ३. पहिल्या प्रथम. ४. योग्य. ५. सार्थान्वयः—नंदना! (बाळा प्रद्युम्ना!) विप्रभजक (ब्राह्मणभक्त) संसारीं (प्रपंचांत) सुख भोगून सदैव (सर्वदा) तरे (=जन्ममरणांतून सुखरूप पार पडतो). ६. सार्थान्वयः—तुझा आजा वसुदेवहि, आजी देवकीहि कुळपूज्य, जीं [वसुदेवदेवकी], जैसे मेघांसि चातक, [तैसीं] विप्रांसि 'आ' करुनि, 'जी! जी!' करिती. ७. हा फार दिवस चालत आलेला हमरस्ता लोकांच्या वहिवाटींत आहे; ह्याच मार्गानें लोक नेहमीं जातात, असा हा धोपटमार्ग आहे. ८. ब्राह्मण ज्यांच्या पूर्वीं असे, ब्राह्मण ज्यांचे मार्गदर्शक असे. 'ब्राह्मणपूजक' हा पाठ अधिक सरळ व सुबोध झाला असता. ९. इंद्रादि लोकपाल. १०. जो विप्राभक्त (विप्र+अभक्त=ब्राह्मणास न भजणारा) तो सत्याज्यपात्रदूषक (सत्य+आज्य+पात्र+दूषक=सत्यरूप तुपाचें भांडें दूषित करणारा) केश होय. गुंतवळ अन्नामध्यें अगर कोणत्याही खाण्याच्या पदार्थांत सांपडल्यास तो पदार्थ निषिद्ध म्हणून खाण्यास अयोग्य होतो असा समज आहे. (मागें अ० १ गी० ३० व शांतिपर्व अ० ४ गी० ६१ पहा.) ११. सत्वर. १२. परमेश्वराच्या सामर्थ्यासारखी. १३. सार्थान्वयः—क्षिति (पृथ्वी) जरी नगशता (शेकडों पर्वतांना) सदा वाहे (अंगावर सहन करिते), [तरी] यांच्या ब्राह्मणांच्या अहिता (विप्रियास) न साहे (तिला सहन करवत नाहीं).

म्हणतिल[1] हो! एखादा, पात्र करुनि रक्त नयन कोपा, 'हूं'! ।
विप्र महद्भूत, तया होउनि तूं त्यक्तनय नको पाहूं. ॥ १७
ज्या प्रेमें स्वापत्या, त्या प्रेमें ब्राह्मणासि पोसावें; ।
कल्याणार्थ[2], सुनेनें सासूचें जेविं, तेविं सोसावें. ॥ १८
शत पथ आहेत, परि क्षेमपथ[3] नसेचि या पथापरिस, ।
पुत्रा! स्वानुभवाची कथितों, ती आदरें कथा परिस. ॥ १९
हरिपिंगल[4], चीरवसन[5], कृश, दीर्घश्मश्रु[6],बिल्वदंडधर[7], ।
बहु उच्च जो प्रमाणें[8] जैसा **विंध्याभिध**[9] प्रचंड धर, ॥ २०
ऐसा एक ब्राह्मण हिंडे तो **द्वारकें**त येऊन; ।
तें[10] तेज तसें आलें, ग्रीष्मीं दुःसह जसेंचि ये ऊन. ॥ २१
हिंडे राजपथांत[11] प्रकट[12] सभाचत्वरांत[13] **यदु**नाथा! ।
प्रद्युम्ना! तो गाय[14] स्वाभिप्रायप्रकाशिका[15] गाथा[16]. ॥ २२
'सत्कारुनि[17], दुर्वासा[18] ब्राह्मण कोणी गृहांत वसवील, ।

---

१. सार्थान्वयः—रक्त नयन कोपा पात्र (=रागाचें स्थान, क्रोधाचा ठेवा) करुनि एखादा (कदाचित्) 'हूं' म्हणतील हो! [तेव्हां हे प्रद्युम्ना फार भिऊन रहा]. विप्र (ब्राह्मण) महद्भूत (वलिष्ठ प्राणी) [आहे], तया (त्याला) तूं त्यक्तनय होउनि (नीति सोडून, उद्धट होऊन) पाहूं नको (=सद्वर्तन सोडून त्यांशीं वागूं नको; त्यांचा आदर कर). २. हें गीत्यर्ध महाराष्ट्रीयांच्या नित्याच्या पाठांतील आहे, आपल्या समाजांत रूढ असलेली एक समजूत ह्यावरून स्पष्ट होते. कविकुलगुरु कालिदास ह्यांनीं आपल्या शाकुंतलनामक नाटकांत घातलेल्या उपदेशश्लोकाची (शुश्रूषस्व गुरून् इ०) आठवण मर्मज्ञ वाचकांस झाल्यावांचून राहणार नाहीं (शाकुंतल अं० ४). ३. कल्याणप्रद मार्ग. ४. रंगानें तांबूस व पिंवळसर. ५. वल्कलधर. ६. दाढी वाढलेला. ७. बेलाच्या झाडाची काठी हातांत घेतलेला. ८. उंचीच्या मापानें, उंचीनें. ९. विंध्य नांवाचा पर्वत. १०. अन्वयः—ग्रीष्मीं जसेंचि दुःसह ऊन ये, तसें तें (त्या ब्राह्मणाचें) तेज आलें. ११. हमरस्त्यांत. १२. 'राजरोस, उघडपणें;' हा अर्थ घेतल्यास हें क्रियाविशेषण 'हिंडे' ह्या क्रियापदाचें; व 'सार्वजनिक' असा अर्थ घेतल्यास तें, 'सभाचत्वरांत' ह्या पदापैकीं 'सभा ह्याचें विशेषण घेऊन 'प्रकटसभाचत्वरांत' असा एक सामासिक शब्द करावा. १३. चत्वर=चौक, चव्हाठा, चार रस्ते एकत्र मिळतात तें स्थान. याचा 'अंगण' असाही अर्थ होतो. १४. गाई, सुरावर म्हणे. १५. स्व+अभिप्राय+प्रकाशिका=आपला हेतु प्रदर्शित करणारी. १६. गीति, सवाल. १७. आदर करून. १८. संस्कृतांत 'दुर्वासस्' असा शब्द असून त्याचें प्रथमेचें एकवचनी रूप 'दुर्वासाः' असें होतें; त्यावरून 'दुर्वास' असा शब्द प्राकृतांत न घेतां 'दुर्वासा' असा घेऊन, त्याचें प्रथमेचें एकवचनी रूप 'दुर्वासा' असें येथें योजिलें आहे. 'दुर्वासा ब्राह्मण' हें 'वसवील' इत्यादि सर्व भविष्यकाळी क्रियापदांचें कर्म; व 'कोणी' (=कोणी एकादा मनुष्य) हें प्रश्नद्योतक सर्वनाम त्याच क्रियापदांचा कर्ता आहे.

वसवील दैवता[1]परि, सुखवील, न कोपवील, हंसवील?' ॥ २३
उच्च स्वरें[2]करुनियां गाथा सर्वत्र गाय हिंडत या; ।
ग्राहक[3] न मिळे, सुयशोवस्त्रांचें जें तदुक्त दिंड, तया. ॥ २४
स्वगृहांत वसविला म्यां[4], सफल[5] व्हाया स्वसंपदा, नमुनी; ।
स्वोग्रत्वें[6] देता[7] जो प्रथमचि सर्वांसि कंपदान मुनी. ॥ २५
वसला[8] माझ्या सदनीं तो दुर्वासा मुनींद्र सन्नमनें[9]. ।
तें तें सिद्ध असे, बा! जें त्याच्या वांछिजेल अन्न मनें. ॥ २६
नित्य उपासित होतों [10]अंगें त्या हव्यभुग्रविप्रखरा[11], ।
तरि तो न तुष्ट, रुष्टचि; उग्रांशप्रभव[12] उग्र विप्र खरा. ॥ २७
वत्सा! मत्सेवेला[13] जपली क्षणही तव प्रसू[14] नाहीं. ।
वर्णावी सुकुमारी[15] जी जातीच्या[16] नव[16] प्रसूनांहीं[16]. ॥ २८
निजले नाहींच[17] दिसा, घटिकाहि न [18]राति सूद[19] नांवांचे[20]; ।
अहि[21] ज्यांत,-त्या गृहीं वा! [22]धृति काय अरातिसूदना[23]! [24]वांचे; ॥ २९

---

१. देवाप्रमाणें. २. खड्या सुरानें. ३. सार्थान्वयः—जें तदुक्त (त्याचें बोलणें) सुयशोवस्त्रांचें (यशोरूप वस्त्रांचें) दिंड (गांठोडें) तया (त्याला) ग्राहक (गिऱ्हाईक) न मिळे. दुर्वास्याचें सादर अभिनंदन करणाऱ्याला यशोनिधान मिळणार; तेव्हां दुर्वासऋषीचें भाषण हेंच कोणी कीर्तिरूप वस्त्रांचें गांठोडेंच होय,परंतु तें विकत घेणारा कोणीही द्वारकेंत भेटला नाहीं. पाठीवर खण, लुगडीं इत्यादिक वस्त्रें घेऊन कापडाचे फिरस्ते व्यापारी रस्त्यानें हिंडतात व ग्राहकांचें लक्ष जावें म्हणून मोठ्यानें 'खण, लुगडीं! खण चोळ्यांचे!' असें ओरडतात, हें सर्वत्रांस माहीत आहेच. ४. मीं श्रीकृष्णानें. ५. आपल्या संपत्तीचें सार्थक व्हावें ह्या हेतूनें. ६. आपल्या उग्र मुद्रेनें, आपल्या चेहऱ्याच्या कठोरपणानें. ७. देणारा. जो प्रथमचि स्वोग्रत्वें सर्वांसि कंपदान देता=ज्याला पाहतांक्षणींच सर्वत्रांस त्याच्या रागीट मुद्रेनें कांपरें भरे, असा भाव. ८. राहिला. ९. वंदन करून केलेल्या माझ्या विनंतीवरून. १०. जातीनें, स्वतः. ११. हव्यभुक्+रवि+प्रखरा=अग्नि व सूर्य यांप्रमाणें कडक असा. १२. उग्र+अंश+प्रभव=रुद्राच्या अंशापासून उत्पन्न झालेला असा. दुर्वासा हा अत्रि व अनसूया यांचा मुलगा असून, शिवांशाचा अवतार होता. १३. आमच्याजवळील तीनही हस्तलिखित प्रतींत 'तत्सेवेला' असा पाठ आहे. १४. माता (रुक्मिणी). अन्वयः—वत्सा! तव प्रसू मत्सेवेला क्षणही जपली नाहीं. श्रीकृष्णाच्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं, दुर्वासऋषी घरीं राहूं लागल्यापासून मीच त्यांच्या सेवेंत तत्पर होतों असें नव्हे, तर रुक्मिणीसुद्धां माझी सेवा सोडून, त्यांच्याच तैनातींत गुंतली. पतिव्रतेला ब्राह्मणसेवेसाठीं पतिसेवासुद्धां बाजूस ठेवावी लागली; अर्थात् ही गोष्टही तिनें पतिसंमतीनेंच केली. १५. कोमल, नाजूक. १६. जाईच्या ताज्या फुलांनीं. १७. पाठभेदः—माझे न. १८. रात्रौ-झोंप घेण्याची वेळा जी रात्र,त्या वेळीं सुद्धां. १९. आचारी; स्वयंपाककर्ते. २०. नांवाजलेले. २१. सर्प. २२. धैर्य. २३. शत्रुनाशका! प्रद्युम्ना! २४. टिके.

अन्न [1]बहुसहस्रांचें एके समयीं पळांत जेवि, [2]खरी ।
प्रळयाग्निशक्ति दावी; ते काय कथूं, पदार्थ जे विखरी? ॥ ३०
'[3]नीज सुखें, करितों पदसंवाहन, जेव, मायबापा! न्हा;' ।
मुनिसि म्हणें, कोपे; परि थानीं प्रेमें न माय बा! पान्हा, ॥ ३१
[4]व्हावें गुप्त, अकस्मात् प्रकट, हसावें, उगेंच वरडावें, ।
नाचावें, धावावें, जाळुनि गृह, वस्त्रही नव, रडावें. ॥ ३२
भलते भलत्या समयीं युक्तायुक्तहि पदार्थ मागे जे,
ते तत्काळहि देतां, न स्वीकारी; उगाचि [5]रागेजे. ॥ ३३
त्यागुनि पलंग, मागे होउंनि [6]अतितप्तकाय [7]बाजाच, ।
[8]कंथाचि आणवी तो; सांगावा फार काय बा! [9]जाच. ॥ ३४
[10]सदनीं कन्या मृदुला शय्या धृतताप सासिता पाहे; ।
'जाय, पदार्थ,' म्हणे 'बहु होतिल मज तापसासि तापा हे.' ॥ ३५
ऐसा विलोकिला म्यां [11]प्रचुर चमत्कार नित्य नव [12]यांचा; ।
आढळला जन [13]तैसा तितुक्या कोणीच अन्य न वयाचा. ॥ ३६

---

१. हजारों माणसांस पुरणारें. २. खाई. ३. सार्थान्वयः—'सुखें नीज (=सुखानें झोंप घे) पदसंवाहन करितों (पाय चुरितों), मायबापा! जेव, न्हा (स्नान कर)' [असें मी] मुनिसि म्हणें; [तो] कोपे; परि (परंतु) बा (प्रद्युम्ना) थानीं प्रेमें पान्हा न माय (अंतर्यामीं दयेचा पाझर मावेना). येथें दुर्वास्यास 'आईची' उपमा दिली आहे तेव्हां त्यास साजेल अशीच शब्दयोजना उत्तरार्धांत केली आहे. मुलास पाहून आईस पान्हा फुटतो हें योग्यच आहे; त्याप्रमाणें श्रीकृष्णाची निष्ठा पाहून दुर्वास मुनीस पोटांत प्रेमाचें भरतें येत होतें, पण तो वरकांतिमात्र राग दाखवी; कारण श्रीकृष्णाचें सत्व खऱ्या कसोटीस लावण्याची त्याची इच्छा होती. ४. 'व्हावें' इत्यादि क्रियापदांचें कर्तृपद त्यानें' (=दुर्वास्यानें) हें अध्याहृत आहे. ५. रागावत असे. या गीतींतील 'मागे' इत्यादि क्रियापदांचा व पुढील दोन गीतींतील क्रियापदांचा कर्ता 'दुर्वासा' हा अध्याहृत आहे. ६. अंगाचा संताप करून. ७. खाटलीच, ८. गोधडी. ९. त्रास, टोंचणी. १०. सार्थान्वयः—तो धृतताप (=संतप्त झालेला) [ऋषी] सदनीं (घरांत) कन्या (दासी) [व] मृदुला (मऊ) शय्या (अंथरूण), [ह्या] सासिता, (=स+असिता=खड्गत्वयुक्त, तरवारीनें युक्त, घातक) पाहे; [व] म्हणे, [मी] जाय (=जातों), हे पदार्थ मज तापसासि (तपस्व्याला) बहु तापा होतील (=फार ताप देण्यासाठीं होतील, संतापप्रद होतील). ११. पुष्कळ. १२. दुर्वासऋषीचा. १३. तसे थेरथेर करणारा. अन्वयः—तितुक्या वयाचा (=तितका वृद्ध) अन्य कोणीच जन तैसा (=त्या प्रकारचा, तसा चमत्कारिक) आढळला न. पाठभेदः—आढळला जन न तसा, तितक्या कोणीहि अन्य न वयाचा.

जातां गेलाचि दिसे, करि रुसव्याच्या[1] उदंड[2] परि[3], पर[4] तो ।
सासूस जांवईसा वाटे गेला रुसोनि परि परतो. ॥ ३७
स्वरगकलहीं[5] न ज्याचा मागें, वाहूनि आण, पाय सरे; ।
प्रकटुनि सहसाचि म्हणे, 'उष्णचि वाहूनि[6] आण पायस[7] रे!' ॥ ३८
'ज्याचे[8] ज्ञानहि अर्पिति, केवळ दासासि न वसु, पाय सखा ।
न म्हणों देति सुरतरुसि, तो तूं हें उष्ण नव सुपायस खा.' ॥ ३९
ऐसें म्हणोनि कांचनपात्रीं म्यां वाढिलें सुपायस त्या, ।
जपलों मुनिस बहु[9], जशा जपति पतिस करुनियां उपाय सत्या[10]. ॥४०
प्रद्युम्ना! सूदजना[11] सोडूं[12] दे श्वास न मुनि पायसदा[13], ।
झाला तृप्त प्रभु[14] कीं जपलों[15] मी दास नमुनि पाय सदा. ॥ ४१
होउनि तृप्त मुनि म्हणे, 'कृष्णा! जें शेष राहिलें पात्रीं, ।
हें[16] पायस लावावें सर्वत्र क्षिप्रं[17] आपुल्या गात्रीं[18].' ॥ ४२
प्रभुसि 'अवश्य' म्हणुनि म्यां पायसशेषें स्वकाय सारविला. ।
नक्षत्रांसि[19] असो, परि विधुचा संकोच कायसा रविला? ॥ ४३

---

१. रुसण्या फुगण्याच्या. २. पुष्कळ. ३. प्रकार, तऱ्हा. ४. सार्थान्वयः—पर (=परंतु) तो सासूस जांवईसा (=जसा सासूला जांवई तसा) रुसोनि गेला, परि (परंतु) परतो (परत येवो) [असें] [आम्हांस] वाटे. सासऱ्यापेक्षां सासूचें प्रेम जांवयावर जास्त असतें, हें सर्वप्रसिद्धच आहे; तेव्हां सासूचें जें प्रेम जांवयावर असतें, तें प्रेम श्रीकृष्णांनीं ब्राह्मणावर ठेविलें होतें, असा भाव. उपमा फार ठसकेदार आहे. ५. स्वर्+अग+कलहीं=स्वर्ग+तरु+कलहीं=कल्पवृक्षाबरोबरील भांडणांत. सार्थान्वयः—[औदार्यासंबंधें] स्वरगकलहीं (कल्पवृक्षाशीं स्पर्धा करण्यांत) ज्याचा (ज्या दुर्वास्याचा) पाय आण वाहूनि (=शपथ वाहून, पुन्हां अशा खटपटींत पडणार नाहीं अशी आण घेऊन) मागें न सरे, [तो] सहसाचि प्रकटुनि इ०. 'जो औदार्यासंबंधें कल्पवृक्षाशीं टेंक देणारा होता' हा पूर्वार्धाचा भाव. पाठभेदः—स्वरकलहीं न जयाची. ६. पाठभेदः—पाहूनि. ७. दूध किंवा खीर. ८. सार्थान्वयः—ज्याचे पाय दासासि (भक्तासि) केवळ वसु (धन) न, [तर] ज्ञानहि अर्पिति, [व] सुरतरुसि (कल्पवृक्षास) सखा म्हणों न देति (कल्पवृक्षाला औदार्यांत जे आपली बरोबरी करूं देत नाहीं,) तो तूं (दुर्वासऋषी) हें उष्ण, नव सुपायस खा (ह्या उत्तम खिरीचा आदर कर). ९. अनेक प्रकारें त्या दुर्वासऋषीची मनधरणी केली. १०. पतिव्रता. ११. आचाऱ्यांस. १२. उसंत पडूं देईना, दम टाकूं देईना. १३. खीर वाढणाऱ्या. १४. दुर्वासऋषी. १५. सेवेला तत्पर होतों. १६. पाठभेदः—तें. १७. सत्वर. १८. देहास. १९. सार्थान्वयः—विधुचा संकोच नक्षत्रांसि असो; (नक्षत्रांस चंद्राची पर्वा किंवा भीड वाटावी हें योग्य); परि (परंतु) [विधुचा संकोच] रविला (सूर्यास) कायसा? अर्थात् कांहीं नाहीं. मजपेक्षां कमी जे असतील त्यांस मजला उच्छिष्ट अंगास सारवावयास सांगण्याचा संकोच वाटला असता, हें विहितच आहे; परंतु दुर्वास्यासारख्या महाब्राह्मणास तसें कर असें मला सांगण्यास काय संकोच वाटणार? कांहींच नाहीं,

[1]पायसलेपन देहीं दृष्टांतीं उष्ण वा रुचो; पडतें, ।
नीटचि युक्ति पहातां, हें, कीं मी कृष्ण वारु, चोपड तें. ॥ ४४
भैष्मीचाही [2]झाला मुनिवचनें [2]काय [2]पायसा [2]मान्य, ।
मोडील कोण आज्ञा ? बापा! [3]ते काय [3]पाय सामान्य ? ॥ ४५
मग रुक्मिणीस [4]योजी, आधीं योजूनियां रथास मज; ।
[5]विप्रप्रभुत्व, पुत्रा! सादर परिसोनि ही कथा, समज. ॥ ४६
जेविं रथाला घोडा जोडावा, एक त्या दुजी घोडी, ।
जोडी स्त्रीस तसें; बा! वद कोणाच्या यशीं [6]अशी गोडी! ॥ ४७
बसुनि रथीं राजपथीं [7]बहु [7]मिरवत चालवी [8]प्रतोदानें; ।
लोकां [9]शोकांचीं दे, धरुनि तसी चाल, विप्र तो [9]दानें. ॥ ४८
जी [10]जातीपुष्पांच्या नव मालेसींच सुतनु [11]तोलावी, ।
त्या भैष्मीस नृपपथीं विप्रप्रवर [12]प्रतोद तो [12]लावी. ॥ ४९
[13]टोंची मुनि प्रतोदें, उघडि यशाचें कवाड; वाटोंच ।
दीन जनांत, परि म्हणें मी मनिं, ‘निःशंक वाडवा टोंच.’ ॥ ५०

म्हणूनच निःशंकपणें दुर्वास्यांनीं मजला उच्छिष्ट पायस अंगास माखण्यास सांगितलें, असा कृष्णोक्तीचा भाव. ‘ब्राह्मणो मम दैवतम्’ हें वाक्य सर्वश्रुत आहेच. तेव्हां श्रीकृष्ण विधूप्रमाणें व दुर्वासा हे सूर्याप्रमाणें होत.

१. सार्थान्वयः– वा (=अथवा) देहीं उष्ण पायसलेपन दृष्टान्तीं (=पुढील दृष्टान्तानें, दाखल्यानें, उदाहरणानें) रुचो (=योग्य किंवा मनोहर वाटो); युक्ति पाहतां (योग्य विचार केला असतां, हें नीटचि पडतें (=घडतें, ठरतें), कीं मी कृष्ण वारु (घोडा) [व] तें (लेपन) चोपड (=मालीश करण्याचें लोणी वगैरे) [होय]. येथें कृष्ण शब्दावर श्लेष आहे; असें भासतें. कृष्ण=(१) वासुदेव. (२) काळा. एका हस्तलिखित प्रतींत ‘उष्ण वा रुचो’ याऐवजीं ‘सच्छ्वा रुचो’ असा पाठ आहे. २. काय (देह) पायसा मान्य झाला (खीर चोपडून घेता झाला). ३. ते दुर्वासऋषींचे पाय. सामान्य=साधारण, असेतसे. ४. जोडिता झाला, जुंफिता झाला. ५. ब्राम्हणसामर्थ्य. ६. पाठ-भेदः–असे. ७. मोठ्या ऐटीनें. ८. चाबुकानें, चावूक मारून. ९. शोकांचीं दानें दे= शोकाकुल करिता झाला. १०. जाईच्या फुलांच्या. ११. तुलनेला घालावी, बरोबरीची समजावी. रुक्मिणी जाईच्या फुलाच्या ताज्या माळेसारखी नाजूक होती, असा गीत्यर्धाचा मतलब. याच अध्यायांत मागें गीति २८ पहा. १२. चावूक मारता झाला. १३. सार्थान्वयः– मुनि [मज] प्रतोदें (=चाबुकानें) टोंची, [व] यशाचें कवाड उघडी; मी जनांत (=लोकांच्या दृष्टीनें) दीन (=दुःखांत पडलेला) वाटोंच, परि मनिं म्हणें [कीं] ‘वाडवा! (ब्राम्हणा!) निःशंक (बेलाशक) टोंच.’

मुनिनें[1] गमे कराया देह सफळ जनन टोंचिला गावा ।
कविनीं मुक्तामणिसा श्रुतिभूषण, जन नटोंचि लागावा. ॥ ५१

यादव म्हणति, 'दे[2]वानळ दुर्वासा, हे[3] लता पहा काय. ।
या उ[4]ग्र ग्रीष्मीं हे दुर्वा साहेल ताप हा काय ?' ॥ ५२
ब्राह्मण जाती श्वश्रू[5], असासिल कसि वृष्णिसंपदे[6] ! सासू[7] ? ।
लोकीं बहु दाष्टिकही[8] ऐसी न सुनेसि कंप दे सासू. ॥ ५३
पुर तळमळे तसें, ह्रदतापें[9] बहु जेविं यादं[10] तळमळतें; ।
म्हणति, 'पथरजांत स्त्रीरत्न नलिनमृदुलपादतळ[11] मळतें !' ॥ ५४
कष्टीं[12] धर्माचरणीं श्वशुरानें[13] योजितां[14] स्वदयितातें[15], ।
पाहूं[16], वारूं, न शके जाणों ती विनयवसति दयिता तें. ॥ ५५
कैकेयीवर[17] मुनि, मी राम; म्हणति, 'विरह पळ नयो,' ध्याती ।

---

१. सार्थान्वयः—[असें] गमे (वाटलें), [कीं] जनन सफळ कराया (जन्माचें सार्थक व्हावें म्हणून) टोंचिला (टोंचिलेला) देह कविनीं श्रुतिभूषण मुक्तामणिसा (कर्णभूषण होणाऱ्या मोत्याप्रमाणें) गावा स्तवावा; [व त्यामुळें] जन नटोंचि लागावा (शोभूं लागावा). मोत्यांस भोंकें पाडल्यानें तीं मोत्यें कर्णभूषण होतात व त्यांची सुज्ञजन तारीफच करितात, त्याचप्रमाणें दुर्वास्यानें टोंचिलेला माझा देह पवित्र व स्तुतिपात्र व्हावा, ही माझी इच्छा होती. श्रुतिभूषण=वेदांस भूषणावह; पक्षीं कर्णाचा अलंकार. २. वणवा. ३. अन्वयः—काय (देह) हे (ही) लता पहा. ४. कडक उन्हाळ्यांत. हे दुर्वा (=दूर्वा) हा ताप साहेल काय? ही रुक्मिणीरूप दुर्वा हा उष्मा सहन करूं शकेल काय?– अर्थात् ह्या दुर्वासरूप वणव्यापुढें ह्या रुक्मिणीरूप दूर्वेचा निभाव लागणार नाहीं, असा भाव. ५. सासू. ६. हे यादवकुलाच्या लक्ष्मी ! वृष्णि हा यादवांचा एक पूर्वज. ७. जिवंत. ८. खाष्ट, कठीण. ९. डोह तापल्यानें. १०. जलचर. ११. नलिन+मृदुल+पाद+तळ=कमळाप्रमाणें मऊ आहेत पायाचे तळवे ज्याच्या असें.हें 'स्त्रीरत्न' या नामाचें विशेषण. १२. खडतर कर्तव्यांत. १३. सासऱ्यासारखें नातें आहे ज्याचें असा दुर्वासा त्यानें. १४. [करावयास] लाविलें असतां. १५. आपल्या पतीतें; श्रीकृष्णास. १६. सार्थान्वयः—जाणों ती विनयवसति (विनयाचें माहेर, अत्यंत मर्यादशील) दयिता (स्त्री; अर्थात् रुक्मिणी) तें (कष्टप्रद धर्माचरण) पाहूं न शके [व] वारूं (टाळूं) [न शके], (तिला तें पाहवेना व त्याचा परिहारही करितां येईना). १७. सार्थान्वयः—मुनि (दुर्वासा) कैकेयीवर (कैकेयीस दशरथानें दिलेला वर), [व] मी (कृष्ण) राम [असे वाटत होतों]; [व] विरह (वियोग) पळ (क्षणभर) न यो (न होवो) [असें] म्हणती (=म्हणणारी) [व] परिहारोपाया (=मजवरील संकट वारण्याच्या उपायाला) ध्याती (=चिंतणारी) जाणों कीं (=जणूं काय) द्वारका न, [तर] ती अयोध्या. कैकेयीच्या वरामुळें रामास अयोध्या सोडून वनवासास जावें लागलें, त्याप्रमाणेंच दुर्वास्यामुळें कृष्णाला द्वारका सोडून जावें लागत होतें, म्हणून येथें 'कैकेयीवर' व 'मुनि' यांचें रूपक साधिलें आहे. 'राम' व 'कृष्ण' आणि 'अयोध्या' व 'द्वारका' यांमधील साम्य उघड आहे. सर्वसंग्रहपाठः—जाणें न द्वारका.

परिहारोपाया कीं जाणों न द्वारका, अयोध्या ती. ॥ ५६
मी [1]नाकावरि ठेवीं वाराया लोक अंगुलीलाच. ।
धरिली [2]तापभरातें सर्व जनें स्पष्ट पं[3]गुलीलाच. ॥ ५७
[4]झाले चित्रचि पाहुनि पौरांचे [5]वाटसुर थवे गा! तें; ।
देती मुनिच्या [6]धाकें राजपथीं वाट सुरथवेगातें. ॥ ५८
[7]भगवंताची सेवा [8]कांहींसी द्वारकापुरीं घडली; ।
[9]धांवडितां रथ, मंथ[10]रगति [11]वैदर्भी [12]सती पथीं पडली. ॥ ५९
मुनिच्या मनांत होतें कीं बहुवेगें रथा पिटाळावें, ।
माझ्या चित्तीं [13]सत्वें दुस्तर [14]संकटें तथापि टाळावें. ॥ ६०
परि [15]भैष्मी [16]स्खलनातें पावे; जें सौकुमार्य, तो दोष; ।
रोष प्रभुला आला; [17]गुणहि अगुण होय, जो न दे तोष. ॥ ६१
[18]तों मुनि कोपोनि म्हणे, 'तरते सिंधूंत जे नदा भणगा ।
दुस्तर म्हणति, तयांचें हृदय सदुपदेश जेन दाभण गा. ॥ ६२
[19]स्खलन समीं राजपथीं पावतसे बायको, समजलाहे ।

---

१. अंगुलीलाच नाकावरि ठेवीं=स्तब्ध राहण्यास खूण करीं, बोट नाकावर ठेवून चूप राहण्यास खुणावीं. २. दुःखपीडितानें. पाठभेदः—तापसभीती. ३. जनें पंगुलीलाच (पांगळ्यासारखी वृत्ति किंवा स्थिति) धरिली=लोक जणों काय पांगळेच झाले, कोणी एकानेंही एक पाऊलही पुढें टाकिलें नाहीं. ४. चित्रचि झाले=चित्रासारखे तटस्थ झाले. ५. पायीं चालणारे. ६. भयानें. ७. दुर्वासमुनीची. ८. थोडीसी. 'सेवा घडली'=चाकरी झाली. अर्थात् कांहीं थोडासा मार्ग मुनीस रथांत बसवून आम्हीं कंठिला. ९. पिटाळिला असतां. १०. मंद आहे चाल जीची अशी. ११. विदर्भ देशच्या राजाची मुलगी, रुक्मिणी. १२. साध्वी. १३. प्रतिज्ञा सांभाळून, ब्रीद राखून. १४. कठीण प्रसंग निभवावा, कठीण प्रसंग पार पाडावा. १५. रुक्मिणी. १६. स्खलनातें पावे=ठेंचकळून पडली. १७. अन्वयः—जो [गुण] तोष न दे, [तो] गुणहि अगुण (=दोष) होय. १८. सार्थान्वयः—तों (तेव्हां) मुनि कोपोनि म्हणे 'जे सिंधूंत (समुद्रांत) तरते (तरणारे) भणगा नदा (=भिकार ओढ्याला, यःकश्चित् ओहोळास) दुस्तर (तरून जाण्यास कठीण) म्हणति (म्हणतात), तयांचें हृदय जेन (=बुरणूस) [व] सदुपदेश दाभण गा (=म्हणा), [=त्यांच्या हृदयास बुरणुसाप्रमाणें समजा व सदुपदेशांना दाभणाप्रमाणें माना.] बुरणुसांतून दाभण काढून घेतला म्हणजे भोंक बुजून तो बुरणूस पूर्ववत् होतो; त्याप्रमाणें लबाड लोकांच्या मनावर सदुपदेशाचा परिणाम काडीमात्रही घडत नाहीं. अर्थात् रुक्मिणी लबाडीनें ठेंचकळली. वस्तुतः तिला पडण्याचें कांहींएक कारण नव्हतें, असा रागावलेल्या दुर्वास मुनींच्या भाषणाचा भाव. १९. सार्थान्वयः—समीं (सपाट, सारख्या;) राजपथीं बायको स्खलन पावतसे! [तेव्हां मजला तिचा] आशय (=हेतु) समजलाहे (=कळला आहे). [तिच्या मनांत मजला रथांतून घेऊन जावयाचें नाहीं हें माझ्या ध्यानांत आलें आहे, असा भाव.] हे (=ही) मजला एक कोस तऱ्ही (तरी) घेऊन आली [आहे] काय?

आशय[1]; आली घेउनि एक तऱ्ही काय कोस मजला हे?' ॥ ६३
ऐसें वदला, रुसला, गेला टाकुनि रथावरूनि उडी; ।
मन्मति विकळा[2] झाली, प्राणवियोगेंकरूनि जेविं कुडी[3]. ॥ ६४
द्रुत[4] दक्षिणेकडे मुनि पायानें[5] उत्पथेंचि[6] तो धांवे, ।
होतां[7] गुप्त, तरि सुता[8]! कोठें तच्चरणपद्म शोधावें? ॥ ६५
तैसाचि[9] तूर्ण[10] पायसदिग्धतनु[11], विरोनि[12] आपुल्या आगें[13], ।
'भगवन्[14]! प्रसीद' ऐसें म्हणत सुता[15]! मीहि धांवलों मागें. ॥ ६६
वैदर्भीही धांउनि ये, प्रार्थी मंजु[16] मांजियाचितसें[17], ।
'न घडेल स्खलन पुन्हा, बैस रथीं हेंचि आजि याचितसें.' ॥ ६७
वात्सल्यें कळवळला चित्तांत; सुजाण विप्र सन्नमनें[18]; ।
स्वाराधनफळ[19] आम्हां, विश्वासहि, जाणवि प्रसन्न मनें. ॥ ६८
तो तेजस्वी मातें सादर पाहुनि म्हणे, 'महाबाहो! ।
बा! हो धन्य[20]; स्पर्धा[21] करुनि परमह न तुझ्या महा बाहो. ॥ ६९
अति[22] दुर्जय परि कृष्णा! त्वां कोप प्रकृतिनेंचि बा जितिला. ॥
जी महिषघ्नी देवी योग्य मिळालीच आलि आजि तिला. ॥ ७०

---

१. पाठभेदः—अयश न. २. माझें मन अगदीं व्याकुळ, हवालदील झालें. ३. शरीर. ४. सत्वर. ५. पाठभेदः—पायांनीं. ६. आडवाटेनें, आडमार्गानें. ७. जर झाला असता. ८. प्रद्युम्ना! ९. तसाच म्हणजे जसा दुर्वासा आडवाटेनें, पळूं लागला तसा मीहीपण आडवाटेनें त्याच्या मागें धावूं लागलों. १०. घाईघाईनें, लागलेंच. ११. खिरीनें माखिलेला आहे देह ज्याचा असा मी. १२. खेद पावून. पाठभेदः—°दिग्धतनू खिन्न आपुल्या आगें. १३. अपराधानें. १४. महाराज! क्षमा करा. १५. पाठभेदः—द्रुत. १६—मृदुस्वरानें. १७. माझ्याप्रमाणेंच. १८. उत्तम नमनानें, मनोभावानें केलेल्या नमस्कारानें. १९. सार्थान्वयः—[तो विप्र] स्वाराधनफळ (आपल्या सेवेचें फल) प्रसन्न मनें (मोठ्या संतुष्ट मनानें) आम्हां (श्रीकृष्णास व रुक्मिणीस) [व] विश्वासहि (अवघ्या जगाला) जाणवी (दाखवी). २०. कृतार्थ हो. २१. सार्थान्वयः—परमह (दुसऱ्याचें तेज) स्पर्धा करुनि (चढाओढीनें) तुझ्या महा (तेजाला) न वाहो (बोलावो). तुझ्या तेजाची बरोबरी दुसऱ्या कोणाच्याही तेजानें होणार नाहीं, हा भाव. २२. सार्थान्वयः—कोप (अर्थात् माझा राग) अति दुर्जय (शमविण्यास अतिशय कठीण), परि (परंतु) बा कृष्णा! त्वां [तो] प्रकृतिनेंचि (स्वभावानें अर्थात् आपल्या सात्विक वृत्तीनें, सुस्वभावानें, सौजन्यानेंच) जितिला (जिंकला). जी महिषघ्नी देवी (महिषासुरमर्दिनी दुर्गा देवी) तिला आजि (आज) योग्य आलि (सखि) मिळालीच. महिषासुराप्रमाणेंच अति दुर्जय असा माझा कोप आज तुझ्या प्रकृतिनें(सुस्वभावानें)नाहींसा केला, तेव्हां अर्थात् ती तुझी प्रकृति दुर्गादेवीप्रमाणेंच प्रतापी होय; असा प्रताप दाखविणारी आजपर्यंत कोणी मिळालीच नव्हती, हा भाव.

इतुक्या दिवसांत तुझें दिसलें[1] नाहींच तिळहि[2] आग[3] मला, ।
सादर गमलासि, जसा चातक मेघासि करुनि[4] 'आ' गमला. ॥ ७१
झालों[5] सुप्रीत, मला वांछित वर सर्व माग, अथवा हो ।
'दे' न म्हणतांचि पूर्ण, ब्राम्हणपदभक्तिभव्यपथ वाहो. ॥ ७२
तें काय योग्य, भक्तें मुख, 'दे' हे शब्द वदत, पसरावें ! ।
सुभजकहितार्थ[6] कृष्णा! माजें सर्वार्थपद तप सरावें. ॥ ७३
बा[7]! भाव मनुष्यांचा अन्नीं जोंवरि जसा दृढ असेल, ।
तोंवरि तैसाचि तुझ्या ठायीं तो[8] भाव निश्चळ वसेल. ॥ ७४
त्वत्कीर्तिपुण्य[9] लोकीं नांदेल सदैव पूतनाकाला[10], ।
त्वत्पुण्यगुणश्रवणें[11] जातिल होवून पूत नाकाला[12]. ॥ ७५
स्पष्ट विशिष्टत्वातें[13] तूं त्रैलोक्यांत पात्र होशील, ।
सर्वां लोकांस प्रिय परम तुझें एक मात्र हो शीलें[14]. ॥ ७६
पात्रादि फोडिलें जें, गृह भूषण वस्त्र जाळिलें रागें, ।
स्रक्चंदनान्नपानहि[15] जें कांहीं व्यर्थ नासिलें मागें[16]. ॥ ७७
दिव्य यथास्थित[17] सर्वहि किंवा तदधिक[18] गृहीं पहासील, ।
किंबहुना[19] पुष्पादिक, तें देवब्राम्हणा वहासील. ॥ ७८
अमृतचि सारविलें हें माझें उच्छिष्ट अन्न गात्रास; ।

---

१. पाठभेदः—घडलें. २. किंचित्सुद्धां. ३. अपराध. ४. 'आ' करुनि=तोंड पसरून. चातक हा मेघबिंदूकरितां तोंड पसरून टाहो फोडतो हा संकेत सर्वमान्य आहे. ५. सार्थान्वयः—[मी] सुप्रीत (प्रसन्न) झालों (झालों आहें); मला वांछित वर माग; अथवा 'दे' न म्हणतांचि (सर्व वांछित) पूर्ण हो (होवो); [व] ब्राह्मण-पद-भक्ति-भव्य-पथ (ब्राह्मणचरणाच्या सेवेमुळें प्राप्त होणाऱ्या कल्याणाचा मार्ग) वाहो (वाहत राहो;) [अर्थात् सर्वांस ब्राह्मणमाहात्म्य कळून, ते ब्राह्मणसेवेला लागोत). ६. कृष्णा! सुभजकहितार्थ (उत्तम भक्ताच्या कल्याणाकरितांच) माजें (माझें) सर्वार्थपद तप (=सर्व संपत्तीचें माहेर असें जें तपश्चरण तें) सरावें (कामास यावें, खर्ची पडावें). ७. भावार्थः—मनुष्यमात्रास अन्न हें अत्यावश्यक आहे, त्याचप्रमाणें तुझी भक्तीही त्यांना आवश्यक होईल; अर्थात् प्राणिमात्र तुला सदैव चाहतील. ८. पाठभेदः—हा. ९. त्वत्+कीर्ति+पुण्य=तुझ्या यशाची पवित्रता. १०. पूतना नामक राक्षसीचा वध करणाऱ्या ? ११. तुझे पवित्र गुण कानीं पडल्यानें जन उद्धरतील, असा भाव. १२. स्वर्गास. १३. श्रेष्ठत्वातें. १४. केवळ तुझा एकट्याचाच स्वभाव. शील=स्वभाव, सद्वर्तन. १५. स्रक्+चंदन+अन्न+पानहि=हार, चंदनादिकांचीं उटणीं, अन्नें व पेय वस्तु सुद्धां. १६. पूर्वीं. गीति ७७ व ७८ यांचें युग्मक आहे. १७. पूर्वींप्रमाणेंच सुंदर. १८. तत्+अधिक=त्याहून अधिक, पूर्वींच्याहून जास्ती. १९. सारांश, थोडक्यांत.

मृत्युदवाचा[1] नाहीं या सद्गुणपत्रिसन्नगा त्रास. ॥ ७९
बा! त्वां देहीं धरिलें जें हें, पायस न, होय पविकवच[2]; ।
प्राप्तामृतसें प्यावें माझें बहु आदरूनि भविक वच[3]. ॥ ८०
कां सारविले नाहीं पायांचे मात्र पुत्रका[4]! तळवे? ।
उरलें अपक्क मृदुपण कीं हें, जेणें[5] फुलाहि नातळवे. ॥ ८१
हें[6] न मम प्रिय, पायसलेपा केलीं न पात्र पादतळें, ।
निवड करुनि, तृषितासीं सुज्ञा! सांगेल काय वाद तळें?' ॥ ८२
मुनिचा प्रसाद होतां वत्सा[7]! जों आपणाकडे पाहें, ।
तों पहिल्याहूनि अधिक मी श्रीसंपन्न शतगुणें[8] आहें. ॥ ८३
करुनि प्रसाद मजवरि, वैदर्भीतेंहि मग म्हणे विप्र, ।
"वत्से! मत्सेवेचें सत्फळ, 'दे' न म्हणतांचि, घे क्षिप्र. ॥ ८४
सर्वां स्त्रियांत रुक्मिणि! कन्ये! होसील वरयशा[9] पात्र, ।
पावेल न रोगजरावैवर्ण्यातें[10] कधीं तुझें गात्र; ॥ ८५
दिव्यकुसुमदामतसें[11] वाहेल[12] सदैव पुण्यगंधातें; ।
सेव्य[13] गुणातें होइल हें, जैसें सत्य सत्यसंधातें. ॥ ८६

---

१. सार्थान्वयः—या सद्गुणपत्रिसन्नगा (सद्गुण+पत्रि+सत्+नगा=सद्गुणरूप पक्ष्यांच्या उत्तम वृक्षास, गुणरूप पक्षी ज्याचा आश्रय करितात अशा तुझ्या देहरूप वृक्षास) मृत्युदवाचा (मृत्युरूप वणव्याचा) त्रास नाहीं. अर्थात् तुझ्या देहास मृत्यूचें भय उरलें नाहीं, असा भाव. २. अन्वयार्थः—बा! त्वां जें हें देहीं धरिलें, [तें] पायस न, [तर] पविकवच (वज्रकवच, दुर्भेद्य चिलखत) [होय]. ३. हितकर बोलणें, वऱ्याचें भाषण. ४. बाळा! बाबारे! ५. सार्थान्वयः—जेणें (ज्या मृदुपणामुळें) फुलाहि (फुलाला सुद्धां) नातळवे (स्पर्श करवणार नाहीं). फुल टोंचण्यानें सुद्धां पायांस इजा होई असे ते मऊ व नाजूक आहेत, हा भाव. ६. सार्थान्वयः—पादतळें (पायाचे तळवे) पायसलेपा [त्वां] पात्र न केलीं, (हें मम प्रिय न, हें मला आवडलें नाहीं.) [हे] सुज्ञा! (अरे शहाण्या!) निवड करुनि तळें तृषितासीं वाद सांगेल काय? अमुक, चांगला तमुक वाईट, अशा कल्पनेनें तलाव कधीं ताहानेल्याबरोबर हुजत घालीत बसेल का? नाहीं. कोणीही असो, तो ताहानेला असल्यास तळें त्यास पाणी देऊन त्याची तहान भागवीलच; तद्वत् 'पादतळ' हें नीचांग आहे असें कधींही पायसास वाटलें नसतें; तूं तें पायस तळव्यांस लाविलें असतेंस तर इतर गात्रांप्रमाणें तेही वज्रकठोर झाले असते, हा भाव. ७. प्रद्युम्ना. ८. शंभरपटीनें. ९. उत्तम कीर्तीला. १०. रोग व वृद्धपण व निस्तेजता. ११. पारिजातक फुलांच्या माळेप्रमाणें. १२. याचा कर्ता 'गात्र' हा मागील गीतींतून घ्यावयाचा. १३. जैसें (ज्याप्रमाणें) सत्य (=सचोटी) सत्यसंधातें (सत्य हेंच ज्याचें ब्रीद आहे त्यास) [तैसें] हें (हें तुझें शरीर) गुणातें (सद्गुणातें) सेव्य होईल. तुझे ठायीं सद्गुण सदैव नांदतील, असा भाव.

पुत्रि! वरिष्ठा होसिल हरिच्या षोडशसहस्रभार्यांत; ।
कीर्तींत कीर्ति तव हो मान्या, मम [1]माय जेविं [2]आर्यांत. ॥ ८७
आराधन कृष्णाचें नित्यप्रेमेंकरूनि करिशील, ।
हरिशील चित्त पतिचें, [3]धरिशील सुशील जेविं हरिशील. ॥ ८८
बहु आवडसिल कृष्णा, जी [4]अभ्रमु जेविं [5]त्या सदान गजा; ।
पतिसह उत्तमलोकीं वससिल, जसि शंभुसह सदा [6]नगजा.' ॥ ८९
मुनि [7]सुवरभूषणांहीं [8]त्वन्मातेतें असें [9]अलंकारी, ।
[10]लंकारी जो, तोचि प्रभु कार्यांतीं जसा अलंकारी. ॥ ९०
भैमी चित्तांत म्हणे, 'अगइ! [11]गवसला [12]महाकसाल्याला ।
देह, शिरःस्नात जसा लग्नीं, शोभा पहा कसा [13]ल्याला !' ॥ ९१
[14]प्रस्थानीं तो भगवान् मुनि कुरवाळुनि म्हणे [15]नतास मज, ।
'कृष्णा! मेघश्यामा! बा! माझ्या माधवा! [16]मतां समज. ॥ ९२

---

१. माझी माता, अनसूया (मागें अ० १, गी० ४६–५२ पहा). २. पतिव्रतांत. ३. अन्वयार्थ– जेविं हरिशील (श्रीकृष्णाचा स्वभाव) [तेविं] सुशील (उत्तमस्वभाव) धरिशील (अंगीकारशील). अर्थात् श्रीकृष्णाप्रमाणें तूंही सुस्वभावाची होशील. येथें रुक्मिणीस दिलेला वर पतिव्रतेस गोड वाटेल व साजेल असाच आहे. यांत अप्रत्यक्ष रीतीनें पतिव्रतेचें वर्तन कसें असावें, तेंही सुचविलें आहे. ४. ऐरावताची स्त्री. ५. त्या सदान गजा=मदमत्त हत्तीला, ऐरावताला. दान=मत्त हत्तीच्या गंडस्थळांतून वाहणारा मद. ६. पर्वतकन्या, पार्वती. ७. उत्तम वररूप दागिन्यांनीं. ८. त्वत्+मातेतें=तुझ्या आईस, रुक्मिणीस. ९. नटविता झाला. १०. सार्थान्वयः–जो प्रभु (रामचंद्र) लंकारी (लंकेचा शत्रु) तो जेविं कार्यांतीं (काम तडीस गेल्यावर, पृथ्वीचा राक्षसभार उतरल्यावर) अलंकारी (लंकेचा शत्रु नव्हे असा) [होय] [तेविं हा मुनि होय]. रामचंद्रांनीं लंकापति रावण मारिला, पण दुष्टांचा संहार केल्यावर, त्याच रामचंद्रांनीं बिभीषणास लंकानाथ केलें; त्याचप्रमाणें दुर्वास्यांनीं सत्व पाहण्याकरितां आम्हां उभयतांस फार छळिलें पण पुढें आमचें सत्व ढळत नाहीं असें पाहतांच आम्हां उभयतांसही वर दिले. स्त्रियांस जात्याच दागिन्यांची हौस असते. तेव्हां प्रसन्न होऊन दुर्वास्यांनीं वररूप अलंकारांनीं रुक्मिणीचा देह भूषित केला, असें स्त्रीजनास प्रिय अशा शब्दांनीं वर्णन केलें आहे. ११. तावडींत सांपडलेला. हें उत्तरार्धांतील 'देह' ह्या नामाचें विशेषण. १२. महाकसाला=अति दुःखद स्थिति. 'महाकसाल्याला गवसला'=अतिशय दुःखद स्थितीच्या फेऱ्यांत पडलेला. १३. धारण करिता झाला. अन्वयः–'अगइ! महा कसाल्याला गवसला देह, जसा लग्नीं (लग्नाचे वेळीं) शिरःस्नात (ज्यास अभ्यंग नाहाण घडलें आहे असा) [देह] [तसा] कसा शोभा ल्याला पहा.' 'अगइ' हें आश्चर्यबोधक अव्यय असून स्त्रीजनाच्याच तोंडीं असतें. केकावली 'म्हणे अगइ! ऐकिलेंहि न कधीं असें पाप गा!' केका १० पहा. १४. जातेसमयीं. १५. नम्र झालेल्यास. १६. हेतूतें.

आम्ही शिव, यश द्याया भजकांतें, जाहलों असों देही;[1] ।
कृष्णा! नित्य ब्राह्मणभजनीं ऐसीच मति असों[2] दे ही.' ॥ ९३
वदुनि असें, तेथेंचि प्रभु झाला गुप्त; पुनरपि तयातें ।
देखावेंचि म्हणें मी, स्वः[3]स्थातें जेविं सुनर[4] पितयातें. ॥ ९४
तेव्हांचि प्रद्युम्ना! अतिचित्रा अनुभवूनियां महिम्या, ।
त्वन्मातेसह, न[5] सरों देतां अर्धार्धमात्र[6] यामहि, म्यां, ॥ ९५
ब्राम्हण म्हणेल जें, तें सर्व करावेंचि सर्वदा साचें; ।
हें गुप्त व्रत धरिलें; कीं,[7] यांतचि इष्ट सर्व दासाचें.[8] ॥ ९६
तदनंतर भैमीसह आलों होवूनि मुदित बहु धामीं, ।
पाहें मुनिप्रसादेंकरुनि चमत्कार उदित[9] बहुधा मी. ॥ ९७
जो काय दग्ध केला होता मुनिनें पदार्थ, जो भग्न, ।
त्यातें अभिनव[10] पाहुनि, झालों बहु विस्मयांत मी मग्न.[11] ॥ ९८
आंत सदय शांत सदा, दिसला बाहेर मात्र कोपनें[12] गा! ।
प्रभु मद्देहा, गेहा, शोभा दे, कुशल जेविं ओप[13] नगा.[14] ॥ ९९
[15]म्यां देखिलें रुचिर, नव, दृढ, वस्तु सकळ, जया विनाशी, तें. ।
[16]जीं उष्णें, तींच करिल नयनें न इतर तयाविना शीतें. ॥ १००
जें पात्र भंगिलें, जो सुरस उडविला, तयाचि[17] सुरसानें ।
तें पात्र पूर्ण झालें; करि कौतुक[18] काय भूमिसुर[19] सानें[20]?' ॥ १०१

---

१. देही जाहलों असों=मानवदेह धारण केला आहे. २ ठेव, राहूं दे. ३. स्व +स्थ=स्वर्गस्थ, मृत. ४. सुशील मनुष्य. ५. न घालवितां. ६. प्रहराचा चवथा हिस्सासुद्धां. ७. कारण. ८. गीति ९५ व ९६ यांचें युग्मक आहे. युग्मकान्वयः—हे प्रद्युम्ना! तेव्हांचि अतिचित्रा महिम्या अनुभवुनियां, अर्धार्धमात्रहि याम न सरों देतां, 'जें ब्राह्मण म्हणेल तें त्वन्मातेसह म्यां सर्वदा साचें करावेंचि' हें गुप्तव्रत धरिलें; कीं, यांतचि दासाचें सर्व इष्ट [असे]. ९. उत्पन्न झालेले, घडून आलेले. १०. नवा झालेला पाहून. ११. गढलेला, गर्क, दंग. १२. रागावलेला, तापट. १३. जिल्हई. १४. अलंकारास. अन्वयः—प्रभु (दुर्वासा) मद्देहा [व] गेहा शोभा दे, जेविं कुशल (हुशार कारागीर) नगा ओप दे (दागिन्यास जिल्हई देतो). १५. सार्थान्वयः—जया (ज्या वस्तूतें) [तो दुर्वासा] विनाशी, तें सकळ वस्तु रुचिर (सुंदर) नव (नवीन) [व] दृढ (बळकट) [असें] म्यां देखिलें. 'वस्तु' हा शब्द संस्कृताप्रमाणें नपुंसकलिंगीच योजिला आहे. १६. अन्वयः—जीं नयनें उष्णें (दुःखाश्रूंनीं) तापलेलीं [आहेत] तींच नयनें तयाविना (दुर्वास्याशिवाय) इतर (दुसरा कोणीहि) शीतें (आनंदाश्रूंनीं गार) न करील. दुःखितांना सुखी करावें असें दुर्वास्यानेंच, इतरांना तें साधणें नाहीं, हा भाव. १७. त्याच. १८. चमत्कार. १९. ब्राह्मण, दुर्वासा. २०. लहानसहान.

तुडवी, उडवी, पूर्वीं[1] कोपोनि न ज्या मनोरमा त्याला, ।
त्याचि पहाता झालों रम्या फुल्ला गृहांत माल्याला. ॥ १०२
जे पूर्वदग्ध, झाले पर्यंक[2] प्रकट[3] शुचि नवे दांत[4]; ।
विप्रप्रसाद[5] जैसे ते देती, तेविं रुचि न वेदान्त. ॥ १०३
ऐसा[6] परम क्षोभचि झाला परम प्रसाद बा! गा! तो; ।
हा **कृष्ण** विप्रमहिम्या, इतरांसि म्हणावया 'दबा,' गातो. ॥ १०४
त्यांपासुनि[7] देहानें, वाचेनें, प्रेमयुक्त चित्तानें, ।
विप्रासि **रौक्मिणेया**[8]! मी पूजितसें सदैव वित्तानें.' ॥ १०५
यांपरि[9] कथिलें **धर्मा**! म्यां **प्रद्युम्ना**सि तेंचि तुज राया! ।
सत्य[10] वदविलें **भीष्में** विप्रभजनशुद्धमार्ग उजराया." ॥ १०६
रामसुत मयूर म्हणे, 'जाणेल निका[11] मनीं चमत्कृतिला[12]; ।
नुमजुनि[13] **कथे**! न मानिल तुज, तेविं निकाम[14] नीच[14] मत्कृतिला[15].'॥ १०७

---

१. अन्वयः–ज्या मनोरमा (सुंदर) [माल्याला] पूर्वीं कोपोनि [तो] तुडवी [व] उडवी [व] न त्याला (अंगावर अलंकाराप्रमाणें धारण न करी) त्याचि माल्याला (फुलांना) गृहांत रम्या [व] फुल्ला (टवटवीत) [अशा] पहाता झालों. २. पलंग. ३. प्रकट झाले=उदय पावले, उत्पन्न झाले. ४. हस्तिदंताचे. हें 'पर्यंक' ह्याचें विशेषण. ५. अन्वयार्थः—विप्रप्रसाद (ब्राह्मणांचे प्रसाद, ब्राह्मणांची कृपा) जैसे रुचि (गोडी) देती (देतात) तेविं (त्या प्रकारची) रुचि वेदान्त न (देती). ६. सार्थान्वयः—बा! गा! ऐसा (या प्रकारें) तो [दुर्वास ऋषीचा] परम क्षोभचि (विलक्षण रागच) परम प्रसाद (शेवटीं मोठ्या प्रसादाप्रमाणें) झाला. [म्हणून] हा कृष्ण इतरांसि 'दबा' (ब्राह्मणांपुढें नम्र व्हा) म्हणावया विप्रमहिम्या (ब्राह्मणमाहात्म्यातें) गातो (वर्णन करितो). ७. तेव्हांपासून. ८. रुक्मिणीपुत्रा, प्रद्युम्ना. ९. ह्याप्रमाणें. १०. सार्थान्वयः–विप्रभजनशुद्धमार्ग (ब्राह्मणभक्तीचा पवित्र रस्ता) उजराया (उजळ करण्याकरितां) सत्य (खरें तें) भीष्में वदविलें. ११. शुद्ध अंतःकरणाचा, सुशील. १२. चमत्कारातें. १३. न+उमजुनि=बोध न झाल्यामुळें. १४. अत्यंत क्षुद्र. १५. मत्+कृतिला=माझ्या ग्रंथास. अन्वयार्थः–रामसुत मयूर म्हणे 'निका मनीं चमत्कृतिला (या कथेच्या कौतुकाला) जाणेल; [हे] कथे! निंकाम नीच [मात्र] नुमजुनि, [जेविं] तुज तेविं मत्कृतिला (माझ्या ग्रंथास) [ही] न मानिल (मान देणार नाहीं). जे शुद्ध अंतःकरणाचे म्हणजे अर्थात् भाविक आहेत, त्यांच्या मनावर ह्या दुर्वासकृत सत्वपरीक्षणाचा रम्य ठसा बरोबर वठेल; पण जे हलकट आहेत, त्यांस ह्या कथेपासून बोध न झाल्यानें ते हिला तुच्छ करितील व त्याप्रमाणेंच माझ्या ग्रंथासही न समजल्यामुळें दोष देतील, असा कवीचा आशय. आपली कृति जरा दुर्बोध पण सरस व सुज्ञांस मान्य अशी आहे, असें पंतांनीं या गीतींत ध्वनित केलें आहे. आपल्या कृतीचे गुणदोष पंतांना कळतच होते, असें यावरून स्पष्ट दिसतें.

अध्याय आठवा.

व्यास म्हणे, "गांगेया! श्रवण करुनि सर्व दानधर्मातें, ।
नृप पावला [1]प्रकृतितें, अमृतें रोगार्त जेविं [2]शर्मातें. ॥ १
त्वां मेघें केला हा गर्जुनि [3]कौंतेयमोर सानंद, ।
बोध दिल्हा पुष्कळ [4]यां, कृष्णा दे जेविं [5]गोरसा [6]नंदं. ॥ २
धर्ममना बोध सुखद झाला, [7]मणिलाभ जेविं [8]उरगमना; ।
आतां आज्ञा द्यावी या कुंतीनंदनासि पुरगमना." ॥ ३
भीष्म म्हणे "[9]स्वपुरातें त्वां [10]सद्गुणहंसमानसा! जावें, ।
[11]स्वपदीं देवेंद्रापरि होउनि बहु [12]पूज्यमान [13]साजावें. ॥ ४
[14]सुश्री, सुकीर्ति, होइल गतिही बरवी; प्रजाचि [15]रंजीव. ।
त्या काळहि कर जोडी, म्हणती [16]वर विप्र ज्या '[17]चिरं [17]जीव.' ॥ ५
[18]वाढे प्रताप सुकृतें, अल्पहि जो अग्नि, जेविं तो धमनें. ।
लुब्धें धनसंचयसा, संरक्षावा जपोनि बोध मनें. ॥ ६

---

१. अंत:करणाची मूलस्थिति, मनाचें स्वास्थ्य. प्रकृतीची व्याख्या वामन पंडित अशी करितात:— जे आपली स्वच्छ मती । तेचि म्हणावी **प्रकृती** । ते घाबरी होतां, तिचे होती । विपरीत भाव. ॥ दूरी होतां घाबरेपण । जो स्वस्थ होतो आपण । तो प्रकृतींत पावला हे खूण । अर्जुन सांगे आपली. ॥ स्वस्थ चित्त जालें । तें आपल्या प्रकृतीतें पावलें । तेव्हां मन आटोपलें । जें घाबरें होतें अत्यंत. ॥ (यथार्थदीपिका, अ० ११, ओंव्या ९८८–९९०). २. सुखातें. ३. कुंतीपुत्ररूपी मोर. ४. धर्मराजास. ५. दूध, दहीं वगैरेंस. ६. श्रीकृष्णाचा पिता. श्रीकृष्ण वसुदेवाचा मुलगा, पण नंदानें व यशोदेनें त्यास अगदीं लहानपणापासून वाढविलें होतें. ७. रत्नप्राप्ति. जातिवंत नागाच्या फडेवर मणि असतो व तो फार सतेज असतो. तो सर्व सर्पांस असत नाहीं; तेव्हां ज्यांच्या फणेवर तो असतो, त्यांस त्यामुळें आनंद वाटणें साहाजिक आहे. ८. उरग=उरसा गच्छतीति, छातीनें चालणारा. सर्पांस पाय नाहींत व तो छातीनें सर्पटत जातो, म्हणून त्यास 'उरग' म्हणतात. ९. हस्तिनापुरातें. १०. सद्गुणरूप राजहंसाच्या मानससरोवरा! मानससरोवर जसें हंसाचें वसतिस्थान आहे, त्याप्रमाणें तूं सद्गुणांचें माहेर आहेस, असा भाव. ११. आपल्या अधिकाराचे ठायीं अर्थात् सिंहासनीं. १२. पूजित होत्साता, मान्य. १३. शोभावें. अन्वय:— देवेंद्रापरि पूज्यमान होउनि स्वपदीं बहु साजावें. १४. उत्तम लक्ष्मी, मोठें वैभव. 'होईल' या क्रियापदाचे 'सुश्री' 'सुकीर्ति' व 'गति' हे सर्व कर्ते होत. १५. संतुष्ट ठेव. पाठभेद:–प्रजा चिरंजीव. १६. श्रेष्ठ. १७. दीर्घ काळपर्यंत जीवंत रहा. १८. सार्थान्वय:—[अल्पहि] प्रताप सुकृतें (पुण्यानें) वाढे, जेविं जो अल्पही अग्नि, तो धमनें (फुंकण्यानें) [वाढे].

यांवास[1] आणुनि घनश्यामास दयासुधारसमयास; ।
व्हावा सहाय घेउनि करवाल जसा सुधार समयास. ॥ ७
होतांचि उत्तरायण[2] ये मज जात्यास[3] बोळवायास[4]. ।
मुनिहो! या सर्व तुम्ही, स्वपदरजांमाजिं[5] घोळवा यास." ॥ ८
भीष्मासि धर्म वंदी भ्रात्यांसह, त्याहि केशवासहित, ।
यत्पदपद्माचा[6] करि मातृशतांहूनि लेश वास हित. ॥ ९
करुनि[7] पुढें गांधारीसह धृतराष्ट्रास, शक्रसम[8] हर्षी[9], ।
गेला पुरा युधिष्ठिर राजा, सभ्रातृवर्ग, संमहर्षी[10]. ॥ १०
प्रेषी स्वस्थानाप्रति सत्कारुनि पौरजानपदलोक[11]; ।
सांत्वुनि[12] हरि स्त्रियांचा दानेंमानेंकरूनियां शोक. ॥ ११
शुद्धें[13] चित्तें वित्तें नमुनि यथायोग्य गौरवि, प्राशी ।
सादर चकोरसा तो कौंतेय सुधांशुगौर विप्राशी. ॥ १२

---

१. सार्थान्वय:—सुधार (उत्तम धारेचा) करवाल (खड्ग) घेउनि जसा सहाय (मित्र) समयास (ऐन प्रसंगीं, वेळेवर) व्हावा (असावा, पाहिजे;) [तसा तूं] दयासुधारसमयास (दयारूप सुधेच्या रसानें भरलेल्या) घनश्यामास (घननीळाला, कृष्णाला) आणुनि यावास (तूं यावेंस अशी माझी इच्छा आहे). 'यावास' ह्या विध्यर्थांत इच्छा व्यक्त होते, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. २. सूर्य मकरराशीस आला म्हणजे उत्तरायण सुरू होतें. तो कर्कराशीस गेला म्हणजे दक्षिणायन लागतें. ३. जाणाऱ्यास अर्थात् इहलोक सोडून जाणाऱ्यास. ४. पाठवणी करण्यास, निरोप देण्यास. ५. यास (मला भीष्माला) स्वपदरजांमाजी (आपल्या चरणधूलींत) घोळवा—अर्थात् तुमची चरणधूली मजवर पडो. हल्लीं प्रचलित असलेला मराठी प्रयोग पहा—'पायधूळ झाडा'. ६. सार्थान्वय:—यत्पदपद्मांचा (ज्याच्या चरणकमलाचा) लेश (थोडासा, अल्पमात्र) वास (सान्निध्य किंवा गंध) मातृशतांहूनि (शेंकडों आयांपेक्षां अधिक) हित (कल्याण) करी. ७. पुरगमनाचे वेळीं अग्रस्थान चुलता व चुलती यांस देऊन, त्यांच्या मागून धर्मराज चालूं लागले, ह्यावरून वडिलांविषयीं त्यांचा किती आदर होता, हें व्यक्त होतें. ८. इंद्रासारखा. ९. संतोष पावलेला. १०. स+महा+ऋषि=मोठमोठ्या ऋषींसहवर्तमान. ११. पौर=नागरिक. जानपद=खेड्यांत राहणारे लोक. पौरजानपदलोक=सर्व प्रजाजन. १२. हस्तिनापुरांतील योद्धे कुरुक्षेत्रीं समर करण्यास गेले व तेथें पुष्कळांचा अंत झाला, ह्यामुळें मागें राहिलेल्या त्यांच्या स्त्रिया शोकाकुल झाल्या. अशा स्त्रियांस देणग्या देऊन म्हणजे अर्थात् त्यांच्या पोषणाची तजवीज करून व त्यांचा मोठा सन्मान करून धर्मानें त्यांचें समाधान केलें. राजांनीं प्रजेबद्दल कशी काळजी वाहावी, ह्याचा हा उत्तम मासला आहे. १३. सार्थान्वय:—तो कौंतेय (धर्मराज) [विप्रांतें] शुद्धें चित्तें (मोकळ्या मनानें) नमुनि, वित्तें (द्रव्यद्वारा) यथायोग्य गौरवि

[1]वारी अवृष्टिचा बहु तो भीष्मचि गाधिसुत ऋषी वळसा, ।
ओळे धर्मघन, सुखी होय जन समग्रही कृषीवळसा. ॥ १३
होता पुरीं युधिष्ठिर लोक[2]व्यवहार चालवीत नयें[3], ।
[4]जो कथिला सर्वज्ञें सद्गतिकीर्त्यर्थ[5] जान्हवीतनयें[6], ॥ १४
सरतांचि [7]दक्षिणायन शांतनवप्रोक्त समय आठवुनी, ।
साहित्य पुढें [8]चंदनघृतरत्नसदंबरादि पाठवुनि, ॥ १५
गांधारी, धृतराष्ट्र, भ्राते, कुंती, युयुत्सु, युयुधान, ।
याजक, विदुर, जनार्दन, होतो ज्यांचा सभेंत बहुमान, ॥ १६
या सर्वांतें घेउनि, अग्नि पुढें करुनि [9]राज आज्याचे, ।

(सत्कार करिता झाला); [व] सुधांशुगौर (चंद्रासारखा स्वच्छ, अर्थात् शीतळ व तापहारक) विप्राशी (ब्रह्मवृंदाचा आशीर्वाद) चकोरसा (चकोरपक्ष्याप्रमाणें) प्राशी. 'चंद्रचकोर' कविसंकेत सर्वप्रसिद्ध आहेच. धर्मराजास चकोरपक्ष्याची, व विप्राशीर्वादास चंद्राची उपमा दिल्यामुळें पंतांनीं 'प्राशी' हें क्रियापद योजिलें आहे.

१. सार्थान्वयः—तो भीष्मचि गाधिसुत ऋषी (तो भीष्म हाच विश्वामित्र, भीष्मरूपी विश्वामित्र) बहु अवृष्टीचा वळसा (अवर्षणाचा फेरा, दुष्काळाचें संकट) वारी (टाळी), [व] धर्मघन (धर्मराजरूपी मेघ) ओळे (वर्षे, पडे); समग्रही जन (अवघे प्रजाजन) कृषीवळसा (शेतकऱ्यांप्रमाणें) सुखी होय. एकदा भयंकर दुष्काळ पडला असतां विश्वामित्रानें प्राणसंरक्षण करण्यासाठीं एका चांडाळाजवळून कुत्र्याची तंगडी मागून घेतली. नंतर त्या ब्रह्मर्षीनें आपल्या कुटुंबासह तें श्वमांस पकवून खाण्यासाठीं तयार केलें. परंतु तें खाण्यापूर्वी देवसंतर्पण यथाविधि करण्याचा संकल्प करून, विश्वामित्रानें ऐंद्राग्नेयविधीनें चरु कढविला व निरनिराळ्या देवांना व पितरांना भाग देण्यास आरंभ केला. पण इंद्रादि देवांना भाग देतांक्षणींच, इंद्रानें पर्जन्य पाडिला, प्रजांचे प्राण वांचले, वनस्पती उगवल्या व दुष्काळाचा वळसा टळला; या गोष्टीवर येथें कटाक्ष आहे. २. प्रजाजनांचा न्याय; अर्थात् प्रजाजनांच्या उत्पन्न झालेल्या तंट्यांची योग्य तडजोड करणें. न्यायकारभार. ३. राजधर्मानें, नीतीस अनुसरून. ४. जो नय. ५. सत्+गति+कीर्ति+अर्थ=मोक्ष व यश यांच्या प्राप्तीस्तव. ६. गंगापुत्रानें, भीष्माचार्यांनें. ७. दक्षिणायनामध्यें वैकुंठाचीं द्वारें लाविलेलीं असतात, त्यामुळें दक्षिणायनांत मरण आल्यास, प्राणी कितीही पुण्यवान् असला, तरी त्यास वैकुंठप्राप्ति होत नाहीं व म्हणूनच भीष्माचार्य हे दक्षिणायन संपून उत्तरायण सुरू होईपर्यंत शरशय्येवर प्राणोत्क्रमण न होऊं देतां राहिले होते. मागें गीति ८ 'होतांचि उत्तरायण' इ० भीष्मोक्ति पहा. ८. चंदन+घृत+सत्+अंबर+आदि=चंदन, तूप, उत्तम वस्त्रें इत्यादि. ह्या गोष्टी अंत्यविधीच्या वेळीं लागतात. गीति १५, १६, व १७ यांचें विशेषक असल्यामुळें एकच अन्वय करावा. द्वाभ्यां **युग्म**मिति प्रोक्तं त्रिभिः श्लोकै**र्विशेषकम्** । **कलापकं** चतुर्भिः स्यात्तदूर्ध्वं **कुलकं** स्मृतम् ॥ ९. आज्याचे राज=तुपाचे अधिपती (असे अग्नी). पाठभेदः—राजराजाचे.

गेला पाय पहाया गुरुवत्सल[1] धर्मराज आज्याचे[2]. ॥ १७
जाऊनि कुरुक्षेत्रीं त्या श्रीभीष्मासमीप तो पावे; ।
श्रीव्यास नारद निकट[3] ज्याच्या, ज्यांहीं पुंमर्थ[4] ओपावे[5]. ॥ १८
नानादेशसमागत[6] नृपतिमुनि न वदति निकट लेश, तशा ।
पाहे, गमे पिपीलिक त्या गुडराशीस चिकटले शतशा. ॥ १९
उतरुनि[7] धर्म नमी त्यां; जे विपुल[8] अलिप्त, जेविं गगन, मुनी; ।
वदला विनयें ऐसें श्रीगंगानंदनासि मग नमुनी. ॥ २०
"तो[9] हा नमितो, वदतो, पढविशि तूं मनुजदेव कीरा ज्या; ।
आला असे पहा तो, जो प्रसवलि तनुज देवकी, राजा ! ॥ २१
सस्त्रीक[10] ज्येष्ठ तनय[11] आला आहे, कनिष्ठही[12] राया ! ।
नेत्रें उघडूनि पहा राजेंद्रा ! सुज्ञमुकुटहीरा[13] ! या. ॥ २२

---

१. वडील माणसांच्या ठायीं निष्ठा ठेवणारा. २. आजोबाचे, भीष्माचे. ३. नारदादिकांनीं. ४. धर्मार्थकाममोक्ष हें चतुष्टय. ५. द्यावे. ६. सार्थान्वयः—नानादेशसमागत (अनेक देशांतून आलेले) नृपतिमुनि (राजे व ऋषि) [ज्या] निकट लेश (किंचितही) न वदति, तशा [शरपंजरीं पडलेल्या भीष्माला] (धर्मराज) पाहे, [व] [त्यास] गमे (=वाटे, वाटलें) [कीं] त्या गुडराशीस (भीष्माचार्यरूप गुळाच्या ढेपीस) शतशा (शेंकडों) पिपीलिक (मुंगळे) चिकटले. गुळास जशा मुंग्या लागतात, त्याप्रमाणें ह्या सर्वज्ञात्या भीष्माचार्यांजवळ गोळा झालेला नृपगण व मुनिवृंद धर्मराजास दिसला. ७. वाहनावरून उतरून. ८. येथें 'विपुल' व 'अलिप्त' हे शब्द श्लिष्ट आहेत. विपुल=(१) (गगनपक्षीं) अमर्याद, विस्तृत; (२) (मुनिपक्षीं) विशाल दृष्टीचे किंवा अंतःकरणाचे, ज्यांचे विचार किंवा नजर कोती नाहीं असे. अलिप्त=(१) (गगनपक्षीं) सर्वव्यापी, परंतु कोणत्याही पदार्थांत न मिसळणारें. (२) (मुनिपक्षीं) संसारांत राहणारे, परंतु विषयाधीन किंवा काम्य कर्मांत गुंतलेले नाहींत, असे. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायांत भगवद्भक्तांचीं लक्षणें सांगतांना हीच उपमा योजिली आहे व 'विपुल' व 'अलिप्त' याच अर्थी त्यांनीं अनुक्रमें 'व्यापक' व 'उदास' हे शब्द वापरले आहेतः—व्यापक आणि उदास । जैसें कां आकाश। तैसें जयाचें मानस । सर्वत्र गा ! ॥ (ज्ञानेश्वरी, अ० १२, ओंवी १८०.) ९. सार्थान्वयः—ज्या कीरा (पोपटास) तूं मनुजदेव (नरपति) पढविशि (बोलावयास शिकविलेंस), तो हा (मी धर्मराज) नमितो [व] वदतो. पोपटास जें शिकवावें तें ज्याप्रमाणें तो जसेंच्या तसेंच बोलतो त्याप्रमाणें भीष्माचार्यांनीं जें जें शिकवावें, तें तें अगदीं बरोबर वठविणारे धर्मराज होते. १०. गांधारीसहवर्तमान. ११. धृतराष्ट्र. १२. कनिष्ठही [तनय]=विदुर. धृतराष्ट्र व विदुर हे भीष्माचे पुतणे, व म्हणून मुलांसारखे होत. १३. विद्वानांच्या मुकुटमणे, सुज्ञश्रेष्ठा.

भीम, **सिताश्व**, **नकुळ**, **सहदेव** तुझे नमिति पाय; हेमा[1] जी ।
न म्हणे तवचरणरजोधिक, करिती नमन माय हे माजी. ॥ २३

नृप, मुनि, **कुरु**[2], जांगळ[3]जन, **दे**[4]वर्षिहि, पातला असे **व्यास**; ।
आले सेव्य तरुकडे द्विजे[5] जेविं, त्यजुनियां असेव्यास[6]. ॥ २४

हे ऋत्विक् सर्व तुझे आले घेऊनि अग्नि समयास; ।
साहित्य सकळ केलें श्री**कृष्णें**, हें सुचेल न **मयास**[7]. ॥ २५

नेत्रें उघडुनि राजा[8]! आम्हां सर्वांकडे पहा, बोल; ।
तव[9]वचनामृतपानीं झाले आहेत कर्ण हे लोल[10]." ॥ २६

उघडुनि नयनें **भीष्म**[11], प्रेक्षुनि सर्वांकडे, म्हणे '**धर्मा**! ।
आलासि बरा समयीं[12], वत्सा! मी बहुत पावलों शर्मा[13]. ॥ २७

सित[14] पक्ष[15], **माघ** कीं हा? शरशयनीं बहुत जाहलों कष्टी, ।
बापा! वर्षशतांसम[16] म्यां द्व्यूना[17] रात्रि कंठिल्या षष्टी[18]. ॥ २८

---

१. सार्थान्वयः—जी हेमा (सुवर्णास) तव चरणरजोधिक (तुझ्या चरणधूळीपेक्षां अधिक) न म्हणे [=जिला तुझ्या पायधूळीपुढें सुवर्ण कःपदार्थ वाटतें] [ती] हे माजी (माझी) माय (कुंती) नमन करिती (वंदन करीत आहे). स्त्रीजातीस स्वभावतःच सुवर्ण व अलंकार ह्या गोष्टी अत्यंत प्रिय असतात, तेव्हां स्त्रिया व त्यांच्या प्रियवस्तु ह्यांचा उल्लेख करण्याचे प्रसंगीं पंत ह्याच संबंधाच्या उपमा व दृष्टान्त वारंवार योजितात. (मागें अ० ७ गीति ९० पहा.) २. कुरुदेश किंवा सर्व कुरुकुलोत्पन्न जन. ३. जंगलांतील रहिवाशी. ४. नारद. ५. पक्षी. ६. आश्रय करण्यास अयोग्य अशास. ७. मय हा असुरांचा शिल्पकार (=कारागीर). मयासुर हा अत्यंत कल्पक होता, असें असून, त्याच्याही ध्यानांत ज्या गोष्टी आल्या नसल्या, त्या सर्व गोष्टींची तयारी श्रीकृष्णांनीं केली. ८. भीष्माचार्या! ९. तुझ्या भाषणरूप अमृताचें प्राशन करण्यांत. १०. ज्यांना चट लागली आहे असे, उत्सुक. ११. पाठभेदः—भीष्में. १२. वेळेवर. १३. सुखातें. १४. शुद्ध किंवा शुक्ल पक्ष, पहिला पंधरवडा. १५. माघ महिना. १६. शंभर वर्षांप्रमाणें. १७. द्वि+ऊना=दोहोंनीं उण्या, कमी. द्व्यूना षष्टी=दोन कमी साठ. १८. साठांमध्यें दोन कमी म्हणजे ५८ रात्री भीष्माचार्यांनीं शरपंजरीं पडून घालविल्या. भीष्माचार्य माघशुद्ध अष्टमीस निजधामास गेले. त्यापूर्वी ५८ दिवस ते शरपंजरीं होते व भारतीयुद्धांत प्रथम दहा दिवसपर्यंत ह्यांच्याकडे सेनानायकत्व होतें; ह्यावरून भारतीयुद्धास आरंभ जाहल्यापासून ६८ दिवसांनीं ह्यांचा काल झाला. तेव्हां, भारतीयुद्धास केव्हां आरंभ झाला हें ह्यावरून ठरविण्याजोगें आहे. प्राचीन विषयजिज्ञासूंस हातीं घेण्याजोगा हा विषय आहे व ज्योतिषीवर्गासही, 'चांद्रमास किंवा सौरमास धरून त्या मानानें अधिक महिन्याची व्यवस्था लावणें, तसेंच भारतीयुद्धास प्रारंभ झाल्यादिवशीं असणाऱ्या शुभाशुभ मुहूर्तांची चर्चा करणें, व भारतीयुद्धापासून आजपर्यंत लोटलेल्या काळाचें परिगणन करणें व त्यावरून ग्रहांमध्यें पडलेला फरक पाहणें इत्यादि' गोष्टींसंबंधानें बारकाईनें शोध करण्यास, हें चांगलें साधन आहे.

वत्सा! **धृत**राष्ट्रा! तूं ज्ञाता, तुज पाठ चारही वेद, ।
भावि[1] कदापि चुकेना, आतां कांहीं करूं नको खेद. ॥ २९
तुजला देव[2]रहस्य **व्यास**ापासुनि असे विदित राजा[3]! ।
सत्सूक्ति[4] सेविल्या त्वां, न[5] मिळाव्या संसृतींत[6] इतरा ज्या. ॥ ३०
हे **पांडु**चे जसे सुत, धर्में[7] तसेचि सर्व तव राया! ।
गुरुवत्सल[8] **धर्म**, समज अचळत्वें तुल्य पर्वतवरा या. ॥ ३१
चिंतामणिची[9] तापा जसि न, करुनि शर्महानि, दे शाला, ।
सत्संगति तसि; न तुझ्या उल्लंघिल **धर्म** हा निदेशाला[10]. ॥ ३२
पुत्र[11] न ते अतिदारुण खळ **त**क्षक सर्प पाकवणवेच; ।
तच्छोकें तेजाचा, सुज्ञ असुनि, करिल बा! कवण वेच?' ॥ ३३
इतुकें **धृत**राष्ट्राला सांगुनि, मग त्यांसि[12] **आ**[13]पगातनय ।

---

१. होणारें, घडून येणारें. २. देवांची गुप्त गोष्ट. ३. धृतराष्ट्रा! ४. उत्तम उपदेश. ५. मिळण्याजोग्या नाहींत, दुर्मिळ आहेत. ६. संसारामध्यें. जो सदुपदेश अन्यजनांस ह्या संसारयात्रेंत सहसा लाभण्याजोगा नाहीं, असा भाव. ७. धर्मशास्त्रदृष्ट्या हे पांडव जरी वस्तुतः पांडूचे पुत्र, तरी धर्मशास्त्रानुरोधानें हे तुझेही आहेत; कारण, तुला पाणी देण्याचा अधिकार धर्मशास्त्रानें ज्याप्रमाणें तुझ्या पुत्रांस प्राप्त होतो, त्याप्रमाणें ह्या पांडवांसही आहे. ८. सार्थान्वयः–धर्म गुरुवत्सल (वडिल माणसांचे ठायीं आदरबुद्धि ठेवणारा) [आहे]; अचलत्वें (स्थैर्यामुळें, पक्षीं धर्मनियमबाह्य आचरण न करण्याच्या दृढनिश्चयावरून) या (ह्या धर्मराजास) पर्वतवरा (पर्वतश्रेष्ठाच्या, मेरुपर्वताच्या) तुल्य(बरोबरीचा) समज. ९. सार्थान्वयः–जसी चिंतामणिची शाला (=घर, इमारत), तसी सत्संगति, शर्महानि (=सुखाचा भंग) करुनि तापा न दे. चिंतामणि हा सर्व चिंता–इच्छा–पुरविणारा मणि आहे. तेव्हां जी इमारत या मणींनीं रचिली आहे, तींत राहणाऱ्याला सुखभंग व संताप हे कधींच शिवणार नाहींत; आणि या सुख देण्याच्या कामांत सत्संगतिही (=सज्जनाचें सान्निध्य, मैत्री) अगदीं हुबेहूब तशीच आहे, हा भाव. अर्थसादृश्यः–(१)प्रीति प्रभुची, चिंतामणिची जसि सर्व ^काम दे शाला. ॥ मोरोपंती अश्वमेधपर्व, ६।१३८. (२) देती स्त्रियांसि सुख पति जाउनि येऊनि जेविं देशाला । श्रीमुनिकरुणा चिंतामणिरचिता सर्व तेविं दे शाला ॥ मोरोपंती आश्रमवासिपर्व, ६।१६. पाठभेद । 'चिंतामणि चिंता या जसि न करुनि' इ०. १०. आज्ञेला. ११. सार्थान्वयः–ते (तुझे मुलगे) पुत्र न; (त्यांस पुत्र म्हणतांच येत नाहीं. कारण 'पुंनाम नरकात्त्रायतेऽसौ पुत्रः' 'पुं'नामक नरकांतून सुटका करणारा तो 'पुत्र' होय). [ते] अतिदारुण, खळ तक्षक सर्प पाकवणवेच (परिणामीं शुद्ध दावानला-प्रमाणें) [होत]; बा! (हे धृतराष्ट्रा) तच्छोकें (त्यांच्याविषयीं शोक करून) कवण (कोण) सुज्ञ (शहाणा) असूनि, तेजाचा वेच (हानि, नाश) करील? पाक=परिणाम. १२. श्रीकृष्णास. १३. गंगापुत्र, भीष्माचार्य.

नमि, [1]ज्याचे रिपु बसले ज्यासह होऊनि आप गात नय. ॥ ३४
[3]'चालाया, बोलाया देसी जीवांसि तूंचि दे[2]वाद्या ! ।
पुतळीस सूत्रधारक कीं वादक शक्ति जेविं दे वाद्या. ॥ ३५
पांडव आहेत तुझ्या पदरीं, म्यां [4]रीति म्हणुनि नि[5]रवावे. ।
[6]आप्तत्व तुजपुढें बा त्रिजगज्जनका ! कशास मिरवावें ? ॥ ३६
मज [7]भक्तवत्सला ! त्वां आज्ञा द्यावी [8]शरीर सोडाया, ।
[9]देसीलें तूंचि, सुकृत न माझ्या पदरांत सुगति जोडाया ? ॥ ३७
[10]हा घेतो जेणें तव नाम, परा मुख न वासु देवा तें. ।
[11]मागेन, भजन सोडुनि, दुसरें तुज सुख न वासुदेवातें. ॥ ३८
[12]उक्त न करुनि, सुयोधन दुर्मति बुडवुनि घरा, बुडालाच. ।

---

१. सार्थान्वयः—ज्याचे (=ज्या कृष्णाचे) रिपु (शत्रुवर्ग) ज्यासह (=ज्या कृष्णासह) आप (=आप्त) होउनी, नय (वर्तन, रीति) गात (स्तवीत) बसले. कृष्णाचे वैरीसुद्धां आपल्या दृढ विरोधी भक्तीनें मुक्त होऊन त्याचे आप्त होऊन बसले, या गोष्टी येथें संधेय आहेत. सर्वसंग्रहाची 'आप' यावर 'उदक, थंड असा भाव' अशी टीप आहे. २. आदिदेवा! ३. सार्थान्वयः— सूत्रधारक (कळसूत्रें चाळणारा) पुतळीस (=बाहुलीस) कीं (किंवा) वादक (वाजविणारा) वाद्या जेविं शक्ति दे, [तेविं] देवाद्या! तूंचि जीवांसि (प्राणिमात्रांस) चालाया बोलाया [शक्ति] देशी. 'चालाया' व 'बोलाया' हीं दोन्ही जीवास लागू होतात, परंतु त्यांपैकीं एकेकच अनुक्रमें 'पुतळी' व 'वाद्य' यांस लागू होतें. आंग्ल कविशिरोमणी शेक्स्पीयर ह्यांनीं आपल्या विख्यात ह्यामूलेटनामक नाटकांत पांचव्या अंकांत अलगुजाविषयीं असेंच ह्मटलें आहे. ४. शिष्टाचार. ५. द्यावे, घालावे. ६. आप्तत्व मिरवावें=नात्याबद्दल डौल, फुशारकी मारावी. तूं जगत्त्रयाचा पिता आहेस व पित्याइतकी मुलाची कळकळ करणारा दुसरा नाहीं; तेव्हां पांडवांच्या हिताची कळकळ तुझ्यापेक्षां माझी काय असणार, असा भीष्मोक्तीचा भाव. ७. भक्तांच्या वाली. ८. देह ठेवण्यास. ९. अन्वयार्थः—तूंचि सुगति देसील (=कृष्णा! तूंच मला सुगति दिलीस तर दिलीस) [नाहीं तर ती मला कांहीं मिळणार नाहीं,] [कारण] सुगति जोडाया (=मोक्ष मिळविण्यापुतें) सुकृत (=पुण्य) माझ्या पदरीं न. १०. सार्थान्वयः—हा (=मी भीष्म) जेणें (ज्या मुखानें) तव नाम घेतों, तें मुख परा देवा (=इतर देवांजवळ) न वासू (=न वेंगाडू, याचना न करू). कृष्णा! तूं मजवर कृपा करच. ज्या तोंडानें मी तुझें नाम जपतों, त्याच तोंडानें इतरांजवळ याचना करण्याचा प्रसंग न येवो; त्यांत तुला व मला दोघांनांही हीनत्व आहे, हा भीष्माचा भाव. ११. अन्वयः—तुज वासुदेवातें (=तुझ्याजवळ) भजन सोडुनि (भजनाव्यतिरिक्त) दुसरें सुख न मागेन. १२. सार्थान्वयः—दुर्मति (दुष्टबुद्धि) सुयोधन, उक्त न करुनि (तूं सांगितल्याप्रमाणें न वागून; किंवा योग्य आचरण न ठेवून) घरा बुडवुनि (कुलाचा नाश करून) [स्वतः] बुडालाच; ज्या कलशाच्या (घागरीच्या) बुडालाच (तळाशींच) घरा (छिद्र) [आहे], तो (तो कलश) सद्रसा (उत्तम पातळ पदार्थास, पाणी दूध वगैरेंस) कसा धरील?

धरिल कसा सद्रस तो, ज्या कलशाच्या घरा बुडालाच? ॥ ३९
व्यासेंहि **ना**रदेंही तूं मजला [1]**म**धुरिपो! [2]केळविलास, ।
[3]तन्हिच तुजपुढें शत्रुश्रीचे दुर्जयहि पोकळ विलास. ॥ ४०
नारायणा! त्वदाज्ञा होतां हा, [4]'जेविं मंडपा वेल, ।
उत्तमलोकासि तुझा सेवक, हो[5]ऊनि थंड, पावेल.' ॥ ४१
[6]**कृ**ष्ण म्हणे, 'या लोकीं, म्हणसी होवूनि सज्ज, न वसूं; तें, ।
रुचलें; जा पाव सुखें **भी**ष्मा! तूं सुज्ञ सज्जन **व**सूंतें. ॥ ४२
या लोकीं तुज काहीं **शां**तनवा! लेश[7]मात्र [8]अघ नाहीं, ।
[9]**का**मशरांहीं भिन्न प्रभु तूं, वज्राद्रि जेविं न घनांहीं. ॥ ४३
मार्कंडेय तसा तूं पितृभक्त, मुनींद्र वर्णिती बा! हे, ।
यास्तव मृत्यु तव [10]वशीं [11]आनत होऊनि [12]भृत्यसा आहे.' ॥ ४४

---

१. मधुनामक राक्षसाचा वध करणाऱ्या, श्रीकृष्णा! २. गीतीचा भावार्थः—तूं कोण ही ओळख व्यास, व नारद ह्यांसारख्या महर्षींनीं मला करून दिली; अर्थात् तुझा मोठेपणा, व तुझी ओळख सामान्य जनास होण्याजोगी नाहीं; ह्यावरून अशा ह्या तुजपुढें कोणाचेंही कांहीं चालणार नाहीं, ह्या निघणारा ध्वनि पंतांनीं उत्तरार्धांत 'तन्हिच=म्हणूनच' अशा शब्दानें स्पष्ट व्यक्त केला आहे. ३. सार्थान्वयः—तन्हिच (म्हणूनच) दुर्जयही (=जिंकण्यास कठिण अशा) शत्रुश्रीचे (शत्रूंच्या लक्ष्मीचे) विलास तुजपुढें पोकळ (व्यर्थ) [आहेत]. टीपः—'शत्रुश्री' असा शब्द घातल्यामुळें स्त्रीस्वभावानुरूप ज्या चेष्टा त्या व्यक्त व्हाव्यात म्हणून 'विलास' असा शब्द योजिला आहे. ४. उत्तम लोक ह्या मृत्युलोकाच्या वर आहे, ह्या संकेतास अनुसरूनच ही उपमा दिली आहे. वेलाची गति नेहमीं वर जाण्याची असते. ५. शरीरसंताप व मानसिक दुःख ह्यांपासून मुक्त होऊन किंवा प्राणज्योती विझून. (वेलाच्या पक्षीं) पाण्यानें गार होऊन. ६. सार्थान्वयः—कृष्ण म्हणे, सज्ज होवूनि (आत्मलोकीं जाण्यास तयार झाल्यावर), या लोकीं (मृत्युलोकीं) न वसूं (न राहावें) [असें जें] म्हणसि, तें रुचलें (मला आवडलें); [हे] भीष्मा! तूं सुज्ञ (शाहणा) [व] सज्जन (साधु, सत्पुरुष) जा (इहलोक सोड) [व] वसूंतें सुखें (आनंदानें) पाव. आठ वसूंपैकीं तिसरा जो सोम त्यास शाप झाल्यामुळें तो गंगेच्या उदरीं भीष्मरूपानें अवतरला होता, म्हणून त्यास कृष्णानें इहलोक सोड व 'वसूंतें पाव' असें म्हटलें आहे. ७. थोडेंसुद्धां. ८. पातक. तूं पापापासून अलिप्त आहेस. ९. अन्वयार्थः—जेविं वज्राद्रि (हिऱ्याचा पर्वत,) घनांहीं [भिन्न न], [तेविं] तूं प्रभु (समर्थ) कामशरांहीं भिन्न न. भीष्माच्या अढळ शुकमारुतितुल्य ब्रह्मचर्यावर येथें लक्ष्य आहे. वज्र—हिरा—घणांच्या घावांनीं फुटत नसतो. 'हिरा ठेवितां ऐरणीं। वांचे मारितां जो घणीं॥ तोचि मोल पावे खरा। करणीचा होय चुरा.॥ (तुकाराम). १०. आधीन. ११. नम्र. १२. चाकराप्रमाणें. तूं बापाच्या वरानें इच्छामरणी झाला आहेस, हा गीतीचा भाव. शांतिपर्वांत कृष्णानें भीष्माच्या पितृतोषणाचा व इच्छामरणाचा असा उल्लेख केला आहेः—"तूं छंदमृत्यु शंतनुवरदानेंचि प्रभो! महाभागा!! हें छंदमृत्युकारण पितृतोषण मजहि न घडलें बा! गा! (मोरोपंती शांति० ७।२९.)

आज्ञा देतां देवें, भीष्मा प्रति[1]पाल्य जे सदा [2]वपुसे, ।
पांडव, धृतराष्ट्र, विदुर सर्व सुहृद्वर्ग जे, तयांस पुसे. ॥ ४५
परिसा हो! सर्व तुम्ही, मागतसे भीष्म हा निरोपातें; ।
'लोभ[3] न देवू सत्वा, दे जेविं ग्रीष्म हानि रोपातें. ॥ ४६
र[4]क्षुनि शुद्धयशातें मेळवितें जेविं सत्य, यश तातें ।
तेविं न मेळविलें; हो! हेंचि करी दूर अत्ययशतातें. ॥ ४७
भू[5]तीं दया असोंद्या; व्हा इंद्रिय[6]षडरिनिग्रहीं धीट; ।
सोडुनि अन्य पथ धरा निज[7]धर्माचारमार्ग हा नीट[8]. ॥ ४८
चैतन्य[9] सम[10] पहावें, गुरु लघु देहें दिसो [11]करी [12]कीट. ।
ब्राह्मणसत्काराचा येवूं देवूं नका मनीं [13]वीट.' ॥ ४९
कथुनि असें, आलिंगुनि धर्मासि, पुन्हा सरिद्वराज[14] म्हणे, ।
"बा! प्राज्ञ[15] गुरु[16] ब्राह्मण पूजावे त्वां सदैव राजमणे[17]!" ॥ ५०

---

१. पालन करण्यास योग्य. २. शरीराप्रमाणें. प्राणिमात्राचें प्रेम आपआपल्या शरीरावर असून तो जितकी त्याची जोपासना करितो, तितकी दुसरी कशाचीही करित नाहीं. भीष्माचार्यांस पांडव, धृतराष्ट्र, विदुर हे आपल्या शरीराप्रमाणें अत्यंत प्रिय होते, असा भाव. ३. सार्थान्वयः—जेविं ग्रीष्म (उन्हाळा) रोपातें (नवीन लाविलेल्या वृक्षास) हानि (नाश) दे, [तेविं] लोभ (मायामोह) सत्वा (उत्तम गुणास) न देवू (देवो). लोभानें सत्वाची हेळसांड न होवो. ४. सार्थान्वयः—रक्षुनि (=रक्षण करून) जेविं सत्य शुद्धयशातें (=उत्तम लौकिकाला, सत्कीर्तीला) मेळवितें, तेविं [आपल्या मुलांना रक्षुनि] तातें यश न मेळविलें; हो! हेंचि (=सत्यच) अत्ययशतातें (=शेंकडों संकटांना) दूर करी. रक्षण करण्याच्या कामांत बापाची तर प्रसिद्धी आहेच, पण सत्याची त्यावरही कडी आहे. शेंकडों संकटें गुदरलीं असतां बाप हात टेंकील व आपलें रक्षणकर्तव्य करण्यास असमर्थ होईल; परंतु सत्य अनेक घोर संकटांतूनही लोकांस सुरक्षित पार पाडितें. सर्वसंग्रहपाठः—रक्षुनि शुद्धयशातें मेळविलें इ०. ५. प्राणिमात्रावर. ६. इंद्रिय+षट्+अरि+निग्रहीं=इंद्रियें व कामक्रोधादि जे सहा शत्रु त्यांचें नियमन करण्यांत. इंद्रियदमन व षडरिजय ह्यांसारखी दुर्घट गोष्ट दुसरी नाहीं, तेव्हां येथेंच अंगचें सामर्थ्य दाखविणें विहित होय. ७. आपल्या धर्माप्रमाणें वर्तन ठेवण्याचा रस्ता. ८. सरळ. ९. परमेश्वराचा अंश. १०. सारखेंच. ११. हत्ती. १२. किडा. अन्वयः—करी [व] कीट देहें (शरीरमानानें) [अनुक्रमें] गुरु (मोठा) [व] लघु (लहान) दिसो; [परि] चैतन्य सम पहावें. ४६ उ० अ०, ४७,४८ व ४९ या साडे तीन गीतींत गीतेचें सार भरलें आहे. १३. तिटकारा. १४. सरित्+वरा+ज=नद्यांमध्यें श्रेष्ठ तिजपासून उत्पन्न झालेला, भीष्माचार्य. १५. शहाणे, विद्वान्. १६. उपदेश देणारे किंवा वडील. १७. राजश्रेष्ठा!

सर्वांसि[1] पुसुनि शांतनुसुत तो राहे मुहूर्तभरि[2] उगला[3], ।
फुगला[4] सुखें, मनांत श्रीकृष्णाच्या धरूनि पदयुगला[5]. ॥ ५१
वंदुनि, चिंतुनि चित्तीं, शांतनवें भक्तवत्सला हरिला, ।
ज्या[6] धारणा, तयांच्या ठाई आत्मा यथाक्रमें धरिला. ॥ ५२
ऊर्ध्व[7] गति प्राणाची करितां आश्चर्य जाहलें मोटें, ।
व्यासप्रमुखमुनींनीं जें पाहुनि घातलीं[8] मुखीं बोटें. ॥ ५३
तो[9] ज्या ज्यातें सोडी तत्काळ विशल्य होय तें अंग, ।
असुंनीं तनुचा तैसा त्या शल्यांनींहि सोडिला संग. ॥ ५४
झालीं क्षणें विशल्यें भीष्माचीं वीररसस[10]सुधापात्रें, ।
कृष्णप्रमुखांचींही झालीं रोमांचितें तदा गात्रें. ॥ ५५
भेदुनि मस्तक आत्मज्योति[11] महोल्कातसी[12] शिरे व्योमीं; ।
मुनि[13] वदले "या तेजीं तें आल्हादप्रदत्व, जें सोमीं". ५६
"करुनि[14] प्रकाश गगनीं, मग नीरधरांत, जेविं सवित्याचें ।
मंडळ, अदृश्य झालें तें आत्मज्योति," म्हणति कवि, "त्याचें." ॥ ५७
क्षत्ता[15], युयुत्सु, पांडव, कृष्णागरु[16]चंदनेंचि आशु चिता ।

१. सर्वांचा निरोप घेऊन. २. क्षणभर. ३. उगा, स्तब्ध, निःशब्द. ४. आनंदानें तरतरला, समाधानानें तट्ट झाला, संतोषानें ओतप्रोत भरला. ५. चरणद्वयाला. ६. अनेक व्यापृति नाहींशी करून एके ठिकाणीं मनाचा लय करण आणि श्वासनिरोध करणें ह्या धारणा होत. भीष्मानें योगक्रमानुसार प्रथम व्यापृति नाहींशी केली, नंतर श्वास निरोध केला व शेवटीं समाधी लाविली. ७. प्राणाची ऊर्ध्व गती करितां=ब्रह्मांडीं प्राण नेला असतां. ८. चकित झाले. 'आंगठे मुखीं धरितों' स्त्रीपर्व अध्याय ६, गीति ६३ पहा. ९. अन्वयः—तो (प्राण) ज्या ज्यातें सोडी, तें अंग तत्काळ विशल्य (शरमुक्त) होय. (निरनिराळ्या अवयवांतून प्राण आकर्षण करून, त्या भीष्मांनीं ऊर्ध्वगति देतांच, ते ते अवयव ताबडतोब दुःखमुक्त व शल्यमुक्त होऊं लागले;) [जैसा] असुंनीं (प्राणांनीं) तैसा शल्यांनींही (ज्या शरशय्येवर आचार्य होते त्या शरांनींही) त्या तनुचा (भीष्माचार्यांच्या शरीराचा) संग (साहचर्य, प्रेम) सोडिला. १०. शौर्यरूप अमृतानें भरलेलीं भांडीं. हें 'गात्रें' ह्याचें विशेषण. भीष्माचें अंग शल्यमुक्त झालें, पण त्याच वेळीं प्रेक्षकांचीं अंगें रोमांचित होऊन, जणूं काय शल्ययुक्तच दिसूं लागलीं, हा गीतीचा भाव. ११. प्राणतेज. १२. आकाशांतून पडणाऱ्या तेजस्वी तारकेप्रमाणें. १३. अन्वयार्थः—मुनि वदले 'जें सोमीं (चंद्राचे ठायीं) तें आल्हादप्रदत्व (=आनंद देण्याचें सामर्थ्य) या तेजीं (=भीष्माचार्यांच्या आत्मज्योतीचे ठायीं) [असे].' १४. अन्वयः—"गगनीं प्रकाश करुनि मग (नंतर) जेविं सवित्याचें (सूर्याचें) मंडळ (बिंब) तेविं तें त्याचें आत्मज्योति (=प्राणतेज) नीरधरांत अदृश्य झालें," [असें] कवि म्हणति. १५. विदुर. युयुत्सु=धृतराष्ट्राचा दासीपुत्र. १६. काळ्या रंगाच्या अत्यंत सुवासिक चंदनाच्या काष्ठांनीं.

उचिता रचिती, त्या श्रीगांगेयाची तसीच बा! शुचिता[१]. ॥ ५८
रत्नकनकगंधांबरमाल्यांहीं **भी**ष्मदेह तो भावें[२] ।
धर्म, **विदुर** शोभविती; जेणें[३] सुकृतें उगेंचि शोभावें. ॥ ५९
ज्या पाहुनि मृत्यु म्हणे, 'देतो मज, करुनि हा तप, त्रास'; ।
त्या[४] प्रभुवरी धरी **धृ**तराष्ट्रसुत **युयुत्सु** आतपत्रास[५]. ॥ ६०
जे[६] झाले माराया ज्या शस्त्रव्रातदातयावरि, ते ।
उडविति धवळें चवरें **भीमा**र्जुन बा! तदा तयावरि ते. ॥ ६१
ज्याचे[७] सुतापसां गुण, कटक जसे सेव्य नुत **हि**माद्रीचे, ।
त्या प्रभुचीं उष्णीषें धरिती सप्रेम सुतहि **मा**द्रीचे. ॥ ६२
स्त्रीवातस्पर्श[८] नसे **गं**गेवांचुनि जयास; परि वारा ।
कौरवपतिस्त्रिया[९] सुव्यजनें[१०] ढाळिति[११] तया सपरिवारा[१२]. ॥ ६३
बहु सामगान[१३] झालें; वाटे[१४] शोभा तसी न यज्ञांत, ।

१. पवित्रता. २. भक्तिपुरस्सर, आवडीनें. ३. अन्वय:—जेणें (=ज्या देहानें) सुकृतें (=पुण्यसंचयाचेच जोरावर) उगेंचि (सहज) शोभावें. पुण्यसंचयानें प्राप्त झालेली भीष्माचार्यांची तेजस्विता इतकी होती कीं त्यांचें प्राणोत्क्रमण झाल्यावरही त्यांचा देह तेजस्वी दिसत होता. तेव्हां रत्नकनकादिकांची त्यास जरूरी होती असें नाहीं. परंतु धर्मविदुरांनीं आपल्या स्वतःच्या समाधानार्थ ती गोष्ट केली इतकेंच. भीष्मभक्तिभाग्यांत पंत म्हणतात:—अभ्यंतरींच जिरवी उपरम समयांत तो कवि श्वास । झाला, तरि तत्तेजें न धरिति योगीहि लोक विश्वास. ॥ भीष्मभक्ति० १७५. ४. त्या समर्थ भीष्माचार्यांवर. ५. छत्रातें. ६. सार्थान्वय:—जे [भीमार्जुन] ज्या शस्त्र-व्रातदातयावरी (शस्त्रांचा समुदाय टाकणाऱ्यावर—अर्थांत बाणांची वृष्टि करणाऱ्या भीष्माचार्यांवर) माराया झाले (ठार करण्यास धावले) ते[च] (भीमार्जुन) तयावरी (त्या भीष्माचार्यांवर) तदा (=अंत्यविधीच्या वेळीं) धवळें चमरें (शुभ्र चवऱ्या) उडविती (ढाळूं लागले). ७. सार्थान्वय:—ज्याचे नुत (प्रशंसित) गुण, जसे हिमाद्रिचे (हिमालय पर्वताचे) नुत (वाखाणिलेले) कटक (कडे), [तसे] सुतापसां (तपस्विवरांस) सेव्य (ग्रहण करण्यास योग्य; पक्षीं आश्रय करण्यास योग्य) [होते], त्या प्रभुचीं (त्या भीष्माचार्यांचीं) उष्णीषें (मुकुटादि विशेष खुणेच्या वस्तु) माद्रीचे सुतहि (नकुल व सहदेवसुद्धां) सप्रेम (आनंदानें) धरिती. ८. स्त्रियांच्या वाऱ्याचा स्पर्श, स्त्रियांचा यत्किंचित् संबंध. ९. कौरव राजांच्या स्त्रिया, भरतस्त्रिया. १०. उत्तम पंख्यानें. ११. ह्या क्रियापदाचें कर्म पूर्वार्धांतील 'वारा' हें नाम होय. १२. मुलांबाळांसह. ह्यावरून भीष्माचार्य हे ब्रह्मचारी असूनसुद्धां मुलांबाळांवर त्यांचें किती प्रेम होतें व त्यांजवर ह्यांचें किती प्रेम होतें हें व्यक्त होतें. १३. सामाचें पठण, सामवेदाचें म्हणणें. १४. जे धर्मज्ञांत (धर्मशास्त्र पारंगत असणाऱ्यांमध्यें) [व] नयज्ञांत (न्यायामध्यें तरबेज असणाऱ्यांमध्यें) वर (श्रेष्ठ) [असे] नारदादि (नारदप्रभृति) जेथें, [त्या] यज्ञांत तशी (भीष्माचार्यांच्या अंत्यविधीच्या वेळीं जशी होती तशी) शोभा न वाटे. 'जेथें' ह्या ऐवजीं

कीं **नार**दादि जेथें, वर धर्मज्ञांत जे **नय**ज्ञांत. ॥ ६४
करुनि [1]पुरावा कृष्णागरुकर्पूरादिपुण्यगंधाचा, ।
[2]संस्कारिला यथाविधि देह चिताग्नींत [3]सत्यसंधाचा. ॥ ६५
[4]अपसव्य करुनि सर्वहि **धृ**तराष्ट्रप्रमुख सज्जन चितेतें, ।
वाटे **गं**गेंत करिति [5]यज्ञांतावभृथमज्जनचि ते तें. ॥ ६६
गांगेयास **व्या**सें, **गं**गोदक **नार**दें दिलें, **अ**सितें, ।
[6]तेणेंहि, सुगति पाउनि, अरि बहु वर्णिति जयाचिया असितें. ॥ ६७
विश्व [7]धवळिलें जेणें स्वयशांहीं चंद्ररश्मिगौरांहीं, ।
त्यासि [8]भरतभार्यांहीं सतिल जल दिलें, तसेंचि [9]पौरांहीं. ॥ ६८
प्रगटे जलदानाच्या [10]अवसानीं [11]भूषणास्यरुचिरहिता, ।
करि [12]परिदेवन [13]दीना **दे**वनदी [14]**ना**रदादिमुनिमहिता. ॥ ६९
ती रोदन करित म्हणे, "[15]**भा**रतहो! भूपहो! अहो! मुनिहो! ।
[16]वाटे न जपुनि, न तपुनि, न नमुनि, कोण्ही श्रमी न होमुनि हो. ॥

'तेथें' असा पाठ घेतल्यास असा अन्वय करितां येईल—वाटे, तशी शोभा यज्ञांत [ही] न; कीं (कारण) जे धर्मज्ञांत व नयज्ञांत वर [ते] नारदादि तेथें (भीष्मांच्या अंत्य संस्काराचे ठिकाणीं) [होते].

१.पुरवठा. २.भीष्माचार्यांच्या मृतदेहास धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें यथासांग मंत्राग्नि दिला, असा भाव. ३.सत्य (=खरी) प्रतिज्ञा ज्याची अशाचा, बोलणें खरें करणाऱ्याचा, भीष्माचार्यांचा. ४. उलटी प्रदक्षिणा घालून. ५. यज्ञ+अंत+अवभृथ+मज्जन=यज्ञसमाप्तीनंतर जें स्नान करितात तें. हें स्नान अंत्यविधीच्या वेळीं केलें होतें तरी अवभृथासारखें भासलें; एकंदरींत त्या महात्म्याचा अंत्यविधि म्हणजे एक पवित्र यज्ञच भासला, असा भाव. ६. अन्वयार्थ:—तेणेंहि (=त्या कृष्णानेंहि) [गांगेया गंगोदक दिलें], जयाचिया असितें (=ज्या कृष्णाच्या तरवारीला) अरि (=शत्रुसुद्धां) सुगति पाउनि (=मुक्ति लाभून) बहु वर्णिती (=अत्यंत स्तवितात). (मागें, गीति ३४ पहा.) ७. शुभ्र केलें. ८. भरतकुलांतील स्त्रियांनीं. ९. नगरवासी लोकांनीं. पौरजनांनीं भीष्माचार्यांस जलाञ्जलि दिला, ह्यावरून त्यांनीं जनानुरञ्जन किती केलें होतें, हें व्यक्त होतें. १०. समाप्तीच्या वेळीं. ११.भूषण+आस्यरुचि+रहिता=अलंकार व मुखावरील टवटवी हीं दिसत नाहींत जिच्या ठायीं अशी. हें 'देवनदी (=गंगा)' या शब्दाचें विशेषण. १२. रोदन. १३. कष्टी झालेली. १४. नारदप्रभृति ऋषिगणांनीं स्तविलेली. १५. भरताच्या कुलांत उत्पन्न झालेल्यांनो! १६. अन्वयार्थ:—वाटे, कोणी जपुनि श्रमी न हो (=कोणीही जपविधि करून श्रमी न होवो, जप करून पुण्यसंचयार्थ कोणींही कष्ट करूं नये), तपुनि श्रमी न हो, नमुनि श्रमी न हो, [व] होमुनि (=होम हवन करून) श्रमी न हो. [कारण एवढे श्रम करून पुण्यसंचय केला, म्हणजे शेवटीं सुख प्राप्त होतें, मनुष्याचा अंत आनंदमय होतो असें मुळींच नाहीं. पहा, भीष्म एवढा पुण्यवान् होता तरी पण अखेर त्याचा अंत शत्रूच्या कपटानें हालांतच झाला ना? हा गंगेचा भाव].

जो [1]शुद्धराजवृत्तें संपन्न, धनेंकरूनि [2]यक्षपसा; ।
[3]कोणीहि कवि धराया ज्या न, जसा पारदास दक्ष पसा; ॥ ७१
[4]प्रज्ञेनें [5]वाक्पतिसा, संपन्न जसा महामुनि [6]यमांनीं; ।
[7]मणिंनीं [8]शेषशिरोगणसा साजे जो सदा [9]सुनियमांनीं; ॥ ७२
[10]सादर सदा गुरूंचें वृद्धांचें जो [11]संभाजन कराया, ।
ज्या [12]तें [12]विशोभवी बहु, जेविं कवींची सभा जनकराया; ॥ ७३
[13]वदले सुज्ञ, ‘त्रिजगीं जोडा गुरुभक्त ज्या न पहिल्याला;’ ।
जो गुरुभक्तिरुचिस रवि, परगुरुभक्तित्वचेस अहि त्याला; ॥ ७४
[14]अरिकटकझषकुळीं, स्वव्यसनतमीं, जो महाव्रत तिमि, रवी; ।
ज्याच्या प्रसूपुढें नच यश अमृतफळा महाव्रतति मिरवी. ॥ ७५

---

१. राजाच्या नात्यानें केलेल्या पवित्र आचरणानें. २. कुबेराप्रमाणें. ३. सार्थान्वयः—जसा पारदास (पाऱ्यास) [धराया] पसा (ओंजळ) [दक्ष] (समर्थ) [न], तसा ज्या (ज्या भीष्माचार्यांस) धराया कोणीही कवि (सुज्ञ, शहाणा) दक्ष न. मोठमोठ्या शहाण्यांच्याही जो हातीं लागणारा नव्हता, असा भाव. गीति ७१–७६ यांत भीष्माचें सुंदर वर्णन आहे. या गीतींतील सर्व संबंधी सर्वनामांचा संबंध ७६ व्या गीतींतील ‘तो (=भीष्म)’ या सर्वनामाशीं आहे. ४. बुद्धीनें. ५. बृहस्पतीसारखा. ६. अहिंसादिक इंद्रियदम त्यांनीं. ७. रत्नांनीं. ८. शेष सर्पाच्या मस्तकसमूहाप्रमाणें. शेषास सहस्र शिरें आहेत. तीं जशीं त्यांवरील रत्नांनीं शोभतात त्याप्रमाणें. ९. नियम (=आचारबंधनें) दहा आहेतः—शौचमिज्या तपोदानं स्वाध्यायोपस्थनिग्रहः । व्रत-मौनोपवासं च स्नानं च नियमा दश ॥ १०. सिद्ध, तयार. ११. पूजन, सेवा. १२. तें (=गुरुवृद्धसभाजन) विशेषच शोभा देई. १३. सार्थान्वयः—‘ज्या पहिल्याला गुरुभक्त जोडा (वडिलांच्या ठिकाणीं आदरबुद्धि असणारा असा दुसरा बरोबरीचा मनुष्य) त्रिजगीं न’ [असें] सुज्ञ (शहाणे) वदले. जो [भीष्मरूप] रवि गुरुभक्तिरुचिस (=वडिलांची भक्ति हीच कोणी एक कांति तिला) त्याला (=स्वीकारिता झाला) [व] जो [भीष्मरूप] अहि परगुरुभक्तित्वचेस (=परगुरुभक्तिरूप त्वचेला, विश्वगुरु जो ईश्वर त्याची भक्ति हीच कोणी एक त्वचा=कात तिला) त्याला (=स्वीकारिता झाला). ‘सूर्य जसा कांतिनिधि, तसा जो गुरुभक्तीचा निधि होता; व फक्त सर्पच ज्याप्रमाणें कात अंगावर घालूं शकतो, तद्वत् खरी ईश्वरभक्ति ज्या एकट्यालाच लाभली होती;’ हा या गीत्यर्धाचा भाव. १४. सार्थान्वयः—जो महाव्रत (मान्य आहे व्रत=प्रतिज्ञा किंवा निश्चय ज्याचा असा) अरि-कटक-झष-कुळीं (शत्रूंच्या सैन्यरूप मत्स्यसमूहांत) तिमि (देवमासा) [व] स्वव्यसनतमीं (स्वकीयांच्या संकटरूप अंधकारामध्यें) रवि; अमृतफळा (अमृतफळें प्रसवणारी) महाव्रतति (कल्पलता) ज्याच्या प्रसूपुढें (मातेपुढें) यश नच मिरवि (प्रौढी दाखवीत नाहीं). ‘तिमि’ नांवाचे मोठे मासे लहान लहान माशांस खातात, या गोष्टीवर पूर्वार्धाचा कटाक्ष आहे.

[1]आचार्येंही रामें शस्त्रास्त्रांहीं न जो पराभविला; ।
वधिला शिखंडिनें तो, [2]नवल कसें भंगिलें तृणें पविला! ॥ ७६
हें माझें हृदय मला [3]भारत हो! [4]अश्मसारमय वाटे, ।
परमप्रियपुत्राच्या न विरहशोकेंकरूनि जें [5]फाटे. ॥ ७७
[6]क्षत्र समग्रहि 'हा! हा! करि, हरितां कन्यका, शिरा ज्याच्या ।
तेजें लववी नगरीं, करुनि तुमुल जन्य, काशिराजाच्या; ॥ ७८
ज्यासम बळवान् महिवरि कोणीही ऐकिला न [7]राजन्य; ।
[8]जैसें अमरवरासीं, दुर्घट ज्यासीं तसें नरा जन्य; ॥ ७९
वधिला शिखंडिनें तो, नायकवे सज्जनापयश कानें; ।
[10]शशकानें मथिला हरि, कीं म्हणतां पक्षिपाळ मशकानें; ॥ ८०
जेणें [11]रामगुरु कुरुक्षेत्रीं बहु पीडिला [12]अबहुयत्नें, ।
वधिला [13]क्षुद्रें, [14]कौस्तुभ परिभविला कृत्रिमें कसा रत्नें? ८१

---

१. काशिराजाची मुलगी अंबा इच्या प्रकरणीं प्रतिज्ञाभंग होऊं द्यावयाचा नाहीं ह्याकरितां भी-ष्माचार्यांस प्रत्यक्ष आपल्या गुरूबरोबर म्हणजे परशुरामाबरोबर युद्ध करावें लागलें; व त्यांत त्यांचा आचार्यहस्तेंही पराभव झाला नाहीं, असे हे महायोद्धे होते. २. अन्वयः—तृणें पविला (वज्रास) कसें भंगिलें? हें नवल. प्रत्यक्ष परशुरामाच्या हातून ज्याचा पराभव झाला नाहीं, त्याचा शिखंडीनें पराभव केला; तेव्हां गवताच्या काडीनें वज्राचे तुकडे कसे केले? हेंच आश्चर्य आहे. ३. भरतकुलामध्यें उत्पन्न झालेल्यांनो! ४. लोहमय. ५. तडके. अर्थसादृश्यः—या दुःखपावकें गावलगणि! । मी न पावे जीवित्वहानि । निश्चयें वज्राचें पद्मयोनि । हृदय निर्मी हें संजया! ॥ विष, अग्नि, पर्वतपात। करितां दुःख नव्हे शान्त । अद्यापि मातें कृतान्त । कैसा न भक्षी? संजया! ॥ गोपाळकृत कर्णपर्व, १।१५९–१६०. ६. सार्थान्वयः—काशिराजाच्या नगरीं (राजधानींत) तुमुल जन्य (निकराचें युद्ध) करुनि कन्यका (मुली) हरितां (हरण करून नेत असतां), ज्याच्या (भीष्माच्या) तेजें (सामर्थ्यानें, प्रभावानें) समग्रही क्षत्र (स्वयंवरास आलेले सर्व क्षत्रिय) हाहा करी (हाय हाय करूं लागले) [व] शिरा लववी (माना खालीं घाली). टीपः—अंबा, अंबिका व अंबालिका ह्या मुलींचा स्वयंवर येथें अनुसंधेय आहे. ह्या मुलींचा पिता काशिराज. शुभानंदकृत भीष्मपर्व २३।५४–८८ पहा. ७. राजा. ८. सार्थान्वयः—जैसें अमरवराशीं (देवश्रेष्ठ—इंद्र—त्याजबरोबर) तसें ज्याशीं (भीष्माशीं) जन्य (युद्ध) नरा (मनुष्यास) दुर्घट (करावयास कठीण). गीति ७८ व ७९ ह्यांतील 'ज्याच्या,' 'ज्यासम,' 'ज्यासीं' ह्या संबंधी सर्वना-मांचा संबंध गीति ८० हींतील 'तो' ह्या दर्शक सर्वनामाकडे. १०. अन्वयार्थः—शशकानें (सशानें) हरि (सिंह) कीं (किंवा) मशकानें (माशीनें) पक्षपाळ (गरुड) मथिला म्हणतां. सर्वसंग्रहपाठः—कीं म्हणतो पक्षिपाळ मशकानें. ॥ ११. गुरु परशुराम. १२. सहज, फार श्रम न करितां. १३. दुर्बळ शिखंडीनें. १४. अन्वयः—कृत्रिमें रत्नें कौस्तुभ कसा परिभविला?=खोट्या रत्नाची ताण कौस्तुभ मण्यावर कशी झाली? गीति ७६, ८० व ८१ ह्यांत दिलेले दाखले फारच ठसकेदार आहेत.

[1]तुज वदले पाहुनि तंव साधुसभाजनक विप्र '**शांतनवा** ! ।
कोठें पाहूं करिता साधुसभाजन कवि प्रशांत नवा?' " ॥ ८२
ऐसा विलाप करितां समजावी **वासुदेव गंगे**तें; ।
[2]मन शुद्धबोधदुग्धें क्षाली, शोकेंकरूनि रंगे, तें. ॥ ८३

"[3]देवि! नको शोक करूं; शुद्धयशा तो न तव तनय शमला, ।
श्रुत इतर असें करितें सत्कविवाणीस न वतन यश मला. ॥ ८४
उत्तमलोकासि, यशें श्रोत्यांचा हरुनि ताप, गेला गे! ।
[4]रसिकांसि तव सुतचरित अमृताहुनि गोड [5]**आ**पगे! लागे. ॥ ८५
[6]भद्रे! हा **वसु** येथें शापें होता धरूनि [7]नरतेतें; ।
ठावें तुज, या लोकीं [8]तुच्छ [9]सुखा आदरूनि [10]न रते, तें. ॥ ८६
[11]तदनुमतेंचि करि [12]तुझा हा त्यासीं तेविं जन्य पणतू तें, ।
पुत्राच्या [13]रणमरणें आलें विश्वांत [14]धन्यपण तूतें. ॥ ८७
[15]शुभदर्शने! सुत तुझा **पार्थ**शरांहींच पावला पतन, ।

---

१. सार्थान्वयः–तुज पाहुनि तंव (=पाहतात तों, पाहतांक्षणींच) साधुसभाजनक (=सत्समाजाचे पोषिंदे) विप्र (=ब्राह्मण) वदले, 'हे शांतनवा! (=भीष्मा!), नवा (=तुझ्यासारखा दुसरा) साधुसभाजन (=सत्पुरुषांचें पूजन, साधूंचें आदरातिथ्य) करिता (=करणारा) प्रशांत कवि (=शाहणा मनुष्य) कोठें पाहूं! भीष्मासारखा साधूंस मान देणारा, शांतस्वभावाचा व सुज्ञ दुसरा कोणीच नव्हता, हा ब्राह्मणांचा भाव. २. सार्थान्वयः–शोकें करूनि [जें मन] रंगे (ज्यावर शोकाचा छटा स्पष्ट उमटला होता), तें मन शुद्धबोधदुग्धें (बोधरूपनिर्मल दुधानें) क्षाली (धुवून टाकिता झाला). डाग पडला असतां दूध लावून धुतल्यानें तो जातो हें सुप्रसिद्ध आहेच. गंगा ही स्वभावानें, मनानें व शरीरानें शुभ्र, तेव्हां तिच्या अंतःकरणावर पडलेला शोकरूप डाग श्रीकृष्णानें बोधरूप शुभ्र पदार्थानेंच धुवून टाकिला. ३. सार्थान्वयः–देवि! (हे भगवति! गंगे!) शोक करूं नको; शुद्धयशा (पवित्र आहे यश ज्याचें असा) तो तव तनय न शमला, (मृत झाला नाहीं, अंत पावला नाहीं) [कारण] सत्कविवाणीस (उत्तम कवींच्या वाणीस) वतन (माहेर) करितें (करणारें) असें इतर (दुसरें अर्थात् भीष्माचार्यांच्या यशापेक्षां निराळें) यश मला श्रुत न (माझ्या ऐकिवांत नाहीं). सत्कवींची वाणी भीष्माचार्यांच्या यशाचें वतन आहे म्हणजे त्या वाणीवर ह्या यशावांचून इतर यशांचा हक्कच नाहीं. भीष्माचार्यांच्या कीर्तीहून भिन्न विषयच सत्कविवाणीला नाहीं, असा भाव. टीपः–वतन हा अरबी भाषेंतील आहे व त्यांत ह्याचा अर्थ 'स्वदेश' असा आहे. ४. मार्मिकांस. ५. गंगे. ६. हे कल्याणि! गंगे! ७. मानवपणातें. नरतेतें धरुनि=नरशरीर अंगीकारून. ८. हलक्या सुखांस, तिरस्कारार्ह अशा विषयोपभोगादि सुखांस. ९. मान देऊन, आस्वादून. १०. रममाण होत नाहीं. ११. त्याच्याच संमतीनें. १२. तुझा पणतू अर्जुन. १३. युद्धांत पडण्यानें. १४. मोठेपण. रणामध्यें जो वीर पडतो त्याच्या आईस 'वीरमाता' हें पद प्राप्त होतें. हें फार थोड्यांच्या कपाळीं असतें. १५. कल्याणकारक आहे दर्शन जीचें अशा, गंगे!

'बत'[1]! न म्हणावें, गेलें होतें, तें साधिलें पुन्हा वतन. ॥ ८८
तुज[2] सुत शोक शिखंडी, सिंहीला शश, कधीं न दे वधुनी; ।
विजयहि न वधी; कीं तो मृत्यु तयाच्या अधीन देवधुनी! ॥ ८९
उद्यतबाणा[3] भीष्मा होती शक्राहि शक्ति न वधाया, ।
कीं तव शुचि[4]कुक्षिभवा घडली परमेशभक्ति नवधा[5] या. ॥ ९०
याच्या शराहुनि अधिक तेजस्वी कवि म्हणेल कां पविला? ।
कीं येणें परिभविला पुष्पशरी[6], वज्रपाणि[7] कांपविला. ॥ ९१
जरि देवता समस्ता मिळल्या[8], करित्या[9] रणीं न तच्छमना; ।
कीं तो होता ज्ञाता, साक्षात्[10] स्मर[11]हरतसाचि अच्छमना[12]. ॥ ९२
तो स्वच्छंदें[13]चि तनु त्यागुनि गेला, परें न वधिला, गे! ।
मृत्युवशा[14] मर्महता[15] न मराया बहु असा[16] अवधि[17] लागे. ॥ ९३
प्रसउनि म्हणती, 'वत्सा! आचर[18], होवूनि वीर, सूचित[19] रे'! ।
तुजसारखी सुदुस्तर[20]सुतशोकाब्धींत वीरसूचि[21] तरे[22]. ॥ ९४
प्रसवश्रम[23] भोगुनिही, सुयश न मिळतां, अवीरसूचि रडे; ।
समर[24]हतसुवीरस्तुतसुतशोकभरें न वीरसू चिरडे." ॥ ९५

---

१. सार्थान्वयः—'बत' (हाय!) न म्हणावें, [जें] गेलें होतें, तें वतन (कायमचा हक्क, वसुत्व) पुन्हा साधिलें. भीष्म हा अष्टावसूंपैकीं एक होता, परंतु शापामुळें त्याचें वसुत्व नष्ट होऊन, तो मानव झाला होता. तेव्हां आतां भीष्माला मरण म्हणजे शापमुक्त होऊन हरपलेल्या वसुत्वाचा लाभच होय, हें उघड आहे. २. अन्वयः—सुत वधुनी, शिखंडी तुज [व] शश (=ससा) सिंहीला कधीं [ही] शोक न दे. [हे] देवधुनी! तो विजयही [तुझा सुत] न वधी; कीं (कारण), तयाच्या (भीष्माचार्यांच्या) मृत्यु अधीन (=तो इच्छामरणी होता). ३. सज्ज केले आहेत बाण ज्यानें अशाला. ४. तुझ्या पवित्र कुशीपासून जन्म झाला आहे ज्याचा अशा याला. ५. नऊ प्रकारची. भक्तीचे नऊ प्रकार येणेंप्रमाणें आहेत:—श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन. ६. मदन. हें 'परिभविला' ह्याचें कर्म. ७. इंद्र. ८. एकत्र झाल्या असल्या. ९. तच्छमना रणीं न करित्या=त्याला मारूं न शकल्या. शमन=मृत्यु. १०. प्रत्यक्ष. ११. शंकराप्रमाणेंच. १२. शुद्ध अंतःकरणाचा. १३. स्वतःच्या इच्छेनें, आपण होऊन. १४. मर्त्यास, मरणाधीनाला. १५. नाजुक जागीं ज्याला घाय लागले आहेत अशाला. १६. भीष्माचार्यांस लागला त्याप्रमाणें. १७. वेळ, काळ. १८. आचरण कर. १९. सु+उचित=अत्यंत उचित अशा प्रकारें. २०. खडतर अशा पुत्रशोकसमुद्रांत. २१. वीरमाताच. २२. पार पडून जाते. अन्वयः—'रे! वत्सा [मुला] वीर होवूनि, सूचित आचर' [असें] प्रसउनि (=जन्म देऊन) म्हणती (=मुलाला म्हणणारी) तुजसारखी वीरसूचि दुस्तरसुतशोकाब्धींत तरे. २३. जिचे पुत्र वीर निपजत नाहींत, तिला प्रसववेदना होतात त्या होऊन, शिवाय अपयश पदरीं येऊन, तिला सर्व जन्म रडण्यांतच काढावा लागतो; अर्थात् तिला दुहेरी दुःख होतें. २४. रणागणीं पडलेले व महायोद्ध्यांनीं स्तविलेले अशा पुत्रांच्या शोकानें वीरमाता विव्हल होत नाहींत. कारण शूरास योग्य असेंच पुत्राचें रणमरण पाहून त्या दुःख विसरतात.

व्यासहि म्हणे, "विशोका[1] हो, तो पडला सुखांत **वसु** नाकीं, ।
[2]**वसु**भार्या म्हणती 'प्रियकर' **पार्थ**शिलीमुखां तव सुना कीं." ॥ ९६
श्रीम[3]त्**कृष्णो**क्ति करी त्या **गंगे**च्याहि दूर शोकातें, ।
[4]जी पापताप वारुनि, निववितसे कीर्तनेंहि लोकातें. ॥ ९७
आज्ञा देउनि, घेउनि ती शिरली निजसुतारक[5] वनांत, ।
त्याचि कथेचा आला कांहींसा या उ[6]तार क[7]वनांत. ॥ ९८
रामसुत **मयूर** म्हणे झाल्यां रसिकांसि प[8]सरुनी पदर, ।
[9]'मी तुमच्या अमृतकरें, गरुडें पावे न जेविं नीप दर. ॥ ९९
सज्जन माले देवू संग, जसा **गरु**ड दे कदंबातें; ।
[10]देणें मीच न, गाइल बहु नाकीं मत्पिता मदंबा तें.' ॥ १००

---

१. शोकहीन, शान्त. २. गंगापुत्र भीष्म हे वसूचे अंश होत. तेव्हां वसूच्या भार्या गंगेच्या सुना झाल्या हें उघड आहे. अर्जुनाच्या बाणांनीं आपलें हित झालें असें वसुस्त्रियांनीं म्हटलें तें योग्यच आहे; कारण, त्यांयोगें भीष्माचार्य मृत होऊन पुन्हा वसुरूप झाले; व त्यामुळें त्या भार्या पतिवियोगदुःखापासून मुक्त झाल्या; पार्थशिलीमुखां=अर्जुनाच्या बाणांना. ३. कृष्णोक्ति=कृष्णांची उक्ति, वासुदेव व व्यास या दोन कृष्णांची. ४. गंगा. ५. उद्धार करणाऱ्या अशा आपल्या उदकांत. ६. उतारा, प्रतिबिंब, प्रतिमा. ७. कवितेंत, काव्यांत. ८. हात जोडून, विनंति करून, नम्रपणें. कवि नेहमीं रसिकांची प्रार्थना करितात तें योग्यच आहे, कारण रसिकांवांचून त्यांच्या कवितेची प्रसिद्धि होणें शक्य नाहीं. ९. सार्थान्वयः—मी तुमच्या अमृतकरें (=अमृतासारख्या करानें; कृपाहस्तानें) दर (भीति) न पावेन, जेविं नीप (कदंबवृक्ष) अमृतकरें (=अमृत आहे ज्याच्या हातांत अशा) गरुडें [दर न पावे]. इंद्रलोकाहून अमृत हरण करून येत असतांना, गरुड यमुनातीरीं एका कदंब वृक्षावर जरा विसाव्यासाठीं बसला. तेव्हां कांहीं अमृतबिंदू पडून तो कदंबवृक्ष अमर झाला. पुढें कालियाच्या विषानें यमुनेंतील सर्वजीव व तीरावरील वनस्पती नष्ट झाल्या, तरी हा कदंबवृक्ष तीरावर कायमच होता. याच वृक्षावरून कालियामर्दनाच्या वेळीं कृष्णानें यमुनेंत उडी मारिली. गरुडाच्या आश्रयानें अमर झालेल्या कदंबवृक्षावर या व पुढील गीतींत कवीचा कटाक्ष आहे. यासंबंधें पुढील वामनी श्लोक वाचनीय आहेत—"थोर एकचि कदंब तटाकीं, त्यावरून उडि **अ**च्युत टाकी ॥ २५ जाळणार विष जीवकदंब, जाळवे न तरु तोचि कदंब; । त्यावरी अमृतबिंदु गळाला, जाळवे न तरु तोचि खळाला. ॥ २६ ने जईं **वि**हगराज सुधेतें, पावला **गरु**ड त्या वसुधेतें । त्या तरूवर तईं बसला हो! घे तईं तरुसुधारसलाहो. ॥ २७ (हरिविलास, १.) १०. सार्थान्वयः—तें देणें [तें दान] मीच न (मीच केवळ नव्हे तर), मत्पिता व मदंबा (=माझी आई) नाकीं बहु गाईल. आपण दिलेल्या सत्संगाची जोड पाहून माझ्या आईबापांस स्वर्गी फार समाधान होईल व ह्या उपकाराबद्दल ते आपली स्तुती गातील. या गीतीवरून एवढें सिद्ध होतें कीं आर्याभारताचें अनुशासनपर्व पुरें होण्याच्या पूर्वीच मोरोपंतांचीं मातापितरें स्वर्गस्थ झालीं होतीं.

१. मोरोपंती अनुशासनपर्वांवरील
शुद्धाशुद्ध, मुख्यमुख्य अलंकार, पाठभेद व टीपा यांचें परिशिष्ट.

पृष्ठ.	पद्य.	टीप.
१	४	**काव्यलिंग.**
२	७	पू० अ०—**निदर्शना.** हिचें **उपमेंत** पर्यवसान होत आहे.
,,	१०	उ० अ०—**पर०रूपक.**
३	१२	उ० अ०—'पूज्यहि पूजिसि मज' यांत **विरोधाभास** आहे. 'एक तुझें यशचि, गांग न वलक्ष' ही **परिसंख्या.** अनेक पदार्थांमध्यें प्रसंगानुरूप एक पदार्थ निवडून, त्याज्य पदार्थांचा गर्भित किंवा उघड निषेध केला असला, म्हणजे हा अलंकार होतो.
,,	१३	**विरोधाभास.**
,,	१६	'**भैष्मी** तसि' ऐवजीं '**भैष्मीतसि**' पाहिजे.
,,	१७	उ० अ०—**प्रतीप.**
,,	१८	उ० अ०—**परिसंख्या.**
४	१९	उ० अ०—श्लेषमूलक **व्यतिरेक.**
,,	२४	पू० अ०—'कच वक्र होणें' ही लोकोक्ति.
,,	,,	उ० अ०—येथें प्रतिरोधक गुणसामग्री असतांही 'चक्राचें वृथा होणें' हें कार्य घडलें आहे, म्हणून **विभावना.**
५	२६	उ० अ०—**काव्यार्थापत्ति.**
,,	३१	'शिव' याच्या आवृत्तीमुळें **यमक.**
६	३२	**अर्थान्तरन्यास.**
,,	३३	**वृकासुर** ऊर्फ **भस्मासुर** यानेंही अशाच प्रकारें तप केलें होतें:—होम करी सा दिवस, स्वकरें शस्त्रें स्वमांस तीं कापी; । पापी निष्ठुरता त्या करुणानिधिच्या शिरावरी स्थापी. ॥ कृष्णविजय, अ० ८८, गी० १०.
७	४०	**असंभव.**
,,	४१	**विरोधाभास.**
,,	४३	येथील उत्तर अर्धावर एका हस्तलिखित पोथींत अशी टीप आहे:—देव कर्मांतें म्हणे, 'जरी मजकरवीं भक्तासि अंतर देववाल, तरी सिंधुकरवीं सैंधवखिल्यातें—सैंधवाच्या खड्यातेंही—अंतर देववाल. तुमचें बळ मजपुढें काय?
८	४७	पू० अ०—योग्य पाठ:—दुरितक्षयार्थ सत्कवि **ज्या** साध्वीचें इ०.

पृष्ठ.	पद्य.	टीप.
८	४८	पू० अ०-'त्यजितां श्रीमद्त्रि' ऐवजीं 'त्यजिता श्रीमद्त्रि' पाहिजे. 'त्यजिता' हें संकेतार्थी तृतीयपुरुषीं एकवचनीं रूप आहे. त्यजिता=सोडता तर.
,,	५०	'त्रिलोकी पतिस' ऐवजीं 'त्रिलोकीपतिस' पाहिजे.
,,	५३	'नववर्ष शतें' ऐवजीं 'नववर्षशतें' पाहिजे.
९	५८	पू० अ०-**यमक.**
,,	५९	उ० अ०-**असम.**
,,	६१	**दृष्टान्त.**
१०	६३	**परिकर;** कारण 'एकमुख' हें विशेषण सहेतुक आहे.
,,	५	'पोषलि' 'शोषलि' हें **आद्ययमक.**
११	६	पू० अ०-**विरोधाभास.**
,,	११	उ० अ०-**विषम.**
१२	१३	उ० अ०-**काव्यार्थापत्ति.**
,,	१४	पूर्वार्ध व उत्तरार्ध यांस जोडणारें **दामयमक.**
,,	१८	**अर्थान्तरन्यास.**
१३	२३	**काव्यलिंग.**
,,	२५	**अप्रस्तुतप्रशंसा.**
१४	१	या पद्याचा टीपांतील अर्थान्वयापेक्षां पुढील अर्थान्वय अधिक सरळ दिसतो:-उपमन्यु म्हणे, 'जेवीं ग्रीष्मीं तृषिता पांथा दाखविला (दाखविलेला) तोयाचा देश (तळें, नदी, विहीर वगैरे जेथें आहे असें स्थळ) [हितकर, तेवीं] तो जननीचा उपदेश याचा (माझा, उपमन्यूचा) हितकरी [झाला].
,,	४	**विभावना.**
१५	५	**उत्प्रेक्षागर्भ चेतनगुणोक्ति.**
१६	१२	पू० अ०-**प्रतीप.**
,,	१४	**निदर्शना.** धर्मामध्यें बिंबप्रतिबिंबभाव असून वाक्य एक असल्यास 'निदर्शना' व वाक्यें निरनिराळीं असल्यास 'दृष्टान्त'-(अलंकारमीमांसा).
,,	१५	'वरदराज' हें विशेषण हेतुगर्भ असल्यामुळें **परिकर.**
,,	१८	**दृष्टान्त.**
१६-१८	१९-२८ व २५-२८	**अनुज्ञा.** ज्या ठिकाणीं दोषाचें गुणत्वानें वर्णन करून त्याचा स्वीकार-पत्कर-केला असेल, त्या ठिकाणीं अनुज्ञा अलंकार होतो.

पृष्ठ.	पद्य.	टीप.
१८	३२	**निरुक्ति.** कोणत्याही वस्तूच्या नांवाचें यथार्थत्व दाखविलें असतां हा अलंकार होतो.
,,	३३	पू० अ०–**समुच्चय.**
१८-१९	३४	**दृष्टान्त.**
२०	४४	**परिसंख्या.**
२१	४८	**दृष्टान्त.**
,,	५०	
,,	५२	
२२	५५	**भ्रांतिमान्.**
,,	५७	पू० अ०–**भ्रांतिमान्.**
,,	५८	उ० अ०–**प्रतीप.**
२३	५९	उ० अ०–'ग डीते' ऐवजीं 'गडी ते' पाहिजे. **विरोधाभास.**
,,	६०	**व्यतिरेक.**
,,	६१	**स्वरूपनिदर्शना.**
,,	६२	पू० अ०–**व्यतिरेक.** उ० अ०–**काव्यार्थापत्ति.**
,,	६३	पू० अ०–**व्यतिरेक.**
२३-२४	६४	**दृष्टान्त.**
२४	६७	**मीलित.** एकाच समान गुणानें युक्त असणाऱ्या दोन किंवा अधिक वस्तूंपैकीं एकीच्या ठिकाणीं त्या गुणाचें स्वभावतः प्राबल्य असल्यामुळें, ती वस्तू बाकीच्यांस झांकून टाकीत आहे असें वर्णन असलें, म्हणजे हा अलंकार होतो.
२५	७०	उ० अ०–**विरोधाभास.**
,,	७४	उ० अ०–**अतिशयोक्ति.**
२६	७५	उ० अ०–**उत्प्रेक्षा.**
,,	७६	उ० अ०–**परिकर.**
२७	८२	उ० अ०–**रूपकातिशयोक्ति.**
,,	८५	**अतिशयोक्ति.**
,,	१	उ० अ०–'शंकरा' ऐवजीं '**शंकरा**' पाहिजे.
२८	५	पू० अ०–**अश्वधाटीयमक.**
,,	५-८	उ० अ०–**यमक व अनुप्रास.**

पृष्ठ.	पद्य.	टीप.
२८	८	'भर्गा' ऐवजीं 'भर्गा!' पाहिजे.
,,	७-८	**अप्रस्तुतप्रशंसा.**
२९	९	**व्यतिरेक.**
,,	११	उ० अ०-**विरोधाभास.**
,,	१२	उ० अ०-**विरुद्धगुणन्यास.**
३०	२०	उ० अ०-**काव्यलिंग.**
३२	३०	**दृष्टान्त.**
,,	३५	**व्यतिरेक.**
३३	३८	**स्वभावोक्ति.**
,,	३९	योग्य पाठः-करमस्तकचि न, शिवले क्षितिस **म्हणत** 'नमन हो बरें' गुडघे;॥ यांत **तुल्ययोगिता** नामक अलंकार आहे. एकाच क्रियेचे अनेक संबंधी सर्वच प्रस्तुत किंवा अप्रस्तुत असल्यास हा अलंकार होतो. येथें तीन्ही संबंधी-कर, मस्तक व गुडघे हे-प्रस्तुत आहेत. उ० अ०—**अतिशयोक्ति.**
३४	४१-४५	**उदात्त.**
३५	५२	उ० अ०-**विभावना.**
३६	५४	उ० अ०-योग्य पाठः-'शोभो **बहुमुनिपद** हें' इ०. पाठभेदः-'**बहु मुनिवदाश्रमपद** त्वां द्विजराजें इ०'.
,,	५५	प्रिया=इष्ट गोष्टींना.
,,	५८	**दृष्टान्त.**
,,	५९-६१	**अर्थान्तरन्यास.**
३७	६५	**अर्थान्तरन्यास.**
,,	६६	**काव्यलिंग.** उ० अ-योग्य पाठः-बुडतां उद्धार करी **क्षितिचा** दंष्ट्रेंकरून **कोलेश.** अन्वयः-[क्षिति] बुडतां, कोलेश दंष्ट्रेंकरून क्षितिचा उद्धार करी.
,,	६९	उ० अ०-**परिसंख्या.**
३९	३	**व्यतिरेक.**
४०	११	पू० अ०-**विरोधाभास.**
,,	१२	पू० अ०-**व्यतिरेक.**
४१	,,	उ० अ०-**काव्यलिंग.**

पृष्ठ.	पद्य.	टीप.
४१	१५	उ० अ०–येथें एका जुन्या हस्तलिखित पोथींत अशी टीप आहेः–मुहूर्त झाले, सरतेही झाले.
४२	२०	**अर्थान्तरन्यास.**
४३	२५	उ० अ०–**उत्प्रेक्षा.**
,,	२६	उ० अ०–**अधिक**; कारण, येथें आधेय जें यश, तें आपला आधार जें ब्रह्मांड त्याहून मोठें आहे, असें वर्णिलें आहे.
,,	२७	उ० अ०–**विभावना.**
४४	३४	उ० अ०–**श्लेषमूलक उत्प्रेक्षा.**
,,	३५	**व्यतिरेक.**
४५	४२	उ० अ०–**परिसंख्या.**
,,	४३	उ० अ०–**अप्रस्तुतप्रशंसा.**
,,	४४	पू० अ०–**सहोक्ति.** 'ताल तोडणें' हा शब्दसमूह मुक्तेश्वराच्या कौतूहल रामायणांत आढळतोः–पदें नृत्यरंगीं मनोभाव मोडी। कळाभिन्न भेदा गती ताल तोडी. ॥ बालकांड ८.
४६	४९	उ० अ०–पाठभेद.—पुरतिल तुझ्या न वजनाही. ॥ **व्यतिरेक.**
,,	५०	**समाधि.** ज्या वेळेस कांहीं अनपेक्षित कारणामुळें कष्टसाध्य कार्यही सुकर झालें असें वर्णन असलें म्हणजे 'समाधि' अलंकार होतो. प्रस्तुत प्रकरणीं 'प्रभूच्या चरणीं व स्तवनीं शिरेन' असें कृष्णाचें मन उत्सुकतेनें म्हणत होतेंच व तदर्थ खटपटही करीत होतें; तों इतक्यांत शंकरानेंच प्रसाद केल्यामुळें तें इष्ट कार्य सुकर झालें आहे.
४७	५५	उ० अ०–**अतिशयोक्ति.**
,,	५६	**वस्तुप्रतिवस्तूपमा.**
,,	५७	**अर्थान्तरन्यास.**
४८	६१	उत्तरार्धांतील **उपमा** मोठी चटकदार आहे.
,,	६२	उ० अ०–हस्तलिखित प्रतींतील टीपः–सुखेंकरून परदेशस्मरणदुःख राहत नसतें.
४८-४९	६४-६७	श्रीकृष्णानें मागितलेले वर सात्विक वृत्तीचे द्योतक आहेत.
४९	६८	**परिसंख्या.**

पृष्ठ.	पद्य.	टीप.
४९	७१	'बारसें' हा मुलाचें नांव ठेवण्याचा विधि व समारंभ होय. हा बाराव्या दिवशीं करण्यांत येतो, म्हणून यास 'बारसें' म्हणतात.
,,	७२	पू० अ०–**चेतनगुणोक्ति.** 'पाठ पुरवणें' ही **लोकोक्ति.**
,,	७३	'तत्सुतसुतसंभवांनीं' याचा अर्थ ब्रह्मदेवाचा नातू जो **कश्यप** त्याच्या मुलांनीं–अर्थात् सर्व विश्वानें–असा घेणें बरें. ब्रह्मदेवाचा मुलगा मरीचि व त्याचा मुलगा कश्यप. महाभारतादि ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं यानें अदिति व बारा दक्षकन्या यांबरोबर विवाह केले. याला अदितीपासून बारा आदित्य झाले; व इतर पत्न्यांपासून विविध प्रजा झाली. अशा प्रकारें कश्यप हा देव, दानव, मानव, नाग, पशुपक्षी, नक्षत्रें इत्यादिकांचा—किंबहुना सर्वच प्राण्यांचा—जनक आहे. म्हणून याला **'प्रजापति'** असेंही नांव देण्यांत येतें.
५०	७८	**प्रतीप.**
,,	८३	**अर्थान्तरन्यास.**
५२	१०	'धर्मा' ऐवजीं 'धर्मा !' पाहिजे.
५२-५३	१०-१४	**अप्रस्तुतप्रशंसा.**
५२	११	**दृष्टान्त.**
५२-५३	१२	वामनपंडितांनीं जरेचें वर्णन असें केलें आहे:–जरा म्हातारपण । सकळ शक्ति होती क्षीण । जाती नेत्र जाती श्रवण । वाणी काय मग दु:खासी? ॥ दन्तविहीन वदन । नाकास हनवटी संघट्टन । माज वांकला, व्रन । हांसती चालतां. ॥ कांपती उठतां चरण । मळमूत्रें भरे आस्तरण। स्त्रीपुत्र दासदासी तयां शरण । जीं स्वशासनें वर्तविलीं. ॥ यथार्थदीपिका, १३।६२७-६२९.
५३	१३	कोयेमध्यें गुप्तरूपानेंही असणारें तत्त्व जर कोंबांत व्यक्त होतें, तर स्त्रियांच्या ठिकाणीं ठळक रीतीनें दिसून येणारा जो लाजवटपणा, तो त्यांच्या पोटीं जन्म घेणारांच्या अंगीं उत्पन्न झालाच पाहिजे; अशी या गीतींतील विचारसरणी भासते.
,,	१५	हस्तलिखित प्रतींतील उत्तरार्धावरील टीप:–'जें इष्ट, तें वदा; आयतें असे. न्या ऐसें म्हणत्या वदान्यातें मागितलें.'
,,	१६	**काव्यलिंग.**
५४	१९	उ० अ०–**विभावना.**

पृष्ठ.	पद्य.	टीप.
५४	२१	**प्रहर्षण.** यत्नाशिवाय किंवा अल्पयत्नानेंच अपेक्षितार्थाची सिद्धि झाली, किंवा अपेक्षितापेक्षां अधिक अर्थाची प्राप्ति झाली, किंवा फलप्राप्तीसाठीं प्रयत्न करितांक्षणींच फललाभ झाला, तर हा अलंकार होतो.
,,	२४	**परिसंख्या.**
५५	२६	'पापा न शिव खळांच्या' याचा अन्वय व अर्थ असा करावा:–'खळांच्या पापा शिव न'='दुष्टांच्या पापकृत्यांना कल्याण कधींहि लाभत नाहीं; त्यांना त्यांचें दुष्ट फळच लाभणार.' असा अर्थ केला म्हणजे या गीतीच्या अर्धांचा क्रम उलट आहे, असेंही भासत नाहीं. शिव=कल्याण, हित.
,,	२८	**अर्थान्तरन्यास.**
,,	३२	येथें **कूट** किंवा **क्लेश** हा शब्दालंकार आहे. अक्षरांची बेरीज किंवा वजाबाकी करण्यांत आली म्हणजे हा अलंकार होतो. "देशी कवींमध्यें मोरोपंताचा कधीं कधीं 'क्लिष्ट' कवितेकडे कल दिसतो. तरी मोरोपंती 'क्लिष्ट' काव्य आणि संस्कृतांतील 'क्लिष्ट' काव्य, या दोहोंमध्यें जमीन अस्मानाचें अंतर आहे. संस्कृतांतील कूटें फोडतां फोडतां हातास फोड मात्र येतात, कारण आंतील अर्थ प्रायः भिकार व नीरस असतो. मोरोपंती 'क्लिष्ट' काव्य नारळासारखें समजावें; कारण फोडतांना जरी कधीं कधीं हातास थोडे श्रम झाले, तरी प्रायः पाणी प्यावयास आणि खोबरेंही खावयास सांपडतें." (प्रो० रा० रा० भागवतकृत अलंकारमीमांसा, पृ० ५६-५७).
५६	३९	**काव्यलिंग.**
५७	४०	उ० अ०–**स्वरूपनिदर्शना.**
,,	४२	**अर्थान्तरन्यास.** वर्णनसादृश्यः–पुत्रा! वर माग; तुला द्यावें म्यां काय गा! यशोधीतें? ॥ जाणसि, जें प्रेम, मुखें वत्साचा काय गाय शोधी, तें. ॥ मोरोपंती वनपर्व २।१०९.
५८	४७	पू० अ०–**विशेषोक्ति.** कारण असून कार्योत्पत्ति झाली नाहीं, म्हणजे हा अलंकार होतो.
५९	५५	पू० अ०–'अनराते' ऐवजीं 'अनराते!' पाहिजे.
,,	५६	'पाहे हाही पसरुनि' ऐवजीं 'पाहे हाहि पसरुनी' हा योग्य पाठ. 'पदर पसरणें' ही **लोकोक्ति.**
६०	६३	उ० अ०–**निदर्शना.**
६१	६९	उ० अ०–**संभावना.**

पृष्ठ.	पद्य.	टीप.
६१	७०	पू० अ०–**सहोक्ति.**
,,	७४	**यमक.**
६२	७७	उ० अ०–**उत्प्रेक्षा.**
,,	८०	उ० अ०–**निदर्शना.** हिचें पर्यवसान **उपमेंत** होतें.
,,	८४	पू० अ०–**सार.**
६३	८६	उ० अ०–**दामयमक.**
,,	८७-८८	**विरोधाभास.**
,,	९०	**व्यतिरेक.**
६४	९४	**श्लेष व अर्थान्तरन्यास.**
६६	९	उ० अ०–**परिसंख्या.**
,,	१३	उ० अ०–**परं०रूपक.**
,,	१५	उ० अ०–**विशेषोक्ति.**
६८	२८	उ० अ०–**व्यतिरेक.**
,,	२९	**दृष्टान्त.** पूर्वार्धांत 'नांवाचे' याचा संबंध 'निजले' या क्रियापदाकडे घेऊन 'नांवाचे [ही] निजले न' म्हणजे 'नांवालाही निजले नाहींत; जागे का असेनात, परंतु नुसते आडवेही झाले नाहींत' असा अर्थ होऊं शकेल.
६९	३१	**विभावना व विरोधाभास.**
,,	३५	पू० अ०–**विरोधाभास.**
७०	३८	पू० अ०–**व्यतिरेक.**
,,	३९	पू० अ०–**तुल्ययोगिता.** 'सुरतरुसि सखा न म्हणों देति' यांत **व्यतिरेक** आहे.
,,	४३	**दृष्टान्त.**
७१	४४	**रूपक.**
,,	४९	**विषम.**
,,	५०	**विरोधाभास.**
७२	५२	**परं०रूपक व विषम.**

पृष्ठ.	पद्य.	टीप.
७२	५३	**प्रतीप.**
,,	५४	उ० अ०—**विषम.**
,,	५५	**उत्प्रेक्षा.**
७२-७३	५६	**परं०रूपक** व **उत्प्रेक्षा** यांचा संकर.
७३	५७	**निदर्शना.**
,,	६२	**अप्रस्तुतप्रशंसा.**
७४	७०	**निदर्शना.**
७५	७३	**अर्थान्तरन्यास.**
७६	८०	पू० अ०—**अपह्नुति.**
,,	८२	**दृष्टान्त.**
७७	९०	**दामयमक.** उ० अ० **विरोधाभास.**
,,	९१	**विरोधाभास.**
८०	६	**अप्रस्तुतप्रशंसा.**
८१	८	उ० अ०—**पर्यायोक्ति.**
,,	९	उ० अ०—**व्यतिरेक.**
८२	१३	**परं०रूपक.**
८३	१९	**उत्प्रेक्षा.**
८४	२६	**काव्यलिंग.**
८५	२९	**काव्यलिंग** व **अर्थान्तरन्यास.**
,,	३१	श्लेषमूलक **उपमा.**
,,	३२	पू० अ०—**अपह्नुति.** उ० अ०—**प्रश्न:**
८६-८७	३९	**दृष्टान्त.**
८७	४३	**काव्यलिंग.**
८८	४७	**व्यतिरेक.**
८९	५३	'मुखीं बोटें घातलीं' ही **लोकोक्ति.**
,,	५४	**तुल्ययोगिता.**
९०	५९-६३	**विरोधाभास.**

पृष्ठ.	पद्य.	टीप.
९१	६८	पू० अ०—तद्गुण.
,,	७०	उ०अ०—अप्रस्तुतप्रशंसा.
९२	७४	उ० अ०—मालापरं०रूपक.
,,	७५	उ० अ०—व्यतिरेक.
९३	७६	उ० अ०—असंभव.
,,	७७	काव्यलिंग.
,,	८०	असंभव.
९५	९४	अर्थान्तरन्यास.
,,	९५	अप्रस्तुतप्रशंसा.
९६	९६	विरोधाभास.

२. मोरोपंती अनुशासनांतील सुभाषितांचें परिशिष्ट.

१. समुचित होय **वदान्या** परमवदान्यालयीं धनन्यास. ॥ १–६१.

२. **मातेतें सदपत्य** प्रिय बहुतचि, सुमधु जेविं भुंगीतें. ॥ २–१८.

३. साचें कीं चित्रींचें वद **शिशुच्या** तृप्तिचें जनक थान ? ॥ ३–१८.

४. भूपें कुसुम दिलें बहु **मानधना,** सेवकें नको चवर. ॥ ३–५०.

५. शीतकर थोर गणिला, उष्णकर कधीं लहान, कोकांहीं ? ॥ ३–५२.

६. अत्युग्राहि हेरीचा बा! बाळक जो अनुग्र हरि त्यातें. ॥ ३–६४.

७. 'दुष्टे !, हित साधूं दे, धरिसी कोंडूनि कां मना ? **लाजे** !'
ऐसें म्हणति, त्यजिती निपटुनियां सर्व कामनांला जे, ॥
तें जोडिलेंचि **भावें स्तउनि,** नव्हे जें विनाशि वस्तु, तिंहीं. ॥ ४–२,३.

८. [**शंभो**!] अंभोद हितहि परि भारी चातकास करकांहीं ।
आवरिति जोडिलेहि न त्या सुजडा घातकास कर कांहीं. ॥ ४–७.

९. [**भर्गा** ! स्वर्गागम जड; यद्यपि ते आश्रितासि शोभविती, ।
क्षोभविती कामांतें, बहु अर्पुनि विषय चित्त लोभविती. ॥ ४–८.

१०. घेणें रुचतें, परि बा ! **देणें** न रुचे कधींहि वाणीचें. ।
जें **अल्पदान,** नोहे प्रभुस प्रभुयाचकासही शुभ तें, ॥ ४–५९,६०.

११. [कीं] परमार्थपरां **तप** 'मीच' म्हणे 'हित, न सांचवा मास.' ॥ ५–१९.
परमार्थेच्छु कवण बुध न करिल **सुतपीं** शुभावहायास ? ॥ ५–२०.

१२. वाटे **गानीं** तैसी कोणाहि रसांत मधुरता नाहीं. ॥ ५–४३.

१३. चंद्र चकोरीं द्रवतां विश्वाचे सर्व ताप हरपावे. ॥ ५–५६.

१४. तो काय जन ? जयाच्या धन्यत्वें हर्षली प्रसू नाहीं. ॥ ५–५७.

१५. **धर्मा**! नावडती **सुत,** सुंदरहि कदापि, जे न कोविद; रे ! ।
तैसेचि पंडितहि, परि बापा ! कोणासही नको विद्रे. ॥ ६–१०.
नसतां शांत, सुताचें बहु तापचि दे वपु; त्रपाकारी ।
काय न अदांत **कश्यपमुनिसि** तसा देव पुत्र **पाकारी.** ॥ ६–११.
झाले प्राप्त विपुलगुण सुत; तत्संबंधयोग परि टांचा, ।
तो तैसा लज्जाकर, जेविं परपटोपभोग परिटांचा. ॥ ६–१४.

१६. सर्वहि सद्गुण सोडुनि जातात तया नरा, **जरा** ज्याला, ।
आटे प्रबळारिचमूशत मथिल्या ही न राजराजाला. ॥ ६–१२.

१७. पुरुषास कानकोंडेपण बा ! करितांचि **बायको** येतें, ।
न दिसे तरुत्व म्हणवुनि गेलें सोडोनि काय कोयेतें ? ॥ ६–१३.

१८. सारत्व सुखें येतें **भगवद्भजनें** भवा असारा या. ॥ ६–२८.
परमेश्वरपदभजनें सकळहि पुरुषार्थ सुलभ या लोकीं. ॥ ६–८२
इतरें असो कसातरि आचरणें, सर्वथा भवीं तरतो, ।
जो **परमेश्वरभक्त,** व्यक्त महामुनिसमान बा! नर तो. ॥ ६–८५.
प्रभुसि मनेंचि **शरण** जे गेले, ते सर्व अमलनय नाकीं ।
सेविति सुरस महित सुरसम हित होवूनि [कमलनयना!] कीं. ॥ ६–८६.
मारिल तृषितां, न मिळों देउनि, फोडुनि तडाग, तोय, जना, ।
पापें लिप्त नव्हे, बा! **प्रभुच्या** जरि काय **करिल तो यजना.** ॥ ६–८७.
१९. **प्रेम** बहु चाटवाया कीं लावी इतर हुंगवायास. ॥ ६–४२.
२०. अहि ज्यांत, त्या गृहीं बा! धृति काय [अरातिसूदना!] वांचे? ॥ ७–२९
२१. नक्षत्रांसि असो, परि विधुचा संकोच कायसा रविला? ॥ ७–४३
२२. कष्टीं धर्माचरणीं श्वशुरानें योजितां स्वदयितातें, ।
पाहूं, वारूं, न शके जाणों ती विनयवसति दयिता तें. ॥ ७–५५.
२३. तों मुनि कोपोनि म्हणे, "तरते सिंधूंते जे नदा भणगा ।
दुस्तर म्हणति; तसांचें हस्त, **सदुपदेश,** जेन, दाभण गा. ॥ ७–५५.
२४. तें काय योग्य **भक्तें** मुख, 'दे' हे शब्द वदत, पसरावें. ॥ ७–७३.
२५. निवड करुनि तृषितांसीं सुज्ञा! सांगेल काय वाद तळें? ॥ ७–८२.
२६. वाढे **प्रताप सुकृतें,** अल्पहि जो अग्नि जेविं तो धमनें, ।
लुब्धें धनसंचयसा संरक्षावा जपोनि बोध मनें. ॥ ८–६.
२७. **भावि** कदापि चुकेना, आतां कांहीं करूं नको खेद. ॥ ८–२९.
२८. **उक्त न करुनि सुयोधन दुर्मति** बुडवुनि घरा, बुडालाच; ।
धरिल कसा सद्रस तो? ज्या कलशाच्या घरा बुडालाच. ॥ ८–३९.
२९. **लोभ** न देऊ **सत्वा,** दे जेविं ग्रीष्म हानि रोपातें. ॥ ८–४६.
३०. रक्षुनि शुद्ध यशातें मेळवितें जेविं **सत्य,** यश तातें ।
तेविं न मेळविलें; हो हेंचि करी दूर अत्ययशतातें. ॥ ८–४७.
भूतीं **दया** असों द्या, व्हा **इंद्रियषडरिनिग्रहीं** धीट, ।
सोडुनि अन्यपथ, धरा **निजधर्माचारमार्ग** हा नीट. ॥ ८–४८.
चैतन्य **सम पहावें** गुरु, लघु देहें दिसो करी, कीट; ।
ब्राह्मणसत्काराचा येवूं देवूं नका मनीं वीट. ॥ ८–४९.
३१. शशकानें मथिला हरि कीं म्हणतों पक्षिपाळ मशकानें! ॥ ८–८०.
३२. प्रसवश्रम भोगुनिही, सुयश न मिळतां, अवीरसूचि रडे; ।
समरहतसुवीरस्तुतसुत शोकभरें न **वीरसू** चिरडे. ॥ ८–९५.

KÂVYASANGRAHA. 56.

THE MAHÂBHÂRATA

OF

MOROPANT,

THE GREAT POET OF THE MAHÂRÂSHTRA.

14. AS'WAMEDHAPARVA.

EDITED WITH

CRITICAL AND EXPLANATORY NOTES, PREFACE AND APPENDICES

BY

BÂLKRISHṆA ANANT BHIDE, B. A.

AND

DATTÂTRAYA KESHAV JOSHI.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRṆAYA-SÂGARA" PRESS.

Bombay.

1906.

Price 1 Rupee.

काव्यसंग्रह. ५६.

महाराष्ट्रकविवर्यमोरोपंतकृत

महाभारत.

म्हणोत कृतिला तुझ्या अपटु लोक भाषांतर;
दुजी न कविता असें भुलविते मदीयांतर. ।
तुझे अमित साक्ष या असति भक्त लोकोत्तर,
न षड्रसरुची कधीं समजतो मनुष्येतर. ॥
—मुकुंद गणेश मिरजकर, कोल्हापूर.

१४. अश्वमेधपर्व.

हें

बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.
व
दत्तात्रय केशव जोशी,

यांनीं
अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन व प्रस्तावना आणि परिशिष्टें जोडून, अनेक हस्तलिखित प्रतींच्या आधारें तयार केलें,
तें

मुंबईंत जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१९०६.

किंमत १ रुपया.

उचितचि सरस्वतीला म्हणतात 'मयूरवाहिनी देवी;' ।
नातरि **मयूर** नेई जिकडे, तिकडेच वाहती केवीं? ॥ १

श्रीहरिकथाघनघटे **मयूर** देखुन करी थयथयाट, ।
स्वकलाकलाप पसरी, त्याचा झाला न कोण कवि भाट? ॥ २

सरसे! शुचि! प्रसन्ने! अलंकृते! सुकृतिकन्यके! लाहे ।
जो तुज, **मयूर**जे! तो कोण न रसिकांत धन्य केलाहे? ॥ ३

'शब्दार्थालंकारीं प्रसादप्रतिभारसें नसावेंच,' ।
सिद्धान्त हा उडवुनी, **मयूर** कितिकांस घालितो पेंच! ॥ ४

—**काव्यसंग्रहकार.**

प्रस्तावना.

१. मोरोपंती आर्याभारतांतील अश्वमेधपर्व आज आह्मी मराठी काव्यवाचकांस सादर करीत आहों. हें चवदावें पर्व होय. यांत धर्माच्या यज्ञीय अश्वाचें पृथ्वीपर्यटन व अश्वमेधाचा समारंभ यांचेंच प्राधान्येंकरून वर्णन असल्यामुळें, 'अश्वमेधपर्व' हें नांव यास साजणारेंच आहे.

२. मूळ व्यासकृतीचें अवलोकन केलें असतां, असें आढळतें कीं, अध्यायसंख्येच्या मानानें शांतिपर्व अनुशासनपर्वाच्या दुप्पट आहे व अनुशासनपर्व अश्वमेधपर्वाच्या पावणेदोनपट आहे. परंतु पंतांच्या आर्याभारताचा सर्वच आखाडा निराळा ! त्यांचा क्रम अगदीं उलट; ह्मणजे अश्वमेधपर्व अनुशासनपर्वाहून मोठें, व अनुशासनपर्व शांतिपर्वाहून मोठें ! परंतु ज्या विशिष्ट धोरणावर कटाक्ष देऊन, पंतांनीं आपल्या आर्याभारताची उभारणी केली, त्या धोरणाशीं वरील प्रकार अगदीं सुसंगत आहे. आर्याभारतांत पांडवांचा सरळ आटोपशीर इतिहास द्यावयाचा, मधून मधून बोधप्रद, रसाळ व मनोरंजक अशीं अवान्तर आख्यानें समाविष्ट करायाचीं व वेदांत, तत्त्वज्ञान, नीति इत्यादि विषयांसंबंधें गहन, लांबट व सामान्य जनांस कंटाळवाणें होणारें विवेचन साफ गाळावयाचें, हें तत्त्व पंतांनीं सतत आपल्या दृष्टीपुढें ठेविलें होतें. या मोरोपंती बाण्याचाच वरील परिणाम होय. शांति व अनुशासन या पर्वांत पांडवांचा इतिहास फारच अल्प असून, तीं पर्वें बहुतेक तात्विक विषयांनींच खचलेलीं आहेत; परंतु अश्वमेधपर्वांत धर्माच्या व अर्जुनाच्या चरित्रांतील महत्वाचा भाग आला असून, तात्विक विषयांचा विन्यास त्या मानानें फारच संकुचित आहे. तेव्हां आर्याभारतांत पंतांना घेण्यासारखा भाग शांतिपर्व व अनुशासनपर्व यांपेक्षां प्रस्तुत पर्वांतच अधिक आहे व पंतांनीं जो भाग या पर्वांतून घेतला आहे, त्यांत फारसा संक्षेप केला नाहीं, इतकेंच नाहीं, तर ठिकठिकाणीं फारच रसाळ, समयोचित व आल्हादजनक वर्णनविस्तार केलेला आहे. यास्तव पंतांचें अश्वमेधपर्व उपरिनिर्दिष्ट दोन पर्वांपेक्षां सहजच मोठें झालें आहे.

३. मूळ व्यासकृत महाभारतांत या पर्वाचे ९२ अध्याय आहेत. पैकीं कृष्ण व धर्म यांचा तात्विक संवाद (अध्याय ११–१३), अनुगीता (१६–१९), ब्राह्मणगीता, (२०–३४) व गुरुशिष्यसंवाद (३५–५१) या गहन विषयांनीं ४० अध्याय व्यापिले आहेत. तेव्हां तेवढे अध्याय सोडून, बाकीच्या ५२ अध्यायांवर पंतांनीं

चांगलीच विस्तृत टीका केली आहे. मूळांतील वर्णन साधें, बोजड व पाल्हाळिक असतें; परंतु मोरोपंती वर्णन खुबीदार, अलंकारिक, टापटिपीचें व मेजक्या शब्दांत विपुल अर्थ सांठून राहील अशा थाटाचें असतें, ही बाब लक्षांत घेतली ह्मणजे मोरोपंतांनीं केलेल्या विस्ताराचें खरें स्वरूप लक्ष्यांत येईल. नुसत्या पद्यसंख्यांवरून संक्षेपविस्तारांविषयीं केलेले हिशोब बरोबर होणार नाहींत. कित्येक वेळां एका मोरोपंती गीतीचें संस्कृतांत भाषांतर करावयाचें ह्मटलें तर अनुष्टुप् वृत्ताचे महाभारतांतील रचनापद्धतीचे तीनतीन चारचार श्लोक बनवावे लागतील. तेव्हां पद्यसंख्येवरूनच संक्षेपविस्तारांविषयीं केलेलीं विधानें अनेक वेळां भ्रामक ठरण्याचा संभव आहे, हें उघड आहे.

४. इतर पर्वांप्रमाणें या पर्वांतही कवीचें कौशल, रसिकता व प्रतिभाप्रभाव दाखविणारी स्थळें विपुल आहेत. दुसऱ्या अध्यायांतील कृष्णांनीं धर्मादिकांचा घेतलेला निरोप (गीति, १२–२३) व पुढें झालेला उत्तंकाच्या भेटीचा प्रकार (२४–८०) हे प्रसंग चांगलेच मनोवेधक वठले आहेत. चवथा अध्याय ह्मणजे शोकहर्षांचें संकेतस्थानच होय. यांतील पहिल्या $\frac{2}{3}$ भागांत करुणरस उज्ज्वल परिपाकास आला आहे, तर बाकीच्या भागांत हर्षाचा प्रवाह बळावला आहे. उत्तरेला मृत मुलगा झालेला पाहून कुंती (२७–३६) व सुभद्रा (३७–४३) यांनीं केलेला शोक तर हृदयभेदक आहेच, परंतु उत्तरेच्या विलापरवाची (४८–६५) त्याच्यावरही कडी आहे. पांचव्या अध्यायांत सर्वत्रच वीर व करुणा हे रस उचंबळत आहेत. तरी पण त्यांतल्या त्यांत बभ्रुवाहनाबरोबरील प्रसंगाचा प्रभाव कांहीं दिव्य आहे. या अध्यायांतील चित्रांगदेच्या करुणविलापाचा (७५–८८) व दुःशलेच्या दीन वाणीचा (२१–८१) विशेष निर्देश केल्यावांचून आह्मांस राहवत नाहीं. सहाव्या अध्यायांतील अश्वमेधाचें वर्णन अत्यन्त चटकदार उतरलें आहे. शिवाय उत्तंककथा (अ० २) मरुत्तसंवर्ताख्यान (अ० १, गी० ११–१२७) व कपोतवृत्तिकथा (अ०७, गी०७–२०), हीं सर्व आख्यानें रसाळ व प्रतिभाशाली आहेत. वरील विधानांच्या समर्थनार्थ उतारे देण्याचा प्रयत्न करण्यांत मतलब नाहीं; कारण उतारे काढूं लागलें असतां, सर्वत्रच गुणप्रकर्ष आढळत असल्यामुळें कोणती गीति गाळावी याबद्दल मन घोंटाळूं लागतें. तरी वाचकांनीं वर निर्दिष्ट केलेली स्थळें मूळांतूनच सबंध वाचून, वरील विधानांच्या खरेपणाबद्दल स्वानुभवानेंच खात्री करून घ्यावी. मोरोपंतांच्या काव्यांत अर्थ आणि शब्द हे दोन्ही इतके वेंचक, मार्मिक, उचित व मोहक असतात, कीं कित्येक प्रसंगीं आपण कोणावर जास्ती खूष होतों, किंवा रसपरिपाकाला कोणाचें जास्ती साहाय्य होतें, हें निश्चित

करणें ह्मणजे एक मोठें कोडेंच पडतें ! त्यांच्या शब्दार्थाच्या सांगडींत अशी कांहीं विलक्षण जादू वारंवार प्रत्ययास येते.

५. प्रस्तुत पर्वांत पंतांनीं दोन ठिकाणीं (६।८६;७।४४) आपल्या गुरूंचा उल्लेख केला आहे. बहुधा हे गुरू पन्हाळकर **केशव** व **गणेश पाध्ये** असावेत. कारण पुढें **स्वर्गारोहणपर्वांत** या **पाध्यांच्या** चरणकृपेनेंच आपण **आर्याभारतग्रंथ** लिहिला असें **पंत** ह्मणतातः—

'श्रीमदुपाध्यायोत्तमकविवरकेशवगणेशपादरजा ।
धरुनि शिरीं, हें सद्यश लिहिलें, पीताति साधु सादर ज्या.' ॥
—स्वर्गारोहण २।३४.

व अशाच तऱ्हेचे, परंतु मोघम, उद्गार त्यांनीं प्रस्तुत पर्वांत काढिले आहेतः—

श्रीगुरुनेंचि करविलें हें स्वार्थ, करूनि नवस, लेखन कीं; ।
मणि आकरीं, प्रभुविना स्नेहासि धरूनि न वसले खनकी. ॥ ७।४४.

हे **पाध्ये पंतांची** कृति अंतःकरणपूर्वक वाचून, त्यांचें नेहमीं अभिनंदन करीत असत व काव्यें रचण्याचे कामीं फार उत्तेजन देत असत, असें प्रस्तुत पर्वांत दुसऱ्या एका गीतींत कवीनें सुचविलें आहे—

स्तवनीं समर्चनीं जरि जिव्हाहस्तें चुका, परि समोर ।
नाचा प्रभुच्या, ह्मणती गुरु कीं, 'बहु मत **शुकापरिस मोर.**' ॥६।८६

६. या पर्वाला शेवटीं एक सुभाषितांचें परिशिष्ट जोडिलें आहे. त्यांत सुंदर नीति-वचनांचा समावेश केला आहे.

७. हें पर्व तयार करितांना रा. **महादेव केशव जोशी**, बी. ए. (धुळें); **दत्तात्रय केशव ओक**, (**नागपुर**); **बाळकृष्ण सीताराम जोशी**, (**मुरूडजंजिरा**); **मोरो गणेश लोंढे**, (**नागोठणें**); इत्यादि गृहस्थांनीं जें साहाय्य केलें, त्याबद्दल आह्मी त्यांचे आभारी आहों.

मुरूड जंजिरा.
२।७।१९०६.

काव्यसंग्रहकार.

मोरोपंती अश्वमेधपर्वाची अनुक्रमणिका.

एकूण ग्रंथसंख्या ६८४

परिशिष्टें.

मोरोपंतकृत महाभारत.

१४. अश्वमेधपर्व.

(गीतिवृत्त.)

अध्याय पहिला.

दा[1]याद पांडुचा त्या गांगेया आठऊनियां रडला, ।
दा[2]रुण कर्में मूर्छित होउनि, गंगातटींच तो पडला ॥ १
धृतराष्ट्र म्हणे, 'धर्मा! न[3] करुनि हितवचन, बुडविली महि म्यां, ।
कां शोक करिशि? आश्रय[4] तूंचि कुरुकुळांत सद्यशा! महिम्या.' ॥ २
श्रीकृष्ण म्हणे, 'धर्मन्यायें संपादिलें[5] करीं राज्य, ।
यज्ञ करुनियां धर्मा! अन्नधन ब्राह्मणांसि दे प्राज्य[6].' ॥ ३
धर्म म्हणे, 'मागतसें तुज जोडुनि हात, पावना! दे हें[7], ।
कृष्णा[8]! अंतीं जावा, जोडाया[9] हा तपा, वना देहें.' ॥ ४
व्यास म्हणे, 'जरि हिंसादोषास्तव[10] पावलीच भय मेधा[11], ।
तरि धर्मा! सांग[12] करीं अस्मद्वचनें[13]करूनि हयमेधा[14].' ॥ ५
धर्म म्हणे, 'निःसंशय पाप सकल अश्वमेध वारील[15]; ।

---

१. वारस, पुत्र. 'श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति' ह्या मंत्रापैकीं चवदावें अक्षर **'दा'** हें आहे आणि 'अश्वमेध' पर्वही चवदावें असून त्याचें आद्याक्षर **'दा'** हेंच आहे. २. भीष्मद्रोणादिकांस लढाईत मारण्याचें जें निष्ठुर कर्म, त्यानें; लढाईत केलेल्या निर्दय कृत्यानें. ३. सदुपदेशाप्रमाणें न वागून, सद्बोध न ऐकून. ४. अन्वयार्थः–[हे] सद्यशा! (चांगलें आहे यश ज्याचें अशा) तूंच कुरुकुळांत महिम्या (थोरपणास) आश्रय. आतां अवघ्या कुरुकुळाच्या मोठेपणाचा आधारस्तंभ तूंच आहेस. ५. संपादन केलेलें. 'धर्मा! न्यायें संपादिलें' असा पाठभेद. ६. पुष्कळ, विपुल. ७. ह्या दर्शक सर्वनामाचा संबंध पुढील वाक्याशीं आहे. ८. अन्वयः–कृष्णा, हा (मी धर्म) तपा जोडाया (तपश्चर्यासंचय करण्यास्तव) अंतीं (शेवटीं अर्थात् आयुष्यसमाप्तिवेळीं) देहें वना जावा. अर्थात् उतार वयांत मृत्यूनें गांठण्याच्या पूर्वींच तपश्चरणार्थ ह्या धर्मराजानें वनास जावें, असा भाव. ९. पाठभेदः–जोडावा. १०. हत्या घडून पाप लागलें म्हणून. ११. [तुझी] बुद्धि, मन. १२. यथोचित, विधियुक्त. १३. आम्ही सांगतों म्हणून. १४. अश्वमेधाला. १५. नाहींसें करील.

जरि तो घडेल विधिवत्, तरि सर्वा भूमितेंहि तारील. ॥ ६
परि धन नसे, कसा [1]मज केवळ अधनास सांग [2]सव [1]घडतो? ।
पुष्कळ असेल ज्याच्या पदरीं कांचन, तयासि [3]सवघड तो. ॥ ७
बहु दुःसह [4]हृदयींचे आजुनि ज्यांचे न [5]वाळले [4]घाय, ।
त्या [6]हतनृपबाळांला मागावें धन मुनीश्वरा! काय?' ॥ ८
व्यास म्हणे, 'युक्ति तुला कथितों मी [7]कोश [8]पूर्ण होयास; ।
आहे **हि**माचळीं धन, आणाया सिद्ध [9]तूर्ण हो यास. ॥ ९
यज्ञांत धन [10]**म**रुत्तें जें विप्रांला दिल्हें, तिहीं [11]श्रांतीं ।
त्यजिलें कंटाळुनि, तें पुष्कळ आहे **हि**[12]मालयप्रांतीं.' ॥ १०
धर्म म्हणे, 'इतुकें धन संपादी तो [13]कैशा **म**रुत्त [13]नयें? ।
[14]येणेंचि पात्र आत्मा केला त्या, ज्या यशा **म**रुत्तनयें.' ॥ ११
व्यास म्हणे, 'रविवंशीं प्रख्यात **क**रंध[15]माख्य जो राजा, ।
धर्मा! [16]**म**रुत्त [16]पृथिवीपाळाचा, जाण, होय तो आजा. ॥ १२
प्रख्यात [17]**अं**गिरा मुनि जो, त्याचा होय भूप तो [18]याज्य; ।
[19]साधु **अ**[20]विक्षिन्नंदन धर्मन्यायें सुखें करी राज्य. ॥ १३
[21]**श**तमख **म**रुत्त यांसीं लागे [22]तेजें [23]परस्परें [24]स्पर्धा, ।

---

१. माझ्या हातून होतो. २. यज्ञ. ३. सोपा. ४. छातींतील प्रत्यक्ष जखमा व मानसिक आधि. ५. सुकले, बरे झाले. ६. मेलेल्या राजांच्या मुलांजवळ. ह्यावरून कुरुक्षेत्रीं वयांत आलेल्या माणसांचा संहार उडून ठिकठिकाणीं मुलें राहिलीं होतीं हें उघड होतें. याचनार्थी धातूंचा दोन कर्माशीं प्रयोग करण्याचा संस्कृत संप्रदाय पंतांनीं जशाचा तसाच मराठींत उतरला आहे. यावरून मराठीला होता होईल तों संस्कृताचेंच वळण लाविण्याचा पंतांचा रोख व्यक्त होतो. ७. खजिना. ८. होण्याकरितां. ९. त्वरित. १०. मरुत्त राजानें. मरुत्त हा दिष्टकुलोत्पन्न अविक्षित राजाचा पुत्र; हा महापराक्रमी, शूर व यज्ञकर्ता होता. यास 'आविक्षित' असेंही म्हणतात. ११. श्रमलेल्यांनीं. १२. हिमालय पर्वताच्या आसपास. १३. कोणत्या प्रकारच्या मार्गानें, कोणत्या नीतिप्रकारानें. १४. सार्थान्वयः—ज्या यशा मरुत्तनयें (वायुपुत्रानें, मारुतीनें) [आत्मा पात्र केला], त्या [यशा] येणेंचि (ह्या मरुत्तानेंच) आत्मा पात्र केला. १५. करंधम+आख्या=करंधम नांव आहे ज्याचें असा. हा राजा दिष्टकुलोत्पन्न खनिनेत्र राजर्षीचा पुत्र व अविक्षित राजाचा पिता; व अर्थात् अविक्षित-पुत्र जो मरुत्त राजा, त्याचा पितामह (आजा) होय. १६. मरुत्तराजाचा. १७. स्वायंभुव मन्वन्तरामध्यें ब्रह्मदेवानें प्रजोत्पादनार्थ उत्पन्न केलेल्या दहा मानसपुत्रांपैकीं एक ऋषि. उतत्थ्य, बृहस्पति व संवर्त असे तीन पुत्र ह्यास होते. १८. यजमान. १९. सद्गुणसंपन्न. २०. अविक्षिताचा पुत्र, मरुत्त. २१. इंद्र. २२. ही तृतीया आहे. तेजें=पराक्रमासंबंधानें, तेजाच्या बाबदींत. २३. आपसांत, एकमेकांबरोबर. २४. चढाओढ.

जाणों[1] राज्या याच्या तो, त्याच्या हा, बळें हरी अर्धा. ॥ १४
अपकर्ष[2] मरुत्ताचा व्हाया कांहीं उपाय चालेना, ।
प्रबळाहि मारुताला जैसा रत्नप्रदीप हालेना. ॥ १५
गुरुसि[3] म्हणे, 'योग्य तुला अमरेश्वर[4] मी, न मर्त्य[5] तो, याज्य[6], ।
रसिकें[7] तैल न खावें, मिळतां नव[8] विपुळ धेनुचें आज्य[9]. ॥ १६
हरितें[10] म्हणे गुरु, 'धरिन त्याच्या मी न स्रुवा[11] सवामाजी[12], ।
संधा[13] भंगुनि येऊं देइल नच अश्रु वासवा! माजी.' ॥ १७
जाय मखार्थ बहाया[14] तो नृप[15], तें सर्व वृत्त परिसून[16]; ।
सासू[17] करी उपेक्षा, त्यागीना स्वविनयासि परि सून. ॥ १८
नमुनि नृप म्हणे, 'माझें वांच्छित[18] सवयजन[19] तें पुरो[20], हित[21] हो, ।
साहित्य सिद्ध झालें जैसें कथिलें तुह्मीं पुरोहित! हो[22]!' ॥ १९
आंगिरस[23] म्हणे, 'येइन मी न तुजकडे, त्यजून शक्रातें, ।
जा, मुग्धा[24]! दुग्धातें सोडुनि, सेवील कोण तक्रातें?' ॥ २०
फिरला मरुत्त, लज्जित होय, म्हणे, 'दुःसहा व्यथा माजी[25], ।
आर्ता[26] धन्वंतरिसा[27], त्या नारद भेटला पथामाजी. ॥ २१
नमितां स्पर्शे निवविति देवर्षिचरण तया[28] सखेदा ते, ।

---

१ अन्वयः—जाणों याच्या अर्धा राज्या तो [व] त्याच्या हा बळें (जबरीनें) हरी (हरण करी). इंद्र व मरुत्त हे समतोल व समवैभव होते, हा भाव. 'अर्धा' हें 'अर्ध या शब्दाचें सामान्यरूप होय. 'अर्धा' शब्दाचें 'अर्ध्या' हें सामान्यरूप. 'नव 'नवा' हीही जोडी, 'अर्ध' 'अर्धा' ह्याच नमुन्याची आहे. २. कमीपणा, तेजोभंग. ३. बृहस्पतीस. ४. देवेंद्र. ५. मृत्युवश, मानव. तो मर्त्य=मरुत्तराजा. ६. यजमान. हा शब्द 'योग्य' ह्या विशेषणाचें विशेष्य होय. ७. रसज्ञानें, जिभेचा जो चोखाळ त्यानें. ८. ताजें, साजूक. ९. तूप. १०. इंद्रातें. ११. पात्रविशेष. हें पळीसारखें असतें. ह्यानें अग्नीला आहुति देतात. यज्ञांत व अग्निकार्यांत लागणारीं पात्रें खैराच्या वगैरे लांकडाचीं करितात. १२. यज्ञामध्यें. १३. सार्थान्वयः—हे वासवा! माजी (माझी) संधा (प्रतिज्ञा) भंगुनि (मोडून) (तुला) अश्रु नच येऊं देईल. माझ्या प्रतिज्ञेचा भंग होऊन तुझ्या डोळ्यांस पाणी येण्याची पाळी खास येणार नाहीं. १४. बोलावण्यास. १५. मरुत्तराजा. १६. ऐकून. १७. पंतांच्या मनांत 'सासू' 'सासुरवास' इत्यादि विषय घोळत असत असें वाटतें. कारण ह्यासंबंधीं दृष्टान्त व उपमा वारंवार आढळतात. 'सासूचें जेविं तेविं सोसावें' (अनुशासन अ० ७ गी० १८ पद्य). १८. इच्छिलेलें. १९. उत्तमयज्ञ. २०. पूर्ण व्हावें. २१. कल्याण होवो. २२. अहो. २३. अंगिऱ्याचा पुत्र बृहस्पति. २४. मूर्खा, वेड्या. २५. माझी. २६. रोग्यास. २७. उत्तमवैद्याप्रमाणें. २८. त्या दुःखितास, मरुत्ताला.

जे [1]कलिकुतुकी, **क**लिहर, कामद, **क**ल्पद्रुचे सखे दाते. ॥ २२
खेदें [2]पुसोनि, मुनि म्हणे, '**सु**रपतिभाग्यासि लोभला [3]**जी**[4]व, ।
[5]त्यांसि, [6]तदनुजा जाउनि शरण, यशें बहुत शोभ, लाजीव. ॥ २३
करुनि विरो[7]धें वि[8]टविला **सु**रगुरुनें दीर्घ[9]दृष्टि **सं**वर्त ।
[10]उन्मत्तसाचि फिरतो, योगबळें करिल '[11]सृष्टिसंवर्त.' ॥ २४
[12]राजा म्हणे, 'जिणें या त्याची गो वि प्रसाद देवर्षे! ।
असि युक्ति शिकिव; घनसा अमृतें तो विप्र साद दे, वर्षे.' ॥ २५
नारद म्हणे, "[13]शवातें पाहे [14]**वा**राणसींत [15]गुणपर हा, ।
मो[16]क्षपुरीद्वारीं तूं [17]भलतें स्थापूनि एक [18]कुणप रहा. ॥ २६
परतेल शव विलोकुनि जो, त्वां **सं**वर्त तोचि जाणावा, ।
कीं **का**शींत **शि**वचि शव, हा त्याचा मुख्य [19]भाव [20]बाणावा. ॥ २७

---

१. जे (चरण) कलिकुतुकी (कलहाची ज्यांना मौज वाटते असे), कलिहर (कलिकालाचा प्रभाव हरणारे), कामद (इच्छा तृप्त करणारे), कल्पद्रुमाचे सखे (इच्छित देणाऱ्या कल्पवृक्षाचे स्नेही) [असे] दाते (उदार) [आहेत]. नारद शब्दाची व्युत्पत्ति वरील अर्थास (कलिकुतुकित्वास) साजण्याजोगी केलेली पाहण्यांत आहे, ती अशी:—नराणां समूहः नारं तत् दारयति सः नारदः—जनसमूहाची (भांडण लावून) फाटाफूट करणारा. यासंबंधानें 'कळीचा नारद' हा लौकिकवादही लक्ष्यांत घेण्यासारखा आहे. यासंबंधें खालील गीति वाचनीय आहेत:—श्रीमन्नारद बावा तेही कळिमाजि भेटती न जना । 'कलहप्रिय' म्हणति म्हणुनि भी मन, परि पाय योग्य ते भजना. ॥ (दत्तदयोदय ५४). लावी, स्वप्रिय, सुरहित, कविरंजन व्हावयासि, कलहातें; । ज्यासि बहुप्रिय हरिहरयशसें, व्यसनार्त म्हणति खल 'हा!', तें॥ (विनायकमाहात्म्य ४।३). २. खेद होण्याचें कारण विचारून. ३. भाळला. ४. बृहस्पति. ५. हें 'लाजीव' ह्या क्रियापदाचें कर्म. ६. तत्+अनुजा=त्याच्या धाकट्या भावाला, संवर्ताला. ७. भांडण. ८. (संवर्ताच्या अंतःकरणांतील) प्रेमभाव नाहींसा केला. ९. शहाणा. १०. वेड्यासारखा. ११. सृष्टीचा प्रलय, जगाचा नाश. १२. सार्थान्वयः—राजा (मरुत्त) म्हणे; जिणें (ज्या युक्तीनें) या (या मला) त्याची (संवर्ताची) गो (वाणी) प्रसाद वि (प्रसवे), असि युक्ति (कल्पना, उपाय) शिकिव (पढव, सांग). [कारण] तो विप्र (संवर्त) घनसा (मेघाप्रमाणें) साद दे (हाक देतो) [व] अमृतें वर्षे (अमृताची वृष्टी, पक्षीं, जलाची वृष्टी करितो). अशी युक्ति सांग कीं त्यायोगें तो हितप्रद संवर्त अनुकूल होऊन, माझे मनोरथ पूर्ण होतील—असा भाव. १३. प्रेतातें. १४. काशीक्षेत्रांत. १५. त्रिगुणाच्या पलीकडील, त्रिगुणातीत, निर्गुण ब्रह्मस्वरूप. अन्वयः—हा (संवर्त) वाराणशींत शवातें (प्रेताला) गुणपर (ब्रह्मस्वरूप, शिवरूप) पाहे (समजतो). सर्वसंग्रहाची 'गुणपर' या शब्दावर 'त्रिगुणात्मक' अशी टीप आहे. १६. मुक्ति देणाऱ्या नगरीच्या वेशींत. मोक्षाच्या पुऱ्या सात आहेत, त्याः—अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, द्वारावती. १७. कोणतें तरी एकादें. १८. प्रेत. १९. समजूत. २०. ठसावा.

परतेल कुणप पाहुनि, जावें तेव्हां उगेंचि[1] त्यामागें; ।
मग एकांतीं, जोडुनि कर, विनवावें तुवां महाभागें. ॥ २८
'मी संवर्त, असें तुज कोणीं कथिलें?' असें पुसेल मुनी, ।
तरि माझें नांव तया सांगावें, तत्पदांबुजें[2] नमुनी. ॥ २९
'कोठें आहे नारद?' ऐसेंहि जरी पुसेल, तरि त्यातें, ।
'शिरला दहनांत[3],' असें सांग, भिउं नकोचि, कोप[4] करित्यातें[4]." ॥३०
मुनि जाय असें सांगुनि, ज्याचें यश नित्य गीतें[5] सद्वारीं[6]; ।
मांडी कुणप मरुत्तहि, जाउनि वाराणसीस, तद्वारीं. ॥ ३१
तों ये संवर्त, फिरे पाहुनि तत्काळ कुणप, हा यांला[7] ।
अनुसरला नृप, बसला होता जो दूर खुण[8] पहायाला. ॥ ३२
पाय धरूं जाय नृपति, तों करि[9] चेष्टा[10] अनेकधा[11] कपिसा[12], ।
उडवी रजें[13] दगड, थुंके, बहु दावी त्यास जेविं धाक[14] पिसा[15]. ॥ ३३
जों जों असें छळी मुनि, तों तों राजा मरुत्त कर जोडी; ।
गोडी कळतां, मधुतें जसि मासी, वारितां[16] बहु[16], न सोडी. ॥ ३४
भागुनि[17], वटातळीं मुनि बसुनि, म्हणे, 'सोशिका! नृपा! वळलों[18]; ।
वद, मी संवर्त असें कोणीं कथिलें? तुला कसा कळलों? ॥ ३५
वदसील सत्य, तरि तूं[19] स्वमनोरथसागरांत[19] तरशील[19], ।
करितां असत्य भाषण, मस्तक शतधा फुटोनि, मरशील.' ॥ ३६
भूप म्हणे, 'गुरुपुत्रा! मजला[20] तूं नारदें कळविलास, ।
साधुविना[21] साधुपरिज्ञानीं न चलेचि धीबळविलास.' ॥ ३७

---

१. मुकाट्यानें. २. तत्+पद+अंबुजें=त्याचीं चरणकमलें. ३. अग्नींत. ४. रागावणाऱ्याला, संतापलेल्यास. ५. गाइलेलें. हें 'यश' शब्दाचें विधिविशेषण आहे. ६. सत्+वारीं=साधुमंडळीनें. ७. संवर्ताला. ८. ताळा, नारदानें सांगितलेलें लक्षण. ९. ह्या क्रियापदांचा कर्ता 'संवर्त' अध्याहृत. १०. चाळे. ११. अनेक प्रकारें. १२. मर्कटाप्रमाणें. १३. धूळ. १४. भीति. १५. वेडा. १६. निकरानें किंवा पुनः पुन्हा हांकलली असतां. १७. थकून, कंटाळून. १८. वधलों, अनुकूळ झालों. १९. तुझे मनोरथ सिद्धीस जातील. मनोरथीं बुडणें=आशाभंग होणें. मनोरथीं तरणें=संकल्पसिद्धि होणें. उदा०:-(१) स्वामी मनोरथांबुधिमध्यें हा कर्ण पत्रकल्प तरो. ॥ (शांति० २।८). (२) बुडतां मनोरथीं, ने बोध तिचा धरुनि हात पार मला. ॥ (अनुशा० ३।३). २०. मजला तूं नारदें कळविलास=मला तुझी ओळख नारद ऋषींनीं पटवून दिली. २१. सार्थान्वयः- साधुपरिज्ञानीं (सत्पुरुषांना ओळखण्याच्या कामीं) साधुविना (सत्पुरुषावांचून) धीबळविलास बुद्धिसामर्थ्याचा प्रताप, तेज) न चलेचि. अर्थसादृश्यः-'गुणी गुणं वेत्ति न वेत्ति निर्गुणः'.

संवर्त म्हणे, 'राया ! सत्य वदसि, नारदा असें कळलों, ।
जग[1] मोहाया, कपटें[2] झालों उन्मत्त, मी बैळें[3] मैळलों[4].' ॥ ३८
'नारद कोठें आहे?' ऐसें पुसतां, पुन्हाहि पद नमुनी, ।
भूप म्हणे 'गुरुपुत्रा! शिरला दहनांत सिद्धिसदन[5] मुनी.' ॥ ३९
ऐसें ऐकुनियां, तो पावे आनंद आंगिरस, डोले, ।
'ईतुकें[6] असें कराया मीही आहें समर्थ' हें बोले. ॥ ४०
निर्भर्त्सना[7] करुनि मुनि, पुनरपि त्या नृपतिला म्हणे, "अज्ञा ! ।
वातविकारें[8] भ्रमलों, नेतोसि मला कशास रे! यज्ञा. ॥ ४१
निजमानसवशवर्ती[9] भ्रांत तुझें करिल काय हा यजन? ।
असुपोतीं[10] चढुनि, पडुनि परमव्यसनीं[11], म्हणेचि 'हाय !' जन. ॥ ४२
कार्य[12] नव्हे, परिपाकीं म्हणविल जें कर्म 'हा' नयज्ञा ! तें, ।
जा तूं देवगुरुकडे, न्यावा त्वां तोचि, हों[13] न, यज्ञातें. ॥ ४३
हरिलें[14] सर्वहि तेणें[14], विनवावा स्वयजनार्थ तो याज्यें[15], ।
झालों[16] भिन्न[16], निवडिलीं[17] होतीं न कदापि एक तोयाज्यें." ॥ ४४
भूप म्हणे, 'वे[18] पदरीं यां न कृतहरिप्रशंस तो याज्या, ।
स्वीकारील कसा त्या? टाकी निवडूनि हंस तोयां[19] ज्या. ॥ ४५

---

१. लोकांस मजविषयीं भ्रम पडावा म्हणून. २. लवाडीनें. ३. बुद्ध्या. ४. मी घाणेरडी स्थिति अंगिकारिली. ५. अतर्क्य बळाचें किंवा जयाचें माहेर. ६. संवर्तासारखे मुनिवर्य सिद्ध पुरुष होत व त्यामुळें त्यांस कोणाच्या मनांत काय आहे हें समजतें. मरुत्ताचा मनोदय संवर्त ऋषींस कळून त्यांचे हे उद्गार आहेत. ७. तिरस्कार. ८. वाताच्या लहरीनें भडकलों आहें, वायूच्या तारेनें भ्रमिष्ट झालों आहें. ९. मनाच्या लहरीप्रमाणें चालणारा, स्वच्छंदी. १०. सुपोत=उत्तम नौका, नव्हे जी सुपोत ती असुपोत अर्थात् फुटकी नौका, तिजमध्यें. ११. महासंकटामध्यें. १२.सार्थान्वयः–[हे] नयज्ञा (शहाण्या), जें कर्म (कृत्य) परिपाकीं (परिणामीं) 'हा' (हाय) म्हणवील (म्हणावयास लावील), तें कार्य (कर्तव्य) नव्हे (तें करण्यास योग्य नाहीं). १३. मी संवर्त. १४. त्या गुरूनें माझें सर्वस्व हरण केलें. १५. यजमानानें. १६. वेगळे झालों. १७. सार्थान्वयः– निवडिलीं (वेगळीं केलेलीं) तोयाज्यें (पाणी आणि तूप) कदापि (केव्हांही) एक न होतीं (एक जीव होऊन सारख्या किंमतीचीं होत नाहींत). १८. अन्वयार्थः–कृतहरिप्रशंस (केलेली आहे इंद्रानें प्रशंसा ज्याची असा) तो (बृहस्पति) या याज्या (ह्या यजमानास, मला मरुत्तास) पदरीं न घे (स्वीकारीत नाहीं, मान्य करीत नाहीं). १९. पाण्यास.

[1]लंघाया [1]ईच्छितसें तवसामर्थ्येंकरूनि [1]शक्रातें, ।
[2]तेजस्विजनोत्कर्षासहनातें [3]सर्वकाळ [3]वक्रातें.' ॥ ४६
संवर्त म्हणे, 'राजा! [4]याज्याचा उचित होय [5]अत्याग; ।
शरणागतयजमानत्यागें जोडीन मी न [6]अत्याग. ॥ ४७
स्वीकारुनि करिन तुझ्या, धरुनि यशाचाचि लोभ, [7]यजनातें; ।
द्वेषें देइल तुज बहु, दे इतरां जेविं [8]तो भय जनातें. ॥ ४८
सुरपतिच्या सुरगुरुच्या द्वेषा [9]शकसिल [9]न [9]तूं [9]सहायास. ।
[10]समयीं सोडिसिल नृपा! मग जरि गडबडुनि मज [11]सहायास, ॥ ४९
तरि [12]तुज [12]सबांधवातें शापुनि करिन क्षणांत मी [13]भसित; ।
स्पष्ट प्रथमचि वद; मम मुख अयशें [14]न [14]करिसील [14]कीं [15]असित?' ५०
नृपति म्हणे, 'संगति जरि सोडिन, तरि मज कधीं न हो [16]सुगति, ।
विषयांसीं [17]संगें [17]घडो, [18]ज्यांतें सेउनि [18]मंदें [18]कुधी [18]फुगती.' ॥ ५१
विप्र म्हणे, "दृढ निश्चय ऐसा केला तुवां जरि, मरुत्ता! ।
[19]तरि, शक्रमदीं घनता साची व्हाया, दिली तुज मरुत्ता. ॥ ५२
कीर्ति असावी [20]अतुला, तैसीच मखीं समृद्धि कनकाची, ।
जाउनि शरण, करावी स्तुति कथिन तसी [21]कुमारजनकाची. ॥ ५३
प्रख्यात [22]मुंजवान् गिरि [23]हिमवत्पार्श्वीं नृपोत्तमा! आहे; ।
तेथें शुद्ध [24]कनकखनि, [25]तद्रक्षक [26]यक्षबळ सदा राहे. ॥ ५४

---

१. इंद्रावर वरचढ करण्यास इच्छितों. २. तेजस्वि+जन+उत्कर्ष+असहनातें=पाणीदार व पीळदार लोकांचा अभ्युदय सहन न करणाऱ्यातें; ज्याला पराक्रमी व बाणेदार लोकांचा अभ्युदय सहन होत नाहीं, त्यातें. ३. नेहमीं तेढा असणाऱ्याला. हें व °सहनातें, हीं 'शक्रातें' ह्याचीं विशेषणें. ४. यजमानाचा. ५. स्वीकार, अंगीकार, आदर. ६. अति+आग=महत् पाप. ७. यज्ञातें. ८. इंद्र. ९. तुला वैर सोसवणार नाहीं. १०. ऐन वेळीं. गीति ४९ व ५० यांचें **युग्मक** आहे, तरी त्यांचा एकत्र अन्वय करावा. ११. मित्राला, पुरस्कर्त्याला. १२. गोतवळ्यासह तुला. १३. भस्मरूप, दग्ध. १४. करणार नाहींसना? १५. काळें. १६. उत्तमगति. १७. आसक्ति राहो. १८. ज्या विषयांचा आस्वाद घेऊन, दुष्टबुद्धि नर मदांध होतात. फुगती=मत्त होतात, ताठा धरितात. १९. सार्थान्वयः—तरि (तर मग) शक्रमदीं (इंद्राच्या गर्विष्ठपणामध्यें) घनता (मेघरूपपणा) साची (सत्य वस्तुतः) व्हाया (यावया) तुज मरुत्ता (वायुपणा) दिली. माझ्या आशीर्वादानें तूं वायूप्रमाणें इंद्रमदरूप मेघाला विरवून टाकशील—हा भाव. २०. अनुपम. २१. कार्तिकस्वामीच्या पित्याची; शिवाची. २२. पर्वतविशेष. २३. हिमालयपर्वताचे बाजूस. २४. चोख सोन्याची खाण. २५. तिचें रक्षण करणारा. २६. यक्ष आहेत सैन्य ज्याचें असा, कुबेर. यक्ष हे कुबेराचे सेवक होत. कुबेर हा धनाचा स्वामी, तेव्हां त्या सुवर्णखाणीचा तो रक्षक असणें यथार्थच आहे.

साक्षान्महेशवश[1] तो[2], त्या स्थानीं त्या प्रभूसि[3] आठीव[4], ।
देइल आज्ञा, 'सेवक, आणाया विपुल हेम, पाठीव.' " ॥ ५५
ऐसें सांगुनि, साधन[5] भगवत्स्तोत्रादि सर्व[6] जाणविलें; ।
भूपाकरवीं प्रेषुनि राजपुरुष[7], बहु सुवर्ण आणविलें. ॥ ५६
पात्रादि सर्व पुष्कळ केलें त्या अध्वरांत[8] कनकाचें, ।
[9]सनकाचें संवर्तीं सामर्थ्य, तयाच्चियाहि जनकाचें. ॥ ५७
तें ऐकुनि, चिंतेचा[10] झाला ज्ञाताहि सोयरा जीव; ।
बहु कृश विवर्ण[11] तद्वपु[12], जळ सरतां जेविं होय राजीव[13]. ॥ ५८
'हा आपणाहुनि अधिक होइल धनवान् स्वशत्रु संवर्त;' ।
ऐसें म्हणे मनीं, [14]कीं दायादोत्कर्ष तोचि संवर्त. ॥ ५९
ऐकुनि शतमख झाला व्याकुळ[15], [16]कीं हा निवास वपुसा या; ।
गेला सामर[17] गुरुच्या सदना, सुखहानि[18] वासव पुसाया. ॥ ६०
'झालासि पांडु कृश, कां? तुज या स्वर्गींहि[19] खेद कां गमला? ।
आहेत कीं चतुर[20] परिचारक[21]? आज्ञेंत देव? सांग मला.' ॥ ६१

---

१. प्रत्यक्ष शिवाच्या अंकित. २. तो कुबेर. ३. शंकरातें. ४. स्मर. ५. उपाय. ६. शिवस्तुति वगैरे सर्व सांगितलें. ७. राजसेवक. ८. यज्ञामध्यें. ९. सार्थान्वयः—संवर्तीं (संवर्त ऋषीचे ठायीं) सनकाचें [व] तयाच्चियाहि जनकाचें (सनकाच्याही पित्याचें—म्हणजे ब्रह्मदेवाचें) सामर्थ्य (बल) [असे]. सनक हा ब्रह्मदेवाच्या चार मानसपुत्रांपैकीं एक. यांसच कुमारावतार म्हणतात. ब्रह्मज्ञानाचा नष्ट झालेला मार्ग यांनींच उद्धरला. १०. अन्वयः—ज्ञाताहि (सुज्ञ असतांही) जीव (बृहस्पति) चिंतेचा सोयरा (नातेवाईक) झाला. बृहस्पतीनें चिंतेशीं शरीरसंबंध जोडिला अर्थात् तो चिंतातुर झाला. ११. फिकट. १२. तत्+वपु=बृहस्पतीचें शरीर. १३. कमल. कमल पाण्यांतच वाढतें; तेव्हां जलाचा अभाव झाल्यास कमल सुकून जातें. पहा:—'सजीवं दहते चिंता निर्जीवं दहते चिता'—सुभाषित. १४. सार्थान्वयः—कीं (कारण) [जो] दायादोत्कर्ष (भाऊबंदाचा अभ्युदय) तोचि संवर्त (प्रलय, मरण). भाऊबंदकीबद्दल विस्तारानें सांगण्याचें कारण नाहीं. भाऊबंदकीच्या प्रकारानें प्रत्यक्ष गुरुबृहस्पती ह्याच्या मनाची काय स्थिती झाली, हें वर सांगितलेंच आहे. १५. घाबरा. १६. सार्थान्वयः—कीं (कारण) हा (गुरु) या (इंद्रास) वपुसा (शरीराप्रमाणें) निवास (आसरा). १७. स+अमर=देवांसहवर्तमान. १८. सुखाचा नाश पुसाया, दुःखाचें कारण विचारण्यास. १९. स्वर्गांत सुद्धां. इतर ठिकाणीं कृशता, पांडुता, चिंता खेद इत्यादि गोष्टी घडतील पण स्वर्गामध्यें यांचा वाराहि लागण्याचा संभव नाहीं. हें 'ही' पद घालून व्यक्त केलें आहे. २०. कुशल. २१. सेवक.

सुरगुरु म्हणे, 'चतुर परिचारक आहेत, करिति बहु सेवा; ।
सर्वहि निर्जर[1] माझ्या आज्ञेतें धरिति[2] मस्तकीं देवा!' ॥ ६२
शक्र म्हणे, 'सांग तुला दुःखप्रद कोण? त्यासि मारीन, ।
वारीन खेद सर्वहि; बुडतां चिंतार्णवांत तारीन.[3]' ॥ ६३
जीव म्हणे, 'तुज कथितों अतिदुःसह दुःख जें, नयज्ञा! तें. ।
संवर्त मरुत्ताच्या करिताहे साभिमान[4] यज्ञातें. ॥ ६४
संवर्तानें याजन तों[5] न करावेंचि आशयज्ञा[6]! तें, ।
करितां दुराग्रहानें, प्राप्त असावाचि नाश यज्ञातें.' ॥ ६५
शक्र म्हणे, 'सुरगुरु तूं, अजर, अमर, देवपूज्य हा काय[7]. ।
प्राप्त सकळ काम[8] तुला, संवर्त तुझें करील बा! काय?' ॥ ६६
धिषण[9] म्हणे, "तूं कैसा म्हणतोसि स्वायुधांसि? 'असुरा खा, ।
जो जो समृद्ध कोणी, त्याचे नच एक दिनहि असु राखा.' ॥ ६७
[10]जसि जसि समृद्धि अहितीं, तसि तसि चिंतारुजा मनीं वाढे; ।
अमृतरसहि न शके, मग तच्छमनीं[11] काय बापुडे काढे. ॥ ६८
संवर्तातें वारीं[12] किंवा तूं त्या नृपा मरुत्तातें, ।
[13]अस्मत्संगत तृणता, तत्संगत न धरु शिखिमरुत्ता तें." ॥ ६९

---

१ देव. २. शिरसा मान्य करितात. ३. सांवरीन, वांचवीन. ४. आग्रहाला पेटून. ५. तर. ६. अभिप्राय जाणल्या, चतुर इंद्रा! ७. हा तुझा देह. देवपूज्य=देवांनीं ज्याची पूजा केली पाहिजे असा. ८. इच्छा. ९. बृहस्पति. सार्थान्वयः—धीषण म्हणे 'असुरा (दैत्यांस) खा (भक्षण करा, नाश करा) [व] जो जो कोणी समृद्ध (बलाढ्य किंवा संपत्तिमान्) त्याचे असु (प्राण) एक दिनहि (दिवस सुद्धां) नच राखा (ठेवूं नकाच)' [असें] तूं स्वायुधांसि कैसा म्हणतोसि? तुला असें कां बरें वाटतें? तर मग त्याचप्रमाणें माझ्याही शत्रूचा सत्वर नाश व्हावा, असें मलाही वाटणें साहजिक आहे.—असा गुरूच्या भाषणाचा भाव. १०. सार्थान्वयः—जसि जसि (ज्या ज्या प्रमाणानें) समृद्धि (चलती) अहितीं (शत्रूच्या ठाशीं) [वाढे], तसि तसि (त्या त्याच प्रमाणानें) चिंतारुजा (चिंतारूप रोग) [माझ्या] मनीं वाढे (वाढतो). जितकी जितकी शत्रूची चलती अधिक तितकी काळजी अंतःकरणांत अधिक. ११. तो चिंतारूप रोग दूर करण्यांत. १२. निवारण कर. १३. सार्थान्वयः—अस्मत्संगत (आपला उभयतांचा संयोग, स्नेह) तृणता (गवताचें रूप, गवताची स्थिति) [न धरू], [व] तें तत्संगत (त्या दोघांचा संयोग, मेळ) शिखिमरुत्ता (अग्नि व वायू ह्यांच्या संयोगाचें स्वरूप) न धरू. अग्निवायूंपुढें जशी तृणाची, तशी संवृत्तमरुत्तांपुढें आपली दुर्दशा न होवो, हा बृहस्पतीचा भाव. संस्कृतांत भूतकालवाचक धातुसाधित विशेषणाचा नपुंसकलिंगी भाववाचक नामाप्रमाणें प्रयोग करितात, व त्याच मासल्याचा येथील 'संगत' शब्द आहे. संगत (नपुंसक०)=संगति. 'अस्मत्संगति' व 'तत्संगति' असे पाठभेद.

शक्र म्हणे, "**अग्ने**! जा, सांग **मरुत्तास**, 'सख्य [1]उजराया, ।
याजक देतों **गुरु**, हा यज्ञ करुनि, अमर करिल तुज राया." ॥ ७०
जाउनि **अग्नि मरुत्ता** भेटे [2]अद्भुत धरूनियां रूप, ।
बोले सभेंत ऐसें, [3]उद्यत होतां [4]स्वपूजना भूप, ॥ ७१
'[5]बहुसत्कृतिनें न, जसा कार्याच्या सिद्धिनें [6]निवे [7]दूत; ।
[8]परिस, मदुक्ति **हरी**चा आशय राया! तुला निवेदूत. ॥ ७२
नि[9]र्जरगुरु [10]स्रुवातें तव यज्ञांत स्वयें धरिल हातें; ।
जें अमरत्व सुदुर्लभ मर्त्यास, सुलभ तुला करिल [11]हा तें.' ॥ ७३
नरपति म्हणे, 'स्रुवातें **सं**वर्तचि मन्मखीं धरो हातें; ।
करणार **बृ**हस्पति जें याजन माझें, स्वयें करो [12]हा तें. ॥ ७४
[13]कर जोडिले **गुरु**सि, कीं माझा स्रुव धरिल, तरि न साजेल; ।
तो [14]मर्त्ययाजकत्वें **सु**रपतियाजकसभेंत लाजेल.' ॥ ७५
अग्नि म्हणे, 'याजक **गुरु** होइल, तरि, [15]ज्यांत [16]तिळ नसे शोक, ।
[17]त्या [17]शतमखप्रसादें बहु उत्तम पावसील तूं लोक.' ॥ ७६
संवर्त म्हणे, '**अग्ने**! [18]सामें येसिल मखा, [19]संभाजीन; ।
[20]या [20]कार्यास पुन्हा [21]तुज येतांचि [21]पवनसखास [22]भोजीन.' ॥ ७७
[23]जें शुचि निज यश, बुडविल दहनत्वें धरुनि का मदा हा तें? ।

---

१. स्नेहभावांतील बिंग किंवा तेढेपणा काढून टाकण्यास. २. अपूर्व ३. तयार झाला असतां. ४. आपल्या पूजेस अर्थात् अपूर्व रूप धारण करून आलेल्या अग्नीच्या पूजनास. कोणीही आपणाकडे आला असतां, त्यास अर्घ्य व पाद्य देणें हा शिष्टाचार आहे. ५. सादर स्वागत केल्यानें. ६. समाधान पावतो. ७. शिष्टाई करण्यास आलेला. ८. सार्थान्वयः—राया! (राजा मरुत्ता!) मदुक्ति (मत्+उक्ति=माझ्या उक्ती, माझे शब्द) हरीचा (इंद्राचा) आशय (अभिप्राय) तुला निवेदूत (कथन करोत); परिस (ऐक). ९. देवगुरु बृहस्पति. १०. यज्ञपात्रातें, चाटूतें. ११. सुरगुरु बृहस्पति. १२. संवर्त. १३. सार्थान्वयः—गुरुसि (बृहस्पतीस) [मीं] कर जोडिले (हात जोडून, विनयपूर्वक नाकारतों). १४. तो (बृहस्पति) मर्त्ययाजकत्वें (माझ्यासारख्या मनुष्याचा अध्वर्यु झाल्यानें) सुरपतियाजकसभेंत (इंद्राच्या यज्ञकर्त्या पुरोहितांच्या मंडळांत) लाजेल. हा मरुत्ताचा बृहस्पतींला मर्मी लागेल असा टोला आहे. मागें गीति २० पहा. १५. ज्या इंद्राच्या प्रसादांत. १६. लेशमात्र. १७. इंद्राच्या त्या कृपेनें. १८. गुण्यागोविंदानें. १९. पूजीन. २०. मध्यस्थी करण्यास. २१. वाऱ्याचा स्नेही जो त्या तुला. २२. भस्म करीन. २३. सार्थान्वयः—जें निज शुचि यश (शुद्धयश), तें (निज यश) हा (अग्नि) दहनत्वें (आपल्या दाहक शक्तीच्या जोरावर) मदा धरुनि (गर्वातें अंगीकारून, गर्विष्ठ होऊन) बुडविल का? (नाहींसें करील का) अर्थात् नाहीं असा भाव. 'आपल्या अंगीं दाहक शक्ति आहे, तेव्हां हा संवर्त आपलें

भ्याला त्या योगी[१]श्वरनयनाला, स्मरुनि काम[२]दाहातें. ॥ ७८
[३]अश्वत्थपर्णसा तो मुनिवचनें [४]दहन देव कांपविला, ।
चित्तीं म्हणे, 'मुनिपुढें रक्षिल सुरपति न सेव[५]कां प[६]विला.' ॥ ७९
[७]कल्पांतीं ग्रहमंडळ होती, भेटोनि ज्या, तवे दाहें; ।
तो सांगे सुरपतिला स्वर्गीं जाऊनि [८]जातवेदा हें. ॥ ८०
शक्र म्हणे, 'लंघि[९]तसे नृप गुरुतें, जेविं [१०]कुनर पितयातें, ।
[११]वच [११]न [११]करितां, '[१२]पवि शिरीं हाणिन, हें सांग पुनरपि त[१३]यातें.' ॥ ८१
अग्नि म्हणे, "आतां जो बहु पटु वक्ता असेल, तो जावा; ।
गंधर्वराज [१५]हो धृतराष्ट्रचि [१५]कार्यासि नि[१४]पुण योजा[१५]वा. ॥ ८२
वदला संवर्त, 'न तव दर्शन मन्नयन पळहि सोसील' ।
राजाला गुरु द्याया, पुनरपि येतांचि भस्म होसील." ॥ ८३
देवेंद्र म्हणे, 'दहना! कां [१६]अश्रद्धेय आज हें वदसी, ।
[१७]दाहसि, भस्म करिसि तूं; स्पर्श [१८]तुझा भीतिकर,—जसा [१९]सदसी.' ॥ ८४

कसचें भस्म करणार, आपणच उलट त्याला वेचिराख करूं' अशा तऱ्हेची घमेंड अग्नीनें धरिली नाहीं, हें त्यानें फार सुज्ञपणाचें केलें; नाहीं तर त्याचीच शेवटीं फजीती झाली असती, कारण संवर्ताचें तेज असेंच अलौकिक होतें. पाठभेदः—कां मदा हातें.

१. मुनींद्र जो संवर्त त्याच्या डोळ्यास. २. शंकरानें मदनाला जाळिलें त्या प्रकाराला. संवर्त हा शंकराप्रमाणेंच योगीश्वर होता, तेव्हां याचें नेत्रतेजही शंकराच्या तृतीयनेत्रतेजाप्रमाणें असेल असें वाटून व शंकरानें नेत्राग्नीनें मदनाला जाळिलें हें स्मरून, अग्नी घाबरला. ३. पिंपळाच्या पानांप्रमाणें. पिंपळाचीं पानें इतर झाडांच्या पानांपेक्षां जास्त हलतात. 'अश्वत्थ' ह्या शब्दाची व्युत्पत्ति अशी दिलेली आहे. 'न श्वश्चिरं शाल्मलीवृक्षादिवत् तिष्ठति सः.' ४. अग्निनारायण. ५. सेवकांना. ६. वज्राला. ७. सार्थान्वयः—कल्पांतीं (प्रलयकाळीं) ग्रहमंडळ (सूर्यादि समुदाय) ज्या (ज्या अग्नीला) भेटोनि (शिवून, भिडून, जवळ येऊन) दाहें (उष्णतेनें) तवे होती (चुलीवर अतिशय उष्णतेनें लाल झालेल्या पोळीच्या तव्यांप्रमाणें तापून लाल होतात). ८. अग्नि. संस्कृत शब्द 'जातवेदस्' असा असून, त्याचें प्रथमेचें एकवचन 'जातवेदाः' असें होतें; ह्यांतील विसर्गाचा लोप होऊन 'जातवेदा' असा शब्द प्राकृतांत आला आहे. ९. अवमानितो. १०. दुष्ट मनुष्य. जे दुष्ट तेच वडिलांचा अवमान करितात, असें पंतांनीं म्हटलें आहे. ह्यावरून गुरुभक्तिसंबंधानें त्यांची केवढी आदरबुद्धि होती, हें व्यक्त होतें. पित्याची आज्ञा पाळणें, हें मुलाचें आद्य कर्तव्य आहे. **ते पुत्रा ये पितुर्भक्ताः**, स पिता यस्तु पोषकः । तन्मित्रं यत्र विश्वासः, सा भार्या यत्र निर्वृतिः ॥ (चाणक्यनीति, २।४.) ११. माझें म्हणणें मान्य न केल्यास. १२. वज्र. १३. मरुत्तातें. १४. कुशल, पटु. १५. हा कार्यासि योजावा=यास कामगिरी द्यावी; याच्याकडे काम सोंपवावें. १६. ज्यावर विश्वास बसणार नाहीं असें. १७. जाळितोस. १८. पाठभेद—करी. १९. सत्+असि=उत्तम खड्ग, तीक्ष्ण तरवार.

वन्हि म्हणे, 'शक्रा तूं तेजस्वि[1]प्रवर, त[2]दपि तुज [3]भारी ।
[4]भेटे वृत्र; कसा जरि म्हणसि, तया कोण अन्य सुर मारी ? ॥ ८५
[5]स्मृति आहे कीं नाहीं तुझिया हृदयांत देववर्या ! ती ? ।
[6]दस्रांसि सोम द्याया करिता झाला मखासि [7]शर्याती. ॥ ८६
गेलासि च्यवनशिरीं घालाया देवनायका ! पविला; ।
त्वां तेजें त्याचा, कीं तेणेंचि तुझा सुकाय कांपविला ? ॥ ८७
निर्मुनि [8]मदासुरातें, [9]हरि तव सुरनायका ! यश च्यवन; ।
[10]वद सत्य, होत होतें स्वावन तरि ? पुसुनि काय शच्च्यवन ? ॥ ८८
मददेहकथाकथनचि [11]दारुण, [12]तद्दंत काय शतगावें ! ।

---

१. बलवच्छ्रेष्ठ. २. तथापि. ३. जड, आवरण्यास कठिण. ४. सार्थान्वयः—शक्रा ! तूं तेजस्विप्रवर, तदपि तुज भारी [असा] वृत्र भेटे; [तो] कसा [भारी] [असें] जरि म्हणसि (विचारशील), तर तया कोण (कोणता) अन्य सुर मारी. जर तो खरोखरच भारी नसता, तर तुला देवेंद्राला त्याबरोबर झगडण्याचें कारणच पडलें नसतें. तो इतर देवांस आंवरेना, तेव्हांच त्याची तुझ्याशीं गांठ पडली. ५. आठवण. ६. अश्विनीकुमारांस. ७. हा राजा असून वेदांत फार पारंगत होता. ह्यास सुकन्या नामक मुलगी होती. ही कोणे एके वेळीं पित्या-बरोबर बाहेर गेली असतां, एका वारुळांत कांहीं चकाकलेंसें तिला दिसलें; तिनें त्या वारुळांत काठी घातली; ती काठी त्या वारुळांत रहात असणाऱ्या च्यवननामक ऋषीच्या डोळ्यास लागून त्या योगें त्यास अंधत्व आलें; व तो च्यवन ऋषी कोपयुक्त झाला, तेव्हां त्याचा कोप शांत करण्या-करितां, शर्याति राजानें तीच मुलगी त्यास दिली. पुढें अश्विनीकुमार (देववैद्य) ह्यांच्या प्रसादानें च्यवन ऋषीस पुनरपि दृष्टि प्राप्त झाली व त्याचा देह उत्तम झाला. ह्या उपकाराची फेड कर-ण्याच्या बुद्धीनें, पूर्वीं अश्विनीकुमारांस यज्ञामध्यें हविर्भाग मिळत नसे, तो देण्याचें च्यवन ऋषीनें ठरविलें व शर्याति राजाकडे जाऊन, त्याजकडून यज्ञ करवून, त्यांत अश्विनीकुमारांस हविर्भाग दिला. ही गोष्ट इंद्रास सहन झाली नाहीं व त्यानें च्यवन ऋषीस मारण्याकरितां वज्र उगारिलें, तेव्हां त्याचा हात जागचे जागींच खिळून राहिला, व च्यवन ऋषीनें मदनामक दैत्य निर्माण करून त्यास इंद्रावर पाठविलें. तेव्हां इंद्र च्यवन ऋषीस शरण गेला व त्यानें मदासुराचें निवारण केलें. ८. मदनामक दैत्यातें. ९. हरण करिता झाला. १०. सार्थान्वयः—वद सत्य (खरें सांग), स्वावन तरि होत होतें [का?] (नुसतें स्वतःचें संरक्षण तरी तुला करितां येत होतें का ?) [मग] शच्च्यवन (शची+अवन=इंद्राणीचें संरक्षण) पुसुनि काय ? (इंद्राणीचें संरक्षण करितां येण्यालेगें होतें कीं नाहीं हें विचारून काय करावयाचें ? अर्थात् ती तर गोष्ट लांब राहिली, कारण स्वतःच्याच संरक्षणाची पंचाईत पडलेली—असा भाव. ११. भयंकर, भीतिप्रद. १२. त्याचे नुसते दांतच काय ? [तर] शंभर शंभर गावें लांबरुंद ! पाठभेदः—ते दंत.

त्वत्तुल्यशतांचें तरि पावुनि त्या अंतका यश तगावें? ॥ ८९
च्यवन शरणागतातें बा! तूतें परमसभयदेहातें, ।
स्मरतें आम्हां सर्वां, धरितां जें चरण अभय दे हातें. ॥ ९०
क्षात्रबळाहुनि शक्रा! परम गुरु ब्रह्मबळ, पहा नीट; ।
संवर्तासीं निष्ठुर बोलायालाहि मी नव्हें धीट.' ॥ ९१
शक्र म्हणे, "वदसी जे ब्रह्मबलोत्कर्ष तूं, न ते लटिके; ।
रसिकपरीक्षेंत जसें सरसत्वें घृत, तसें न तेल टिके. ॥ ९२
संवर्त असो; परि त्या आविक्षितनृपबळासि वचकोनी, ।
केसरिभयें शशातसा, मी वज्री हरि बसेन नच कोनीं. ॥ ९३
करिल मरुत्तशिराचें चूर्णचि मद्बाहुमुक्त शतकोटी; ।
वधिले असतिल ऐसे म्यां श्रीमदमत्त दुष्ट शत कोटी. ॥ ९४
ये धृतराष्ट्रा! जा, त्या सांग मरुत्तासि या निरोपातें, ।
'अनुसरतोसि गुरुसि, कीं तव मस्तक अशनिच्या विरो पातें?'" ॥ ९५
गंधर्वराज जाउनि, भेटुनि, ऐसें म्हणे मरुत्तातें, ।
"आज्ञापितो तुज प्रभु, केला उत्पन्न जो मरुत्तातें, ॥ ९६
'याजक बृहस्पतीतें करितोसि मखीं, करूनि नमना, कीं ।

---

१. त्या अंतका (त्या सर्वज्ञ मदासुराला) पावुनि (भेटोनि, सामना करून) त्वत्तुल्यशतांचें (त्वत्+तुल्य+शतांचें=तुझ्यासारख्या शंभरांचें) तरि यश तगावें (टिकावें) [काय]? तुझ्यासारख्या शंभरांचीही दाद त्याच्या पुढें लागली नसती, मग तुझ्या एकट्याची काय गोष्ट? असा भाव. २. सार्थान्वयः—परमसभयदेहातें (अत्यंत भयाकुल झालें आहे शरीर ज्याचें त्यातें) शरणागतातें (शरण आलेल्यास) तूतें, चरण धरितां (पायांवर लोळण घातली तेव्हां) च्यवन जें अभय हातें (हातानें) दे (आश्रय देता झाला, पाठीशीं घाली) [तें] आम्हां सर्वां स्मरतें (त्याची आम्हां सर्वत्रांस आठवण आहे). ३. क्षत्रियसामर्थ्यापेक्षां. ४. फार भारी. ५. ब्राह्मणसामर्थ्य. ६. ब्राह्मणसामर्थ्याचें मोठेपण. ७. खोटे. ८. खऱ्या जाणत्यानें लाविलेल्या कसोटींत, खऱ्या मर्मज्ञानें केलेल्या परीक्षेंत. ९. चविष्टपणांत. १०. सार्थान्वयः—संवर्त असो (संवर्त ऋषीची गोष्ट सोडून द्या); परि (परंतु) त्या आविक्षितनृपबळास (अविक्षित राजाचा पुत्र जो राजा मरुत्त त्याच्या सामर्थ्यास) वचकोनि (भिऊन), केसरिभयें (सिंहाच्या भीतीनें) शशातसा (सशाप्रमाणें) मी वज्री (वज्रायुध) हरि (इंद्र) कोनीं (कोपऱ्यांत) नच बसेन. ११. माझ्या हातांतून सुटलेलें. १२. वज्र. १३. लक्ष्मीच्या गर्वानें ताठलेले. १४. कोट्यवधि. १५. किंवा. १६. वज्राच्या. १७. चूर्ण होवो. १८. पतनानें, आघातानें. १९. इंद्र. २०. मरुत्+तातें=देव+पित्यानें=कश्यप मुनीनें. २१. अध्वर्यु.

वधुनि तुज करूं उत्सव, जेविं बळवधीं, तयाचिसम नाकीं.'"॥ ९७
त्यासि मरुत्त म्हणे, 'कां तें कथितां, श्रोत्रें ज्यामुळें मैळतें; ।
शिवशिव ! मित्रद्रोह ब्रह्मवधसमान हें तुला कळतें. ॥ ९८
देऊ, जें यश दे तो गुरु शक्रा करुनि याजना, हा तें; ।
याजक संवर्त प्रभु तर्पूं अर्पूनि या जना हातें.' । ९९
धृतराष्ट्र म्हणे, 'आला सुरपतिचा घोर नाद हा कानीं, ।
क्षेमसमय गेल्यावरि, फिरविल मागें न पाद हाकांनीं.' ॥ १००
ऐके मरुत्त, वज्री, येतां स्ववधार्थ, गर्जना करि, तें; ।
ये सिंह जेविं धांवत माराया, करित तर्जना, करितें. ॥ १०१
भूप म्हणे, 'संवर्ता ! तूं श्रितसुरनग, न या नरा खावें ।
काळेंहि, काय पवि? हें स्वयशाचें गगनयान राखावें. ॥ १०२
हा वज्रधर, अमानुष घोष करित, येतसे महातेजा, ।
तेज दिसतसे, झाले बहु भीत सदस्यजन पहाते ज्या.' ॥ १०३
संवर्त म्हणे, 'राजा ! स्वस्थ रहा, किमपि भय नसे तूतें; ।
जलधिस सुखें तरावें, अवलंबुनि शेषशयनसेतूतें. ॥ १०४

---

१. अन्वयार्थः–जेविं बळवधीं (बलनामक दैत्याच्या हननाचे वेळीं), तयाचिसम (तसाच) उत्सव तुज वधुनि (मारून) नाकीं (स्वर्गामध्यें) करूं? टीपः–बल हा दनायूच्या पुत्रांतील एक. यास इंद्रानें मारिलें. २. जें ऐकिलें असतां श्रोत्र (=कान) दूषित होतात; जें ऐकून कानांना पाप लागतें. ३. देवो. ४. यशातें. ५. संवर्त. ६. सबंध गीतीचा सार्थान्वयः–जें यश तो गुरु (बृहस्पति) याजन करुनि शक्रा दे, तें हा (संवर्त) [मला] देऊ. प्रभु (इंद्र) याजक संवर्त हातें (आपल्याच हातानें, आपण होऊनच) अर्पूनि (देऊन), या जना (मला मरुत्ताला) तर्पूं (आनंदित करू). इंद्रानें असा हट्ट न धरितां, आपण होऊनच संवर्ताला माझें याजन करण्यास सांगावें, हेंच त्यास उचित–हा मरुत्ताचा मतलब. ७. भयंकर गर्जना. ८. कानीं येणें=ऐकूं येणें. ९. कल्याणाची किंवा संरक्षणाची सोन्यासारखी संधि. १०. अन्वयः–हाकांनीं (रडण्यानें किंवा विनविण्यानें) पाद (पाय) मागें न फिरवील. अर्थात् ही स्वसंरक्षणाची संधि दवडून, नंतर जरी तूं कितीही ओरडत बसलास, तरी इंद्र आपलें पाऊल मागें न घेतां, तुझा नाश करीलच करील, असा भाव. ११. पाठभेदः–येतो. १२. भीति दाखवीत, दर्डावीत. १३. हत्तीला. १४. आश्रितांचा कल्पवृक्ष. १५. आपल्या कीर्तीचें विमान, आपलें लौकिकरूपी विमान. गगनयान=आकाशांतील गाडी, विमान. १६. राक्षसी, भयंकर. १७. मोठें आहे तेज ज्याचें असा. हें 'वज्रधर' ह्याचें विशेषण. १८. सभेंतील लोक. १९. ज्या तेजातें पाहणारे. २०. शेष आहे शयन ज्याचें असा विष्णु तोच पूल त्यातें.

म्यां संस्तंभन[1]विद्या [2]शक्रास्त्रस्तंभनार्थ [3]आठविली, ।
[4]महिषावरि [5]दुर्गासी, हरिकोपावरि मघांचि पाठविली. ॥ १०५
झालें [6]वारापाणी वज्र, तव भयेंचि देव कांपावे; ।
माग वर, [7]महेश्वरसा हाही संवर्त सेवकां [8]पावे.' ॥ १०६
नमुनि मरुत्त म्हणे, 'बा! यावा [9]सामर महेंद्र मद्यजना, ।
[10]वैरें असेव्य गमावें त्याला, [11]शिष्टां जसेंचि मद्य [12]जना.' ॥ १०७
संवर्त म्हणे, "राजा! हो स्वस्थ, त्यजुनि सर्व [12]संत्रास, ।
झाला अवैर हरि, '[13]अहि निर्विष[14]' जपतांचि जेविं मंत्रास. ॥ १०८
हा आला सोमातें प्राशाया, त्यजुनियां विरोधा त्या; ।
[15]म्हणतो, 'मत्सर करितां जन लज्जेनें मनीं विरो, धात्या!' " ॥ १०९
[16]वारिदपंक्ति जसें जळ, सज्जनसंगति तसेंचि सुख [17]विखरी; ।
[18]मातेपरिस [19]शतगुणें [20]सच्छरणागति जनासि सुखवि खरी. ॥ ११०
सुब्राह्मणतेजाला सर्वसुरसमूह [21]वशतम खरा, ज्या ।
'[22]वधिन' म्हणे, त्या मानी आत्म्याहुनि अन्य न शतमख राजा.॥ १११
संवर्तसह मरुत्त प्रभु सामोरा [23]शचीवरा गेला; ।
वाटे परम प्रियसख शतमख, चित्तीं कधीं न [24]रागेला. ॥ ११२
पूजी मरुत्त [25]उत्तमवस्त्रमणिस्वर्णि [26]नाकपाळाला, ।
[27]त्या सुमहाभागाच्या कोण सुधी वर्णिना कपाळाला? ॥ ११३

---

१. ह्या विद्येच्या योगानें कोणतीही वस्तु जेथल्या तेथेंच खिळवून टाकतां येते. २ इंद्रानें फेंकिलेलें आयुध जेथल्या तेथेंच थबकावें म्हणून. ३. स्मरली, जपली. ४.-महिषासुरावर. ५. दुर्गादेवीप्रमाणें. ६.निष्फळ, दुर्बळ. वज्र वारापाणी झालें=वज्र व्यर्थ झालें. ७.सांबाप्रमाणें. ८.प्रसन्न होऊन वर देतो, इच्छित फल देतो. ९. सर्व देवांसह. १०. वैर असेव्य गमावें=वैर करणें अयोग्य, असें त्यास वाटावें. ११. सभ्यास, सदाचारी मनुष्यास. १२. संताप, भयें. १३. साप. १४. विषहीन. १५. अन्वयार्थ:-धात्या (हे विधात्या, ब्रह्मदेवा), मत्सर करितां जन लज्जेनें मनीं विरो (विरघळून जावो, मनांत लज्जेमुळें खजील होवो); [असें] म्हणतो. १६. मेघमाला. १७. पसरी. १८. आईहून अधिक. १९. शेंकडों पटीनें. २०. सज्जनास शरण जाणें. २१. पूर्णपणें अंकित. २२. सार्थान्वय:-[शतमख] ज्या [राजा] 'वधिन' म्हणे, त्या राजा शतमख (इंद्र) आत्म्याहुनी अन्य न मानी (आपल्याहून भिन्न असें मानीत नाहींसा झाला). २३. शचीपति इंद्र, त्यास. २४. रागावलेला, संतापलेला. २५. उत्कृष्ट वस्त्रें, जवाहीर व सुवर्ण ह्यांहीं, ह्या वस्तूंची भेट अर्पण करून. २६. नाक+पाळाला= स्वर्गाचें पालनकर्ता इंद्र त्याला. २७. अन्वयार्थ:-त्या सुमहाभागाच्या (अत्यंत भाग्यवानाच्या, मरुत्त राजाच्या] कपाळाला (सुदैवाला) कोण सुधी (शहाणा) वर्णिना? अर्थात् प्रत्येक सुज्ञ वर्णीलच.

संवर्त म्हणे, '[1]तूं या नृपतिस, प[2]द्मास तपनसा, मा[3]न्य. ।
शक्रा! तव प्रसादें हा[5] मख, माझेंहि तप न सामान्य.' ॥ ११४
भूप म्हणे, 'सौम्या[4] हो तव दृष्टि त्रिदिवभ[6]वनदीपा! हे, ।
यो[7]ग्यायोग्य असें न प्रभुपादांगुष्ठभवनदी पाहे. ॥ ११५
हा माझा मखकर्ता, अ[8]नुज परि त[9]साच सत्य जी[10]वांचा; ।
गंगा शु[11]चितेसि, तसी ज्याची [12]संधेसि न त्यजी वाचा.' ॥ ११६
इंद्र[13] म्हणे, 'तव गुरुतें जाणें, बहुधा कवि प्रयास महा ।
करिती; पवितीव्रत्वें याचा बहु धाक; विप्र यासम हा. ॥ ११७
गेला[14] मजही सोडुनि हाता पसरून कोप सारा या; ।
तव गुरुचि अगद जोडुनि, हा ताप सरू; नको पसा राया! ॥ ११८
[15]मी काय? [16]विधि [17]हरि [18]हरहि [19]यांच्या न [20]विलंघितील [21]आव्हाना, ।
[22]राजाजी! धन्य तुम्ही कां अवलंबुनि अशाहि या व्हा ना?' ॥ ११९

---

१. इंद्र. २. सूर्याप्रमाणें. ३. ग्राह्य, पूज्य. ४. शांत, सकरुण. ५. होवो. ६. स्वर्गलोकरूप गृहांतील दीपका! हे इंद्रा! ७. प्रभु+पाद+अंगुष्ठ+भव+नदी=विष्णूच्या पायाच्या आंगठ्यापासून जन्म पावलेली (निघालेली) नदी अर्थात् गंगा योग्यायोग्य असें न पाहे (हें योग्य व हें अयोग्य, असा भेद करीत नाहीं). ती सर्वत्रांचा सरसकट उद्धार करिते, त्याप्रमाणें हे इंद्रा, तूं मनामध्यें कांहीं एक राग न ठेवितां सकरुण हो, असा गीतीचा भाव. ८. धाकटा भाऊ. ९. त्याचप्रमाणें. १०. बृहस्पतीचा. ११. पवित्रतेस. १२. प्रतिज्ञेस. ज्याची वाचा संधेसि न त्यजी=ज्याचा शब्द प्रतिज्ञेंत (एकदा बोललेल्या गोष्टींत) बदल होऊं देत नाहीं. १३. सार्थान्वयः—इंद्र म्हणेः—[मी] तव गुरुतें जाणें; कवि (शाहणे, हुशार मनुष्य) [आपली प्रतिज्ञा तडीस नेण्यासाठीं) बहुधा (नाना तऱ्हांनीं) महाप्रयास (प्रचंड खटपट) करिती; पवितीव्रत्वें (याच्या वज्रकठोरतेनें, याच्या अंगच्या वज्रासारख्या निश्चयदृढतेनें) याचा (संवर्ताचा) बहु धाक (भीति) [आहे]; यासम (ह्याच्यासारखा) विप्र हा[चि] (ह्या ब्राह्मणास उपमाच नाहीं, ह्याच्यासारखा हाच). १४. सार्थान्वयः—सारा कोप (सगळा राग) या (ह्या संवर्ताला) हाता पसरुनि (ह्या संवर्तापुढें हात टेंकून, ह्याच्या पुढें कांहीं चालेनासें होऊन) मजहि (मलासुद्धां) सोडुनि गेला, (ह्याच्या पुढें माझाही कोप नाहींसा झाला); तव गुरुचि अगद (तुझा गुरु संवर्त हेंच औषध, तव गुरुरूपी औषध) जोडुनि (लाभून), हा ताप (त्रास, दुःख पक्षीं ज्वररोग) सरू (निरसू, उतरो, नाहींसा होवो); हे राया! [तुझा] पसा नको (तुला हात जोडण्याचें कारण नाहीं, माझ्या विनवणी करण्याचें प्रयोजन नाहीं). उत्तरार्धाचा पाठभेदः—हा ताप सरून कोपसा राया. १५. मी इंद्रच काय? माझी काय कथा? १६. ब्रह्मदेव. १७. विष्णु. १८. शंकरसुद्धां. १९. संवर्ताच्या. २०. ओलांडतील, नाकारतील. २१. आमंत्रणास, शब्दास, बोलावण्यास. २२. अन्वयार्थः—राजाजी! या अशाहि अवलंबुनि (अशा सारख्यांचा आश्रय धरून) तुम्ही धन्य (कृतार्थ) कां ना व्हा? (कां होणार नाहीं)?

संवर्त म्हणे, 'जरि तूं प्रसन्न, तरि तुंज दयानिधानातें[१] ।
उचित[२] विनवितों, स्वमुखें सांग सवांत[३] स्वयें[४] विधानातें[५].' ॥ १२०
त्या[६] स्वमखांत शतमखप्रभुसि म्हणे विप्र 'कारभारी हो;' ।
बहुमानचिं वाटे[७] तो तैसाही विप्रकार भारी हो! ॥ १२१
अत्यद्भुत[८] हरिमुख[९] सुर, त्या संवर्तासि नमुनि, राबति[१०] तें; ।
केले[११] अमर नर, सुधा जी मग, करि काय न मुनि राब तितें? ॥ १२२
आवसथसभास्थानें[१२] विविधें शोभावयासि मख रचिते ।
सुर, गमति, करिति यज्ञश्रीच्या फलशोभनार्थ मखरचि ते. ॥ १२३
साहित्य[१३] करिति धनपति[१४], विश्वे[१५], वरुण[१५], सोम[१५], वसु[१५], मरुत्[१५], तरणी[१६]; ।
जाणों[१७] आणी अरि, परिभउनि तयां वीरवर मरुत्त रणीं. ॥ १२४
सेउनि[१८] सोमरसातें सकळसुरसमाजसहित शतमन्यू[१९] ।
स्वर्गासि जाय होउनि सत्कृत[२०] सानंद साश्रु[२१] गतमन्यू[२२]. ॥ १२५
यापरि मरुत्तराजा यज्ञ करि; पदोपदीं[२३] कनकराशी, ।

---

१. दयेचें माहेर असा जो तूं त्या तुला. २. योग्य रीतीनें, साजेसें. ३. यज्ञांत. ४. तूं स्वतः. ५. व्यवस्थेतें. ६. सार्थान्वयः—त्या शतमखप्रभुसि (इंद्रास) विप्र (संवर्त) स्वमखांत (आपण चालवीत असलेल्या यज्ञांत) कारभारी हो [असें] म्हणे. हो! (अहो) तो तैसाही (तशा प्रकारचा सुद्धां) विप्रकार (कमीपणा) भारी (मोठा) बहुमानचि वाटे. ७. पाठभेदः—वाढे. ८. विलक्षण, अपूर्व. ९. इंद्रप्रमुख. १०. काम- खटपट—करितात, झटतात. ११. सार्थान्वयः—अमर (देव) नर केले (देवांस माणसांप्रमाणें राबविलें), मग जी सुधा, तितें मुनि राब (काकवीच्या खालची साक किंवा गाळ) न करील काय? करीलच. मुनि कर्तुमकर्तुं समर्थ आहे, असा भाव. १२. सार्थान्वयः—मख शोभावयासि (यज्ञास शोभा यावी म्हणून) विविधें (निरनिराळीं) आवसथसभास्थानें (अग्निगृहें व सभा) रचिते (तयार करणारे) ते सुर यज्ञश्रीच्या (यज्ञरूपलक्ष्मी अथवा यज्ञाची शोभारूप स्त्री, तिच्या) फलशोभनार्थ (गर्भाधानाकरितां) मखरचि करिती (बांधतात), [असे] गमति (दिसतात). मुलगी प्रथम ऋतुमती झाली असतां मखर वगैरे बांधण्यांत जी हौस दृष्टी पडते, तीच हौस ह्या वेळीं अग्न्यागारादि बांधण्यांत प्रत्यक्ष देवांमध्यें दिसत होती. १३. सामग्री तयार करूं लागले. १४. कुबेर. १५. देवविशेष. 'वसु' ऐवजीं 'यम' असा अन्य पाठ. १६. सूर्य. १७. सार्थान्वयः—जाणों (जणुं कांहीं) रणीं (रणांगणामध्यें) अरि (शत्रू) परिभवुनि (पराभव करून) तयां (शत्रूंतें) वीरवर (वीरश्रेष्ठ) मरुत्त आणी (आणिता झाला). १८. ग्रहण करून. १९. इंद्र. २०. सन्मानिलेला. २१. गहिंवरलेला असा. २२. नष्टक्रोध, शांत. २३. उत्तरार्धासह अन्वयार्थः— कनकराशी (सुवर्णाचे ढीग) नेतां नेतां भूमिसुजनकराशीं (ब्राह्मणमंडळाच्या हातास) बहु विटवुनि (थकवुनि) पदोपदीं (पावलीं पावलीं) उरले. मरुत्त राजानें ब्राह्मणांस यज्ञामध्यें इतकें अपार द्रव्य दिलें होतें, कीं ते द्रव्यराशी नेतां नेतां ब्राह्मणांचे हात भारावून थकले व पावलोपावलीं ते सुवर्णराशी टाकीत गेले, असा भाव.

नेतां नेतां उरले, बहु विटवुनि भूमिसुरजनकराशीं. ॥ १२६
तें आणावें, होइल सांग[१] तुझा[२] अश्वमेध त्या वित्तें; ।
कथिलें तसें करावें त्वां माझें[३] वचन सादरें[४] चित्तें." ।' १२७

अध्याय दुसरा.

शांतनवाचें उत्तरकार्य[५] करुनि सांग[६] सर्व तो धर्म, ।
धर्में नयें[७] प्रजांतें परिपाळुनि, दे नवे नवें शर्म[८]. ॥ १
धर्मातें पुसुनि, प्रभु[९] इंद्रप्रस्थासि[१०] जिष्णुसह गेला, ।
केला शिल्पोत्कर्ष[११] प्रचुर[१२] मयें[१३] जींत[१४], तींत[१५] तो ठेला[१५]. ॥ २
सांपडला जिष्णुसह क्रीडाया दासमानदा[१६] समय, ।
करुणाब्धिस[१७] सुखवाया उचितचि यादासमान दास मय. ॥ ३
प्रभु आज्ञेंत[१८] वसुनि[२०] बहु[१९] मानुनियां[१९] नित्य जेविं धर्मास, ।
तेविं सभेंत बसुनि बहुमानुनि, दे[२१] त्यां[२१] मयास शर्मास[२२]. ॥ ४
तेथें मनास सहसा परमसखकथाप्रसंग[२३] आठव[२३] दे; ।
म्हणुनि प्रभुला अर्जुन, देउनि[२४] उरल्या[२५] कथांसि पाठ, वदे. ॥ ५
'कृष्णा! युद्धारंभीं त्वां स्वसख्या[२६] परम मुह्यमाना[२६] यां[२६], ।

---

१. परिपूर्ण, यथास्थित. २. धर्माचा. ३. माझें, व्यासाचें. ४. आदरयुक्त अंतःकरणानें. ५. अन्त्यविधि. ६. यथाविधि. ७. शास्त्रानुसार व न्यायानें. ८. हरएक प्रकारचें कल्याण, सुख. ९. श्रीकृष्ण. १०. ह्या पुरीस 'हरिप्रस्थ' 'शक्रप्रस्थ' इत्यादि नांवें आढळतात. ही इंद्रप्रस्थ पुरीच हलींचें दिल्ली शहर असें मानितात, तथापि इंद्रप्रस्थ ही पुरी यमुना नदीच्या डावे तीरास होती व दिल्ली शहर उजवे तीरास आहे. ११. शिल्प+उत्कर्ष=शिल्पकला (बांधकामाच्या चातुर्याची) कमाल. १२. पुष्कळच. १३. मयासुरानें. १४. ज्या सभेंत. १५. त्या सभेंत राहिला. १६. दास+मान+दा= सेवकाला मान देणाऱ्यातें, श्रीकृष्णाला. १७. सार्थान्वयः—यादासमान (जलजंतूप्रमाणें) सुखवाया (सुखी करण्याला) मय (मयासुर) [हा] दास करुणाब्धीस (दयासागर जो कृष्ण त्यास) उचितचि (खास योग्य) [होता]. १८. आज्ञेंत राहून, आज्ञा पाळून. १९. अत्यंत मान देऊन. २०. पाठभेदः—वसुनि. २१. पाठभेदः—दैत्या. २२. सुखाला, आनंदाला. २३. सहज बोलत असतांना, [आपला] परम स्नेही जो श्रीकृष्ण, त्यानें सांगितलेल्या गीतेच्या प्रसंगाचें स्मरण [अर्जुनास] झालें. आठव=स्मरण. '°मखकथा°' असा पाठभेद. २४. उरल्या कथांसि पाठ देउनि= बाकीच्या गप्पा एका बाजूस ठेऊन. २५. पाठभेदः—उरत्या कथांस आठ वदे. २६. या अत्यंत मूढ झालेल्या आपल्या मित्राला [=मला अर्जुनाला].

धर्मा[1] मानित[1] नसतां[1], कथिलें जें शास्त्रगुह्य[2] मानाया[3], ॥ ६
तें विसरलों, तरि मला सांग पुन्हा वृष्णिनायका! सार[4]; ।
जलदानें[5] जलदानें[6] पुनरपि भरिजे[7] न काय कासार[7]?' ॥ ७
कृष्ण म्हणे, 'श्रितमति[8] उपदेशामृत पिउनि, मज गमे धावी[9];
म्हणउनि रहस्य कथिलें तुज, परि तूं **अर्जुना**! न मेधावी[10]. ॥ ८
आतां तें काय पुन्हा सांगावें? त्यासि पात्र मेधावी; ।
उपदेशासि मति, जसी गीतासि मृगी, तसीच वेधावी[11].' ॥ ९
ऐसें वदोनि, **विभुनें** कथिली त्या **अर्जुनासि** अनुगीता[12], ।
दुसरी **ब्राह्मणगीता**[13], जी **अमृतनदी** भवोग्रदवभीता[14]. ॥ १०
तिसरा **गुरुशिष्यांचा**[15] कथिला **संवाद**[15] आयकायाचा[16]; ।
ज्याच्या[17] श्रवणें, **स्नानें मळसा**, अभिमान जाय कायाचा. ॥ ११
मग **देव** म्हणे, '**पार्था**! आतां प्रार्थूं नको रहायास, ।
तव संमतें[18] पित्यातें, **रामातें**[19], इच्छितों पहायास[20].' ॥ १२
जिष्णु[21] म्हणे, '**धर्मातें** प्रार्थूनि निरोप देववेिन, यश तें ।

---

१. स्वधर्माची (=क्षत्रियधर्माची) हेळसांड करीत असतां. २. वेदान्तरहस्य. ह्या गीतींतील 'जें' ह्या संबंधी सर्वनामाचा संबंध पुढील गीतींतील 'तें' ह्याकडे आहे. तेव्हां दोन्ही गीति मिळून अन्वय करावा. ३. [स्वधर्माला—क्षात्रधर्माला] मानावें म्हणून. ४. सारांश, तात्पर्य, मथितार्थ. ५. मेघानें. ६. जल+दानें=उदक देऊन अर्थात् वृष्टीच्या योगें. ७. सरोवर भरावें. ८. आश्रितांची बुद्धि. ९. तृप्त व्हावी. १०. बुद्धिवान्. ११. हरिण हें जनावर फार नाद-लुब्ध आहे; तशी मनुष्याची चित्तवृत्ति उपदेशाविषयीं असावी. १२. अनुगीता हें प्रकरण अश्वमेधपर्वांत १६-१९ या अध्यायांत आहे. १३. ब्राह्मणगीता हें प्रकरण अश्वमेधपर्वांत २०-३४ अध्यायांत आहे. १४. भव+उग्र+दव+भीत=संसाररूप भयंकर वणव्यानें भय पावलेल्यास. १५. गुरुशिष्यसंवाद हें प्रकरण अश्वमेधपर्वांत ३५-५१ अध्यायांत आहे. १६.सुश्राव्य, ऐकण्याजोगा. १७. अन्वयार्थः—स्नानें कायाचा (देहाचा, शरीराचा) मळसा (घाणीसारखा) ज्याच्या (गुरुशिष्य-संवादाच्या) श्रवणें (ऐकण्यानें) कायाचा अभिमान (देहाभिमान, देहबुद्धि), जाय (निश्चयेंकरून नाहींसा होतो). १८.तुझ्या अनुमतीनें, विचारानें. 'त्वत्संमतें' असा पाठभेद. १९.बलरामातें. २०. भेटावयास. इंग्रजी 'To see' व संस्कृत 'दृश्' हेही याच अर्थी योजितात. २१. सार्थान्वयः—जिष्णु (अर्जुन) म्हणेः—धर्मातें प्रार्थुनि (विनंति करून) निरोप देववीन, (त्याच्याकडून आपल्या जाण्यास रुकार देव-वीन]. जो देव विनयशतें (शेंकडों प्रकारच्या नम्र भावांनीं, अत्यंत नम्रतेनें) सेव्य (सेवा करण्यास योग्य), [तोच] भक्ता (आपल्या सेवकाला) गुरु (गुरूप्रमाणें पूज्य) करी (मानी), तें [प्रभुचें] यश (कीर्ति) काय वदावें (किती वर्णावें?). भक्तालाच उलट बहुमान देण्याची ही भक्तप्रिय प्रभूची लीला केवळ वर्णनातीत आहे,हा गीतीचा भाव. 'नतां करुनि मुक्तही म्हणसि,मी बुडालों रिणें' (केकावली

काय वदावें? गुरु करि भक्ता जो सेव्य देव विनयशतें. ॥ १३
इंद्रप्रस्थाहुनि ते [1]कृष्ण प्रभु [2]गजपुरासि मग आले, ।
झाले [3]नत धर्मपदीं; तद्वाक्पद[4]दर्शनामृतें [5]धाले. ॥ १४
[6]दुसरे दिवशीं कृष्णा जायास निरोप देववी, राजा ।
धर्मा विनउनि तो, बहु मानवले सर्व देव वीरा ज्या. ॥ १५
धर्म म्हणे, '[7]पितरांतें भेट, तुला शीघ्र आणविन [8]यज्ञा; ।
[9]तेथें आह्मांसह या स्वसख्या स्मरणांत आण, विनयज्ञा! ॥ १६
कृष्णा! निज[10]पितरांतें तूं पाय धरूनि सांग [11]मन्नमनें, ।
तव दर्शन सुहृदांच्या, क्षुधितांच्या [12]ध्येयें जेविं अन्न मनें. ॥ १७
जें जें [13]मनोज्ञ, ने, धन, गज, हय, रथ, रत्न, [14]वासस, वस्तु, [15]तया; ।
[16]माज्या सर्वस्वा तूं पात्र सलोकेशवासवस्तुत या.' ॥ १८
कृष्ण म्हणे, 'आहे जें येथें, सर्वस्व होय हें [17]माजें; ।

११); 'भक्तीनें वश सत्पतीस करिती साध्वी मला मज्जन । प्रेमांभोनिधि संत, त्यांत करितों मी मीनसा मज्जन' (भक्तभूषण ६३); 'विश्वाचे माझे प्रभु संतचि, मजवरि त्यांची सत्ता, । सत्ता नसती, तरि सोसवती कशि संताची लत्ता?' (अंबरीषाख्यान २२); 'भक्तऋणी देव बोलती पुराणें' (तुकाराम); इत्यादि वचनांत हीच कल्पना आहे.

१. ते सर्वसमर्थ कृष्ण (=कृष्ण व अर्जुन). २. हस्तिनापुरास. ३. नम्र. ४. तत्+वाक्+पददर्शन+अमृतें=त्यांची वाणी व चरणदर्शन, ह्या गोष्टीच अमृत त्यायोगें. 'तद्वाक्संदर्शनामृतें' असा पाठभेद. ५. तृप्त झाले. ६. अन्वयार्थः—ज्या वीरा सर्व देव बहु मानवले (मान देते झाले, पसंत करिते झाले) तो (अर्जुन) दुसरे दिवशीं राजा धर्मा विनवुनि (प्रार्थना करून) कृष्णा जावया निरोप देववी. ७. 'पितयातें असा पाठभेद. ८. अश्वमेधास. ९. सार्थान्वयः—तेथें (आपल्या घरीं [हे] विनयज्ञा! (शिष्टसंप्रदायातें जाणल्या!) आम्हांसह या स्वसख्या (या अर्जुनास) स्मरणांत आण. अर्थात् तुझा परम मित्र जो अर्जुन त्याची तुला आठवण होईलच, परंतु आमचीही होऊं दे, असा भाव. १०. '°पितयातें' असा पाठभेद. ११. मत्+नमनें=माझे नमस्कार. १२. ध्यान करण्यास योग्य. १३. सुंदर. १४. वस्त्र. १५. त्यातें. हें 'ने' ह्याचें कर्म. १६. अन्वयार्थः—सलोकेशवासवस्तुत (स+लोक+ईश+वासव+स्तुत=सर्व लोकपाळां—दिक्पाळां—समवेत इंद्रानें स्तविलेला असा) तूं (कृष्ण) या माज्या सर्वस्वा (माझ्या धनगजहयादि संपत्तीला) पात्र (योग्य) [आहेस]—हा भाव. १७. माझें.

[1]त्वां सुयश दिलें, ध्यावें, त्यजुनि अयुतमेरुरत्न हेमा, जें. ॥ १९
न्यावें कशास येथुनि ? तेथुनि आणीन [2]तुरगमेधा मी; ।
[3]पुण्यश्लोका ! [4]मज या अधिक न तें वृष्णिपुर गमे धामीं. ॥ २०
[5]धर्मातें भीमातें कुंतीतें नमुनि, पुसुनि विदुरातें, ।
स्पर्शुनि शिरीं यमांतें, भेटोनि सख्या पराद्रिभिदुरातें, ॥ २१
धृतराष्ट्रातें वंदुनि, धर्मानुमतें पुसोनि [6]देवीतें, ।
[7]अनुजेसि घेउनि निघे दैवत, ज्यातें महेश सेवी, तें; ॥ २२
भीमार्जुनयमविदुर प्रमुखा [8]पाऊनि परतले मागें, ।
त्यांचीं मनें न फिरलीं, मोहुनि नेलींच त्या [9]महाभागें. ॥ २३
[10]मरुधन्वनाम देशीं भेटे [11]उत्तंक विप्रवर [12]वाटे; ।

---

१. अन्वयार्थः—अयुतमेरुरत्नहेमा (दहा हजार मेरुपर्वतावरील रत्नें व सुवर्णराशी) त्यजुनि, जें ध्यावें, [तें] सुयश त्वां मला दिलें. श्रीकृष्णाचें पांडवांविषयींचें अहेतुक प्रेम व त्यांचा श्रीकृष्णाच्या ठायीं असणारा निःसीम भाव पाहून, कोणाही भक्तिमान् मनुष्याचे मनांत संतोष उत्पन्न झालाच पाहिजे. शिवाय पाठवणी म्हणून कांहीं चांगले चांगले जिन्नस देण्याचा जो जगिक संप्रदाय आहे, तोही पण मागल्या गीतींत वर्णिला असून, ह्या ठिकाणीं प्रेमाची किंमत कोणत्याही पदार्थापेक्षां अधिक आहे, हें सुचविलें आहे. २. अश्वमेधास. ३. धर्मा ! 'पुण्यश्लोक' हें विशेषण, धर्मराज, नलराज, वैदेही व श्रीकृष्ण ह्या चार विभूतींसच लावितात. ४. अन्वयः—मज वृष्णिपुर (द्वारका) धामीं (तेजानें) या (हस्तनापुराहून) अधिक न गमे. ५. श्रीकृष्ण वयानें अर्जुनाचे बरोबरीचे होते. तेव्हां धर्म, भीम व कुंती हीं वडील असल्यामुळें त्यांना भगवंतांनीं नमस्कार केला व विदुराचा नुसताच निरोप घेतला, कारण तो ज्ञाता परंतु दासीपुत्र होता. यम (नकुल सहदेव) हे लहान असल्यामुळें त्यांच्या मस्तकीं कर ठेविला अर्थात् त्यांस आशीर्वाद दिला. पराद्रिभिदुर (पर+अद्रि+भिदुरातें=शत्रुरूप पर्वतांना वज्राप्रमाणें फोडणारा अर्जुन)हा बरोबरीचा व परमस्नेही असल्यामुळें त्यास आलिंगन दिलें. एकंदरींत कृष्णांनीं सर्वांचा यथाधिकार निर्मल प्रेमानें निरोप घेतला. ६. ह्या वेळीं धर्मराजास राज्याभिषेक झालेला होता, तेव्हां आतां द्रौपदी ही 'देवी' शब्दास योग्य झाली. द्रौपदी ही श्रीकृष्णाची कृतकभगिनी परंतु महिषी ह्या नात्यानें निरोप घ्यावयाच्या वेळीं श्रीकृष्णांनीं राजा युधिष्ठिराची तसें करण्याबद्दल संमति घेतली. ह्या सर्व गोष्टींवरून तात्कालिक प्रचलित असून आजपर्यंत चालत आलेल्या शिष्टसांप्रदायाची चांगली ओळख पटेते. ७. सार्थान्वयः—ज्यातें महेश (शंकर) सेवी, तें दैवत (श्रीकृष्ण) अनुजेसि (धाकटी बहीण जी सुभद्रा तिला) घेऊन निघे. शिव व विष्णु हे परस्परांचे दृढ भक्त आहेत, या गोष्टीवर येथें लक्ष्य आहे. ८. पोंहोंचवून. ९. त्या भाग्यवान् श्रीकृष्णानें. हे सर्व जण शरीरानें मागें फिरले पण त्या सर्वांचीं मनें श्रीकृष्णानें आकर्षिल्यामुळें तीं त्याजबरोबर गेलीं. १०. हा हल्लींचा 'मारवाड' असावा. ११. नामविशेष ऋषि. १२. वाटेंत, मार्गांत.

तो मुनिवर्य मयूरचि, [1]यदुनायक देव [2]नीरधर [3]वाटे. ॥ २४
त्या ब्राह्मणासि पूजी भगवान् [4]ब्रह्मण्य देव, पद नमुनी; ।
प्रभुतें पूजुनि, तोही झाला परमप्रसन्नवदन मुनी. ॥ २५
उत्तंकाला वाटे कौरवपांडवविरोध [5]वारूनी, ।
आला देव [6]सुदुस्तर [6]युद्धव्यसनार्णवांत [7]तारूनी. ॥ २६
प्रभुसि पुसे तो, 'कृष्णा! जाउनि [8]कुरुपांडुपुत्रसद्मातें, ।
आलासि हर्षउनि [9]कीं? हर्षवितो [10]अर्क जेविं [11]पद्मातें. ॥ २७
[12]आप्त शमविले कीं, [13]सुत शमवावे जेविं वैरवश तातें? ।
झालासि चंद्र कीं तूं [14]क्षितिवर्तिनृपाळकैरवशतातें? ॥ २८
समजाविशील तूं प्रभु, [15]सजले जे [15]मारणाप्रति, ज्ञाती; ।
[16]कीं तव सत्या, केली जी निजजनतारणा प्रतिज्ञा, ती. ॥ २९
हें मम चित्तीं होतें, केलें कीं त्वां तसेंच? सांग मला, ।
वद सत्वर, [17]काय मनीं चिंतिसि? [18]मत्प्रश्न भार कां गमला.' ॥ ३०
[19]कृष्ण म्हणे, 'सांगाया [20]आप्तजन, करुनि अनर्थशम, हर्षे; ।
[21]बा! [21]पांचेंमात्र पांडव उरले, कोणीहि अन्य न महर्षे! ॥ ३१

---

१. श्रीकृष्ण. २. मेघ. ३. भासला. ४. ब्राह्मण आहेत पूज्य ज्यातें तो श्रीकृष्ण. पहा:– 'ब्राह्मणो मम दैवतम्', व अनुशासनपर्व, अ० ७. ५. दूर करून, मिटवून. ६. तरून जाण्यास कठीण अशा रणसंकटरूप समुद्रामध्यें. ७. बचाव करून, [त्यांत] बुडूं न देतां. ८. कौरवपांडवांच्या गृहीं. ९. कीं (प्रश्नदर्शक)=ना, का? १०. सूर्य. ११. सूर्यविकासी कमलाला. १२. नातेवाईक. १३. अन्वयार्थः–जेविं वैरवश (वैराच्या अंकित अर्थात् कलहप्रिय) सुत तातें शमवावे. भावाभावांत कलह लागला असतां, पिता त्यांचा कलह मोडून टाकितो व त्यांचा सलोखा करून देतो त्याप्रमाणें इ०. १४. पृथ्वीवर राहणारीं राजरूप शेंकडों चंद्रविकासी कमलें त्यांतें. ह्या कौरवपांडवकलहामध्यें अन्यनृपतींचा संबंध यावयाचा, मग तो त्यांस प्रिय असो वा नसो, तेव्हां तो कौरवपांडववैरभाव मोडून इतर सामंत मंडळास तूं, जसा चंद्र कुमुदांस आनंदवितो त्याप्रमाणें, आनंदित केलेंसना? असा उत्तंकोक्तीचा भाव. १५. मारण्याला तयार, सिद्ध, झाले. १६. सार्थान्वयः–कीं (कारण) जी निज–जन–तारणा (आपल्या आश्रितांचा–भक्तांचा–उद्धार करण्यासाठीं) प्रतिज्ञा [त्वां] केली, तव (तुझी) ती सत्या असे. १७. मनामध्यें विचार कशाचा करितोस? १८. अन्वयः–मत्प्रश्न [तुला] भार (ओझें, ओझ्यासारखा कठिण, जड) कां गमला (भासला, वाटला.)? पाठभेदः–सत्प्रश्न भार कां गमला? १९. अन्वयार्थः–कृष्णे म्हणे, 'अनर्थशम (संकटनिवारण) करुनि सांगाया आप्तजन हर्षे (आनंदित होतो). [पण तसें संकटनिवारण अर्थात् वैरशमन माझे हातून झालें नाहीं, ह्यामुळें मला तुमच्या प्रश्नाचें उत्तर देणें मोठें गूढ पडलें आहे; असा भाव.] २०. 'आसत न' असा पाठभेद. २१. 'वापीच' असा पाठभेद.

[1]लंघुनि माझ्या मतितें, त्याहि श्रीभीष्मविदुर[2]बुद्धीतें, ।
गेलें धृतराष्ट्र[3]तनुजशत नृपशतसह [4]लयासि युद्धीं तें.' ॥ ३२
भार्गव उत्तंक करी, ऐकुनि तें कृष्णवचन, कोपातें; ।
[5]कीं सन्मन तरि भूताभ्युदय, जरि ह्मणेल [5]कच नको पातें. ॥ ३३
"कृष्णा! उपेक्षिले त्वां, सामर्थ्य असोनि, ते [6]परिच्छिन्न; ।
[7]तरिच परस्पर शस्त्रें पडले होऊनि भूवरि [8]च्छिन्न. ॥ ३४
[9]नायकत्याला [10]हितंकर [11]आप्त ज्ञाता [12]बळेंचि आयकवी, ।
[13]नायक विख्यात [14]नयें [14]वर्तविति; उपेक्षितात काय कवी? ॥ ३५
मज माझी मति म्हणते, 'दे शाप; [15]न हें सहा; यशा [15]पावें; ।
जो प्रभु अरक्षक तया, [16]घेऊनि [16]सुतप [16]सहाय, शापावें." ॥ ३६
कृष्ण म्हणे, "तुज कथितों [17]अध्यात्म, प्रथम परिस बापा! तें, ।
मग [18]शापोचित जरि मी गमलों, तरि दे [19]विशंक शापातें. ॥ ३७
[20]कोपवंश पुरुष निजतप शापुनि [21]वेंची; न कोप हा [22]साधू; ।

---

१. माझी इच्छा व मसलत अव्हेरून. कृष्णशिष्टाईचा प्रसंग येथें अनुसंधेय आहे. २. बुद्धि=उपदेश, मंत्र, मसलत. ३. ते धृतराष्ट्राचे शंभर पुत्र. 'शत=शंभरांचा समुदाय' हा शब्द संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे व तसीच मराठींतही त्याची योजना करितात, म्हणून 'तें' हें नपुंसक सर्वनाम घातलें आहे. ४. नाशाप्रत. ५. कीं (कारण) जरि पातें (पापण्या) कच (केस) नको म्हणेल तरी सन्मन (सज्जनांचें चित्त, अंतःकरण) भूताभ्युदय (प्राण्यांचें कल्याण व चलती) नको म्हणेल. पापण्या ह्या केसांवांचून व्यर्थ, तेव्हां आपल्यास केस असूं नयेत असें पापण्यांनीं म्हणणें जर शक्य असेल, तर सज्जनास प्राण्यांची वाढ होऊं नये, असें वाटणें शक्य आहे. लोकांतील कलह दूर होऊन, सर्वजणांनीं भरभराटीचा व सुखाचा अनुभव घ्यावा, असा उत्तंकऋषींचा मनोदय असल्यामुळें ते रागावले; असा भाव. ६. उघड, स्पष्ट. याच अर्थीं हा शब्द दासबोधांत आला आहे:—भूतभविष्य वर्तमान । ठाउकें आहे **परिच्छिन्न** । त्यासीच म्हणिजेलें ज्ञान । परि तें ज्ञान नव्हे. ॥ ७. म्हणूनच. ८. जखमी व गतप्राण. ९. न ऐकणाऱ्यास. १०. कल्याणकारक गोष्ट. ११. यथार्थवक्ता. १२. जबरदस्तीनें. १३. पुढारी सूत्रधार. १४. नयें वर्तविति=न्यायमार्गानें चालावयास लावितात. 'वर्तविति' व 'उपेक्षितात' ह्या क्रियापदांचें कर्म 'नायकत्याला' हें आहे. १५. [प्राण्यांची वृद्धि होऊं दिली नाहीं व संहार केला] ही गोष्ट सहन करूं नको. व ह्याचें प्रायश्चित्त म्हणून असें करणारास शाप देऊन, कीर्ति संपादन कर. १६. सुतप सहाय घेऊनि=उत्तम तपाच्या मदतीनें, उत्तम तपाच्या जोरावर. १७. वेदांतविद्या, तत्वज्ञान. १८. शापास योग्य. १९. बेलाशक, बिनदिक्कत. २०. रागीट. २१. खर्चीं घालतो, नाहींसें करितो. ह्याचें कर्म 'निजतप'. शापुनि=शाप देऊन. २२. चांगला, भला. 'कोप हा चांडाळ आहे व त्यामुळें आपणास विटाळ होतो,' ही म्हण महाराष्ट्रीयांच्या प्रचारांतली आहेच.

कीर्तिस[1] म्हणसि, 'तुला' कां बा! 'पुनिवेची नको,' पहा, 'साधू'? ॥ ३८
उत्तंका[2]! समज मनीं, तापस चुकला, करून कोपाला; ।
क्रोधाग्नि[3] जो, तयांत स्वतपा सुकला करूं नको पाला." ॥ ३९
विप्र म्हणे, 'अध्यात्म श्रवण करिन, सांग, मान[4] साधीन[5]; ।
शापानुग्रह[6] करणें आहे माझ्याचि मानसाधीन[7].' ॥ ४०
कृष्ण म्हणे, 'उत्तंका! प्रकृति[8] पुरुष[9] मीच, गुण[10], महाभूतें[11]; ।
मातें[12] प्रपंच तैसा, त्यजुनि असे घट जसा न हा भूतें. ॥ ४१
मी[13] विश्वरूप जैसा, पटतंतु[13] मनीं, पहा, तसे आण; ।
हें सत्य; वहा[14] म्हणसिल साधो! जरि, तरि वहातसें आण. ॥ ४२
धर्मत्राणाकरितां[15] विप्रा! मी वेष जो जसा धरितों, ।
बा! उचित तया वेषा जेंजें जैसें, तसेंतसें करितों. ॥ ४३
या द्वापरांत संप्रति झालों नर, वर्ततों सदा नरसा[16]; ।

---

१. सार्थान्वयः—बा! पहा (विचार कर), 'पुनिवेची (पौर्णिमेची) तुला (उपमा) साधूं नको' [असें] कीर्तिस (यशास) कां म्हणसी? तुझी कीर्ति ही पौर्णिमेच्या चांदण्याप्रमाणें उज्ज्वल व आल्हादकर आहे, तेव्हां तिला मळवूं कां पहातोस, हा भाव. २. सार्थान्वयः—उत्तंका! तापस (ऋषी) कोपाला करुनि, चुकला (कोपाविष्ट झाल्यानें त्याचे हातून प्रमाद घडतो) [हें] मनीं समज. जो क्रोधाग्नि, तयांत स्वतपा (आपल्या तपश्चर्येस) सुकला (वाळलेला) पाला करूं नको. (रागरूपी अग्नीमध्यें आपलें तप पालेऱ्याप्रमाणें जाळून व्यर्थ करूं नको). ३. 'क्रोधा अग्नि,' असा पाठभेद. ४. कीर्ति, यश. ५. संपादन करीन. ६. शाप व प्रसाद. ७. मानस+अधीन=मनाच्या कह्यांत, मर्जीवर अवलंबून. ८. ह्या जगाचें आदिकारण, आदिमाया. ९. आत्मा. आत्मा हा स्वतः निर्विकार व निष्क्रिय आहे. प्रकृति व पुरुष हीं सांख्य दर्शनांतील मुख्य तत्वें होत. १०. सत्व, रज व तमस्—ही गुणत्रयी. ११. पृथ्वी, आप्, तेज, वायु आणि आकाश ही पंच महाभूतें. त्यांच्या योगें हें जग निर्माण झालें आहे. १२. सार्थान्वयः—जसा हा घट भूतें (पृथ्वीतें) त्यजुनि न असे [=जसा मातीवेगळा घट (=मडकें) कधींहि असूं शकत नाहीं] तैसा मातें (मजला) [त्यजुनि] प्रपंच (जगाचा पसारा) [न असे]. १३. अन्वयः—पहा, मी जैसा विश्वरूप [आहें], तसे पटतन्तु मनीं आण. अर्थः—मी ज्या तऱ्हेनें या विश्वांत भरलों आहें, त्या तऱ्हेनेंच हे पटांतील (वस्त्रांतील) तंतू (धागे) पटांत आहेत हें ध्यानांत घे. विश्व हें माझें रूप, व पट हें तंतूचें रूप; असें दोहोंत साम्य आहे, हें समज. १४. अन्वयार्थः—साधो! जरी [आण] वाहा (घे) म्हणसिल तरी आण (शपथ) वाहतसें (घेतों). १५. धर्मसंरक्षण करणें हें माझें कर्तव्य आहे, तेव्हां ज्या वेळीं जो अवतार किंवा जें सोंग घेणें भाग पडेल, तें घेऊन मी धर्मसंरक्षणासाठीं योग्य ती वतावणी करितों; हा गीतीचा मतलब. १६. मनुष्याप्रमाणें.

[1]हरिला स[2]केसरा तनु होय, [3]समुचिता, गजा [4]सदानरसा. ॥ ४४
वदलों कलह शमाया, जैसे वदतात [5]आप्त नर [6]सामीं; ।
तो [7]खळ म्हणे, 'समर्पिन [8]सूच्यग्रें भेदिलीहि न [9]रसा मी.' ॥ ४५
[10]परिसुनि मदुक्तिस, [11]जैसे तस्कर पाहूनि पुनिव, [11]रागेले; ।
परि धर्मयुद्धहत [11]ते खळहि स्वर्गासि मुनिवरा ! [11]गेले. ॥ ४६
दुर्योधनादि मेले, [12]धर्म [12]त्यागुनि, करूनि अन्याया; ।
पांडव विजयी झाले, [13]यांच्या येती न रीति अन्या या. ॥ ४७
अन्याय काय माझा उत्तंका! यांत? तूंचि सांग मला. ।
हा वासुदेव [14]नरसा अपराधी शापयोग्य कां [15]गमला.' ॥ ४८
उत्तंक म्हणे, "बा! मी ब्राह्मण, परि उग्र; तूं अनुग्र, हरे! ।
मज मम मति म्हणते, 'या केला [16]परमेश्वरें [17]अनुग्रह रे!' ॥ ४९
देवा! अनुग्रहातें जरि योग्य असेन, तरि मला द्रे हें, ।
तें विश्वरूप दाखिव; [18]कीं, संगें धरिति परिमला देहें. ॥ ५०
[19]क्षणसंगें [20]सुपरिमलद्रव्याच्या धरिति परिमला देहें; ।
[21]विख्यात चंदनाचा, संगिनगा स्वगुण परि; मला दे हें." ॥ ५१

---

१. सिंहाला. २. अयाळीनें युक्त, हें 'तनू'चें विशेषण. ३. अत्यंत योग्य. ४. मदस्रावयुक्त. हें 'तनू'चें विशेषण. ५. सत्यवादी. ६. शिष्टाईत, सलोख्याचे बावतींत. ७. दुर्योधन. ८. सुईच्या टोकानें. ९. पृथ्वी. सुईच्या टोकावर जेवढी पृथ्वी राहील, तेवढी सुद्धां पांडवांस देणार नाहीं, असें दुष्ट दुर्योधनानें पांडवशिष्टाई करणाऱ्या कृष्णाला सांगितलें. १०. सार्थान्वयः—पुनिव (पौर्णिमा) पाहूनि जसे तस्कर (चोर), [तसे] मदुक्तिस (माझ्या बोलण्यास, माझ्या उपदेशास) परिसुनि (ऐकून) [ते दुर्योधनादि] रागेले (रागावले, खवळले); परि (परंतु) ते खळही (दुर्योधनादि धृतराष्ट्राचे पुत्र दुष्ट असून सुद्धां) धर्मयुद्धहत (न्याय्य युद्धामध्यें पतन पावलेले असे), मुनिवरा! (उत्तंका!) स्वर्गासि गेले. ११. या शब्दांऐवजीं 'जसा' 'रागेला' 'तो' व 'गेला' असे यथानुक्रम पाठभेद. १२. नीति सोडून, कर्तव्यमार्ग चुकवून. १३. अन्वयः—यांच्या (पांडवांच्या) या (ह्या) रीति अन्या न येती (साधती). १४. मानवाप्रमाणें. १५. भासला. १६. ह्या देवानें, त्वां. १७. कृपा. १८. सार्थान्वयः—कीं (कारण) देहें (शरीरें) पुष्पहारादि सुगंधि वस्तूंच्या संगें (सहवासानें, संगतीनें) परिमला (सुवासाला) धरिती (धारण करितात). 'देह' शब्द संस्कृताप्रमाणें नपुंसकलिंगीं योजिला आहे. १९. पळभर घडलेल्या सहवासानें. २०. सुवासिक पदार्थांच्या. २१. सार्थान्वयः—[सुवास हा] चंदनाचा [गुण] विख्यात (प्रसिद्ध), परि (परंतु) [तो गुण] संगिनगा (साहचर्यांत असणाऱ्या पर्वतास) स्वगुण [असे] अर्थात् अगरु चंदनाच्या संगतीमुळें त्या पर्वतासही मैलागिरी ही संज्ञा प्राप्त होऊन, सुवास हा त्या पर्वताच्या अंगचा गुण झाला आहे.

[1]स्वसख्यास, विश्वरूप प्रभुनें त्या ब्राह्मणाहि दाखविलें; ।
[2]कीं सोमें देवगणा, तेंचि चकोराहि अमृत चाखविलें. ॥ ५२
तें वि[3]श्वरूप पाहुनि झाला [4]कृतकृत्य, जेविं तो पार्थ; ।
[5]तरलाचि, देत होता प्रभुला जो शापदान को[6]पार्थ. ॥ ५३
विस्मि[7]त होउनि, वर्णुनि सुगुणसदोका यशा, पदा नमुनी,
धरि लाज, देत होता कोपुनि जो काय शापदान मुनी. ॥ ५४
'[8]आवरुनि विश्वरूपा, दर्शन पहिलेंचि दे,' वदे हा[9], तें ।
करि शीघ्र, प्रकट करुनि त्या पूर्वींच्याचि देव देहातें. ॥ ५५
प्रभुवर 'वर माग' म्हणे; विप्र म्हणे, 'विश्वरूप दाखविलें. ।
मागों काय अधिक? त[10]पं बुडवित होतों बळेंचि, राखविलें.' ॥ ५६
देव म्हणे, 'उत्तंका! [11]कविंनीं मजला, तुलाहि बा! गावें; ।
दर्शन [12]अमोघ माझें, यास्तव कांहीं अवश्य मागावें.' ॥ ५७
विप्र म्हणे, 'मागावा वर म्यां, प्रिय हेंचि जरि तुझें होय, ।
तरि इच्छिन तेथें [13]यां [13]मरुदेशामाजि मज मिळो तोय.' ॥ ५८
[14]चातक घना तसें, हें निर्जल जाणोनि मारवाड, वदे, ।
जाणों, न पुढें याया, तो विषयेच्छेसि मार वाडव दे. ॥ ५९
'उत्तंका! स्मर मातें, ज्या समयीं इच्छिसील तूं [15]सलिला,' ।
ऐसें वदोनि, गेला स्वपुरीतें, [16]भयद यश जिचें कलिला. ॥ ६०

---

१. अर्जुनास. भगवद्गीता सांगतेवेळीं भगवंतांनीं अर्जुनास विश्वरूप दाखविलें (गीता अ० ११). २. अन्वयार्थ:—कीं (कारण) सोमें (चंद्रानें) [जें] अमृत देवगणा [चाखविलें], तेंचि चकोराहि चाखविलें. ह्यांत उत्तंकऋषि चकोरसम व अर्जुन देवांसम होत. ३. 'तेंचि स्वरूप' असा पाठभेद. ४. कृतार्थ, धन्य, सुखी. ५. मुक्त झाला. ६. कोप+अर्थ=कोपामुळें. ७. सार्थान्वय:—जो काय मुनि (उत्तंक) कोपुनि शापदान देत होता, [तो] विस्मित होउनि (थक्क होऊन), सुगुणसदोका [सुगुण+सत्+ओका=उत्तम गुणांचें उत्तम स्थान (माहेर) अशा] यशा वर्णुनि, पदा नमुनि (श्रीकृष्णाच्या पायाशीं लागून) लाज धरी (खजील झाला). ८. आटोपून. ९. उत्तंक ऋषि. 'हा तें' ऐवजीं 'हातें' असा सर्वसंग्रहपाठ. १०. अन्वयार्थ:—बळेंचि (आपल्या हातानेंच) तप बुडवित होतों [तें त्वां] राखविलें (कायम ठेवावयास लाविलें). ११. सुज्ञांनीं. १२. व्यर्थ नव्हे असें, वायां न जाणारें. १३. ह्या निर्जल प्रदेशीं, ह्या मारवाडांत. १४. अन्वय:—मारवाड निर्जल जाणोनि [जसा] चातक घना, तसें [हा] हें वदे. सार्थान्वय:—जाणों (जणूं काय) तो वाडव (ब्राह्मण, उत्तंकमुनि) विषयेच्छेसि, पुढें न याया (ती पुढें येऊं नये म्हणून) मार दे. 'जाणों न' ऐवजीं 'जाणोनि' असा पाठभेद. १५. जलातें. १६. अन्वयार्थ:—जिचें (ज्या पुरीचें, द्वारकेचें) यश कलिला (कलिकाळास, कलियुगास) [पापनाशकत्वानें] भयद. 'अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका। पुरी द्वारवती चैव सप्तैता मोक्षदायका: ॥'.

प्रभु गेल्यावरि, वांच्छा जेव्हां त्या मुनिस होय तोयाची, ।
मेघासि जसा चातक, आठउनि प्रभुसि तोय तो याची[1]. ॥ ६१
मार्गी मातंग[2] दिसे, नरका आंतूनि[3] काय[4] तो उतरे[5], ।
ज्याजवळि चर्मपात्रीं[6] भरिलें जळ विपुळ, मक्षिका, कुतरे. ॥ ६२
आग्रह करुनि म्हणे, 'घे' तो सुमलिन[7] नग्न मांग, 'तोयातें,'[8] ।
जाणों[9] विहित परमहित शिष्ट परम आप्त सांगतो यातें. ॥ ६३
धिक्कारी सुब्राह्मण तो, त्या 'शिव! शिव!' म्हणोनि मांगाला, ।
लागों देइल कैसें परम दुराचरणपाप[10] आंगाला? ॥ ६४
वरदा[11] प्रभुसहि निंदी, वरफळ पाहोनि तो तसें ऋषि तें, ।
विहित[12] मरावें, हें परि प्यावें चांडाळजळ कसें, तृषितें?' ॥ ६५
मातंग म्हणे, 'त्यागिसि परि पश्चात्तापतप्त होसील[13]; ।
अमृत अनादरुनि[14], तृषित[15] बुद्धिभ्रमखेद कोण सोसील.' ॥ ६६
मातंग जसा, तैसे अंतर्हित[16] तेहि जाहले कुतरे, ।
उत्तंक होय विस्मित[17], [18]तों त्याचा कोप[19] तत्क्षणीं उतरे. । ६७
'कृष्णेंचि आपुलें तें वंचन[20] केलें' असें तया वाटे, ।
तों चक्रपाणि धांवत येउनि, भेटोनि, करि दया वाटे[21]. ॥ ६८
उत्तंक म्हणे, 'म्यां वरविश्वासें[22] प्रार्थिलें तुला तृषितें, ।

---

१. मागता झाला. २. चांडाल. ३. नरका आंतूनि=नरकांतून. ४. जणुं कांहीं. ५. वर निघाला, बाहेर पडला. 'नरक' खालीं आहे अशी समजूत आहे, त्या समजुतीशीं 'उत्तरे'='वर निघे' हा अर्थ बरोबर जुळतो. हल्लीं ह्या शब्दाचा 'खालीं येणें' असा साधारण व्यवहारांत अर्थ होतो. परंतु व्युत्पत्तीशीं तो विसंगत आहे. उत्=वर. ६. डोलांत, पखालींत किंवा बुधल्यांत. (माशा, कुत्रे व कातड्याचा डोल ह्या गोष्टी गलिच्छपणाची साक्षी देतात.) ७. अत्यंत घाणेरडा. ८. जलातें. ९. अन्वयार्थः—जाणों (जणुं कांहीं) परम शिष्ट (अत्यंत सुविनीत असा) आप्त (यथार्थवक्ता ज्ञाता) यातें (उत्तंकातें) विहित (योग्य) [असें] परमहित (उत्कृष्ट कल्याण अर्थात् कल्याणमार्ग) सांगतो (उत्कृष्ट कल्याणाचा योग्य मार्ग दाखवीत आहे). १०. धर्मबाह्य आचरणामुळें घडणारें महापाप. ११. वर देणाऱ्या. १२. अन्वयः—तृषितें मरावें विहित, परि हें चांडाळजळ कसें प्यावें? १३. पस्तावशील. १४. अव्हेर करून. १५. कोणता तान्हेलेला मनुष्य बुद्धीचा भ्रमिष्टपणा व दुःख सहन करील. [जो शाहणा मनुष्य आहे, तो तृषाक्रांत झाला असतां, अमृताचा तिरस्कार करून स्वतांस दुःखांत व कष्टांत लोटित नाहीं; हा भाव]. १६. अदृश्य. १७. चकित. १८. तेव्हां, तत्काळ. १९. राग उसळे. वर टीप ५ पहा. २०. फसवणूक. २१. मार्गीं. २२. तूं दिलेल्या वराच्या भरंवशानें.

मातंगचर्मपात्रें[1] जळ द्यावें प्राशनार्थ या ऋषितें ! ॥ ६९
[2]करिती तव सुयशातें, व्हाया कामेभतोत्र, पाठ कवी; ।
तो तूं कसा ठकविसी ? निर्दय[3] जो, त्यजुनि तो त्रपा ठकवी'. ॥ ७०
कृष्ण म्हणे, "जो[4] वाहत होता, तैसाचि मार्ग वाहो तो, ।
भलत्याचि संशयानें प्रेमाचा भंग भार्गवा[5] ! होतो. ॥ ७१
म्यां छळ केला ऐसें लटिकेंचि[6] मनीं धरूं नको, पावें[7]; ।
वदतों, तें श्रवण करीं, मज न ईतरसम करून[8] कोपावें. ॥ ७२
मी शक्राला वदलों, 'मरुदेशीं शीघ्र नाकपा[9] ! जावें; ।
त्वां उत्तंकासि अमृत, कानीं पडतांचि हांक[10], पाजावें.' ॥ ७३
शक्र म्हणे, 'मर्त्याला[11] अमृत न द्यावें, तथापि जरि आज्ञा, ।
मातंगरूप घेउनि देइन मी, त्या रुचेल तरि नाज्ञा[12].' ॥ ७४
'[13]बहिरंगें तुज दिसला नीरस तो अदितिसुतपनस; मजला ।
अदय म्हणसि; भाव तुला, पदरींच असोनि सुतप, न समजला. ॥ ७५
[14]अमृत तुझें तपचि, घडे दिव्या न पटा विनाश, तक्र तुतें ।

---

१. चांडाळाच्या डोलांतून. २. अन्वयार्थः—कामेभतोत्र (काम+इभ+तोत्र=कामरूपहत्तीला अंकुश) व्हाया (व्हावें म्हणून) कवि (ज्ञाते) तव सुयशातें पाठ करिती. वासनाक्षयास तुझें स्तोत्र हाच उत्तम उपाय जाणून, ज्ञाते तें गातात. ३. अन्वयार्थः—जो निर्दय तो त्रपा (लज्जा) त्यजुनि [=निलाजरेपणानें] ठकवी. ज्याला दया नाहीं, त्यास फसविण्याचें कांहीं वाटणार नाहीं, हें सहाजिक आहे. ४. आजवर जसें वर्तन चाललें आहे, तसेंच पुढें चालूं राहूं दे. ५. हे भृगुकुलोत्पन्ना उत्तंका. ६. खोटेंच. ७. कृपा कर. ८. सामान्यजनासारिखा मानून. ९. स्वर्गपते, इंद्रा ! १०. धांवा ऐकतांच. ११. मानवास. १२. न+अज्ञा=जो अज्ञानी नाहीं त्याला; सुज्ञास. अन्वयः—तरि त्या नाज्ञा रुचेल, [तर] मी मातंगरूप घेऊन [तें] देईन. १३. सार्थान्वयः—तो अदितिसुतपनस (इंद्ररूपी फणस) तुज बहिरंगें (बाह्य स्वरूपावरून) नीरस दिसला (रसहीन, शुष्क व कंटकयुक्त वाटला). फणसास बाहेरून कांटे असतात पण आंत तर उत्तम गरे असतात. नीरस हलका व क्रूर, पक्षीं बेचव. उत्तरार्धान्वयार्थः—मजला अदय (निर्दय) म्हणसि; [परंतु] पदरींच सुतप असोनि (तूं चांगला तपोनिष्ठ असूनही) तुला भाव (खरें मर्म) न समजला. [हा चांडालवेषधारी कोण असावा ह्याचा उमज तुला पडला नाहीं व उलट मलाच निर्दय म्हणतोस, हें ठीक नव्हे]. १४. अन्वयार्थः—तुझें तपचि अमृत (तुझी तपश्चर्या हेंच अमृत); दिव्या पटा विनाश न घडे (अलौकिक अशी सुंदर गोष्ट विनाश पावत नाहीं); शतक्रतु (इंद्र) जें तुज कपटाविना (कपटावांचून) देना (देण्यास तयार नव्हता) तें तक्र (नीरस पेय) तुतें कशास व्हावें ? (पाहिजे) [तुझ्या तपश्चर्येची योग्यता अमृताहून अधिक आहे. तीपुढें अमृत ताकाप्रमाणेंच नीरस ठरतें. तेव्हां त्याची तुला इतकी पर्वा ती कशास पाहिजे ? हा भाव].

व्हावें कशास, तुज जें देना कपटाविना शतक्रतु, तें? ७६
तुजला लागेल तृषा[1], तेन्हां घन वर्षतील तर्पाया, ।
बा! या मरुदेशासहि तुजसह अत्यंत तृप्ति अर्पाया. ॥ ७७
होसिल[2] बहुमान्य, जसा तो चातकनाम सुखग, मेघास; ।
जो वांटुनि भक्षावा[3], तो सुज्ञजनास सुख गमे घास. ॥ ७८
'उत्तंक[4] मेघ' म्हणतिल लोक तयां, जे त्वदर्थ वर्षतिल, ।
या तव सुयशःश्रवणें उत्तंका सर्व साधु हर्षतिल." ॥ ७९
केला उत्तंक मुदित[5], जो होता जाहला असानंद[6], ।
बहुमान्य जसा विप्रें[7], प्रभुला नच शौरि[8], नच असा नंदें. ॥ ८०

अध्याय तिसरा.[9]

नृपति[10] पुसे, 'शापाया झाला जगदीश्वरासि जो सिद्ध, ।
कोण्या सुतपस्तेजें होता उत्तंक तो असा इद्ध[11]?' ॥ १
वैशंपायन सांगे 'गुरुभक्तप्रवर[12] गौतमच्छात्र[13], ।
बहु[14] मुनिसुत शिष्य तया, सर्वांत श्रेष्ठ गुरुकृपापात्र. ॥ २
सिंची[15] भजनें लाउनि भक्तीचें भावधौतमनिं रोप; ।
इतरां शिष्यांतें दे, परि उत्तंका न, गौतम निरोप. ॥ ३

---

१. तहान. २. सार्थान्वयः—जसा तो चातकनाम (चातक नांवाचा) सुखग (उत्तम पक्षी), [तसा] तूं मेघास बहुमान्य होसिल (अर्थात् तुझ्या इच्छेचा मेघ आदर करील व ती तृप्त करील). जो (घास) [इतरांना] वांटूनि (विभागून देऊन) [त्याबरोबर] भक्षावा, तो घास सुज्ञजनास सुख गमे. [कोणत्याही गोष्टीचा आस्वाद एकट्यानें घेणें सज्जनांस आवडत नसून, तिचा आस्वाद इतरांस करून देऊन त्यांसह ती उपभोगण्यांतच त्यांना आनंद वाटतो. त्याप्रमाणें निर्जलमारवाडस्थांसह जलतृप्ति उपभोगण्यांतच तुजला समाधान आहे, असा भाव.] ३. 'भक्षाया' असा सर्वसंग्रहाचा पाठ. ४. सार्थान्वयः—जे [मेघ] त्वदर्थं (तुजकरितां) वर्षतील, तयां लोक उत्तंक मेघ म्हणतील. उत्तंका! या (ह्या) तव सुयशःश्रवणें (उत्तम कीर्ति ऐकून) सर्व साधु (सज्जन) हर्षतिल (आनंदानें डोलूं लागतील). पूर्वार्धांत—'जया जे त्वदर्थं' व उत्तरार्धांत—'यास्तव सुयशःश्रवणें' असे सर्वसंग्रहांतील पाठभेद. ५. आनंदित. ६. अ+सानंद=कष्टी. ७. ब्राह्मण. ८. वसुदेव. ९. या अध्यायाला एका पोथींत 'कृष्णउत्तंकसंवाद' असें नांव आहे. १०. जनमेजय. ११. तेजस्वी. १२. गुरूच्या ठायीं निष्ठा ठेवणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असा. १३. गौतम ऋषींचा शिष्य उत्तंक मुनि. १४. अन्वयार्थः—तया (गौतमा) बहु मुनिसुत शिष्य [होते], [परंतु तो गौतमच्छात्र उत्तंक] सर्वांत श्रेष्ठ गुरुकृपापात्र (गुरूच्या दयेचें भाजन) [होता]. १५. अन्वयार्थः—[गौतमच्छात्र] भावधौतमनीं (खरेपणानें निर्मल झालेल्या अंतःकरणांत) भक्तीचें रोप लावुनि भजनें (गुरुसेवारूपी जलानें) सिंची.

गुरुभक्तिनें [1]भुलविला नच काढी गोष्टि [2]हा [3]निरोपाची; ।
गुरुलाही [4]तदसंगति, सुरतरुच्या जेविं हानि रोपाची. ॥ ४
काष्ठांचा भार शिरीं वेउनि येतां, तया जटा [5]जडली; ।
श्रांतें उत्तंकें [6]तो त्यजितां, त्यासह तुटोनि ती पडली. ५
वृद्धपणातें कळवी [7]सहसाचि [8]रजतसमा जटा [9]केविला; ।
खेदें विवेक जेविं कुसंगें सज्जनसमाज, टाकविला. ॥ ६
झाला हा [10]निबरवया; हानि बरवया, न जाणतां, होय; ।
म्हणुनि रडे, तों धरवी गौतम कन्यांजळींत तें तोय. ॥ ७
गौतमकन्येचे त्या उत्तंकनयनजळें कर जळाले, ।
तत्काळ ते [11]अबिंधनदग्ध, जसे [12]पद्मिनीछद, गळाले. ॥ ८
गौतम पुसे तयातें 'बापा! कां सांग आजि रडलास? ।
[13]जडलास [13]गुरुपदाब्जीं, कोणा [14]शोकार्णवांत पडलास?' ॥ ९
उत्तंक म्हणे 'तुजला [15]आज्ञा मागावया स्वयें चुकलों; ।
त्वांही न दिली झालों वृद्ध, [16]गृहस्थाश्रमास मी [17]मुकलों. ॥ १०

---

१. मोहित केलेला. २. उत्तंक. ३. जाण्याची, पाठवणीची. ४. त्याचा (=उत्तंकाचा) वियोग. ५. गुंतली. ६. भार. ७. अकस्मात्. ८. रुप्यासारखी अर्थात् पांढरी. ९. झाल्या उत्तंकास. १०. जीर्ण वयाचा. प्राकृत व संस्कृत शब्दांचा येथें सामासिक शब्द केला आहे. (निबर=जीर्ण, जुनें; वयस्=वय. निबर आहे वय ज्याचें तो). अन्वयार्थ:—'हा निबरवया झाला (आपण वृद्ध झालों). न जाणतां (न कळतां, अज्ञानानें) बरवया [हि] (=भल्यालासुद्धां) हानि होय;' [असें] म्हणुनि रडे; तों गौतम तें तोय (=उत्तंकाचे अश्रुबिंदु) कन्यांजळींत (=आपल्या मुलीच्या ओंजळींत) धरवी. पूर्वार्धाचा पाठभेद:—झाला हो! निबरवया, कष्टीही तो न जाणतां होय. ११. अप्+इंधन+दग्ध=उदकरूप काष्ठांनीं दग्ध असे. १२. कमळिणीचीं पानें. हिमसेकानें कमळिणींचीं पानें निर्जीव होतात, हें प्रसिद्धच आहे; या संबंधें पुढील श्लोक वाचनीय आहे:— अथवा मृदुवस्तु हिंसितुं मृदुनैवारभते प्रजान्तकः । हिमसेकविपत्तिरत्र मे नलिनी पूर्वनिदर्शनं मता ॥ (रघुवंश ८।४५.) १३. गुरूच्या चरणरूप कमळाचे ठायीं रत झालास. १४. शोकसागरांत. १५. जावयाकरितां परवानगी, निरोप. १६. सर्व आश्रमांमध्यें गृहस्थाश्रम श्रेष्ठ आहे, कारण, ह्या आश्रमांत विवाह करून धाराग्नि ठेवितां येतें, अतिथिअभ्यागतांचा परामर्श घेतां येतो, तीर्थयात्रादि गोष्टी साधितां येतात; सारांश ह्या आश्रमांत प्रपंच साधून परमार्थ जोडितां येतो. पहा:— गृहस्थाश्रमांत सर्व धर्म घडे । तेणें मळ झडे अंतरींचा. ॥ १७० ॥ विषय वासना मळ जातां ज्ञान, । होय समाधान आत्मलाभें, ॥ १७१ ॥ गृहस्थाला सोपें, न तसें अन्यास, । न लागे संन्यास ज्ञानासाठीं. ॥ १७२ ॥ (मोरोपंत, सावित्रीगीत.) १७. अंतरलों.

त्यासि गुरु म्हणे, 'झाला त्वत्प्रेमा तोचि मधुरस[१] मजला, ।
भुललों केवळ साधो! गेला जरि विपुल काळ, न समजला. ॥ ११
बा! उत्तंका! आज्ञा दिधली आतां, गृहस्थ हो, जा, गा! ।
तूं या गुरुगेहवसतिसुखशय्येतें[२] त्यजूनि, हो जागा.' ॥ १२
तो द्विज म्हणे गुरुस, 'तुज द्यावी म्यां, सांग, दक्षिणा काय?' ।
गौतम म्हणे, 'बहु दिली, सेवेंत[३] तुवां न राखिला काय. ॥ १३
सादरभजनें[४] घडतो, सर्वार्थांउपरि तो खरा होतो, ।
मेरुवितरणेंहि तसा गुरुसि नव्हे सुपरितोख, राहो तो. ॥ १४
मी तुष्ट असेन तुझ्या भजनें, तरि षोडशाब्द[५] होसील; ।
देइन तुज निजकन्या, तव[६] तेजा ते, परा न, सोसील. ॥ १५
गुरुवचनें[७] होय तरुण, कीं अमृतेंही नवा युवा होतो; ।
दीप्त कराया त्या शुचितेजातें, कां न वायु वाहो तो? ॥ १६
कन्या, आशी[८], आज्ञा गुरुपासुनि पावला महाभाग[९]; ।

---

१. मादक द्रव्य. मादक द्रव्याच्या सेवनानें भ्रम उत्पन्न होऊन विस्मृति पडते. तेव्हां तुजवरील प्रेम हें मादक द्रव्याप्रमाणें असून त्यामुळें तुला निरोप देण्याचें भान मला राहिलें नाहीं, असा गौतमोक्तीचा भाव. २. गुरुघरीं राहणें हेंच आनंद देणारें अंथरूण त्यातें. ३. तुवां सेवेंत काय (देह) न राखिला=तूं अंग चोरून सेवा केली नाहींस अर्थात् सेवा करण्यांत तुझी मुळींच कसूर नव्हती. 'अंग राखून काम करणें' हा भाषाप्रयोग महाराष्ट्रीयांच्या अत्यंत परिचयाचा आहे. ४. सार्थान्वयः—सादर भजनें (सप्रेम सेवेनें) घडतो (साधतो) तो [परितोख] सर्वार्थांउपरि (=सर्व पदार्थांहून श्रेष्ठ) खरा (=खरोखर) होतो; तसा सुपरितोख (अत्यानंद) गुरुसि मेरुवितरणेंहि (मेरु पर्वताच्या दानानेंसुद्धां, सुवर्णगिरी दिल्यानेंसुद्धां) नव्हे (न होय, होत नाहीं;) [तेव्हां] तो (मेरुवितरणानें होणारा आनंद) राहो (एके बाजूस असो). अर्थात् गुरुदक्षिणा घेऊन प्राप्त होणाऱ्या आनंदाचें नांवही नको, कारण तो आनंद तुझ्या सादरसेवेनें झालेल्या आनंदापुढें कांहींच नव्हे, असा भाव. ५. सोळा वर्षांचा. ६. सार्थान्वयः—ते (=माझी मुलगी) तव तेजा सोसील (=सहन करील), परा (=दुसरी कोणतीही मुलगी) न [सोसील]. पाठभेदः—(१) तव तेजातें परा नसो सील; (२) तव तेजातें परा न सोसील. ७. सार्थान्वयः—[वृद्धमानव] गुरुवचनें तरुण होय; किं (कारण) अमृतानेंही (अमृतसेवनानेंही) [तो] नवा युवा (रसरसीत तारुण्यमय) होतो. [अमृतानेंसुद्धां तारुण्य येतें, त्या अर्थी गुरुकृपेनें सहजच आलें पाहिजे. असें वर्णन करून येथें गुरुकृपा अमृताहून श्रेष्ठ आहे, हें सुचविलें आहे.] त्या (उत्तंकाचे तारुण्यरूपी) शुचितेजातें (अग्नीच्या तेजास) दीप्त कराया (प्रज्वलित करण्यास) तो [गुरुप्रसादरूपी] वायु कां न वाहो (=कां वाहणार नाहीं)? [अर्थात् वाहलाच पाहिजे, हा भाव.] येथें अग्निवायूंप्रमाणेंच शिष्याचें तेज व गुरूचा प्रसाद यांचा स्नेह आहे, हें ध्वनित केलें आहे. ८. आशीर्वाद. ९. पवित्रशील उत्तंक मुनि.

मग गुरुपत्नीतें तो बहु विनवी; 'दक्षिणा' म्हणे 'माग.' ॥ १७
त्यासि अहल्याहि म्हणे, '[1]सादर सेवेंत दक्षिणा आली, ।
[2]विप्रवरा! वृत्ति तुझी सुरभीची होय दक्षिणा आली.' ॥ १८
मागावेंचि सुदुर्लभ[3] [4]वस्तु असा शिष्यभाव जाणोनी, ।
'[5]मणिकुंडलें' म्हणे, 'दे [6]सौदासस्वीकृतेंचि आणोनी.' ॥ १९
गेला उत्तंक; पुसे गौतम, सांगे तयास [7]तज्जाया; ।
तो मुनि म्हणे, '[8]अहा! त्वां पाठविला संकटांत [9]मज्जाया. ॥ २०
राक्षस झाला आहे [10]संप्रति सौदासभूप तो शापें, ।
खातो बहु पुरुषांतें, [11]नच [11]वंचके विप्रभक्षणें पापें.' ॥ २१
साध्वी म्हणे, 'न जाणुनि हें, म्यां तो साधु विप्र पाठविला, ।
परि येइल [12]कुशल पुन्हा, [13]कीं त्वां वरदें मनांत आठविला.' ॥ २२
[14]मुनि 'एवमस्तु' बोले; नाशुनि विघ्ना, श्रमा, अघा, बरवी ।
वरिल कसि कीर्ति? गुरुचें मन, साहस करुनि, जो न घाबरवी. ॥ २३
[15]शून्यवनीं [16]अत्युग्रा सौदासाजवळि विप्र तो [17]पावे, ।
[18]स्वाधिक म्हणउनि राक्षस ज्यातें पाहुनि मनांत कोपावे. ॥ २४
उठला परम क्षुधित क्रूर करायासि घात [19]राक्षससा, ।

---

१. गुरुदक्षिणा यावयाची ती आम्हांस तूं केलेल्या एकनिष्ठसेवेंतच मिळून चुकली, आतां निराळी दक्षिणा ती काय मागावयाची? असा भाव. २. सार्थान्वयः—विप्रवरा! (ब्राह्मणश्रेष्ठा! उत्तंका!) तुझी वृत्ति (वर्तनक्रम) सुरभीची (कामधेनूची) दक्षिणा (सरला, उदार) आलि (सखी) होय. ३. दुष्प्राप्य. ४. संस्कृतांत हा शब्द नपुंसकलिंगीं आहे, तसाच येथेंही योजिला आहे. ५. रत्नखचित कर्णभूषणें. ६. राजा कल्माषपाद हा वसिष्ठशापानें बारा वर्षें राक्षस झाला होता. तोच सौदास. सौदासस्वीकृतेंचि=सौदासाच्या मालकीचीं. ७. तत्+जाया=त्या गौतम ऋषीची पत्नी अहल्या. ८.हाय, हाय.९. बुडाया. १०. ह्या वेळीं, आतां. ११. भीत नाहीं. १२. सुखरूप. १३. अन्वयार्थः—कीं (कारण) त्वां वरदें (वर देणाऱ्यानें) [तो] मनांत आठविला. त्याचें स्मरण आपणास झालें, तेव्हां आतां त्याच्या सुखरूपतेची भीति नाहीं; असा भाव. १४. सार्थान्वयः—'एवमस्तु'(तथास्तु, असें असो) [असें] मुनि बोले; [आणि असा गुरूचा आशीर्वाद मिळणें योग्यच होय; कारण] जो साहस करुनि गुरुचें मन न घाबरवी (अचाट कृत्य अंगीकारून गुरूच्या मनास जो स्वकुशलतेबद्दल भीति उत्पन्न करीत नाहीं), [तो] विघ्ना, श्रमा [व] अघा (पापातें) नाशुनि, बरवी (उज्ज्वल) कीर्ति कसि वरील? अर्थात् कांहीं अचाट कृत्य शिरावरून तें पार पाडल्यासच कीर्ति संपादन होते. १५. निर्जन वनामध्यें. १६. अति क्रूर अशा. १७. प्राप्त झाला. १८. अन्वयार्थः—ज्यातें (सौदासाला) पाहुनि, स्वाधिक म्हणउनि (आपल्याला उग्रपणानें न आटोपण्यासारखा म्हणून) राक्षस [सुद्धां] मनांत कोपावे (चिडावे). १९. सौदास हा खरा राक्षस नसून शापानें राक्षस झाला होता, म्हणून 'राक्षससा' असें पद घातलें आहे.

होय[1] न, व्हावा जरि, हरिदृष्टिपुढें जेविं कातराक्ष ससा. ॥ २५
राक्षस म्हणे, 'भला बा! षष्ठीं[2] काळीं स्वयेंचि आलास, ।
विप्रा! क्षुधितास मज प्राणप्रद तूं सुभक्ष्य झालास.' ॥ २६
उत्तंक म्हणे 'राजा! आलों गुरुदक्षिणार्थ[3]; रक्षावें, ।
आधीं कार्य करावें; मग, जरि चित्तीं असेल, भक्षावें.' ॥ २७
भूप म्हणे 'दिधला, जरि गुर्वर्थ[4] तुझा, असेल मदधीन[5]; ।
तरि[6] या दशेंत मागुनि, बा! होय तव त्रपेसि पद धी न.' ॥ २८
'मणिकुंडलें तुझ्या जीं स्त्रीच्या कर्णांत दिव्य आहेत, ।
तीं त्यावीं आपण, मम[7] गुरुपत्नीच्या मनांत हा हेत.' ॥ २९
मित्रसह म्हणे 'विप्रा! तीं माझ्या स्त्रीस कुंडलें उचितें[8], ।
माग इतर वस्तु, सुखें[9] देइन येईल जें तुझ्या रुचितें[10].' ॥ ३०
'देणें रुचेल, तरि दे; उचित यशचि तुज, न कुंडलें उचितें; ।
किंबहुना[11] कुळजें त्वां संपादावें, असेल जें शुचि[12], तें. ॥ ३१
हो सत्यवाक्[13] प्रभो! तूं, मीहि वचन आपुलें करीन खरें, ।
अर्थ्याधि[14] नुरे प्रभुच्या लपितें, हरिच्या जसा करी नखरें.' ॥ ३२
नृपति म्हणे 'साधो! जा मागुनि घे, आपुली जसी ठेवी[15]; ।
माझा निरोप कथितां, देइल मणिकुंडलें तुला देवी[16].' ॥ ३३

---

१. अन्वयः—हरिदृष्टिपुढें (सिंहाच्या नजरेसमोर) जेविं ससा कातराक्ष (कावरेबावरे आहेत डोळे ज्याचे असा) [होतो], [तेवीं तो उत्तंक सौदासापुढें] जरि व्हावा (व्हावयास पाहिजे होता, होईल असें अपेक्षित होतें), [तरी तो तसा] न होय. उत्तंक राक्षसी सौदासाला पाहून तिळमात्र डगमगला नाहीं, हा भाव. २. तीन दिवसांच्या उपासाला 'षष्ठान्नकाल' किंवा 'षष्ठकाल' असें म्हणतात. पाठभेदः—कष्टीं कळीं. ३. गुरूस द्यावयाच्या दक्षिणेकरितां. ४. गुरूची इच्छित वस्तु. ५. माझ्या हातीं. ६. तरि बा! या दशेंत (माझें राज्यपद जाऊन मी राक्षस झालों आहे, ह्या स्थितींत), मागुनि, तव धी (तुझी बुद्धि) त्रपेसि पद न होय [लज्जेला पात्र न व्हावी, न लाजावी]. माझ्या हातीं ती वस्तू असल्यास, मी ह्या स्थितींतसुद्धां तुझी इच्छा तृप्त करीन; तुला तुझा शब्द व्यर्थ गेल्याची लाज वाटून, खजील होण्याचा प्रसंगच येणार नाहीं, हा सौदासाचा भाव. ७. पाठभेदः—मज. ८. योग्य. ९. आनंदानें. १०. पसंतीस, आवडीस. ११. सारांश. १२. शुद्ध, निर्मळ. १३. खरी आहे वाणी ज्याची असा, शब्दाचा धड. १४. सार्थान्वयः—प्रभूच्या लपितें (भाषणानें) अर्थ्याधि (अर्थि+आधि=याचक जनांची मनोव्यथा) नुरे (राहत नाहीं), जसा हरिच्या नखरें (नखानें) करी (हत्ती) [नुरे]. ह्या गीतींतील 'प्रभु' शब्द फार वजनदार व खुबीचा आहे. १५. ठेव, अनामत. १६. राणी, [माझी] पट्टराणी.

विप्र म्हणे 'कोठें ती देखावी? कां स्वयें न येशि? बद; ।
[1]केलें स्वयें सुपात्रीं स्वधनाचें दान, होय तें शिवद.' ॥ ३४
भूप म्हणे, 'कोठें वननिर्झरदेशीं असेल [2]सक्त, [3]पहा; ।
षष्ठीं काळीं तें स्त्रीरत्न पहाया अयोग्य [4]रक्तप हा.' ॥ ३५
[5]पुसुनि नृपातें, शोधुनि भेटे देवीस काननीं [6]आर्य; ।
नमुनि विचारी साध्वी, सांगे तो तीस आपुलें कार्य. ॥ ३६
[7]मदयंती त्यासि म्हणे, "बा! हीं [8]अतुलेंचि जाण [9]तानिवडें, ।
देउनि गुरुपत्नीतें, तूं गुरुभक्तांत [10]जाणता [11]निवडें. ॥ ३७
यांतें तीच धरिल, बा! जीच्या अंगीं असेल अतिशुचिता, ।
मणिकुंडलांसि तव [12]गुरुपत्नी [13]मजपरिस [14]बहुगुणें उचिता. ॥ ३८
सुर, राक्षस, यक्ष, भुजग [15]बहुनिस्पृह जे वनांत तपतात, ।
तेहि महर्षि, हराया [16]यांतें बापा! सदैव [17]जपतात. ॥ ३९
[18]स्रवतात कनक संतत; बहु गुण सुरवृक्षपुष्पसम यांत; ।
नक्षत्रतारकाधिक भव्य दिसे तेज रात्रिसमयांत. ॥ ४०
[19]धरितां, क्षुधापिपासाश्वापदविषवन्हिभय नसे कांहीं; ।
यांच्या बहु होय सुखित, अमृताच्या जेविं नयन [20]सेकांहीं. ॥ ४१
क्षितिवरि भय [21]नागांचें उच्छिष्टपणांत यांसि यक्षांचें,
निद्रेंत [22]निर्जरांचें, [23]नानायत्नस्वकार्यदक्षांचें. ॥ ४२

---

१. सार्थान्वयः—स्वधनाचें [जें] दान स्वयें सुपात्रीं (योग्य व्यक्तीस) केलें, तें शिवद (कल्याण देणारें अर्थात् हितकर) होय. २. रमलेली, गुंगलेली, आवडीनें राहिलेली. ३. शोधून काढ. ४. रक्तपान करणारा राक्षस. ५. राजाचा निरोप घेऊन. ६. तो पूज्य उत्तंक. ७. मित्रसह राजाची पत्नी. ८. अद्वितीय, निरुपम. ९. कुंडलें. १०. ज्ञाता. ११. निवडला जा. १२. अहल्या. १३. मजपेक्षां. १४. पुष्कळ पटीनें. १५. अत्यंत निरिच्छ. अत्यंत निरिच्छ तपस्व्यांना सुद्धां हीं कुंडलें हरण करण्याची इच्छा होते, यावरून त्या कुंडलांचे गुण व सौंदर्य हीं स्पष्ट होतात. १६. कुंडलांना. १७. टपत असतात. १८. अन्वयः—हीं कुंडलें सतत कनक (सोनें) स्रवतात (प्रसवतात, उत्पन्न करितात); सुरवृक्षपुष्पसम (कल्पवृक्षाच्या फुलांप्रमाणें) यांत (या कुंडलांत) बहु गुण आहेत; [यांचें] तेज रात्रिसमयांत (रात्रीच्या वेळीं) नक्षत्रतारकाधिक (नक्षत्र-तारकांपेक्षां जास्त) भव्य दिसे. १९. कानांत घातलीं असतां. २०. सिंचनानें. २१. सर्पांचें. २२. देवांचें. २३. अनेक प्रकारांनीं खटपट करून स्वार्थ साधण्यास टपलेल्या. हें 'निर्जरांचें' ह्याचें विशेषण. मागें गीति ३९ पहा.

बा! गुरु लघु अनुरूपें होतीं[2], प्रौढा असो, असो कन्या; ।
मणिकुंडलें[3] असीं हीं माझीं परमार्चितें धरो धन्या. ॥ ४३
देतें ताटंकें[4], परि घेउनि ये एकदा अभिज्ञान[5]; ।
जेविं नृपाच्या[6] वदनीं, माझ्याहि तसा नसे अभिज्ञा[7]! 'नं.[8]' ॥ ४४
विप्र नृपासि म्हणे, "जी त्वत्प्रत्ययहेतु[9], सांग खुण गा! ती, ।
'आर्थिमनोरथपूरक[10] तूंचि' म्हणुनि कवि[11] तुझेचि गुण गाती." ॥ ४५
भूप म्हणे, "सांग असें, 'क्षेम्या[12] गति विप्र हे, नसे अन्या,' ।
या मन्मतासि जाणुनि, हो देउनि रत्नकुंडलें धन्या[13]." ॥ ४६
ऐसें जाणुनि[14] कथितां, दे ताटंकें सहर्ष[15], पद नमुनी; ।
आला नृपाकडे तो, होउनि परमप्रसन्नवदन, मुनी. ॥ ४७
विप्र अभिज्ञानाचा अर्थ पुसे त्या नृपासि, तो बोले, ।
ज्यातें[16] उत्तंक मुनि श्रवण करुनि कविसमूहही डोले. ॥ ४८
भूप म्हणे, "क्षेमं[17] नसे लेशहि जीमाजि, गति असी घडली; ।

---

१. सार्थान्वयः–[धारणकर्त्री] प्रौढा (प्रोक्त) असो, [किंवा] कन्या असो, बा (हे उत्तंका!) [हीं] अनुरूपें (साजतील अशीं, योग्य) गुरु (मोठीं) लघु (लहान) होतीं. (धारण करणारी प्रोक्त वयाची असल्यास हीं मोठीं होतात व लहान मुलगी असल्यास हीं लहान होतात व कोणाच्याही कानास बसतात). २. पाठभेदः–हो ती. ३. अन्वयार्थः–असीं हीं माझीं परमार्चितें (अत्यंत मान्य) मणिकुंडलें (रत्नखचित कर्णभूषणें) धन्या (पवित्र पुण्य स्त्री) धरो (धारण करो). ४. तानिवडें, कर्णभूषणें. ५. खूण. ६. मित्रसह राजाच्या. ७. ज्ञात्या! ८. नकार. ९. त्वत्+प्रत्यय+हेतु=तुझी ओळख पटविण्याचें साधन अशी. हें 'खुण' ह्याचें विशेषण. १०. याचक जनांचे हेतु पूर्ण करणारा. ११. ज्ञाते. १२. सार्थान्वयः–विप्र हे (ब्राह्मण हे) क्षेम्यागति (कल्याणप्रद आसरा) [होत], अन्या (त्यांवांचून दुसरी) [गति] नसे (दुसरा उपाय नाहीं). मित्रसह राजास ब्राह्मणापासून शाप झालेला असल्यामुळें, ह्या शापांतून मुक्त होण्याचा कल्याणकर उपाय म्हणजे ब्राह्मण हेच असून, दुसरा उपाय नाहीं, असें तो समजत असे. पाठभेदः–भूप म्हणे, "सांग असें 'हे क्षेम्या गति नव्हे, नसे अन्या' । १३. कृतकृत्य. १४. पाठभेदः–जाणुनि. १५. आनंदानें, नाइलाजानें नव्हे हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. दान करितेवेळीं सानंद अंतःकरण पाहिजे; नाहींपेक्षां तें दान होत नाहीं. १६. अन्वयार्थः–ज्यातें (ज्या अर्थातें) श्रवण करुनि उत्तंक मुनि [व] कविसमूहही (पंडितमंडळसुद्धां) डोले. १७. कल्याण, स्वस्थता.

ब्राह्मणशापें झालों राक्षस, [1] हे दुर्दशा गळां पडली. ॥ ४९
ई[2]पासुनि उत्तंका ! मुक्ति घडाया, विचारितां, धन्या[3] ।
यु[4]क्ति द्विजप्रसादावांचुनि नाहींच निश्चयें अन्या. ॥ ५०
ब्राह्मण हे [5]गति सर्व क्षत्रा[6]ची, सर्वथा नसे दुसरी; ।
ब्राह्मणसेवा नसतां, सकळाही निष्फळा क[7]ळाकुसरी. ॥ ५१
या लोकीं परलोकीं आधार क्षत्रियासि विप्र; [8]भया ।
अभया द्याया प्रभु हे, सप्रभ कीं करिति निपट विप्रभ या. ॥ ५२
आम्हां ब्राह्मणचि गति, न अन्या, कथिलें असें अभिज्ञां[9]नीं; ।
पुसिला त्वां तो कथिला, उत्तंका ! अर्थ हा [10]अभिज्ञानीं. ॥ ५३
मणिकुंडलें तुज दिल्हीं; केला म्यां सत्य बोलिला बोल[11]; ।
बा ! धर्मज्ञा ! त्वांहीं न करावें वचन आपुलें फोल[12]." ॥ ५४
विप्र[13] म्हणे, 'ठावें मज सत्य सुकृतजनक वाडवा राया ! ।
बा ! लाविल, येतां श्रीकीर्ति, कवण जन कवाड वाराया ? ॥ ५५
मा[14]झा बहु सत्यांतचि, न गणुनि हा काय, भर वसायाचा; ।
क्षणभंगुर बुद्बुदसम समजें; बा ! काय भरवसा याचा ? ॥ ५६
आलों परतोनि तुला किमपि[15] पुसायास, कोविदा[16] ! राया ! ।

---

१. ही दुःखद स्थिति इच्छा नसतांही प्राप्त झाली. पाठभेदः—सह दुर्दशा. २. ह्या राक्षसस्थितींतून. ३. रामबाण. ४. उपाय. ५. आश्रय. ६. क्षात्रमंडळाची. ७. हुन्नरें, ज्ञानें. ८. भया [व] अभया द्याया (देण्याला) प्रभु (समर्थ) [असे] हे (विप्र) या (क्षत्रियांतें) सप्रभ (तेजोयुक्त) [व] निपट (पूर्णपणें) विप्रभ (तेजोरहित) करिती. ९. ज्ञात्यांनीं. १०. खुणेंतील. ११. शब्द, वचन. १२. व्यर्थ, निष्फळ, खोटें. १३. सार्थान्वयः—विप्र म्हणे (उत्तंक म्हणे) 'राया ! सत्य सुकृतजनक (पुण्य उत्पन्न करणारें) [आहे], [हें] मज वाडवा (ब्राह्मणास) ठावें (माहीत आहे); बा ! श्री [व] कीर्ति येतां (लक्ष्मी व यश हीं चालून आलीं असतां) [त्यांतें] वाराया कवण (कोण) जन कवाड (दार) लावील ?' [अर्थात् कोणीही नाहीं.] १४. सार्थान्वयः—हा काय (शरीर) न गणुनि [=या शरीराची पर्वा न धरितां, प्रसंगीं शरीरत्यागालाही तयार होऊन), सत्यांत वसायाचा (खरेपणानें वागण्याचा) माझा बहु भर (मनाचा कल, हेका) आहे; [मी हा काय] बुद्बुदसम क्षणभंगुर समजें; बा ह्याचा भरवसा काय ? [तेव्हां प्राणरक्षणाच्या व शरीरसुखाच्या भरीं भरून, अनिश्चित गोष्टींवर अवलंबून न राहतां, सत्यरक्षणानें पुण्य जोडावें, हेंच मी उत्तम समजतों.] १५. कांहींएक गोष्ट. १६. ज्ञात्या.

[1]कीं तिळहि संशया तुज, हरिस गजा, श्रम नको विदाराया. ॥ ५७
[2]राजा म्हणे 'प्रकाशीं, इतरीं प्रिय पद्म न, रविच्या रमला; ।
वेदज्ञास कथावें काय? परि प्रश्न कर, विचार मला.' ॥ ५८
उत्तंक म्हणे, "धर्मी झाली आम्हांत मि[3]त्रता राया! ।
हा संबंध [4]व्यसनीं, तिमिरीं [5]क्षेम जेविं मि[6]त्र [7]ताराया. ॥ ५९
'[8]वाक्संयत विप्र' असें धर्माचें तत्व जाणते म्हणती, ।
[9]मित्रीं विषम, तयाची करिती विस्पष्ट तस्करीं गणती. ॥ ६०
मि[10]त्रकृत बोध मित्रां हर्षद, रवि जेविं सारसां, गमला, ।
यास्तव बा! मि[11]त्रसहा! तूं एक वि[12]चार सा[12]र सांग मला. ॥ ६१
मी [13]प्राप्तार्थ, नृपा! तूं [14]पुरुषादक पुरुषभक्षणीं [15]लोल, ।
जाउनि पुन्हा तुजकडे येउं? न येऊं? कसें करूं? बोल." ॥ ६२
मित्रसह म्हणे, 'साधो! पुससी जरि [16]धरुनि मि[16]त्रभावातें. ।
कथितों, [17]गेली शापें न प्रतिभा, जेविं मित्रभा वातें. ॥ ६३

---

१. अन्वयार्थः—कीं (कारण) गजा (हत्तीतें) विदाराया (फाडण्यास) हरिस (सिंहास) [व] संशया विदाराया (शंका निरसन करण्यास) तुज तिळहि (लेशमात्र) श्रम नको. [तूं ज्ञाता आहेस, तेव्हां मला योग्य मसलत देऊन, माझी शंका तत्काळ दूर करशील अशी मला खात्री आहे हा उत्तंकाचा भाव]. २. अन्वयार्थः—राजा म्हणे, इतरीं प्रकाशीं (सूर्याहून इतरांच्या प्रकाशांत) रमला (रमलेला) पद्म (कमल) प्रिय न (आवडत नाहीं), [परंतु] रविच्या [प्रकाशीं] रमला पद्म प्रिय. राजाच्या म्हणण्याचा भावार्थ हा कीं, 'रविप्रकाशांत फुललेलें कमल जसें मनाला आवडतें, तसें इतरांच्या प्रकाशांत फुललेलें आवडत नाहीं; तद्वत् तुमच्यासारख्या ब्राह्मणांनीं विद्वान् ब्राह्मणाजवळूनच आपल्या शंकांचें निरसन करून घ्यावें. हें बरें दिसतें. माझ्यासारख्या जवळून ज्ञान संपादण्याची इच्छा करणें रुचण्यासारखें नाहीं. पद्म म्हणजे कमल. हा शब्द प्रायः संस्कृतांत नपुंसकलिंगीच आढळतो व क्वचित् पुल्लिंगीही येतो; व पंतांनीं ह्या गीतींत पुल्लिंगीच उपयोग केलेला आहे. पाठभेद—पूर्वार्धः—रविचा. ३. स्नेह. ४. संकटीं. ५. समर्थ. ६. सूर्य. ७. सोडविण्यास. ८. वाक्संयत विप्र=शब्दाप्रमाणें वागणारे ब्राह्मण असतात, ब्राह्मणांनीं आपलें वचन पाळावें. ९. मित्राशीं कपट करणाऱ्याला शहाणे लोक चोराप्रमाणें मानतात. १०. अन्वयार्थः—जेविं सारसां (कमलांस) रवि, [तेविं] मित्रकृतबोध (स्नेह्याचा हितोपदेश) मित्रां हर्षद (आनंद देणारा) गमला. ११. हें नांव येथें मोठ्या खुबीनें योजिलें आहे. १२. उत्तम सल्ला. १३. इच्छित प्राप्त झालें आहे ज्याला असा. १४. पुरुष भक्षण करणारा. १५. उत्सुक. १६. स्नेह्याच्या नात्यानें. १७. अन्वयार्थः—वातें जेविं मित्रभा (सूर्यतेज), [तेविं] शापें प्रतिभा (बुद्धि) न गेली.

[1]वेंची मराळें[2] मोतीं, तैसें, बोलेन वचन[3] या वेंच; ।
त्वां मजकडे पुन्हा, सुररिपुदेशा[4] जेविं कच[5], न यावेंच[6]. ॥ ६४
येतां परतोनि, तुझे प्राण द्विजसत्तमा! न वांचावे[7]; ।
कीं क्षुधित नित्य चरचर[8] हा[9] राक्षस मत्त मानवां चावे.' ॥ ६५
होउनि कृतकृत्य[10], द्विजें[11] तो निघतां त्या नृपासि आमंत्री[12]; ।
[13]दुर्घटहि कार्य घडवी सुसमर्थ गुरुप्रसाद हा मंत्री. ॥ ६६
[14]कृष्णाजिनांत वेष्टुनि [15]मणिकुंडलयुग, जपोनि[16] राखे[17] तें; ।
चढला फळार्थ बिल्वीं[18], बांधुनियां धन तदीयशाखेतें[19]. ॥ ६७
पक्वफळातें[20] पाडी, गुंते[21] मुनिची फळांकडे दृष्टी; ।
दैवें[22] करुनि फळांची शाखासक्ताजिनीं[23] पडे वृष्टी. ॥ ६८
अजिन विसकटे, पावे[24] मणिकुंडलयुग धरातळीं पतन; ।
विधि[25] रक्षिना जया, त्या कोण कुशळ करिल वस्तुला जतन? ॥ ६९
अजिन करि शब्द पतनीं, उत्तंकाला स्वपात तें कळवी; ।
पाहे फिरोनि मुनिवर तो जों, तों नाग[26] कुंडलें पळवी. ॥ ७०
ऐरावतकुलज[27] भुजग सत्वर मणिकुंडलें मुखीं धरुनी, ।
वल्मीकांत[28] शिरे, तों टाकी तो मुनि उडी द्रुमावरुनी. ॥ ७१
उत्तंक म्हणे अजगरगिलितैकतनयजनापरिस[29] 'हाय,' ।

---

१. जमवितो, गोळा करितो. २. राजहंस. ३. पाठभेदः—वच न. ४. दैत्यांच्या प्रांतीं. ५. बृहस्पतिपुत्र. दैत्यगुरु शुक्राचार्य ह्याजकडे हा संजीवनी विद्या शिकण्याकरितां आलेला होता. ह्यावर कविकन्या देवयानी हिचें अत्यंत प्रेम बसलें होतें व असुरांनीं ह्याचा घात केल्या वेळीं देवयानीच्या प्रार्थनेवरून शुक्राचार्यांनीं ह्यास जीवंत केलें होतें. ६. हें अव्यय साग्रहप्रार्थनादर्शी आहे. ७. वांचणार नाहींत. हा विध्यर्थी प्रयोग ध्यानांत धरण्यासारखा आहे. ८. पाठभेदः—करकर. ९. राक्षस झालेला मी मित्रसह राजा. १०. प्राप्तार्थ. ११. उत्तंक. १२. 'येतों' असें म्हणून निरोप घेता झाला. १३. अन्वयार्थः—गुरुप्रसाद (गुरूची कृपा) हा सुसमर्थ (फार सामर्थ्यवान्) मंत्री (प्रधान) दुर्घटही (दुरापास्तसुद्धां) कार्य घडवी (साध्य करितो). १४. हरिणाच्या कातड्यांत. १५. रत्नजडित कर्णभूषणांचा जोड. १६. काळजीनें. १७. रक्षण कर्ता झाला. १८. बेलाच्या झाडावर. पाठभेदः—वृक्षीं. १९. तदीय+शाखेतें=त्या बेलाच्या डहाळीस. २०. पाठभेदः—पक्कें पक्कें. २१. जडली, लागली, आसक्त झाली. २२. दुर्दैवानें. २३. फांदीस बांधलेल्या कृष्णाजिनावर. २४. पडलें. २५. दैव. अन्वयः—जया (ज्या) वस्तुला विधि रक्षिना, त्या वस्तुला कोण कुशल जतन करिल? २६. मागें गीति ४२ पहा. २७. पाताळांत राहणाऱ्या नागांपैकीं एक जो ऐरावत त्याच्या कुळांत जन्मलेला. २८. वारुळांत. २९. अजगर+

गुरुचा प्रसाद होता त्या गुरुभक्तोत्तमा[1] परि[2] सहाय[3]. ॥ ७२
दंडें वारुळ खाणुनि, खाणी[4] धरणीस दिवस अठरा हो! ।
कांपे धरा[5] थरारां, त्या मुनिस म्हणेल कोण हठ[6] राहो? ॥ ७३
द्विजरूपी शक्र म्हणे 'नाहीं नागांत बा! त्रपा[7] ताळ,[8] ।
काष्ठें[9] खणसिल किति[10]? बहुशत[11] योजन परमदूर पाताळ.' ॥ ७४
उत्तंक म्हणे 'विप्रा! यावद्बळ[12] भूतलासि फोडीन, ।
जोडीन[13] कुंडलें कीं[14] प्राणातें त्वत्समक्ष सोडीन.' ॥ ७५
निश्चळ निश्चय जाणुनि, शिरवी दंडांत देव[15] तो पविला,[16]
कीं[17] भस्म अहिसुरांचें न करो गुरुभक्त विप्र कोपविला. ॥ ७६
वज्रास्त्रबळें[18] सुदृढहि भूतळ तें क्षिप्र[19] भेदिलें दंडें, ।
भेदावीं[20] स्वानुभवें[21] वेदांतज्ञें[22] जसीं सुखें[23] बंडें[24]. ॥ ७७
भेदी शिळातळातें तो दंडें, जेविं जाणता टंकें[25]; ।
कीं जातो आणाया, भेदुनि भस्मासि, बाण ताटंकें. ॥ ७८
पाडी[26] महीतळीं, घनपटलीं ज्यापरि समीर, विवरातें; ।

गिलित+एकतनय+जना+परिस=अजगरानें एकुलता एक मुलगा ज्याचा गिळिला आहे अशा माणसापेक्षां अधिक. एकुलत्या एक मुलापेक्षांही तें कुंडल उत्तंकाला जास्त प्रिय होतें, हा भाव.

१. गुरुभक्तांमध्यें जो श्रेष्ठ त्यास. २. परंतु. ३. मदतकर्ता. ४. खणीत राहिला. ५. पृथ्वी. ६. अत्याग्रह पुरे. ७. लज्जा. ८. भलेपणा, मेळ, युक्तायुक्तविचार. ९. दंडानें. १०. कितीसें. पाठभेदः—खणशील किती. ११. शैंकडों योजनें. योजन=चार कोस. १२. अंगांत जोंपर्यंत शक्ति आहे तोंपर्यंत. १३. परत मिळवीन. १४. किंवा. १५. इंद्र. १६. वज्राला. १७. अन्वयार्थः—कीं (या हेतूनें कीं) कोपविला (रागास आणिलेला, चिडविलेला) गुरुभक्त विप्र अहिसुरांचें (सर्प व देव ह्यांचें) भस्म न करो. इंद्र हा देवांचा राजा, तेव्हां त्यांचा नाश न व्हावा, अशी सदिच्छा त्याचे ठायीं असणें विहितच आहे. १८. वज्ररूपशस्त्राचें बळ आहे ज्याचे ठायीं अशानें. हें 'दंडें' ह्याचें विशेषण. १९. सत्वर. २०. मोडावीं, नाहींशीं करावीं. २१. आपल्या अनुभवानें, आत्मप्रत्ययानें, प्रत्यक्ष प्रमाणानें. २२. वेदान्तविषय जाणत्यानें. २३. सहज. २४. नास्तिक्य व दंभ; भोंदूपणाचीं कृत्यें; खोट्या धर्मवेडाचें स्तोम. २५. टंकें=टांकीनें. सार्थान्वयः—जेविं जाणता (शहाणा) टंकें, [तेविं] तो (उत्तंक) शिळातळातें दंडें भेदी; कीं (अथवा) [हा विप्रबाहुरूपी] बाण [शिलातलरूपी] भस्मासि भेदुनि [फारसे सायास न करितां, अगदीं सहज लीलेनें] ताटंकें (तानवडें) आणाया जातो. २६. सार्थान्वयः—ज्यापरि (ज्याप्रमाणें) घनपटलीं (मेघसमूहामध्यें) समीर (वायु) विवरातें (छिद्रातें) पाडी, [तेविं तो (उत्तंक)] महीतळीं [विवरातें पाडी]. बा ! परिस (ऐक). मी (वैशंपायन) भूमितळा तम (अंधकार) म्हणतों [व] गुरुच्या वरातें रवि [म्हणतों].

भूमितळा 'तम,' गुरुच्या म्हणतों, बा! परिस, मी 'रवि' वरातें. ॥७९
करि, उपवासाचा श्रम बहुदिन साहोनि, तो [1]खनक विवर; ।
सुविशाल नागलोका पावे पाहूनि [2]तोख न [3]कविवर. ॥ ८०
तो बहुसहस्रयोजन अत्यद्भुत नागलोक, [4]शैत गांवें
ज्याचें द्वार, विलोकुनि [5]ज्या कोणाचेंहि धैर्य न [6]तगावें. ॥ ८१
[7]प्राकार सुवर्णाचे जेथें, [8]बहुसंख्य [9]नंदनाभ वनें, ।
त्या लोकींचीं किति म्यां वर्णावीं पांडुनंदना! [10]भवनें? ॥ ८२
दुःसाध्य कार्य वाटे, झाला [11]चिंतामहागदातुर गा! ।
तेथें पाहे [12]कृष्णासितवालधिमंडिता तदा [13]तुरगा, ॥ ८३
अश्व म्हणे '[14]आढ्यत्वीं निश्चित आहेचि जेविं मद पानीं, ।
[15]मत्ताचा [16]उतराया मांज, करीं [17]धमन शीघ्र [18]मदपानीं. ॥ ८४
उत्तंका! त्वां [19]आजचि धरिला? संकोच कां अगा! [20]धमना? ।
होतासि करित गुरुच्या सदनीं ऐसेंचि तूं [21]अगाधमना.' ॥ ८५
उत्तंक म्हणे, 'भलतें वदसी हें काय तूं? अरे! वाजी! ।
[22]न तसी तसी करिसि, परि होइल रेवा कसी? अरेवा जी.' ॥ ८६

---

१. तो खणणारा उत्तंक मुनि. २. संतोष. ३. शहाण्यांमध्यें श्रेष्ठ असा उत्तंक मुनि. उत्तंक मुनींस भव्य नागलोक पाहून संतोष वाटला नाहीं, कारण उत्तंक मुनि हे नागलोकसौंदर्य पाहण्याकरितां गेले नसून, आपल्या नष्ट झालेल्या ताटंकांचें दर्शन त्यांस हवें होतें. ४. शेंकडों कोस रुंद. हें 'द्वार' ह्याचें विशेषण. गांव=चार कोस किंवा आठनऊ मैल. ५. ज्या दाराला. ६. टिकावें, रहावें. तें नागलोकद्वार इतकें मोठें, भव्य व थक्क करणारें होतें, असा भाव. ७. तटबंदी, कोट. ८. अनंत. ९. नंदनवनाचें साम्य आहे ज्यांचे ठायीं अशीं. आभा=कांति. १०. गृहें. ११. चिंता+महागद+आतुर=चिंतारूप महारोगानें ग्रस्त. १२. कृष्ण+असित+वालधि+मंडित= काळें व पांढरें आहे पुच्छ ज्याचें अशा. १३. घोड्याला. १४. सार्थान्वयः—जेविं पानीं (मद्याचे ठायीं) [तेविं] आढ्यत्वीं (श्रीमंतीचे ठायीं) मद (उन्मत्तपणा, भ्रमोत्पादकशक्ति) निश्चित आहेचि. १५. माजलेल्यांचा अर्थात् उन्मत्त सर्पांचा. (पुढें गीति ९४पहा.) १६. माज उतराया=उन्मत्तपणा नाहींसा करण्यासाठीं, रेंच उतरण्याला. १७.फुंकणें, फुंकर. १८. मत्+अपानीं=माझ्या गुदस्थानीं. १९. यज्ञयागादि क्रियांत उत्तंकाला नेहमींचाच फुंकर घालण्याचा सहवास होता, म्हणून, उत्तंक फुंकर मारीत नाहीं हें पाहून, 'आजच हा संकोच कां ?' असें अश्व विचारीत आहे. २०. फुंकण्याविषयीं. २१. खोलबुद्धीचा तूं अर्थात् विचारी. २२. अन्वयः—[जी] तसी (=त्या प्रकारची) न, [ती तूं] तसी करिसी (=करूं पाहतोस), परि (=परंतु) जी अरेवा(=रेवा नदी नव्हे अशी नदी) [ती] रेवा कसी होईल? 'गुरुगृहीं मंत्रपूत अग्नींत धमन करणें,व तुझ्यासारख्या घोड्याच्या अपानीं धमन करणें, हीं दोन्हीं सारखींच का? हें तूं काय वेड्यासारखें भकतोस?'—हा उत्तंकाचा मतलब.

अश्व म्हणे 'तव गुरुचा गुरु मी; होऊनि नित्य दास, मज ।
पूजिसि; गौतमगेहीं[1] जो, तोचि ज्वलन होय हा समज.' ॥ ८७
त्या[2] पावकप्रसादें झाला तत्काळ तत्त्वबोध[3] मनीं, ।
मग वाजिच्या अपानीं[4] उत्साहें सक्त[5] होय तो धमनीं. ॥ ८८
त्या अश्वरोमकूपांतुनि[6] होय[7] प्रकट बहुतसा[8] धूर, ।
जेणें[9] अद्यापि भिजे अश्रुभरेंकरुनि बहुत साधूर[10]. ॥ ८९
करितो जसी सरोरुहगहनांत[11] शिरोनि धामधूम[12] करी[13], ।
तैसी,[14] वासुकिमुख भुजगांचें व्यापूनि धाम, धूम करी. ॥ ९०
भुजगांसि[15] शिकवि, करुनि व्याकुळ बहु मानसा, धुरी ती तें, ।
कीं द्यावा, सकळच्छळ सोडुनि, बहुमान साधुरीतीतें. ॥ ९१
'शरणागत रक्षावे हंसें बक; वाडवा[16]! सुकवि[17] देहें ।
न नतांचीं; करुणेचें लावीं न कवाड[18];' वासुकि वदे हें. ॥ ९२
मणिकुंडलें समर्पुनि, पूजुनि, उत्तंक विनविलो[19] नमुनी, ।
होय सुशांत, अभय दे व्याळांतें[20]; दीर्घरोष[21] तो न मुनी. ॥ ९३
दमिले[22], अतितर दारुण जे श्रीमदमत्त[23] कुंडली[24] होते. ।
गुरुभक्तितपस्तेजें[25] केले गुरुदार[26] कुंडली[27] हो! ते. ॥ ९४

---

१. अन्वयः–जो [ज्वलन] गौतमगेहीं, तोचि ज्वलन हा [मी] होय, [हें] समज. २. त्या अग्निकृपेमुळें. ३. खऱ्या गोष्टीचा उलगडा, सत्यज्ञान. ४. गुदस्थानीं. ५. गर्क. ६. घोड्याच्या रोमरंध्रांतून. ७. निघाला. ८. पाठभेदः–बहु तसा. ९. जेणें=ज्या धुराच्या योगें अर्थात् धूर निघाल्याची कथा ऐकून. प्रत्यक्ष धुरामुळें अश्रुधारा लागतात, तशाच हृदयद्रावक कथेच्या श्रवणानें लागतात. १०. साधु+उर=सत्पुरुषांचें वक्षःस्थळ. ११. कमलवनांत. १२. गोंधळ, त्रेधा. १३. हत्ती. १४. अन्वयार्थः–तैसी [धामधूम] धूम (धूर) वासुकिमुख भुजगांचें धाम (वासुकिप्रमुख सर्पांचें स्थान) व्यापुनि करी (करिता झाला). उत्पन्न झालेला धूर सर्पगृहांमध्यें शिरून त्यांची दाणादाण झाली, असा भाव. १५. अन्वयः–ती धुरी मानसा बहु व्याकुळ करुनि भुजगांसि तें शिकवि, कीं सकळच्छळ सोडुनि साधुरीतीतें (सन्मार्गास) बहुमान द्यावा. धुरीः–पिशाचादिकानें एकाद्यास पछाडिलें असतां, त्यास बोलावयास लावण्याकरितां मिरची, धूप इत्यादि विवक्षित द्रव्य अग्नीवर घालून जो धूर उत्पन्न करितात तो. १६. हे ब्राह्मणा! १७. शुष्क करें. १८. दार, वेस. करुणेचें कवाड न लावीं=कृपादान करण्याचें बंद करूं नकोस, करुणाविमुख होऊं नकोस. १९. विनविलेला, प्रार्थिलेला. २०. सर्पांतें. २१. बहुतकालपर्यंत टिकणारा आहे राग ज्याचा असा. २२. वठणीस आणिले, मऊ केले. २३. संपत्तीच्या ताठ्यानें माजलेले. २४. सर्प. २५. गुरूची सेवा हीच तपश्चर्या तिच्या जोरावर. २६. गुरुपत्नी. 'दार' शब्द संस्कृत संप्रदायानुसार पुल्लिंगी व अनेकवचनी योजिला आहे. २७. कुंडलांनीं युक्त, कर्णभूषणांनीं भूषित.

उत्तंक म्हणे गुरुला, 'हातीं[1] येतीं न कुंडलें कांहीं; ।
[2]केलें होतें माझें कद्रूच्या मलिन तुंड लेंकांहीं. ॥ ९५
परि [3]यां पदप्रसादें तरलों मी संकटांत गुरुदेवा ! ।
[4]भवसागरांत नौका, सेतु, विमान, प्रभो ! तुझी सेवा. ॥ ९६
मी भक्त मयूर, प्रभु तूं [5]करुणामृतपयोद गुरुराजा !' ।
ऐसें वदोनि, वंदी; ऐसा तो सुगुरुभक्त [6]कुरुराजा ! ॥ ९७
होय [7]सुधा वसुधेवरि उत्तंकाची कथा असी सुरसा; ।
[8]इतें [9]सादर सेविल जो कोणी [10]रसिक साधु, तो [11]सुरसा. ॥ ९८

अध्याय चवथा.

यादव करीत होते येउनि [12]सस्वजन [13]रैवतमहातें, ।
तेथें वसुदेवातें वंदी भेटोनि [11]दैवत [14]महा तें. ॥ १
वसुदेव पुसे, सांगे [15]भीष्मद्रोणादिनिधन [16]वनमाळी, ।
शोक न व्हावा म्हणउनि, अच्युत अभिमन्युचाचि वध [17]गाळी. ॥ २
भवसागरीं तराया [18]ज्यांची धरितात[19] सुज्ञ जन कास, ।
त्यातें म्हणे सुभद्रा, '[20]यांच्याची [21]गतिहि सांग [22]जनकास'. ॥ ३

१. हातीं न येतीं=हातांत आलीं नसतीं, प्राप्त झालीं नसतीं, पाठभेदः—हातीं येतां. २.अन्वयार्थः—कद्रूच्या लेंकांहीं (सर्पांनीं) माझें तुंड (तोंड) मलिन केलें होतें (माझ्या तोंडास काळोखी लाविली होती). माझ्या तोंडाला अपयशाचा डाग लागण्याची वेळ ह्या सर्पांमुळें आली होती, असा भाव. ३. ह्या आपल्या पायाच्या कृपेनें. ४. अन्वयार्थः—प्रभो ! भवसागरांत (संसारसमुद्रामध्यें) तुझी सेवा नौका (नाव), सेतु (पूल) [व] विमान. भवसागर तरून जाण्यास गुरुसेवेवांचून दुसरें साधन नाहीं. ५. दयाघन. ६. धर्मराजा ! ७. अमृत. ८. ह्या कथेतें. ९. भक्तिपूर्वक. १०. सहृदय मर्मज्ञ, गुणग्रहणकर्ता. ११. देवाप्रमाणें. १२. आपल्या इष्टमित्रां व आप्तांसहवर्तमान. १३. रैवत नामक पर्वताच्या उत्सवातें. १४. श्रीकृष्ण. १५. भीष्म+द्रोण+आदि+निधन=भीष्माचार्य, द्रोणाचार्य वगैरेंचें मरण. १६. श्रीकृष्ण. वनमाला=गुडघ्यापर्यंत लोंबणारी माला; तीतें धारण करणारा तो 'वनमाळी'. 'वनमाळा' ह्याची व्याख्या संस्कृतांत येणेंप्रमाणें दिलेली आहे. 'आजानुलम्बिनीमाला संवर्तकुसुमोज्ज्वला । मध्ये स्थूलकदंबाढ्या वनमालेति कीर्तिता.' अद्यापिही पुष्पहार तयार करितात, त्यांतही कमालखानी वगैरे पर्याय आढळतात. १७. वगळिता झाला. १८. ज्या भगवान् श्रीकृष्णाची. १९. कास धरितात=आश्रय करितात. २०. अभिमन्यूची. २१. स्थिति. २२. वसुदेवास.

बोलुनि असें, पडे ती, शोकें **वसुदेव**, **देवकीहि**, पडे; ।
तें किति वर्णूं? शिशुसा[1] **उद्धव**, **अक्रूर**, ऐकुनीहि रडे. ॥ ४
तातप्रमुख जनाच्या दूर करी **वासुदेव** शोकातें; ।
नामें[2] विश्वाचें हरि, राहो देईल दुःख तो कां तें ? ॥ ५
प्रभुनें सौभद्राच्या श्राद्धीं द्विज साठ लक्ष जेवविले, ।
लेवविले[3] आपण सदलंकार[4], सुवर्णराशि देवविले. ॥ ६
यादव, **पांडव**, सर्वहि दुःखित **अभिमन्युच्या** वियोगानें; ।
न रुचति कोणालाही मधुरें शुकसारिकोदितें[5] गानें. ॥ ७
सर्वांत **उत्तरा** बहुशोकार्ता[6] सुबहुदिवस जेवीना; ।
ठेवीना[7] गर्भीही दृष्टिस ती, नीट जळहि सेवीना. ॥ ८
शोकें, जागरणें, उपवासें, घडला जसा[8] चिरायास[9], ।
पोटांत गर्भ हळु हळु तत्तापें[10] लागला जिरायास[11]. ॥ ९
व्यास प्रकटुनि सांगे **कुंतीतें**, त्याहि मत्स्यतनयेतें[12]; ।
'वत्से[13] ! समुचित तरि, जरि गेलें शोकेंकरूनि धन येतें. ॥ १०
शोकीं बुडो अवीरा[14], पति किंवा जीस शुचि तनय नाहीं; ।

---

१. मुलाप्रमाणें. 'शिशुसा' शब्दानें उद्धवाक्रूरांच्या गहिंवराचा अतिरेक दर्शविला आहे. २. जो केवळ आपल्या नांवानें अवघ्या जगाच्या दुःखाचा परिहार करितो, तो प्रत्यक्ष असतां स्वजनांचें दुःख शमविल्याशिवाय कसा राहील ? ३. (ब्राह्मणादिकांच्या अंगावर) चढविले, अंगावर धारण करावयास लाविले. ४. सत्+अलंकार=उत्तम भूषणें. ५. शुक+सारिका+उदितें=पोपट व मैना ह्यांनीं म्हटलेलीं. हें 'गानें' (गाणीं) ह्याचें विशेषण. ६. अत्यंत दुःखानें वैतागलेली. ७. तिनें पोटांतील गर्भाची काळजी किंवा पर्वा केली नाहीं. गरोदर स्त्रीनें गर्भाच्या संगोपनार्थ तरी वेळच्या वेळीं यथास्थित जेवणखाण केलें पाहिजे, असा नियम आहे. परंतु उत्तरेनें तोही नियम मोडिला. ८. जसा जसा. ९. बहुतकालपर्यंत होणारे कष्ट. १०. तत्+तापें=त्या कष्टांनीं उत्पन्न होणाऱ्या उष्णतेमुळें. ११. जिरूं लागला, तेथेंच कमी होऊं लागला, जागच्याजागीं नाहींसा होऊं लागला. १२. उत्तरेतें. १३. सार्थान्वयः—वत्से ! जरि गेलें (गेलेलें, नष्ट) धन (प्रियवस्तु) शोकेंकरूनि (शोकामुळें) येतें (पुनरपि प्राप्त झालें असतें), तरि [शोक] समुचित (योग्य). १४. पतिपुत्ररहित स्त्री. ह्या पूर्वार्धांत 'अवीरा' कोण, ह्याचें लक्षण पंतांनीं सांगितलें आहे. अन्वयः—जीस शुचि (शुद्ध, बदनाम ज्याचें झालें नाहीं असा) पति किंवा तनय नाहीं ती अवीरा शोकीं बुडो. तुझी स्थिति तशी नाहीं; तुझा पति केवळ सद्गुणमूर्ति असून महाप्रतापी होता व प्रभुकृपेनें तुला उत्तम पुत्राची प्राप्ति होणार आहे, तेव्हां तुला शोक करण्याचें कारण नाहीं, असा भाव.

प्रभुतेजें, मद्वचनें[1], देखसिल कुमार उचित[2] नयनांहीं[3]. ॥ ११
परिपाळिल साधूंतें, द्याया बहु उत्सवास वसुधेतें[4], ।
तत्सोमातें[5] सेविल टाकुनि कृतकुत्स[6] **वा**सव सुधेतें[7]. ॥ १२
झुरवाया[8] शुष्क[9] हृदय, गर्भहि, उपवास करिसि मुलि! कां गे ?' ।
ऐसेंचि **पां**डवांसहि, 'न करावा व्यर्थ शोक,' हें सांगे. ॥ १३
'यावरि शोक करूं ना' ऐसें बोला कसे, वहा आणा[10]; ।
शकटगजोष्ट्रांवरि[11] तें धन यज्ञाकारणें वहा[12], आणा[12].' ॥ १४
यापरि आज्ञा करुनि, **व्यास** प्रभु गुप्त होय, मग तीतें[13] ।
पांडव अनुष्ठिती[14], **ह**यमेधें तारावयासि जगतीतें. ॥ १५
जाउनि **हि**माचलीं, पदपद्में पूजूनि **वि**श्वजनकाचीं[15], ।
घेउनि आले नानाविध[16] पात्रें आयतींच कनकाचीं. ॥ १६
आठसहस्र[17], सुवर्ण, प्रबळीं उष्ट्रीं, वहावया, भार, ।
शकटीं द्विगुण, त्रिगुण द्विरदीं, रचिला न दुर्बळीं फार. ॥ १७
लक्ष गज, लक्ष गजिनी, लक्ष शकट, लक्ष रथहि हे मानें[18] ।
भरिले **म**रुत्तदत्त[19] द्विजवर्यत्यक्त[19] शुद्ध[19] हेमानें[19]. ॥ १८
भरिलीं उंटें तेथें सासष्ट सहस्र, तद्द्विगुणं[20] वाजी, ।
खरें[21], पुरुष भारवाहक[22] जे, तत्संख्या[23] नसेचि[23] यामाजी[23]. ॥ १९
ती दोन दोनें[24] कोश स्वर्णभरार्ता[25] महाचमू[26] चाले, ।

---

१. माझ्या आशीर्वादानें. २. योग्य. ३. डोळ्यांनीं. कुमार नयनांहीं देखसिल=तुला मुलगा होईल व तो बघण्याला तूं जीवंत राहशील. ४. पृथ्वीतें. ५. तत्+सोमातें=त्यानें दिलेल्या सोमरसातें. सोमरस यज्ञामध्यें पिल्यात, त्या वेळीं इंद्रादि देवता प्रत्यक्ष येऊन सोमग्रहण करितील. ६. केली आहे [सुधेची] निंदा ज्यानें असा. ७. अमृतातें. ८. क्षीण करण्यास. ९. करपून गेलेलें. १० शपथा. ११. गाडे, हत्ती व उंट ह्यांवर. १२. भरून घेऊन या. १३. व्यासांच्या आज्ञेतें. १४. करिते झाले; मानिते झाले. १५. शंकराचीं. १६. अनेक प्रकारचीं. १७. अन्वयार्थः—सुवर्ण वहावया प्रबळीं उष्ट्रीं आठसहस्र (आठ हजार) भार(२०००पल) [रचिला], शकटीं (गाड्यावर) द्विगुण (दुप्पट, अर्थात् ४००० पल), द्विरदीं (हत्तींवर) त्रिगुण (तिप्पट) [भार] रचिला; [परंतु] दुर्बळीं फार न [रचिला]. १८. ह्या प्रमाणानें. १९. मरुत्त राजानें दिलेलें व ब्राह्मणश्रेष्ठांनीं टाकिलेलें जें चोख सोनें त्यानें. २०. त्याच्या दुप्पट अर्थात् एक लक्ष बत्तीस हजार. २१. गर्दभ. ह्या जनावराचा उपयोग पूर्वीपासून ओझीं वाहण्याकडे होत आहे, हें सांगणें नकोच. २२. भारवाहक पुरुष=हमाल, हेलकरी. २३. त्यांची गणति ह्यांत नाहीं. २४. ओझें फार असल्यामुळें जवळ जवळ मुक्काम करावा लागला. २५. सुवर्णाच्या ओझ्यानें लवलेली. २६. मोठी सेना.

परमेश्वरप्रसादें **पां**डव निर्विघ्न निजपुरा[1] आले. ॥ २०

पांडव येणार, पुढें[2] तोंचि **सु**भद्रासमेत **रा**मातें, ।

घेउनि **ना**गपुरा[3] प्रभु[4] ये, पुरवाया स्वभक्तकामातें[5]. ॥ २१

प्रद्युम्न[6], **सां**ब[7], **सा**त्यकि, **कृ**तवर्मा, **नि**शट[8], **चा**रुदेष्ण[9], **ग**द[10], ।

इत्यादि वीर **वि**भुंच्या[11] जवळ, सुवैद्याचिया जसे सगद[12]. ॥ २२

त्यांतें **धृ**तराष्ट्र, सुकवि[13] **वि**दुर, यथान्याय पूजिती हर्षें; ।

प्रभुदर्शनें निवे[14] **ग**जपुर बहु,जैसें मयूरकुल वर्षें[15]. ॥ २३

पांडव हळुहळु, बहु धन घेउनियां, येत निजपथें[16] असतां, ।

विदुरसुसत्कृत **या**दव, **मा**धव, **ब**ळदेव **ग**जपुरीं वसतां[17], ॥ २४

शुभदिवसीं, शुभलग्नीं[18], **अ**भिमन्युसुतासि **उ**त्तरा प्रसवे; ।

[19]तो हर्षशोकवर्धन होय, न तदसूंस तद्वशीं वसवे. ॥ २५

तो शिशु निश्चेष्ट[20] शव[21] ब्रह्मास्त्रेंकरुनि[22] पीडिला होय, ।

---

१. आपल्या राजधानीस; हस्तिनापुरास. २. अगोदर. ३. हस्तिनापुरास. ४. श्रीकृष्ण. ५. आपल्या भक्तांच्या मनोरथातें. ६. कृष्णाचा मुलगा. ७. जांबवतीस झालेला कृष्णपुत्र. हा दुर्योधनाचा जांवई. ८. यादवविशेष. ९. रुक्मिणीपुत्र. १०. वसुदेवास रोहिणीच्या टायीं झालेला पुत्र. ११. श्रीकृष्णाच्या. पाठभेदः-प्रभुच्या. १२. रोगयुक्त, रोगी. १३. ज्ञाता. पाठभेदः–विदुर सुकवी इत्यादि पूजिती हर्षें. १४. समाधान पावतें झालें. १५. पर्जन्यवृष्टीनें. १६. आपल्या मार्गानें. पाठभेदः–पांडवहि हळुहळू धन घेउनियां येत निजपथीं असतां. १७. गीति २४ व २५ यांचें युग्मक आहे. १८. सुमुहूर्तावर सूर्याचें कोणत्याही राशीस येणें, ह्यास ज्योतिषशास्त्रांत 'लग्न' ही पारिभाषिक संज्ञा आहे; जसें, 'मेष' राशीस सूर्य आल्यास मेषलग्न होय. सूर्योदय कोणत्या राशीवर आहे, हें पाहून, कोणत्याही मनुष्याच्या जन्मकाळीं कोणतें लग्न असावें, हें ठरवून, त्यावरून त्या मनुष्याची जन्मकुंडली मांडितात. फलज्योतिषग्रंथांत जन्मकाळच्या निरनिराळ्या लग्नांचीं निरनिराळीं फळें सांगितलीं आहेत. अभिमन्यूच्या पुत्राच्या जन्मकाळीं असणारें लग्न शुभदायक होतें. १९. अन्वयार्थः–तो (सुत) हर्षशोकवर्धन होय (आनंद व शोक यांस पोषक झाला). [कारण] तदसूंस (त्याच्या प्राणांस) तद्वशीं (त्या मुलाच्या ताब्यांत) न वसवे (राहतां येईना) [तो निर्जीव–मृत–होता]. भारतीय युद्धांत द्रौपदीचे सर्व पुत्र मृत होऊन, पांडवकुल निःसंतान झालें होतें; तेव्हां या पुत्रजन्मानें वंशवृद्धि झाली, असें वाटून, त्यांस आनंद वाटणें, हें जसें योग्य होतें, त्याचप्रमाणें तो मृत होऊनच जन्मास आला, हें पाहून शोक वाटणें, हेंही यथार्थच होतें. २०. विगतचेतन; निर्जीव. २१. प्रेत. २२. अश्वत्थाम्यानें सोडिलेल्या ब्रह्मास्त्राच्या प्रभावानें. (मोरोपंती गदापर्वान्तर्गत ऐषिकपर्व २।४३–४५ व ३।१–१४ पहा.)

निश्रीक[1] दिसे, जैसा कासारीं[2] पद्म[3], आटतां तोय. ॥ २६
प्रभु धांवे, तों भेटे अनुजाकृष्णायुता[4] पृथा वाटे[5], ।
जीस सुदुःसहनानाशोकाकुल[6] जन्म निज वृथा[7] वाटे[8]. ॥ २७
कुंती प्रभुसि म्हणे, "बा! कीर्तिश्रीसद्मकंज[9] राखावें, ।
काळें[10] न तुझ्या दासा शरणागतवज्रपंजरा! खावें. ॥ २८
झाला[11], मेला, सुत त्या त्वन्नेत्रसमाननेत्रशोभाचा. ।
हा वांचवुनि, करावा त्वां परलोकीं प्रहृष्ट तो भाचा. ॥ २९
गाती, गुरुसि सुत दिला त्वां[12], अतुला[13] त्वत्कृताप्रति[14] ज्ञाते; ।
जोडू सुकीर्ति, सोडू बा! न तुला त्वत्कृता प्रतिज्ञा[15] ते. ॥ ३०
तो चपलाक्ष[16] स्त्रीप्रति[17] वदला कीं; 'त्वत्सुतासि रक्षील ।
मन्मातुल[18] जगदीश, प्रेमें मजहूनि अधिक लक्षील[19]. ॥ ३१
सुदृशस्वस्त्रीयाचें[20] सत्य करीं, वांचऊनि तोकें[21], वच; ।
भगिनीस[22], पांडवांस, स्वसखीस[23], पितृष्वसेस[24], हो कवच[25]. ॥ ३२

---

१. निस्तेज, शोभारहित. २. सरोवरामध्यें. ३. कमल. ४. धाकटी बहीण (सुभद्रा) व द्रौपदी यांसहवर्तमान. हें 'पृथा' ह्याचें विशेषण. ५. मार्गांत. ६. सोसण्यास कठीण अशा अनेक शोकांनीं व्याप्त. हें 'जन्म' ह्याचें विशेषण. ७. व्यर्थ. ८. भासला. ९. कीर्तिरूपलक्ष्मीचें घररूपी कमल. १०. अन्वयार्थः—शरणागतवज्रपंजरा! (शरण आलेल्यांचें वज्रकवच, अशा!) तुझ्या दासा काळें (मृत्यूनें) न खावें. वज्रपंजर=वज्राचा पिंजरा, अत्यंत कठिण असें कवच, दुर्भेद्य चिलखत. ११. अन्वयार्थः—त्या त्वन्नेत्रसमाननेत्रशोभाचा (त्वत्+नेत्र+समान+नेत्रशोभाचा=तुझ्या नेत्राप्रमाणें नेत्रशोभा आहे ज्याची त्याचा; अभिमन्यूचा) सुत झाला (जन्मास आला) [व] मेला, [तरी] हा सुत वांचवुनि, तो (तुझ्या नेत्राप्रमाणें ज्याचे नेत्र आहेत तो) भाचा (अभिमन्यु) परलोकीं त्वां प्रहृष्ट (अत्यानंदित) करावा. पुत्रप्राप्तीबरोबर अभिमन्यूला स्वर्गांत मुक्तिलाभ होऊन, तो साहजिक आनंदित होईल. १२. कृष्णानें आपला गुरु सांदीपिनि याचा मृतपुत्र यमलोकाहून परत आणिला होता, अशी कथा आहे. 'श्रीसांदीपिनिगुरुसुत यमलोकाहूनि आणिला तूर्ण, । केला गुरुदारमनोरथ सच्छात्रीं तुम्हींच संपूर्ण. ॥ २० ॥ अघटितघटनापटु बहु भावीही हें घडेचि ना तरुणा । अरुणानुज लाजविला, अमृत हरी, परि असी नसे करुणा ॥ २१ ॥ (कृष्णविजय अ० ८५.) १३. अनुपमेय, ज्याला जोडा नाहीं अशा. १४. तुझ्या कृत्याला. १५. कृष्णानें अश्वत्थाम्याच्या अस्त्रानें दग्ध होणाऱ्या उत्तरेच्या गर्भाला पुन्हां जीवंत करण्याची प्रतिज्ञा केली होती. (गदापर्वान्तर्गत ऐषिकपर्व ३।१–१४ पहा.) १६. तो पाणीदार डोळ्यांचा अभिमन्यू. १७. उत्तरेला. १८. माझा मामा, कृष्ण. १९. पाठभेदः—सुक्षील. २०. उत्तमनेत्रयुक्त भाच्याचें. २१. बालक. २२. सुभद्रेस. २३. आपल्या मैत्रिणीस अर्थात् द्रौपदीस. २४. पितृ+स्वसेस=पित्याच्या बहिणीस, आतेस, मला कुंतीला. २५. त्राण, आधार,

आधींच उत्तरा बहु विकळा[1] चित्तीं, स्मरोनि चपलाक्षा; ।
वांचेल[2] पुत्रशोकीं हे, तरि दहनीं करूनि तप लाक्षा. ॥ ३३
गुरु[3]विप्रदेवकीसुतवितरणसुयशांत हेंहि सांचीव, ।
पात्र दया लोभाचा तो भाचा स्मरुनि, बाळ वांचीव." ॥ ३४
बहु करुण विलाप करुनि, कुंती देवी सती रडायाला ।
लागे, शोकें[4] मोहे, वातें कदलीतसी पडायाला. ॥ ३५
श्रीकृष्ण सांवरी त्या मोहीं बहु कळकळूनि[5] आतेला, ।
या प्रभुसि दया जैसी ये, न पित्याला तसी, न मातेला[6]. ॥ ३६
प्रभुला म्हणे सुभद्रा "वांचिव मुल, परिस[7], भाचिया दे हें; ।
त्वां[8] आक्रमिली हरिची, दुष्प्रापा परि सभाचि या देहें. ॥ ३७
अससि समर्थ असा कीं, मृत लोकत्रय पुन्हा जिवविशील[9]; ।
तप्तातें अमृतघनाहूनि अधिक शतगुणें[10] निववशील. ॥ ३८
वदलासि गुरुसुतातें[11] 'लंघूं[12] पाहसि, करूनि वध, मातें, ।
तरि वांचवीन मी मृत सौभद्राचें अपत्य[13] अधमा! तें'. ॥ ३९
सुतशोकांत बुडाली, मेली, त्वां रक्षिली न परि सून[14]; ।
बा ते! पांडव म्हणतिल काय? असें[15] हें अनिष्ट परिसून ॥ ४०

---

१. विव्हल, दुःखी. २. अन्वयार्थः—हे (ही उत्तरा) [जरी] पुत्रशोकीं वांचेल, तरी लाक्षा (लाख) दहनीं तप करून (=तप आचरून) [वांचेल]. अग्नीमध्यें लाख कधीं टिकावयाची नाहीं, तद्वत् पुत्रशोकामध्यें ही उत्तरा वांचणार नाहीं, असा भाव. ३. कृष्णानें यमपुरीहून आपल्या गुरूचा (सांदीपिनीचा) मुलगा, तसेच महाकालपुरीहून एका द्वारावतीवासी ब्राह्मणाचे मृतपुत्र व देवकीचे (बलराम व कृष्ण यापूर्वी जन्मलेले व कंसानें मारलेले) सहा मुलगे परत आणिले, अशी कथा भागवतांत आहे. (कृष्णविजय अ० ८५ व ८९ आणि मंत्रभागवत स्कं० १० गी० १०२४–१०३६ व ११०६–११२३ पहा.) वितरण=देणें. ४. वातें कदलीतसी पडायाला (पडावी म्हणून) शोकें मोहे (मूर्च्छित होई). शोकानें बेशुद्ध होऊन कुंती पडली, हा भाव. पाठभेदः—मोहें. ५. भडभडून, गहिंवरून, आंतड्यांस पीळ पडून. ६. श्रीकृष्णाचें खरें वात्सल्य मातापितरांतही आढळत नाहीं, हा गीतीच्या उत्तरार्धाचा भाव. ७. ऐक. ८. कृष्ण महाकाळरूप विष्णूच्या पुरीस जाऊन द्वारकेंतील ब्राह्मणाचे मृतपुत्र भूलोकीं घेऊन आला, या गोष्टीवर येथें कटाक्ष आहे. (कृष्णविजय, अ० ८९ गी० ७२–९७ पहा.) ९. जिवंत करिशील. १०. शंभरपटीनें. ११. अश्वत्थाम्यातें. १२. मातें लंघूं पाहसि=माझा उपमर्द—अपमान—करण्याचा तुझा बेत असेल. (मोरोपंती, गदापर्वान्तर्गत ऐषिकपर्व अ० १ पहा.) १३. बालक. १४. अभिमन्युपत्नी उत्तरा. १५. गीतीच्या पूर्वार्धांतील वृत्त.

उठउनि पौत्रातें[1], जरि न सुखविसिल वृष्णिनायका! मातें[2], ।
व्हावास तरि कशास भ्राता, येशील काय कामातें ? ॥ ४१
भगिनी, प्रिया[3] सख्याची[4], दीना, शरणागता, हतापत्या[5], ।
ऐसें आणुनि चित्तीं, स्वोक्ति[6] करावी प्रभो! तुवां सत्या. ॥ ४२
मजहुनि मन कृष्णेचें[7] पाहोनि मृता मुलास कळकळतें[8], ।
बापा! मरणाधिक हें दुःख, किति वदों! तुला सकळ कळतें.' ॥ ४३
देव म्हणे, 'तेज तुझ्या वरिल पुन्हा कां न नातवा, सति! तें? ।
लागेचि, लता सहजा जी चंदनकाननांत[9], वास तितें.' ॥ ४४
ऐसें बोलुनि रडतां[10] घेउनि तीतें, स्वयें अरिष्टातें[11] ।
गेला, दयामृतमुदिर[12] भगवान् वारावया अरिष्टातें[13]. ॥ ४५
कृष्णा म्हणे सुनेतें, " ह्री[14], ताप[15] सरावयास[15], आला गे! ।
श्वशुर[14], जया[16] यम, जोडुनि हाता, पसरावयास 'आ' लागे." ॥ ४६
वृद्धांगना चिकित्सकें[17], सितें[18] माल्यें, दीप, कलश[19] जलपूर्ण, ।
प्रभु 'साधु साधु' बोले पाहुनि त्या सूतिकागृहीं[20] तूर्ण[21]. ॥ ४७
ती होय सुसंवीता[22], आला श्रीकृष्णनाथ जाणोनी; ।
करि करुणविलापातें, निर्भर[23] नयनांत नीर आणोनी. ॥ ४८
'अजि! मामाजी! प्रभुजी! मज हा झाला कुमार मेलों[24] हो! ।

---

१. नातवातें. २. मला सुभद्रेला. ३. लाडकी स्त्री. ४. मित्राची, अर्जुनाची. ५. मरण पावलें आहे बालक (अभिमन्यु) जिचें असी. ६. स्व+उक्ति=आपलें बोलणें. (वर गीति ३९ पहा.) ७. द्रौपदीचें. ८. तुटतें. ९. चंदनवनांत चंदनतरूबरोबर उगवलेली. १०. रडत रडत. ११. सूतिकागृहाप्रत. १२. दयारूप पाण्याचा मेघ. १३. संकटातें. १४. हा [मामे] सासरा, कृष्ण. १५. दुःखाचा अंत व्हावा म्हणून. १६. अन्वयार्थः—जया यम (मृत्यु) हात जोडुनि 'आ'पसरावया (तोंड वेंगाडण्यास) लागे. ह्या गीतींत अकराक्षरी यमक आहे. १७. परीक्षा करणाऱ्या. हें 'वृद्धांगना' ह्याचें विशेषण. अर्थात् अनुभवशीर वृद्ध सुइणी, असा अर्थ. १८. पांढरीं पुष्पें. १९. कुंभ. २०. बाळंतिणीच्या खोलींत. २१. चटदिशीं. ह्या क्रियाविशेषणाचा संबंध 'बोले' ह्या क्रियापदाकडे. २२. चांगल्या रीतीनें परिधान केलें आहे वस्त्र जिनें अशी. 'ती सुसंवीता होय'=तिनें आपलें अव्यवस्थित झालेलें वस्त्र सावरिलें. यावरून उत्तरेचा मर्यादशीलपणा व्यक्त होत आहे. २३. पुष्कळ. २४. मेलेला.

[१]हें श्रवण करूनि, अधःप्रेक्षणदात्री उमा रमेला हो. ॥ ४९
मेल्यें मीहि, प्रभुजी! तो मन्नाथचि म्हणों नको मेला; ।
बहुधा जनक न [२]जातीं [३]यांसि दिसे, हा म्हणोन [४]कोमेला. ॥ ५०
[५]होतें हित, दाखविली असती जरि हे तुम्हीं इषीकेला; ।
गुरुजें निमग्न मदुदरिं हा पतिसुतशोकशर विषी केला. ॥ ५१
[६]केलें न तुम्हीं, मी पतिलोका जातें, कुमार उरता, तें; ।
म्यां ताडावें येथें, कितितरि याच्या परत्र उर तातें! ॥ ५२
[७]शस्त्रज्वलनीं केलें हवि, अंकीं रत्न हें न खेळविलें; ।
आचार्यसुतें जन्मुनि संसारीं सुफळ कोण मेळविलें? ॥ ५३
नमन तुम्हांसि करावें सुत घेउनि [८]मन्मनीं असें होतें, ।
केलें [९]विफळ मनोरथशत केवळ गुरुसुतें कसें हो [१०]तें! ॥ ५४

---

१. सार्थान्वयः—हें ('मज झाला कुमार मेला' हें) श्रवण करूनि उमा (पार्वती) रमेला (विष्णुपत्नी लक्ष्मी तिला) अधःप्रेक्षणदात्री (खालीं पहावयास लावणारी, लाजविणारी) हो (होवो). शंकर हे नेहमीं आपलें बोलणें खरें करून आपल्या भक्तांस सुखी करितात; पण श्रीकृष्णरूपी भगवान् विष्णु हे आपला शब्द पाळीत नाहींत. असें ह्या गोष्टीवरून निदर्शनास येईल व त्यामुळें पार्वतीपुढें लक्ष्मीस खालीं पहावें लागेल, असा उत्तरेचा भाव. पाठभेदः—हें श्रवण करुनि, न अधःप्रेक्षणदात्री इ०. २. जन्मीं, जन्मकाळीं. ३. या मुलाला. ४. कोमेजून गेला, तेजोहीन व प्राणहीन झाला. ५. सार्थान्वयः—तुम्हीं इषीकेला (अश्वत्थाम्यानें ब्रह्मास्त्रप्रयोग केलेल्या काडीला) हे (ही मी उत्तरा) जरि दाखविली असती, [तरी] हित होतें (फार बरें झालें असतें); [कारण हल्लीं] गुरुजें (गुरुपुत्र अश्वत्थाम्यानें) हा विषी (विषारी) पतिपुत्रशोकशर (पतिपुत्रशोकरूपी बाण) मदुदरिं (माझ्या पोटांत) निमग्न केला (खोंचला, मारला). ६. सार्थान्वयः—[जेणें] (ज्या योगें) मी [मरून] पतिलोका जातें (गेलें असतें) [व] हा कुमार उरता (जगला असता), तें तुम्हीं न केलें; [कारण] म्यां येथें, व याच्या तातें परत्र (स्वर्गीं) उर कितीतरि ताडावें! (कितीतरी दुःखानें तळतळावें व श्रान्त व्हावें!) ७. सार्थान्वयः—हें रत्न (पुत्ररत्न) अंकीं (मांडीवर) न खेळिवलें, शस्त्रज्वलनीं (शस्त्ररूप अग्नीमध्यें) हवि केलें (आहुति म्हणून दिलें,) [=ब्रह्मास्त्रांत भस्म केलें]. पुत्ररत्न मांडीवर खेळविण्याचा आनंद काय आहे, ह्या संबंधाची कविकुलगुरु कालिदास ह्याची उक्ति 'धन्यास्तदंगरजसा मलिनीभवन्ति' (शाकुं० अ० ७) वाचनीय आहे. ८. मत्+मनीं=माझ्या मनांत. ९. व्यर्थ. १०. हें दर्शकसर्वनाम असून ह्याचा संबंध 'मनोरथ–शत' ह्या नपुंसकलिंगी नामाकडे आहे.

[1]चपलाक्ष बहु तव प्रिय गमला आप्तां तुम्हां महाहितसा, ।
केवळ कृतघ्न, घातक, निर्दय; त्याचा कुमार हाहि तसा. ॥ ५५
[2]कर्म तसेंचि करितसे हा, ज्यांत स्वपरघात कां जी! तें? ।
त्यजुनि सुधेतें, पीतो सुत, कीं प्याला स्वतात, कांजीतें! ॥ ५६
चपलाक्षासीं [3]केली होती 'येईन सह,' असी बोली; ।
[4]खोली ती असती, तरि म्हणती 'छी !,' त्यजुनि आपुली खोली. ५७
[5]चपलाक्षमति सुमृदु, परि दूषीना दुष्ट काय कोप तितें? ।
परलोकीं जाउनि, हे कसि समजावील बायको पतितें?' ॥ ५८
रडवी स्त्रियांसि, [6]मोहीं [7]सुतनु [8]बुडे, जेविं [9]शृंगिणी पंकीं; ।
होय [10]मुहूर्तें सावध, उचलुनियां मृतसुतासि घे अंकीं. ॥ ५९
त्यासि म्हणे, 'वत्सा! तूं [11]धर्मज्ञतनुज कसा अधर्मातें ।
[12]नुमजसि? [13]निजगुरुगुरुतें न नमिसि, पावावया [14]सुशर्मातें. ॥ ६०
[15]प्रपितामही, पहा हे बुडती कीं शोकसागरीं [16]आजी; ।

---

१. सार्थान्वयः–तव बहु प्रिय चपलाक्ष (तुझा अत्यंत आवडता अभिमन्यू), [अकाल मरणानें पितरांचें ऋण न फेडतां स्वर्गी गेल्यानें] तुम्हां आप्तां महाहितसा (हाडवैऱ्याप्रमाणें) केवळ कृतघ्न, घातक [व] निर्दय गमला; हाही त्याचा कुमार (पुत्र) तसा (कृतघ्न, घातक इत्यादि) [गमला] (वाटला). २. उत्तरेच्या मुलाच्या मरणांत स्वपरघात होता, कारण तो स्वतः मेला व तेणेंकरून पांडवांचेंही निःसंतान झालें होतें. ३. सहगमन करीन असें वचन दिलें होतें. ४. सार्थान्वयः–ती खोली (ज्या शय्यागृहांत पतीला हें वचन मीं दिलें तें) असती, तरी आपुली खोली (खोलपणा पक्षीं गांभीर्य) त्यजुनि [मजला] 'छी!' म्हणती. 'खोली' ह्या शब्दावरील श्लेष फार चमत्कारिक आहे. ५. गीतीचा भावार्थः–अभिमन्यूचें मन फार कोमल होतें, हें खरें. [परंतु मी आपलें वचन मोडून जो बेविश्वासूपणा केला आहे, त्यामुळें] दुष्ट कोप त्याच्या कोमल-मनावरही आपला पगडा बसविल्याशिवाय राहील काय? [आणि अशा रीतीनें जर तो मजवर रागवला तर] मी स्वर्गांत जाऊन त्याची कोणत्या तोंडानें बरें समजवणी करूं? त्याचें रागावणें सकारण आहे व तो राग शांत करण्याची माझ्या अंगीं पात्रता नाहीं. हा व स्त्रीपर्वांतील (अ० ४, गी० ४२–५९) उत्तरेचा विलाप खरोखर पाषाणासही पाझर आणण्यासारखा आहे व याला कालिदासकृतींतील 'रतिविलाप' व 'अजविलाप' यांच्या पंक्तीला बसविण्याला कांहींच शंका वाटत नाहीं. 'सुमृदु' ऐवजीं 'मृदुल' असा पाठभेद. ६. शोकानें बेशुद्ध झाली. ७. ही सुंदरी उत्तरा. ८. गाय. ९. चिखलांत. १०. क्षणभरानें. ११. धर्म जाणणाऱ्या अभिमन्यूचा मुलगा. १२. न जाणसी. १३. आपला पिता जो अभिमन्यु त्याच्या गुरूतें–श्रीकृष्णातें. १४. उत्तम प्रकारच्या कल्याणातें. १५. पणजी–कुंती. १६. आज, सांप्रत.

तैसीच सुपूज्या[1] हे पांचाळी[2], हेहि सात्वती[3] आजी. ॥ ६१
झाल्यें मी व्याधविशिखविद्धकुरंगीसमा[4] कुळाधारा[5]! ।
मज तव दृष्टि, सुधेची जेविं पिपासासमाकुला[6] धारा. ॥ ६२
अभिमुख[7] आहे आर्य श्रीकृष्ण, हरील ताप हा; याचें ।
वदन पहा, तव चित्तीं जरि चपलाक्षास्य[8] बा! पहायाचें.' ॥ ६३
करुनि बहु विलाप असे, रडउनि भरतस्त्रियांस, ती रडली; ।
जसि कर्दमांत[9] करिणी[10], पुनरपि मोहांत उत्तरा पडली. ॥ ६४
सावध करिति, उठविती, आर्या कुंतीमुखस्त्रिया[11] तीतें; ।
[12] वंदी नतवरदप्रभुपदयुग अभिमन्युची प्रिया ती तें. ॥ ६५
त्या विपुल विलापातें श्रवण करुनि, दीनबंधु[13] तो तीतें, ।
दावी वात्सल्य जया[14] गाती, वेडेचि सुकवि होती ते. ॥ ६६
आचमन करी भगवान् यदुनायक, आणवूनि शुचि[15] वारी, ।
क्षिप्र ब्रह्मास्त्रातें, तापातें जेविं शीतरुचि[16] वारी[17]. ॥ ६७

---

१. उत्तमप्रकारें मान देण्यास योग्य अशी. २. पांचाळकुलोत्पन्न आजी, द्रौपदी. ३. यादवकुलोत्पन्न आजी, सुभद्रा. ४. पारध्याच्या बाणानें जखमी झालेल्या हरिणीप्रमाणें. ५. वंशाच्या आधारा. वंश पुढें चालविण्यास हाच्र आधार होता; कारण, इतर पांडवपुत्र निद्रित असतां, अश्वत्थाम्यानें शिबिरावर छापा घालून त्या सर्वांचा वध केला होता, म्हणून उत्तरेनें आपल्या बालकास दिलेलें संबोधन योग्य व सार्थ आहे. ६. तृषेनें व्याकुळ झालेल्यास. ७. समोर. ८. अभिमन्यूचें मुख. कृष्ण व अभिमन्यू या मामेभाच्यांच्या तोंडवळ्यांत अत्यंत साम्य होतें. (वर गीति २९ पहा.) ९. चिखलांत. १०. हत्तीण. ह्या गीतीचें व वरील ५९ गीतीच्या पूर्वार्धाचें पूर्ण सादृश्य आहे. ह्या दोनही ठिकाणीं उत्तरा फार विलाप करून मूर्च्छित झाली, असें म्हटलें तें योग्यच आहे, कारण तिजवर दुःखाचे पर्वतच कोसळले. पण तिचा शोक इतका हृदयद्रावक होता, कीं तो ऐकून अनुभवानें दृढ अंतःकरण झालेल्या पोक्त भरतस्त्रियांसही रडें कोसळलें! ११. कुंती आदिकरून बायका. १२. अन्वयार्थः—ती (सावध केलेली) अभिमन्युची प्रिया तें नतवरदप्रभुपदयुग (शरण आलेल्यास वर देणारा जो प्रभु श्रीकृष्ण त्याचें चरणद्वय) वंदी. १३. अनाथांचा कैवारी, गरिबांचा वाली. १४. जया (ज्या वात्सल्याला) [जें] गाती, तें सुकवि वेडेच होती (केवळ हर्षानें व भक्तिप्रेमानें वेडावूनच जातात, मोहून त्यांतच दंग होऊन रंगून जातात). १५. स्वच्छ पाणी. १६. शीतल आहे तेज ज्याचें असा चंद्र. १७. निवारण करिता झाला.

स्वमुखें करि प्रतिज्ञा देव, म्हणे, 'पुत्रि! उत्तरे! जाण, ।
मिथ्या न कधीं वदलों, करितों मी त्वत्सुतासि सप्राण. ॥ ६८
वदलों नसेन मिथ्या, युद्धीं फिरलों नसेन जरि मागें; ।
तरि हा तव पुत्र उठो, वधिला जो त्या द्विजाधमें[1] रागें[2]. ॥ ६९
धर्म, ब्राह्मण, परम प्रिय जरि असतिल मला पुढें मागें; ।
तरि हा तव पुत्र उठो, वधिला जो त्या द्विजाधमें रागें. ॥ ७०
विजयीं विरोध कांहीं जरि म्यां केला नसेल अनुरागें[3]; ।
तरि हा तव पुत्र उठो, वधिला जो त्या द्विजाधमें रागें. ॥ ७१
धरिला असेल सत्यासह म्यां जरि धर्म, मणि जसा नागें[4]; ।
तरि हा तव पुत्र उठो, वधिला जो त्या द्विजाधमें रागें. ॥ ७२
वधिले असतिल धर्में[5] जरि केशी, कंस, त्यांचिया आगें[6]; ।
तरि हा तव पुत्र उठो, वधिला जो त्या द्विजाधमें रागें.' ॥ ७३
यांपरि[7] कृष्णप्रभुचे वचनामृत[8] सेक हे जेंसे[9] झाले, ।
हाले मृतशिशु, हळुहळु गेले[10] असु चेतनेसहचि[11] आले. ॥ ७४
राहुविमुक्त विधु[12] जसा, ब्रह्मास्त्रविमुक्त शिशु तसा गेहीं ।
प्रकटी प्रकाश, शिरतां प्राणगणांसहित[13] चेतना देहीं. ॥ ७५
[14]मृतशिशुशोकानुभव प्रभुनें तो स्वप्नसाच वांटविला[15], ।
सागर जेविं अगस्त्यें, क्षणमात्रें सर्व खेद आंटविला[16]. ॥ ७६
[17]भरलें होतें गजपुर जें शोकें, वांचवूनि तोक, रितें ।
प्रभु, परिपूर्ण कराया हर्षामृत सांचवूनि, तो करि तें. ॥ ७७
कुंती, देवी कृष्णा, कृष्णावरजा[18], विराटनृपकन्या[19], ।

---

१. नीच अश्वत्थाम्यानें. २. कोपानें. ३. प्रेमामुळें. ४. सर्पानें. ५. न्याय्यवृत्तीचा अवलंब करून. ६. अपराधामुळें. ७. ह्याप्रमाणें. ८. शब्दरूप अमृताचें सिंचन, शिंडकाव. ९. जेव्हां. १०. गेलेले [पंच] प्राण. ११. हालचालीसुद्धां, चैतन्यासह. १२. चंद्र. १३. पंचप्राणांसह. ह्या गीतींतील उपमा फार नामी आहे. १४. मेलेल्या बालकाबद्दलच्या दुःखाचा प्रत्यय. १५. भासावयास लाविला. १६. नाहींसा केला. १७. अन्वयार्थः—जें गजपुर (हस्तिनापुर) शोकें भरिलें होतें, तें (पुर) तो प्रभु (श्रीकृष्ण) हर्षामृत (हर्षरूप अमृत) सांचवुनि (सांठवून) परिपूर्ण कराया तोक (उत्तरेचें बालक) वांचवून (जीवंत करून) रितें (रिकामें, शोकरहित) करि (करिता झाला). कल्पना फार बहारीची आहे. १८. श्रीकृष्णाची धाकटी बहीण, सुभद्रा. १९. विराटाची मुलगी उत्तरा.

[1]अंत:पुरीं, पुरीं अति मुदिता झाल्या स्त्रिया सुबहु अन्या. ॥ ७८
[2]कविजनमुखेंतसींच प्रकटिति बहुशब्दसंपदे वाद्यें; ।
संपों नये रडें, परि संपे, म्हणतांचि 'संप' [3]देवाचें. ॥ ७९
गाति जनमेजया! तव [4]गुरुच्या [5]आश्चर्य [6]मरणजननाचें, ।
प्रभुतें सुखविति गानें, स्तवनें, तैसेंचि कुशलजन नाचें. ॥ ८०
करि [7]जातकर्म, वांटी बहु रत्नसुवर्णशर्करा [8]जीवां; ।
[9]प्रभु तेविं जना सुखकर, विधु कुमुदां जेविं, अर्क राजीवां. ॥ ८१
जनमेजया! 'परिक्षिन्' नाम स्थापि प्रभु स्वयें त्याला, ।
[10]कीं होताचि कुरूप क्षीण तव जनक महायशा झाला. ॥ ८२
प्रभुतें, पुढें कुमार स्थापुनि, ती उत्तरा करी नमन; ।
[11]दे रत्नें बहु त्यातें, जो व्यसनीं हर्षवी करीनमन. ॥ ८३
उपजुनि अविघ्न झाला [12]पौत्राला एक मास, गा! [13]राया! ।
पांडव, बहु धन घेउनि, आले, पावोनि विजय, नगरा या. ॥ ८४
धर्मासि अमात्यांसह गेला [14]आनंदकाय सामोरा; ।
[15]प्रभु भेटुनि देइल, तो तोयद आनंद कायसा मोरा? ॥ ८५
ती भरतराजधानी वाटे भरिली लुटोनि [16]अलकेला; ।
[17]जाणों दारिद्र्यावरि निधिंनीं सज्जनबळेंचि चल केला. ॥ ८६

---

१. जनान्यांत व शहरांत. २. कवींच्या तोंडाप्रमाणें वाद्येंही शब्दसंपदा दाखवूं लागलीं; म्हणजे कवी या प्रभुकृतीचे व मंगल प्रसंगाचे पोवाडे गावूं लागले, व नाना प्रकारचीं वाद्येंही वाजूं लागलीं. ३. कृष्णानें. ४. परिक्षिताच्या. ५. चमत्कार. ६. 'जनन–मरण' हा नेहमींचा क्रम, पण 'मरण–जनन' हा येथें परिक्षितासंबंधें विचित्र क्रम घडून आला. ७. पुत्रावण. हा पुत्रजन्माच्या वेळचा एक संस्कार आहे. ८. लोकांस. ९. अन्वयार्थ:–जेवि कुमुदा विधु (चंद्र) [व] राजीवां अर्क (सूर्य), तेविं जना प्रभु सुखकर [होय]. कुमद=चंद्रविकासी कमल. राजीव=सूर्यविकासी कमल. १०. अन्वयार्थ:–कीं (कारण) तव महायशा (कीर्तिमान्) जनक (पिता) कुरूप [व] क्षीण झाला होताचि. 'कुरूपहि क्षीण' व 'कुरु परिक्षीण' असे पाठभेद. ११. अन्वयार्थ:–जो व्यसनीं (संकटीं) करीनमन (गजेन्द्राचें मन) हर्षवी, त्यातें बहु रत्नें दे. येथें गजेन्द्रमोक्षाची कथा अनुसंधेय आहे. १२. नातवाला, परिक्षिताला. १३. जनमेजया! १४. आनंदमूर्ति. १५. अन्वयार्थ:–प्रभु (श्रीकृष्ण परमात्मा) भेटुनि [जो] आनंद देईल, तो तोयद (मेघ) मोरा कायसा (कितीसा) देईल? अर्थात् मेघामुळें मोरास होणारा आनंद, प्रभु भेटल्यानें भक्तास होणाऱ्या आनंदापुढें कांहींच नव्हे, असा भाव. १६. कुबेरनगरीला. १७. अन्वयार्थ:–जाणों (जणूं काय) निधिंनीं (द्रव्यसंचयांनीं) सज्जनबळेंचि (सत्पुरुषसैन्य घेऊन) दारिद्र्यावरि चल केला (हल्लाच केला, घाला घातला). हस्तिनापुरांत दारिद्र्याची कशी ती डाळ शिजली नाहीं, हा भाव.

धृतराष्ट्रातें वंदुनि, भेटुनि **विदुरा**, युयुत्सुला, **धर्म** ।
पौत्राची [1]उज्जीवनवार्ता ऐकोनि पावला [2]शर्म. ॥ ८७
पूजी **धर्म** [3]प्रभुतें प्रेमें, [4]पावोनि गहिवरा; हा [5]तें ।
[6]स्मरवी, समर्चिलें जें, उद्धरितां मग्न महि, **वराहातें**. ॥ ८८
त्यावरि भेटे [7]कृष्णद्वैपायनभानु [8]सारसा राजा; ।
सांगे, [9]सच्छ्रवणसुधा धर्मकथांमाजि सारसारा ज्या. ॥ ८९
मुनितें **धर्म** म्हणे, 'धन घेउनि आलों तव प्रसादानें, ।
लावावें **हयमेधीं** तें हें त्वां [10]विश्वपूज्यपादानें.' ॥ ९०
व्यास म्हणे, 'बहु उत्तम; सत्वर साहित्य तूं करिव; [11]राजा! ।
[12]सुखसिद्धिकीर्ति वरितिल तुज, [13]'वरित्या जाहल्या **करिवरा** ज्या. ॥ ९१
मी, **पैल**[14], **याज्ञवल्क्य**, [15]त्वन्मखसिद्ध्यर्थ सर्वदा [16]जपतों; ।
[17]तपतों, तुजसारिखिया साधूतें उद्धरावया [18]खपतों.' ॥ ९२
धर्म म्हणे 'श्रीकृष्णा! तूं [19]दीक्षितें हो, तुझीच हे वसुधा; ।
पांडव न [20]पावतेच स्वभुजबळेंकरुनि, जेविं देवें[21]' सुधा. ॥ ९३
[22]योग्य स्वीकाराया, तूंचि प्रभु, न वसुधा, न दीक्षा, मी; ।
[23]हे कीर्ति जगीं, धर्मीं दृष्टि तुझी, नवसुधानदी क्षामीं.' ॥ ९४

---

१. मेला असतां सजीव झाल्याची हकीकत. २. सुख. ३. श्रीकृष्णातें. ४. सद्गदित होऊन. ५. हा=धर्म. पाठभेद:–हातें. ६. अन्वयार्थ:–मग्न महि (समुद्रांत बुडालेली पृथ्वी) उद्धरितां (वर काढल्यावेळीं) वराहातें (वराहरूप धारण करणाऱ्या देवातें) जें समर्चिलें (जें पूजन केलें), तें हा [धर्म] स्मरवी (त्याची आठवण ह्या वेळीं धर्मराजांनीं केलेल्या पूजेवरून लोकांस झाली. ७. व्यास. ८. धर्मराजरूपी कमलाला. ९. सत्पुरुषांच्या कर्णांचें अमृत. अन्वयार्थ:–धर्मकथांमाजि (धार्मिक कथांमध्यें) ज्या सारसारा (उत्तमोत्तम) [व] सच्छ्रवणसुधा, [त्या कथा] सांगे. १०. अवघ्या जगाला वंदनीय आहेत पाय ज्याचे अशानें. ११. धर्मराजा. १२. सुख, यश व लौकिक. १३. अन्वयार्थ:–ज्या करिवरा वरित्या जाहल्या=जें सुखसिद्धिकीर्तित्रय गजेन्द्रास लाभलें. १४. ऋक्शाखेचें अध्ययन करणारा व्यासशिष्य व वसुऋषीचा मुलगा. १५. तुझा यज्ञ सिद्ध व्हावा म्हणून. १६. काळजी वाहतों. १७. तपश्चरण करितों. १८. खटपट करितों. १९. यजमान. २०. [ही वसुधा] न लाभते. २१. विष्णूच्या साहाय्यानें व युक्तीनें देवांना अमृत लाभलें, या गोष्टीवर येथें कटाक्ष आहे. २२. तूंचि प्रभु, मी वसुधा (पृथ्वी) स्वीकाराया योग्य न, [व म्हणून] दीक्षा (यज्ञांतील यजमानपणा) [ही] योग्य न. २३. अन्वयार्थ:–क्षामीं (उन्हानें संतप्त झालेल्यावर किंवा रोगानें क्षीण झालेल्यावर) [जशी] नवसुधानदी (ताजी अमृताची नदी), [तशी] तुझी हे कीर्ति जगीं व हे दृष्टि धर्मीं (धर्मावर) असे. तुझी कीर्ति जगाचा आधार व दृष्टि धर्मांचा आधार आहे. तेव्हां तूंच यजमानपणाला पात्र आहेस हा धर्माचा भाव.

पुण्यश्लोकासि[1] म्हणे, तत्प्रार्थित[2] आयकोन[3] शौरी[4] तें; ।
'धर्मा! तूंचि उचित[5] या दीक्षेतें[6], जेविं शंभु गौरीतें[7]. ॥ ९५
तूं आम्हां सर्वांचा नाथ, कुरूत्तम, गुरूत्तम खरा, या ।
सर्वां भूतांची[8] गति[9] तूं धर्मा! तुंजचि योग्य मख[11] रांया[10]. ॥ ९६
धर्मा! प्रधान[12] तूं, बा! आम्ही सर्वहि तुझे गुणीभूत[13]; ।
भूताधिपें[14] करावें, तें कैसें करिल, जरि गुणी[15], भूत[16] ? ॥ ९७
दीक्षास्वीकार करीं, वरकड[17] तूं सर्व काम सांग मला; ।
अधिकार[18] राजसां कीं नीचोच्च मखांत तामसां गमला.' ॥ ९८
चैत्रीचिया[19] प्रतीक्षा[20] करि, दीक्षा द्यावयासि, पुनिवेची[19]; ।
ती चैत्री ये तोंवरि धर्मकथांहींच काळ मुनि वेंची[21]. ॥ ९९
मग अश्व उक्तकाळीं[22], दीक्षा देउनि युधिष्ठिरा विधिनें[23], ।
संरक्षणार्थ अर्जुन योजुनियां, सोडिला तपोनिधिनें[24]. ॥ १००
विजयासि धर्म सांगे, "हरि[25] हरित्यासी महाविरोध[26] रणीं ।
न करावा त्वां, बाळकपाळकशोकीं[27] न हे विरो धरणी. ॥ १०१
सांत्वुनि[28] त्यांसि म्हणावें 'या' सहपरिवार[29] तुरगमेधाला, ।
बहु सामें[30] हृष्ट गमो अरि[31], अमृतें जेविं सुर गमे धाला. ॥ १०२

---

१. धर्मराजास. हें विशेषण 'नल' 'युधिष्ठिर' 'जनार्दन' व 'जनक' ह्यांस लावितात. २. त्या धर्मराजाची विनंति. ३. ऐकून. पाठभेदः—आयको न. ४. श्रीकृष्ण. ५. योग्य. ६. यज्ञदीक्षा घेण्यास. ७. पार्वतीतें. ८. जीवांची. ९. आधार, आश्रय, पाठिंबा. १०. तुला राजाला. कृष्ण हा मूर्धाभिषिक्त राजा नव्हता, परंतु धर्माला मात्र राजाभिषेक झाला होता, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. ११. यज्ञ. १२. मुख्य. १३. अंगभूत, गौण, कमी योग्यतेचे. १४. शंकरानें. १५. गुणवान्. १६. पिशाच. १७. अवांतर, बाकी, दुसरें. १८. यज्ञांतील सर्वच कामें सारख्या महत्वाचीं व दर्जाचीं आहेत. रज आणि तम या गुणांनीं व्यापलेल्या लोकांच्या दृष्टीला मात्र कांहीं कामें उच्च नीच—थोर हलकीं—वाटतात. वस्तुतः यज्ञसंबंधीं कर्मांत उच्च नीच हा भेदच नाहीं. तेव्हां मला तूं वाटेल तें काम करण्यास सांग, हा गीत्यर्धाचा भाव. १९. चैत्री पौर्णिमेची. २०. वाट पाही. २१. काळ घालवी, वेळ कंठी. २२. योग्य वेळीं, सुमुहूर्तावर. २३. योग्य संस्कारानें. २४. व्यासानें. २५ घोडा हरण करणाऱ्याबरोबर. २६. निकराचें युद्ध. २७. अन्वयार्थः—हे धरणी (ही पृथ्वी) बाळकपाळकशोकीं (बाळराजांच्या शोकांमध्यें) न विरो (झरून नाहींशी न होवो). भारती युद्धांत बहुतेक सर्व मोठमोठे राजे पडले व त्यांचे लहान पुत्र युधिष्ठिरानें गादीवर बसविले होते. (शांतिपर्व पहा). २८. समाधान करून. २९. लवाजम्यासह. ३०. सख्यानें. ३१. शत्रू.

हरि हरित्यावरि [1]कार्यापुरतेंचि [2]स्वशरजाळ वर्षावें, ।
[3]व्हावें त्वां करुणाघन, शिशुभूपमयूरवृंद हर्षावे." ॥ १०३

अध्याय पांचवा.

[4]अच्युतसख [5]अनुसरला [6]अध्वरतुरगोत्तमासि फिरवाया, ।
जिरवाया [7]शात्रवमद, सर्वत्र स्वप्रताप [8]मिरवाया. ॥ १
[9]हरितें हरिते झाले जे नृप, त्यांचे रणीं [10]मद न [11]टिकले; ।
धर्माज्ञेनें उरले शोभवित [12]तदंगनावदन [13]टिकले. ॥ २
[14]पति सूर्यवर्मनामक ये, न लउनि कंधरा, त्रिगर्तांचा; ।
'प्रभुचा' म्हणे, 'अतिक्रम करिन', जसा अंधरात्रि गर्तांचा. ॥ ३
अर्जुन म्हणे, 'स्मरा तें [15]निजपूर्वजवीरमथन, कां मरतां?' ।
कटुहि हित तदुक्त तया, जैसें वैराग्यकथन [16]कामरतां. ॥ ४

---

१. कामापुरतेंच अर्थात् त्यांस वश करण्यापुरतेंच. २. आपल्या बाणांचा समूह. ३. अन्वयार्थ:—त्वां करुणाघन (दयेचा मेघ) व्हावें [व] शिशुभूपमयूरवृंद (बालराजरूपी मोरांच्या टोळया) हर्षावे (आनंदित व्हावे). ४. श्रीकृष्णमित्र, अर्जुन. संस्कृतामध्यें तत्पुरुष समासांत जर उत्तरपद 'राजन्' 'अहन्' 'सखि' ह्यांपैकीं कोणताही शब्द असेल, तर त्यांतील उपांत्यस्वरासह अंत्य व्यंजन किंवा अंत्य स्वर यांना 'अ' हा आदेश होतो. जसें परमसख:, उत्तमाह:. तद्वत् 'अच्युतसख:' असें रूप होतें. ५. मागून चालला. ६. अध्वर+तुरगोत्तम=यज्ञसंबंधीं अश्वश्रेष्ठ. अश्वमेधांत लागणारा अश्व 'श्यामकर्ण' असावा लागतो म्हणून त्यास 'तुरगश्रेष्ठ' असें म्हटलें आहे. ७. शत्रुसंबंधी तो 'शात्रव'. शत्रूंचा गर्व. ८. गाजविण्याकरितां. ९. अश्वातें. १०. अभिमान, गर्व. ११. तगले. १२. तत्+अंगना+वदन=त्यांच्या स्त्रियांचीं मुखें. १३. कुंकुमतिलक. अन्वयार्थ:—धर्माज्ञेनें तदंगनावदन शोभवीत टिकले—उरले. अर्जुनानें अश्वहरण करणाऱ्यांचा रणांत माज उतरला. परंतु धर्माज्ञेमुळें त्यांशीं साम करून, त्यांस जिवंत राहूं दिलें व त्यामुळें त्यांच्या स्त्रियांच्या कपाळीं सौभाग्यदर्शी कुंकुमतिलक कायम राहिले. पद्य अ० ४ गी० १०१. 'तंटा करावयाचा असेल, तर बायकोचें कुंकू पुसून ये' असा प्रयोग अगदीं प्रचलित आहे. १४. अन्वयार्थ:—त्रिगर्तांचा पति (त्रिगर्त देशाचा राजा) सूर्यवर्मनामक (सूर्यवर्म नांवाचा) कंधरा न लउनि, (मान न वांकवितां अर्थात् शरण न येतां) ये [व] प्रभूचा अतिक्रम (आज्ञेचें उल्लंघन, अपमान) करीन म्हणे; जसा अंधरात्रि (काळोख्या रात्रीं) गर्तांचा (खळग्याचा) [अतिक्रम=उलंघन] [करीन म्हणावें]. अर्थात् दोनही गोष्टी एकसारख्याच अनिष्ट होत, असा भाव. पाठभेद:—सूर्यवर्मनायक. टीप:—हिंदुस्थानाच्या वायव्येचा प्रांत, ज्यास जालंदर म्हणतात, तो मुलुख व तेथील लोक यांस त्रिगर्त हें नांव होतें, ह्या प्रांतांचे 'उत्तर' व 'पश्चिम' असे भाग केलेले आहेत. १५. आपले वाडवडील योद्धे ह्यांचें भारती युद्धांतील हनन. १६. विषयासक्तांस, कामी जनांस.

सा[1]म न मानुनि, कटकें[2] वेढीच बळें[3] त्रिगर्तनृप हरिला[4]; ।
त्याचा प्रताप तेव्हां मृदुयुद्धेंकरुनि[5] हरिसखें[6] हरिला. ॥ ५
तद्बंधु[7] केतुवर्मा धांवे, त्यातेंहि पार्थ कवि रोधी[8]. ।
तिसराहि न धृतवर्मा होऊं दे साम सार्थक, विरोधी[9]. ॥ ६
बहु[10] मानवे धनंजय त्या धृतवर्म्यास शीघ्र संधानें, ।
तो तत्प्रसाद तेणें न निरखिला, निधि जसाचि अंधानें. ॥ ७
क्षत केला विजयाचा, सोडुनियां दीप्त[11] कांड, वाम[12] कर[12]; ।
सिंधु[13]मकरापुढें [15]करि तो क्षुद्र[14]सरःस्थ तांडवा[15] मकर. ॥ ८
शर लागतां कराला, गांडीव गळोनि तत्क्षणीं पडलें, ।
कुरवाळितां डसावें विष[16]धरशिशुनें जसें, तसें घडलें. ॥ ९
गांडीव[17] गळुनी पडतां, [18]तैं धृतवर्मा पुनःपुन्हा हांसे, ।
खेळां[19]त महापटुतें पाडुनि अकुलज[20] शिशू जसा फांसे. ॥ १०
कोपुनि, गांडीव धरी, रक्तें भरला[21] पुसोनि हात, रणीं; ।
[22]सोडी खर[23] शर, [24]वांटे करितोचि क्षय रुसोनी हा तरणी. ॥ ११
[25]त्याचें तेज हरि, क्षण[26] आयासी करुनि[26] हातिं, सारेंच[27]; ।

---

१. सलोख्याच्या गोष्टी न जुमानितां. २. सैन्यानें. ३. हट्टानें. ४. अश्वास. ५. सौम्य प्रकारें युद्ध करून. ६. अर्जुनानें. ७. सूर्यवर्म्याचा भाऊ. ८. तोंड देता झाला. ९. [अर्जुनाशीं] विरोध (वैर) करणारा. १०. अन्वयार्थः—शीघ्र संधानें (जलद नेम मारण्याच्या गुणामुळें) त्या धृतवर्म्यास धनंजय बहु मानवे (धृतवर्मा धनंजयास फार आवडला); तो तत्प्रसाद (धनंजयाची उल्हासवृत्ति) तेणें (धृतवर्म्यानें) न निरखिला, जसाचि अंधानें निधि (धनठेवा) [न निरखावा]. धृतवर्म्यानें हें पाहून त्याप्रमाणें वर्तन केलें असतें, तर त्याचें हित झालें असतें, असा भाव. ११. तेजस्वी बाण. १२. डावा हात. १३. समुद्रांतील सुसरीपुढें. १४. भिकार डबक्यांतील. १५. नाच करी; गमजा, चेष्टा करी. १६. सापाच्या पिलानें. १७. अर्जुनाच्या हातांतील धनुष्य. १८. तेव्हां. १९. अन्वयार्थः—जसा खेळांत (द्यूतांत) [खेळणाऱ्याच्या हातांतील]फांसे पाडुनी (जमिनीवर उडवून) अकुलज (नीच कुळांत जन्मलेला, असभ्य) शिशू महापटुतें (द्यूतक्रीडेंत अतिनिष्णात अशा मनुष्यातें) [हांसे], [तसा] धृतवर्मा अर्जुनातें हांसे. २०. पाठभेदः—अनुकूल शिशु. २१. भरलेला. २२. पाठभेदः—खांडी. २३. तीक्ष्ण. २४. अन्वयार्थः—हा तरणी (हा अर्जुनरूप सूर्य) रुसोनि (रागावून) क्षय (संहार) करितोचि, [असें] वाटे (भासलें). २५. धृतवर्म्याचें. २६. [अर्जुन] पळभर आपल्या हाताला श्रम देऊन, क्षणभर जरा नेटानें बाण सोडण्याची तसदी हाताला देऊन. पाठभेदः—आयासें. २७. सर्वच. हें 'तेज' शब्दाचें विशेषण.

मृगपति जसा करीचा, [1]उतरी, धनु धरुनि, [2]हा तसा [1]रेंचें. ॥ १२
भ्याले त्रिगर्त सर्वहि, आले [3]तृणवदन संगरीं शरण, ।
त्यांसि अभय दे अर्जुन, धर्माज्ञेचें करूनियां स्मरण. ॥ १३
वदला, 'विरोध न बरा, संसारीं साधुसीं बरी मैत्री, ।
या हयमेधासि पुढें, [4]जे कीं येणार पूर्णिमा चैत्री.' ॥ १४
तेथुनि निघोनियां मग जों प्राग्जोति[5]षपुरासि हय गेला, ।
तों हरुनि [6]वज्रदत्तें [7]भगदत्तसुतें [8]महाबळें नेला. ॥ १५
भगदत्तवधक्रोधें त्या पार्थासीं [9]त्रिरात्र युद्ध करी; ।
[10]तो [11]हरिसा, यश त्याचा ऐरावतसाचि मिरवि शुद्ध [12]करी. ॥ १६
चवथे दिवशीं पावे पार्थशराहत सुवीर तो पतन, ।
पुनरपि चढे [13]करिवरी, स्वयशातें करि [14]पराक्रमें [15]जतन. ॥ १७
[16]बहुशरचित शल्यसमचि होय द्विपवर रणांत, मग शिर तो ।
नत करुनि पडे; वाटे वज्राहत मेदिनींत नग शिरतो. ॥ १८
यापरि अर्जुन [17]भंगुनि भगदत्तसुतास, [18]वीर्यमत्तास, ।

---

१. माज जिरवी, खोडकी मोडी. २. अर्जुन. ३. तृण आहे वदनीं ज्यांच्या, ते तृणवदन. 'दांतीं तृण धरणें' (=शरण येणें) हा सार्वत्रिक प्रयोग आहे. ४. जी. पाठभेद:—जो. ५. शाकल देशाच्या उत्तरेस ह्या नांवाचा एक देश व नगर होतें. ६. प्राग्जोतिष पुराच्या भगदत्त राजाचा मुलगा. हे पितापुत्र हत्तीवर बसून युद्ध करण्यांत निपुण होते. (पहा पुढें गीति १६.) ७. भारती युद्धांत भगदत्तास अर्जुनानें मारिलें. मरतेसमयींसुद्धां त्याचे हातांतून अंकुश गळून पडला नव्हता. (पहा, स्त्रीपर्व अ०५, गीति २९). ८. वलिष्ठानें. ९. दिवसा तर युद्ध होत असतेंच, पण ह्यानें रात्रींसुद्धां युद्ध केलें, हें सांगून त्याच्या सामर्थ्याचें विशालत्व व क्रोधाचा आवेश पंतांनीं मोठ्या खुबीनें व्यक्त केला आहे. १०. वज्रदत्त. ११. इंद्रासारखा. १२. हत्ती. वज्रदत्ताचा ह्मणजे भगदत्ताच्या मुलाचा हत्ती ऐरावताच्या कुळांतील होता. १३. हत्तीवर. १४. शौर्यानें. १५. रक्षण. १६. अन्वयार्थ:—तो वहुशरचित (पुष्कळ बाणांनीं आच्छादिलेला) द्विपवर (गजश्रेष्ठ) रणांत (रणभूमीवर) शल्यसमचि (साळूंद्राप्रमाणें) होय, मग तो शिर नत करुनि (मान खालीं वांकवून) पडे; [हें पाहून] वज्राहत (वज्रपात ज्यावर झाला आहे असा) नग (पर्वत) मेदनींत (पृथ्वीमध्यें) शिरतो, वाटे. साळींद्राचें अंग कांटेरी पिसांनीं भरलेलें असून, तो रागावला म्हणजे आपलें अंग फुगवितो व त्यांतून तीं पिसें बाणाप्रमाणें निघतात व शत्रूवर पडतात. हीच उपमा शरपंजरीं पडलेल्या भीष्मास दिलेली आहे:—कथमपि वृद्ध सहातों देवा! तापापहा! कसाल्याला। शलले शल्य, तसा हा सायक बापा! पहा कसा त्याला! ॥ शांतिपर्व ७।५७. १७. पराभवून. १८. सामर्थ्यानें धुंद झालेल्यास.

देता झाला अभय व्यसननिमग्नास[1] वज्रदत्तास. ॥ १९
त्यासि म्हणे 'सुरभि[2] न जें, देइल तत्काल साधु मैत्री तें, ।
यावें पहावया बा! हयमेधोत्सव पुढील चैत्रीतें[3].' ॥ २०
तेथुनि जयद्रथाच्या गेला तो पार्थ सिंधुदेशाला[4]; ।
तेथेंही जय पावे, करुनि प्रकट प्रतापलेशाला[5]. ॥ २१
आधीं सैंधववीर स्मरुनि जयद्रथवधासि कोपानें ।
वेढिति, म्हणति, 'धरा[6] या खळरुधिराच्या सुतृप्त हो पानें.' ॥ २२
उत्पात[7] विविध झाले, भ्याले सुर म्हणति 'पार्थ हा शुकसा[8] ।
शरपंजरांत[9] दिसतो, होइल यांतूनि मुक्त आशु[10] कसा?' ॥ २३
देते झाले मुनिवर त्यासि करायासि समर तेजातें[11], ।
तो भंगेल कसा? हो! 'विजयी हो,' म्हणति अमर ते ज्यातें. ॥ २४
परे[12] झांकिले नराच्या[13] इषुंहीं[13], तरु जेविं शलभसेनांहीं[14]; ।
झाले जिष्णुपुढें ते मृगराजसमक्ष[16] कलभसे[17] नाहीं[15]. ॥ २५
ज्याचेंत्याचेंही[18] करी भंगीं[19] 'हा! हा!' अशा स्वना[20] तुंड; ।
धावोनि दुःशला[21] ये, दावी त्या अतियशा[22] स्वें नातुंडें[23]; ॥ २६
भगिनीतें पाहुनि, धनु उतरि अजातारिच्या[24] अंकोपार्थ; ।
द्रवुनि[25] म्हणे; 'वद, वत्से! काय करूं? परं[26] म्हणों नको पार्थ.' ॥ २७

---

१. संकटांत पडलेल्यास, कचाटींत सांपडलेल्यास. २. कामधेनू. ३. चैत्री पूर्णिमेला. ४. सिंधप्रांताला. ५. थोड्याशा पराक्रमाला. ६. पृथ्वी. ७. अपशकुन. ८. पोपटासारखा. ९. बाणांच्या पिंजऱ्यांत. १०. सत्वर. ११. सामर्थ्यातें. १२. शत्रु. १३. अर्जुनाच्या बाणांनीं. १४. टोळांच्या झुंडीनें. ज्यांनीं इ.स. १९०३ सालीं टोळांच्या झुंडींनीं फुललेलीं रानेंच्या रानें पाहिलीं असतील, त्यांच्या ध्यानांत या उपमेचें उचितत्व पूर्णपणें बिंबल्यावांचून राहणार नाहीं. १५. नाहींसे झाले, नाश पावले. १६. सिंहापुढें. १७. बालहत्तींप्रमाणें, हत्तीच्या पोरांसारखे. १८. प्रत्येकाचें. १९. फुटलें असतां. २०. स्वराला, शब्दाला. २१. धृतराष्ट्राची कन्या व जयद्रथाची स्त्री. २२. महाविजय संपादन करणाऱ्या अर्जुनास. २३. आपलें नातवंड. २४. [वहीण शरण आली असतां, युद्ध चालू ठेवून, तिच्या सैन्याचा व कुळाचा निःपात केला तर धर्मराजा रागावेल; तेव्हां तसें घडूं नये व आपल्यावर] धर्माचा राग होऊं नये म्हणून. २५. गहिंवरून. २६. या अर्जुनाला परका [किंवा शत्रु] समजूं नकोस. दुःशला ही धृतराष्ट्राची मुलगी व पांडवांची चुलत बहीण होती. ही अर्जुनाहून लहान असल्यामुळें, तो तिला 'वत्से' या शब्दानें संबोधित आहे. (या संबंधानें स्त्रीपर्व अ० ५, गीति २४, पहा.)

ती त्यास म्हणे, 'माझा पुत्र तुझा सुरथनाम जो भाचा, ।
तत्सुत हा तुज नमितो; दे आशीर्वाद [1]अभयलोभाचा.' ॥ २८
पार्थ म्हणे, 'कोठें तो तव पुत्र सुरथ? न आणिला कां? गे!'।
ती दुःशळा, स्वनयनें [2]शोकांबुभरें भरूनियां, सांगे. ॥ २९
'बा! होता शोकाकुळ, ऐकुनि निजतात[3]सिंधुराजगती; ।
[4]कळली आक्रमिली त्वां सिंहें त्या बाळसिंधुरा जगती. ॥ ३०
तव आगमनाची त्या झाली अतिमात्र शोकदा वार्ता, ।
सिंव्हासनींच मूर्च्छा आली तत्काळ [5]शोकदावार्ता. ॥ ३१
केवळ बाळ [6]झळेनें ग्रीष्मांत जसा, तसाच कोमेला; ।
[7]भद्रासनावरुनि बा! पडला, पडतांचि सुरथ तो मेला! ॥ ३२
मग या तत्पुत्रातें घेउनि, अभयार्थ धांवल्यें बा! मी, ।
मेला तुझ्या भयें जो, पडला आहे तसाचि तो [8]धामीं.' ॥ ३३
ऐसें सांगोनि; रडे फारचि, [9]कारुण्यसंपदभ्रा त्या; ।
[10]पुनरपि म्हणे, करुण बहु व्हाया तच्चित्तकंपद, भ्राल्या. ॥ ३४
'अभिमन्युसुततसा [11]परिपाल्य सुरथसुतहि अर्जुना! तूतें, ।
[12]तो [13]अर्जितो जसें जें प्रेम तुझें, हाहि अर्जु नातू तें. ॥ ३५
दुर्योधन [14]सैंधव खळ, त्या दोघांस स्मरो नको; [15]पावें; ।
बा! मजवरि न, तयांचे ते अपकार स्मरोन, कोपावें. ॥ ३६
[16]हतबंधु [17]निपट शिशु हा [18]कांहीं नेणें, अशावरि [19]द्रवें; दे ।

---

१. निर्भयता व ममता ज्यांत आहे असा. २. दुःखामुळें उत्पन्न होणाऱ्या पाण्याच्या पुरानें. ३. आपला बाप सिंधुपति जयद्रथ ह्याची [तुझ्या हातानें झालेली] अवस्था. ४. अन्वयार्थः—त्वां सिंहें आक्रमिली (पादाक्रान्त केलेली) जगती (पृथ्वी) त्या बाळसिंधुरा (सुरथरूपी बाळहत्तीस) कळली. ५. शोक+दाव+आर्त=शोकरूप वणव्यानें पीडिलेल्यास. ६. तिरिपेनें, झळाळीनें, उन्हाच्या आहाळीनें. ७. सिंहासनावरून. ८. घरीं. ९. त्या दयारूप संपत्तीच्या मेघाला, त्या करुणावना अर्जुनाला. १०. बहु करुण (विपुलकरुण-रस, दया, करुणा) तच्चित्तकंपद व्हाया (त्याच्या मनाला कंप देणारें व्हावें म्हणून, गहिंवर आणवून, त्यास कांपविणारें व्हावें म्हणून) ती पुनरपि भ्राल्या (भावाला) म्हणे. अर्जुनाचें रणप्रसंगीं अत्यंत कठोर, परंतु एरवीं अत्यंत कोमळ, असें चित्त पाहून, 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि । लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति ॥' या भवभूतीच्या उक्तीचें साहजिक स्मरण होतें. ११. संभाळ करण्यास योग्य. १२. अभिमन्युसुत. १३. संपादन करितो. १४. सिंधुपति जयद्रथ. १५. दया कर. १६. ज्याचे नातेवाईक मृत झाले आहेत असा. १७. खरोखर. १८. [ह्यास] कांहीं कळत नाहीं अर्थात् अज्ञान आहे. १९. दया कर.

शरणागता अभय; बा! प्रभु करि, विनवूनि जें दरिद्र वदे. ॥ ३७
बा! सन्मन अरिच्याही पाहुनि दुःखित मुलास कळकळतें, ।
बहु काय वदों? शरणागतवत्सल तूं, तुला सकळ कळतें.' ॥ ३८
इत्यादि बहु विलाप श्रवण करुनि, पार्थ गहिंवरें दाटे; ।
फाटे उर शोकानें, बहु निंद्य क्षत्रधर्म त्या वाटे. ॥ ३९
आलिंगुनि, समजावुनि, पार्थ म्हणे, 'रक्ष या स्वसे! वेला; ।
सांगत जा मज, द्याया शुद्धयशा अक्षया, स्वसेवेला. ॥ ४०
आलें हटें मराया, समर कराया, बळ; स्वसे! ने तें.' ।
वदुनि असें दे आज्ञा, ती गेली फिरवुनि स्वसेनेतें. ॥ ४१
आकाशीं जेविं मृगामागें भगवान् पिनाकधर लागे, ।
त्या यज्ञहयामागें तैसाचि विजय, न लेशेंही भागे. ॥ ४२
अश्व मणिपूरदेशीं जातां, ज्यांचें न यश कधीं मळलें, ।
तो अर्जुन आला, हें तत्तनया बभ्रुवाहना कळलें. ॥ ४३
धनविप्रपुरःसर ये, नमन करी, धरुनि तोकें विनयातें; ।
सुखवी, माथा हुंगुनि, आलिंगन करुनि, तो कवि नयातें. ॥ ४४

---

१. बा! दरिद्र (प्रसंगांत सांपडलेला गरजू) जें विनवूनि वदे, [तें] प्रभु (समर्थ पुरुष) करि (करितो). २. सत्पुरुषांचें चित्त. ३. गहिंवरतें. ४. शरण आलेल्यावर दया करणारा. ५. उमास्यानें भरून आला, सद्गदित झाला. ६. क्षत्रियास विहित म्हणून सांगितलेलें कर्तव्य. ७. हे भगिनि, दुःशले. ८. वंशवेलाला, कुलांकुराला, नातवंडास. ९. अन्वयार्थः—अक्षया (अखंड, शाश्वत) अशा शुद्ध यशा (निर्मल कीर्तीतें) द्याया मज स्वसेवेला (आपल्या स्वतःच्या कामातें) सांगत जा. तुझें कोणतेंही काम असल्यास मला करावयास सांगण्यास संकोच करूं नको, कारण, वहिणीचें काम केल्यानें मजला निर्मल कीर्तिच प्राप्त होत जाईल, असा भाव. १०. दुराग्रहानें. ११. दक्षानें यज्ञ केला, तेव्हां शंकरपार्वतींस यज्ञास पाचारण केलें नाहीं. त्यावर आमंत्रणावांचूनच व शंकर 'नको' म्हणत असतांही पार्वती यज्ञास गेली, परंतु तेथें तिचा अपमान झाल्यानें तिनें यज्ञकुंडांत उडी टाकिली. हें वर्तमान शंकरास कळलें, तेव्हां दक्षाचें पारिपत्य करण्याकरितां त्यांनीं वीरभद्रास पाठविलें; त्याच्या भयानें यज्ञपुरुष (अग्नि) हरिणाचें रूप धारण करून आकाशमार्गें पळून जाऊं लागला. तेव्हां त्याचें पारिपत्य करण्यासाठीं पिनाक धारण करणारे शंकर त्याचे मागें लागले. वर्णनसादृश्यः—'मृगानुसारिणं साक्षात्पश्यामीव पिनाकिनम्'. १२. यत्किंचित्सुद्धां. १३. दमला नाहीं. १४. चित्रवाहन राजाचें नगर. १५. ज्याच्या कीर्तीस कधींही डाग लागला नाहीं. १६. चित्रवाहनाची कन्या चित्रांगदा हिचे ठायीं अर्जुनापासून झालेला पुत्र. १७. धन आणि ब्राह्मण ह्यांस पुढें करून अर्थात् ह्यांसह. १८. बालक बभ्रुवाहन. १९. अन्वयार्थः—तो कवि (शाहणा अर्जुन) माथा हुंगुनि, आलिंगन करुनि नयातें सुखवी (शिष्टाचाराला संतोष देता झाला, शिष्टसंप्रदायाला मानिता झाला).

[1]जी साधुरीतिसीं शुचि सुतरीति, धरूनि तोष, तोलावी; ।
तीतेंहि पुत्रवत्सल बहु धर्मनयज्ञ दोष तो लावी. ॥ ४५

कोपोनि म्हणे, 'युद्ध न करितां, स्वक्षात्रधर्म सोडून, ।
मोडून [2]वीररीतिप्रति, कां आलासि हात जोडून? ॥ ४६

[3]क्षत्रियधर्मबहिष्कृत उचित मज न पुत्र तूं [4]भयातुर गा! ।
[5]हे भेटि नीट तरि, जरि अनुसरतों पार्थ मी न या तुरगा. ॥ ४७

भेटसि भीरु स्त्रीसा; करिसी, जोडूनि हात, सामातें; ।
[6]परकृत अपमान जसा, त्वत्कृत बहुमान हा तसा मातें. ॥ ४८

आयुध धरूनि आलों? किंवा मी करुनि [7]आयुधन्यास? ।
वद, रे! रुचे यशस्कर? कीं अयशस्करहि [8]आयु [9]धन्यास? ॥ ४९

या समयीं [10]सोडावे शर, तें न करूनि, जोडिसी हात, ।
घात यशाचा केला, होइन कैसा प्रसन्न मी तात?' ॥ ५०

[11]यापरि बहु धिक्कारी पुत्रातें पार्थ [12]संकटीं घोली; ।
[13]तों [14]भेदुनि [15]उर्वीतें, तेथें नागात्मजा सती आली. ॥ ५१

[16]पार्थप्रिया [17]उलूपी येऊनि [18]अधोमुखा सुता पाहे, ।
[19]साक्षात् जनकाहुनि बहु पावे चित्तीं सती सुतापा हे. ॥ ५२

---

१. सार्थान्वयः—तोष धरूनि (आनंदानें) जी शुचि (शुद्ध, निर्मल) सुतरीति (मुलाची वागणूक) साधुरीतिसीं तोलावी (सत्पुरुषांच्या चालीच्या बरोबरीची मानावी) तीतेंहि (तिलासुद्धां) तो पुत्रवत्सल (पुत्राचे ठायीं प्रेम ठेवणारा)[व]बहु धर्मनयज्ञ (योग्य शिष्टाचार जाणणारा असा अर्जुन)दोष लावी (नांवें ठेविता झाला). २. शूर पुरुषांच्या संप्रदायाला उल्लंघून. ३. क्षत्रियधर्मानें वगळलेला, क्षात्र धर्मापासून चावलेला. ४. भेकड. ५. अन्वयार्थः—मी पार्थ जरि या तुरगा न अनुसरतों, तरी हे (ही) भेटि नीट [झाली असती]. मी ह्या घोड्याचा संरक्षणकर्ता म्हणून न येतां, जर निराळ्या स्थितीनें येऊन तुझी माझी भेट झाली असती, तर ही तुझी आचारपद्धति मजला मानवली असती; ह्या वेळीं ती योग्य नसून, निंद्यच होय; असा अर्जुनोक्तीचा भाव. ६. तिन्हाइतानें किंवा शत्रूनें केलेला. ७. शस्त्रत्याग. ८. जीवित. ९. थोरास. १०. पाठभेदः—जोडावे. ११. ह्याप्रमाणें. १२. पेंचांत पाडी. १३. इतक्यांत. १४. पृथ्वीचें विदारण करून. १५. नागकन्या उलूपी. १६.अर्जुनपत्नी.१७. कौरव्यनामक नागाची मुलगी. हिची व अर्जुनाची गंगाद्वारीं गांठ पडली. ही अर्जुनाच्या स्वरूपावर लुब्ध झाली व त्यास पाताळांत घेऊन गेली. पुढें अर्जुनानें हिचें पाणिग्रहण केलें व तिला इरावान् नामक पुत्र झाला. १८. खालीं मान घातलेल्यास. १९. [बभ्रुवाहनाच्या] प्रत्यक्ष बापापेक्षांही अधिक. ह्याचा संबंध 'सुतापा पावे=दुःखी होई' ह्याकडे. पाठभेदः—साक्षात् जननीहुनि. हा पाठही उचित आहे; कारण उलूपी ही बभ्रुवाहनाची सावत्र आई होती.

त्या बभ्रुवाहनातें भेटुनियां, ती म्हणे, 'अरे! ताता[1]! ।
नागात्मजा उलूपी मी श्वेताश्वप्रिया[2] तुझी माता[3]. ॥ ५३
पतिचें जसें करावें, तैसेंचि प्रिय तुझेंहि पुत्रा! म्यां; ।
ऐकावेंचि हितविहित माझें त्वां सर्ववीरसुत्राम्या[4]! ॥ ५४
मद्वचनें तातासीं युद्ध करीं, बा! घडेल धर्म तुला[5], ।
घे यश, तव[6] शर्माची पावेल न तें जयंतशर्म तुला[6]. ॥ ५५
युद्धेंचि[7] युद्धदुर्मद, हा होइल न प्रसन्न सामास;
दानासहि न वळेलचि, माथां धरिल्याहि पाय सा मास.' ॥ ५६
ती धमनी[8], सुत दहन[9]चि, पेटविला क्षिप्र बोधवातें[10] हो! ।
कीं तच्चित्तीं[11], प्रियें[12], भुजविक्रम दावूनि, तो धवातें[12] हो[12]. ॥ ५७
चित्तीं[3] धरि[13] मातेच्या सुकृतसुसुखकीर्तिदायक[14] वचातें, ।
दिव्य शिरस्त्राण[15] शिरीं, देहीं तो वीरराय कवचातें[16]. ॥ ५८
सदिषुधिशतसंबाधीं[17] नमुनि उलूपीस शुभ[17] रथीं[17] चढला, ।
कढला[18] क्रोधें, समयीं[19] धर्मातें[20] कां चुकेल, जो पढला[21]. ॥ ५९
[22] न दुजा तसा सुतेजा पाहे, जरि करि उदंड शोध, रवी; ।
निजसैनिकांसि आज्ञा करुनि, हयांस[23] प्रवीर तो धरवी. ॥ ६०
होय प्रसन्न अर्जुन, पुत्रावरि बाणवृष्टि तो सोडी, ।
तो बभ्रुवाहनहि त्या गुरुवरि, घनवृष्टि[24] तीपुढें थोडी[24]. ॥ ६१

१. बाळा! २. पांढरे घोडे आहेत ज्याचे अशा अर्जुनाची पत्नी. ३. [सावत्र] आई. ४. हे वीरेंद्रा! वीरश्रेष्ठा! सुत्रामा=इंद्र. ५. तुला स्वकर्तव्य केल्याचें पुण्य लाभेल. ६. तें (सुप्रसिद्ध) जयंतशर्म (इंद्रपुत्राचें सुख) तव शर्माची तुला (बरोबरी, सर) न पावेल. ७. अन्वयार्थः—हा युद्धदुर्मद (युद्धाचा अनिवार गर्व ज्याला झाला आहे असा) युद्धेंचि [प्रसन्न होईल], सामास (संधिस, तहास) न प्रसन्न होईल; दानास (खंडणीस) ही [व] माथां पाय सा (सहा) मास (महिने) धरिल्याही (सहामहिनेपर्यंत पायांवर डोकें घांसल्यानें सुद्धां) न वळेलचि (प्रसन्न होणारच नाहीं). ८. फुंकणी. ९. अग्नि. १०. उपदेशरूपी वाऱ्यानें. ११. तिच्या मनांत. १२. पतीतें आवडता होवो. १३. मनांत वागविता झाला. १४. पुण्य, सुख व यश देणाऱ्या. १५. (मस्तकाचें रक्षण करणारा) वीरांचा टोप. १६. चिलखताला. १७. उत्तम बाणांच्या शेंकडों भात्यांच्या समूहानें सज्ज केलेल्या सुंदर रथावर. 'संबाधी' असा पाठ घेतल्यास तें बभ्रुवाहनाचें विशेषण घ्यावें लागेल. संबाध=समुदाय. १८. सळसळला, तापला. १९. योग्य प्रसंगीं. २०. कर्तव्याला पाठ देईल. २१. शिकला. २२. अन्वयार्थः—[जगताचा चक्षु असा] रवी जरी उदंड (पुष्कळ) शोध करि (चौकसपणें पाहूं लागला), [तरी] असा दुजा (दुसरा) सुतेजा (सामर्थ्यवान्) न पाहे. २३. (अर्जुनरक्षित) घोड्यास. २४. तीपुढें (त्या बाणवृष्टीच्या मानानें) घनवृष्टि (मेघांनीं केलेली जलवृष्टि) थोडी (कमी).

केवळ सुर [1]असुर जसे, करिति पिता पुत्र उग्र युद्ध तसे, ।
दिसती निर्दय, निर्भय, निर्मम[2] निःशंक, निपट उद्धतसे[3]. ॥ ६२
तातासि बभ्रुवाहन [4]शतपर्वप्रतिम तीव्र रोपानें[5], ।
युद्धांत जत्रुदेशीं[6] ताडी वधकामसाचि[7] कोपानें. ॥ ६३
शर लागतांचि [8]घेरी आली जी, चेतनेस [9]घेरी ती; ।
होउनि निश्चेष्ट क्षण, तो पार्थ [10]परासुचीच घे रीती[10]. ॥ ६४
तो [11]सावधान होउनि[11] पुत्रासि म्हणे, 'भला, भला, वीरा ! ।
[12]हो सावधान आतां, मद्बाणातें पहा, [13]सहा, धीरा !' ॥ ६५
[14]ऐसें गर्जुन, अर्जुन भरभर खरतर शरप्रकर सोडी, ।
तो वीर बभ्रुवाहन तितुक्यांसहि शीघ्र तडतडां तोडी. ॥ ६६
[15]स्वसमसमर्थ सुत, असें कळुनिहि, करि कलह, जेविं अविचारी; ।
तोडुनि कनकध्वज, हय मारी [16]कुरुकुळसरोजरवि चारी. ॥ ६७
[17]अतितप्त [18]घृतकटाह [19]क्षोभें साहे जसा न [20]थेंबाला, ।
तेविं न बाणा साहे, ताडी विशिखें [21]अतिव्यथें [22]बाला. ॥ ६८

---

१. ह्या युद्धास 'सुरासुर' युद्ध म्हटलें ह्याचें कारण, तें केवळ घनघोर होतें एवढेंच नव्हे, तर तें अविचारप्रेरित होतें. कारण, पितापुत्रानें युद्धास उभें राहणें गैर, असें असूनही, युद्ध सुरू झालें, ह्यावरून कोणत्या तरी एकापक्षीं असुरभाव उत्पन्न झालाच होता हें निर्विवाद आहे. (पहा, गी० ६७.) २. ममताशून्य, निष्ठुर. ३. तर्र झालेले असे. ४. शतपर्व=कळक, बांबू. शतपर्वप्रतिम= कळकाप्रमाणें (मोठा आणि टणक). ५. बाणानें. ६. बाहु आणि खांदा ह्यांच्या संधिस्थानीं जीं हाडें त्यांचे ठायीं, बावखडावर. ७. वधाची इच्छा करणाऱ्याप्रमाणें. ८. मूर्च्छा. ९. व्यापी. 'चेतनेस घेरी=(तिनें) त्याच्या सावधपणास पछाडिलें, अर्थात् ती [त्यास] बेशुद्ध करी. १०. मेल्यासारखा पडला. ११. शुद्धीवर येऊन. १२. सावध रहा; सांभाळ. १३. सहन कर. १४. ह्या गीतींतील शब्दरचनेची योजना अशी केली आहे, कीं ती वाचतांच वर्णनीय प्रकाराचें हुबेहूब चित्र समोर उभें राहावें; ध्वनिमूलक क्रियाविशेषणामुळें व अर्थानुकूल अनुप्रासानें रसपरिपोष बहुत झाला आहे. शरप्रकर=बाणसमूह. १५. आपल्या सारखाच पराक्रमी; खंदा वीर. आपला पुत्र पराक्रमी आहे, असें प्रत्ययास आल्यावर पुढें युद्ध करण्याचें कारण नव्हतें. तेव्हां पुढें युद्ध सुरू ठेवण्यांत अर्जुनाच्या माथीं अविचाराचा दोष येतो, असा भाव. पाठभेदः—समरसमर्थ. १६. कुरुकुळरूपी कमळाचा सूर्य. अर्थात् कुरुकुलभूषण, अर्जुन. १७. अत्यंत तापलेला. १८. तुपाची कढई. १९. उष्णतेनें उत्पन्न झालेल्या सळसळीनें, कढानें. २०. पाण्याच्या थेंबाला. २१. अत्यंत व्यथा ज्यांत आहे अशा, अत्यंत पीडाजनक अशानें. हें 'विशिखें=बाणें' ह्याचें विशेषण. २२. बापाला, अर्जुनाला.

होउनि विरथ[1], क्षितिवरि उतरुनि, घनसा शरव्रजें[2] वर्षे; ।
तोंतों मयूरसा तो **पांडव** तांडव करी, मनीं हर्षे. ॥ ६९

ताडिति अन्योन्यातें बाणांहीं पत्रिपतिसमरयांहीं[3]; ।
केला, रसिक कवीला लावाया[4] वेडें, अतिसमर यांहीं[5]. ॥ ७०

बाळपणेंकरुनि[6] भरीं भरला[7] **मणिपूरपाळ** कोपानें, ।
ताडी तातातें तो हृदयीं अत्यंततीक्ष्ण रोपानें[8]. ॥ ७१

पर्वत[9] पविप्रहारा, तेविं न साहोनि काय तो खचला; ।
जाणों प्राण परस्पर वदले, 'राहोनि काय तोखं[10]? चला.' ॥ ७२

समरीं श्रम बहु घडला, पडला, पावोनि तोहि[11] मग मोहा, ।
जाणों[12] वीररसतसा मोहहि वदला, 'गुरून न गमो हा' ॥ ७३

स्वकृतें तातनिपातें पावेना देह[13] कां पतन याचें? ।
तें[14] पावलेंच होतें, तातविशिखविद्ध कांप तनयाचें. ॥ ७४

आली अशांत[15] तेथें धांउनि **चित्रांगदा**, म्हणे 'हाय !' ।
जाय तिचें धैर्य, तसें सोसिल पतिपुत्रदुःख ती काय? ॥ ७५

पावे देह, विलोकुनि सहसा[16] प्रियपुत्रपात, कांप तिचा; ।

---

१. रथ नाहींसा झाला आहे ज्याचा असा. अर्जुनानें बभ्रुवाहनाच्या रथाचे घोडे मारिले होते. (पद्य, गीति ६७.) २. बाणसमूहांचा पाऊस पाडिता झाला. ३. गरुडाप्रमाणें वेग आहे ज्यांचा अशा. हें 'बाणांहीं' ह्याचें विशेषण. ४. भांबावून सोडण्यास्तव. ५. अर्जुन आणि बभ्रुवाहन यांनीं. ह्या पितापुत्रांनीं असें युद्ध केलें, कीं तें वर्णन करण्यांत रसिक कवींची सुद्धां मति गुंग होऊन गेली. कारण कीं ह्यांत कमी कोण व अधिक कोण, ह्याचा उलगडाच पडणें कठिण होतें. ६. पोरवय असल्यामुळें. ७. हट्टास पेटला. ८. बाणानें. ९. अन्वयार्थः—[जेविं] पर्वत पविप्रहारा (वज्राच्या आघातास) [न साहे], तेविं तो काय (अर्जुन-देह) [बाणप्रहारा] न साहोनि (सहन न करून) खचला (खालीं पडला). १०. संतोष, सुख. 'अर्जुन निष्प्राण झाला' हा या अर्धाचा अर्थ. ११. बभ्रुवाहनसुद्धां. १२. अन्वयार्थः—जाणों (जणूं काय) वीररसतसा (शौर्याप्रमाणेंच) मोहही वदला, [कीं]हा (बभ्रुवाहन) गुरून (गुरु+ऊन=पित्यापेक्षां कमी) न गमो (भासो). आपण शूरत्वांत बापापेक्षां कमी नाहीं, त्याप्रमाणें मोह पावण्यांतसुद्धां कमी नाहीं, असें दाखविण्याकरितांच जणूं कांहीं बभ्रुवाहन मोह पावला; हा भाव. १३. हा शब्द येथें संस्कृत संप्रदायाप्रमाणें नपुंसकलिंगी योजिला आहे. १४. अन्वयार्थः—[कारण] तनयाचें तात-विशिखविद्ध (पित्याच्या बाणानें टोंचिलेलें) तें (देह) कांप (कंप) पावलेंच होतें. १५. अशा वेळीं, इतक्यांत. १६. एकदम. अन्वयः—प्रियपुत्रपात सहसा विलोकुनि तिचा देह कांप पावे.

मो[१]हसमुद्रामाजि न बुडविल साध्वीस घात कां पतिचा ? ॥ ७६
तो सावध करितां, ती[२] देवी[२] तेथें उद्धपिला पाहे; ।
तीच्या आरडुनि, गळां पडुनि, करी बहुविधा[३] विलापा हे[४]. ॥ ७७
'[५]सखि ! [६]पुत्राकरवीं त्वां कां मारविला रणांत हा कांत ? ॥
सति ! आणिला [७]बळेंचि प्रार्थुनि कैसा गृहासि [८]आक्रांत ? ॥ ७८
ज्यातें वर्णित होता बहु सादर साधु लोक अवघा, तें ।
कां [९]बुडविलें स्वयें त्वां सौभाग्यसुयश अशेष [१०]धवघातें. ॥ ७९
[११]अपराध तिघांपासुनि या दंडा योग्य काय घडला ? गे ! ।
रोषींहि विष[१२]फलांचा वद अमृतलतेसि काय [१२]घेंड लागे ? ॥ ८०
सांग, न वांछिसि सद्गुण पतिसीं तूं कां पतिव्रता [१३]केली ? ।
कोठें असी सतीनें, [१४]मानें [१४]न [१४]धरुनि कोप, तीव्रता केली ? ॥ ८१
शोक नसे, तुज्ञ करवुनि पतिच्या हस्तें रणांत तोकांत[१५]; ।
[१६]पुत्रकरें मारविला, सर्वाधिक जो, क्षणांत तो कांत.' ॥ ८२
पतिसहि म्हणे 'उठा, कां रुसलां ? [१७]चुकला ईलाप हा[१८]; [१९]वाजी ।
[१९]व्हावा [१९]कशास ? घ्या, म्यां तुमचा सोडुनि दिला पहावा, [२०]जी ! ॥ ८३

---

१. मूर्च्छारूपी सागरांत. या अर्थांत पर्यायानें साध्वीचें लक्षण सांगितलें आहे. २. बभ्रुवाहनमाता चित्रांगदा. ३. अनेक प्रकारच्या. ४. ही चित्रांगदा. ५. ऐन शोकांत असतांही, चित्रांगदेनें आपल्या सवतीस 'सखि' व, 'सति' हीं विशेषणें दिलीं आहेत, ह्यावरून सपत्नीच्या ठायीं बहुमान प्रेम ठेवण्याचें वळण तिला लागलेलें असून, ती किती सुशील होती, हें व्यक्त होतें. अशा तऱ्हेचें शिक्षण स्पृहणीय नाहीं, असें कोण म्हणेल? कण्वऋषींनीं शकुंतलेस केलेल्या उपदेशांत 'कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने' ही गोष्ट प्राधान्यानें सांगितलेली आहे. तिची आठवण सुज्ञ वाचकांस ह्यावरून होईलच. (शाकुन्तल, अ. ४. पद्य.) ६. बभ्रुवाहनाच्या हातून. ७. मुद्दाम. ८. शोक. ९. नाहींसें केलेंस. १०. पतिवधानें. ११. गे ! या दंडायोग्य (या शिक्षेला पात्र असा) [आमच्या] तिघांपासून [अर्जुनाच्या, माझ्या व बभ्रुवाहनाच्या हातून] काय अपराध घडला? १२. विषारी फळांचा घोंस. अर्थ-साद्दश्यः—विषाद धरिला म्हणों, न सुरभी विषक्षीर वी. ॥ (केकावली ४.) १३ क्रीडा, विलास. १४. मन यत्किंचितही न कचरतां, अंतःकरण अगदीं घट्ट करून. पाठभेदः—मनिं धरुनी कोप. १५. तोक+अंत=बालकाचा नाश. १६. अन्वयार्थः—जो सर्वाधिक (सर्वश्रेष्ठ) तो कांत (पति) [तूं]पुत्रकरें (मुलाच्या हातून) मारविला. ह्यांत सतीस्त्रियांस पति म्हणजे जीव कीं प्राण असतो, ही गोष्ट 'सर्वाधिक' शब्द घालून व्यक्त केलेली आहे. १७. चूक करिता झाला, अपराध—प्रमाद—करिता झाला. १८. हा पृथ्वीपति बभ्रुवाहन. १९. [तुमचा] वाजी (घोडा) कशास व्हावा ?=तुमचा घोडा घेऊन काय करावयाचें आहे. २०. अहो महाराज.

[1]सत्वर करुनि मखतुरगहरपरनरपाळहानि जायाचा, ।
शारीरसुखीं ठेवुनि दृष्टि, नव्हे काळ हा निजायाचा. ॥ ८४
[2]यज्ञ [2]समाप्त न होतां, व्यर्थ [3]असमयीं कसें [4]असु [4]खर्चितां? ।
व्हा सावध; धर्ममनीं, श्रीकृष्णमनीं, कसें [5]असुख [5]रचितां?' ॥ ८५
पुनरपि [6]उरगीस म्हणे, 'सखि! तूं तरि सांग; उठिव [7]अनघातें; ।
[8]होईल पश्चात्ताप स्वांतीं कीं शुद्धकीर्तिधनघातें. ॥ ८६
पुत्र [9]नुठो, कांत उठो, हो [10]सधवा, साध्वि! तूं न विधवा हो. ।
[11]सेक नसेल, तरि नसो; परि सुनद व्रततिच्या सविध वाहो. ॥ ८७
पतिवांचुनि '[12]वांचुनियां आहे लोकांत काय हो! करणें?' ।
ऐसें बोलुनि, पतिच्या निकटचि मरणार्थ [13]घे सती [13]धरणें. ॥ ८८
तों बभ्रुवाहन [14]निघे [14]मोहांतुनि, परि बुडे महाशोकीं, ।
कीं तातघात घडला, जो दोषांमाजि मुख्य या लोकीं. ॥ ८९
[15]प्रायोपवेशन करी तोही, पाहुनि नृपा सखेदास, ।
शोकीं पडले, रडले, बहु धरुनि मनीं कृपा, सखे, दास. ॥ ९०
.तेव्हां सती उलूपी स्मरली [16]पन्नगपरायणा मणितें, ।

---

१. अन्वयार्थः—हा काळ (ही वेळ) मखतुरगहरपरनरपाळहानि (यज्ञसंबंधी घोड्याचें हरण करणाऱ्या शत्रुनृपतींचा नाश) करुनि [हस्तिनापुरास परत घोड्यासह] जावयाचा [असे], शारीरसुखीं दृष्टि ठेवुनि निजायाचा नव्हे. २. पाठभेदः—यज्ञसमाप्ति. ३. अवेळीं. ४. प्राण खर्चीं घालतां, कामीं येतां. ५. दुःख उत्पन्न करितां. ६. उलूपीस. ७. निष्कलंकातें. ८. अन्वयार्थः—शुद्धकीर्तिधनघातें (विमल कीर्तिरूप धनाच्या नाशामुळें) स्वांतीं (मनांत, अंतःकरणांत) पश्चात्ताप होईल कीं (होईल बरें). ९. न उठो, जिवंत झाला नाहीं तरी चालेल. १०. सौभाग्यवती, भर्तृमती. ११. सार्थान्वयः—सेक (सिंचन) नसेल तरी नसो, परि (परंतु) व्रततिच्या (वेलीच्या) सविध (समीप) सुनद (उत्तम नदी) वाहो (वाहत राहूं दे). पाणी घालण्यानें वेली तरारतात, हें खरें, तथापि जर जवळ वाहतें पाणी सदैव राहिलें व मग सिंचन जरी नसलें, तथापि ती वेल कोमेजणार नाहीं व सिंचन झाल्यास ती फळ धरीलच. 'सेक' व पुल्लिंगी 'सुनद' व स्त्रीलिंगी 'व्रतति' ह्या शब्दांनीं उत्पन्न होणारा श्लेष फार खुबीदार आहे. ह्याप्रमाणेंच 'सिच्' धातु सश्लेष विक्रमोर्वशी नाटकांत योजिलेला आहे. 'निषिञ्चन् माधवीमेनां लतां कौंदीं च नर्तयन् । स्नेहदाक्षिण्ययोर्योगात्कामीव प्रतिभाति मे' ॥ अं. २. १२. जिवंत राहून. १३. ती पतिव्रता निश्चयानें बसती झाली. पाठभेदः—घेतलें धरणें. १४. मूर्च्छा नाहींशी होऊन सावध झाला. १५. अन्नत्याग, उपास. १६. नागाचें सर्वस्व अशा, सर्पांचा अमोल ठेवा अशा, नागांचा जीव कीं प्राण अशा.

ज्याच्या[1] यशें निवविलें सन्मन[2] बहु, कामिमन जसें मणितें[3]. ॥ ९१
स्मरतांचि तिच्या हस्तीं आला संजीवनाख्य[4] सन्मणि कीं ।
येईल सतीच्छेनें स्पष्ट ब्रह्मांडभाव[5] तन्मणिकीं[6]. ॥ ९२
त्या बभ्रुवाहनातें मग ती साध्वी म्हणे, 'कुमारा! मी ।
कल्याण इच्छितें बहु तुझिया ठायीं, जैसी उमा रामीं[7]. ॥ ९३
ऊठ, नको शोक करूं, न पराभविला रणीं तुवां तात; ।
न[8] शकेल अमरवरही[9] वत्सा! याचा करावया घात. ॥ ९४
पतिला तुझा पराक्रम दावावा म्हणुनि, मोहिनी माया[10] ।
योजुनि, युद्ध करविलें बापा! टाकीन मी कसी माया[11]? ॥ ९५
म्यां हें केलें पतिच्या, विश्वाच्याहि, प्रियार्थ[12]; अवधानें[13] ।
युक्त असावें तव मन; होसिल[14] गुरुच्या प्रहृष्ट अवधानें. ॥ ९६
हा संजीवनमणि घे, याच्या स्पर्शें सजीव हो[15] तात[16]. ।
जे जे पन्नग मरती, ते ते येणें सजीव होतात'. ॥ ९७
निववी मधुरें उक्तें[17], नारदवीणा जसी कल[18] क्वणितें; ।
दे पुत्रकरीं, पतितें उठवाया, ती महासती मणितें. ॥ ९८
उठवी धनंजयातें, पुत्रें करितांचि[19] मणि उरोनिहित; ।
अमृतरस[20] सरोनि करी, तदधिक तो, कीं करी उरोनि हित. ॥ ९९

---

१. ज्या मण्याच्या. २. सज्जनचित्त. ३. एकांतांतील गोड व हलक्या स्वरानें. ४. संजीवननामक. हें नांव सार्थ आहे. (पहा गीति ९७.) ५. जगाचें अस्तित्व. ६. तिच्या मडक्यामध्यें. पतिव्रतेचा अधिकार एवढा आहे कीं मनांत आणिल्यास सर्व जग तिला आपल्या मडक्यांत सांठविता येईल. तेव्हां इच्छा करितांच उलूपीच्या हातीं संजीवनमणि आला, हें साहजिकच झालें.—असा भाव. ७. राम हें शिवाचें परम प्रिय दैवत होय. तेव्हां अनादि सती जी शिवपत्नी उमा, ती रामाचें कल्याण चिंतीत असावी, हें उघडच आहे. ८. पाठभेदः—नच शकले अमिरवरहि. ९. सुरश्रेष्ठ इंद्र. १०. भ्रामक कपट, भारणी. ११. ममता. १२. हितासाठीं. १३. तव मन अवधानें युक्त असावें=तुझें मन हुशार असो, तूं भांबावून जाऊं नकोस. १४. अन्वयार्थः—गुरुच्या अवधानें (पित्याचा घात न झाल्यानें) [तूं] प्रहृष्ट (आनंदित) होशील. तुझ्या हातून पितृवध झाला नाहीं, हें ऐकून तुला आनंद होईल; असा भाव. १५. होवो. १६. [तुझा] पिता. १७. भाषणानें. १८. मधुर स्वरानें. १९. छातीवर ठेवितांच. २०. अन्वयार्थः—अमृतरस सरोनि हित करि; तो (मणि) तदधिक (अमृतापेक्षां वरचढ) [होय] कीं (कारण) तो उरोनि (स्वतः शिल्लक राहून) हित करी. अमृत पाजल्यानें मनुष्य जिवंत होतो, पण त्या कृत्यांत अमृत संपून जातें; परंतु ह्या मण्याचा यत्किंचितही व्यय न होतां, मनुष्य जीवंत होतो. तेव्हां अमृतापेक्षां मणि श्रेष्ठ ठरतो, हें उघड आहे.

उठतांचि, पुत्र वंदी, वि[1]धुच्या उदयीं चकोरसा हर्षे; ।
त्यावरि नं[2]दनवनभवकुसुमांहीं शक्र मेघसा वर्षे. ॥ १००
सुर 'साधु! साधु'! वदले, वाद्यें गगनांत वाजलीं अ[3]मितें, ।
शीतळमंदसुगंधें वातें झालीं श्र[4]मोदकें श[5]मितें. ॥ १०१
आलिंगुनि पुत्रातें, माथां हुंगुनि, धनंजय नि[6]वाला. ।
मणिपूरेश्वरहि निवे भेटुनि गु[7]रुला, जसा गु[8]ह शिवाला. ॥ १०२
सु[9]प्तोत्थितसा अर्जुन पुत्रास पुसे, 'य[10]थार्थ सांग मला, ।
त्वन्माता कां आल्या? बहु विस्मय, शोक, हर्ष, कां गमला? ॥ १०३
मणिपूरपति म्हणे, '[11]जी! जें पुसणें, तें पुसा उलूपीतें; ।
तुमचें श्रो[12]त्रयुग लु[13]ब्ध, शत्रूचें हें क[15]था [14]दल पीतें.' ॥ १०४
अर्जुन पुसे, 'प्रिये! तूं कां या यु[16]द्धांगणांत आलीस? ।
चित्रांगदाहि आली? प्रश्न तुला हाचि, याहि आ[17]लीस. ॥ १०५
माझें या पुत्राचें इच्छिसि कीं कु[18]शळ; '[19]जो मना श्रम दे, ।
[19]तो अपराध नसे कीं केला आम्हीं तुझा? वद प्रमदे! ॥ १०६
हे चै[20]त्रवाहिनीही अपराध तुझा करीत नाहीं कीं? ।
वद सत्य, साध्वि! पूर्वप्रेमीं पडलें [21]उणें न कांहीं कीं?' ॥ १०७
प्रार्थुनि म्हणे उलूपी, 'केलें आ[22]गं न तुवां, न तनयानें;' ।
चित्रांगदाहि भ[23]जती, प्रे[24]ष्यांसी क[25]रुनि शिर नत, न[26]यानें. ॥ १०८
चेष्टि[27]त कथिलें, केलें तुझियाचि करावया प्रि[28]याला जें; ।
प्रभुनें क्षमा करावी, सांगायालाहि मी प्रिया लाजें. ॥ १०९
वधिला भीष्म, शिखंडी करुनि पुढें, हाणिले तुवां शर कीं; ।

ंद्राच्या. २. नंदन वनामध्यें होणाऱ्या पुष्पांनीं, कल्पवृक्षाच्या फुलांनीं. ३. पाठभेद:— . श्रमानें आलेला घाम. ५. शांत, नाहींशीं. पाठभेद:—वर्षें. ६. संतोष पावला. ला. ८. शंकरपुत्र कार्तिकस्वामी. ९. झोपेंतून उठलेल्याप्रमाणें. १०. जें असेल तें खरें. ठभेद:—वा! १२. कर्णद्वय. १३. लुब्ध होवो. १४. तडको, फुटो, विदीर्ण होवो. ारस पिणारें, कथा ऐकणारें. हें 'श्रोत्रयुग' याचें विशेषण. १६. रणभूमीवर. १७. सखीस चित्रांगदेस. १८. क्षेम. १९. अन्वयार्थ:—जो मना श्रम दे, तो तुझा अपराध ी व बभ्रुवाहन ह्यांनीं) केला नसेचि कीं? (केला नाहींना?) हे प्रमदे! (स्त्रिये) वद. ांगदासुद्धां. २१. कमी. २२. अपराध. २३. सेवेंत तत्पर असते. २४. दासीप्रमाणें. ाक वांकवून, नम्रतेनें. २६. मर्यादेस अनुसरून. २७. कृत्य. २८. हितातें.

पडतासि[1] त्या अधर्मे[2] प्रायश्चित्ताविना महानरकीं. ॥ ११०
त्या पापाची पुत्रापासुनि तुज शांति[3] या रणीं घडली, ।
कीं बभ्रुवाहनशरें तव तनु होउनि अचेतना[4] पडली. ॥ १११
म्यां देखिले सुरनदीतीरीं[5] ते, अद्भुतप्रभा[6] वसु जे; ।
गंगाहि, जिचें दृग्युग[7], रडतां स्मरुनी सुतप्रभाव[8], सुजे. ॥ ११२
भीष्में देह त्यजितां, गंगेंत स्नान करुनि, शोकानें ।
देते[9] झाले शाप; श्रुत केला म्यांचि शाप तो कानें. ॥ ११३
वसुंनीं गंगानुमतें तुज 'नरक घडो' असा दिला शाप; ।
कीं त्वां केलें बहु परसंसक्तायुध्यमानवधपाप[10]. ॥ ११४
ती अत्युग्रा वार्ता कुरुकुलतिलका! कथूनि शापाची, ।
म्यां बहुविकळा केली आपणतैसीच[11] बुद्धि बापाची. ॥ ११५
जाउनि शरण, विनविले तातें ते, नमुनि, आठ वसु नाकीं, ।
कीं, 'गांधारी[12], कुंती, करिती अभयार्थ आठव सुना कीं. ॥ ११६
प्रभु! हो शाप! दिला तो, मत्कन्येवरि कृपा करा, फिरवा; ।
मिरवा यश; विष[13] ईशें[14] जेविं, तसा क्रोध हा तुम्ही जिरवा.' ॥ ११७
वसु ऐसें वदले कीं, 'समरीं मणिपूरपाळ मारील; ।
या शापापासुनि तो पार्थातें पातकांत तारील'. ॥ ११८
वसुवचन मला कथिलें, यश व्हाया प्राप्त शुद्ध, मत्तातें[15]; ।
म्हणुनि पराभविलें तुज म्यां पुत्रकरेंचि युद्धमत्तातें[16]. ॥ ११९
'स्वपराजयकर[17] सुत हो; वेंचिन सर्वस्ववित्त;' नवसा या ।

---

१. पडला असतास. २. अन्याय्य आचरणामुळें. ३. निरसन. ४. निचेष्ट; निर्जीव. ५. गंगेच्या कांठीं. ६. विलक्षण तेजयुक्त असे. व्याकरणनियमानें हा शब्द 'अद्भुतप्रभ' असा पाहिजे होता. ७. नेत्रद्वय, दोन्ही डोळे. ८. आपला मुलगा जो भीष्म त्याचा पराक्रम. ९. ह्याचा कर्ता 'ते वसु' हा अध्याहृत आहे. १०. पर+संसक्त+अयुध्यमान+पाप=शत्रूकडे मिळालेला व युद्ध न करणारा जो भीष्माचार्य त्याच्या वधाचें पाप. ११. स्वतःप्रमाणेंच. १२. अन्वयार्थ:— सुना, गांधारी व कुन्ती, [अर्जुनाच्या नरकवासासंबंधें] अभयार्थ (भय उरूं नये म्हणून) [तुमचा] आठव (स्मरण) करिती कीं (करीत आहेत बरें). १३. काळकूट, हलाहल. १४. शंकरानें. १५. माझ्या बापानें. १६. लढाईमध्यें देहभान विसरून जाणाऱ्या तुला. १७. अन्वयार्थ:—'स्वपराजयकर (आपल्या स्वतःपेक्षां अधिक पराक्रमी) सुत हो (होवो), [त्यासाठीं] सर्वस्ववित्त (सर्व मिळकत व द्रव्य) वेंचिन (खर्च करीन);' या (ह्या) नवसा सुज्ञ (शहाणा) करितसे; यास्तव कोपास वसाया चित्त न द्यावें (रागास मनीं थारा न द्यावा, आपण रागावूं नये).

सुज्ञ करितसे; यास्तव द्यावें कोपास चित्त न वसाया. ॥ १२०
[1]आत्मा सुत, म्हणुनि उचित कोपाला या [2]पराजयास्तव न,
[3]सत्पुत्रत्वें समुचित यापरि हृतशाप राजया स्तवन. ॥ १२१
हा पुत्र जरि न तारिल, लज्जावह काय मग न या [4]नातें ? ।
[5]सुगतिगुणें पुत्रातें बहुमानिति कवि, न गगनयानातें. ॥ १२२
[6]अच्युतसखा ! प्रभो ! तुज शक्रहि शकता रणीं न भंगाया; ।
आत्माचि सुत, म्हणुनि करि निर्जीव, पुन्हा सजीव, अंगा या.' ॥ १२३
लवली जैसी कदली, वदली [7]पदलीनचित्तवृत्ति सती; ।
प्रियहित करुनिहि, झाली अपराधवती तसीच ती दिसती. ॥ १२४
सात्विकभावें होउनि रोमांचित [8]कृष्णसख म्हणे, '[10]अयि! ते ।
[11]प्रभुची दया तव मनीं सिरली, श्री वारिजीं जसी; दयिते ! ॥ १२५
[12]ऐसें प्रभुप्रसादें मिळतें; या अमृतरस कलत्रास।
लाजे, कीं जैसें हें, पळवी [13]पीयूष न सकल त्रास. ॥ १२६

'शिष्यादिच्छेत् पराजयम्'. ह्याच म्हणीचा येथें अनुवाद केला आहे. पहा:-(१) मृत्युपरीस परिभवापासुनि बहुतचि भिती; परि भवातें । प्रार्थुनि, मागति पुत्राच्छात्रापासुनि भले परिभवातें ॥(२) पुत्राच्छात्रादिकांहीं जित बुध धरिती दुःख चित्तीं न कांहीं. ॥ (मोरोपंती कुशलवाख्यान १३-८६.)

१. सुत आत्मा म्हणुनि=ज्या अर्थी पुत्र म्हणजे आपणचि त्या अर्थी. पहा:-श्रुति 'आत्मा वै पुत्रनामासि.' २. (आपला) पराभव केला म्हणून. ३. अन्वय:-यापरि (ह्याप्रमाणें) हृतशापराजया (नाहींसा केला आहे शाप ज्यानें अशा राजाला अर्थात् बभ्रुवाहनास) सत्पुत्रत्वें (पुत्रधर्म उत्तम प्रकारें पाळल्यामुळें) स्तवन (स्तुति) समुचित (योग्य) [असे]. 'पुंन्नाम नरकात् त्रायतेऽसौ पुत्रः' ह्या व्याख्येप्रमाणें आपला बाप जो अर्जुन, त्याला नरकापासून तारून, बभ्रुवाहन हा खरा सत्पुत्र ठरला होता. ४. पुत्राचें नातें. ५. अन्वयार्थ:-सुगतिगुणें (उत्तमपद प्राप्त करून देण्याच्या धर्मामुळें) पुत्रातें कवि (ज्ञाते) बहुमानिति, [तसें] गगनयानानें (विमानास) न [बहुमानिति]. विमानांत बसल्यानें उत्तमपदाची प्राप्ति होईलच असा नेम नाहीं, पण सुपुत्र असल्यास त्यायोगानें मनुष्यास स्वर्गप्राप्ति खास होते. ह्यामुळें ज्ञाते विमानापेक्षां सत्पुत्राचीच योग्यता अधिक मानितात:-असा भाव. शिवाय या ठिकाणीं 'सुगति' या शब्दावर श्लेषाची छायाही मानितां येण्यासारखी आहे. (१) (पुत्रपक्षीं) उत्तमपदप्राप्ति, मुक्ति. (२) (विमानपक्षीं) उत्तम वेग. ६. हे कृष्णाच्या सख्या! 'अच्युतसख' याचें संबोधन 'अच्युतसखा!' ७. अर्जुनाच्या पायाचे ठिकाणीं गढून गेली आहे मनोवृत्ति जीची अशी. ८. गहिंवरानें. ९. अर्जुन. १०. हें प्रेमव्यक्त करणारें सांत्वनकारक संबोधनात्मक अव्यय आहे. ११. अन्वयार्थ:-अयि दयिते ! (प्रिय!) जसी वारिजीं (कमलामध्यें) श्री (लक्ष्मी), [तसी] ते (प्रसिद्ध) प्रभुची दया तव मनीं (तुझ्या मनांत) सिरली. १२. असें कलत्र, अशी स्त्री. १३. अमृत.

त्वां बहु मत्प्रिय केलें, हें तव यश [1]करिल [1]पद रसि[1]कतिलकीं; ।
या चरितातें गाया, [2]गुरुला [2]पसरूनि [2]पदर, सिकति[3]ल कीं.' ॥ १२७

ऐसें परम प्रिय तो **पार्थ** स्वप्रियतमेसि आयकवी; ।
वर्णिल सकळ सविस्तर [4]एकें [4]वदनेंकरूनि काय कवी ? ॥ १२८

मग पुत्रासि म्हणे, 'या दोघी माझ्या प्रिया [5]सपरिवारा ।
घेउनि, हयमेधा ये; [6]लागों द्यावा न यांस परि [6]वारा.' ॥ १२९

[7]भूप म्हणे, 'एक निशा, [8]व्हायासि [8]सनाथ [8]हा निर्वास, रहा, ।
ताता! तव प्रवेशें करिल [9]सुहृत्तापहानि [10]वासर हा.' ॥ १३०

पार्थ म्हणे 'हयरक्षणदीक्षेसि विरुद्ध हें, नको [11]बाहूं, ।
दे मज निरोप, [12]येतों; हा गहिंवर आवरूनि [13]म्हण बा! [13]हूं.' ॥ १३१

पूजुनि निरोपें [15]मातांसह [14]दे [16]धृतयज्ञहयपथा पितया; ।
गुरुसम समर्थ जरि तो, बहु [17]अवघड [17]वाटलें तथापि तया. ॥ १३२

तेथुनि [18]राजगृहातें गेला, जोडूनि विजयधन, **पार्थ**; ।
धरि [19]मेघसंधि नृप हय, [20]निजधर्म करावयासि [21]अनपार्थ. ॥ १३३

त्या [22]सहदेवसुतातें [23]विरथ [23]करुनि, **पार्थ** अभय देऊन, ।

---

१. रसिकश्रेष्ठावर छाप बसवील, रसिकशिरोमणीस मान्य होईल. २. गुरूचें आर्जव करून, गुरूची पायधरणी करून. ३. याचा कर्ता 'रसिकतिलक' हा पूर्वार्धांतून घ्यावयाचा. ४. शेष, षण्मुख, ब्रह्मा इत्यादि अनेकमुख कदाचित् याचें सविस्तर वर्णन करूं शकतील, परंतु हा एकमुख मयूर कवी तें कसचें करूं शकणार, हा या अर्धाचा भाव. ५. लव्याजम्यानिशीं. ६. परि (परंतु) यांस वारा लागों न द्यावा=यांस अतिशय जपून घेऊन ये. ७. बभ्रुवाहन. ८. हें घर यजमानानें मंडित व्हावें म्हणून. अर्जुन हा बभ्रुवाहनाचा बाप असल्यामुळें, एकप्रकारें तो बभ्रुवाहनाच्या गृहाचा स्वामीच होय. 'सनाथ' याचा अर्थ 'धन्य, कृतकृत्य, पवित्र' असा केला असतांही चालण्यासारखें आहे. ९. मित्रांच्या शोकाचें निरसन. १०. दिवस. ११. बोलावूं. १२. हा शिष्टप्रयोग 'जातों' ह्या अर्थी आहे. बहुधा 'या=जाणें' ह्या संस्कृत धातूवरून हा प्रचारांत आला असावा. १३. हूं म्हण=रुकार किंवा अनुमोदन दे. १४. जाण्यास अनुमोदन देता झाला. १५. पाठभेदः—मानासह. १६. धरलेला आहे यज्ञाच्या घोड्याचा मार्ग ज्यानें अशा, यज्ञिय घोड्याच्या मागून जाणाऱ्या. १७. जड वाटलें, कष्टप्रद भासलें, दुःख झालें. १८. मागधदेशाच्या सहदेवनामक राजाच्या नगरांत राजमंदिराजवळ. १९. जरासंधाच्या सहदेवनामक कनिष्ठ पुत्राचा मुलगा. २०. क्षात्रधर्म. २१. अन्+अपार्थ=नाहींसा झालेला नाहीं अर्थ ज्यांतून असा, सार्थ, खरा, यथार्थ. हें 'निजधर्म' ह्याचें विधिविशेषण. २२. मेघसंधीला. २३. भग्नरथ करून, रथहीन करून.

तो द्वारकेसि गेला, हरि[1] हरित्यांच्या यशास घेऊन. ॥ १३४
वृष्णि[2]कुमार समस्तहि तेथें[3] गेले हरोनि तुरगातें, ।
त्यां उग्रसेन[4] वैरी[5], कीं या विजयासि[6] वृष्णिपुर गातें. ॥ १३५
वसुदेवासह भेटुनि विजयातें, उग्रसेन दे वाजी; ।
सन्मैत्री[7] तें विटविल कोण? मता श्रीपरीस[8] देवा[9] जी. ॥ १३६
पूजिति बहु पार्थातें शौरीचे[10] हस्त, उग्रसेनाचे; ।
यदुकुल विजयें[11], जैसें बर्हिणकुल[12] वारिमुग्रसें[13], नाचे[14]. ॥ १३७
प्रीति प्रभुची, चिंतामणिची[15] जसि सर्व[16] काम[16] दे[16] शाला; ।
यदुपतिस पुसुनि, तेथुनि गेला गांधारनामदेशाला[17]. ॥ १३८
शकुनिसुत[18] पूर्ववैरें आला घेऊनि जिष्णुवरि सेना. ।
धर्माज्ञा जय[19] सामें[20] सांगे, परि तो कुबुद्धि परिसेना[21]. ॥ १३९
पार्थ[22] म्हणे, 'तरि, सोडुनि भद्रनिवासाध्व साम, नाटोप.' ।
खळबळ पळउनि उडवी, मग घाया साध्वसा मना, टोप. ॥ १४०
समजे[23] बळ, कीं 'हरिता शिर, जरि आटोपिता न हातातें; ।
व्यर्थ विटविला याचा अमृतस्रावी वितान हा तातें.' ॥ १४१

---

१. घोडा हरण करणाऱ्यांवर विजय संपादून. २. यदूचा पुत्र क्रोष्टा, त्याचा सात्वत व सात्वताचा वृष्णि, त्याचे पुत्र. येथें 'यादव' असा समुच्चयबोधी अर्थ करावा. ३. द्वारकेमध्यें. ४. यदुकुलोत्पन्न सात्वत राजाच्या अंधकनामक वंशांत जन्मलेल्या आहुक राजाचा दुसरा मुलगा. हा कंसपिता होय. ५. निषेधी, नको म्हणे. ६. अर्जुनाला. अर्जुन हा द्वारकेंत मोठा प्रिय होता; कारण तो कृष्णाचा परमप्रिय मित्र असून, सुभद्रेचा पती होता. ७. 'सन्-मैत्रीतें' असा पाठभेद. ८. लक्ष्मीपेक्षांही, रुक्मिणीहूनही. ९. विष्णूला, कृष्णाला. १०. वसुदेवाचे. ११. पार्थामुळें. १२. मोरांचा समुदाय. १३. वारिमुक्+रसें=मेघरसामुळें, पर्जन्यामुळें. १४. नाचूं लागलें, आनंदित झालें. १५. चिंतामणिरत्नांनीं रचलेलें घर. 'चिंतामणि' हा इच्छापूरक मणि आहे. १६. सर्व इच्छा तृप्त करितें. १७. हा देश सिंधुनदीच्या दुथडीं आहे. १८. गांधारीचा भाऊ जो शकुनि, त्याचा हा पुत्र. १९. अर्जुन. २०. सामोपचारानें. २१. ऐकेना. २२. अन्वयार्थः—पार्थ म्हणे, 'तरि (अशीच तुझी मर्जी असेल तर) भद्रनिवासाध्व (भद्र+निवास+अध्व=कल्याणस्थानाचा मार्ग) [असा] साम (तह) सोडुनि, नाटोप (हार खाऊं नकोस, माघार घेऊं नकोस).' मग (असें बोलल्यावर) खळबळ पळवुनि (शत्रुसैन्याची दाणादाण करून), [शकुनिपुत्राच्या] मना साध्वसा (भीतीतें) घाया [त्याचा] टोप (शिरस्त्राण) उडवी. २३. सार्थान्वयः—बळ (शकुनिपुत्राचें सैन्य, गांधारसेना) समजे (जाणे) कीं [हा अर्जुन] हातातें जरि न आटोपिता, [तरी] शिर हरिता, (जर अर्जुनानें हात आंखडिला नसता, तर त्यानें शकुनिपुत्राचें

तो मंद[1] पळों लागे, तों धांवुनि शकुनिची वधू[2] आली; ।
पूजुनि पार्थपदावरि पुत्रातें, पदर[3] पसरुनी[3], घाली. ॥ १४२
बहुमान करुनि, वंदुनि, तो पार्थ म्हणे तिला, "अहो! मामी[4]! ।
करुणा नसती जरि, तरि करितों[5] याच्याहि कां न होमा मी? ॥ १४३
बहु मान्या गांधारी आम्हां, त्वत्पुत्र आमुचा बंधू[6], ।
श्रीकृष्णनाथ सागर, धर्मप्रभु जलद, अन्यनृप अंधू[7]. ॥ १४४
सर्वत्रसम अमृतकर[8] अजातरिपु, शकुनिपुत्र कैरव[9] हा, ।
यावें हयमेधाला, सांगावें यास कीं, 'न वैर वहां[10]'" ॥ १४५

अध्याय सहावा.

प्रभुला दिग्विजयींचा करुणारस[11], वीररस[11], कळवि चार[12]; ।
कीं शरणागतविवांचुनि चालों दिधलेचि न सकळ विचार. ॥ १
होय प्रसन्न, परिसुनि, करि विजय[13] शकुनिसुतावर दया तें; ।
धर्म म्हणे, 'यश देतो, स्मरुनि स्वदयाळुता वरद[14], यातें.' ॥ २

शिर उडविलें असतें); तातें (या कुमारानें, शकुनिपुत्रानें) याचा हा अमृतस्रावी (सुधा वर्षणारा, सुखद) वितान (चांदवा, लक्षणेनें आस्रा) व्यर्थ विटविला (कंटाळविला, मूर्खपणानें प्रतिकूळ करून घेतला). वितान=चांदवा, छत. छत किंवा चांदवा ह्यायोगें ऊन्ह वगैरेंचा ताप नाहींसा होतो, ह्यावरून पर्यायानें येथें त्याचा अर्थ 'ताप हरण करणारा आस्रा,' असा आहे.

१. मूर्ख. २. पत्नी. ३. क्षमा मागून, दीन होऊन. ४. शकुनी हा गांधारीचा भाऊ व दुर्योधनादि धृतराष्ट्रपुत्रांचा मामा होता व ह्यामुळें धर्मादिकांसही तो मामाचे ठिकाणींच होता, हें ध्यानांत आणून, अर्जुनानें त्याचे पत्नीस 'मामी' असें संबोधिलें. ५. याच्याही होमा मी कां न करितों?=[शकुनीप्रमाणेंच] ह्यालाही मारण्यास मी असमर्थ होतों का? ६. मामेभाऊ. ७. कूप. मेघ जसा सर्व कूपतडाग जलवर्षावानें तुडुंब भरून टाकितो, तसा धर्म राजाही आपल्या कृपाप्रसादानें सर्व मांडलिकांच्या इच्छा पुरविण्यास समर्थ आहे. आणि मेघास पाण्याचा पुरवठा करणारा जसा मेघ, तसा धर्माच्या आंगीं दातृत्वशक्ति आणणारा श्रीकृष्ण होय; हा या अर्धाचा भाव. ८. चंद्र. ९. चंद्रविकासी शुभ्र कमल. १०. वैर धरूं नकोस. ही गीति फार रसभरित आहे. येथें 'अजातरिपु' हें पद मार्मिकपणें योजिलेलें आहे. त्यावरून, धर्म हा समदृष्टि व दयेचा सागर आहे व तो कोणाविषयींही वैरभाव मनांत ठेवीत नाहीं. शकुनिपुत्रानें मात्र आपला वैरभाव सोडला पाहिजे, हा अर्थ सुचविला जात आहे. ११. बभ्रुवाहनाबरोबरील युद्धांत अर्जुनाचें अचेतन होणें, शकुनिपुत्राची तारांबळ, जयद्रथाच्या मुलाचा मृत्यु इत्यादि हृदयद्रावक प्रकार व बभ्रुवाहनयुद्ध, त्रिगर्तांची लढाई इत्यादि शौर्याचीं कृत्यें. १२. हेर. १३. अर्जुन. १४. वर देणारा श्रीकृष्णप्रभु.

भीमासि म्हणे, 'अर्जुन आला, हें सांगतात बा! हेरें[1]; ।
उरला मासचि अवधि, स्थान करावें मखास[2] बाहेर. ॥ ३
बहुमानें ब्राह्मण, नृप, सर्वहि सत्वर मखासि आणीव; ।
पार्थ प्रार्थित आला[3]; दूत प्रेषुनि तथापि जाणीव[4]. ॥ ४
पुरुषार्थ[5], **वे**द, **ह**रिभुज, मज बंधु तुम्ही नयज्ञ वाटतसा. ।
ज्ञाते[6] म्हणोत, जैसे इतरांचे[7], हा न यज्ञवाट तसा.' ॥ ५
भीम 'अवश्य' म्हणे, मग विप्रविचारें[8]करूनि सर्व करी; ।
जेथिल[9] चित्रकरीसहि पाहुनि, **ह**रिचाहि न धरि गर्व करी. ॥ ६
विप्रगृहें देखुनि, मुनि म्हणति न **मो**मांसंही[10] असीं मखरें[11]; ।
मख रेंचे उतरि[12] '**ह**रिचा[13]; प्रेम **प्र**भुचें नतीं असीम[14] खरें. ॥ ७
'प्रकटी[15] स्वशिल्प **भ**गवद्भक्तमखीं सर्व **वि**श्वकर्मा तें, ।
व्हाया प्रसन्न पाहुनि त्या **भ**गवद्रूपविश्व कर्मातें. ॥ ८

---

१. दूत. २. यज्ञाला. ३. [यज्ञाश्वाबरोबर फिरतांना] अर्जुन [राजादिकांना यज्ञाचीं] बोलावणीं करीतच आला आहे. ४. तरी पण मुद्दाम हेर पाठवून, पुन्हा एकदा यज्ञाचीं आमंत्रणें कर. ५. अन्वयार्थः–तुम्ही नयज्ञ (ज्ञाते) बंधु मज पुरुषार्थ (धर्म, अर्थ काम व मोक्ष हें चतुष्टय), वेद (ऋक्, यजु, साम व अथर्व हें चतुष्टय) [किंवा] हरिभुज (प्रभुश्रीकृष्णाचे चतुर्भुज) वाटतसा भासता. [धर्मबंधूंची संख्या चार ह्यावरून व त्यांच्या अंगच्या सामर्थ्यावरून पंतांनीं हें साम्य घेतलें आहे]. ६. अन्वयार्थः–जैसे इतरांचे [यज्ञवाट], तसा [च] हा यज्ञवाट (आपल्या यज्ञाचें स्थान) [आहे], [ऐसें] ज्ञाते न म्हणोत. यज्ञस्थान असें तयार करा, कीं तें अलौकिक आहे, असें सुज्ञांसही भासावें, असा धर्मोक्तीचा भाव. ७. 'इतरांतें' असा पाठभेद. ८. ब्राह्मणांच्या संमतीनें. ९. जेथील (यज्ञस्थानांतील, यज्ञमंडपांतील) चित्रकरीसेही (चित्रांत काढिलेल्या हत्तीला सुद्धां) पाहुनि, हरिचाहि (इंद्राचासुद्धां) करी (हत्ती, ऐरावत) गर्व न धरि. त्या यज्ञमंडपामध्यें काढिलेलीं हत्तीचीं चित्रें इतकीं सुबक होतीं, कीं तीं पाहून ऐरावतानेंही खालीं मान घालावी. १०. मा+उमांस=लक्ष्मी व पार्वती ह्यांस. ११. अशीं, इतकीं चांगलीं, मखरें, गृहस्थितीच्या मानानें नेहमीं सुंदर मखरें बांधून प्रथम ऋतुस्नात होणाऱ्या मुलींचा सोहळा करण्याचा प्रघात आहे; तेव्हां लक्ष्मी व पार्वती ह्यांच्या सोहळ्यांचे वेळीं मखरें किती उत्तम असतील, ह्याची कल्पनाच करणें योग्य आहे. इतकें असूनही तीं मखरें धर्मराजाच्या विप्रगृहांपुढें कांहींच नव्हतीं, असा भाव. १२. गर्व परिहार करी. १३. इंद्राचा. १४. अमर्याद, अपरंपार. १५. सार्थान्वयः– भगवद्रूपविश्व (भगवत्+रूप+विश्व=परमेश्वरस्वरूपमय अखिल जगत्) त्या कर्मातें (आपण केलेल्या कामातें) पाहुनि प्रसन्न व्हाया (संतोष पावावें म्हणून, आनंदभरित व्हावें म्हणून) विश्वकर्मा (देवांचा कारागीर सुतार) तें स्वशिल्प (सुप्रसिद्ध अशी आपली कारागिरी, कौशल्य) भगवत्भक्त-मखीं (पांडवांच्या अश्वमेधयज्ञामध्यें) सर्व प्रकटी (पूर्णपणें दाखविता झाला).

आले भीमप्रेषित दूतोक्तें सकळ विप्रभूप कृती;[1] ।
त्यांला[2] सर्वस्वार्पण केलेंसें न कळवि प्रभूपकृती. ॥ ९

चातक, मयूर, सख्यें निववाया प्रार्थितां, जलद ये; तें[3] ।
दावी प्रभुवर येतां;[4] तेथें शिवसा करी बेल[5] दयेतें. ॥ १०

पूजी धर्म तयांतें, जैसा दांभिक[6] जनांस दंभानें, ।
निववी बहु शीलानें, समयघन[7] जसा वना सदंभानें.[8] ॥ ११

'लक्षब्राह्मणभोजन होतां, सांगुनि निरोप धाडावा, ।
तेव्हांचि वादकानें[9] गुरु दुंदुभि एक वार ताडावा.' ॥ १२

केली मर्यादा त्या यज्ञीं जनमेजया! नरवरा! हे;[10] ।
होतां द्विजभोजनभर,[11] दुंदुभिचा पळहि तो न रव[12] राहे. ॥ १३

प्रभु धर्मासि कथी, 'चर[13] आले मद्वारकापुराहून; ।
आला[14] महायशा, ज्या मानी सद्वार कापुराहून.' ॥ १४

---

१. कर्तृत्ववान्, बलाढ्य. २. प्रभूपकृती (धर्मराजानें केलेला जो सन्मानादि उपकार तो) त्यांला सर्वस्वार्पण केलेंसें (आपण धर्मराजाला सर्व द्रव्यकोशादि व प्रत्यक्ष स्वातंत्र्य अर्पून त्याचे आज्ञांकित मांडलिक झालों असें) न कळवी (वाटूं न देई). धर्मराजानें सर्वांचा अगदीं स्वतंत्र राजांप्रमाणें उदार दिलानें मान राखिला, हा भाव. ३.हें सर्वनाम मागील नामवाक्याकरितां योजिलें आहे. तें='...जलद ये (=येतो')हें. ४.आल्यानें. ५.बलराम. बलरामास शिवाची उपमा फार नामी आहे. 'भोळा शंकर' 'भोळा सांब' इत्यादि शब्द मराठींत सरळ व मोकळ्या मनानें चालणाऱ्या माणसास लावण्याची रूढ पडली आहे. बलराम व श्रीकृष्ण ह्या बंधुद्वयाच्या वर्तनाचें पर्यालोचन केलें, म्हणजे बलराम दादा 'भोळा सांब' होते व श्रीकृष्ण 'डावपेंच घालणारे व उकलणारे' होते, हें स्पष्ट दिसून येतें. ६. ढोंगी दांभिकाचें अंतर्याम जरी कसेंही असलें, तरी लोकांवर आपली छाप बसण्याकरितां तो बाह्योपचाराच्या थाटांत कांकणभर सरसपणाच ठेवितो, हें सुप्रसिद्धच आहे. ह्या गीतींत धर्मराजांनीं केलेल्या आदरातिथ्यांत व दांभिकाच्या दंभांत 'यथास्थितपणा'पुरतेंच साम्य घ्यावयाचें. प्रेमळ भगवद्भक्ताच्या ईश्वरावरील एकनिष्ठेला केवळ एकतानतेपुरतीच जशी जारिणीच्या जारावरील निष्ठेची उपमा देतात, तसाच या गीतींतील प्रकार आहे. ७. योग्य वेळेवर येणारा ढग, हंगामशीर बरसाद. ८. उत्तम पाण्यानें. ९. वाजंत्र्यानें. १०. वरील गीतींतील. ११. ब्राह्मणभोजनाचा सपाटा. १२. आवाज. १३. दूत. १४. सार्थान्वयः—ज्या सद्वार (सत्+वार=साधुसमूह) कापुराहून (कापुरापेक्षां) मानी (बहुमानी, अधिक असा समजतो), [तो] महायशा (मोठें आहे यश ज्याचें असा, अर्जुन) आला. टीपः—कापुराचा रंग पांढरा असून, त्यांत शीतलता आहे. त्याचप्रमाणें यशाचाही रंग पांढरा असून, त्यांत सुखकारित्व आहे. असा कविसंकेत आहे, तेव्हां जे यशस्वी आहेत त्यांची व कापुराची योग्यता सारखी खरी; पण, महायश जो अर्जुन, त्याचे अंगीं भगवद्भक्तपणा पूर्ण बाणलेला असल्यामुळें, कापुरापेक्षां साधुवृंदास अर्जुन अधिक वाटावा, हें योग्यच होय.

हर्षें धर्म म्हणे 'बा! सांग मज निरोप काय वत्साचा,[1] ।
प्रिय[2] आत्मवत् सखा तव मजला, मी जाण कायवत् साचा.' ॥ १५
श्रीकृष्ण म्हणे, "घेउनि, आला तुज चार हा, निरोपातें; ।
[3] कीं 'बुध होउं न देती तुलसीच्या जेविं हानि रोपातें, ॥ १६
तेविं मखागतभूपप्रेमातें तूं न होउं दे हानी; ।
सर्वांच्या रोमांचित व्हावें सत्कारसुखित[4] देहांनीं. ॥ १७
चित्रांगदा, उलूपी, या दोघी सुगुणवसति मज्जाया[5] ।
मत्पुत्र बभ्रुवाहन घेउनि येइल सुखांत मज्जाया[6]. ॥ १८
त्वत्प्रेमा मच्चित्तीं सुख, जेविं करुनि अलोलकी[7], रचितो, ।
मत्पुत्रींहि रचू तें; शुचि पटु वक्ता अलोल[8] कीरचि[9] तो." ॥ १९
या प्रभुकथितें[10] अर्जुनसंदेशें[11], जेविं वर्षलाभानें[12] ।
बर्हीं[13], तेविं त्यजिला[14] देहांच्या धर्म हर्षला[15] भानें. ॥ २०
धर्म पुसे, "देवा! कां पावतसे वत्स विजय कष्ट महा? ।
कोणी[16] असुलक्षण[17], कीं म्हणवी गुरु, मंद[18], भौम[19], अष्टम[20] 'हा?' ॥ २१
जन्मापासुनि कष्ट[21], श्रमला बहु वत्स करुनि संगर हा, ।
कष्टातें विधि वदला काय 'जयाचा धरूनि संग रहा?" ॥ २२
भगवान् वदे, 'नसेचि न्यूनत्व सुलक्षणांत कायाच्या[22]; ।

---

१. अर्जुनाचा. २. अन्वयार्थः–तव सखा (तुझा स्नेही अर्जुन) मजला आत्मवत् (प्राणासारखा) प्रिय (प्यारा); मी साचा (खरोखर) कायवत् (देहाप्रमाणें), जाण (समज). प्राणांवांचून जसें शरीर व्यर्थ, तद्वत् अर्जुनावांचून मी व्यर्थ होय, असा भाव. ३. गीति १६ उत्तरार्ध व १७ पूर्वार्ध मिळून एकत्र अन्वय करावा. ४. मान व पाहुणचार यांनीं संतुष्ट झालेल्या. ५. मत्+जाया=माझ्या स्त्रिया. ६. बुडाया. 'सुखांत पोहणें' हा प्रचलितप्रयोग वाचकांच्या ध्यानांत येईलच. ७. नवल, अपूर्वाई. ८. भारदस्त, शांत. ९. पोपट. १०. श्रीकृष्णांनीं सांगितलेल्या. ११. अर्जुनाच्या निरोपानें. १२. पर्जन्यवृष्टीच्या प्राप्तीनें. १३. मोर. १४. देहाभिमानानें सोडला, [धर्माला] आपल्या शरीराचीही आठवण राहिली नाहीं. १५. आनंदलेला. १६. कांहीं, एकादें. १७. प्रतिकूल, अनिष्ट चिन्ह; अशुभसूचक शरीरावरील रेषा वगैरे लक्षण. मनुष्यमात्राच्या अंगावर उपजत रेषादिमुद्रा लक्षणें असतात, त्यावरून तो मनुष्य सुखी किंवा दुःखी निपजेल, हें सामुद्रिकशास्त्रावरून समजतें. १८. शनि. १९. मंगळ. २०. आठवा.–गुरु, शनि व मंगळ, हे ग्रह आठव्या स्थानीं आले असतां फार पीडा करितात. हीच कल्पना शांतिपर्वांत योजिली आहे:–कोणासही न म्हणविल यापरि गुरु, शनिहि, कुजहि अष्टम 'हा!'। (मोरोपंत, शांतिपर्व ६।१२). २१. क्लेश, दगदग. २२. शरीराच्या.

जं[1]घापश्चाद्भागीं अधिका आहेत पिंडि[2]का याच्या.' || २३
श्री[3]कृष्णा श्री[4]कृष्णा तिर्यक्[5] सा[6]सूय तेधवां पाहे, |
कीं तें प्रिय[7]तमलक्षणदोषोद्घाटन न ती सती साहे. || २४
प्रभु समजे कीं, 'आला, दूषण वदलों, म्हणोन कोप तिला;' |
तीस म्हणे, 'मन्नर्मीं[8] सति! तूंहि किमपि म्हणों नको पतिला.' || २५
तों[9] सुखवी दूत निकट आला अर्जुन असें निवेदून, |
तद्वचनें सानुज नृप तो, जेविं अमृतरसें निवे दू[10]न. || २६
आपण पाउनि बहु सुख, दे त्या दूतासि धर्म ध[11]नदानें; |
व[12]नदानें शिखिसँ[13] जसें, द्यावें अधनासि शर्म[14] ध[15]नदानें. || २७
दु[16]सरे दिवशीं येतां भगवत्सख; साहुकार याद वही, |
पौरस्त्रिया अलंकृति, विसरति, ते आपणासि यादवही. || २८
राजा धृतराष्ट्रातें करुनि पुढें, अ[17]नुजयादवांसहित |
सामोरा जाउनियां, आणी त्या, कीं तसाचि तो [18]महित. || २९
धृतराष्ट्रादिगुरुजना वंदुनि, भेटे तया रमेशातें; |
वैकुंठीं पापीही, ज्या[19]ची होतां दया, रमे शां[20]तें. || ३०
'झा[21]ली यात्रा सुहृदां, अहितां, विश्रामदा, विलापार्था; |
पथिका सरें, तसा जगदीशें विश्राम दाविला पार्था. || ३१

---

१. मांडीच्या मागील भागांवर. २. मांसल पुष्ट भाग. ३. श्रीकृष्णाला. ४. द्रौपदी. ५. तिरकस नजरेनें, वांकड्या डोळ्यानें. ६. स+असूय=समत्सर, मत्सरानें, असहनशीलपणानें. पाठभेदः—सासूयं. ७. अत्यंत आवडता जो अर्जुन, त्याच्या अंगलक्षणाच्या दोषाचें आविष्करण. ८. मी केलेल्या विनोदासंबंधानें. ९. पाठभेदः—तो. १०. संताप पावलेला. ११. द्रव्याचे नजराणे. १२. मेघानें. १३. मयूरांस. १४. सुख. १५. कुबेरानें. १६. सार्थान्वयः—दुसरे दिवशीं भगवत्सख (अर्जुन) येतां, साहुकार याद वही (आपल्या कीर्द—चोपड्या वगैरे, देवघेवीच्या धंद्याचीं लिखितें) विसरती, पौरस्त्रिया अलंकृति (दागिने) विसरती व ते यादवही (रामकृष्णादि यादवसुद्धां) स्वतःलाच विसरती. खतपत्रें उराशीं बाळगणारे सावकार, दागिनेच ज्यांचें दैवत अशा स्त्रिया व आत्मज्ञाननिष्ठ असे रामकृष्णादि यादव हे सर्व अर्जुनदर्शनाच्या आनंदानें इतके वेडावून गेले, कीं त्यांना इतर कांहींच व्यवधान किंवा भान राहिलें नाहीं. १७. धाकटे भाऊ व यादव यांसह. १८. संमानित, संमानयोग्य. १९. ज्या रमेशाची (कृष्णाची). २०. शात=सुख. शातें=सुखानें. २१. अन्वयार्थः—यात्रा (पर्यटन अर्थात् अश्वानुसरण) सुहृदां (मित्रवर्गास) विश्रामदा (सुख देणारी) [व] अहितां (शत्रुवर्गास) विलापार्था (विलाप+अर्थ, दुःख हाच हेतु आहे जीचा अशी अर्थात् दुःखद) झाली. [जसा] पथिका (प्रवाशांस) सरें (तलावानें), तसा पार्था जगदीशें (श्रीकृष्णानें) विश्राम (आराम, स्वस्थता) दाविला.

[1]तुडवी, उडवी, पूर्वीं कोपोनि न ज्या मनोरमा ल्याला, ।
त्याचि पहाता झालों रम्या फुल्ला गृहांत माल्याला. ॥ १०२
जे पूर्वदग्ध, झाले [2]पर्यंक [3]प्रकट शुचि नवे [4]दांत; ।
[5]विप्रप्रसाद जैसे ते देती, तेविं रुचि न वेदान्त. ॥ १०३
[6]ऐसा परम क्षोभचि झाला परम प्रसाद बा! गा! तो; ।
हा **कृ**ष्ण विप्रमहिम्या, इतरांसि म्हणावया 'दबा,' गातो. ॥ १०४
[7]त्यांपासुनि देहानें, वाचेनें, प्रेमयुक्त चित्तानें, ।
विप्रासि **रौ**[8]क्मिणेया! मी पूजितसें सदैव वित्तानें.' ॥ १०५
[9]यापरि कथिलें **धर्मा**! म्यां **प्र**द्युम्नासि तेंचि तुज राया! ।
[10]सत्य वदविलें **भी**ष्में विप्रभजनशुद्धमार्ग उजराया." ॥ १०६
रामसुत **मयू**र म्हणे, 'जाणेल [11]निका मनीं [12]चमत्कृतिला; ।
[13]नुमजुनि **क**थे! न मानिल तुज, तेविं [14]निकाम नीचें [15]मत्कृतिला.' ॥ १०७

---

१. अन्वय:–ज्या मनोरमा (सुंदर) [माल्याला] पूर्वीं कोपोनि [तो] तुडवी [व] उडवी [व] न ल्याला (अंगावर अलंकाराप्रमाणें धारण न करी) त्याचि माल्याला (फुलांना) गृहांत रम्या [व] फुल्ला (टवटवीत) [अशा] पहाता झालों. २. पलंग. ३. प्रकट झाले=उदय पावले, उत्पन्न झाले. ४. हस्तिदंताचे. हें 'पर्यंक' ह्याचें विशेषण. ५. अन्वयार्थ:—विप्रप्रसाद (ब्राह्मणांचे प्रसाद, ब्राह्मणांची कृपा) जैसे रुचि (गोडी) देती (देतात) तेविं (त्या प्रकारची) रुचि वेदान्त न (देती). ६. सार्थान्वय:—बा! गा! ऐसा (या प्रकारें) तो [दुर्वास ऋषीचा] परम क्षोभचि (विलक्षण रागच) परम प्रसाद (शेवटीं मोठ्या प्रसादाप्रमाणें) झाला. [म्हणून] हा कृष्ण इतरांसि 'दबा' (ब्राह्मणांपुढें नम्र व्हा) म्हणावया विप्रमहिम्या (ब्राह्मणमाहात्म्यातें) गातो (वर्णन करितो). ७. तेव्हांपासून. ८. रुक्मिणीपुत्रा, प्रद्युम्ना. ९. ह्याप्रमाणें. १०. सार्थान्वय:–विप्रभजनशुद्धमार्ग (ब्राह्मणभक्तीचा पवित्र रस्ता) उजराया (उजळ करण्याकरितां) सत्य (खरें तें) भीष्में वदविलें. ११. शुद्ध अंत:करणाचा, सुशील. १२. चमत्कारातें. १३. न+उमजुनि=बोध न झाल्यामुळें. १४. अत्यंत क्षुद्र. १५. मत्+कृतिला=माझ्या ग्रंथास. अन्वयार्थ:–रामसुत मयूर म्हणे 'निका मनीं चमत्कृतिला (या कथेच्या कौतुकाला) जाणेल; [हे] कथे! निंकाम नीच [मात्र] नुमजुनि, [जेविं] तुज तेविं मत्कृतिला (माझ्या ग्रंथास) [ही] न मानिल (मान देणार नाहीं). जे शुद्ध अंत:करणाचे म्हणजे अर्थात् भाविक आहेत, त्यांच्या मनावर ह्या दुर्वासकृत सत्वपरीक्षणाचा रम्य ठसा बरोबर वठेल; पण जे हलकट आहेत, त्यांस ह्या कथेपासून बोध न झाल्यानें ते हिला तुच्छ करितील व त्याप्रमाणेंच माझ्या ग्रंथासही न समजल्यामुळें दोष देतील, असा कवीचा आशय. आपली कृति जरा दुर्बोध पण सरस व सुज्ञांस मान्य अशी आहे, असें पंतांनीं या गीतींत ध्वनित केलें आहे. आपल्या कृतीचे गुणदोष पंतांना कळतच होते, असें यावरून स्पष्ट दिसतें.

दे[1] त्रिगुण दक्षिणा; गुण सुमत, गुणशताहिपरिस हा यज्ञ; ।
त्रिगुण क्रतुफल घे, तूं ज्ञाता आम्हांचिपरि सहायज्ञ." ॥ ४०
कथुनि असें, सुमुहूर्तीं आरंभुनि करवि सु[2]कवि [2]तो य[3]जन; ।
घे[4]तां देतां निरुपम **धर्म**प्रभु न, रवि सुकवि, तोय जन. ॥ ४१
विख्यात, वि[5]श्वपावन, विस्तृत, विध्युक्त, होय तो यज्ञ, ।
सर्व तृषित निववाया प्रकट करी साधु तोय तो[6]यज्ञ. ॥ ४२
गाती **नारद**, **तुंबर**, **विश्वावसु**, हे जयांत स[7]मयज्ञ; ।
झाला **अजातरिपु**चा सा[8]धुस्तुत [9]तो तयाचिसम यज्ञ. ॥ ४३
ज्या यज्ञांत च[10]यन तें शुचि[11]कनकाच्याचि इ[12]ष्टकांहीं हो! ।
अर्थि[13]जनाचें, सर्वहि झालें परिपूर्ण, इष्ट कांहीं हो. ॥ ४४
शोभार्थ **भीम** उ[14]भवी त्या यज्ञीं शु[15]द्धकनकयूपातें; ।
भूपांतें बहु भुलवी, र[16]त्नाकरभाग्य जेविं कूपातें. ॥ ४५
नि[17]जगंधसेवितें जे, नाशुनि अघ, सुकृत दे वपा त्यांतें; ।
आपुलिया मानवले या **धर्म**मखांत देव पा[18]पण्यांतें; ॥ ४६

---

१. अन्वयार्थः–त्रिगुण (तिपट) दक्षिणा दे; गुण सुमत (सद्गुण सर्वत्रांचे आदरास पात्र असतातच); [परि] हा यज्ञ (तूं आरंभिलेला अश्वमेध) गुणशताहिपरिस (शेकडों सद्गुणांपेक्षां) [सुमत] (मान्य आहे); क्रतुफल (यज्ञाचें फल) त्रिगुण (तिपट) घे; सहायज्ञ (मित्रातें जाणणारा अर्थात् मित्राची किंमत ओळखणारा असा) तूं आम्हांचिपरि (आमच्या सारखाच) ज्ञाता (ज्ञानी) [आहेस]. २. ज्ञाता व्यास. ३. यज्ञ. ४. अन्वयार्थः–रवि (सूर्य) तोय (जल) घेतां देतां जन सुकवि (शुष्क करी), [परंतु] निरुपम (अद्वितीय) धर्मप्रभु तोय (दानवारि, दानसंकल्पाचें पाणी) घेतां देतां जन न सुकवि (कष्टी करी). समुद्राच्या पाण्याची वाफ सूर्यतेजामुळें होऊन त्याचे ढग बनतात. ह्या वेळीं उष्मा फार होतो; व नंतर वर्षाकाळींही अतिवृष्टीनें त्रास होतो. परंतु धर्माच्या यज्ञांत दान घेतांना व देतांनाही कोणास कष्ट झाले नाहींत, म्हणून धर्मराज सूर्याहून उघड श्रेष्ठ होत. ५. जगाला पवित्र करणारा. ६. पानाडी. ७. कालव्यवहार जाणणारे. ८. सज्जनांनीं वर्णिलेला. ९. तो यज्ञ त्या यज्ञाप्रमाणेंच (स्वतः प्रमाणेंच) झाला; त्याला त्याचीच उपमा योग्य, अन्य नाहीं. १०. हवनाकरितां बांधिलेलें चतुष्कोण कुंड. ११. चोख सोन्याच्याच. १२. विटांनीं. १३. अन्वयार्थः–अर्थिजनांचें (याचकवर्गाचें) इष्ट (कामना) कांहीं हो (कोणतेंही असो), [तें] सर्वहि परिपूर्ण झालें. १४. उभारिता झाला. १५. चोख सोन्याच्या खांबातें. १६. समुद्राची संपत्ति, समुद्राचें वैभव. १७. सार्थान्वयः–जे निजगंध सेवितें [=स्वाभिमानी (गंध=ताठा)], त्यांतें वपा (यज्ञपशूंच्या हवनांतील चरबी) [त्यांचें] अघ नाशुनी, सुकृत (पुण्य) दे. १८. पापण्यांतें. मनुष्यांप्रमाणें देवांचे ठायीं पापण्यांची उघडझांप नसते. ही गोष्ट त्या देवांना फार वरी वाटली, कारण त्यायोगें मखशोभा अवलोकन करण्यांत काडीमात्रही व्यत्यय येण्याची भीति नव्हती. तेव्हां देवांनीं आपल्या डोळ्यांना धन्यवाद दिला, हा भाव.

यावास[1] आणुनि घनश्यामास दयासुधारसमयास; ।
व्हावा सहाय घेउनि करवाल जसा सुधार समयास. ॥ ७
होतांचि उत्तरायण[2] ये मज जात्यास[3] बोळवायास[4]. ।
मुनिहो! या सर्वं तुम्ही, स्वपदरजांमाजि[5] घोळवा यास." ॥ ८
भीष्मासि धर्म वंदी भ्रात्यांसह, त्याहि केशवासहित, ।
यत्पदपद्माचा[6] करि मातृशतांहूनि लेश वास हित. ॥ ९
करुनि[7] पुढें गांधारीसह धृतराष्ट्रास, शक्रसम[8] हर्षी[9], ।
गेला पुरा युधिष्ठिर राजा, सभ्रातृवर्ग, समहर्षी[10]. ॥ १०
प्रेषी स्वस्थानाप्रति सत्कारुनि पौरजानपदलोक[11]; ।
सांत्वुनि[12] हरि स्त्रियांचा दानेंमानेंकरूनियां शोक. ॥ ११
शुद्धें[13] चित्तें वित्तें नमुनि यथायोग्य गौरवि, प्राशी ।
सादर चकोरसा तो कौंतेय सुधांशुगौर विप्राशी. ॥ १२

---

१. सार्थान्वयः—सुधार (उत्तम धारेचा) करवाल (खड्ग) घेउनि जसा सहाय (मित्र) समयास (ऐन प्रसंगीं, वेळेवर) व्हावा (असावा, पाहिजे;) [तसा तूं] दयासुधारसमयास (दयारूप सुधेच्या रसानें भरलेल्या) घनश्यामास (घननीळाला, कृष्णाला) आणुनि यावास (तूं यावेंस अशी माझी इच्छा आहे). 'यावास' ह्या विध्यर्थांत इच्छा व्यक्त होते, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. २. सूर्य मकरराशीस आला म्हणजे उत्तरायण सुरू होतें. तो कर्कराशीस गेला म्हणजे दक्षिणायन लागतें. ३. जाणाऱ्यास अर्थात् इहलोक सोडून जाणाऱ्यास. ४. पाठवणी करण्यास, निरोप देण्यास. ५. यास (मला भीष्माला) स्वपदरजांमाजी (आपल्या चरणधूलींत) घोळवा—अर्थात् तुमची चरणधूली मजवर पडो. हल्लीं प्रचलित असलेला मराठी प्रयोग पहा—'पायधूळ झाडा'. ६. सार्थान्वयः—यत्पदपद्माचा (ज्याच्या चरणकमलाचा) लेश (थोडासा, अल्पमात्र) वास (सान्निध्य किंवा गंध) मातृशतांहूनि (शेंकडों आयांपेक्षां अधिक) हित (कल्याण) करी. ७. पुरगमनाचे वेळीं अग्रस्थान चुलता व चुलती यांस देऊन, त्यांच्या मागून धर्मराज चालूं लागले, ह्यावरून वडिलांविषयीं त्यांचा किती आदर होता, हें व्यक्त होतें. ८. इंद्रासारखा. ९. संतोष पावलेला. १०. स+महा+ऋषि=मोठमोठ्या ऋषींसहवर्तमान. ११. पौर=नागरिक. जानपद=खेड्यांत राहणारे लोक. पौरजानपदलोक=सर्व प्रजाजन. १२. हस्तिनापुरांतील योद्धे कुरुक्षेत्रीं समर करण्यास गेले व तेथें पुष्कळांचा अंत झाला, ह्यामुळें मागें राहिलेल्या त्यांच्या स्त्रिया शोकाकुल झाल्या. अशा स्त्रियांस देणग्या देऊन म्हणजे अर्थात् त्यांच्या पोषणाची तजवीज करून व त्यांचा मोठा सन्मान करून धर्मानें त्यांचें समाधान केलें. राजांनीं प्रजेबद्दल कशी काळजी वाहावी, ह्याचा हा उत्तम मासला आहे. १३. सार्थान्वयः—तो कौंतेय (धर्मराज) [विप्रांतें] शुद्धें चित्तें (मोकळ्या मनानें) नमुनि, वित्तें (द्रव्यद्वारा) यथायोग्य गौरवि

[1]धर्म म्हणे, 'भू मुख्या स्वपतिसुखा दक्षिणा दिली पाहो; ।
या हर्षयशें भरता, बहु त्याही दक्षिणा दिलीपा हो. ॥ ५५

अर्जुनजिता हयमखीं म्यां दिधली [2]ऋत्विजांसि हे[3] अवनी, ।
घ्यावी यथाविभाग, [4]क्षम सर्व [5]प्रभु तुम्ही इच्या [6]अवनीं. ॥ ५६

झालों [7]कृतार्थ, आतां लावीना हात या [8]परस्वा मी; ।
आज्ञा तपोवनाप्रति जाया द्या, जोडितों कर स्वामी! ॥ ५७

तुमच्या पदप्रसादें, चिरचिंतित[9] जें, [10]अशेष तें घडलें; ।
[11]दुर्वह भार उतरला, मद्भाग्यांचेंहि मन सुखीं पडलें. ॥ ५८

स्वामी! पुण्य यश विपुल घेउनि, हे म्यां तुम्हां धरा विकिली; ।
[12]उघडील जी कपाट स्वर्गाचें, ती जिवीं धरावि किली.' ॥ ५९

[13]कृष्णा, भीम, जय, नकुळ, सहदेवहि, करुनियां तयां [14]प्रणती, ।
धर्म प्रभुवर वदला जैसें, तैसेंचि सर्वही म्हणती. ॥ ६०

त्या सर्वांहीं म्हणतां, 'राज्यादि, त्यजुनि तप, नको कांहीं;' ।
'हा' म्हणितलें जनांहीं तैं, जातां जेविं [15]तपन [16]कोकांहीं. ॥ ६१

---

१. सार्थान्वयः—धर्म म्हणे, भू [ही] दिली (दिलेली) मुख्य दक्षिणा स्वपतिसुखा (आपल्या यजमानाचें सुख) पाहो. (अर्थात् पृथ्वी व तिचे हल्लींचे स्वामी ब्राह्मण ह्या उभयतांस सुखप्राप्ति होवो). या यशें (भूदान करून ब्रह्मवृंदास व पृथ्वीस सुखाची जोड करून दिली, ह्या कीर्तीमुळें) भरता [व] त्याहि (सुप्रसिद्ध) ॰ दक्षिणा (न्यायशीला) दिलीपा बहु हर्ष (होवो). टीपः—भरत हा सोमवंशीय दुष्यन्त राजाचा पुत्र. दिलीपः—सूर्यवंशीय अंशुमान् राजाचा पुत्र व भगीरथाचा पिता. २. यज्ञांतील पुरोहितांस. ३. ही पृथ्वी. ४. योग्य; समर्थ. ५. पति, मालक. ६. रक्षण करण्यांत. ७. कृतकृत्य, धन्य, सफलहेतु. ८. दुसऱ्याच्या वित्तास. ९. फार दिवसपर्यंत इच्छिलेलें. १०. पूर्णपणें. ११. सोसण्यास कठीण असें ओझें दूर झालें. १२. अन्वयार्थः—जी किली (किल्ली) स्वर्गाचें कपाट (दार) उघडील, ती जिवीं (उराशीं) धरावी (फार काळजीनें जतन केली पाहिजे). तुम्हांस भूदान केल्यानें मजला यशःप्राप्ति व पुण्याची जोड लाभली आहे. त्यामुळें मजला स्वर्गप्राप्ति खचित होणार; तेव्हां स्वर्गाच्या दरवाजास लागणारी ही किल्ली मी उराशीं बाळगावी हेंच विहित होय. अर्थात् दिलेलें दान परत घेऊन, ती किल्ली हातची जाऊं देणें शहाणपणाचें होणार नाहीं, असा भाव. १३. द्रौपदी. १४. वंदन. १५. सूर्य. १६. सूर्यास्त झाला म्हणजे कोकांच्या (चक्रवाकांच्या) जोडप्यांचा वियोग होऊन, त्यांस दुःखांत रात्र लोटावी लागते, असा कविसंकेत आहे.

गेला पाय पहाया [1]गुरुवत्सल धर्मराज [2]आज्याचे. ॥ १७
जाऊनि कुरुक्षेत्रीं त्या श्रीभीष्मासमीप तो पावे; ।
श्रीव्यास नारद निकट ज्याच्या, [3]ज्यांहीं [4]पुंमर्थ [5]ओपावे. ॥ १८
[6]नानादेशसमागत नृपतिमुनि न वदति निकट लेश, तशा ।
पाहे, गमे पिपीलिक त्या गुडराशीस चिकटले शतशा. ॥ १९
[7]उतरुनि धर्म नमी त्यां; जे [8]विपुल अलिप्त, जेविं गगन, मुनी; ।
वदला विनयें ऐसें श्रीगंगानंदनासि मग नमुनी. ॥ २०
"[9]तो हा नमितो, वदतो, पढविशि तूं मनुजदेव कीरा ज्या; ।
आला असे पहा तो, जो प्रसवलि तनुज देवकी, राजा ! ॥ २१
[10]सस्त्रीक ज्येष्ठ [11]तनय आला आहे, [12]कनिष्ठही राया ! ।
नेत्रें उघडूनि पहा राजेंद्रा ! [13]सुज्ञमुकुटहीरा ! या. ॥ २२

---

१. वडील माणसांच्या ठायीं निष्ठा ठेवणारा. २. आजोबाचे, भीष्माचे. ३. नारदादिकांनीं. ४. धर्मार्थकाममोक्ष हें चतुष्टय. ५. द्यावे. ६. सार्थान्वयः—नानादेशसमागत (अनेक देशांतून आलेले) नृपतिमुनि (राजे व ऋषि) [ज्या] निकट लेश (किंचित्‌ही) न वदति, तशा [शरपंजरीं पडलेल्या भीष्माला] (धर्मराज) पाहे, [व] [त्यास] गमे (=वाटे, वाटलें) [कीं] त्या गुडराशीस (भीष्माचार्यरूप गुळाच्या ढेपीस) शतशा (शेंकडों) पिपीलिक (मुंगळे) चिकटले. गुळास जशा मुंग्या लागतात, त्याप्रमाणें ह्या सर्वज्ञाल्या भीष्माचार्यांजवळ गोळा झालेला नृपगण व मुनिवृंद धर्मराजास दिसला. ७. वाहनावरून उतरून. ८. येथें 'विपुल' व 'अलिप्त' हे शब्द श्लिष्ट आहेत. विपुल=(१) (गगनपक्षीं) अमर्याद, विस्तृत; (२) (मुनिपक्षीं) विशाल दृष्टीचे किंवा अंतःकरणाचे, ज्यांचे विचार किंवा नजर कोती नाहीं असे. अलिप्त=(१) (गगनपक्षीं) सर्वव्यापी, परंतु कोणत्याही पदार्थांत न मिसळणारें. (२) (मुनिपक्षीं) संसारांत राहणारे, परंतु विषयाधीन किंवा काम्य कर्मांत गुंतलेले नाहींत, असे. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायांत भगवद्भक्तांचीं लक्षणें सांगतांना हीच उपमा योजिली आहे व 'विपुल' व 'अलिप्त' याच अर्थीं त्यांनीं अनुक्रमें 'व्यापक' व 'उदास' हे शब्द वापरले आहेतः—व्यापक आणि उदास । जैसें कां आकाश। तैसें जयाचें मानस । सर्वत्र गा ! ॥ (ज्ञानेश्वरी, अ० १२, ओंवी १८०.) ९. सार्थान्वयः—ज्या कीरा (पोपटास) तूं मनुजदेव (नरपति) पढविशि (बोलावयास शिकविलेंस), तो हा (मी धर्मराज) नमितो [व] वदतो. पोपटास जें शिकवावें तें ज्याप्रमाणें तो जसेंच्या तसेंच बोलतो त्याप्रमाणें भीष्माचार्यांनीं जें जें शिकवावें, तें तें अगदीं बरोबर वठविणारे धर्मराज होते. १०. गांधारीसहवर्तमान. ११. धृतराष्ट्र. १२. कनिष्ठही [तनय]=विदुर. धृतराष्ट्र व विदुर हे भीष्माचे पुतणे, व म्हणून मुलांसारखे होत. १३. विद्वानांच्या मुकुटमणे, सुज्ञश्रेष्ठा.

धन ऋत्विजांसि देता झाला तें व्यास तो महाभाग; ।
केलें[1] तेंहि[1] चतुर्धा[1], मग वांटुनि घेतलें यथाभाग. ॥ ७०
स्वांशातें[2] ऋत्विज ते वांटुनि देती यथेष्ट अन्यास[3]. ।
कितिक विनोदें म्हणती, 'तरि नेऊं, जरि[4] म्हणाल अन्यास.' ॥ ७१
राशि न सरती, जाणों[5] आली सहसा धना तदा सांजी; ।
न[6] परा श्री, श्रीपतिच्या सर्वांसह साधनांत दासां जी. ॥ ७२
सर्वद्विजांप्रति म्हणे, वंदुनियां पाद, 'या, लुटा,' कवि तो; ।
कीं सद्भक्ताकरवीं धनलोभ प्रभु दयालु टाकवितो. ॥ ७३
चयनांतिल[7] हेमाच्या वदल्या नेत्यासि भार धन 'वीट,' ।
जाणों म्हणती तेंव्हांपासूनचि इष्टकेसि जन 'वीट.' ॥ ७४
ध्याव्या झाऱ्या, चंबू, ताटें, संपुष्ट कीं कलश, हांडे? ।
भांडे तृष्णेसीं[8] द्विज भारार्त, म्हणे 'यथेष्ट घे रांडे'. ॥ ७५
आधीं ब्राह्मण, मग जे क्षत्रिय, विट्, शूद्र, धन तिंहीं लुटिलें, ।
किंबहुना[9] म्लेच्छांहीं; न सुयतिनें, तें न हतभगें कुटिलें. ॥ ७६

---

१. त्याचे चार भाग करण्यांत आले. २. स्व+अंशातें=आपआपल्या भागातें. ३. इतर ब्राह्मणांना. ४. जर 'हें अनामत किंवा ठेव नाहीं' असें म्हणाल; जर हें सर्वस्वीं आमच्या मालकीचें आहे असें कबूल कराल. [द्रव्य पुष्कळ असल्यामुळें तें जरी आज दिलें, तरी ऋत्विजांना कांहीं काळानंतर तें परत घेण्याची इच्छा होईल, अशी कल्पना करून हा विनोद केलेला आहे. वस्तुतः धर्माच्या राज्यांत दिलेलें दान परत घेणारे ऋत्विज नव्हते व तसे असण्याचें कारणही नव्हतें.] ५. जाणों तदा धना सहसा सांजी आली =जणुं कांहीं त्या वेळीं एकाएकीं द्रव्याचें [अपरंपार] पीकच लोटलें, म्हणजे तें कितीही दिलें तरी संपेना. सांजी=पीक. ६. जी [श्री] श्रीपतिच्या (लक्ष्मीपतीच्या, कृष्णाच्या) दासां सर्वांसह (इतर सर्व साहित्याबरोबर) साधनांत [असे], [ती] परा (परक्यासारखी किंवा दुष्प्राप्य) न. ७. सार्थान्वयः—चयनांतील (होमकुंडांतील) हेमाच्या [इष्टिका] भारधन (ओझेंभर सोनें) नेत्यासि (नेणाऱ्यास) वदल्याः—'(सोन्याचीं ओझीं वाहून वाहून) वीट (कंटाळ);' [म्हणून] जाणों (जणूं काय असें वाटतें कीं) तेंव्हांपासूनचि इष्टिकेसि (विटेला) जन 'वीट' म्हणती. ८. सटवे तृष्णे! नाठाळे धनाशे! ९. किंबहुना (फार काय? पण) म्लेच्छांहीं [लुटिलें]; [मात्र] सुयतिनें (खऱ्या निरिच्छ साधूनें) न [लुटिलें] [व] हतभगें (दुर्दैवी) कुटिलें (कुढ्या, वांकड्या, नीच माणसानें) न [लुटिलें]. एकंदरींत निरिच्छ यति व दुर्दैवी कुढीं माणसें यांशिवाय इतर सर्वांनीं—म्लेच्छांनींसुद्धां—धर्माच्या यज्ञांत द्रव्याची लूट केली. जातीपातीचा भेद तिळमात्र ठेवण्यांत आला नाहीं.

माता जसि कन्येतें, जी जनता[1], धर्म बोळवी[2] तीतें; ।
[3]बहुहितकर भूतादर सन्मतितें, जेविं बोळ वीतीतें. ॥ ७७
व्यास नें[4] निजाश्रमपदा, लोभाचें[5] जें विमान, वसु ने तें, ।
कुंतीतें दे प्रेमें, संसारी[6] जेविं मानव सुनेतें. ॥ ७८
[7]श्वशुरार्पित धर्मधनेंकरुनि करी सांग पुण्यकव्रत ती; ।
पुरवी मनोरथातें गुरुभक्तितसी न निर्जरव्रतती[8]. ॥ ७९
देतां निरोप वदला मणिपूरेश्वर, 'पुरेत या राशी, ।
भरलों मणिकनकांहीं; अणिक न कांहीं, अभीष्ट[9] द्या आशी[10],' ॥ ८०
[11]बहुसत्कारें नाशा[12] जी[12] अमृतें जेविं आठवी न गरा, ।
[13]त्या दुःशलेसि पौत्रासह पूजा करुनि पाठवी नगरा. ॥ ८१
पूजुनि सुतादिकांसह कृष्णबल द्वारकेसि पाठविले; ।
[14]शतदा पांडुसुतांहीं प्रभु[15], त्यांहीं हे, दिसांत आठविले. ॥ ८२
[16]घेते झाले वर्णनगुण दाते शूरविप्र भाटाचा; ।
[17]धर्मप्रभेपुढें घे तुडवुनि जाणों रविप्रभा टांचा. ॥ ८३

---

१. जनसमूह. २. पाठवणी करिता झाला. ह्यांतील उपमा फार मार्मिक आहे. कन्येवर मातेचें प्रेम फार असतें व तिची पाठवणी करितेवेळीं माता तिची यथास्थित व्यवस्था करून देते, हें सर्वांस परिचित आहेच. ३. अन्वयार्थः—वीतीतें (प्रसविणारीतें, आईतें) जेविं बोळ—औषधीविशेष—तेविं सन्मतितें (साधूंच्या मनोवृत्तीला) भूतादर (प्राणिमात्रांची आदरबुद्धि) बहुहितकर. 'बोळ' हें औषध मुलांना फार गुणकारी आहे. यानें मुलांचे जठरांतील अनेक विकार निर्मूळ होतात, म्हणून आया हें औषध मोठ्या आदरानें संग्रहीं ठेवितात. ४. सर्वसंग्रहपाठः—हि. ५. जें लोभाचें विमान (माप) तें वसु (धन). हें धनाचें लक्षण मौजेचें पण यथार्थ आहे. ६. प्रपंची मनुष्य. पाठभेदः—संसारीं. ७. अन्वयार्थः—श्वशुरार्पित धर्मधनेंकरुनि (सासऱ्यानें दिलेल्या योग्य द्रव्याच्या द्वारें अथवा साहाय्यानें) ती (कुंती) पुण्यकव्रत (पुण्यप्रदव्रत) सांग करी (यथाविधि करिती झाली). ८. सुरलता, कल्पलता. ९. वांच्छित. १०. आशीर्वाद. ११. अन्वयार्थः—जेंवि अमृतें गरा (विषाला) न आठवी, [तेंवि] बहुसत्कारें जी [दुःशला] नाशा (पतिपुत्रांच्या वधाला) न आठवी (न स्मरे, विसरली), त्या दुःशलेसी पौत्रासह (नातवासह) पूजा करुनि नगरा पाठवी. १२. पाठभेदः—नाशी ती. १३. पाठभेदः—या. १४. अन्वयार्थः—पांडुसुतांहीं प्रभु, [व] त्यांहीं हे (पांडुसुत) दिसांत शतदा (दिवसांतून शंभर वेळां) आठिवले. परस्परांस परस्परांची आठवण शंभरदा होई. १५. कृष्ण व बळराम. १६. भाटांचा वर्णनगुण घेते झाले=स्तुतिपाठक बनले. १७. अन्वयार्थः—जाणों धर्मप्रभेपुढें (धर्मराजाच्या तेजापुढें) रविप्रभा टांचा तुडवुनि घे (रवितेज निस्तेज झालें). मुलें रुसलीं म्हणजे टांचा घांसतात हें सुप्रसिद्धच आहे. धर्मतेज पाहून रवितेज मनांत विषाद पावून टांचा घासूं लागलें, व्यर्थ धडपडूं लागलें, तरी त्यास धर्मराजाच्या दीप्तीची बरोबरी होईना.

झाले[१] प्राप्त तसे ते बहुमान, उचित मखीं सुरवरा जे; ।
प्रकृतींसि मोहिति, जसे गोपींसि सुवेणुचे सुरव, राजे. ॥ ८४
'एकें कृष्णें होतो सांग[२] क्रतु' म्हणति सर्व सुनयज्ञ[३]; ।
मग कृष्णत्रय[४] जेथें, होइल तो कां बहूत्तम[५] न यज्ञ ? ॥ ८५
स्तवनीं[६] समर्चनीं जरि जिव्हाहस्तें चुका, परि समोर ।
नाचा प्रभुच्या; म्हणती गुरु कीं, 'बहुमत शुकापरिस मोर.' ॥ ८६

अध्याय सातवा.

यज्ञाच्या अवसानीं[७] दिव्यकुसुमवृष्टि होय, तों[८] नकुळ[९] ।
तेथें येउनि गर्जे[१०], भाग्यमदें[११] करुनि जेविं हीनकुळ[१२]. ॥ १
त्या नकुळाचा मस्तक सर्व[१३], अणिक एक पार्श्व[१४], कनकमय[१५]; ।
वाटे[१६] दैवें त्यांचा[१७] राहविला धरुनि हस्त जनक मय. ॥ २

---

१. अन्वयार्थः—मखीं (यज्ञांत) सुरवरा (इंद्रातें) जे बहुमान उचित, ते तसे [तेथें जमलेल्या राजांना] प्राप्त झाले [=यज्ञासाठीं जमलेल्या राजांचा बहुमान करून धर्मानें त्यांस सुरवराप्रमाणेंच शोभविलें]. [म्हणून ते] राजे, जसे सुवेणूचे (कृष्णाच्या पांव्याचे) सुरव (गोड स्वर) गोपींसि [मोहिती], [तसे] प्रकृतींसि (प्रजाजनांतें) मोहिती. २. पूर्ण. ३. उत्तम प्रकारें नीति जाणणारे. ४. श्रीकृष्ण, श्रीमद्व्यास व अर्जुन. ५. सर्वोत्कृष्ट. ६. सार्थान्वयः—जरि स्तवनीं (प्रार्थनेमध्यें) [व] समर्चनीं (पूजेमध्यें) जिव्हाहस्तें (जीभ आणि हात ह्या योगें; स्तवन करणारी जीभ व पूजा वाहणारा हात यांनीं) [तुम्ही] चुका (चुकतां, प्रमाद करितां), परि (तरीपण) प्रभुच्या समोर नाचा. गुरु (वडिल माणसें) म्हणती कीं, 'शुकापरिस (पोपटापेक्षां) मोर बहुमत.' मोरापेक्षां पोपटाचा आवाज गोड आहे खरा, तथापि मोर नाचूं लागला म्हणजे त्याच्या आवाजाच्या दोषाकडे लक्ष जात नाहीं. देवस्थानाचे ठिकाणीं देवापुढें नाचण्याकरितां मोर पाळिलेले असतात पण गाण्याकरितां पोपट नसतात हें सर्वांस माहीत आहेच. येथें मोर शब्दानें कवीनें आपलें नांवही सुचविलें आहे. ७. समाप्तीच्या वेळीं. ८. इतक्यांत. ९. मुंगूस. १०. ताठ्यानें ओरडून बोलला. ११. संपत्तीमुळें शेफारून जाऊन. मृच्छकटिकांत गर्जना करणाऱ्या मेघाचें संपत्तीनें चढून गेलेल्या मनुष्याबरोबरचें साम्य असें वर्णिलें आहेः—उतरे, चढेहि, वर्षे, गर्जे, पाडी घनांधकारातें । प्राप्तनवश्रीपुरुषापरि मेघ धरी अनेक रूपातें ॥. १२. नीचकुळांत जन्मलेला पुरुष. १३. हें 'मस्तका'चें विशेषण. १४. बाजू, कूस. १५. सुवर्णाचा. १६. अन्वयार्थः—वाटे (भासे), जणूं काय), त्याचा जनक (उत्पन्नकर्ता) मय हस्त धरुनि दैवें राहविला (थांबविला, सर्व देह सुवर्णमय करीत असतां, अर्धें काम झाल्यावर मध्येंच थोपविला). उत्प्रेक्षा फार मौजेची आहे. १७. पाठभेदः—त्याच्या.

तो नकुळ म्हणे, '[1]सक्तुप्रस्थासीं हा न होय [2]सम यज्ञ; ।
ब्रह्मांडाहूनि अधिक [3]पात्रीं देणार तोयें [4]समयज्ञ.' ॥ ३
त्यासी ब्राह्मण म्हणती, 'ऐसें वदतोसि काय? गा! नकुळा! ।
[5]या यजमानयशाचें न कवीच्या स्मरवि काय गान कुळा. ॥ ४
[6]नकुळा! स्वकुळांतचि तूं हर्म्याहुनि बहुकरून कोटर गा; ।
दिससी पटु, कटु वदसी; साधूची बहु करूं नको टर गा!' ॥ ५
नकुळ म्हणे, "हो सक्तुप्रस्थचि उत्तम, न हा [7]निका यज्ञ; ।
वर्णिल कां [8]उटजाला [9]मणिकनकखचितमहानिकायज्ञ. ॥ ६
होता [10]कपोतवृत्ति स्त्रीपुत्रवधूसवें कुरुक्षेत्रीं; ।
त्या सकुटुंबाचे [11]असु दुष्काळीं सर्व [11]राहिले [11]नेत्रीं. ॥ ७
बहुकष्टें, बहुकाळें, मेळविला हो! तिहीं [12]यवप्रस्थ; ।
[13]तत्सक्तुकुडव चववे घेति, नियम करुनि बैसुनि स्वस्थ. ॥ ८
तों अतिथि ब्राह्मण ये; त्या क्षुधित विलोकितांचि [14]आल्याला, ।
रोमांचांतें देहीं सकुटुंब कपोतवृत्ति हा [15]त्याला. ॥ ९

---

१. प्रस्थभर धान्याशीं. 'प्रस्थ' हें एक धान्याचें लहानसें माप आहे. पुढें टीप १३ पहा. २. बरोबरीचा. ३. योग्य अधिकारी पुरुष पाहून त्याच्या हातावर दानसंकल्पाचें जळ सोडणारा, पात्रीं दान देणारा. ४. कालज्ञाता, जें काळाला साजेल तें जाणून करणारा. ५. अन्वयार्थः—या यजमानयशाचें गान कवीच्या कुळा काय (देह) न स्मरवि (=देहाची आठवण किंवा भान राहूं देत नाहीं). कवी धर्माचें यश गावूं लागले, म्हणजे देहभान विसरतात, इतके ते त्यांत दंगून जातात; हा भाव. ६. अन्वयार्थः—नकुळा तूं हर्म्याहुनि कोटर बहुकरून (राजवाड्यापेक्षां आपलें घरटेंच फार चांगलें, असें वर्णन करून) स्वकुळांतचि (मुंगुसांच्या जमावांतच) गा (गायन करीत रहा, पोवाडे म्हणत रहा). (कारण तुझे सजातीय पशू तें खरें मानितील, परंतु मनुष्यमंडळींत तें खपावयाचें नाहीं.) पटु (हुशार) दिससी; [परि] कटु (भेदक) वदसी; गा! (अरे) साधूची टर (उपहास) बहु करूं नको. ७. खरा; यथार्थ. ८. पर्णशालेस. ९. रत्नें व सुवर्ण ह्यांहीं ज्याचें बांधकाम केलें आहे, अशा विस्तीर्ण वाड्याचा ज्यास अनुभव आहे असा मनुष्य. महानिकाय=महा+निकाय=मोठें घर. १०. कबूतरासारखी वृत्ति आचरणारा; कबूतर किंवा कवडा जसा पृथ्वीवर पडलेला एक एक दाणा टिपून आपली उपजीविका करितो, त्याप्रमाणें करणारा. मूळांत या ब्राह्मणाचें 'उंच्छवृत्ति' असें नांव आहे. 'उंच्छवृत्ति'=दाणे टिपून पोट भरणारा. मुक्तेश्वरांनीं आदिपर्वांत शिलोञ्छवृत्ति (=खडकावरील धान्यकण वेंचून वृत्ति चालवणारा) हा शब्द योजिला आहे. (आदि० १९।१४८ पहा). ११. डोळ्यांत प्राण आले, प्राण जाण्याची बारी आली. १२. प्रस्थभर यव. १३. 'कुडव' हें कैलीमाप होतें. ह्यांत १२ मुठी धान्य भरतें व ह्या मापाच्या दुप्पट 'प्रस्थ' होय. १४. आलेल्यास. १५. धारण करिता झाला.

पूजुनि तया म्हणे, 'बा भक्षुनि हे सक्तु, [1]धा कुटीमाजी; ।
[2]हे आजि होय गुर्वी उर्वीहुनि बहु, न धाकुटी माजी.' ॥ १०
[3]सत्व रहाया, देइल यवसक्तूंचा न कां कुडव हातें? ।
[4]स्ववपु विपत्तींत तसें त्या, जेविं नदींत लांकुड वहातें. ॥ ११
स्त्रीहि [5]अतृप्त अतिथितें जाणुनि, पतितें [6]नवक्तुकामातें ।
प्रार्थुनि, म्हणे, 'कराना शुचि, अर्पुनि हेहि सक्तु, कां मातें?' ॥ १२
स्त्रीचेहि अतिथिला दे सक्तु सबहुमान, सत्व राखाया; ।
तों त्या क्षुधिताचें करि सक्तुस बहु मानस त्वरा खाया. ॥ १३
[7]कापोति म्हणे 'याहुनि समधिक न शिखि, रवि, प्रयाग, मला.' ।
बहु हर्षें मातेला भोक्ता सुतसाच विप्र या गमला. ॥ १४
पुत्र म्हणे, 'मत्सक्तुहि दे, अतिथिच हित, तुला सकळ कळतें;' ।
तात म्हणे, 'मन, वत्सा! क्षुधित विलोकुनि मुलास, कळकळतें.' १५

---

१. तृप्त हो. २. अन्वयार्थ:—आजि (आज) हे (ही) माजी (माझी) [कुटी] उर्वीहुनि (पृथ्वीपेक्षां) बहु गुर्वी (मोठी) [होय], धाकुटी (लहान) न होय. ३. ब्रीद, [अतिथीला तृप्त करण्याचें] व्रत. ४. त्या (कपोतवृत्ती ब्राह्मणास) स्ववपु (आपलें शरीर) तसें विपत्तींत, जेविं (जसें) वाहतें लांकूड नदींत. त्या ब्राह्मणास असें भासलें कीं, 'ज्याप्रमाणें नदीच्या ओघांत वाहत जाणारें लांकूड एकसारखें खालीं खालींच जायचें, त्याप्रमाणें आपण ह्या विपत्तिरूप ओघांत सांपडलों असून ह्यांतून मुक्तता होणें कठिण. आपण दिवसोंदिवस अधिक विपत्तींत सांपडून, केव्हां तरी गटंगळी खाणारच. मग अतिथीचा आदर करून, त्याचे प्राण वांचविल्याचें पुण्य तरी पदरीं पाडून कां घेऊं नये?' ५. कपोतवृत्तीचे यव खाऊनही ज्याची तृप्ती झाली नाहीं अशा. ६. बोलूं न इच्छिणाऱ्या, स्तब्ध बसलेल्या. [ब्राह्मण तृप्त झाला नाहीं हें कपोतवृत्तीच्या ध्यानांत आलें, परंतु पुढें काय करावें हें त्यास सुचेना. आपल्या बायकोला व इतरांना 'तुम्ही आपले सक्तु ब्राह्मणाला द्या' असें म्हणण्याचा त्याला हिय्या होईना. म्हणून तो स्तब्ध राहिला.] ७. कापोति (ब्राह्मणपत्नी) म्हणे 'याहुनि (याचकाच्या क्षुधातृप्तीपेक्षां) शिखी (अग्नि), रवि [व] प्रयाग (गंगायमुनासंगमतीर्थ) मला समधिक न. (अग्निव्रत, सूर्योपासना किंवा प्रयागादि तीर्थाचे ठायीं घडणारा वास, ह्या गोष्टी या याचकाच्या क्षुधाशांतीपेक्षां मला अधिक वाटत नाहींत. घरीं धाराइयादि ठेवून होणारी अग्न्युपासना व सुप्रभात अर्घ्यप्रदानाच्या योगें घडणारी सूर्योपासना व तीर्थवास हीं स्वकर्में ब्राह्मणास विहित म्हणून सांगितलेलीं आहेत; व अग्न्युपासना गृहस्थाश्रमांतही असून, त्यांत पत्नीचा कार्यभाग बराच आहे; कारण, हवनादिविधि करण्याचा अधिकार विशेष अडचणीच्या प्रसंगीं स्त्रियांस आहे).

[1]संतीं, श्री सुरतरुचें नवि नवि लक्षि प्रसून, हित याची; ।
मग 'सक्तु द्या' म्हणुनि कां न विनविल क्षिप्र सूनहि तयाची? ॥ १६
ज्ञात्याला, ताप वसे अन्यशरीरांत, परि सकळ कळतो, ।
करि साधु त्या अतिथिची आत्मकुटुंबाहिपरिस कळकळ तो. ॥ १७
अतिथिद्विजासि, चित्तीं [2]जाणुनि [3]बहुनिर्विकार चवघांस, ।
देती त्या सक्तूचे पीयूषाहूनि[4] अधिक चव घांस. ॥ १८
अतिथि प्रसन्न होय; [5]प्रकट [5]करि [5]स्ववपु, [5]ढेंकर, [5]दया; तें ।
वर्णुनि सुदान, झाला तो [6]धर्मप्रभु पुढें [7]करद यातें. ॥ १९
सकुटुंब वरविमानीं वाहुनि, वारूनि सर्व शोकातें, ।
धर्में दिव्यतनु करुनि, नेला तो विप्र [8]सत्यलोकातें. ॥ २०
तें पाहिलें, निघालों बाहिर सोडून मी बिळाला; हो ! ।
मज पुण्यसक्तुगंधें जळलेशें [9]लाभ हा मिळाला हो! ॥ २१
शिर, एक [10]पार्श्व, झाला [11]स्वर्णमय; [12]तसाचि [13]अन्य कीं [14]उरला; ।
फिरलों पुण्यस्थानें कोठें माझा न [15]काम हा [16]पुरला. ॥ २२
धर्माच्या हयमेधीं होईलचि काम आपुला पूर्ण; ।
[17]यां [17]भावें मी येथें आलों, धांवोनि विप्रहो! [18]तूर्ण. ॥ २३

---

१. सार्थान्वयः—नवि नवि श्री (लक्ष्मीं) सुरतरुचें (कल्पवृक्षाचें) प्रसून (पुष्प) लक्षि [व] संतीं (साधु पुरुषाचे ठिकाणीं) हित (कल्याण) याची (मागते); अर्थात् प्रत्येक प्रकारची लक्ष्मी-सुद्धां सत्पुरुषाचें हित व्हावें म्हणून कल्पवृक्षाचें पुष्प पाहून [आपण सत्पुरुषाच्या उपयोगीं पडावें या हेतूनें] त्याची विनंति करिते. सर्व मनोरथ पुरविणाऱ्या कल्पवृक्षकुसुमाला प्रत्येक प्रकारची लक्ष्मी—हरएक प्रकारचें वैभव—'आपण सत्पुरुषाच्या ठिकाणीं रहावें असें' विनवीत असते, मग त्या कपोतवृत्तीची सून सक्तुदानानें ब्राह्मणाच्या उपयोगीं पडावें, असें कां बरें इच्छिणार नाहीं? हा गीतीचा भाव. २. या शब्दाचा संबंध अर्थानुरोधानें 'अतिथिद्विजासि' या नामाकडे घेतला पाहिजे. व्याकरणदृष्टीनें मात्र ही रचना शुद्ध नाहीं; कारण व्याकरणनियमानें 'जाणुनि' यांचा संबंध 'घांस' या कर्त्याकडे जाऊं बघतो. ३. शांत; आपल्या तोंडचें अन्न गेलें, या भावनेनें कष्टी न झालेल्या. ४. अमृतापेक्षां. ५. आपलें खरें रूप, [तृप्तिदर्शक] ढेंकर [व] दया (कृपाप्रसाद) हीं प्रकट करिता झाला. हा अतिथि ब्राह्मणवेषधारी यम होता व त्यानें आतां प्रसन्न होऊन व ढेंकर देऊन आपलें सत्यस्वरूप प्रकट केलें. ६. यम. ७. हात देणारा, साहाय्य करणारा, तारणारा. ८. ब्रह्मलोकाला. ९. अर्धदेह सोन्याचा झाला, हा लाभ. १०. बाजू, कूस. ११. सोन्याचा. १२. पूर्वींप्रमाणेंच, साधा. १३. दुसरी बाजू. १४. राहिला. १५. इच्छा; अवघें शरीर सुवर्णमय व्हावें ही इच्छा. १६. तृप्त झाला. १७. ह्या समजुतीनें. १८. सत्वर.

परि सक्तुप्रस्थसम न [1]मेख; दोष, म्हणाल, पाहिला काय? ।
तरि सर्व पहा झाला न कनक, तैसाचि राहिला [2]काय. ॥ २४
कनकमय न झालों मी, पाहुनियां [3]अन्नकर्दमा, नकुळ. ।
'हा' त्यां तुमचें द्विज! हो! 'साधु' म्हणो यास नर्दमान [4]कुळ." ॥ २५
यापरि अशेषसुरसिकें[5]साधुमधुपसेव्यमान [6]जो [7]बकुळ, ।
त्या निंदुनि धर्माच्या हयमेधा, गुप्त होय तो नकुळ. ॥ २६
जनमेजयभूप पुसे, 'सकळां साधूंचियाहि उत्साहा ।
भंगाया कोण करी सत्क्रतुची सुद्विजांत [8]कुत्सा हा?' ॥ २७
मुनि सांगे पूर्वकथा, 'जो [9]सत्तेज:प्रकर्षनमदग्नी, ।
तो राजा! श्राद्धाचा संकल्प करी मुनींद्र जमदग्नी. ॥ २८
मुनिच्या संकल्पातें जाणुनियां होमधेनु ये जवळ; ।
सांचवि [10]तत्पय भांडीं, ब्रह्मांडीं स्वयश तो जसें [11]धवळ. ॥ २९
तों धर्म कोपरूपें ये, येउनि, त्या पयासि मग तो पी, ।
मुनिस परीक्षाया; जन म्हणती, 'परि होय कीं न॰हे [12]कोपी' ॥ ३०
मुनि त्यातें कोप असें जाणे, त्यावरि करी न कोपाला; ।
तें नवल, '[13]चलदलाचा मृदु,' जेविं म्हणे [14]करी, 'नको पाला'. ॥ ३१
त्या मुनिवराप्रति, धरुनि तो कोप [15]ब्राह्मणी शिवो मूर्ती, ।
[16]पूर्ति कराया [17]श्रुतिची, बोले, [18]पाहूनि शांतिची स्फूर्ती. ॥ ३२
"सुमुने! 'भार्गव [19]रोषण' हा या लोकीं वृथाचि [20]बोभांट, ।

---

१. पाठभेद:—हा. २. देह. ३. अन्नाचा खच. ४. अन्वय:—[अशी खरी स्थिति असतां,] हे द्विज हो! [पाहिजे तर] तुमचें नर्दमान (शब्द करणारें, एकदम घोष करणारें) कुळ (समूह) त्या (उंच्छवृत्तीच्या सक्तुप्रस्थास) 'हा!' ('धिक्कार! धिक्कार!') म्हणो व यास (या धर्मयज्ञास) 'साधु' ('भलें, भलें' 'उत्तम, उत्तम') म्हणो. ५. अशेष+सुरसिक+साधु+मधुप+सेव्यमान=अत्यंत रसिक असे संपूर्ण सत्पुरुष हेच कोणी भ्रमर, त्यांहीं सेविण्यास योग्य असा. ६. जो यज्ञ. ७. ओवळीचें झाड. ८. निंदा. ९. सत्+तेज:+प्रकर्ष+नमत्+अग्नी=उत्तम तेजाच्या वर्चस्वानें नमस्कार घालीत आहे अग्नी ज्याला असा; ज्याचें तेज अग्नीपेक्षांही श्रेष्ठ आहे असा. १०. तिचें दूध. ११. शुभ्र. हें 'पय' आणि 'यश' या दोहोंचें विशेषण. १२. क्रुद्ध; संतप्त. १३. पिंपळाचा. १४. हत्ती. अन्वय:—जेविं करी 'चलदलाचा मृदु पाला नको' म्हणे [हें नवल], [तेविं] तें [जमदग्नीचें न रागावणें] नवल (आश्चर्य) [होय]. कोंवळ्या पाल्याचा स्वाभाविक भोक्ता जो हत्ती, त्यानें पिंपळाची पालवी टाकणें जितकें आश्चर्यकारक, तितकेंच संतापीपणासंबंधें प्रसिद्ध असलेल्या जमदग्नीनें राग टाकिला, हें आश्चर्यकारक होतें. १५. शुद्ध ब्राह्मणवेष. १६. तृप्ति. १७. कानांची. १८. 'बाहूनि' असा पाठभेद. १९. क्रोधी, संतापी. २०. डांगोरा, अपवाद, भकवा.

कीं नारदादि जेथें, वर धर्मज्ञांत जे नयज्ञांत. ॥ ६४
करुनि [1]पुरावा कृष्णागरुकर्पूरादिपुण्यगंधाचा, ।
[2]संस्कारिला यथाविधि देह चिताग्नींत [3]सत्यसंधाचा. ॥ ६५
[4]अपसव्य करुनि सर्वहि धृतराष्ट्रप्रमुख सज्जन चितेतें, ।
वाटे गंगेंत करिति [5]यज्ञांतावभृथमज्जनचि ते तें. ॥ ६६
गांगेयास व्यासें, गंगोदक नारदें दिलें, असितें, ।
[6]तेणेंहि, सुगति पाउनि, अरि बहु वर्णिति जयाचिया असितें. ॥ ६७
विश्व [7]धवळिलें जेणें स्वयशांहीं चंद्ररश्मिगौरांहीं, ।
त्यासि [8]भरतभार्यांहीं सतिल जल दिलें, तसेंचि [9]पौरांहीं. ॥ ६८
प्रगटे जलदानाच्या [10]अवसानीं [11]भूषणास्यरुचिरहिता, ।
करि [12]परिदेवन [13]दीना देवनदी [14]नारदादिमुनिमहिता. ॥ ६९
ती रोदन करित म्हणे, "[15]भारतहो! भूपहो! अहो! मुनिहो! ।
[16]वाटे न जपुनि, न तपुनि, न नमुनि, कोण्ही श्रमी न होमुनि हो. ॥

'तेथें' असा पाठ घेतल्यास असा अन्वय करितां येईल—वाटे, तशी शोभा यज्ञांत [ही] न; कीं (कारण) जे धर्मज्ञांत व नयज्ञांत वर [ते] नारदादि तेथें (भीष्मांच्या अंत्य संस्काराचे ठिकाणीं) [होते].

१. पुरवठा. २. भीष्माचार्यांच्या मृतदेहास धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें यथासांग मंत्राग्नि दिला, असा भाव. ३. सत्य (=खरी) प्रतिज्ञा ज्याची अशाचा, बोलणें खरें करणाऱ्याचा, भीष्माचार्यांचा. ४. उलटी प्रदक्षिणा घालून. ५. यज्ञ+अंत+अवभृथ+मज्जन=यज्ञसमाप्तीनंतर जें स्नान करितात तें. हें स्नान अंत्यविधीच्या वेळीं केलें होतें तरी अवभृथासारखें भासलें; एकंदरींत त्या महात्म्याचा अंत्यविधि म्हणजे एक पवित्र यज्ञच भासला, असा भाव. ६. अन्वयार्थ:—तेणेंहि (=त्या कृष्णानेंहि) [गांगेया गंगोदक दिलें], जयाचिया असितें (=ज्या कृष्णाच्या तरवारीला) अरि (=शत्रुसुद्धां) सुगति पाउनि (=मुक्ति लाभून) बहु वर्णिती (=अत्यंत स्तवितात). (मागें, गीति ३४ पहा.) ७. शुभ्र केलें. ८. भरतकुलांतील स्त्रियांनीं. ९. नगरवासी लोकांनीं. पौरजनांनीं भीष्माचार्यांस जलाञ्जलि दिला, ह्यावरून त्यांनीं जनानुरञ्जन किती केलें होतें, हें व्यक्त होतें. १०. समाप्तीच्या वेळीं. ११. भूषण+आस्यरुचि+रहिता=अलंकार व मुखावरील टवटवी हीं दिसत नाहींत जिच्या ठायीं अशी. हें 'देवनदी (=गंगा)' या शब्दाचें विशेषण. १२. रोदन. १३. कष्टी झालेली. १४. नारदप्रभृति ऋषिगणांनीं स्तविलेली. १५. भरताच्या कुलांत उत्पन्न झालेल्यांनो! १६. अन्वयार्थ:—वाटे, कोणी जपुनि श्रमी न हो (=कोणीही जपविधि करून श्रमी न होवो, जप करून पुण्यसंचयार्थ कोणींही कष्ट करूं नये), तपुनि श्रमी न हो, नमुनि श्रमी न हो, [व] होमुनि (=होम हवन करून) श्रमी न हो. [कारण एवढे श्रम करून पुण्यसंचय केला, म्हणजे शेवटीं सुख प्राप्त होतें, मनुष्याचा अंत आनंदमय होतो असें मुळींच नाहीं. पहा, भीष्म एवढा पुण्यवान् होता तरी पण अखेर त्याचा अंत शत्रूच्या कपटानें हालांतच झाला ना? हा गंगेचा भाव].

तो धर्म **को**परूपी, पितरांचें धरुनि तें मनीं उक्त[1], ।
निंदुनि धर्मसुतातें[2], शापापासूनि जाहला मुक्त[3]. ॥ ४३

उपसंहार.

श्रीगुरुनेंचि[4] करविलें हें स्वार्थ, करूनि नवस, लेखन; कीं, ।
मणि आकरीं[5], प्रभुविना स्नेहासि धरूनि न वसले खनकीं[6]. ॥ ४४
श्रीरामपदीं[7] अर्पित केलें **हयमेधपर्व** चवदावें; ।
सामर्थ्य[8] पारिजातीं जें, तें कुसुमींहि सर्वच वदावें. ॥ ४५

---

१. शब्द, भाषण. २. यमसुताला, धर्मराजाला. ३. मुक्त झाला=सुटला. ४. अन्वयार्थ:—नवस करून, श्रीगुरूनेंचि हें स्वार्थ (ज्यांत स्वहित—आत्मकल्याण—आहे असें हितकर) लेखन करविलें; कीं (कारण) मणि आकरीं वसेल, [परंतु] प्रभुविना (सत्ताधीशावांचून) खनकीं (खाण खणणाऱ्या मजुराच्या ठिकाणीं) स्नेहासि धरून (प्रेमानें) वसले न. खाणींतलीं रत्नें सत्ताधाऱ्यांच्या साहाय्याशिवाय जशीं आपण होऊन खणणाऱ्या मजुराच्या हातांत येऊन राहात नाहींत, तसें गुरुकृपेशिवाय लेखनचातुर्य माझ्या सारख्याच्या ठिकाणीं येणें शक्य नाहीं. लेखनाच्या कामीं मी केवळ एक मजूर आहें, परंतु खरें कर्तृत्व गुरुकृपेंचेंच आहे. त्या कृपेच्या अभावीं हीं भारतरत्नें गीर्वाण भाषेच्या खाणींतच पडून राहतीं. ५. खाणींत. ६. खणणाऱ्या मजुरांत. ७. पंतांचें आराध्यदैवत प्रभुरामचंद्र त्याच्या (व त्यांचे वडील रामाजीपंत पराडकर त्यांच्याही) पायीं. ८. जें पारिजातनामक कल्पतरूच्या फुलांत सामर्थ्य, तेंच सामर्थ्य ईश्वरचरणीं वाहिलेल्या सर्वच फुलांत आहे. तेव्हां माझी कृती जरी कमी दर्जाची असली, तरी ती ईश्वरार्पित केल्यामुळें मला कृतकृत्यच करीत आहे.

१ मोरोपंती अश्वमेधपर्वावरील

शुद्धाशुद्ध, मुख्यमुख्य अलंकार[१], पाठभेद व टीपा यांचें परिशिष्ट.

पृष्ठ.	पद्य.	टीपा.
३	१४	उ० अ०-**उत्प्रेक्षालंकार.**
,,	१५	रत्नप्रदीप=रत्नरूपी दिवा. रत्नप्रदीप हालेना=रत्नरूपी दिव्यांतून बाहेर निघणारी प्रभारूपी ज्योति चलबिचल करीत नाहीं.
,,	१६	**दृष्टांतालंकार.**
,,	१८	**दृष्टांतालंकार.**
,,	२०	**दृष्टांत.**
५	३७	**अर्थांतरन्यास.**
६	४२	**अर्थांतरन्यासालंकार.**
,,	४३	**अर्थांतरन्यासालंकार.**
,,	४४	उ० अ० भिन्न होणें व एक न होणें, यांचा अर्थ एकच असल्यामुळें **वस्तुप्रतिवस्तूपमालंकार.**
,,	४५	सर्व गीतींत **वस्तुप्रतिवस्तूपमालंकार.**
७	४६	उत्तरार्धांतील विशेषणें सहेतुक असल्यामुळें **परिकर.**
,,	५२	**परंपरितरूपक.**
८	५८	पू० अ०-चिंतोद्भवरूपी कार्याला ज्ञातृत्वरूपी प्रतिरोधक सामग्री असतांही, कार्य घडलें आहे, असें वर्णन असल्यामुळें **विभावना.** शिवाय यांत **चेतनगुणोक्ति**नामक अलंकारही आहे. सोयरा.-सोदरक (सख्खा भाऊ)=सोअरअ=सोयरा.
,,	५९	उ० अ० **रूपक.**
९	६५	'आशयज्ञा' हें विशेषण हेतुगर्भ आहे, ह्मणून **परिकर.**
,,	६८	पू० अ०-समृद्धि होते शत्रूची व चिंता वाढते दुसऱ्याची, असें वर्णिल्यामुळें **असंगति**नामक अलंकार. सबंध गीतींत **अप्रस्तुतप्रशंसा** आहे, कारण सामान्यतत्व सांगून, प्रस्तुत वस्तु सुचविली आहे. उ० अ०-**काव्यार्थापपत्ति.**
,,	६९	उ० अ०-**परंपरितरूपकालंकार.**
१०	७२	**अर्थांतरन्यासालंकार.**

१.पर्यायोक्त, उपमा व यमकानुप्रासादि शब्दालंकार यांचा उल्लेख या परिशिष्टांत बहुधा केलेला नाहीं.

पृष्ठ.	पद्य.	टीपा.
११	७८	**स्मरणालंकार.**
,,	८१	पू० अ०–'जेविं कुनर पितयातें', हीच उपमा मोरोपंती हरिश्चंद्राख्यानांत आहे— अवमानितोसि मज तूं, वृद्धपणीं जेविं कुनर पितयातें. ॥ १-४१
१२	८७	'इष्टार्थ साधावयाला जावें, तों इष्टसिद्धि न होतां, अनिष्टच पदरीं पडतें', असें वर्णन आलें असतां, एक **विषमाचा** प्रकार होतो. अशा प्रकारचा **विषम** येथें आहे.
,,	८८	उ० अ०–**काव्यार्थापपत्ति** अलंकार आहे. **'शाच्यवन'** ऐवजीं **'शाच्यवन'** पाहिजे.
१३	८९	उ० अ०–'अतका' येथें 'अंतका' असें वाचावें.
,,	९२	**दृष्टान्त.** येथें 'रसिक' शब्दावर **श्लेषाची** छाया आहे, असें भासतें.
,,	९३	उ० अ०–**उपमालंकार,** 'कोनीं बसणें' ही **लोकोक्ति.**
,,	९५	उ० अ०–येथें 'हें तरी कर, नाहीं तर तसें तरी होऊं दे' अशी सवड दिल्यामुळें **विकल्पालंकार.**
१३-१४	९७	**विकल्पालंकार.**
१४	९८	**विषम.**
,,	९९	'गुरु' ऐवजीं **'गुरु'** समजावें. गुरु=बृहस्पति.
,,	१०२	**काव्यलिंग व काव्यार्थापत्ति.**
१५	१०७	उ० अ०–'वैरें' ऐवजीं 'वैरें' असें समजावें.
,,	१०९	उ० अ०–**गम्योत्प्रेक्षा.**
,,	११०	उ० अ०–**व्यतिरेकालंकार** आहे. सबंध गीतींत **'अप्रस्तुतप्रशंसा'** आहे.
,,	१११	उ० अ०–**विरोधाभास.**
,,	११२	उ० अ०–**उत्प्रेक्षालंकार.**
१६	११५	**दृष्टांतालंकार.**
,,	११६	पू० अ०–'**जीवाचा** अनुज, परि सत्य तसाच'=बृहस्पतीचा धाकटा भाऊ खरा, परंतु [गुणांनीं व योग्यतेनें] खरोखर त्याच्या तोडीचाच.
,,	११७	उ० अ०–**अनन्वयालंकार.**
,,	११८	पू० अ०–**चेतनगुणोक्ति.** हात पसरणें ही लोकोक्ति.
,,	११९	पू० अ०–**काव्यार्थापपत्ति** अलंकार आहे.
१७	१२१	उ० अ०–अयोग्य प्रकार बहुमान वाटला, असें वर्णिल्यामुळें **विभावनालंकार.**

पृष्ठ.	पद्य.	टीपा.
१७	१२२	उ० अ०–**काव्यार्थापपत्ति** अलंकार.
,,	१२३	उ० अ०–**उत्प्रेक्षालंकार** आहे.
,,	१२४	उ० अ०–**उत्प्रेक्षालंकार** आहे.
१८	३	उत्तरार्धांत 'सुखविणें' या क्रियेचा कर्ता 'करुणाब्धि' व कर्म 'मय'. कृष्णानें मयाला सुखी करणें योग्य होतें; त्या मानाला मय पात्र होता.—हा उत्तरार्धाचा भाव.
,,	५	उ० अ०–'पाठ देणें' ही **लोकोक्ति.**
१९	७	पू० अ०–'श्रृष्णिनायका' ऐवजीं '**वृ**ष्णिनायका' पाहिजे. **दृष्टान्त.**
,,	१२	संस्कृतांतील 'दृश्' धातूप्रमाणें 'पाहणें' हें क्रियापद 'भेटणें' या अर्थी मुक्तेश्वरांनींही योजिलेलें आढळतें— भगिनितनुज गेले मातुळालागिं पाहों ॥ रामायण–अयोध्याकांड श्लोक १.
१९-२०	१३	पू० अ०–'देवविन' या शब्दाबरोबर अर्जुनाचें भाषण संपतें. उ० अ०–देवाच्या ठिकाणीं 'सेव्यत्व' व 'विनयशालित्व' या दोहोंचेंही एकदम अस्तित्व वर्णिल्यामुळें **विरोधाभास.**
२१	१९	'अयुतमेरुरत्न हेमा' ऐवजीं 'अयुतमेरुरत्नहेमा' असें वाचावें. **प्रतीपालंकार.**
,,	२३	भीमादि श्रीकृष्णास पोहोंचवून मागें परतले, तरी त्यांचीं मनें शरीररूपी आधाराशिवायच कृष्णाजवळच राहिलीं, परतलीं नाहींत, असें वर्णिल्यामुळें '**विशेष**'अलंकार झाला.
२२	२४	उ० अ०–**उत्प्रेक्षा** व **परंपरितरूपक** यांचा संकर.
,,	२८	उ० अ०–**रूपकालंकार.**
,,	३०	उ० अ०–'कां गमला.' ऐवजीं 'कां गमला?' असें वाचावें.
,,	३१	पूर्वार्धांत सामान्य सिद्धांत दिला असून, उत्तरार्धांत विशेष गोष्टीचा उल्लेख आहे, ह्मणून **अर्थान्तरन्यास.**
२३	३३	उ० अ०–**मिथ्याध्यवसिति** व सर्व गीतींत **अर्थांतरन्यास.**
,,	३५	या गीतींत **आद्ययमक** आहे. **अप्रस्तुतप्रशंसा.**
,,	३६	पू० अ०–**चेतनगुणोक्ति.**
२४	३८	उ० अ०–'साधू' ऐवजीं 'साधूं' वाचावें. **व्यतिरेक** अलंकार येथें ध्वनित केला आहे.
,,	३९	उ० अ०–**रूपकालंकार.**

पृष्ठ.	पद्य.	टीपा.
२५	४८	'गमला' यापुढें प्रश्नचिन्ह पाहिजे.
२६	५२	**दृष्टांतालंकार**–चाखविलें:–चष् (खाणें)–चख्–चाखणें–चाखवणें (प्रयोजक).
,,	५७	मागावें:–मार्ग् (याचना करणें)–माग्ग–मागणें.
,,	५९	उ० अ०–**उत्प्रेक्षालंकार** आहे.
२७	६२	पू० अ०–**उत्प्रेक्षालंकार.**
,,	६३	मांग:–मातंग=माअंग=मांग. उ० अ०–**उत्प्रेक्षा.**
,,	६६	कोण:–कोऽन्य:=कोन=कोण. उ० अ०–'सोसील' ऐवजीं 'सोसील ?' मानावें.
,,	६७	उ० अ०–'कोपें' ऐवजीं 'कोपें[१°]' वाचावें.
,,	६८	आपुलें:–आप्त=आप्प=आप=आपलें=आपुलें. 'ला–ली–लें' हा प्रत्यय स्वार्थी आहे.
२७-२८	६९	**विषम.**
२८	७०	सर्व गीतींत **अर्थांतरन्यास** आहे.
,,	७१	**अर्थांतरन्यासालंकार** आहे.
,,	७५	पू० अ०–**रूपकालंकार** व उ० अ०–'सुतप' हें कारण असतां, 'भाव समजणें' हें कार्य झालें नाहीं असें वर्णिल्यामुळें **विशेषोक्ति.**
,,	७६	पू० अ०–येथें 'दिव्य पट' ह्मणजे उत्तंकाचें उज्वळ यश समजावें.
२९	७८	सर्व गीतींत **अर्थांतरन्यासालंकार.** वांटावा:–वंट् (विभाग करणें)–वाँट्–वांटणें.
,,	८०	उ० अ०–**व्यतिरेकालंकार.**
,,	३	पू० अ०–**रूपकालंकार.**
३०	६	सर्व गीतींत **अर्थांतरन्यासालंकार.**
,,	७	पू० अ०–प्रथम पाद व द्वितीय पाद यांत **दामयमक** आहे. निबर:-निर्भर (पुष्कळ)–निब्बर–निबर.
,,	८	उ० अ०–**रूपक** व **उपमा** हे अलंकार आहेत.
३१	११	पू० अ०–**विरोधालंकार.**
,,	१३	उ० अ०–'काय राखणें' ही **लोकोक्ति.**
,,	१४	**अर्थांतरन्यासालंकार.**
,,	१६	पू० अ०–**व्यतिरेक.** उ० अ० **परंपरितरूपक.**
३२	१८	उ० अ०–**निदर्शनालंकार.**

पृष्ठ.	पद्य.	टीपा.
३२	२३	**अर्थांतरन्यास.**
,,	२४	**प्रतीप.**
३३	२५	**विशेषोक्ति.**
,,	३२	**अर्थांतरन्यासालंकार.**
३४	३४	**अर्थांतरन्यासालंकार.**
३५	४३	पू० अ०–'होतीं' ऐवजीं 'होती' असें वाचावें. होती=होतात.
,,	४८	उत्तंक व कविसमूह डोलण्याचें कारण हें, कीं सौदासानें आपल्या अभिज्ञानाची जी फोड केली, ती त्यांच्या मनाला चांगली पटते.
३६	४९	उ० अ०–**चेतन**गुणोक्ति. 'गळां पडणें' ही **लोकोक्ति.**
,,	५५	**अर्थांतरन्यासालंकार.**
३७	६०।६१	**अर्थांतरन्यासालंकार.**
३८	६६।६९	**अर्थांतरन्यासालंकार.**
३९	७३	पू० अ०–दंडें=काष्ठानें.
,,	७५	उ० अ०–**विकल्प.**
४०	८३	'कृष्णासितवालधिमंडिता' हा पाठ व यावरील टीप सर्वसंग्रहाप्रमाणेंच दिलेली आहे. परंतु खरा पाठ असा असावा.—'कृष्णा सितवालधिमंडिता'=जो काळा आहे व ज्याची शेपटी पांढरी आहे अशा (तुरगा).
४१	८९	**अतिशयोक्ति.**
,,	९३	उ० अ०–**काव्यलिंग.**
४२	९६	**काव्यलिंग.**
,,	९	पू० अ०–**समुच्चयालंकार.**
,,	१०	उ० अ०–**अप्रस्तुतप्रशंसा.** विचारसादृश्यः–अर्थ अपरिहार्यचि जो झाला, गेला; वृथाच हा शोक; । शोक सफल जरि असता, मेल्याला उठविते न का लोक ? ॥ मोरोपंती स्त्रीपर्व.
,,	११	पू० अ०–**परिसंख्या.**
४४	१२	उ० अ०–**प्रतीप.**
,,	१९	पू० अ०–'तद्विगुण' ऐवजीं 'तद्द्विगुण' असें लिहिण्याचा परिपाठ अधिक शुद्ध आहे.
४६	२९	भाचा.–बहिणीचा=भेणचा=भेंचा=भांचा=भाचा.
४७	३३	उ० अ०–**मिथ्याध्यवसिति**; कारण प्रस्तुत अर्थाचें अशक्यत्व दाखविण्यासाठीं, अशक्य अशा अन्य अर्थाची संभावना केली आहे.

पृष्ठ.	पद्य.	टीपा.
४७	३४	उ० अ०–'दया लोभाचा' ऐवजीं 'दयालोभाचा' असें दुरुस्त करावें.
,,	३६	उ० अ०–पिता व माता यांपेक्षां प्रभूचें आधिक्य वर्णिल्यामुळें **व्यतिरेकालंकार.** आत.–आप्ता-आत्ता-आत्ता-आत (बापाची बहीण).
४८	४२	पू० अ०–**समुच्चयालंकार.**
,,	४४	**दृष्टांतालंकार.**
,,	४६	उ० अ०–'आ पसरणें' ही **लोकोक्ति.**
,,	४९	मामाजी.–मामक+आर्य=मामअ+अज्ज=मामाजी=मामंजी.
४९	५०	उ० अ०–**उत्प्रेक्षालंकार.**
,,	५१	उ० अ०–**रूपकालंकार.**
,,	५३	उ० अ०–येथें प्रस्तुत जें 'मूल,' त्यावर अप्रस्तुत 'रत्नां'चा पगडा इतका बसला आहे, कीं त्याचा उल्लेखही अप्रस्तुताच्या नांवानें करण्यांत येत आहे, ह्मणून ही **रूपकातिशयोक्ति.**
,,	५४	**विषमालंकार.**
५०	५७	उ० अ०–**चेतनगुणोक्ति** व **श्लेष.**
,,	६१	आजी.–आर्यक=अज्जअ=आजा; (स्त्रीलिंगी रूप) आजी.
५२	७४	पू० अ०–'वचनामृत सेक' ऐवजीं 'वचनामृतसेक' असें वाचावें.
५३	८१	उ० अ०–**मालोपमा.**
,,	८५	उ० अ०–**व्यतिरेकालंकार.**
,,	८६	दोन्ही अर्धांत **उत्प्रेक्षालंकार.**
५४	८८	उ० अ०–**स्मरणालंकार.**
,,	८९	पू० अ०–**परंपरितरूपकालंकार.**
,,	९१	उ०अ०–**समासोक्ति.**
५५	९७	**दृष्टांतालंकार.**
५६	१०३	उ० अ०–**परंपरितरूपकालंकार.**
५७	६	सार्थक=हितकर, इष्ट.
,,	७	या गीतींत 'धृतवर्म्याला' असा शब्द लिहिला आहे. त्यावर आक्षेप घेऊन, एक मित्र विचारतात कीं, "मराठींत आकारान्त पुलिंगी विशेष किंवा शरीरसंबंधदर्शक नामांस विभक्तिप्रत्यय लागला असतां, मूळचें (म्ह० आकारान्त) रूपच कायम राहतें:–रामा–रामास; मामा–मामास; काका–काकास; गोपाळा–गोपाळास. मग 'धृतवर्मास'

पृष्ठ.	पद्य.	टीपा.
		न लिहितां, 'धृतवर्म्यास' असें कां म्हणून लिहावयाचें ? तसेंच उद्धटपणानें बोलावयाचें असतां 'रामास' बद्दल 'राम्यास' 'गोविंदास' बद्दल 'गोविंद्यास' असें म्हणतों. तसेंच अश्वत्थाम्यास, धृतवर्म्यास, असें म्हटलें असतां उद्धटपणा दिसत नाहीं काय?" यास उत्तर:–(१) संस्कृतांत आलेलीं आकारान्त विशेषनामांचीं सामान्यरूपें मोरोपंतांनीं व मोरोपंतांच्या आजपर्यंतच्या प्रकाशकांनीं 'या' हा आगम लावूनच केलेलीं आढळतात. (२) मराठींत जीं विशेषनामें आकारान्तच आहेत–म्हणजे ज्यांचीं अकारान्त रूपें प्रचलित नाहींत–त्यांचीं सामान्यरूपें 'या' हा आगम लावूनच होतात; जसें:–नामा–नाम्याला; तुका–तुक्याला. मुधेश चांगा, जगमित्र नागा, एका, चोखा इत्यादि नांवें या वर्गांतीलच होत. (३) ज्यांचीं अकारान्त रूपें प्रचलित आहेत, अशा आकारान्त विशेषनामांसंबंधें मात्र शंका उद्भवते. या नामांना **'या'** हा आगम विकल्पानें लागतो, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. 'रामा' याचीं 'रामाला' व 'राम्याला' अशीं दुहेरी रूपें प्रचारांत आहेत. (४) शरीरसंबंधदर्शक नामासंबंधेंही एक नियम घालितां येत नाहीं. सासरा, भ्राता, चुलता, पिता इत्यादि कांहीं शब्दांत **'या'** अवश्य येतो, तर 'मामा', 'काका', 'जामाता', इत्यादि शब्दांत तो विकल्पानें योजलेला आढळतो. 'हयहृदय कृष्ण जाणे, त्याहुन तूं द्विगुण जाणसी **माम्या !**' (कर्ण. २१।३६) येथें पंतांनीं **'माम्या !'** शब्द योजिला आहे, पण त्यांत तिरस्काराचा लेशही नाहीं. तेव्हां **'या'** आगमानें युक्त रूपें तिरस्कार हटकून दर्शवितात असें नाहीं. कधीं कधीं तीं वत्सलता दर्शवितात.
५७	८	उ० अ०–**रूपकालंकार.**
,,	१०	'गळुनी' ऐवजीं 'गळुनि' वाचावें.
,,	११	उ० अ०–**उत्प्रेक्षालंकार.** 'रुसोनी' बद्दल 'रुसोनि' वाचावें.
५८	१२	उ० अ०–'रेंच उतरणें' ही **लोकोक्ति.**
,,	१८	उ० अ०–**उत्प्रेक्षालंकार.**
५९	२०	पू० अ०–**व्यतिरेकालंकार**–सबंध गीतींत **अर्थांतरन्यास.** पूर्वार्धांत 'साधुमैत्री' असा सामासिक शब्द घेऊन, त्याचा अर्थ 'साधूंची मैत्री, सज्जनांचा स्नेह', असा केला तरी चालेल.
,,	२६	'भंगीं' म्हणजे 'पराभव झाला असतां', असा अर्थ केला तरी चालेल.
६०	३०	उ० अ०–**रूपकालंकार.**
,,	३५	नातू–नप्तृ=नत्तु=नातु.

पृष्ठ.	पद्य.	टीपा.
६०	३६	उ० अ०—अपकार एकाचे व कोपणें दुसऱ्यावर, असें वर्णिल्यामुळें **असंगति.** पूर्वार्धांत यमकाला जरी 'स्मरो' तील 'रो' अनुस्वारयुक्त नको आहे, तरी सांप्रतच्या चालू लेखनपद्धतीला 'स्मरों' असें सानुस्वार रूप अवश्य आहे.
६०-६१	३७	**अर्थांतरन्यासालंकार.**
६१	३८	**अर्थांतरन्यासालंकार.**
,,	४०	पू० अ०—'सुत' ह्या उपमेयाचा 'वेल' या उपमानाच्या नांवानें उल्लेख केल्यामुळें **रूपकातिशयोक्ति.**
६२	४५	**विभावनालंकार.**
,,	टीप ३	येथें 'चावलेला' ऐवजीं 'च्यवलेला (किंवा चवलेला)' असें वाचावें.
,,	५७	पू० अ०—**परंपरितरूपकालंकार.**
,,	५९	**अर्थांतरन्यास.**
,,	६०	पू० अ०—**असमालंकार.**
,,	६१	**व्यतिरेकालंकार.**
६५	७२-७३	उ० अ०—**उत्प्रेक्षालंकार.**
,,	७४	आगंतुक कारणाच्या योगानें कार्योत्पत्ति लवकर झाली, असें वर्णन येथें आल्यामुळें **समाधि**नामक अलंकार झाला आहे.
६५-६६	७६	**अर्थांतरन्यासालंकार.**
६६	८०	**दृष्टांतालंकार.**
,,	८२	पू० अ०—'शोक नसे, तुज' बद्दल 'शोक नसे तुज,' असें पाहिजे.
६७	८७	**दृष्टांतालंकार.**
६८	९२	**अर्थांतरन्यासालंकार.**
,,	९४	उ० अ०—**संबंधातिशयोक्ति.**
,,	९५	बापा.—वप्‌ (बीं पेरणारा)=वप्प=वप्प=बाप. हा शब्द आर्यलोकांच्या शेतकरी पेश्याच्या काळांतील (pastoral period) असला पाहिजे, हें उघड आहे.
,,	९९	उ० अ०—**व्यतिरेकालंकार.**
७१	१२२	**अर्थांतरन्यासालंकार.** उ० अ०—**परिसंख्या.**
,,	१२४	पू० अ०—**अश्वधाटीयमक.**
,,	१२६	**व्यतिरेक.**
७२	१२७	उ० अ०—'पदर पसरणें' ही **लोकोक्ति.**

पृष्ठ.	पद्य.	टीपा.
७२	१३२	पू० अ०–'निरोपे' ऐवजीं 'निरोपे[१२]' समजावें. येथें 'मातांसह' या शब्दानें असें सुचविलें आहे कीं चंद्रांगदा, उलूपी व बभ्रुवाहन या तिघांनींही अर्जुनाला पूजादिक उपचारांनीं गौरवून, त्यास अश्वसंरक्षणार्थ जाण्याला निरोप दिला. उ० अ०—**विभावनालंकार.**
७३	१३६	मता=मान्या, पूज्या.
,,	१३८	हल्लींचे सिंध प्रांत व कंदाहार हेच पुरातन गांधारदेश होत, असें कांहींचें मत आहे. गांधार देशाची राजधानी पुष्पपुर नांवाची होती. हेंच सांप्रतचें पेशावर होय, असें ह्मणतात.
७४	१४४	उ० अ०–**परंपरित रूपक.**
,,	१४५	'अजातरिपुत्व' हें 'सर्वत्रसमतेचें' कारण असल्यामुळें **काव्यलिंग.**
,,	१	'प्रभुला' ऐवजीं 'प्रभुला' पाहिजे. प्रभुला=धर्मराजाला. शरणागति=दांतीं तृण धरून येणें; नम्र होऊन कृपा भाकणें. विचार चालूं देणें=गमजा चालू देणें, दुरदूर करूं देणें.
७५	५	पू० अ०–**उत्प्रेक्षा.** उ० अ०–टीपेंतील अन्वयांत दूरान्वय आहे. पुढील अन्वय अगदीं सरळ आहे:—'जैसे इतरांचे, तसा हा यज्ञवाट न' [असें] ज्ञाते म्हणोत.
,,	६	उ० अ०–**अतिशयोक्ति.**
,,	७	**द्मयमक** व **अर्थान्तरन्यास.**
,,	८	आरंभींचें अवतरणचिन्ह गाळावें.
७६	१४	उ० अ०–**व्यतिरेक.**
७७	१९	उ० अ०–**रूपक.**
,,	२१	उ० अ०–'हा?' बद्दल 'हा!' पाहिजे.
७८	२८	**अतिशयोक्ति.**
,,	३१	**यथासंख्यालंकार,** कारण 'विश्रामदा' व 'विलापार्था' हीं विशेषणें अनुक्रमानें 'सुहृदा' व 'अहिता' या नामांशीं घ्यावयाचीं आहेत.
७९	३३	आजी.–आर्यक=अज्जअ=आजा–(स्त्रीलिंग) आजी. आजीं.—अद्य=अज्य=अज्ज=आज–(सप्तम्यंत रूप) आजीं. या सप्तम्यंत पदांतील अनुस्वाराचा लोप करण्याचीही वहिवाट आहे: जसें—वर, वरीं, वरी; पास, पाशीं, पाशी; लाग, लागीं, लागी; अभ्यंतर, भीतर, भीतरीं, भीतरी; मध्य, माज, माजीं, माजी; दूर, दुरीं दुरी.
,,	३४, ३६ व ३७	**अर्थान्तरन्यास.**

पृष्ठ.	पद्य.	टीपा.
८०	४१	**श्लेषमूलक व्यतिरेक.** या गीतीचा पूर्वार्ध पुढीलप्रमाणें लिहिला असतां अर्थबोध लवकर होईल असें एक मित्र सुचवितात:—देतां घेतां, निरुपम धर्म प्रभु न, रवि सुकवि तोय जन.
,,	४२	**दृष्टान्त.**
८१	४७	**विभावना.**
,,	४९	पू० अ०-**अतिशयोक्ति.**
,,	५०	**अर्थान्तरन्यास.**
,,	५२	'शतमख' हें नाम हेतुगर्भ आहे, ह्मणून **परिकराङ्कुर.**
,,	५३	उत्तरार्धांतील क्रियेला कारणभूत असे अनेक गुण पूर्वार्धांत असल्यामुळें **काव्यलिंग** व **समुच्चय.**
,,	५४	**अर्थान्तरन्यास.** या गीतींत थोडा **विनोदा**चाही छटा आहे.
८२	५५	'भूमुख्या' असा एक शब्द घेऊन तो दक्षिणेचें विशेषण मानला तरी चालेल. उ० अ०-'हर्षयशें' बद्दल 'हर्ष यशें' पाहिजे.
,,	५९	**अर्थान्तरन्यास.**
८३	६५	**दामयमक.**
,,	६६	**अर्थान्तरन्यास.**
८४	७२।७४	**उत्प्रेक्षा.**
,,	७५	ही गीति **विनोदा**त्मक आहे. **स्वभावोक्ति.**
,,	७६	**परिसंख्या.**
८५	७७	'बोळ' ही औषधी जशी लहान मुलांना घालतात, तशी ती दूध सुटावें ह्मणून बाळंतिणीलाही देण्यांत येते. येथें 'बोळाच्या' या दुहेरी उपयोगावर कवीचें लक्ष्य आहे.
,,	७९	**अर्थान्तरन्यास.** उ०अ०-**व्यतिरेक.**
,,	८०	**परिसंख्या.**
,,	८३	'भाटाचा गुण घेत झाले' ही **निदर्शना** आहे. उ० अ०-**उत्प्रेक्षा** व **प्रतीप.**
८६	८५	**काव्यार्थापत्ति.**
,,	८६	'जिव्हा' व 'हस्त' यांचा संबंध अनुक्रमें 'स्तवनीं' व 'समर्चनीं' यांकडे असल्यामुळें **यथासंख्यालंकार** झाला आहे.
,,	२	उ० अ०-**उत्प्रेक्षा.**

पृष्ठ.	पद्य.	टीपा.
८७	३	**अर्थान्तरन्यास.**
,,	६	**दृष्टान्त.**
,,	७	उ० अ०–**स्वभावोक्ति.**
,,	८	'कुडव' हें एक आठ पायलींचें माप असून, तें नागपुराकडे चालू आहे—असें एक मित्र कळवितात. परंतु प्रस्तुत पर्वातील 'कुडव' हें माप इतकें मोठें असणें शक्य नाहीं. कारण, कपोतवृत्तीच्या कुटुंबांतील प्रत्येक माणसाच्या वांट्यास आलेला 'कुडव' जर आठ पायलींचा असता, तर तो काळ दुकाळाचा न ह्मणतां, सुकाळाचा ह्मणावा लागेल!
,,	९	'आपल्याजवळ धान्य आहे व हा बुभुक्षित ब्राह्मण आला आहे; तेव्हां आपल्यास यास संतुष्ट करितां येईल.' असा उदार विचार मनांत येऊन, कपोतवृत्ति व त्याचें कुटुंब, हीं आनंदानें रोमांचित झालीं.
८८	१०	उ० अ०–**विरोधाभास.**
८९	१६	**अर्थान्तरन्यास.** या गीतीवरील–टीपांवर आक्षेप घेऊन एक हितचिंतक विचारतात कीं, ''नवि नवि' हें श्रीचें विशेषण व 'लक्षि' हें क्रियापद, ही जुळणी व्याकरणास धरून आहे काय? यावर आमचें उत्तर इतकेंच आहे कीं, ही जुळणी मोरोपंती वहिवाटीस धरून आहे. 'असा', 'तसा', 'जुना', 'नवा', इत्यादि विशेषणांचीं स्त्रीलिंगी रूपें पंत दीर्घस्वरांत तशीं ऱ्हस्वस्वरांतही योजितात. त्याप्रमाणेंच क्रियापदांना लाविलेल्या प्रत्ययांतील अंत्य 'ई' व 'उ', तसेंच अंत्याक्षरापूर्वील 'इ' व 'उ' पंत सोईप्रमाणें ऱ्हस्व किंवा दीर्घ लिहितात. वरील हितचिंतक या गीतीचा पुढील पाठ व अर्थ सुचवितात–संतीं **श्रीसुरतरुचें नविन विलक्षि** प्रसून हित याची । **मम** सकु या इ० ॥ अन्वय:–श्रीसुरतरुचें नविन विलक्षि प्रसून, हित याची, तयाची सूनहि, 'संतीं मम सक्तु या'–ह्मणुनि क्षिप्र कां न विनविल ? येथें 'श्री' हा केवळ शोभादायक शब्द. विलक्षि=विलक्षण. प्रसून=फूल अशी सून. हितयाची =हित याचणारी, हें सुनेचें विशेषण. या सूचनेवर आक्षेप इतकेच आहेत कीं,–शुद्ध शब्द 'नवीन' आहे. मोरोपंत 'नविन' लिहीत नाहींत. 'विलक्षि' व 'हित याची' यांचे येथें सुचविलेले अर्थ कोशसंमत नाहींत. आणि 'मग' या पाठांतील स्वारस्य 'मम' या पाठांत नाहीं.

पृष्ठ.	पद्य.	टीपा.
,,	१७	पू० अ०–**विभावना.** सबंध गीतींत **अर्थान्तरन्यास.**
,,	१८	अन्वयः–चवघांस चित्तीं बहुनिर्विकार जाणुनि, त्या अतिथि द्विजास त्या सक्तूचे घांस पीयूषाहूनि अधिक चव देती.
,,	२१	या गीतींत यमकांतील **'हो'** शब्द दोन्ही अर्थांत एकाच अर्थी योजिलेला आहे. असा प्रकार मोरोपंती काव्यांत क्वचित् क्वचित् आढळतो. उदाहरणार्थः—पुष्करभयें न पुसती कोणीही आप्त त्या नळाला हो! । हिंडे वनोवनीं तो अन्नावांचूनि बहु गळाला हो! ॥ १०४ ॥ विश्वंभरे! क्षमे! ह्या साध्वीला रक्ष, म्यां निरविली हो! । सर्वसहे! तुजपुढें न स्वाधिकता इणें मिरविली हो! ॥ १२० ॥ (मोरोपंती वनपर्व अ० ४).
९०	२६	पू० अ०–**परं० रूपक.**
९१	३४-३६	**अर्थान्तरन्यास.**
,,	३७	'तम' व 'मित्र' हे शब्द येथें **श्लेषयुक्त** भासतात.
,,	४०	**अर्थान्तरन्यास.** 'येतें भोगास तेंचि, जें सुप्त'=you reap as you sow.
९२	४४-४५	**दृष्टान्त.**

२ मोरोपंती अश्वमेधपर्वांतील सुभाषितांचें परिशिष्ट.

१ **रसिकें** तैल न खावें, मिळतां नव विपुल धेनुचें आज्य. ॥ १–१६
२ सासू करी उपेक्षा, त्यागीना स्वविनयासि परि **सून.** ॥ १–१८
३ जा, मुग्धा! दुग्धातें सोडुनि, सेवील कोण तक्रातें? ॥ १–२०
४ **साधु**विना साधुपरिज्ञानीं न चलेचि धीबळविलास. ॥ १–३७
५ असुपोतीं चढुनि, पडुनि परमव्यसनीं, म्हणेचि 'हाय' जन. ॥ १–४२
६ कार्य नव्हे, परिपाकीं म्हणविल जें **कर्म** 'हा', नयज्ञा! तें. ॥ १–४३
७ स्वीकारील कसा त्या? टाकी निवडूनि हंस तोया ज्या. ॥ १–४५
८ जसि जसि समृद्धि अहितीं, तसि तसि चिंतारुजा मनीं वाढे; ।
अमृतरसहि न शके, मग तच्छमनीं काय बापुडे काढे? ॥ १–६८
९ बहु सत्कृतिनें न, जसा कार्याच्या सिद्धिनें निवे **दूत.** ॥ १–७२
१० **रसिकपरीक्षें**त जसें सरसत्वें घृत, तसें न तेल टिके. ॥ १–९२
११ शिवशिव! **मित्रद्रोह** ब्रह्मवधसमान हें तुला कळतें. ॥ १–९८
१२ वारिदपंक्ति जसें जळ, **सज्जनसंगति** तसेंच सुख विखरी. ।
मातेपरिस शतगुणें सच्छरणागति जनास सुखवि खरी. ॥ १–११०
१३ योग्यायोग्य असें न प्रभुपादांगुष्ठभवनदी पाहे. ॥ १–११५
१४ जलदानें जलदानें पुनरपि भरिजे न काय कासार? ॥ २–७
१५ **उपदेशासि** मति, जसी गीतासि मृगी, तसीच वेधावी. ॥ २–९
१६ कृष्ण म्हणे, 'सांगाया आप्तजन, करुनि अनर्थशम, हर्षे.' ॥ २–३१
१७ कीं **सन्मन** तरि भूताभ्युदय, जरि ह्मणेल कच नको पातें. ॥ २–३३
१८ नायक त्याला हितकर आप्त **ज्ञाता** बळेंचि आयर्कवी, ।
नायक विख्यात नयें वर्तविति; उपेक्षितात काय कवी? ॥ २–३५
१९ जो **प्रभु अरक्षक** तया, घेऊनि सुतप सहाय शापावें. ॥ २–३६
२० **कोपवश** पुरुष निजतप शापुनि वेंची; न **कोप** हा साधू. ॥ २–३८
२१ हरिला सकेसरा तनु होय समुचिता, गजा सदानरसा. ॥ २–४४
२२ दुर्योधनादि मेले, धर्म त्यागुनि, करूनि अन्याया; ।
पांडव विजयी झाले, यांच्या येती न रीति अन्या या. ॥ २–४७
२३ **क्षणसंगें सुपरिमलद्रव्याच्या** धरिति परिमला देहें; ।
विख्यात चंदनाचा, संगिनगा स्वगुण परि; [मला दे हें.] ॥ २–५१
२४ अमृत अनादरुनि, तृषित बुद्धिभ्रमखेद कोण सोसील? ॥ २–६६
२५ भलत्याचि **संशयानें** प्रेमाचा भंग [भार्गवा!] होतो. ॥ २–७१
२६ जो वांटुनि भक्षावा, तो सुज्ञजनास सुख गमे घास. ॥ २–७८

२७ **खेदें** विवेक, जेविं कुसंगें सज्जनसमाज, टाकविला. ॥ ३-६

२८ **सादरभजनें** घडतो, सर्वार्थांउपरि तो खरा होतो, ।
मेरुवितरणेंहि तसा गुरुसि नव्हे सुपरितोख, राहो तो. ॥ ३-१४

२९ किंबहुना कुळजें त्वां संपादावें, असेल जें शुचि, तें. ॥ ३-३१

३० अर्थ्याधि नुरे **प्रभुच्या लपितें**, हरिच्या जसा करी नखरें. ॥ ३-३२

३१ केलें स्वयें **सुपात्रीं** स्वधनाचें **दान**, होय तें शिवद. ॥ ३-३४

३२ **ब्राह्मण** हे गति सर्व क्षत्राची, सर्वथा नसे दुसरी; ।
ब्राह्मणसेवा नसतां, सकळाही निष्फळा कळाकुसरी. ॥ ३-५१
या लोकीं परलोकीं आधार क्षत्रियासि **विप्र**; भया ।
अभया द्याया प्रभु हे, सप्रभ कीं करिति निपट विप्रभ या. ॥ ३-५२

३३ बा! लाविल येतां श्रीकीर्ति कवण जन कवाड वाराया? ॥ ३-५५

३४ माझा बहु सत्यांतचि, न गणुनि हा काय, भर वसायाचा; ।
क्षणभंगुर बुद्बुदसम समजें; बा! काय भरवसा याचा? ॥ ३-५६

३५ 'वाक्संयत विप्र' असें धर्माचें तत्त्व जाणते ह्मणती, ।
मित्रीं विषम, तयाची करिती विस्पष्ट तस्करीं गणती. ॥ ३-६०

३६ **मित्रकृत बोध** मित्रां हर्षद, रवि जेविं सारसां गमला. ॥ ३-६१

३७ दुर्घटहि कार्य घडवी सुसमर्थ **गुरुप्रसाद** हा मंत्री. ॥ ३-६६

३८ **विधि** रक्षिना जया, त्या कोण कुशळ करिल वस्तुला जतन? ॥ ३-६९

३९ शोकीं बुडो अवीरा, पति किंवा जीस शुचि तनय नाहीं. ॥ ४-११

४० जोडूं सुकीर्ति, सोडूं बा! न तुला त्वत्कृता प्रतिज्ञा ते. ॥ ४-३०

४१ लागेचि, लता सहजा जी चंदनकाननांत, वास तितें. ॥ ४-४४

४२ त्यजुनि सुधेतें, पीतो सुत, कीं प्याला स्वतात कांजीतें. ॥ ४-५६

४३ **प्रभु** तेविं जना सुखकर, विधु कुमुदां जेविं, अर्क राजीवां. ॥ ४-८१

४४ भूताधिपें करावें, तें कैसें करिल, जरि गुणी, भूत? ॥ ४-९७

४५ बा! **सन्मन** अरिच्याही पाहुनि दुःखित मुलास कळकळतें. ॥ ५-३८

४६ वद, रे! रुचे यशस्कर? कीं अयशस्करहि आयु धन्यास? ॥ ५-४९

४७ मोहसमुद्रामाजि न बुडविल **साध्वीस** घात कां पतिचा? ॥ ५-७६

४८ रोषींहि विषफलांचा वद अमृतलतेसि काय घड लागे? ॥ ५-८०

४९ सेक नसेल, तरि नसो; परि सुनद व्रततिच्या सविध वाहो. ॥ ५-८७

५० येईल **सतीच्छेनें** स्पष्ट ब्रह्मांडभाव तन्मणिकीं. ॥ ५-९२

५१ **सुगतिगुणें** पुत्रातें बहु मानिति कवि, न गगनयानातें. ॥ ५-१२२

५२ **सन्मैत्रीतें** विटविल कोण? मता श्रीपरीस देवा जी. ॥ ५-१३६

५३ 'जेथें **आकृति** तेथें वसति सुगुण', म्हणति कवि वृथा काय? ६-३४

५४ जी **सुमति,** 'सुरी' तीतें म्हणति सुकवि, **कुमति** जी, 'सुरी' तीतें. ॥ ६-३७

५५ देती, तें सार करुनि जें निपट असार, **विप्र** भव्यास. ॥ ६–५
५६ **विप्रासि धनचि** जैसें हेमंतीं दुर्गतासि गोड उन. ॥ ६–५
५७ उघडील जी कपाट स्वर्गांचें ती जिवीं धरावि **किली.** ॥ ६–५
५८ करुनि, **गुरूक्त** वरावें, रोमांचित सर्व साधुदेहातें. ॥ ६–६
५९ बहु हितकर **भूतादर** सन्मतितें, जेविं बोळवीतीतें. ॥ ६–७
६० पुरवी मनोरथातें **गुरुभक्ति**तसी न निर्जरव्रतती. ॥ ६–७
६१ स्तवनीं समर्चनीं जरि जिव्हाहस्तें चुका, परि समोर ।
नाचा प्रभुच्या, म्हणती गुरु कीं, 'बहुमत शुकापरिस मोर.' ॥ ६–८
६२ ब्रह्मांडाहूनि अधिक **पात्रीं देणार** तोय समयज्ञ. ॥ ७–
६३ वर्णिल कां उटजाला मणिकनकखचितमहानिकायज्ञ? ॥ ७–
६४ संतीं, श्री सुरतरुचें नवि नवि लक्षि प्रसून, हित याची. ॥ ७–१
६५ **ज्ञात्या**ला ताप वसे अन्य शरीरांत परि सकळ कळतो. ॥ ७–१
६६ कोपाच्या उकळीला जिरवील जसा न दक्ष माशीला. ॥ ७–३
६७ आर्तांच्या कां देइल **धर्मज्ञ** न हाक **विप्र** सादास? ॥ ७–३
६८ मणि आकरीं, प्रभुविना स्नेहासि धरूनि न वसले खनकीं. ॥ ७–४

KÂVYASANGRAHA. 58.

THE MAHÂBHÂRATA

OF

MOROPANT,

THE GREAT POET OF THE MAHÂRÂSHTRA.

15. AS'RAMAVÂSIKAPARVA.

EDITED WITH

CRITICAL AND EXPLANATORY NOTES,

BY

BÂLKRISHṆA ANANT BHIDE, B. A.

AND

DATTÂTRAYA KESHAV JOSHÎ.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRṆAYA-SÂGARA" PRESS,

Bombay.

1907.

Price 8 Annas.

काव्यसंग्रह. ५८.

महाराष्ट्रकविवर्यमोरोपंतकृत

महाभारत.

रोमांचित तनु होते पुनःपुन्हा मधुनि वाचितां कवन, ।
करिशि तयाचें, वाटे, निर्दाळुनि दुरित दुष्टमत, अवन. ॥

—वा. सी. गुर्जर.

१५. आश्रमवासिकपर्व.

हें

बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.
व
दत्तात्रय केशव जोशी,

यांनीं

अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन, अनेक हस्तलिखित प्रतींच्या आधारें तयार केलें.

तें

मुंबईत जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१९०७.

किंमत ८ आणे.

गुरुदेवभावभावित, गंभीर, प्रौढ, शुद्ध, वाग्वृत्ती ।
ज्याची मानस हरिते, **धर्म** नृपतिची जणों मनोवृत्ती; ॥ १ ॥

आवेशी, प्रभुसेवक, सत्याहत, वीर्यपूर्ण, निःसीम ।
ज्याचा शब्दविलास प्रकट दिसे दोषकाळ जणुं **भीम**; ॥ २ ॥

उचित प्रसंग बघुनी, मार्दव काठिन्य दावुनी नाचे ।
ज्याचें काव्य बुधगणीं, रणांगणीं जणुं धनुष्य **विजयाचें**; ॥ ३ ॥

श्रवणामृतरसजननी, प्रणयखनी, शोभना, मधुरलीला, ।
ज्याची वाणी रुचली दिव्य सखी **वासुदेव**मुरलीला; ॥ ४ ॥

त्या श्री**मयूर**कविच्या कृतिला सादर वरीन मी माथां, ।
तेजोहीन ग्रहही लखलखती भजुनियां प्रभानाथा. ॥ ५ ॥

काव्यसंग्रहकार.

प्रस्तावना.

१. मोरोपंती आर्याभारतापैकीं आश्रमवासिकपर्व आज आम्ही मराठी वाचकांस सादर करीत आहों. हें पंधरावें पर्व होय. भीमाच्या जाचानें, परंतु विशेषतः पुत्रशोकानें व स्वतःच्याच मनाच्या टोंचणीनें, वैतागलेल्या व लौकिकव्यवहारास कंटाळलेल्या वृद्ध धृतराष्ट्रानें सर्वसंगपरित्याग करून वानप्रस्थाश्रम कसा स्वीकारला व त्याचा अखेर गांधारी व कुंती यांच्या सह वनांत वणव्यांत सांपडून कसा अंत झाला, तो कथाभाग या पर्वांत असल्यामुळें, या पर्वाला 'आश्रमवासिक' असें सार्थ अभिधान दिलेलें आहे.

२. मूळ व्यासकृत महाभारतांत या पर्वांत एकंदर ३९ अध्याय आहेत. यांत कोठेंही उपाख्यानांच्या व तात्त्विक विषयांवरील लांबच लांब ऊहापोहाच्या रूपानें विषयान्तर झालेलें नसून, धृतराष्ट्राच्या चरित्रांतील वरील कलमांत निर्दिष्ट केलेला कथाभाग विस्तरशः उतरलेला आहे. या पर्वावरील पंतांची ही सप्ताध्यायात्मक मराठी टीका चांगली विस्तृत आहे, व त्यांनीं मूळांतील कथाभाग कोठेंही वगळलेला नाहीं. पर्वांतील दरोबस्त कथाभाग धृतराष्ट्रपांडवांच्या प्रत्यक्ष जीवनचरित्रांतीलच असल्यामुळें, पंतांनीं या ठिकाणीं आपली संक्षेपाची कातर न चालवितां, विस्तारकलेचा स्वतंत्रतेनें प्रयोग केला आहे.

३. प्रस्तुत पर्वांतील प्रधान रस 'करुण' आहे, व त्याचा पंतांनीं आपल्या सरस वाणीनें उत्तम पोष केलेला आहे. भीमाच्या हेटाळणीनें झालेला धृतराष्ट्राचा मर्मभेद, त्याचें वैराग्य व धर्माबरोबरील त्याचें वनांत जाण्यासंबंधींचें संभाषण, हे पहिल्या अध्यायांतील भाग (गीति २१-७३) फार चांगले उतरले आहेत. तसेंच धृतराष्ट्रानें प्रजाजनांचा निरोप घेतला तेव्हांचा प्रसंग (२।३०–८५), दुर्योधनाच्या श्राद्धासंबंधें भीमाचें तिरस्कारयुक्त भाषण (२।८६–१०६), वनवासासंबंधें कुंती व तिचे मुलगे यांचा संवाद (३।२२–५२), धृतराष्ट्राच्या दर्शनार्थ पांडवांचें वनगमन (४।१–३४), कौरव पांडवांच्या स्त्रियांना घडलेलें मृत आप्तांचें दर्शन (६।१–२२), व धृतराष्ट्रादिकांचा वणव्यांत प्राणनाश झाला हें ऐकून धर्मराजानें केलेला करुण विलाप, हीं स्थलें हृदयंगम काव्याचे अस्सल मासले आहेत.

४. हें पर्व तयार करण्याचे कामीं रा० महादेव केशव जोशी, बी. ए. (धुळें), बाळकृष्ण सीताराम जोशी, (मुरूड–जंजिरा), व इतर कांहीं मित्र, यांनीं जें साहाय्य केलें, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों.

मुरूड–जंजिरा,
२२।३।१९०७.

काव्यसंग्रहकार.

मोरोपंती आश्रमवासिक पर्वाची अनुक्रमणिका.

मोरोपंतकृत महाभारत.

१५. आश्रमवासिकपर्व.

(गीतिवृत्त.)

अध्याय पहिला.

क्षोणीतें[1] प्रतिपाळी धर्म, पुढें करुनि[2] अंध राजास[3], ।
आज्ञा[4] पाळूनि, दिलें वेदत्वचि अब्द[5] पंधरा ज्यास. ॥ १

विदुर वसे निकट[6], गमे बोध प्रारब्ध भोग उरकवितो, ।
शोकाश्रुनें[7] भिजों दे त्या प्रज्ञाचक्षुचें न उर कवि तो. ॥ २

कृप, संजय, वैश्यात्मज जो साधु युयुत्सु[8], हे तिघे राया ।
रक्षकमणिसे[9] रक्षिति, न शकति शोकाग्निहेति[10] घेराया. ॥ ३

---

१. पृथ्वीतें. पंतांनीं आपल्या आर्याभारताच्या प्रत्येक पर्वाचें आद्याक्षर घेऊन ‘श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति’ हा अष्टादशाक्षरी मंत्र साधला आहे. या मंत्रांतील पंधरावें अक्षर ‘क्षो’ असून, तें प्रस्तुतच्या म्हणजे पंधराव्या पर्वाचेंही आद्य अक्षर आहे. २. थोरपणा देऊन; मुख्यस्थान देऊन. ३. धृतराष्ट्रास. ४. जसें वेदवाक्य उल्लंघावयाचें नाहीं, त्याचप्रमाणें धृतराष्ट्राचा शब्द कधींही मोडावयाचा नाहीं, असा धर्मराजाचा संकल्प होता; तेव्हां जशी वेदाज्ञा, तशीच धृतराष्ट्राज्ञा युधिष्ठिरास होती व म्हणूनच त्यानें स्वकृतीनें धृतराष्ट्रास वेदत्व दिलें, असें कवीनें म्हटलें आहे. ५. वर्षें. ६. मनुष्याच्या अंतःकरणांत सुबोध जागता असला, म्हणजे त्याच्या जोरावर मनुष्य आपला प्रारब्धभोग—सुखदुःख वगैरे—धैर्यानें सोसून नाहींसा करून टाकतो, त्याप्रमाणेंच विदुराच्या सान्निध्यानें धृतराष्ट्रानें सर्व सुखदुःखास सहन करून, आपल्या मनाचें समाधान राखलें; म्हणून पंत म्हणतात कीं विदुर हा जणूं काय प्रारब्धभोग उरकवून टाकविणारा मूर्तिमंत सुबोधच होता. उरकविणें=भोगून नाहींसा करविणें, सहनशीलपणानें तोंड देऊन बाकी शून्य करविणें. ७. शाहाण्या विदुरानें बोधाच्या गोष्टी सांगून, धृतराष्ट्रास शोक होऊं दिला नाहीं, असा गीत्यर्थाचा भाव. ८. युयुत्सु हा धृतराष्ट्राचा दासीपुत्र होता. ९ हा मणि हातांत बांधिलेल्यानें अग्निपीडा किंवा शस्त्रबाधा होत नाहीं; म्हणून यास ‘रक्षकमणि’ म्हणतात. १०. शोकाग्निहेति=शोक+अग्नि+हेति=शोकरूपी अग्नि व हत्यारें.

भ्रात्यांसह धर्म सदा वंदुनि विनयें पदासि, आर्यातें,[1] ।
प्रेमें निकटचि बैसुनि, पुसुनि, करी सर्व राजकार्यातें.[2] ॥ ४
गां[3]धारीची होय व्यवहारीं दृक्, पडों न दे गुंती, ।
तीसें[4] गमे स्वच्छाया, स्वच्छा यापरि भजे सदा कुंती. ॥ ५
त्या श्वश्रूश्वशुरांच्या[5] सेवेला द्रौपदी अनलसाच,[6] ।
कीं गुरुजन तापदही श्रेयस्कर[7] सर्वथा अनल[8] साच.[9] ॥ ६
प्रभुंची अनुजाहि[10] जपे श्वश्रूच्या सर्व काळ सेवेला; ।
कीं फळपात्र[11] न व्हे कर, जो सिंचायासि आळसे वेला. ॥ ७
चित्रांगदा, उलूपी, इतराही पांडवस्त्रिया होत्या, ।
धृतराष्ट्राची सेवा करिति, कराया पतिप्रिया[12] हो ! त्या. ॥ ८
सर्वांतें धर्म म्हणे, "पहिली जी, नीट[13] वाट वाहो ती, ।
स्वश्री[14] 'आहेच' असें या रायाला, न वाटवा 'होती'" ॥ ९
सकृप[15] श्रीव्यास प्रभु अनुदिन[16] निकटचि वसे, कथा कथित, ।
व्यथित सुतांसि[17] उपेक्षिल कैसा ? जो दीनवत्सल प्रथित.[18] ॥ १०
सामंतांहीं[19] द्यावें धन, हा व्यवहार जो असे पहिला, ।
विदुरनयें[20] तो चाले, वाटे अंधासि 'शासितों[21] महिला.' ॥ ११

---

१. वडील माणसास; धृतराष्ट्रास. हें 'पुसुनि' ह्याचें कर्म. २. राज्यकारभाराला. ३. सार्थान्वयः—गांधारीची दृक् (दृष्टि) व्यवहारीं (धूरकामांत) होय (होती), [ती] गुंती (अडचण) न पडों दे. ४. अन्वयार्थः—स्वच्छा (पवित्र) कुंती सदा यापरि (ह्याप्रमाणें) भजे (शुश्रूषा करी), [कीं ती कुंती] तीस (गांधारीस) स्वच्छाया गमे (ती कुंती म्हणजे आपलीच सावली आहे असें गांधारीस वाटे). कुंती गांधारीची अशी शुश्रूषा करी, कीं तिजला ती एक क्षणभरही विसंबत नसे. अर्थसादृश्यः—'छायेव तां भूपतिरन्वगच्छत्' रघुवंश, २ रा सर्ग. ५. सासूसासऱ्यांच्या. ६. केवळ निराळशी, सर्वपरी तत्पर. ७. कल्याणकारण. ८. अग्नि. ९. खरोखर. १०. श्रीकृष्णाची धाकटी बहीण, सुभद्रा. ११. फळाला योग्य, फळाचा आस्वाद घेण्यास लायक. "वेलास पाणी घालील, तो फळास चाखील; सासूची सेवा करील, तीच सून श्वश्रूप्रसाद—सासूची कृपा—लाभेल" हा गीतीचा भाव. १२. पतींस आवडणाऱ्या गोष्टीला किंवा पतींच्या हिताला. १३. धडक किंवा सरळ. १४. अन्वयार्थः—स्वश्री (आपलें वैभव) 'आहेच' असें या रायाला वाटवा (भासवा), 'होती' असें न वाटवा. १५. कृपाळु. १६. प्रतिदिवशीं. १७. धृतराष्ट्र व पांडु हे व्यासवीर्यज होते. १८. प्रख्यात. १९. मांडलीक राजांनीं. २०. विदुराच्या धोरणानें. २१. महिला शासितों= पृथ्वीचें राज्य करितों, सार्वभौम आहें.

न वदे धर्म किमपि, जरि बद्धा[1], वध्याहि[2], [3]तो करी मुक्त, ।
कीं गुरुशासनलंघन[4] गुरुहननचि[5], सर्वथा नव्हे युक्त[6]. ॥ १२
सर्व तदुक्त करी, कीं नेंच शोकें नम्रकंधर[7] क्षण[8] [9]हो, ।
साधु अजातारि म्हणे, “वेंचा[10] सर्वस्व, अंधरक्षण [11]हो.” ॥ १३
या धर्ममता एका भीमावांचूनि सर्व अनुसरले, ।
[12]कीं न सरे यशचि, इतर बहु बहुवर्षायु दिव्यतनु सरले. ॥ १४
अंधाच्या दुर्मतिनें त्यां[13] दुर्द्यूतांत[14] वृत्त जें घडलें, ।
[15]तें भीममनीं, वज्रीं वज्रें लिहिलें जसें, तसें जडलें. ॥ १५
अ[16]नराति स्पष्ट म्हणे, “कोणी मागील[17] पाप काढील, ।
त्या होइल फळ[18] त्याचें, जो विष मिसळूनि अन्न वाढील.” ॥ १६
धृ[19]तराष्ट्रतत्सुतां जन न म्हणे, वाहूनि आण[20], वाईट, ।
[21]कीं प्रभु म्हणेल, “धाडुनि लंकेला यासि, आणवा ईट.” ॥ १७

---

१. कैद केलेल्यास. २. देहांत शिक्षेस जो पात्र आहे अशासमुद्धां. ३. धृतराष्ट्र. ४. वडिलांची आज्ञा मोडणें, वडिलांचा हुकूम न मानणें. ५. वडिलांची आज्ञा अमान्य करणें, म्हणजे त्यांचा वध करणेंच होय, असें धर्मशास्त्र म्हणतें. ६. योग्य. ७. नम्र (वांकलेली) आहे कंधरा (मान) ज्याची असा अर्थात् खालीं मान घातलेला. ८. क्षणभर. ९. न व्हावा. १०. खर्च करा. ११. होऊं द्या. १२. सार्थान्वयः—कीं (कारण) यशचि न सरे, इतर (यश वगळून बाकीचे) बहुवर्षायु (दीर्घायु, चिरंजीवी] [व] दिव्यतनु [असे] बहु (कैक) सरले(नाहींसे झाले,मेले.) १३. ‘या’ असा पाठभेद. १४. कपटद्यूतांत, किंवा दुष्टपरिणाम ज्याचा झाला अशा फाशांच्या खेळांत. १५. वज्राच्या कठीण पाटीवर वज्रानेंच लिहिलेलें (वज्रलेख) जसें कधीं नाहींसें व्हावयाचें नाहीं, त्याप्रमाणें भीमाच्या अंतःकरणांत द्यूतांत घडलेल्या गोष्टी अशा बिंबल्या होत्या कीं, त्या तो कधींच विसरेना. १६. धर्मराज. १७. मागील पाप काढणें=उखाळ्या पाखाळ्या काढणें, पूर्वीं घडलेल्या वाईट गोष्टींचा उल्लेख करणें. १८. शिक्षा. विषान्न चारणाऱ्यास जी शिक्षा होते, त्या शिक्षेस तो पात्र होईल, हा या गीत्यर्धाचा भाव. १९. धृतराष्ट्र व त्याचे पुत्र ह्यांस. २०. शपथेवर; प्रतिज्ञापूर्वक. २१. सार्थान्वयः—कीं (कारण) प्रभु (धर्मराज) म्हणेल, यासि (निंदकासि) लंकेला धाडुनि ईट आणवा. ‘लंकेंत सोन्याच्या विटा, पण आणायच्या कोणी ?’ ही म्हण सर्वरूढ आहेच, व तीस अनुलक्षून ही उक्ति आहे. लंका कोठें आहे, हें माहीत नसल्यामुळें किंवा लंका अपरंपार लांबीवर असल्यामुळें, लंकेला जावयास सांगणें ह्मणजे जन्मभर भूपृष्ठावर भटक्या मारण्यास सांगण्यासारखेंच होय. तेव्हां भावार्थ म्हणून एवढाच, कीं धृतराष्ट्राची व त्याच्या मुलांची निंदा करणाऱ्यास प्रभु धर्मराज हद्दपार करील, अशी लोकांना धास्ती वाटत असल्यामुळें, धृतराष्ट्र व त्याचे मुलगे ह्यांची निंदा करावयाची नाहींच, असा प्रजाजनांचा निश्चय होता.

अनुतप्त[1] होय राजा, होतां अनुभूति[2] साधुरीतीची[5]; ।
'गोड सुधा' म्हणत्याला[3] हळहळ[4] लावील माधुरी तीची. ॥ १८
धृतराष्ट्र निवोनि[6] म्हणे, "देती सुख पांच जें, न शंभर तें. ।
खळसंगें, सत्त्यागें[7], केला म्यां स्वपरघात दंभरतें[8]" ॥ १९
निंदी पुत्रातें विषकंदातें तेविं भूप[9] मंदातें; ।
वर्णी बहु धर्मातें, गुण[10] समजुनि, जेविं अमृतकंदातें. ॥ २०
विस्मरण होय जेव्हां आपुलिया दारुणाहि अनयांचें[11], ।
होय स्मरण स्नेहें शतसंख्य सुयोधनादि तनयांचें. ॥ २१
चित्तीं अंध म्हणे, "सुत शत वधितां, लेशही न घोंमेला[12], ।
हा राक्षस भीम न कां, जोडुनि अतिदारुणा, अघा[13] मेला. ॥" २२
भीमहि मनीं म्हणे, "मज न गमे झाली खरी प्रतिज्ञा ती; ।
[14]कीं ते वधिले, न वधुनि म्यां या मुख्या अरीप्रति, ज्ञाती." ॥ २३
द्यूतादि क्लेशांच्या कृष्णेचा प्राणवल्लभ[15] स्मरणीं ।
तापे पहिल्या[16]चितसा, करुनिहि[17] सकलारिमल्लभस्मरणीं. ॥ २४
भीम बहु अप्रकाशें[18] राजाचीं[19] अप्रियें[20] करी रागें, ।
त्याच्या[21] सोसावीं किति तीं दावालिंगनें[22] शरीरागें[23]. ॥ २५

---

१. पश्चात्ताप झालेला असा. २. अनुभव, प्रत्यय. ३. म्हणणाऱ्यास. ४. चुटका लावील. ५. साधुरीतीची. ६. संतोष पावून. ७. सत्+त्यागें=उत्तमांच्या (पांडवांच्या) अव्हेरानें. ८. गर्वोद्धतानें किंवा कपटपटूनें. ९. धृतराष्ट्र. १०. धर्मांचे गुण लक्षांत घेऊन. ११. दुर्वर्तनांचें. १२. कंटाळला. १३. पातकाला. १४. सार्थान्वयः—कीं (कारण), या मुख्या अरीप्रति (धृतराष्ट्राला) न वधुनि, म्यां ते ज्ञाती (बंधुवर्ग) वधिले. १५. 'कृष्णेचा प्राणवल्लभ' हें पद घालून पंतांनीं मोठ्या खुबीनें महाभारतांतील पांडवांवरील व द्रौपदीवरील संकटाच्या दिवसाचें स्मरण वाचकांस दिलें आहे, त्याचप्रमाणें 'कृष्णेचा' हेंही पद मोठ्या बहारीचें आहे. अर्जुनादि कांहीं पराक्रमानें कमी होते असें नाहींच; तरी पण वस्त्रहरणाच्या वेळीं कृष्णेची दृष्टि विशेषतः भीमाकडे वळली; तसेंच अज्ञातवासांत असतां विराटाचे घरीं कीचकाच्या वांकड्या नजरेंतून मुक्त करण्याबद्दलही तिनें भीमसेनाचीच प्रार्थना केली होती; ह्यावरून 'कृष्णेचा प्राणवल्लभ' हें पद भीमसेनास सार्थ व योग्य आहे असें कोण सहृदय वाचक म्हणणार नाहीं? १६. अगदीं पूर्वीइतकाच. १७. शत्रूंकडील सर्व वीरांना खाक करूनही; सर्व शत्रूंचें रणांगणीं चंदन उडविलें असतांही. १८. गुप्तपणें. १९. धृतराष्ट्राचीं. २०. न रुचणाऱ्या गोष्टी, खोड्या. २१. धृतराष्ट्राच्या. २२. दाव+आलिंगनें=वणव्याचीं आलिंगनें, वणव्याच्या मिठ्या. २३. शरीर+अगें=शरीररूप वृक्षानें.

अंधाच्या आज्ञेचा [१]परभारां भंग भीम तो करवी, ।
[२]ऐकेवि असें वच, म्हणे ज्याहुनि न स्वीय भीम तोक रवी. ॥ २६
[३]भुजशब्द, भुजपराक्रम, [४]भुजभुजगाकार, परिसवि [५]तयाला; ।
[६]अहिस भय गरुड दे, तो बहु अरिच्या त्याहिपरिस वितयाला. ॥ २७
“उपमेला [७]दिक्करिकर न [८]सरे, भुजग न सरे, [९]परिघ न सरे; ।
भुजहो ! अतुल तुम्हीं; बहु [१०]शरधारा वर्षतो, परि घन [११]सरे. ॥ २८
[१२]जे राज्येंहि न, केले ते, देवुनि तोयदान, वश तातें; ।
[१३]कीं **इंद्रोपेंद्रबळें** बहु **विवरहि** होय दानवशतातें. ॥ २९
होइन चंदन[१४]मुद्राकटकांगदभूषणें न [१५]उतराई, ।
भुजहो! केला, गिरि जो होता, हा निपट **पांडसुत** [१६]राई. ॥ ३०
[१७]गिळिल्या तमा न गिळवे, तेजस्वी म्हणति, परि, [१८]सवितयास; ।

---

१. परस्पर, कोणासही कळूं न देतां. २. सार्थान्वयः—रवि स्वीय तोक (आपलें मूल—वक्र दृष्टीचा शनि किंवा यमधर्म) ज्याहून भीम (उग्र) न म्हणे, असें वच (भाषण, शब्द) ऐकवि (धृतराष्ट्राच्या कानावर जाई, असें भीम करिता झाला). ३. दंड थोपटण्याचा आवाज. ४. [आपल्या] हातांचा सर्पासारखा आकार. ५. त्याला, धृतराष्ट्राला. ६. सार्थान्वयः—गरुड अहिस (सर्पास) भय दे (भीति उत्पन्न करितो), त्याहिपरिस (त्या भयापेक्षांही) बहु [भय] तो (भीम) अरिच्या (दुर्योधनादिकांच्या) वितयाला (विणाऱ्यास अर्थात् पित्यास म्हणजे धृतराष्ट्रास) दे. ७. दिक्+करि+कर= दिग्गजाची सोंड. गीति २८–३१ यांत भीमानें आपल्या प्रचंड भुजदंडांस उद्देशून काढलेले उद्गार आहेत. ८. पुढें न येई. ९. लोहदंड, अर्गला. १०. शर [१] (पुलिंगी) बाण; (नपुंसकलिंगी) पाणी. ११. संपतो. १२. सार्थान्वयः=[हे भुजहो !] जे (दुर्योधनादि) शतपुत्र [धृतराष्ट्रें] राज्येंहि (राज्यसत्ता अर्पूनही) वश न केले (आपल्या स्वाधीन=आटोक्यांत—ठेविले नव्हते; शांत व तृप्त केले नव्हते), ते [आपले पुत्र] तातें(धृतराष्ट्रानें)तोयदान देवुनि(तिलाञ्जलि अर्पण करून)[आज] [तुमच्या दोघांच्या जोरावर] वश केले (शांत केले, तृप्त केले). सर्वसंग्रहपाठः—जें राज्येंहि न केलें तें देवुनि तोयदान वश तातें. १३. अन्वयार्थः—कीं (कारण) इंद्रोपेन्द्रबळें (इंद्र आणि विष्णु ह्यांच्या पाठबळानें) विवरहि (पक्षिपतिही, गरुडासारखें पाखरूंसुद्धां) दानवशतातें (शेकडों राक्षसांना) बहु (भारी, न आटोपणारा, जबरदस्त) होय (झाला). या गीतींत, धृतराष्ट्राचें पुत्रशत व दानवशत, धृतराष्ट्र व विवर, आणि भीमाचे भुजदंड व इंद्रोपेंद्र यांत बिंबप्रतिबिंबभाव आहे. १४. चंदन+मुद्रा+कटक+ अंगद+भूषणें=चंदनाची उटी, आंगठ्या, दंडकडीं, बाहुभूषण इत्यादि अलंकारांनीं. १५. उतराई= केलेल्या उपकाराची फेड करणारा असा. १६. राईसारखा क्षुद्र. या धृतराष्ट्राचा नक्षा उतरून, त्याला तुम्हीं अगदीं गोगलगाय करून सोडिलें आहे.—हा अर्धाचा मतलब. १७. गिळणाऱ्या राहूस. सूर्यास व चंद्रास ग्रहण लागतें, तेव्हां राहू त्यांस गिळतो, अशी कल्पना आहे. १८. सवितयास, सूर्यास. अन्वयः—सवितयास तेजस्वी म्हणति, परि [त्यासि] गिळल्या तमा न गिळवे.

शतगुण[१] अधिक तुम्हीं." हा स्वभुजस्तव भीम परिसवि[२] तयास[३]. ॥ ३१

या वाक्शल्यांहीं[४] बहु पावे तो वृद्ध अंध[५] निर्वेदा[६]; ।
नच[८] उलगडे, न साहे, खेद, जसा मोहबंध निर्वेदा[७]. ॥ ३२

तें धर्मार्जुन, कुंतीकृष्णा, यांला नसे विदित कांहीं; ।
यम[९] जाणति, परि त्यांला संकोचें[१०] किमपि[११] वदवलें नाहीं. ॥ ३३

शीलें[१२] घातलि, कोठें अहित न हो, म्हणुनि आण वीरा ज्या, ।
धृतराष्ट्र सुहृद्वर्गासह त्या स्वसमीप आणवी राजा. ॥ ३४

बाष्पें[१३] संदिग्धें[१४] वदे, "परिसा मत्प्रार्थनेसि, सज्जनहो ! ।
केलें म्यां जगदप्रिय[१५], तेणें नरकांत मज न मज्जन[१६] हो. ॥ ३५

न करावा, तरि केला दुष्टांचा, लोभ धरुनि, अंत्याग[१७], ।
सत्त्यागहि[१८] म्यां; सुहृदुपदेश अनादरुनि[१९], ज्यांत अत्याग[२०]. ॥ ३६

पिकला रसाळ[२१] उपडुनि, त्या स्थानीं लाविला जेंसा[२२] कुचला, ।
सुचला मज मूर्खाला निंद्य व्यवहार[२३], फार हा रुचला[२४]. ॥ ३७

[२५]कीं राजहंस दवडुनि, मूर्खें म्यां पाळिले समस्त बक, ।
कितवाचा[२६] बहु रुचला, सुरतरुचा मज न त्यासम स्तबक[२७]. ॥ ३८

---

१. शंभर पटीनें. २. ऐकवी. ३. त्यास, धृतराष्ट्रास. ४. शब्दबाणांमुळें. ५. आंधळा धृतराष्ट्र. ६. दुःखा. ७. सार्थान्वयः—जसा निर्वेदा (वेदाध्ययनरहितास, तत्त्वज्ञानहीनाला,) मोहबंध (मायापाश) [उकलत नाहीं व सहनही होत नाहीं], [तसा त्या धृतराष्ट्रास]खेद नच उलगडे (न सुटे), व न साहे. ८. बिलकूल. ९. नकुळसहदेवांची जोडी. १०. भिडेमुळें. ११. कांहींच. १२. सार्थान्वयः— कोठें [ही] अहित (अप्रिय, वेडेंवांकडें,) न हो (न व्हावें), म्हणुनि शीलें (सज्जनपणानें, सद्वर्तन ठेवण्याच्या उपजत बुद्धीनें किंवा मनाच्या कलानें) ज्या वीरा (युधिष्ठिरास) आण घातलि (शपथ घातली), [अर्थात् कांहीं एक अप्रिय गोष्ट होऊं द्यावयाची नाहीं अशी शपथच ज्या आत्मसंयमी युधिष्ठिरानें आंगच्या सद्वर्तनव्रतामुळें घेतली होती—] त्या राजा (त्या धर्मराजास) धृतराष्ट्र सुहृद्वर्गासह (मित्रासह) समीप आणवी. ह्या ठिकाणीं 'वीर' शब्दाची योजना फार मार्मिक व भारदस्त आहे; ज्यानें आत्मसंयमन साधिलें आहे, त्याच्या तोडीचा शूर पुरुष विरळा, व म्हणूनच तो वीरश्रेष्ठ होय. १३. [डोळ्यांत] आसवें आणून. १४. अंतःकरण साफ न करून अर्धवट; अस्पष्ट. १५. जगत्+अप्रिय=जगाचें अहित. १६. बुडणें. १७. स्वीकार. १८. सज्जनांचा त्याग. १९. अमान्य करून, न ऐकून. २०. मोठा अपराध, घोर पातक. २१. आम्रवृक्ष. २२. जणूं काय. २३. वर्तनक्रम, मार्ग. २४. मानवला, प्रिय झाला. २५. अथवा. २६. धोत्र्याचा. २७. गुच्छ.

त्यजुनि मणि, पसरिला कर हतभाग्यें[1] फुटकियाहि कवडीला, ।
बैसविला राज्यपदीं खळ, सदनांतूनि धर्म[2] दवडीला. ॥ ३९
मज भीष्मव्यासविदुरविहितहितवचन[3] न मानलें[4] कांहीं[5], ।
म्यां रक्षिला न[6] गुरुचा[6], मीजाहि[7] तसा न मान लेंकांहीं. ॥ ४०
उपदेशामृत वरदें सदयें कृष्णेंहि घातलें कानीं, ।
तरि[8] केला स्वपरांचा हा म्यां, माझा न घात लेंकांनीं. ॥ ४१
विषमंत्रगर्भित[9] जसा करितो तत्काळ घात लाखोटा, ।
विधिनें जग बुडवाया हा कुरुवंशांत घातला खोटा[10]. ॥ ४२
दशमांत[11] स्त्रींस तसें मज दुःखद कर्म पंधराव्यांत[12], ।
भ्रमतों बहु मी, जैसा रावा पावोनि बंध राव्यांत[13]. ॥ ४३
स्वाघस्मरणांत[14] मला ताप, जसा कुंजरा वणवयांत[15]; ।
वृद्धहि मी जेवि, तसे न रचि[16] अघपुंज[17] रावण वयांत[18]. ॥ ४४
अन्न[19] चतुर्थी काळीं, कीं खातों स्वल्प अष्टमीं काळीं; ।
कीं[20] पितृवदनें करितों अयशें देवूनि कष्ट मीं काळीं. ॥ ४५

---

१. दैवहीनानें. २. युधिष्ठिर. ३. भीष्म+व्यास+विदुर+विहित+हित+वचन=भीष्म, व्यास, विदुर, ह्यांचें योग्य व हितकारक वचन. ४. आवडलें, रुचलें. ५. यत्किंचित्सुद्धां. ६. वडिलाचा. पाठभेद—गुरूंचा. ७. माझासुद्धां. ८. अन्वयार्थः—तरि हा स्वपरांचा घात म्यां (मी स्वतःच) केला, लेंकांहीं माझा [घात] न [केला.] ९. विष आणि मंत्र (जादूटोणा) ज्यांत आहे असा. हें 'लाखोट्या'चें विशेषण. १०. लबाड, कपटी. ११. दहाव्या वर्षीं. मुलींचीं लग्नें सुमारें दहाव्या वर्षीं होऊन, त्यांस आपल्या मायेच्या माहेरच्या आप्तांस सोडून, अगदीं परक्या घरीं—सासरीं—नांदण्यास जाणें भाग पडतें. अर्थात् त्यांस तें वर्ष फारच कठिण जातें. येथें सर्वसंग्रहकारांची '(भागवताच्या) दशमस्कंधांत' अशी आहे. तीवरून त्याचा मतलब असा वाटतो कीं, दशमस्कंधांत परमात्म्यांनीं गोपींसह क्रीडा केल्याचें वर्णन असून, त्याच स्कंधांत शेवटीं गोपींचा गर्व परिहार व्हावा म्हणून परमात्मा अंतर्धान पावल्यानें त्या गोपीसमुदायास अतिशय दुःख झाल्याचें वर्णिलेलें आहे. तेव्हां तो स्कंध स्त्रियांस अत्यंत दुःखप्रद होणारच. १२. पंधराव्या वर्षांत. याच अध्यायांत मागें गीति १ ली व पुढें गीति ५१ वी पहा. १३. पोपटांत. १४. आपल्या पापकर्मांचें स्मरण होण्यांत. १५. वणवयांत=वणव्यांत, दावाग्नीमध्यें. १६. करिता झाला. १७. पापराशि. १८. तारुण्यामध्यें. जितकीं पापकर्में रावणानें तारुण्यांत केलीं नसतील, तितकीं मीं आपल्या वृद्धापकाळांतही केलीं आहेत,—असा गीत्यर्धाचा भाव. १९. चार प्रहरांनीं किंवा आठ प्रहरांनीं एक वेळ अन्न ग्रहण करितों व तेंही फार थोडें—असा भाव. (पहा गीति ८५.) २०. अन्वयार्थः—कीं (कारण) अयशें (अपकीर्तीनें) कष्ट देवूनि (दुःख देऊन) मी पितृवदनें काळीं (कृष्णवर्ण) करितों. अन्न गोड न लागण्याचें कारण असें कीं, माझें अपकीर्तिकर वर्तन असून, त्यायोगें वडिलांस त्रास होतो व त्यांस कालिमा लागतो—असा मथितार्थ.

धर्म[1]भयाकुळ परिजन[2] मर्यादावश[3] 'न जेवि'[4] न वदे हें,[4] ।
मानिलहि[5] जीर्णदेहें[6] होत नसे अशन[7], जेंवि नवदेहें[8]. ॥ ४६
प्रावरण[9] [10]अजिन केवळ, शयन[11]हि भूतळ संदर्भ[12] कायास[13]; ।
[14]सोसी हितेच्छु लंघन, दाहाद्युग्रहि, सदर्भकायास. ॥ ४७
मी पश्चात्तप्त असें व्रतें[15], नियमाचें[16] करूनि मिषें[17], [18]करितों; ।
न परापराध[19] हा; जें आपण केलें जसें, तसें [20]भरितों. ॥ ४८
हे स्त्री माझी छाया, [21]वर्तेल तसीच काय अच्छाया, ।
कथिलें तुम्हांसि जें व्रत, आम्हीं दोवेहि पात्र अच्छा[22] या[22]. ॥ ४९
कीं आम्हां दोघांचें अस्मद्दोषेंहि पुत्रशत मेलें, ।
गेलें सुगतिप्रति परि, पळतां[23] न परासु तें परें केलें[23]. ॥ ५०
धर्मा तुजपाशीं मी [24]वर्षें सुखरूप पंधरा होतों, ।
आतां तपोवनीं हा, जों आयु असेल, अंध राहो तों. ॥ ५१

---

१. धर्मराजाच्या भीतीनें व्याकुळ. २. नोकरमाणसें. ३. मर्यादशील, आज्ञाधारक. ४. जेवीत नाहीं, ही गोष्ट. ५. मानीत असेल, समजत असेल. ६. वृद्ध झालेलें आहे शरीर ज्याचें, त्याच्या हातून. ७. आहार, भोजन. ८. तरुण मनुष्याच्या हातून. ९. पांघरूण. १०. मृगचर्म. ११. अंथरूण. १२. दर्भाच्छादित. १३. देहास. १४. सार्थान्वयः— हितेच्छु (कल्याणाची इच्छा करणारा) लंघन (अनशन, [पक्षीं] अमर्यादा), दाहादि (दाह+आदि= दाहप्रभृति. दाह=पंचाग्निसाधनादिव्रत, [पक्षीं] दुःख इत्यादि) उग्र (दारुण, खडतर गोष्टी) ही व सदर्भकायास (सत्+अर्भक+आयास=चांगल्या मुलानें दिलेले कष्ट, सत्पुत्रकृतकष्ट) सोसी (खरोखर सहन करतो). १५. जी कोणतीही धार्मिक गोष्ट आपण होऊन आचरण्यासाठीं अंगीकारितों ती, तप. १६. प्रघातानुरूप किंवा शास्त्रानुरूप असणारें आचरणबंधन. १७. निमित्त, सबब. १८. आचरितों. १९. दुसऱ्याची चूक, दोष. २०. भोगतों, उरकतों. २१. अच्छाया (पतीच्या छायेप्रमाणें त्याच्या चलनवलनावर पूर्ण लक्ष्य ठेवून त्याला न अनुसरणारी स्त्री) तसीच (गांधारीसारखी) वर्तेल काय? गांधारीचें वर्तनच असें आहे, कीं सती पतिव्रतेशिवाय इतर स्त्रियांस तें साधणारच नाहीं.—हा धृतराष्ट्रवचनाचा मतलब. २२. या पवित्र व्रतास. 'जें—हें' ही सर्वनामांची सांगड लक्ष्यांत ठेविण्यासारखी आहे. मोरोपंती काव्यांत ही वारंवार आढळते. २३. [कीं=कारण] तें (पुत्रशत) पळतां (रणांतून पळ काढीत असतां, भ्याडाप्रमाणें अक्षात्रवृत्तीनें समरपराङ्मुख झालेले असतांना) परें (शत्रूनें) परासु (मृत) न केलें. रणविमुख होऊन मेलेल्या क्षत्रियांना स्वर्गप्राप्ति होत नाहीं; परंतु कितीही पापी क्षत्रिय असला, तरी तो धारातीर्थीं शौर्यानें लढून पडला असतां, मोक्षास जातो. धृतराष्ट्राचे शंभर मुलगे जरी दुष्ट होते, तरी ते धारातीर्थीं देह ठेवून सद्गतीला पोंचले होते. २४. याच अध्यायांतील पहिली गीति पहा.

तुज राजासि [1]फळ असे, सरतिल [2]मद्दोष [3]तापसत्वानें, ।
करिन कुळव्रत अंतीं, साहेन [4]सदार ताप [5]सत्वानें. ॥ ५२

तुज न विसरेन, बापा! बहु [6]आशीराशि नित्य योजीन, ।
प्राज्ञा! आज्ञा दे, म्हण 'करुनि सुतप, सुगतिपात्र [7]हो जीन'." ॥ ५३

धर्म म्हणे, "बा! भोगिसि गुप्त असें दुःख तूं कवि प्राज्य, ।
राज्यसुख रुचे न तुला हें, [10]ज्वलनाला जसें [11]अविप्राज्य. ॥ ५४

धिक्कार असो मातें! कीं केवळ मूर्ख मी, [12]जया कांहीं ।
भोगासक्ता गेहीं [13]दुःखितें गुरुवृत्त ठाउकें नाहीं. ॥ ५५

मज [14]गूढबुद्धिनें त्वां देउनि विश्वास, [15]वंचिलें स्पष्ट; ।
कीं हे उपवासक्षितिशयनादि असह्य भोगिले कष्ट. ॥ ५६

या दुःखोक्ति तुझ्या मम [16]हृदयाश्वा लागल्या [17]कशा समज; ।
[18]व्हावें राज्य, विविध सुख, यज्ञानुष्ठान, हें कशास मज? ॥ ५७

तूं आमुचा पिता, तूं माता, तूं परम गुरु, अगा! राया! ।
कोठें कसें वसावें? त्वां जातां, त्यजुनियां [19]अगारा या. ॥ ५८

[20]जातो सुखें जन [21]जैसा, गुरुनें म्हणतांचि 'आजि होरा, जा,' ।
मीच वनातें जातों; तव औरस सुत युयुत्सु हो राजा. ॥ ५९

अयशेंकरुनि जळालों आहेंचि, मला पुन्हा न जाळावें; ।
टाळावें हें [22]व्यसन, प्रभुनें शरणागतास पाळावें. ॥ ६०

---

१. मीं तप केलें असतां, त्याचें फळ अंशतः तुलाही लाभणारें आहे; कारण तूं राजा आहेस, व तपस्व्यांच्या तपाचा पुण्यांश धर्मशास्त्रानें राजासही प्राप्त होतो. २. मत्+दोष=माझे अपराध. ३. तपस्वीपणानें. ४. स्त्रीसह. ५.नेटानें, धैर्यानें. सोमवंशीय व सूर्यवंशीय राजांची अशी चाल असे कीं वृद्धापकाळीं आपल्या पुत्रास गादीवर बसवून आपण तपश्चरणार्थ वनामध्यें सदार जावयाचें. त्या नियमास अनुलक्षून ही धृतराष्ट्राची उक्ति आहे. ६. आशीर्वादाच्या राशी. 'तुज आशीराशि नित्य योजीन'=तुला नित्य आशीर्वाद देईन. ७. होवो. ८. वृद्ध. ९. पुष्कळ. १०. अग्नीतें. ११. अविप्र+आज्यें=अब्राह्मणानें—ब्राह्मणेतरानें—होमिलेलें घृत. १२. ज्या मला. १३. जाचलेल्या—कष्ट पावलेल्या—वडील माणसांची वार्ताही. १४. आंतल्या गांठीनें, पाताळयंत्रीपणानें. १५. फसविलें. १६. हृदयरूप घोड्यास. १७. चाबूक. १८. हवें, पाहिजे. १९. गृहातें. २०. अन्वयार्थः—'आजि होरा (मुहूर्त—पहा स्त्रीपर्व अ० १ गीति २) जा' [असें] गुरुनें (वडिलांनीं किंवा तत्त्वज्ञान प्राप्त करून देणाऱ्या गुरूनें, उपाध्यानें) म्हणतांचि जन सुखें (आनंदानें) जसा जातो, [तसा] मीच वनातें जातों; तव औरस पुत्र युयुत्सु राजा हो (होवो). २१. सर्वसंग्रहपाठ—'तसा'. २२. संकट.

राजा तूं, मी सेवक; वद, आहें कीं [1]अधीन मी नाहीं ? ।
[2]दासें धण्यास, आज्ञा दिधली डोहा कधीं न मीनांहीं. ॥ ६१

आतां सुयोधनाचा कोप नसे माझिया मनीं कांहीं; ।
वाटे, उत्तम झालें, कीं वरिली सुगति त्या [3]अनीकांहीं. ॥ ६२

[4]भवितव्य तें, तसेचि भ्रमलों; जातों सुयोधना शरण, ।
[5]कीं तो येतां[6] होतां, तरि कां[7] व्हावा [8]सुयोधनाश [9]रण. ॥ ६३

[10]ते सुत, तसेचि हे; त्यां झालासि न सिद्ध, यां अव्हेराया, ।
उचित शरणागतांचा धर्मज्ञा त्याग तुज नव्हे, राया ! ॥ ६४

पांडु, पृथा, गांधारी, तूं, यां पाहें समान चवघांस; ।
देतात, शर्करेचे भिन्न म्हणुनि, काय भिन्न चव घांस ? ॥ ६५

त्यजशील मज, तरि तुझा[11] बापा ! सोडीन न पथ बहुधा मी, ।
वत्सास दुःख आहे, कथितों, वाहोनि शपथ, बहु धामीं[12]. ॥ ६६

तव विरहीं देइल धनपूर्णाही दुःख नित्य नव धरणी, ।
[13]हें पाहणें [14]कपाळीं, बहुधा झाला म्हणूनि न वध रणीं. ॥ ६७

आम्ही तुज वश[15] आहों; आहे सर्वहि तुझें नरवरा ! हें, ।
नमितों, प्रसन्न हो, बा ! शमला प्रकटो पुन्हा न रव[16], राहें. ॥ ६८

[17]सेवेनें ताप तुज्या टाकुनि, माज्याहि, मानसा जावा; ।

---

१. आज्ञाधारक. २. अन्वयार्थः–दासें धण्यास (धन्यास–यजमानास) [व] मीनांहीं (माशांनीं) डोहा (डोहास)कधीं आज्ञा न दिधली. ३. सैन्यांनीं, वर गीति ५० वी पहा. ४. होष्यमाण, भावी, होणार.५. किंवा. ६. [शरण] आला असता.७.कां झाला असता? पाठभेदः–कां व्हाया. ८.उत्तम वीरांचा नाश ज्यामध्यें झाला असा. ९. युद्धप्रसंग. १०. अन्वयार्थः–ते (दुर्योधनादि) सुत (पुत्र), तसेचि हे (पाण्डव) [ही] [सुत]; त्यां अव्हेराया सिद्ध न [झालासि], यां [अव्हेराया सिद्ध] झालासि. ११. अन्वयः–बापा ! बहुधा (हरएक प्रकारांनीं) तुझा मार्ग मी न सोडीन. हजार तऱ्हा करून मी तुझ्या मागोमाग अरण्यांत येईन. 'पाठ न सोडणें,' 'पाठीस लागणें,' व 'पथ न सोडणें,' हे सर्व शब्दसमूह समानार्थकच आहेत. १२. गृहीं. १३. हें प्रस्तुतचें दुःख. १४. दैवीं, नशीबीं. अर्थ-सादृश्यः–भोगावयास दुःखें दैवें चैतन्य ठेविलें रामीं। (उत्तररामचरित, अंक ३).१५. आज्ञाधारक. १६. शोकस्वर. १७.अन्वयार्थः–[मीं केलेल्या तुझ्या] सेवेनें तुज्या [व] माज्याहि मानसा ताप (दुःख) टाकुनि जावा. (अर्थात् तुझी शुश्रूषा करण्यांत मला समाधान व ती स्वीकारण्यांत तुलाही समाधान वाटूं दे.–असा भाव.) हे राजा ! (धृतराष्ट्रा !) पुरुष विवेका (विचारास) [व] हिमगिरि हिमा सोडुनि न साजावा (शोभावा). हिमाच्या अभावीं 'हिमगिरि' शब्दानें व्यक्त होणाऱ्या वस्तूचा अभावच राहतो; तद्वत् विवेकाच्या अभावीं 'पुरुष'वाचक व्यक्तीचा अभाव व्यक्त होतो.

पुरुष विवेका, हिमगिरि, सोडुनि राजा! हिमा, न साजावा.” ॥ ६९

धृतराष्ट्र म्हणे, ‘बापा! तपचि करावें, असें मनीं आलें,[1] ।
उचितहि हें या स्वकुळीं; भोगुनि भोगासि, कोण गा! धालें[2]? ॥ ७०

वसलों चिर, शुश्रूषा चिर[3] केली त्वां तसी, जसी उचिता; ।
दे आज्ञा; मज वृद्धा प्रीता[4] सुतपेंकरूनि हो शुचिता[5].’ ॥ ७१

ऐसें वदोनि, मग तो, जोडुनि कर, संजयाकृपास वदे, ।
‘विनवा नृपासि, साधा सुयशाचे, करुनियां कृपा, संवदे[6]. ॥ ७२

वाग्व्यायामें[7] या, बहु वृद्धपणें, न वदवे; वदन सुकलें, ।
झालें म्लान मन, जसें वृकविपिनामाजि[8] वासरूं चुकलें.’ ॥ ७३

ऐसें बोलुनि, आश्रय गांधारीचा करी बहु श्रमला[9], ।
नृप राहिला उगाचि, प्राणरहितसाचि तेधवां गमला. ७४

होय व्याकुळ शोकें, पाहुनि तो धर्म संत[10] तदवस्था[11], ।
बाधे गुरुताप[12] तया, दाव[13] गजा जेविं संततदवस्था[14]. ॥ ७५

धर्म म्हणे, “हा[15]! हा! या राजेंद्रीं अयुतनागबल[16] होतें, ।
निःशेष बुडविलें कीं पोटा येवूनि सर्व, खल[17] हो! तें. ॥ ७६

भीमाची लोहमयी प्रतिमा[18] केली चुरोनियां पिष्ट[19], ।
तो अबलाश्रित झाला[20]; फिरतां[21], वज्रासि तृण करी दिष्ट. ॥ ७७

---

१. याच अध्यायांत मागें गीति ५२ वी पहा. २. तृप्त झालें. ३. ह्या अर्धांत ‘चिर’ शब्दाची योजना फार मार्मिक आहे. सेवा, भक्ति अथवा धर्म इत्यादिक प्रारंभीं मोठ्या कळकळीनें सुरू होतात, पण सतत टिकत नाहींत. परंतु धर्मराजाचे हातून ‘पितृ-सेवाव्रत’ अबाधित व एकसारखें चाललें होतें, ही गोष्ट कवीनें ‘चिर’ शब्दाची योजना करून पूर्णपणें दर्शित केली आहे. ४. पाठभेदः—प्राज्ञा! ५. पवित्रता, निर्मळपणा. ६. खरेदी. ७. वाक्+व्यायाम=बोलण्याचे श्रम किंवा शीण, त्यामुळें. ८. लांडग्यांच्या वनांत. ९. दमलेला, शिणलेला. १०. सद्गुणी, शहाणा. ११. तत्+अवस्था=धृतराष्ट्राची स्थिती. १२. वडिलांचे क्लेश, चुलत्याचें दुःख. १३. वणवा. १४. पसरलेल्या वणव्यांत सांपडलेल्या हत्तीला. १५. हाय! हाय! १६. दहा हजार हत्तींचें बळ. १७. दुर्योधनप्रभृति दुष्टांनो! १८. पुतळा. (स्त्रीपर्व. अ० २ गी० २१,२२). १९. पीठ. २०. येथें ‘अबलाश्रित’ ह्या पदाची योजना फार बहारीची आहे. जो सबल आहे, तो इतका निर्बल झाला, कीं त्यानें अबलेचाही आश्रय केला. आधीं सबलानें दुसऱ्याचा आश्रय घेणें म्हणजेच आश्चर्य; तर मग तो ‘अबलेचा’ घेतल्यास काय म्हणावें बरें! २१. अन्वयः—दिष्ट (दैव) फिरतां वज्रासि तृण करी.

म्हणति[1] अयशा बुधा 'अरि,' कीर्तिकरा अश्रुता 'तनय,' नाकीं; ।
मी रिपु, न पुत्र, आलें मजकरितां अश्रु तातनयना कीं. ॥ ७८
हा[2]! हंत! धिक्[3] श्रुतातें माझ्या! केला जनांत हाकाट[4], ।
झालों गुरुला तापद, तैसाचि[5] असे मनांत हा कांट[6]. ॥ ७९
मीहि न करीन भोजन, जरि न करिल तात, माय **गांधारी**; ।"
यांच्या[7] घातें झालों बहु निंद्य, जसा निजानुगांधारी. ॥ ८०
ऐसें वदुनि, उरावरि, वदनावरि, पाणि[8] नृपतिच्या फिरवी; ।
तोयार्द्र[9] सुरत्नौषधिधर तो यश अमृतरश्मिचें मिरवी. ॥ ८१
त्या परमपुण्यपाणिस्पर्शें संज्ञेसि[10] वृद्ध तो पावे, ।
धर्मासि म्हणे, 'बापा! स्पर्श क्षणभरि असेचि ओपावे[11]. ॥ ८२
बा! मज धरीं उराशीं बाहूंनीं व्याकुळासि कवळून, ।
हुंगीनें[12] मस्तकीं, बा! क्षणभरि जाऊं नकोचि जवळून. ॥ ८३
राजीवलोचना[13]! शशिरश्मि[14] चकोरा, मलाहि पाणि तसे, ।
यांचा स्पर्श प्राणाप्रति परतुनि[15] सुयतिसाचि[16] आणितसे. ॥ ८४

---

१. सार्थान्वयः—नाकीं (स्वर्गी) अयशा (नांवलौकिक ज्यास प्राप्त झालेला नाहीं अशा) बुधा (बुद्धिमानास किंवा सुशिक्षितासही) 'अरि' (शत्रु) म्हणति; [व] कीर्तिकरा (लौकिकवान् अशा) अश्रुता (अक्षरशत्रूसही)'तनय' [स्वर्गस्थ पितर] म्हणति [कारण, दुर्लौकिक करणारा मुलगा वडिलांच्या अधःपातास कारणीभूत होतो व कुळाचें नांव काढणारा लौकिकवान् मुलगा वडिलांस मोक्षप्रद होतो]. २. हाय! हाय! ३. शिक्षणाला धिक्कार असो. ४. बोभाट, दुर्लौकिक. सर्वसंग्रहपाठ–हाकांटा. ५. वडिलांना तापद झालों ही गोष्ट. ६. मळ, पाप. सर्वसंग्रहपाठ–कांटा. ७. सार्थान्वयः—यांच्या (ह्यांच्या, धृतराष्ट्र व गांधारी ह्या उभयतांच्या) घातें (नाशानें), जसा निजानुगांधारी (निज+अनुग+अंध+अरि=आपल्या मागून येणारे जे अंध त्यांचा शत्रु) [तसा] बहु निंद्य झालों. ह्या द्वयांचा घात माझे हातून झाल्यानें मी त्यांचा शत्रु झालों असून जगांत महानिंदेस पात्र झालों आहें–असा भाव. ८. हात. ९. सार्थान्वयः—तोयार्द्र (उदकानें ओला) [व] सुरत्नौषधिधर (उत्तम रत्न, कंकण, वलयमुद्रिका इत्यादि रत्नखचित भूषणें व औषधी[=औषधें] यांना धारण करणारा) तो (धर्मराजाचा हात) अमृतरश्मिचें (चंद्राचें) [शीतलत्व, तापहारकत्व, निर्मळत्व इत्यादि गुणांनीं प्राप्त होणारें] यश मिरवी. येथें 'तोयार्द्र' व 'सुरत्नौषधिधर' हीं पदें **श्लिष्ट** आहेत. चंद्रपक्षीं.—'तोयार्द्र'=जलयुक्त, हिममय. चंद्राला अत्यंत शीतलत्वानें 'हिमकिरण' म्हणतात. 'सुरत्नौषधिधर'=[रात्रींच्या] उत्तम हिऱ्याप्रमाणें चमकणाऱ्या औषधींचें पोषण करणारा. १०. शुद्धीवर आला. ११. द्यावे. १२. वडिलांनीं लहानाचें'मस्तक हुंगणें' हें प्रेमाचें लक्षण आहे. १३. कमलनेत्रा! १४. चंद्रकिरण. १५. पुनरपि. १६. उत्तम योग्याप्रमाणें. समाधि लाविल्या वेळीं यतिराजांचे प्राण ब्रह्मांडीं असतात व शरीर केवळ काष्ठवत् भासतें; परंतु समाधि विसर्जन झाली म्हणजे प्राण पूर्ववत् शरीरांत स्वस्थानीं येतात, ह्या गोष्टीकडे येथें कटाक्ष आहे. पाठभेदः–सुपतिसा.

भोजन केलें, त्याला झाला बा! आजि काळ[1] अष्टम[2] हा, ।
म्हणउनि विसंज्ञ[3] झालों, झाले तुज विनवितांहि कष्ट[4] महा.' ॥ ८५
त्यावरि पाणि युधिष्ठिर फिरवी, उतरी[5] विषघ्नपल्लवसा,[6] ।
गोंजारी[7] तापार्ता[8] दुर्बळवृषभासि सदय बल्लवसा.[9] ॥ ८६

हुंगी, आलिंगी दृढ तो[10] स्वस्थ[11] प्रभु विशाल भुज; गमला, ।
चंदनतरुला[12] आहे आलिंगुनियां विशाल भुजग, मला. ॥ ८७
आघ्राणा[13] होय विनत[14] शिर, आंगीं आंग लीन परिरंभा; ।
गुरुरीति[15] सन्मन हरी, तैसी, बहु चांगली, न परि रंभा. ॥ ८८
गुरुतापें गहिंवरला, अन्यें तो सुज्ञगुरु[16] न[17] गहिंवरता, ।
नच[18] गडबडता युद्धीं, जरि पडता काय गुरु नगहि वरता. ॥ ८९
स्त्रीजन, सुहृज्जन, रडे, त्यां गांधारी रडों न दे, वारी,[19] ।
शोकें[20] शमे तो, जैसा देवीतेजीं पडोन देवारी. ॥ ९०
पुनरपि वनगमनाज्ञा,[21] पडुनि[22] गळां, प्रभुसि[23] भूप[24] तो याची;[25] ।
चातक घना जळ जसा, इच्छा न करूनि कूपतोयाची. ॥ ९१
'वदतां पुनःपुन्हा म्यां, व्हावें न म्लान मानदा[26] तातें; ।
कष्टी करुनि न देतो, जें द्याया योग्य दान, दाता तें.' ॥ ९२

---

१. प्रहर. २. आठवा. ३. बेशुद्ध. ४. श्रम. ५. डोक्याकडून पायांपर्यंत शरीरावर फिरवी, ओंवाळी. ६. विष उतरणाऱ्या झाडाच्या डाहळीप्रमाणें किंवा पालवीप्रमाणें. कित्येक झाडांची किंवा वनस्पतींची पालवी अंगावरून उतरली असतां विंचू, साप, इत्यादिकांचें विष उतरतें, हें अनुभवसिद्ध आहे. ७. कुरवाळी. ८. दुःखानें—पक्षीं उन्हानें—शिणलेला. ९. गुराखी, गवळी. पाठभेदः—वल्लभसा. १०. धृतराष्ट्र. ११. पाठभेद—स्वच्छ. १२. येथें 'चंदनतरु' व धर्माचा शीतल 'भुज' आणि 'प्रभु' धृतराष्ट्र व 'भुजग' यांत सादृश्य उत्प्रेक्षित आहे. १३. हुंगण्यास. १४ नम्र. अन्वयार्थः—आघ्राणा शिर विनत होय [व] परिरंभा (आलिंगनाकरितां) आंग आंगीं लीन होय. १५. अन्वयार्थः—गुरुरीति (थोरांचा शिष्टाचार) सन्मन (सज्जनांच्या मनास) हरी (आकर्षण करितें); रंभा बहु चांगली, परि (परंतु) तैसी न [हरी]. १६. ज्ञानिश्रेष्ठ धर्मराज. १७. न गाहिंवरता=गहिंवरला नसता. १८. अन्वयार्थः—जरि काय (जर का) गुरु नगही (प्रचंड पर्वतही) वरता (अंगावर) पडता (पडला असता), [तरीही तो धर्म] नच गडबडता (गडबडला नसता). १९. निवारण करी. २०. अन्वयार्थः—जैसा देवी-तेजीं (दुर्गेच्या प्रतापांत) देवारी (देव+अरी=महिषासुर) पडोनि शमे (शांत झाला, नष्ट झाला), [तैसा] शोक [गांधारीच्या तेजीं शमे]. २१. अरण्यांत जावयाची आज्ञा. २२. गळां पडुनि=अति आग्रहानें. २३. धर्मराजास. २४. धृतराष्ट्र. २५. मागूं लागला. २६. [वडिलांस] मान देणाऱ्या मुलानें, त्वां आज्ञाधारक बाळानें. 'बाबा' 'बापा' 'ताता' हे शब्द, वडील माणसांनीं लहानास उद्देशून योजिले असतां, प्रेम, कळकळ, वात्सल्य, वगैरे दाखवितात.

बहु कृश विवर्ण[1] पाहुनि बापातें, आरडुनि गळां, पडला; ।
जडला कंठीं; केवळ शिशुसाचि अजातशत्रु तो रडला. ॥ ९३
वदला, तुझें प्रिय मला व्हावें, तैसें न जीवित, न राज्य, ।
विषयरसभजन तैलचि, गुरुजनपदभजन तें मज वैराग्य[2]. ॥ ९४
बा! प्रीति, अनुग्रह[3], जरि मज पुत्रावरि असेल, तरि आधीं, ।
आहार[4] करुनि, मग तूं समुचित[5] कर्तव्य आपुलें साधीं.' ॥ ९५
धृतराष्ट्र म्हणे, 'बापा! आधीं आज्ञामृतासि सेवीन, ।
मग मी निश्चिंतपणें[6], होउनियां प्राप्तकाम[7] जेवीन. ॥ ९६
त्या अवसरांत आला तो भगवान् सजलघननिभ[8] व्यास, ।
श्रुतिस[9] म्हणे, 'विश्वाच्या करिं, उघडुनि अर्थ, जननि! भव्यास.' ॥

अध्याय दुसरा.

व्यास म्हणे, 'धर्मा! हा, मत[10] होइल, न करिता तप कसा? रे; ।
तरुणपणीं गोड पुढें वृद्धपणीं विषय[11] ते सपक[12] सारे. ॥ १
अंधें, वृद्धें, दोघें[13] झालीं शोकांत मग्न सुतपातें[14]; ।
राजर्षींस उचित वनसंश्रय[15] अंतीं; करूत[16] सुतपातें[17]. ॥ २
दे आज्ञा; संपादू[18] स्वकुलव्रत सेवटील, सुतपा हो[19], ।
न मरो वृथा; सुगतितें[20] हा माझा अंध वृद्ध सुत पाहो.' ॥ ३
धर्म म्हणे, "भगवंता! देतो, वच करुनि[21], मान वडिला[22] हां[23]; ।
होतां प्राप्त गुरुविरह, कैसा न म्हणेल मानव ढिलें[24] 'हा!'? ॥ ४

---

१. पांढरा, निस्तेज. २. साजुक तूप. पंतांच्या ठराविक रूपकांपैकीं हें एक आहे. ३. कृपा. ही प्रेमाच्या पुढील पायरी आहे. ४. भोजन. ५. योग्य. ६. स्वस्थपणें. ७. सफल मनोरथ झाले आहेत ज्याचे असा. ८. उदकानें भरलेल्या मेघाप्रमाणें [काळीनिळी] कांति आहे ज्याची असा, श्यामवर्ण. ९. सार्थान्वयः—श्रुतिस (वेदांस) म्हणे, '[हे] जननि! (माते) अर्थ उघडुनि (स्पष्ट करून) विश्वाच्या भव्यास (कल्याणास) करिं (साधीं).' व्यास ऋषींनीं वैदिक वाङ्मयाला व्यवस्थित रूप दिलें व म्हणूनच त्यास वेदव्यास हें नांव पडलें,—या हकीकतीवर येथें कवीचें लक्ष्य आहे. १०. मान्य. ११. ऐहिक सुखें. १२. बेचव. १३. धृतराष्ट्रगांधारी. १४. पुत्रांच्या नाशानें. १५. आयुष्याच्या अखेरीस. १६. करोत. १७. उत्तम तपातें. १८. प्राप्त करून घेवो. १९. होवो. २०. उत्तम पदाला, मोक्षपदवीला. २१. शब्द ऐकून, हुकूम पाळून. २२. वडिलांना. २३. मी धर्म. २४. दुर्बळ, शिथिल वृत्तीचा, कमकुवत.

तूं [१]कुळराज्यपरायण, मम सर्वस्व गुरुजन, कविप्राज्ञा ! ।
कां न करीन, हरी जी श्रम सर्व, [२]स्वगुरुजनकविप्राज्ञा ?" ॥ ५

व्यास म्हणे, "योग्य तुझ्या, माझ्याही, होय हा [३]निरोपातें, ।
यातें न घडो शोकीं, [४]दैवदहनीं जेविं हानि [५]रोपातें. ॥ ६

सत्कर्म योजिलें जें, नेती सिद्धीस संत राया! तें, ।
[६]ताततपासि कराया तूं सुज्ञ न योग्य अंतरायातें. ॥ ७

देह पडावा युद्धीं, किंवा [७]विधिनें तपोवनीं अंतीं, ।
[८]राजर्षींचा **धर्मा**! हाचि [९]परम धर्म वर्णिला [१०]संतीं. ॥ ८

पूर्वीं **पांडुनृपें** [११]हा शिष्यें गुरुसा [१२]उपासिला [१३]भावें, ।
[१४]कीं 'तोय, तेल,' म्हणतां, येणें दुग्धातुपासि लाभावें. ॥ ९

व्रत यज्ञानुष्ठानें, कीं घडलीं कोणतीं न [१५]यां दानें, ।
[१६]न म्हणावें, 'वापीचे अनुभविले कोण तीन यादानें.' ॥ १०

[१७]पुत्राच्या राज्यांतहि, [१८]त्यांतहि वर्षें [१९]समग्र [२०]हा तेरा ।
[२१]पावुनि वित्ता, जोडी विपुल यशा, जेविं शूर हातेरा. ॥ ११

---

१. वंश व राज्य यांचा आधारस्तंभ. २. आपल्या बापाचा बाप व ब्राह्मण अशाची आज्ञा; आजोबा व ब्राह्मण असा जो त्या तुझी आज्ञा. धृतराष्ट्र व पांडु हे व्यासवीर्यज होते, या गोष्टीवर येथें कटाक्ष आहे. ३. जाण्याविषयीं आज्ञेला. ४. वणव्यांत. ५. बालतरूला. ६. अन्वयार्थः—तूं सुज्ञ (शहाणा, जाणता) ताततपासि (चुलत्याच्या तपश्चरणाला) अंतरायातें कराया (विघ्न करावयास, आड येण्यास) योग्य न. ७. शास्त्रोक्तनियमानुरूप. ८. राजे असून ऋषीप्रमाणें सदाचरण करणारे त्यांचा. ९. श्रेष्ठ. १०. सत्पुरुषांनीं. ११. हा धृतराष्ट्र. १२. आराधिला. १३. भक्तीनें. १४. अन्वयार्थः—कीं (असा उपासिला कीं) येणें (या धृतराष्ट्रानें) 'तोय, तेल,' म्हणतां (पाणी किंवा तेल मागितलें असतां) दुग्धातुपासि लाभावें. १५. या धृतराष्ट्राला. १६ यादानें (जल-जंतूनें, मत्स्यानें वगैरे) वापीचे (विहिरीचे) तीन कोण (तीनच कोंपरे) अनुभविले [व चौथा अनुभविला नाहीं], [असें] न म्हणावें (म्हणण्याला लोकांना जागा नाहीं). विहिरीला जसे चार कोंपरे असतात, तसेच ब्रह्मक्षत्रवैश्यांच्या जीवयात्रेला व्रत, यज्ञ, अनुष्ठान व दान, हे चार कर्तव्यमार्ग आहेत. तेव्हां विहिरीच्या तीन कोंपऱ्यांत संचार करून, एक कोंपरा मात्र यादानें पाहिला नाहीं हें ह्मणणें जसें अविचाराचें होय, तसेंच धृतराष्ट्राला सर्व गोष्टी अनुकूळ असल्यामुळें, कर्तव्यचतुष्टयापैकीं अमुक एक करण्याचें त्याचें राहिलें आहे, हें ह्मणणेंही अनुचित होय. १७. दुर्योधनाच्या. १८. आणि त्यामध्यें विशेषेंकरून. १९. पूर्ण. २०. धृतराष्ट्र. २१. अन्वयार्थः—जेविं शूर (योद्धा) हातेरा (शस्त्रातें) पावुनि (मिळवुनि) विपुल यशा (महाकीर्तीतें) जोडी (संपादी), [तेविं] हा (धृतराष्ट्र) वित्ता पावुनि विपुलयशा जोडी.

त्वांही [१]कृतार्थ केला, बहु [२]शुश्रूषा करूनि, [३]आलिकडे, ।
[४]काय उणें त्या? घे ज्या सत्संगति सुरभिचीच आलि कडे. ॥ १२

समय तपाचा, आज्ञा दे, [५]तात [६]तरो [७]तपोनि, [८]धीरा! [९]जे ।
मेले तपोवनीं, सुरपूजित झाले तपोनिधी राजे. ॥ १३

हा [१०]स्पर्शलां न कोपा आजि, जसा द्विज [११]महातपा [१२]यवना, ।
[१३]जातो नृप, कीं जावें तों, जों स्वाधीन हात पाय वना." ॥ १४

धर्मास निरोप तसा मागे [१४]पुत्रार्थ [१५]एकल व्यास, ।
[१६]शिष्यार्थ द्रोण जसा पूर्वी अंगुष्ठ [१७]एकलव्यास. ॥ १५

मुनि गेल्यावरि, [१८]वदनें, बोले तो धर्म मंद मंद, '[१८]नतें;
[१९]पावे, निरोप देतां नंदा जें दुःख नंदनंदन, तें. ॥ १६

---

१. संतुष्ट. २. सेवा. पाठभेदः–शुश्रूषण. ३. दुर्योधनाच्या मागें, प्रस्तुतकाळीं. ४. अन्वयार्थः–सुरभिचीच (प्रत्यक्ष कामधेनूची) आलि (सखी) सत्संगति (सज्जनसमागम) ज्या (मनुष्यास) कडे (कडेवर) घे, त्या काय उणें (कमी)? कामधेनूनें संगोपन केलेल्यास, जसें सर्व कांहीं लाभतें, त्याचप्रमाणें सज्जनसमागमांत जो वाढतो, त्यास सर्व कांहीं प्राप्त होतें. ५. धृतराष्ट्र. ६. मोक्षपद लाभो होवो. ७. तपश्चर्या करून. ८. धैर्यशीला, धर्मराजा! ९. ह्या संबंधीसर्वनामाचा संबंध उत्तरार्धातील 'राजे' ह्या पदाकडे. १०. शिवला. ११. मोठें आहे तप ज्याचें असा, महातपस्वी. १२. आर्येतरास. आर्येतरांस स्पर्श करण्याचा फार प्राचीन काळापासून निषेध आहे. १३. अन्वयार्थः–नृप (धृतराष्ट्र) जातो; कीं (कारण) जों हात पाय स्वाधीन, तों वना जावें (जोंपर्यंत शरीर चालतें आहे, तोंपर्यंतच वनास जावें, हें बरें. कारण जोंपर्यंत शरीर वागत आहे, तोंपर्यंत व्रतादि तपश्चरण साध्य होणें शक्य आहे.) अर्थसादृश्यः–यावत्स्वस्थमिदं देहं यावन्मृत्युश्च दूरतः। तावदात्महितं कुर्यात्प्राणान्ते किं करिष्यसि ॥ १४. धृतराष्ट्राकरितां, मुलाच्या वतीनें. १५. एकटा. १६. अर्जुनाप्रीत्यर्थ. १७. हा हिरण्यधेनुक नामक निषादाधिपतीचा पुत्र होता. हा द्रोणाचार्याजवळ अस्त्रविद्या शिकविण्यासाठीं हस्तिनापुरीं गेला; परंतु त्यांनीं त्याचा अव्हेर केला. त्या वेळीं तो त्यांच्या पादुका घेऊन गेला व त्यांवर निष्ठा ठेवून इष्टविद्येचा अभ्यास करून तींत प्रवीण झाला, तो इतका कीं प्रसंगीं हा अर्जुनासही दाद देणार नाहीं अशी द्रोणाचार्यास भीति पडली. तेव्हां आचार्यांनीं गुरुदक्षणा म्हणून त्याच्या उजव्या हाताचा अंगठा मागितला, व ही गुरुदक्षिणा त्यानें मोठ्या संतोषानें दिली. तेव्हांपासून किरात बाणास अंगठा न लावतां, मधलें बोट व तर्जनी ह्या दोन बोटांनीं दोरी खेचतात व बाण सोडतात. १८. नतें वदनें=खालीं मान घालून. १९. अन्वयार्थः–नंदा निरोप देतां जें दुःख नंदनंदन (श्रीकृष्ण) पावे, तें [धृतराष्ट्रास निरोप देतां धर्म] पावे. ज्याच्यामुळें बारा वर्षें वनवास भोगण्याची पाळी आली व इतकी हानि झाली, त्याला वनास जाण्याची अनुमति देतांना धर्माला दुःख व्हावें, हें धर्माच्या चांगुलपणाची निःसंशय उत्तम साक्ष पटवितें.

"[1]व्यास, कृप, युयुत्सु, विदुर, संजय, तूं, हे सदैव जेविं हित ।
कुरुवंशाचे, तेविं न इतर; करिन मी वदाल जें विहित.' ॥ १७
जेवावें, मग जावें; अन्य [2]वरा त्यजुनि, आजि [3]याचि तसें, ।
[4]स्तन्याला बाळ जसें, सानुज मी, नमुनि पाय, याचितसें." ॥ १८

आज्ञा युधिष्ठिरानें देतांचि तपोवनास जायास, ।
उठला, विप्र [5]विवाहा जाणों, पावुनि धना, सजायास. ॥ १९

जातां गृहांत मार्गी करि जीर्णकरींद्र[6]सा [7]पदन्यास; ।
जें सुख, जें दुःख, तया, जालेंचि नसेल तें [8]तदन्यास. ॥ २०

विप्रादिकांसि भोजन देवूनि, करी स्वयेंहि मग [9]विधिनें, ।
[10]कीं लाविला असे हा अर्थिखगांचा गृहस्थनग विधिनें. २१

कुंतीसह जेववली गांधारी हर्षली सुनारी ती, ।
[11]कीं आदरीं सखीची कन्येची दाविती सुना रीती. ॥ २२

भोजन करूनि, बसला स्वस्थानीं स्वस्थ [12]भूप, त्याजवळ ।
ये धर्म; चकोर जसा इंदुकडे ध्यावया प्रभा[13]कवळ. ॥ २३

---

१. उत्तरार्धासह अन्वयार्थः–व्यास, कृप, युयुत्सु, विदुर, संजय [व] तूं, हे जेविं कुरुवंशाचें हित (कल्याण साधणारे)[आहां], तेविं इतर न;[म्हणून] जें विहित (उचित गोष्ट) वदाल, [तें] मी करीन. २. मागण्याला, इच्छेला. ३. या वरालाच. हें 'याचितसें' याचें कर्म. ४. अंगावरील दुधाला. ५. लग्नाकरितां नटण्यासाठीं, किंवा लग्नाची तयारी करण्यासाठीं. ब्राह्मण गरीब असल्यास, त्यानें लग्नासाठीं धनयाचना करण्याची वहिवाट फार पुरातन आहे. लग्नाला उत्सुक झालेल्या निर्धन ब्राह्मणास धनलाभ झाला असतां, तो जसा मोठ्या उल्हासानें लग्नाच्या तयारीस लागतो, तसाच वनगमनोत्सुक धृतराष्ट्र धर्मराजाची अनुज्ञा मिळतांच, प्रस्थानाच्या तयारीस मोठ्या उल्हासानें लागला. ६. वृद्ध हत्तीप्रमाणें. ७. पाऊल ठेवणें. पदन्यास करि=पावलें टाकी. ८. तत्+अन्यास=धृतराष्ट्रावांचून इतरांस. धृतराष्ट्रानें भोगलेलें सुखदुःख केवळ असामान्य होतें व म्हणूनच तो इतका थकला होता–हा गीतीचा मतलब. ९. शास्त्रोक्त पद्धतीनें. १०. अन्वयार्थः–कीं (कारण) विधिनें (ब्रह्मदेवानें) अर्थिखगांचा (याचकरूप पक्षिगणांचा) हा गृहस्थनग (गृहस्थाश्रमरूप वृक्ष) लाविला असे. आश्रमचतुष्टयांत गृहस्थाश्रमाची योग्यता फार मानिलेली आहे. अर्थसादृश्यः–आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे साधोः संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥ ११. अन्वयार्थः–कीं (कारण) आदरीं (सत्कार करण्यामध्यें) सुना (द्रौपदी, सुभद्रा इत्यादि) सखीची (मैत्रिणीची)[व] कन्येची रीती दाविती. १२. धृतराष्ट्र. १३. चांदण्याचा घुटका. पेय वस्तूंच्या ग्रासास आपण 'घुटका' म्हणतों. कवळ=घांस. चकोरपक्ष्याचें इंदुकिरण हें फार प्रिय खाद्य आहे, हा कविसंकेत सुप्रसिद्ध आहेच.

धर्मासि म्हणे राजा, फिरउनि सप्रेम पाठिवर हात, ।
"[1]वत्सा! धर्मीं सादर, नित्य सदुपदेश आठिव, रहात. ॥ २४
आत्मा संरक्षावा[2], मंत्रे करावा नृपोत्तमा! गूढ[3], ।
सुज्ञे[4] पुरुष एकहि बहु, राजा! न बरे सहस्रही मूढ. ॥ २५
होचि उपासक[5] विद्यावृद्धांचा, शंभुचा उपासकसा, ।
सेवीं तद्वचनास[6] प्रेमें, जन सेवितो तुपास कसा. ॥ २६
राजकुळ सुखें नांदे, देती वर विप्र ज्या सदाशी[7], तें; ।
निर्ववीं[8] निरीक्षणें, जसि संतति बरवी, प्रजा सदा शीतें[9]. ॥ २७
ढाळितिल जाळितिल हिमहेममया[10] कामकोपलोभ[11] नगा, ।
बा[12]! तनया! वात न या पापांचा या पथांत शोभन गा! ॥ २८
तुज सदुपदेश[13] भीष्में केलाचि असे, तथापि हें कांहीं[14] ।
कथिलें, कीं [15]करिती हृद्वाक् वात्सल्यें उगीच हेंका हीं[16]." ॥ २९
धर्म म्हणे, "करिन असें; कथिलें त्वां नीतिसार[17] सार मला, ।
त्यजुनि गुरूक्ता[18], इतरीं हा नच, [19]अलि जेविं सारसा[20] रमला. ॥ ३०

---

१. अन्वयार्थः—वत्सा धर्मीं (कर्तव्याचे ठायीं) सादर रहात (वर्तन ठेवून), सदुपदेश (साधूंचा उपदेश) आठिव (चित्तांत वागीव). धृतराष्ट्रानें केलेला पुढील उपदेश राजनीतीचा उत्तम मासला आहे. २. पाठभेदः—संरक्षाया. मंत्र=राजकार्यमसलत. ३. गुप्त. ४. धर्मराजास नारदांनीं केलेला उपदेश पहा. (सभापर्व.) ५. ह्यावरून विद्यालंकृताची योग्यता देवाच्या बरोबरीची आहे, हें उघड होतें. ६. विद्वज्जनांचें बोलणें. ७. सत्+आशी=उत्तम आशीर्वाद. अन्वयः—ज्या (राजकुळा)वर विप्र सदाशी देती, तें राजकुळ सुखें नांदे. ह्यावरून ब्रह्मवृंदांच्या वराची व आशीर्वादाची केवढी महती आहे, हें दिसून येतें. ८. संतुष्ट करीत जा. ९. प्रेमळ दृष्टीनें, शीतल नजरेनें. प्रजाजनांचा परामर्श आपल्या मुलांप्रमाणें सप्रेम दृष्टीनें घेत जा.—असा भाव. अर्थसादृश्यः—'प्रजाः प्रजाः स्वा इव तन्त्रयित्वा' (शाकुंतल नाटक अं० ५). १०. हिमनगाला व हेमनगाला, हिमालयाला व मेरूला. ११. बर्फ व सोनें हीं जाळणें शक्य नाहीं, व डोंगर ढळविणें शक्य नाहीं. परंतु कामकोपलोभ या तिकलीचा प्रताप इतका कांहीं विलक्षण आहे, कीं तो बर्फाचा डोंगर व सोन्याचा डोंगर यांना सुद्धां ढळवील व जाळून खाक करून टाकील. १२. अन्वयार्थः—बा तनया! गा! या पापांचा (कामक्रोधादिकांचा) वात (वारा) या पथांत (तुझ्या शासनक्रमांत) शोभन (चांगला, हितावह) न. १३. चांगला उपदेश. भीष्माच्या उपदेशासंबंधें शांतिपर्व व अनुशासनपर्व पहा. १४. थोडेंसें. पाठभेदः—का हो. १५. अन्वयार्थः—कीं (कारण) हृद् (हृदय) व वाक् (वाणी) हीं वात्सल्यें (प्रेमानें) उगीच हेंका (आग्रह, उपदेशाचा आग्रह) करिती. 'हृद्वाक्' ऐवजीं 'दृग्वाक्' असा पाठभेद. १६. पाठभेदः—हो. १७. नीतीचें श्रेष्ठ तत्व; उत्तम नीतिबीज. १८. वडिलांचें वचन. १९. भ्रमर. २०. कमळाला. हें 'त्यजुनि' याचें कर्म.

हित सांगुनि **धर्मा**ला राजा अंतःपुरांत तो गेला, ।
त्यासि म्हणे **गांधा**री, 'सांगावा मज विचार, जो केला. ॥ ३१

आलें सुतापसत्वें जरि राया ! तव मना सजायाचें[1], ।
तरि करिशिल केव्हां तूं या स्थानाहुनि वनास जायाचें?' ॥ ३२

भूप म्हणे, 'पुत्रांचीं श्राद्धें करुनि, द्विजांसि तर्पूनी, ।
गांधारि! शीघ्र निघतों, सर्वस्व ब्राह्मणांसि अर्पूनी. ॥ ३३

आज्ञा घ्यायाकरितां आधीं सर्व प्रजेसि आणवितों; ।
इतुकेंचि राहिलें, हें कर्तव्य **युधिष्ठि**रासि जाणवितों.' ॥ ३४

धर्मासि नृपें सांगुनि[2], **धर्में**हि सकळ जनासि, पाठविलें[2], ।
वर्ण[3] सकळही आले, कीं प्रभुनें आपणासि आठविलें. ॥ ३५

नगरींचे, देशींचे, जन आटोकाट[4] दाटले[5] थाट, ।
दे[6] वेत्रपाणिवांचुनि वृंद वहाया न वायुला वाट. ॥ ३६

नृप भेटुनि त्यांसि म्हणे, 'सज्जन हो! जेविं वायुसह वास[7], ।
तेविं तुम्हांसह **भा**रत[8], अविट[9] सदां यावदायु[10] सहवास[11]. ॥ ३७

जें आप्तहो[12]! वदतसें, हें माझें वचन आयकोनि करा; ।
आली[13] मति वनिं जाया, माहेरीं जेविं बायको, निकरा[13]. ॥ ३८

व्यासें, **धर्में**हि, दिली आज्ञा जाया तपोवनास मज, ।

---

१. शोभणें. या गीतींतील 'सजायाचें' (=सजणें) व 'जायाचें' (=जाणें) हीं मूळचीं षष्ठयंत रूपें असून क्रियादर्शक नामांप्रमाणें योजिलीं आहेत. सजायाचें=सजायाचें कार्य. जायाचें=जायाचें कार्य. २. सांगून पाठविलें=बोलवणें धाडिलें; येण्याकरितां निरोप धाडिला. ३. ब्राह्मण-क्षत्रियादि जाति. ४. समस्त. ५. रीघ न मिळे असे एकत्र झाले. अर्थात् अति गर्दी उडाली. ६. अन्वयार्थः—वेत्रपाणिवांचुनि (भालदाराशिवाय) वायुला वहाया वृंद (समूह, गर्दी) वाट न दे. त्या ठिकाणीं वायूस सुद्धां वाट मिळविण्यासाठीं भालदाराची जरूर लागे, इतकी गर्दी झाली होती. ७. गंध. गंध (चांगला किंवा वाईट) ह्याचें वायूशीं नित्य साहचर्य असतें, ह्यावरूनच वायूस 'गंधवाह' असें नांव आहे. ८. भरतकुलोत्पन्न राजे. ९. कंटाळा ज्यांत नाहीं असा, प्रेमळ. फार दिवस कोणत्याही गोष्टीचा सहवास झाल्यानें त्या गोष्टीचा तिटकारा येण्याचा संभव असतो. पहा, 'अतिपरिचयादवज्ञा संततगमनादनादरो भवति.' १०. आजन्म. ११. संगति, साहचर्य. १२. सत्य बोलणारे, स्पष्टवक्ते! 'आप्तस्तु यथार्थवक्ता.' राजानें प्रजाजनांस 'आप्त' म्हटलें आहे, तेव्हां त्या काळीं प्रजाजन राज्यांत घडणारा कोणताही अयोग्य प्रकार राजांस स्पष्ट कळवीत असत व त्याचा राजांस रागही येत नसे. १३. 'निकरा येणें'=हट्टाला पेटणें, आग्रहास पडणें, बेतावर येणें.

कीं आहे [१]यां सुज्ञा [१]राया, जसि [२]त्या [२]तपोधना, [३]समज. ॥ ३९
द्यावी तुह्मींहि आज्ञा मज; न करावी [४]विचारणा कांहीं, ।
[५]मत्परिणाम घडावा बहु बरवा, यांत [६]वांकडें नाहीं. ॥ ४०
[७]प्रीति जसी, प्रेमल! हो!, जी तुमची आमुची सदा आहे, ।
देशांतरस्थभूपप्रकृतिप्रेमोपमा न ती साहे. ॥ ४१
आहें [८]सुतविरहाकुळ, [९]उपवासक्षीण, [१०]यां [१०]वयें [११]श्रांत; ।
[१२]भ्रांत नसें झालों जों, तों मी पाहेन [१३]आपुला प्रांत. ॥ ४२
[१४]गेलें या **पांडुसुतीं**, सत्पुरुषवरीं, **युधिष्ठिरीं** राज्य; ।
[१५]प्राज्य सुख मला झालें; [१६]ससितीं दुग्धींच सांडलें [१७]आज्य. ॥ ४३
[१८]यां पुत्रैश्वर्याहुनि तें [१९]पुत्रैश्वर्य होय फार [२०]उणें, ।
हा कोठें, तो कोठें? [२१]तदधिक सत्पुरुष **धर्म** कोटि[२२]गुणें. ॥ ४४
[२३]गति वनवासावांचुनि या संसारांत काय हो! मातें? ।

---

१. ह्या धर्मराजास. २. व्यासास. ३. समजूत, ज्ञान. ४. कांकूं, पंचाईत, अनुमान, चौकशी. ५. माझा अंत, शेवट, अखेर, निर्गत. ६. वावगें. ७. अन्वयार्थ:—प्रेमल हो! (प्रेम ठेवणारांनो!) जी तुमची आमुची प्रीति जसी सदा आहे, ती देशांतरस्थभूपप्रकृतिप्रेमोपमा (दुसऱ्या कोणत्याही देशांतील राजा व प्रजाजन यांजमधील प्रीतीची उपमा) न साहे. तुमच्या व आमच्या मधील प्रेम इतकें दृढ व निर्मल आहे, कीं त्याला कोणत्याही देशांत तुलनाच आढळत नाहीं.—असा भाव. ८. पुत्रांच्या वियोगानें व्याकुळ. ९. अन्नग्रहणाच्या अभावानें वाळलेला. १०. ह्या वृद्धापकाळामुळें. ११. थकलेला. १२. भ्रमिष्ठ, 'साठी, बुद्धि नाठी' असा. १३. वनोद्देश. वनामध्यें जाऊन तपश्चर्या करणें ही गोष्ट बुद्धीस भ्रम होण्यापूर्वींच साधणार. १४. ह्या गीत्यर्धांत धर्मराजास तीन विशेषणें दिलीं आहेत व तीं यथार्थ आहेत. (१) 'पांडुसुत.' धृतराष्ट्र अंध असल्यामुळें पांडूस राज्यावर बसविलें होतें व त्यानें राज्य चांगुलपणानें केलें व त्याचा मुलगा तसेंच राज्य चालवील, असें म्हणणें यथार्थच होय. (२) सत्पुरुषांमध्यें श्रेष्ठ. यामुळें त्याच्या राज्यकारभाराच्या चांगुलपणाबद्दल शंकेचें कारणच नाहीं. (३) युद्धाचे ठायीं स्थिर. यामुळें तो राजलक्ष्मीस प्रिय असावयाचा हें निर्विवाद होय. 'राजकुलजन्म' 'सौजन्य' आणि 'शौर्य' असे राजास अवश्य लागणारे गुण धर्मराजाच्या ठायीं होते. तेव्हां ह्याच्या शासनकाळीं राजलक्ष्मी चिरकाल नांदणारच म्हणजे राज्याची अवनति होणें शक्य नाहीं.—असा ध्वनि. १५. पुष्कळ. १६. शर्करायुक्तीं. हें 'दुग्धीं' ह्याचें विशेषण. १७. तूप. धर्मांच्या ठिकाणीं जो 'पांडुसुतत्व, सत्पुरुषवरत्व व युधिष्ठिरत्व' यांचा सुयोग घडून आलेला होता, त्याशीं साजेल असाच येथें 'सिता (साखर) दुग्ध व आज्य' यांचा योग वर्णिला आहे. १८. धर्मराजाच्या वैभवापेक्षां. १९. दुर्योधनाचें वैभव. २०. कमी. २१. त्या दुर्योधनापेक्षां अधिक. २२. कोटीपटीनें. २३. उपाय, आसरा.

वृद्धांध, अपुत्रहि, मी करिन तपोग्नींत कायहोमातें[1]. ॥ ४५

यास्तव आज्ञा द्यावी आजि तुम्हीं, वृद्ध हा तपो[2] रानीं; ।
यांकरवीं[3] जोडविले[4] निःसार भवासि हात पोरांनीं.' ॥ ४६

ऐसें आज्ञेकरितां बहु विनयें विनविलें महिवरानें, ।
कोणी[5] किमपि न देती उत्तर, बहु दाटले गहिंवरानें. ॥ ४७

पुनरपि भूप म्हणे, 'या क्षितितें शंतनु अगाधमति पाळी[6], ।
मग दे शांतनवप्रतिपाळित[7] मत्तात[8] मनुजपति पाळी[9]. ॥ ४८

पांडु मग प्रतिपाळी, केलें[10] सत्कीर्तिनें पद भ्राल्या, ।
मी किति? तुम्हीच गातां त्याच्या सद्गुणगणा[11] अदभ्रा[12] त्यां[13]. ॥ ४९

म्यां तुमची शुश्रूषा केलीच नसेल नीट अंधानें, ।
[14]अंजलि केला, याच्या ध्यावी[15] परिपूर्ण करुनि बंधानें. ॥ ५०

दुर्योधन राज्य करित होता, तेव्हां कुबुद्धि तो[16] [17]कांहीं ।
करिता झाला तुमच्या अपराधातें असाधु[18], कीं नाहीं[19]? ॥ ५१

स्पष्ट बुडविली [20]धर्मस्थिति, नीति, क्षिति, महाखळें तनयें, ।
केला विमर्द[21] दारुण तैसा तो बहु दुराग्रहें अनयें. ॥ ५२

अपराध सर्व माझा, यास्तव केला तुम्हांसि अंजलि हो! ।

---

१. शरीरहोमातें. २. तपश्चर्या करो. ३. मजकडून. ४. यांकरवीं संसारास हात जोडविले=याला संसाराचा वीट आणला; मला संसारांत जेरीस आणलें. ५. सद्गदित झाले व त्यांच्या मुखावाटे शब्द निघेना. ६. संरक्षिता झाला. ७. भीष्मानें संरक्षिलेला. ८. विचित्रवीर्य. ९. क्रम. 'पाळी दे'=पाळी फेडी, परंपरेनें आलेलें राज्याचें जोखीम शिरावर घेता झाला. १०. भ्राल्या सत्कीर्तीनें पद केलें=त्या माझ्या भावाला सत्कीर्तीनें आपलें वसतिस्थान केलें; तो माझा भाऊ नांवलौकिक संपादिता झाला. ११. गुणसमुदायास. १२. विपुल, विस्तृत अशा. १३. सर्वमान्य, सर्वविश्रुत अशा. १४. अन्वयार्थः—अंजलि केला (हात जोडले,) याच्या बंधानें (अंजलिबंधानें, मीं हात जोडले हें पाहून) [ती शुश्रूषा] परिपूर्ण करून घ्यावी (त्या सेवेंत जी न्यूनता असेल ती भरून पावा). 'अंजलिबंध'=हात जोडणें, हाताची जोडणी. १५. 'धावी' असें पाठांतर. १६ '°नें' असें पाठांतर. १७. हें 'अपराधातें' याचें विशेषण. १८. दुष्ट, अनीतीनें वागणारा. १९. अन्वय–दुर्योधन राज्य करित होता, तेव्हां तो असाधु कुबुद्धि तुमच्या कांहीं अपराधातें करिता झाला, कीं नाहीं [झाला]? २०. धर्मरूढि. २१. संहार.

वंध्यत्व लिहो भाळीं विधिचें, कदपत्य[1] न, करकंज[2] लिहो.[3] ॥ ५३
हतपुत्र, वृद्ध, दुःखित, पूर्वनृपाचा अचक्षु हा तनय; ।
ह्मणुनि क्षमा करावी, जरिहि नसें मी क्षमार्ह हीतनय.[4] ॥ ५४
पहिल्यापासूनि पटी बांधुनि, झाली अचक्षु गांधारी, ।
नो[5] तरि सुना पहातां, येती शतदा[6] दिसांत आंधारी. ॥ ५५
मागतसे आज्ञेतें, मजसहित करावयासि सुतपा, हे;[7] ।
राहेल काय? होते शत, त्यांतुनि एकही न सुत पाहे. ॥ ५६
आलों शरण तुम्हांला, वाहतसों नित्य शोकसरिदोघें,[8] ।
अवलंबूनि[9] तरों द्या तूर्ण तपोरण्यवसतितरि[10] दोघें. ॥ ५७
रक्षिल तुम्हांसि हरिसा,[11] विधिसा, हा धर्म वत्स राघवसा;[12] ।
येथें[13] नाहीं कामक्रोधाहंकारमत्सराघ,[14] वसा.[15] ॥ ५८
हा निरविलों[16] तुम्हांला म्यां चिंतास्पर्शमणिधनन्यास,[17] ।
बहु सावधान चित्तें संरक्षा नित्य या अनन्यास.[18] ॥ ५९
जेवि किजे[19] पुत्रकरीं अंतीं सर्वस्वआयुधन्यास,[20] ।

---

१. दुष्ट संतति. २. हस्तकमळ. ३. वंध्यत्वाचें ब्रह्मलिखित कपाळीं असो, पण दुष्टपुत्राचें नको. अर्थसादृश्यः—वरं गर्भस्रावो वरमृतुषु नैवाभिगमनं वरं जातप्रेतो वरमपि च कन्यैव जनिता । वरं वंध्या भार्या वरमपि च गर्भेषु वसतिर्न चाविद्वान्रूपद्रविणगुणयुक्तोपि तनयः ॥ 'कुसंतानापेक्षां निसंतान बरें.' मनुष्याच्या जन्मापूर्वी त्याचे कपाळीं ब्रह्मदेव होणाऱ्या गोष्टी लिहून ठेवितो अशी समजूत आहे व तेंच नशीब. पहा 'लिखितमपि ललाटे प्रोज्झितुं कः समर्थः'. ४. टाकिली आहे नीति ज्यानें असा; अनीतिमान्, दुर्वर्तनी. ५. नाहींपेक्षां, अशा रीतीनें जर अंधत्व स्वीकारिलें नसतें तर. ६. शेंकडों वेळां. दिवसांतून शंभरदां तिजला दुःखानें घेरी आली असती. ७. ही गांधारी. ८. शोकरूप नदीच्या प्रवाहानें. आह्मी दोघें शोकाच्या वाहटीस लागलों आहों. ९. साहाय्य घेऊन, आश्रय करून. १०. तपोवननिवासरूपी नौका. ११. विष्णूप्रमाणें. सृष्टीची स्थिति करणें हें काम विष्णूचें आहे. १२. रामाप्रमाणें. उत्कृष्ट राजशासनास 'रामराज्याची' उपमा ही केवळ लोकोक्ति होऊन बसली आहे. १३. ह्याच्या राज्यांत. १४. काम, क्रोध, अहंकार आणि मत्सर व पाप. १५. रहा. १६. तुमच्या ओटींत घातला. १७. चिंतामणि व स्पर्शमणि (परिस) व द्रव्य यांची ठेव. येथें धर्मराजास 'चिंतामणि' म्हटलें आहे व 'परिस' म्हटलें आहे तें फार मार्मिक आहे. प्रजेच्या इष्ट कामना हा पूर्ण करणारा म्हणून 'चिंतामणि'. व 'परिस' आत्मस्पर्शानें लोखंडास सुवर्ण करितो तर हा आत्मसंसर्गानें अज्ञानास सुज्ञ व दुष्टास सुष्ट करणारा म्हणून 'स्पर्शमणि.' १८. ज्यास वडिलाचें पाठबळ नाहीं, अशास. १९. करावा. २०. मालमत्ता व सोनें नाणें ह्यांचें समर्पण. आयुध=सोन्याचे दागिने.

केलें तुम्हीं तसें, [1]कीं दिधलें सर्व [2]स्वआयु धन्यास. ॥ ६०
[3]विप्रिय करिता झालों तुमचें मी, मत्सुतादि, [4]मैज्जन [5]कीं, ।
[6]तें द्या मज, मन्नमनीं [7]अथवा ठेवूनि दृष्टि मज्जनकीं.' ॥ ६१
ऐसीं करुणावचनें ऐकुनि, जन सर्व [8]कोंडला, '[9]जा' या ।
वर्णा वदेल कैसें? त्याचें लोकांत तोंड लाजाया. ॥ ६२
पुनरपि करी, सभेला म्हणवाया 'हाय' राय [10]काकुळती; ।
बोलेलें[11] काय, जीचें हृदय करुणशब्दसायकाकुळ, ती. ॥ ६३
'[12]द्यावें तपोवन मला, भक्ताला जेविं पद रमागेहें,' ।
सर्वजना दीनपणें नरपति, [13]पसरूनि पदर, मागे हें. ॥ ६४
आधीं रोदन पुष्कळ, मग करुनि विचार, त्या [14]संशोकांहीं ।
ऋग्वेदी [15]**सांब** द्विज वक्ता केला समस्त लोकांहीं. ॥ ६५
तो **सांब** म्हणे, "राजा! जें तूं वदलासि, तें सकळ साचें; ।
तव वचनाचें, जैसें [16]प्रासादाच्या महत्व [17]कळसाचें. ॥ ६६
कोणी प्रजांसि अप्रिय राजा, एकींहि जो उणा [18]अंशीं, ।
[19]कुरुकुळतिलका! ऐसा झाला नाहींच भूप या वंशीं. ॥ ६७
भ्रात्यापरि, तातापरि, आम्हां प्रतिपाळितां तुम्ही करुण, ।
[20]अनुराग तुम्हांआधीं, जैसा [21]सूर्योदयापुढें अरुण. ॥ ६८

---

१. कारण. २. धन व प्राण. अर्थात् पैशानें व प्राणानें तुम्ही स्वामिकार्यास झटलांत असा भाव. ३. अहित. ४. माझीं माणसें. ५. अथवा. ६. तें विप्रिय मज द्या=तें अहित मजला परत द्या, तें विसरून मजला त्याबद्दल क्षमा करा, असा भाव. ७. किंवा माझ्या बापाकडे पाहून. पहा. 'प्रणयिषु वा दाक्षिण्यादथवासद्वस्तुपुरुषबहुमानात् । शृणुत जना अवधानात्क्रियामिमां कालिदासस्य ॥ (विक्रमोर्वशी अ० १ प्रस्तावना). ८. संकोचला किंवा गहिंवरानें दाटला, भरून आला. ९. अन्वयः—त्याचें तोंड लोकांत लाजाया, 'जा' या वर्णा कैसें वदेल? १०. विनवणी. ११. अन्वयार्थः—जीचें (ज्या सभेचें) हृदय करुणशब्दसायकाकुळ (दयेचा पान्हा फोडणारे शब्द हेच बाण त्यांयोगें विव्हळ असें) [होतें], ती काय बोलेल? अर्थात् कोणाच्यानेंही कांहीं बोलवेना इतके ते सद्गदित झाले. १२. अन्वयार्थः—जेविं रमागेहें (लक्ष्मी आहे घरीं ज्याच्या त्यानें विष्णूनें) भक्ताला पद (स्वपद, स्वर्ग) द्यावें [तेविं तुम्हीं] मला तपोवन द्यावें. १३. 'पदर पसरणें' ही गोष्ट विनवणीची शिकस्त सूचित करिते. १४. दुःखितांनीं. १५. एक ब्रह्मर्षि. १६. राजवाड्याच्या. १७. शिखराचें. १८. लेशानें, अल्प भागानें. १९. हें विशेषण देऊन प्रजाजनांच्या मुखरानें असें सुचविलें, कीं 'तूंही पण यत्किंचितही कमी नाहींस.' २०. प्रेम. २१. सूर्योदयापूर्वीं.

दुर्योधनें न केलें कांहींच अयुक्त अब्द तेरा, ज्या ।
[१]अस्मद्रंजननिरता नेणति, लावूत शब्द ते, राजा. ॥ ६९
[२]त्वां [३]व्यासोक्त करावें, होतें करितां [४]तदुक्त [५]जन्महित, ।
आम्हां सर्वांचा तो परमगुरु ज्ञानसिंधु [६]सन्महित. ॥ ७०
[७]धरुनि व्यसनांत तुझी, तरलों आम्हीं समस्त जन, कास, ।
[८]विरहीं दुःखित होवूं, बाळ जसे आठवूनि जनकास. ॥ ७१
शंतनु, **चि**त्रांगद नृप, तो तव तातहि **वि**चित्रवीर्य, नृपा! ।
पांडु, जसा प्रतिपाळी, त्वत्सुतहि तसाचि बहु करूनि कृपा. ॥ ७२
[९]तातीं तसेचि होतों विश्वस्त **सु**योधनीं, नसे तातें ।
केलें असें प्रिय; नृपीं जें सुख आम्हां, [१०]वनीं न सेतातें. ॥ ७३
तैसाचि हा **यु**धिष्ठिर करिल [११]बहुसहस्रवत्सर हितातें, ।
[१२]याची श्रितरहिता मति पावे, जें धेनु वत्सरहिता, तें. ॥ ७४
[१३]वृत्तें जसा **कुरु**, जसा **सं**वरण, जसाच [१४]कीर्तिलें **भ**रत, ।
हा धर्मज्ञ **यु**धिष्ठिर राजर्षि तसाच कीर्तिलाभरत. ॥ ७५
[१५]मधुसंश्रित कोणितरी तरु म्हणतो, होवुनी विपल्लव 'हा' ? ।
देवा! स्वप्नींहि न तव आश्रित जन पावला [१६]विपल्लव हा. ॥ ७६
देवा! ज्ञातिविमर्दीं म्हणसी **दु**र्योधनास हेतू, तें ।
न तसें, दैवचि कारण, ऐसें जन विनवितात हे तूतें. ॥ ७७
अक्षौहिणी क्षयातें गेल्या अठरादिसांत अठरा ज्या, ।

---

१. अन्वयार्थः—ज्या अस्मद्रंजननिरता (आमचें समाराधन करण्यांत निमग्न अशा) राजा [=दुर्योधनास] [जे] नेणति, ते [त्या राजा] शब्द लावूत (दोष देवोत). २. सर्वसंग्रहांत गीति ७०–७१ यांचा उलट क्रम आहे. ३. व्यासानें सांगितल्याप्रमाणें. ४. व्यासाचें बोलणें. ५. जन्माचें सार्थक. ६. साधूंनीं स्तविलेला. ७. कास धरूनि=तुझ्या आश्रयानें. ८.-वियोगानें. ९. सार्थान्वयः—तातीं तसेचि (प्रत्यक्ष बापाप्रमाणेंच) सुयोधनीं विश्वस्त (विश्वास पावलेले) [होतों]. [किंबहुना] तातें (आमच्या वडिलांनीं) असें (आमच्या राजानें केल्या प्रकारचें) प्रिय (हित) केलें नसे; आम्हां नृपीं जें सुख, तें सेतातें वनीं न. १०. पाण्यांत. ११. हजारों वर्षें. १२. सार्थान्वयः—श्रितरहिता (आश्रितहीना, आश्रयास असणाऱ्याचा वियोग पावलेली) याची (युधिष्ठिराची) मति, वत्सरहिता धेनु जें [दुःख] पावे, तें पावे. १३. वर्तनानें. १४. वर्णिला, गाजला. १५. अन्वयार्थः—मधुसंश्रित (चैत्र महिन्याचा आश्रय करणारा) कोणी तरी तरु, विपल्लव (अंकुररहित) होवुनि, 'हा' म्हणतो? अर्थात् नाहीं, कारण चैत्रामध्यें सर्व तरूंस नवी पालवी येतेच. १६. विपत्+लव=यत्किंचित् दुःखही, विपत्तीचा अंशही.

तेथें दैवचि कारण मुख्य, नव्हे [1]त्वत्तनूजहठ राजा! ॥ ७८

सुजनातें सुखवाया सुयशें, वरिती [2]पैरासुता राजे; ।
[3]निववििति चंदन गंधें, छेदूं देती परा सुतारा जे. ॥ ७९

[4]दिव्यें देहें पावुनि व्हाया सुरपूज्यमान सत्य, जुनीं ।
तुच्छें जीं, तीं, गेले ते धर्मी निरतमानस, त्यजुनी. ॥ ८०

दुर्योधनादि सर्व क्षत्रिय गेलेचि वीरलोकातें, ।
त्यांच्या आम्ही कोणी आप्तजन नसोंचि योग्य शोकातें. ॥ ८१

राजा! [5]निजायुतें तूं, होवुनि [6]गुरुपादनत, [7]तपुनि [8]वेचीं; ।
तव कीर्ति [9]कार्तिकींच्या नेत्रें झांकील [10]संतत [11]पुनिवेचीं. ॥ ८२

धर्ममतिला प्रजा तसि आवडते, जेविं आइला [12]दुहिता, ।
क्षितिला सुखविल, [13]आहितवन्हि जसा विप्र गाइला [14]दुहिता. ॥ ८३

विप्रांच्या पूर्वप्रभुदत्ता [15]वृत्ती [16]जपोनि चालवितो, ।
देउनि नव्याहि, घ्याया सुयशें, अर्थिद्विजांसि [17]पालवितो. ॥ ८४

सुतपस्याचि करावी अस्मच्चिंता तुवां कदा न मनें, ।
देतों निरोप, करितों बा! आम्ही सर्व हे तुला नमनें.' ॥ ८५

ऐसी आज्ञा देतां, बहुतचि तो जन मनीं असुख पावे, ।
हर्षे नृप, कीं त्याच्या चित्तांत तपोवनीं असु खपावे. ॥ ८६

देतां निरोप, नृप, दृढ करुनि हृदय, त्या जनासि कर जोडी, ।
जाणों सुहृदां, [18]अटकळ [19]असुमोक्षाची पहावया, सोडी. ॥ ८७

---

१. तुझ्या मुलाचा दुराग्रह. २. प्राणवियोग. ३. पाठभेद—विनविति. ४. सार्थान्वयः—धर्मी (कर्तव्याचे ठायीं) निरतमानस (लग्नमति) ते (राजे), जीं (देहें) जुनीं व तुच्छें (अव्हेरायास योग्य), तीं त्यजुनि, [व] दिव्यें देहें पावुनि (लाभून), सत्य सुरपूज्यमान (देवांमध्यें मान्य) व्हाया (होण्याकरितां) गेले. ते राजे स्वकर्तव्यापायीं इहलोक सोडून गेले व त्यांस सद्गति त्यामुळें प्राप्त झाली आहे—असा भाव. ५. आपल्या आयुष्यातें. ६. गुरुचरणीं लीन होऊन. ७. तपश्चरण करून. ८. संपीव. ९. पाठभेदः—कार्तिकेच्या. १०. निरंतर. ११. पौर्णिमेचीं. कार्तिकेच्या पुनवेचीं नेत्रें सतत झांकील. तुझी कीर्ति कार्तिकपौर्णिमेपेक्षांही शुभ्रतर उज्ज्वल राहील.—हा भाव. १२. कन्या. १३. अग्निहोत्री. १४. दोहन करणारा. अग्निहोत्राला गाय अगदीं अवश्य आहे, हें लोकविश्रुतच्च आहे. १५. पूर्वींच्या राजांनीं दिलेलीं वर्षासनें. १६. काळजीपुरःसर. १७. बोलावितो. १८. अजमास, अनुमान, कल्पना. १९. प्राणोत्क्रमण. प्राणवियोगीं प्राण्याला जें दुःख होतें, तेंच धृतराष्ट्राला मित्रवियोगीं झालें, हा या गीत्यर्धाचा भाव.

बहु निर्भर्त्सुनि त्या अनुजासि, म्हणे **धर्म**, "तू उगाचि रहा,
[1]कीं म्हणवी गुरुनिंदा परलोकीं निजकृतानुगा चिर 'हा.'" ॥ १०६

अर्जुन म्हणे, 'गुरुपुढें **भी**मा! म्यां बहुत काय बोलावें? ।
[2]सकलंकहि हेम[3] महित[4], तें पितळेसीं कधीं न तोलावें. ॥ १०७

[5]विसरति अपकारातें उपकारातेंचि साधु आठविती, ।
बा! सोसितां न सा विति होय वपु, न सोसितां न आठ विती.' १०८

वि[6]जयोत्साह जया बळ, वाताचा जेविं मर्मरा जव, दे; ।
तो त्या कनिष्ठ ताताप्रति ऐसें साधु **ध**र्मराज वदे. ॥ १०९

'निज कोशांतुनि देतों; न्यावें, जितुकें अभीष्ट[7] जनका जें; ।
व्हावें कशास तें? बा! आप्तांचीं जें न करिल धन [8]काजें.' ॥ ११०

ऐसें **विदु**रासि कथुनि, **ध**र्में बहु धन्य सुयश अर्जुन, हो! ।
यापरि वाक्कुसुमांहीं पूजियला तो सुशील **अर्जुन** हो. ॥ १११

त्या **अर्जु**नाकडे तो **भी**म कटाक्षें[10] करूनियां पाहे, ।
जें 'साधु साधु' वदला अनुजासि, न [11]आपणा, न तें साहे. ॥ ११२

पुनरपि **ध**र्म म्हणे, "बा! **विदु**रा! **भी**मीं नृपें न कोपावें, ।
प्रार्थुनि तुवां म्हणावें, '[12]परुषोक्त मनीं धरूं नको, [13]पावें. ॥ ११३

कष्टी वनांत झाला, साहुनि बहु [14]वृष्टि, [14]शीत, [14]आतप, हा, ।
[15]तेजस्विजना कंपद परिभव, दीपासि लवहि वात, पहा. ॥ ११४

---

१. अन्वयार्थः—कीं (कारण) निजकृतानुगा (=निज+कृत+अनुगा=आपण केलेली व आपल्या पाठीमागून येणारी) गुरुनिंदा (वडिलांची निर्भर्त्सना) परलोकीं चिर 'हा' म्हणवी. आपण या लोकीं जीं बरींवाईट कर्में करितों, तीं परलोकीं आपल्याबरोवर येऊन आपणांस सुखदुःखें भोगावयास लावितात, या कल्पनेवर येथें कटाक्ष आहे. २. डांकलग. ३. सुवर्ण. ४. स्तुत्य मानिलेलें. ५. या गीतींत पूर्वार्धांत साधूचें लक्षण दिलें आहे व उत्तरार्धांत 'सहन केल्यानें मनुष्य झिजत नाहीं व असहिष्णुतेमुळें फुगत नाहीं,' मनुष्याची उंची नेहमीं स्वतःच्या सात विती असते, ती असहनशीलत्वानें वाढत नाहीं किंवा सहनशीलपणानें खुटत नाहीं.'—असें सांगितलें आहे. सा=सहा. ६. सार्थान्वयः—वाताचा (वाऱ्याचा) जव (वेग) जेविं मर्मरा (पर्णादिकांच्या खळखळ आवाजातें) बळ दे, [तेविं] जया (ज्याला) विजयोत्साह (अर्जुनाच्या अंगचा हुरूप) बळ दे, तो साधु धर्मराज त्या कनिष्ठ ताताप्रति (त्या धाकट्या चुलत्यास अर्थात् विदुरास) ऐसें (ह्याप्रमाणें) वदे. ७. रुचतें, आवडतें. ८. कार्यें. ९. संपादून. १०. सकोपदृष्टीनें. ११. सर्वसंग्रहपाठ—आपणास. १२. कठोरभाषण. १३. कृपा कर. १४. पाऊस, थंडी आणि ऊन. १५. पाणीदार मनुष्यास, मानी पुरुषास.

बहुतचि दुःखित, यास्तव करितो हा भीम मत्सरा, याचा ।
कोप मनीं न धरावा; मी तैसा हाहि वत्स रायाचा. ॥ ११५
जें कांहीं माझ्या, कीं या विजयाच्या, असेल धन धामीं; ।
स्वामी त्याचा राजा धृतराष्ट्र, स्पष्ट सांगतों वा ! मी. ॥ ११६
संकोच[1] धरावा त्या प्रभुनें चित्तांत न वसु[2] खरचाया, ।
गुरुच्या[3] गुण प्रसादीं, न तसा वित्तांत, नव सुख रचाया. ॥ ११७
तनुसह सर्वस्वाच्या मी कांटाळेन न व्ययशतातें', ।
ऐसें सांग पित्या, कीं जोडावें नित्य नव्य यश तातें." ॥ ११८
विदुरें तसेंचि सांगुनि सर्वहि, धृतराष्ट्र भूप हर्षविला, ।
पौत्रशतीं तो त्याणें शुभकाळें मेघसाचि वर्षविला. ॥ ११९
भीष्मद्रोणजयद्रथबाह्लिकतत्पुत्रशकुनितनयशतें, ।
श्राद्धें त्यांचीं मागें करि नृप, बहु गाय साधुजन यश तें. ॥ १२०
दासीदासग्रामक्षेत्रसदनहस्तिवाजिशिबिकांहीं[10] ।
तोषविले[11] विप्र म्हणति, "अधिक गमेनाचि आजि शिबि[12] कांहीं." १२१
दे मणि[13], कांचन, शय्या, कन्या, गोधन, अजाविक[14], तराया. ।
कवि[15] म्हणति, "हंस घेउनि, यश देशील न अजा विकत, राया!" १२२
धृतराष्ट्र देववी शत ज्याला, त्याला सहस्र दे धर्म, ।
ज्यासि सहस्र, अयुत त्या, देत्यां[16] घेत्यांहि[17] व्हावया शर्म[18]. ॥ १२३

---

१. भीड. २. धन. ३. अन्वयार्थः—नव सुख रचाया (नवीन नवीन सुखें देण्याचा) गुण (जेवि) गुरुच्या प्रसादीं (कृपेमध्यें), तसा वित्तांत न. वडिलांच्या कृपेनें जसें सुख लाभतें, तसें सुख धनानें प्राप्त होत नाहीं. ४. शेंकडों प्रकारच्या खर्चांतें. ५. धृतराष्ट्रातें. ६. धृतराष्ट्रानें. ७. त्यानें धृतराष्ट्राकडून शेकडों योग्य मनुष्यांस मेघधारांप्रमाणें दानसंकल्पाचीं उदकें देवविलीं.—हा भाव. ८. बाह्लिक=प्रतीप राजाचा पुत्र व शंतनूचा कनिष्ठ भ्राता. ९. गातात. १०. शिबिका=पालखी. ११. संतुष्ट केलेले. १२. ह्या राजाची दातृत्वाबद्दल फार प्रसिद्धि आहे. इंद्र व अग्नि, हेससाणा व कपोत यांच्या रूपानें शिबिराजाचें सत्व कसोटीस लावण्यासाठीं आले असतां, शिबिराजानें, कपोताच्या भारंभार आपल्या शरीराचें मांस ससाण्यास देऊन, आपलें सत्व राखिलें, अशी कथा आहे. १३. रत्नें. १४. शेळ्यामेंढ्या. १५. अन्वयार्थः—कवि म्हणति, राया! हंस घेऊन अजा (ब्रह्मदेवास) यश न देशील. हंस हें ब्रह्मदेवाचें वाहन आहे. आणि हंसाचा रंग शुभ्र व कीर्तीचाही रंग शुभ्र असा कविसंकेत आहे. स्वयश देऊन ब्रह्मदेवाचा हंस मोबदला घेण्याची इच्छा धृतराष्ट्रास होणार नाहीं, इतकें त्याचें यश उज्ज्वल होतें, असा भाव. १६. दात्याला. १७. दान घेणाऱ्या विप्रांस. १८. सुख.

तर्पी सुहृदां दासां; त्या जेविं स्वपर[1] तोयदा[2] नाहीं; ।
स्त्रीच्याहि[3], आपुल्याही, अनृण[4] क्षितिपाळ होय दानांहीं. ॥ १२४
सर्वस्वदानमखसा[5] दश दिवस श्राद्धयज्ञ तो होय, ।
सकळ निववले भूपें, वर्षुनि धन, तोयदें जसें तोय. ॥ १२५

अध्याय तिसरा.

मग कार्तिकीदिनीं[6] तो प्रातःकाळींच पांडवा बाहे[7], ।
इष्टि[8] करुनि, तापसमुनिवेष[9] धरी, वल्कलाजिनें[10] वाहे[11]. ॥ १
नृप सिद्ध[12] होय, भार्यास्कंधीं अर्पूनि[13] बाहुला, जाया[12], ।
लागे[14] धर्मा गिळित्या मोहा ग्रस्तार्क राहु लाजाया. ॥ २
गांधारीचा बाहु स्वस्कंधीं घे सती पृथा वाटे[15], ।
कीं कुळवतीस गुरुजनभजन न घडतां, जिणें[16] वृथा वाटे. ॥ ३
हाहाकारसह उठे; अजिनें वल्कें[17], पटासि निंदुनि, घे; ।
समचि गृहांतुनि राजा जननयनांतुनिहि अश्रुबिंदु निघे. ॥ ४
किमपि न वदवे कोणा, कीं झाले बाष्पभाररुद्ध[18] गळे[19], ।
धर्माचें वपु सहसा[20], वीराचें जेविं करुनि युद्ध, गळे[21]. ॥ ५
या श्वश्रूश्वशुरांनीं[22] प्रीति त्यजिली, न परि सुनांनीं ती, ।
'न रडावें' ऐसें गुरु सांगति, तरि, 'म्हणति परिसुं[23] नों[23] नीती[24].' ॥ ६

---

१. आपपर, दुजाभाव. २. मेघाला. ३. पाठभेदः—स्त्रीचाहि, आपुलाही. ४. उतराई. ५. ज्यांत सर्व मालमत्ता दान दिली आहे, अशा यज्ञाप्रमाणें. ६. कार्तिकी पौर्णिमेच्या दिवशीं. ७. बोलाविता झाला. ८. होम. हा होम घरीं अग्नि ठेवणाऱ्या गृहस्थास दर पौर्णिमेस व अमावास्येस करावा लागतो. ९. तपश्चर्या करणाऱ्या ऋषीचा पोषाग. १०. वल्कलें आणि मृगचर्मे हीं. ११. धारण करिता झाला. १२. जाया सिद्ध होय=जावयास निघाला. १३. ठेवून. १४. सार्थान्वयः—ग्रस्तार्क (ग्रासिला आहे सूर्य ज्यानें असा) राहु, धर्मा (धर्मराजास) गिळित्या (ग्रासणाऱ्या) मोहा (भ्रमाला) लाजाया लागे. सूर्यबिंबासारखा तेजोराशि छायावृत व्हावा, ही गोष्ट आश्चर्यजनक तर आहेच, परंतु धर्मराजासारखा ज्ञानी पुरुष मोहपाशानें बद्ध व्हावा, हें तर त्याहूनही महदाश्चर्य होय; असा भाव. १५. मार्गांत. १६. जीवित. १७. वल्कलें. १८. गहिंवरानें दाटलेले. १९. कंठ. २०. एकदम. २१. पडे. २२. सासूसासऱ्यांनीं. २३. ऐकणार नाहीं. २४. उपदेश. वडिलांनीं जरी रडूं नका असें सांगितलें, तरी त्यांना रडें कोसळलेंच—असा भाव.

दुष्प्रापदर्शना[1] ज्या देवें तपनेंहि लेखिल्या होत्या, ।
सर्वजनें कुरुकांता उघड्या मार्गांत देखिल्या हो! त्या. ॥ ७
पांडव वनवासाला जातां, जें दुःख जाहलें होतें; ।
निघतां तपोवनाला धृतराष्ट्र जनास जाहलें हो! तें. ॥ ८
सर्वांस वर्धमानद्वारा[2]बाहीर परतवी राजा, ।
धर्मासि म्हणे, 'वत्सा! घेउनि सर्वांसि, परत, वीरा! जा.' ॥ ९
संजयविदुर न फिरती, सिद्धचि ते सुज्ञ शुद्ध वनवासा, ।
कविहृदयासि बहुरुचे त्याग[3]चि, बाळास उद्भव[4] नवासा. ॥ १०
राजा[5] अजातरिपुच्या, बहु विनवुनि[6], कृप युयुत्सु[7] दे हातीं, ।
शस्त्रें[8] न, कंप करुणें गुरुवचनें जेविं देति देहा तीं. ॥ ११
कुंतीतें धर्म म्हणे, 'मी पावायासि[9] नरवरा जातों, ।
शरदब्द[10] चातकाचा, माझा करि तेविं[11] न रव राजा तों. ॥ १२
माते समजावूनि[12] स्ववधूजन[13], तूं फिरोनि[14] नगरा जा, ।
जातो तपोवनीं हा व्हाया तेथिल नगांत नगराजा[15].' ॥ १३
धृतराष्ट्राला सोडुनि न पृथा, जसि सिंधुला[16] नदी, परते; ।

---

१. अन्वयार्थः—देवें तपनेंही (सूर्यनारायणानें सुद्धां) ज्या (सुना) दुष्प्रापदर्शना (दृष्टीस पडण्यास कटीण अशा) लेखिल्या (मानिल्या) होत्या. सूर्यकिरणाचा वाराही आजपर्यंत ज्यांस लागलेला नव्हता, त्या इतरांच्या नजरेस पडल्याचें नांव कशाला? २. मुख्य दरवाजाबाहेर, गणेशदरवाजाबाहेर. ३. संन्यास, मायापाशच्छेद. ४. उत्सव. ५. धृतराष्ट्र. ६. पाठभेदः—निरवुनि. ७. धृतराष्ट्राचा दासीपुत्र. ह्याचा चांगला सांभाळ व्हावा हें मनांत येऊन मोठ्या कळकळीनें त्यानें त्यास धर्मराजाच्या हवालीं केलें. ८. अन्वयार्थः—तीं (तशा प्रकारचीं) करुणें गुरुवचनें (अंतःकरणास पान्हा फोडणारे वडिलांचे शब्द) जेविं देहा कंप देति, [तेंवि] शस्त्रें न. वडिलांच्या तोंडून आंतड्यास पीळ पडून निघालेले शब्द ऐकून मनुष्यावर जो परिणाम घडतो, तो शस्त्राच्या घायापेक्षांही अधिक असतोः—असा भाव. ९. पोंचविण्यास. १०. अन्वयार्थः—[जेविं] शरदब्द (शरदृतूंतील मेघ) चातकाचा रव [अमान्य करी], तेविं राजा (धृतराष्ट्र) तों (तर) माझा रव (शब्द) न करि [अमान्य न करी]. अर्थात् शरदृतूंतील मेघ शुष्क असतात त्यामुळें चातकाची इच्छा त्यांच्या हातून तृप्त होत नाहीं पण राजा धृतराष्ट्र सदय आहे, तेव्हां तो माझा शब्द मोडणार नाहीं, असा भाव. ११. पाठभेदः—व्यर्थ. १२. समजूत घालून. १३. आपल्या सुनांच्या समुदायास. १४. परत. १५. वृक्षपति. निश्चल मनानें व शरीरानें पाऊस, ऊन्ह, वारा व थंडी सहन करून तपश्चरण करणाऱ्या तपस्व्याच्या कृश पण रांठ व कणखर अंगकाठीचें झाडाशीं असणारें साम्य चमत्कारजनक आहे. १६. समुद्रास.

गुरु[1] तों शिवचि; पतंगी अन्यत्र, त्यजुनियां न दीप, रते. ॥ १४
जाय तसीच वनपथीं, न[2] धरुनियां कंप[2], देतें[3] पाउल[3] ती, ।
दुसरी[4] हृदयीं, वरितां, त्यजुनि तशा संपदे, तपा, उलती. ॥ १५
धर्मासि म्हणे, "वत्सीं सहदेवीं त्वां प्रमाद[5] न करावा, ।
हा[6] म्यां, सरस्वतीनें जैसा पावों दिला न अक रावा. ॥ १६
कर्णाच्या[7], तळमळतें माझें, स्मरुनि स्वपाप, मन, घातें[7], ।
बापा! स्मरत असावें त्वां त्या[8] पितृतर्पणांत अनघातें[9]. ॥ १७
त्वां प्रीति उणी[10] होवूं द्यावी बा! मानदा! न देवीची[11], ।
देती[12] सती, सुधेची तेविं सुखाचें न दान दे वीची. ॥ १८
भीमार्जुनाहुनि समाधान करीं सर्वकाल नकुळाचें, ।
केवळ आजि तुजकडे वडिलपणें सर्व पालन कुळाचें. ॥ १९
शुश्रूषा या श्वश्रूश्वशुरांच्या[13] मी वनांत पायांची ।

---

१. अन्वयार्थः— गुरु तों शिवचि (खरोखर मंगलकारक) [होय]. पतंगी, दीप त्यजुनियां, अन्यत्र (इतर ठिकाणीं) न रते (सुख न पावे). २. निर्धास्तपणें. ३. पावलें टाकीत. ४. अन्वयार्थः—तशा संपदे त्यजुनि (अशा प्रकारच्या राज्यवैभवाला दूर लोटून) तपा वरितां (तपश्चरण स्वीकार करीत असतां) दुसरी (पृथ्वेवांचून इतर स्त्री) हृदयीं उलती (फुटती, तडून जाती). अन्यस्त्रीच्या हातून राजलक्ष्मीचा त्याग व तपश्चर्या-स्वीकार घडणें दुरापास्त होतें,—असा भाव. ५. अलक्ष्य, हेळसांड. ६. अन्वयार्थः—सरस्वतीनें जैसा रावा अक (दुःख) पावों न दिला, तैसा हा म्यां [अक पावों न दिला]. सहदेव कुंतीचा सावत्र मुलगा होता, परंतु त्याच्यावर तिचें सख्या मुलांपेक्षांही जास्त प्रेम होतें. सरस्वतीच्या लाडक्या पोपटाचा पंतांनीं आर्याभारतांत वारंवार उल्लेख केलेला आहेः—"भेटुनि देव मज म्हणे, 'अमरत्वें जिष्णुसींच तुकशील । चुकशील नच कधीं, हो जितवाणीपाणिवर्तिशुकशील. ॥" (अनुशासनपर्व, ६।४०); "मग आयकवी कृष्णा निजसूक्तिकलाप लाडकी राजा । प्याव्या वाणीकर्णें, करुनी बहुकल पलाड कीरा, ज्या." (शांतिपर्व, ३।५९). ७. कर्ण हा कौमार्यावस्थेंत झालेला आपला पुत्र आहे, असें युद्धसमाप्तिपर्यंत कुंतीनें बाहेर पडूं दिलें नव्हतें, पण क्रिया करण्याच्या वेळीं तें तिनें युधिष्ठिरास सांगितलें. आपण पूर्वींच ही गोष्ट कळविली असती, तर पुत्रनाशाचा अनर्थ टळला असता, असें वाटून ही पुत्रघाताची गोष्ट तिच्या मनास फार लागली.—असा भाव. ८. सर्वसंग्रहपाठ—या. ९. निष्पाप कर्णाला. कर्णालाही पितृतर्पणाचे वेळीं नित्य पाणी देत जा.—हा या अर्धाचा भाव. १०. कमी. ११. राणी द्रौपदी हिची. १२. अन्वयार्थः—सती (पतिव्रता स्त्री) [जेविं सुखाचें दान] देती, तेविं सुधेची वीचि (लाट) सुखाचें दान न दे. १३. धृतराष्ट्र व गांधारी हीं उभयतां वडील दीर व वडील जाऊ ह्या दृष्टीनें कुंतीला सासूसासऱ्यांच्या ठिकाणीं होतीं.

जातें करावया, बा! मजला संगति अनातपा[1] यांची. ॥ २०
न विसंबावें म्यां गुरुचरणांतें शेवटीं[2] अहेयांतें[3], ।
'स्वर्गविमान'[4] म्हणति कवि धर्मा! अरिवायुच्या[5] अहे! यातें." ॥ २१
ऐकुनि युधिष्ठिर म्हणे, होउनियां अधिक शोकपद[6] तीस, ।
"त्वां काय योजिलें[7] हें? माते! हें काय योग्य वदतीस? ॥ २२
जातीस कसी सहसा? स्वमुखें तुजला म्हणेन 'जा' मी न, ।
माते! म्हणेल काय, त्यागुनि जातां, नदीस 'जा' मीन? ॥ २३
विदुलेच्या[8] वचनांहीं पूर्वी देउनि तुवांचि उत्साहा[9], ।
युद्धासि सिद्ध केला सानुज निजपुत्र, करुनि कुत्सा[10], हा. ॥ २४
वधिले बहु नृप, आलें त्वत्प्रज्ञेनेंचि[11] राज्य पदरा[12] हें, ।
ते[13] मति कोठें गेली? भोगाया प्राप्तराज्यपद राहें. ॥ २५
स्वसुतांतें, स्ववधूंतें, जासी त्यागूनि याहि पणतूतें[14], ।
दुर्गम विषम वनवसति जननि! व्याकुळ करील पण तूतें." ॥ २६
असकृत्[15] 'प्रसीद'[16] ऐसें रडत जरि म्हणे सुपुत्र तो, तरि ती ।
जाय तसिच, अश्रुमिषें पुत्रस्नेह स्रवोनि होत रिती[17]." ॥ २७

---

१. अनुष्ण, शीतल, सुखावह. २. वृद्धपणीं. ३. टाकण्यास योग्य नव्हत असे, अत्याज्य अशा. हें चरणांचें विशेषण. ४. स्वर्गास (मोक्षपदास) जाण्याचें वाहन. ५. हे शत्रुरूप वाऱ्याच्या सर्पा! शत्रुनाशका! सर्प वाऱ्यावर उपजीविका करितात, अशी समजूत आहे. कुशलवोपाख्यानांत पंतांनीं हीच उपमा रामाला दिली आहे:—"विद्याश्रीमदमत्तमूढहृदयस्वर्द्विण्मरुद्वासुकी। माझा प्राणसखा, निरंतर असो श्रीरामराजा सुखी. ॥ (कुशलवो० ४।८). ६. शोकाचें स्थान अर्थात् शोकाकुल. ७. मनांत आणिलें. ८. ही सौवीर देशाच्या राजाची स्त्री; पतिमरणोत्तर हिचें राज्य सिंधुदेशाच्या राजानें घेतलें. ह्यावेळीं हिचा पुत्र वयानें लहान होता. पुढें तो वयांत आल्यावर वीरश्री उत्पन्न होईल अशा क्षात्रधर्माच्या गोष्टी पुत्रास सांगून, हिनें त्याच्या करवीं गेलेलें राज्य परत मिळविलें. (पहा उद्योगपर्व). ९. उत्तेजन किंवा वीरश्री. १०. चीड येण्यासारखें बोलून, चिडवून. ११. तुझ्या बुद्धिवैभवानेंच. १२. पदरा आलें=प्राप्त झालें. १३. ती. १४. कुंतीचा पुत्र अर्जुन, त्याचा पुत्र अभिमन्यु व त्याचा पुत्र परिक्षित् त्यातें. पणतू झाला असतां काशीयात्रा केल्याचें पुण्य घडतें, असा समज आहे, व काशीयात्रा करून जसें मांवदें करितात, त्याप्रमाणें पणतू झाल्यावर करण्याचा प्रघात असून, पणजा व पणजी ह्यांजवर सोन्याचीं फुलें उधळण्याची रूढि आहे. ह्या गोष्टीस अनुलक्षून 'पणतूकरितां तरी रहा,' असा आग्रह धर्मराजानें धरिला. १५. वारंवार. १६. कृपा कर. १७. अन्वयार्थ:—अश्रुमिषें (आंसवाच्या रूपानें) पुत्रस्नेह (पुत्रासंबंधी प्रेम) स्रवोनि (गळून जाऊन) रिती (रिकामी, ममताशून्य) होत. ह्या अर्थांतील उत्प्रेक्षा कवीच्या कल्पनाचातुर्याची साक्ष देते.

भीम म्हणे, "त्वां सुतजित राज्य, करुनि दानधर्म, भोगावें, ।
सं[1]प्रति नमुनि म्हणावें, 'घ्या सु[2]समृद्धें सुविप्रहो! गांवें.' ॥ २८
[3]त्यागमति असी कोठुनि आली? या भोजनांत हे मासी, ।
काय वनीं बहु? धन्या तूं वांटुनि हो जनांत हेमासी. ॥ २९
तरि करविलीं नृपांचीं बहु शून्यें त्वां वृथाचि कां गेहें? ।
'घ्या साधुनि राज्य' म्हणसि, टाकिसि ती तूं **पृ**थाचि कां गे! हें? ३०
बाळ वनीं होतों, त्या आम्हां घेउनि, कशास आलीस? ।
[4]श्री न, सखी वनभू जरि, तरि दिधला कां वियोग आलीस? ॥ ३१
सहदेवासि तरि पहा, केला माते! कशास पै[5]ण [6]तुंडें? ।
कां **उ**त्तराकुमारें पात्र न व्हावें यशास पणतुंडें? ॥ ३२
माते! प्रसन्न हो, गे! जें येथें तुज घडेल, न वनीं तें, ।
साहेल देह हा तप, आतप जरि साहिजेल [8]नवनीतें." ॥ ३३
[9]**स**हदेव बहु रडे, कीं जाते, होता [10]करीत 'आ' जिस, ती, ।
वाटे स्पष्ट तयाला होती **मा**द्रीच माय आजि सती. ॥ ३४
रडती पांचहि, म्हणती, 'दुःसह पदविरह, पा[11]वं;' काकुळती ।
करिति; तरि माय जायचि, [12]अवरि मन, न वि[13]रहपावकाकुळ ती. ॥ ३५
कुंती म्हणे; "तुम्हां म्यां [14]कथिलें **वि**दुलोक्त वृष्णि[15]राय कवी ।
युद्धापूर्वी तुमच्या राज्यसुखयशोर्थ **कृ**ष्ण आयकवी. ॥ ३६
उरल्या देहातेंही गिळितचि होते, [16]करूनि 'आं,' ज्ञा[17]ती; ।

---

१. हल्लीं. २. नांदतीं व भरभराटीचीं. ३. वैराग्याची इच्छा. ४. अन्वयार्थ:–जरि वनभू सखी (मैत्रीण, आवडती), [व] श्री न [सखी], तरी आलीस (त्या मैत्रिणीस, वनभूस) वियोग कां दिधला? ५. प्रतिज्ञापूर्वक निश्चय. माद्रीनें सहगमन केल्या वेळीं 'तुझ्या मुलाचा मी प्रतिपाळ' करीन, असें कुंतीनें माद्रीस सांगितलें होतें, त्यास अनुलक्षून हें आहे. ६. तोंडानें. ७. अन्वय:–उत्तराकुमारें पणतुंडें यशास पात्र न व्हावें कां? तूं वनांत गेल्यास त्याला 'पणतू' असें कोण म्हणेल. 'पणतू' म्हणून तुझ्यावांचून दुसरें कोण त्यास बोलावील? ८. लोण्यानें. ९. अन्वय:–सहदेव बहु रडे कीं (कारण) [तो] जीस 'आ' करीत होता, ती (कुंती) जाते. १०. आ करणें=तोंड वेंगाडून कृपा याचणें, साहाय्यार्थ विनंति करणें. ११. प्रसन्न हो. १२. अन्वयार्थ:–ती कुंती मन अवरि (मन घट्ट करी) [व] विरहपावकाकुळ (वियोगरूप अग्नीनें त्रस्त) न [होय]. १३. वियोगरूपी अग्नीनें त्रासलेली. १४. सांगितलेलें. १५. यदुश्रेष्ठ. १६. आ करणें=एकादा पदार्थ खाण्याकरितां तोंड उघडणें. या शब्दविशेषाच्या दुसऱ्या अर्थासंबंधें वर गीति ३४ पहा. १७. भाऊबंद.

म्यां **पां**डुवंश न बुडो, यास्तव केली तुम्हांसि आज्ञा ती. ॥ ३७
वृत्त्यर्थ[1] तुम्हीं प्रभुंहीं न पहावें अन्यवदन दीनांहीं, ।
कादंबिनी[2] न साहे, म्हणतां तृषितास नदनदी 'नाहीं'. ॥ ३८
म्यां भोगिलें स्वपतिच्या राज्याचें, भोगयोग्य जें फळ, तें, ।
सांग[3] महादान सकळ केलें, जितुकें पुरोहिता कळतें. ॥ ३९
विधिवत्[4]सोमरसाच्या तृप्तीही मानसा दिली पानें, ।
हे[5] **पां**डुनें कृतार्था स्त्री, जेविं सुदक्षिणा[6] **दि**लीपानें[7]. ॥ ४०
मजला पुत्रविनिर्जित राज्यफळाची स्पृहा[8] नसे कांहीं, ।
मेघें मही निवाली इच्छील निवावया न सेकांहीं[9]. ॥ ४१
या श्वश्रूश्वशुरांच्या सेवेंत तपोवनीं गळो[10] गात्र, ।
पतिलोक प्राप्त असो, आहे हृदयांत काम[11] हा मात्र. ॥ ४२
त्यजिल कशी निज धर्मा? भजतचि आली पृथा परतरा[12] ज्यां, ।
धर्मीं बुद्धि असों दे, न करीं आग्रह वृथा, परतं राजा[13]! ॥ ४३
योगें[14] हर्ष, वियोगें खेद, पळ[15] बरा नव्हे प्रजापाळीं[16]; ।
समजावूनि[17] वधूंतें, अनुजांतें, जा; नयें प्रजा पाळीं[18]." ॥ ४४
धर्मासि[19] न अनुमोदिति जे, त्यांची आप्तता वृथा, पर ते; ।
यास्तव सुतस्नुषांच्या स्नेहें पदही न ती पृथा परते. ॥ ४५
दिव्यां[20] पटा धरुनि, बहु मान न जाणों तिणें दिला जुनिया, ।

---

१. पोटाकरितां. २. मेघमाला. ३. यथाविधि. ४. विधिवत्सोमरसाच्या पानें मानसा तृप्ति दिली=धर्मनिर्दिष्ट मार्गानें यज्ञादि कार्यें पूर्णपणें करून सोमप्राशनानें संतुष्ट झालें. ५. मी कुंती. ६. दिलीपपत्नी. हिचें वर्णन कालिदासानें असें केलें आहे.—तस्य दाक्षिण्यरूढेन नाम्ना मगधवंशजा । पत्नी सुदक्षिणेत्यासीदध्वरस्येव दक्षिणा ॥ (रघुवंश १।३१). ७. इक्ष्वाकुकुलोत्पन्न सूर्यवंशीय राजा. ८. लोभ. ९. शिंपण्यानें, उदकासिंचनांनीं. १०. पाठभेदः—गळे. ११. इच्छा. १२. ज्या सर्वोत्तम धर्माला. १३. येथें कुंतीनें स्वपुत्रास 'राजा' हें विशेषण दिलें आहे, ह्यावरून तिनें पुत्रवात्सल्यमोह किती नाहींसा केला होता, हें स्पष्ट दिसतें; तसेंच तपस्वी जनांचा परामर्श घेणें, हें राजाचें कर्तव्य आहे व सुबुद्धि राजास सांगणें, हें तपोधनाचें कर्तव्य आहे; हाच संबंध कुंतीनें दृष्टीपुढें ठेविलासा दिसतो. १४. साहचर्यामुळें. १५. क्षणमात्रही. १६. राजाचे ठायीं. १७. समजूत घालून. १८. सांभाळ. १९. अन्वयार्थः—जे धर्मासि (कर्तव्यातें) न अनुमोदिति, त्यांची आप्तता (बंधुत्व, नातें) वृथा; ते पर (शत्रु). २०. अन्वयः—तिणें दिव्या पटा धरुनि (मोक्षप्रद तपश्चरणरूपी तेजस्वी वस्त्राला परिधान करून), जाणों (जणूं काय) जुनिया पटा (संसारमोहरूपी जीर्ण फटकुराला) बहुमान (आदरसत्कार) न दिला.

मातेसि 'धन्य' म्हणती ते पुत्र **यु**धिष्ठिरादि लाजुनिया. ॥ ४६
धृतराष्ट्र म्हणे स्त्रीला, "**गां**धारि! **पृ**थेसि सांग जें विहित[१], ।
केलें[२] माझें बहु, करि जीवाचें जपुनि आंग जेविं हित. ॥ ४७

म्हण, या पुण्यश्लोका **ध**र्माला पाव[३]; काननीं काय? ।
कां होमिसी सुताचे व्यर्थ विरहपावकाननीं काय[४]. ॥ ४८

सत्सुतराज्यसुख पहा; करुनि सुतीर्थें, व्रतेंहि, दे दानें; ।
भवनीं, न वनींच सुकृत[५]; हें तों कथिलें असेंच[६] वेदानें. ॥ ४९

भीता अभय, क्षुधिता अन्न, अनाच्छादितास दे वास[७]; ।
वेडे! सर्व तपाहुनि हेंचि करिल सुप्रसन्न **दे**वास." ॥ ५०

ऐवं **धृ**तराष्ट्राच्या, **गां**धारीच्याहि, घे न[९] उक्तिस ती[१०], ।
कीं **गु**[११]रुमेघनिवृत्तिस्वातीवाग्वृष्टिरत्नशुक्ति सती. ॥ ५१

स्तविति **पृ**थेसि, गुरु[१२]वचन केवळचि अनादरी, तथापि कवी; ।
सस्यासि[१३] सुवृष्टि जसी, सुयशासि तशीच ती कथा[१४] पिकवी[१५]. ॥ ५२

गुरुतें, **गां**धारीतें, **कुं**तीतें; नमुनि परतला **ध**र्म; ।
गुरुजनचरणवियोगें संसारीं ज्यांसि[१६] नाढळे[१७] शर्म[१८]. ॥ ५३
कृ[१९]ष्णादि **पां**डवांच्या विकळा[२०] सकळाहि जाहल्या भार्या, ।

---

१. योग्य. २. अन्वयार्थः—आंग जेंवि जपुनि (जतन करून) जीवाचें हित करि (करितें), [तेंवीं हिनें] माझें बहु हित केलें. ३. प्रसन्न हो. ४. देह. ५. पुण्य. ६. पाठभेदः—(१) तसेंच, (२) नसेचि. ७. वस्त्र. ८. ह्याप्रमाणें. ९. न घे=ऐकेना. १०. कुंती. ११. अन्वयः—कीं (कारण) सती (सुशील कुंती) °रत्नशुक्ति [होती]. दुर्वास्याच्या वैराग्यपर उपदेशाचा कुंतीच्या मनावर पूर्ण ठसा उमटला होता—हा या अर्थाचा भाव. गुरु+मेघ+निवृत्ति+स्वाती+वाक्+वृष्टि+रत्न+शुक्ति=गुरु दुर्वासा हाच मेघ त्यापासून निघणारा विरक्तिपर उपदेश हाच स्वाती नक्षत्राचा पाऊस त्याला ग्रहण करणारी मोत्यांची शिंप. समुद्रांत मोतीं पसविणाऱ्या शिंपल्या आढळतात. त्या शिंपल्या स्वाती नक्षत्राचा पाऊस पडला म्हणजे मिटतात व त्यांत जलबिंदूंचीं मोत्यें होतात. इतर नक्षत्राच्या पर्जन्यबिंदूपासून त्या विवक्षित शिंपल्यांवर कांहीं एक परिणाम घडत नाहीं, असा संकेत आहे. ह्या संकेतास अनुसरून हें रूपक केलें आहे. सती कुंती ही मोत्यांची शिंपली व तिचा गुरु हा मेघ व त्याचा विरक्तिपर उपदेश हा स्वातीनक्षत्रांतील पर्जन्यबिन्दु, व गुरुवांचून इतरांचे (धृतराष्ट्रादिकांचे) उपदेश म्हणजे इतर नक्षत्राचे पर्जन्यबिन्दु; तेव्हां स्वगुरूपदेशावांचून इतर उपदेश, अर्थात् धृतराष्ट्र व गांधारी ह्यांचें भाषण, कुंती मनावर घेईना, हें योग्यच आहे. कुंतीचा गुरु 'दुर्वासा' हा होय. १२. वडिलांचें भाषण. १३. धान्यास. १४. वडिलांच्या भाषणाचा अनादररूपी कथा. १५. वाढवी. १६. ज्या धर्मास. १७. दिसेना. १८. कल्याण, १९. द्रौपदीप्रभृति. २०. व्याकुळ.

[1]कीं नव्हती मातेची स्मृति होऊं देत ती पृथा आर्या. ॥ ५४
राजर्षि कुरुक्षेत्रीं होता नामें प्रसिद्ध [2]शतयूप, ।
त्याच्या सदाश्रमीं [3]तो [4]विदुरमतेंकरुनि राहिला [3]भूप. ॥ ५५
तेथें धृतराष्ट्राला भेटे येऊनि नारद, व्यास, ।
ज्यांचे श्री[5]चरण सदा निर्भय आधार सर्व [6]भव्यास. ॥ ५६
नारद म्हणे, "नृपा ! या शतयूपाचा [7]महातपा आजा, ।
नामें सहस्रचित्य[8] स्थानीं या सिद्धि पावला राजा. ॥ ५७
येथेंचि नर्मदाप्रिय [9]पुरुकुत्सनृपति तपोनिधी राजा ।
[10]सिद्धि असुलभा, पावे अविलंबें तो तपोनि, धीरा! ज्या. ॥ ५८
याच वनीं [11]शशलोमा तपुनि स्वर्गासि पावला आहे; ।
[12]द्वैपायनप्रसादें देइल तुजलाहि सुगति [13]भू बा! [13]हे. ॥ ५९
[14]पुरुषासि पटु तपाचा, शिखिचा वंशासि, ताप उजराया, ।
[15]शतमखसमीपवर्ती पांडु स्मरतो सदैव तुज, राया ! ॥ ६०
जीचा[16] जीव [17]न तुमचा विरह[18], जसा वायुचा [19]अनल, सहे[17], ।

---

१. ह्यावरून हिंदुसमाजांतील सास्वासुनांचा वास्तविक संबंध किती प्रेमळ असावा, हें दिसून येईल. २. हा कैकेय देशाचा राजा. वृद्धपणीं पुत्रास राज्याभिषिक्त करून वानप्रस्थाश्रमाच्या आचरणासाठीं तो हिमालय पर्वतावर जाऊन राहिला होता. ३. धृतराष्ट्र. ४. विदुराच्या सांगण्यावरून. ५. मंगलप्रद पाय. ६. कल्याणास. ७. मोठा तपस्वी. ८. ह्यानें ब्राह्मणाकरितां आपल्या प्राणाचेंही दान दिलें होतें. ९. सूर्यवंशीय इक्ष्वाकुकुलोत्पन्न मांधाता राजाचा पुत्र. हा मोठा शूर होता. हा राज्य करीत असतां त्यानें नागास उत्तम प्रकारें साहाय्य केलें. त्यावरून नागानें आपली कन्या नर्मदा ही ह्यास अर्पण केली. १०. अन्वयार्थ:–हे धीरा (धैर्यशाली धृतराष्ट्रा) ज्या सिद्धि असुलभा (मिळण्यास कठीण), [त्या] तो तपोनि (तपश्चरण करून) अविलंबें (तत्काळ) पावे (मिळविता झाला). कालिदास कवीनें 'धीर' ह्याचें लक्षण येणेंप्रमाणें केलें आहे.—'विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः' (कुमारसंभव सर्ग १). ११. एक राजर्षि. १२. व्यासांच्या कृपेनें. १३. हें स्थल, हें तपोवन. १४. सार्थान्वय:–वंशासि (वेळूस) उजराया (उजू–सरळ–करण्याचे कामीं) शिखिचा (अग्नीचा) ताप (आंच) पटु (योग्य), [व] पुरुषासि [उजराया] तपाचा (तपश्चर्येचा) ताप (दगदग) [पटु]. कळक वांकडे तिकडे असल्यास त्यांस अग्नीची आंच देतात म्हणजे ते तात्पुरते लवचीक होतात व सरळ करितां येतात. त्याचप्रमाणें मनुष्याचें मन निर्मल होण्यास तपश्चरण हाच उत्तम उपाय होय. १५. इंद्राच्या सान्निध्यांत असणारा. १६. ज्या कुंतीचा. १७. सहन करवत नाहीं. १८. वियोग. १९. अग्नि.

जपुनि तुम्हां दोघांची शुश्रूषा करितसे [1]अनलसा हे. ॥ ६१
पावेल पृथा पतिच्या लोका, जसि मंडपा लता पावे, ।
[2]गुरुदास्यतपस्तेजें, काय इतर? अंडपाल तापावे. ॥ ६२
[3]करिल प्रवेश धर्मीं सर्व जगन्मान्य हा कवि, दुरापें ।
[4]इतरास जीं यशें, तीं येती मारीत हाक विदुरापें." ॥ ६३
मग शतयूपासि वदे, "[5]तव चित्त 'स्तुति' असें म्हणेना कीं? ।
'केव्हां येइल केकयपति,' यापरि [6]हरि सदा म्हणे [7]नाकीं.' ॥ ६४
शतयूप म्हणे, 'स्वामी आम्हीं [8]तव पादसारसां गावें, ।
[9]द्रुहिणें, [10]वेदें, जैसें, बा! त्वां तैसेंचि सार सांगावें. ॥ ६५
[11]कोणां लोकास, कधीं, हा नृप पावेल? वद मुनिवरा! हें; ।
कीं उद्धरिजेल मही इतरें अति अहित न दमुनि वराहें.' ॥ ६६
नारद म्हणे, "नृपाळा! आहे आयुष्य तीन [12]हायन या, ।
[13]याच्या क्रिया विलोकुनि, म्हणतिल पंकप्रसूति 'हाय' नया. ॥ ६७
ईश्वरमित्रपुरीतें पावेल, म्हणति कवी जिला [14]अलका, ।
अमरावतीहुनि तिळहि बहुमान जिचा नृपा! [15]नसे [16]हलका. ॥ ६८

---

१. अन्+आलस्य=आलस नाहीं जिच्या ठायीं अशी. २. अन्वयार्थ:—गुरुदास्यतपस्तेजें (वडिलांची सेवा हेंच तप त्याच्या तेजानें) अंडपाल (ब्रह्मा, विष्णु, इत्यादिक) तापावे, [मग] इतर काय? वडिलांची सेवा केल्यानें उत्पन्न होणाऱ्या तेजापुढें ब्रह्मादि देवांचाही थरकांप होतो, मग इतरांची काय कथा? ३. सार्थान्वय:—हा कवि (ज्ञाता, विदुर) सर्व जगन्मान्य (सर्व जगास संमत अशा) धर्मीं (धर्म राजाचे शरीरांत) प्रवेश करील. विदुरानें यानंतर लवकरच युधिष्ठिराचे ठिकाणीं आपलें तेज ठेवून, आपली अवतारसमाप्ति केली, असें वर्णन पुढील अध्यायांत आहे. (पुढें अ०४, गी०४१–४६). ४. इतरांस जीं यशें (सिद्धि) दुरापें (दुष्प्राप्य), तीं विदुरापें (विदुरासन्निध) हाक मारीत येती. ज्या सिद्धि कष्टानेंसुद्धां इतरांस साधावयास कठीण, त्या आपोआप विदुराकडे धांव घेतात. ५. [मी जें तुझ्याविषयीं म्हणणार आहें, तें केवळ] स्तुति (तोंडपुजेपणानें केलेलें स्तोत्र) [होय, असें] तव चित्त म्हणेना कीं? (असें तुझ्या मनाला वाटत नाहीं ना?). ६. इंद्र. ७. स्वर्गात. ८. तुझ्या चरणकमलातें. ९. ब्रह्मदेवानें. १०. पाठभेद—वेद. ११. भावार्थ:—हे नारदा, हा धृतराष्ट्र कोणत्या लोकाला केव्हां जाईल, तें कृपा करून सांगावें. हें तुला विचारण्याचें कारण असें कीं तूं दिव्यचक्षू आहेस व हें सांगणें तुजवांचून इतरांस शक्य नाहीं. विष्णूचा अवतार जो वराह, तोच शत्रूला निर्दाळून पृथ्वीला पेलूं शकतो; तें काम इतर वराहांच्या हातून कसचें होणार? १२. वर्षें. १३. सार्थान्वय:—याच्या (धृतराष्ट्राच्या) [निर्मल] क्रिया (शुद्ध तपश्चरणादि क्रिया विलोकुनी), पंकप्रसूति (चिखलापासून ज्याची उत्पत्ति आहे अशा) नया (नद्या, नद्या) 'हाय' म्हणतिल. १४. कुबेरनगरीला. १५. पाठभेद—नव्हे. १६. कमी.

करुनि प्रवेश [1]शिवसखसत्कृत हा हर्षवील अलकेला, ।
कीं येणें आत्मा शुचि सुतपें, काढूनि [2]पापसल, केला. ॥ ६९
[3]गंधर्वदेवराक्षसलोकीं, अर्कप्रभा वर विमाना ।
पावुनि, मिरवेल; करिल या पात्र तपःप्रभाव रविमाना.” ॥ ७०
या मुनिवाणी देती बहु धृतराष्ट्रादि तापसां हर्षा, ।
जेविं मयूरांसि वनीं ग्रीष्मांतीं करुनि गर्जना [4]वर्षा. ॥ ७१

अध्याय चवथा.

पांडव, [5]पौरहि, म्हणती, “नृप, विदुर, कसे वनांत वसतील? ।
न कळे, [6]देवी कैशा सांप्रत [7]पर्णालयांत [8]बसतील? ॥ १
[9]आधी वनीं असे ज्यां, त्यांचा करितीच मग निभाव सवे, ।
[10]आतपहिमवृष्टिसहा तापसदेहाचि [11]नगनिभा वस्त्रे. ॥ २
हुरहुर मन करि, न सुचे [12]कार्य, शुकाचेंहि किमपि न वच रुचे, ।
ज्वरिता [13]पर्युषिताचे लागति, तैसेचि [14]केवळ [15]नवे [15]चरुचे. ॥ ३
लोभ्यानें [16]निधि, [17]कीं तो शूरें उजवाचि बाहु हारविला, ।
[18]गुरुविरहाधि न धर्मा, लागे त्या स्पष्ट राहु हा रविला. ॥ ४
बहु [19]चटपट धर्माला लागे, सहदेव [20]इंगितें समजे, ।
समजतिल [21]अत्यसुख ते, असतिल गुरुभक्त बुध तयासम जे. ॥ ५

---

१. कुबेरानें मान दिला आहे ज्याला असा. २. पातकाचा कांटा उपटून. ३. अन्वयार्थः— [हा] अर्कप्रभा (सूर्याप्रमाणें तेजस्वी अशा) वर (उत्तम) विमाना पावुनि गंधर्वदेवराक्षसलोकीं मिरवेल (मोठ्या वैभवानें व थाटानें संचार करील); [व] तपःप्रभाव (तपाचें बळ) [तेजानें] या (ह्या धृतराष्ट्राला) रविमाना (रवीला मिळणाऱ्या संमानाला) पात्र (योग्य) करील. ४. पावसाळा. ५. नगरवासी जन. पाठभेद—पौरव. ६. गांधारी व कुंती. ७. पर्णकुटिकेंत, झोंपडींत. ‘तर्णालयांत’ व ‘वर्णालयांत’ अशीं पाठांतरें. ८. पाठभेद—असतील. ९. सार्थान्वयः—वनीं ज्यां आधी (क्लेश, दुःख,) असे, त्यांचा मग (कांहीं काळानंतर) सवे (संवय) निभाव (तग, रक्षण) करिते. पाठभेद—आधीं वनीं असें इ०. १०. ऊन, थंडी, व पाऊस सहन करणाऱ्या. ११. झाडाप्रमाणें. १२. पाठभेद—काय. १३. शिळ्या अन्नाचे. १४. घांस. १५. ताज्या भाताचे. १६. ठेवा. १७. किंवा. १८. वडिलमाणसांचा वियोग झाल्यानें होणारें मानसिक दुःख. अन्वयः—गुरुविरहाधि धर्मा न (लागे), [तर] हा (°विरहाधि) स्पष्ट (प्रत्यक्ष) राहु त्या (धर्मरूपी) रवीला लागे. १९. रुखरुख. २०. न सांगतां, अनुमानानें. २१. अति+असुख=महद्दुःख.

सहदेव म्हणे, 'जाऊं, पाहूं, आहे वनांत आइ कसी, ।
घन जेविं चातकांचें, तूं [1]प्रणतप्रार्थितोक्त आइकसी.' ॥ ६
[2]कृष्णाहि म्हणे, "चाला; या [3]स्ववधूवेनु [4]वारिवरि घाला; ।
[5]आम्हांत, ईश्वरा! हा त्यांकरवीं ताप वारिव, रिवाला. ॥ ७
वसले या वंशींचे नृप विपिनीं, जे [6]शरण्य [7]वासवसे, ।
[8]हें दुःख, अंध हतसुत, अंगीकारुनि अरण्यवास, वसे." ॥ ८
अंतः[9]पुरजन, पुरजन, म्हणती, 'देवा मनास [10]यो, जावें,' ।
नृप सचिवांसि म्हणे, '[11]बळ सत्वर जाया वनास योजावें. ॥ ९
धौम्ययुयुत्सुशिरीं दे राज्याचा सर्वही भर भरतसा; ।
जाय [12]गुरुकडे, डोहाप्रति [13]गजयूथप जसा [14]भरभर तसा. ॥ १०
पंच दिन क्रमुनि पथीं, ताताच्या आश्रमासि तो [15]पावे, ।
'आधीं गुरुचरणावरि मस्तक,' जन सर्व म्हणति, '[16]ओपावे.' ॥ ११
[17]जाणों म्हणे खगरवें त्यां, 'तुमचा पंक धुविन, या,' वन तें, ।
केला प्रवेश धर्मे जनसह पायींच [18]सुविनयावनतें. ॥ १२
[19]राजा बहुत [20]गडबडे, आश्रमपद पाहतांचि ओसाड, ।
[21]गुरुचिंताग्निपुढें किति? इतराधिघुणासि होय तो साड. ॥ १३

---

१. नम्रजनाचें विनंतियुक्त भाषण. पाठभेद–°प्रार्थनोक्त. २. द्रौपदी. ३. स्वस्त्रीरूप गाई. ४. पाण्यावर. 'पाण्यावर घालणें' (=पाण्यावर नेणें, पाणी दाखविणें, पाणी पाजणें) हा प्रयोग जनावरांसंबंधी योजितात. ५. अन्वयार्थः–ईश्वरा! (प्रभो) आम्हांत रिवाला (उत्पन्न झालेला) ताप (दुःख) त्याकरवीं (वडिलांच्या हातून) वारिव (नाहींसा करीव, निवारण करीव). ६. शरण जाण्यास योग्य असे, आश्रय देणारे, संरक्षणकर्ते. ७. इंद्रासारखे. ८. अन्वयार्थः–[परंतु] हें दुःख (=हें अत्यंत दुःखप्रद होय), [कीं] हतसुत (ज्याचे मुलगे मेले आहेत असा) अंध (आंधळा धृतराष्ट्र) अरण्यवास अंगीकारुनि वसे. ९. राजस्त्रीमंडल. १०. येवो. मनास यो=रुचो. ११. सैन्य. १२. धृतराष्ट्राकडे. १३. हत्तींच्या कळपांतील झोरक्या. १४. जलदीनें. १५. येऊन पोंचला. १६. ठेवावे. १७. अन्वयार्थः–'तुमचा पंक (चिखल, पाप) धुवीन (नाहींसें करीन) या,' [असें], जाणों तें वन त्यां (युधिष्ठिरादि मंडळीस) खगरवें (पक्ष्यांच्या शब्दांच्या द्वारें) म्हणे. वनांत जातांच जो पक्ष्यांचा शब्द कानीं आला, तो पक्ष्यांचा शब्द नसून, पक्ष्यांच्या शब्दांच्या द्वारें तें वन येणाऱ्यांस 'मी तुमचें पाप नाहींसें करीन,' असें म्हणत आहे, अशी उत्प्रेक्षा केलेली आहे. पहा 'परभृतविरुतं कलं यथा प्रतिवचनीकृतमेभिरीदृशम्' शाकुंतल अं० ४. १८. सु+विनय+अवनतें=अत्यंत विनयानें वांकलेल्यानें. १९. धर्मराज. २०. भ्याला. २१. अन्वयार्थः–इतराधिघुणासि (दुसरीं मानसिक दुःखें हीच कीड तिजप्रत) तो (धर्मराज) साड (लांकडाचा नार, गाभा,) होय, [पण तो] गुरुचिंताग्निपुढें किती? (वडिलांसंबंधीं काळजी हाच अग्नि, ह्याच्या पुढें त्याचा धर्मराजाचा निभाव कितीसा लागेल?) लांकडाच्या नाराला कीड लागत नाहीं, हें नेहमींचें अनुभवाचेंच आहे.

वि[1]धुला राहु, तसा त्या[2] ग्रासाया गुरुवियोगताप सजे[3], । १४
नृप त्यांसि पुसे, आले देखाया आपणास तापस जे. ॥
मुनि वदले, 'गंगेतें गेला, आणावया फुलें, पाणी; । १५
यष्टि[4] तया गांधारी झाली, तिस तीहि पांडुची राणी[5].' ॥
ऐकुनि, धरिता झाला त्या यमुनेच्याहि धर्म वाटेतें, । १६
उचित[6] अनुचितहि तैशा त्या तदवस्थेंत कर्म वाटे तें. ॥

घे[7] धांव, देवदेवी दिसतां, सहदेव, जेविं तान्हा तो, । १७
ज्याचा उर अश्रुभरें खातां, पीतांहि, जेवितां, न्हातो. ॥
न वियोगें विषय रुचे सहदेवा, जेविं पाडसा[8] चारा; । १८
त्याचा याचा प्रेमा सुज्ञमतें ऐकपाड[9] सांचारा[10]. ॥
रडला सहदेव, पृथाचरणांवरि निपट[11] बाळसा पडला; । १९
वाटे तीसहि चिंतामणि, हरपुनि[12] सुचिरकाळ, सांपडला. ॥
प्रियपुत्रातें भेटुनि, रडुनि, म्हणे, 'मांडवास[13] जा[13], वेला!' । २०
पुसतां कळवि[14] सगद्गदवाचेनें पांडवांस[14] जावेला. ॥
माथां कलश पृथेच्या, दों स्कंधांउपरि हात दोघांचे; । २१
देह[15] तिघांचेहि सखे, ग्रीष्मींच्या सिंधु ज्या, तदोघांचे. ॥
पाहुनि तसी अवस्था, मूर्च्छा पावुनि, पदापुढें पडले, ।
ते धर्म, भीम, अर्जुन, नकुल, नमुनि, 'हाय' म्हणुनियां, रडले. ॥२२
आलिंगिले तिघांहीं, शब्दें, स्पर्शेंहि, ते नृपा[16] कळले; । २३
पुण्यमय[17] तदंगमळें पुत्र महाभाग पांचही मळले. ॥

---

१. चंद्राला. २. धर्मराजाला. ३. तयार झाला. ४. काठी. ५. कुंती. गांधारीनें डोळे बांधून अंधत्व धारण केलें होतें, तेव्हां तिलाही मार्गदर्शक यष्टीची जरूरी होतीच. ६. धृतराष्ट्रादिक गुरुजनांचें तें कृत्य धर्मराजाला एका दृष्टीनें योग्य वाटलें, तर दुसऱ्या दृष्टीनें अयोग्यही वाटलें; हें कर्म उचित किंवा अनुचित होतें, याविषयीं धर्मराजाचा निश्चय होईना. ७. अन्वयः—खातां, पीतां, जेवितांही, अश्रुभरें ज्याचा उर न्हातो तो तान्हा (बालक) जेविं, [तेवीं], देवदेवी दिसतां, सहदेव धांव घे. ८. वांसरास. ९. एकसारखा, समतोल. १०. खरोखर. ११. अगदीं. १२. नाहींसा होऊन. १३. दीर्घायु हो, व तुझा विस्तार होवो. १४. पांडव आले आहेत, असें जावेला (गांधारीला) कळवी. १५. अन्वयार्थः—ज्या ग्रीष्मींच्या सिंधु (उन्हाळ्यांतील शुष्क होणाऱ्या नद्या), तदोघांचे (त्यांच्या प्रवाहांचे) सखे (स्नेही) तिघांचे देह [होते], त्या त्रिवर्गाचे देह वाळून कृश झाले होते, असा भाव. १६. धृतराष्ट्राला. १७. पवित्र असा जो त्याचा अंगाचा मल तेणेंकरून.

धर्मादि त्यां तिघांचे उतरुनि, घेती शिरीं घट तिघे ते; ।
[1]बहु शोभले न ऐसे जे मुकुटाचे वृथा नटति घेते. ॥ २४

[2]ज्यां [3]करद शत्रु झाले, दोघे दोघांस पुत्र ते [4]करद, ।
गुरुभक्तां बाधों दे स्वप्नींहि न [5]अंतराय [6]एकरद. ॥ २५

'लागत नव्हता [7]व्यंजनावांचुनियां' म्हणति पौर, 'वारा ज्या, ।
त्या बाधे आतपहिमवृष्टिमहावात [8]पौरवा राजा.' ॥ २६

भेटे [9]सुनांसि कुंती, गांधारी, जेविं माय लेंकींतें, ।
तेव्हांचें सुख त्यांचें ब्रह्मांडांतहि [10]न मांयलें कीं तें. ॥ २७

ज्याज्या देता झाला, होऊनि तपोवनस्थ, विरहातें, ।
त्यात्या कुरवाळुनि, करि तो [11]बहुसुखभाजन [12]स्थविर, हातें. ॥ २८

नमिती, त्यांचें कळवी [13]स्वपित्याला नामगोत्र [14]अनराती; ।
मन रातींहि [15]तयाचें जनचिंतेंतचि, सुबुद्धि न [16]नरा ती. ॥ २९

सर्वस्वजनसमागम होता दैवेंकरूनि [17]सुलभ वनीं, ।
वाटे नृपासि, 'आपण आहें होतों तसाचि [18]कुलभवनीं.' ॥ ३०

सर्वांसहि कुशल पुसे, बोले, जें त्या श्रमीं तयांस हित, ।
जाउनि बसला राजा [19]व्यासात्मज आश्रमीं तयांसहित. ॥
तेथें आले तापस, पाप सकळ ज्यांसि पाहतांचि [20]सरे, ।

---

१. अन्वयार्थः—जे मुकुटांचे घेते (घेणारे अर्थात् धारण करणारे) वृथा नटति (थाटमाट करिती), ते ऐसे बहु न शोभले. मुकुट धारण करणाऱ्या राजांच्या मुकुटाची शोभा ह्यापुढें तुच्छ होय,—असा भाव. २. ज्या दोघां-पुत्रांस. ३. करभार देणारे. ४. हात देणारे. ५. विघ्न. ६. गणपति. आपल्या भक्ताचें संकट निवारण्याचे वेळीं असुराबरोबर लढत असतां गणपतीचा एक दांत मोडला. पण गणपतीनें त्या मोडक्या दांताचा शस्त्राप्रमाणें उपयोग करून शत्रूचें उच्छेदन व भक्ताचें संरक्षण केलें; व तेव्हांपासून तो एकदंत झाला. आईबापाची सेवा करणाऱ्या पुत्रास गणपति हा विघ्नबाधा स्वप्नांतही होऊं देत नाहीं, मग प्रत्यक्ष विघ्नाचें नांव कशास? ७. पंख्याशिवाय. ८. पुरुवंशांतील राजास, धृतराष्ट्रास. ९. पाठभेद—सुनेसि. १०. मावलें. त्यांचें सुख गगनांत मावेना असें प्रेम सासवासुनांमध्यें होतें, असा भाव. ११. अत्यंत सुखाचें पात्र. १२. वृद्ध धृतराष्ट्र. १३. धृतराष्ट्राला. १४. नाहीं ज्याला शत्रु तो, युधिष्ठिर. १५. अन्वयार्थः—तयाचें (धर्मराजाचें मन) मन रातींहि (रात्रींसुद्धां) जन—चिंतेंतचि (प्रजेच्या काळजींत) [असे]; ती सुबुद्धि (जनहिताची काळजी वाहण्याची बुद्धि) नरा न (साधारण मनुष्यांत आढळत नाहीं). १६. पाठभेद—नरा. १७. लाभण्याजोगा, साध्य. १८. वडिलोपार्जित घरीं; राजगृहांत. १९. धृतराष्ट्र. २०. नाहींसें होतें.

[1]त्यांचेंही पातें, त्या साधूतें देखतां, लवों विसरे. ॥ ३२
साधुनि जयांस चिंतित अर्थ [2]भगवदंघ्रिकंजयव देतो, ।
तद्रूपलक्षण पुसति तापस जे, त्यांसि संजय वदे तो. ॥ ३३
नृपति म्हणे, 'बा! केली कुंती त्वां [3]सुप्रजा, वना येणें ।
[4]झालें ज्या सुप्रेमें, करिसी कीं सुप्रजावना येणें?' ॥ ३४
धर्म म्हणे, 'आहे, जो केला त्वां सदुपदेश, तो कानीं ।
आम्हीं वरिला, जैसा गोपांच्या [5]यदुपदेश [6]तोकांनीं. ॥ ३५
[7]स्मरत नसे कीं, करितां तप, दुःख तुला अनंत राया! तें? ।
पावेल कीं पृथा गुरुगतितें तीही अनंतरायातें? ॥ ३६
सर्वांसि पहातों मी, परि कां एकाचि न विदुरा पाहें? ।
आश्रमपद पावावें तेणें [8]द्युति नित्य नवि [9]दुरापा हें.' ॥ ३७
भूप म्हणे, "कुशल असे विदुर, वनीं तापसांसि आढळतो, ।
घोर तप [10]अनशनव्रत करितो, [11]बहु ज्यांत करुनि '[12]आ' ढळतो. ॥ ३८
[13]कविस रुचे, घालावें विषयसुख, करूनि घोर तप, डावें, ।
मूढासि आवडे बहु, जेउनि, सस्त्रीक घोरत पडावें. ॥ ३९

---

१. अन्वयार्थः—त्यांचें (दर्शनास आलेल्या जनांचें) पातें (पापणी) त्या साधूतें देखतां लवों (उघडझांक) करण्यास विसरे. त्यांच्या डोळ्याचें पातेंही लवेना, असे एकसारखे ते पाहत राहिले. २. भगवत्+अंघ्रि+कंज+यव=भगवंताच्या चरणकमलाचा लेश. अन्वयः—भगवदंघ्रिकंजयव जयांस (ज्या धर्मादिक पांडवांस) चिंतित अर्थ साधुनि देतो, तद्रूपलक्षण (त्यांच्या खाणाखुणा) जे तापस पुसति, त्यांसि तो संजय वदे. ३. चांगली संतति आहे जीची अशी. ४. अन्वयार्थः—ज्या सुप्रेमें वना येणें (आगमन) झालें, येणें (याच प्रेमानें) सुप्रजावना (उत्तमप्रकारें प्रजाजनाचें संरक्षण) करिसी कीं? ज्या प्रेमानें तूं मजला वनामध्यें भेटावयास आलास, त्याच प्रेमानें प्रजाजनांचें उत्तमप्रकारें संरक्षण करितोस ना? असा धृतराष्ट्राच्या उक्तीचा आशय. ५. यदु+पद+ईश=श्रीकृष्ण. ६. बाळकांनीं. ७. अन्वयार्थः—राया! तप करितां, तुला तें अनंत दुःख स्मरत नसे कीं? (तप आचरीत असतां, तुझ्या अपार दुःखाचें स्मरण तुला होत नाहीं ना?) तीही पृथा (कुंती) अनंतरायातें (विघ्न ज्यांत नाहीं अशा) गुरुगतितें (पितृलोकातें) पावेल कीं? ८. कांति. ९. दुर्मिळ अशी. १०. उपवास-व्रत, निरशन. ११. बहु जन, पुष्कळ लोक. १२. तोंड वासून. अन्वयः—'आ' करुनि, ज्यांत (ज्या व्रताचरणांत) बहु ढळतो (चुकतो). १३. सार्थान्वयः—घोर तप करुनि, विषयसुख डावें घालावें (विषयसुखाकडे दुर्लक्ष करावें), [हें] कविस (ज्ञात्यास) रुचे (आवडे).

सुतपीं[1] धरूनि, झाला आहे तो धमनिसंतत, रतीतें, ।
जाणे रहस्य, ज्याचा लाउनि शोध मनिं संत तरती, तें." ॥ ४०
स्मरण करितांचि ऐसें, श्रीदत्तात्रेयसाचि तो आला, ।
धर्मातें अवलोकुनि, बहु जन पाहूनि, परतता झाला. ॥ ४१
धर्म द्रुततर मागें धांवुनियां, त्या सदेकनिष्ठातें, ।
साधुगुणज्येष्ठातें[2], स्वपित्यातें, तो वदे, कनिष्ठातें[3]. ॥ ४२
"ताता! मी, कुंतीचा ज्येष्ठ तनुज, लाडका तुझा आहें, ।
बा! हें निष्ठुरपण कां? ठाक उभा; बोल; मजकडे पाहें." ॥ ४३
दूर वनीं जाउनि तो, ओठंगुनि[4] तरुसि, बैसला क्षत्ता[5], ।
सुकृश, मलिन, वीटांमुख[6], योगित्वें परम मान्य जो दत्ता[7]. ॥ ४४
धांवत धांवत जाउनि, धर्म प्रभु त्यापुढें उभा राहे; ।
कवि[8], नयनें[9] नयनांसीं मेळवुनि, सुताननाकडे[10] पाहे. ॥ ४५
त्या पाहण्यांत नेत्रद्वारें[11] धर्मीं[12] प्रवेशला[13] तूर्ण[14], ।
वाटे युधिष्ठिराला, 'झालों ज्ञानें, सुखें, बळें, पूर्ण.' ॥ ४६
स्मरला व्यासमुनिकथित निजजन्म महामना तदा हा तें[15]; ।
मग त्या कलेवराच्या[16] जों तो योजी मनांत[17] दहातें[18], ॥ ४७
तों होय नभोवाणी[19], "त्वां न म्हणावेंचि मानदा! 'हा! हा!'[20] ।
यतिधर्मपात्र[21] झाला[22] समुचित कविकाय बा! न दाहा[23] हा." ॥ ४८

---

१. सार्थान्वयः—सुतपीं रतीतें धरूनि (घोर तपश्चर्येंत गढून), तो धमनिसंतत (शिरांनीं व्यापलेला, ज्याच्या अंगावर कृशत्वामुळें शिरा ठळक रीतीनें पसरलेल्या दिसताहेत असा) झाला आहे; ज्याचा (ज्या रहस्याचा) शोध मनीं लावुनि, संत (सत्पुरुष) तरती (भवसागरांतून पार पडतात), तें रहस्य [तो विदुर] जाणे. २. सत्पुरुषाग्रणीतें. ३. धाकट्या चुलत्यास. ४. टेंकून. ५. विदुर. ६. विटी (=काष्ठाचा तुकडा) आहे मुखांत ज्याच्या असा. ७. श्रीदत्तात्रेयास. ८. सुज्ञ विदुर. ९. दृष्टीशीं दृष्टि लावून. १०. धर्मराजाच्या मुखाकडे. ११. नेत्रांवाटे. १२. धर्मराजाच्या ठायीं. १३. योगप्रभावानें विदुरानें आपली आत्मज्योती धर्माच्या शरीरांत शिरकविली, हा मतलब. १४. सत्वर. १५. धर्म. 'हा तें' ऐवजीं 'हातें' असा सर्वसंग्रहाचा पाठ. १६. शरीराच्या. १७. मनांत आणिता झाला. १८. दहनातें. विदुराच्या शवास अग्नि देण्याचें धर्मानें मनांत आणिलें इतक्यांत.—असा भाव. गीति ४७ व ४८ यांचें युग्मक आहे. तेव्हां त्यांचा एकत्र अन्वय करावा. १९. आकाशवाणी. २०. हाय! हाय! २१. ज्यानें षड्रिपूंचा दम केला आहे, अशांच्या कर्तव्याचरणाचें स्थान असा; ज्यानें सर्वसंन्यास केला होता असा. हें 'कविकाय' ह्याचें विशेषण. संन्याशाला दहन करीत नाहींत, हें प्रसिद्धच आहे. २२. झाल्या विदुराचा देह. २३. दहनास.

खोक्तीसं[1] मान देउनि, क[2]विचा तैसाचि काय सोडूनी, ।
परतोनि धर्म आला, जोडा[3]याची सुकीर्ति जोडूनी. ॥ ४९
'शिरला आत्मशरीरीं नेत्रद्वारा, त्यजूनि काय, कवी,' ।
हें वृत्त आश्रमीं त्या, धृतराष्ट्रा, भ्रातयांहि, आयकवी. ॥ ५०
सर्व सविस्मय 'जय, जय,' वदले, आला तयांसि [4]कांटा हो! ।
धर्मघन पूर्ण होतां, श्रि[5]तमोरांला सुचे न कां [6]टाहो? ॥ ५१

अध्याय पांचवा.

सर्वांसि [7]अतिथिभावें त्या दिवसीं [8]भूप अन्न दे [9]वन्य, ।
[10]त्यांतें सेवुनि, मानिति [11]धर्मादि समस्त आपणा [12]धन्य. ॥ १
रात्रौ पांचहि निजले कुंतीच्या भोंवते महीवरते, ।
पर्यंकींही न कधीं तैसे सुख पावले [13]महीवर ते. ॥ २
दुसरे दिवसीं [14]पूजी, होते त्या आश्रमांत [15]तापस जे; ।
ते वदति, "असाचि [16]रघुप सर्व हराया तपस्वितप [17]सजे." ॥ ३
हे[18]मरजतताम्रमयें, कीं पात्रें कार्य आयसें होतें, ।

---

१. आकाशवाणीस. २. विदुराचा. ३. मिळवावयाची; जी मिळविणें योग्य व अवश्य होतें ती. ४. रोमांच. येथील रोमांच आश्चर्य व आनंद यांचे होत. परंतु आश्चर्यानंदाप्रमाणें रोमांच भीतीचेंही लक्षण असूं शकतात. ५. आश्रयास असलेले बंधुवर्ग हेच मोर त्यांस. ६. मोराचा शब्द. ह्या गीतींत धर्मराज व मेघ, ज्ञानपूर्णता व जलपूर्णता, बंधुचतुष्टय व मोर आणि टाहो व आनंदोद्गार, यांतील **रूपक** सरस आहे. ७. पाहुण्यास योग्य अशा सत्कारानें. ८. धृतराष्ट्र. ९. वनांत असणारें. १०. अन्नातें. ११. पाठभेद–धर्मांसि. १२. कृतकृत्य. १३. पृथ्वीपति पांडव. राजे असूनही ते आपल्या आईभोंवतीं जमिनीवर निजले, ह्यांत त्यांची मातृभक्ति व्यक्त होते. १४. याचें कर्म 'तापस.' १५. तपस्वी, तपश्चर्या करणारे. १६. रघुकुलश्रेष्ठ श्रीराम. १७. [एकदां पूर्वीं] तयार झाला होता. १८. गीतीचा सार्थ अन्वयः–हेमरजतताम्रमयें (सोनें, रुपें व तांबें यांच्या), कीं (किंवा) आयसें (लोखंडाच्या), कीं मृत्–काष्ठतृणमयेंही (माती, लांकूड, गवत, यांच्याही) पात्रें (भांड्यानें) कार्य होतें (म्हणजे प्रसंगवशानें त्या तपस्व्यांना जशा लहानमोठ्या भांड्यांची जरूरी होती), तैसें (त्या प्रकारचें लहानमोठ्या किंमतीचें भांडें) [धर्मराज] दे. हो! (अहो) तें (धर्मराजाचें यथाप्रसंग पात्रदान) कायसें नवल? धर्मराजानें, ज्याला जशी जरूरी होती, त्याला तशी वस्तु दिली. तेव्हां त्यानें अल्प किमतीचें दान कोणाला दिलें, म्हणून आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं–हा भाव. 'तृणेन कार्यं भवतीश्वराणाम्' [=प्रभूंना गवताचीही जरूर पडते] या संस्कृत वाक्यांतील **'तृणेन कार्यं भवति'** या वाक्यरचनेचीच **'पात्रें कार्य होतें'** ही मराठी प्रतिमा आहे.

[१]मृत्काष्ठतृणमयें कीं, दे तैसें नवल कायसें हो! तें? ॥ ४
[२]व्हावें [३]चीर, [४]अजिन, [५]ज्या वल्कल, तैसेंचि कांबळें; दे हा; ।
द्यावा सुविरक्तांच्या [६]अनभिमतें ताप कां बळें देहा? ॥ ५
अनुसरले 'संतोषं [७]जनयेद्' इत्यादि सदुपदेशाला, ।
त्यांसि स्वोचित वस्त्रें, व्हाया संतुष्ट [८]यदुप, दे शाला. ॥ ६
होता [९]सानुज [१०]शिबिरीं, स्वव्यवहारा करूनि, मग राजा; ।
[११]ताताज्ञा ऐसी कीं, '[१२]यावन्निजतोष वसुनि, नगरा जा.' ॥ ७
[१३]कळलें करणार पितर उग्र तपोग्नींत कायहोमास; ।
जरि एक तयानिकट क्रमिला, तरि अधिक काय हो! मास? ॥ ८
दर्शन घ्यावें; वंदुनि नित्य रहावें उभें; [१४]तदा ज्ञात्या, ।
[१५]बैसाया, बोलाया, जाया, लागे नृपा तदाज्ञा त्या. ॥ ९
मासानंतर तेथें सुदिनीं [१६]द्विजपाळ पातला **व्यास**, ।

---

१. सर्वसंग्रहपाठ०.–मयेंही कीं देतें नवल कायसें होतें. २. असावें. ३. वस्त्र. ४. मृगचर्म. ५. सार्थान्वयः–ज्या व्हावें (=ज्याला जें पाहिजे होतें), [त्याला] [तें इष्ट असे] चीर (वस्त्र), अजिन (हरिणचर्म), वल्कल, तैसेंचि कांबळें, [वेणाऱ्याच्या मर्जीप्रमाणें] हा (धर्म) दे (देता झाला). ६. नावडल्यानें, नावडती वस्तु देऊन. ७. 'संतोषं जनयेत्' इत्यादि सत् उपदेशाला=संतोष उत्पन्न करावा, हा व ह्यासारखा जो उपदेश त्याला–अन्वयार्थः–[जे] 'संतोषं जनयेत्' इत्यादि सदुपदेशाला अनुसरले, त्यांसि (त्या मुनिजनांस) [धर्मराज आपल्यावर] यदुप संतुष्ट व्हाया (कृष्ण–परमात्मा–प्रसन्न व्हावा म्हणून) स्वोचितवस्त्रें (त्यांना–मुनींना–उपयोगीं पडतील अशा वस्त्रांनीं) शाला (श म्ह० सुख त्याला, सुखाला, संतोषाला) दे (देता झाला). ईश्वर प्रसन्न व्हावा, या हेतूनें धर्मराजानें ज्या मुनींला जें वस्त्र पाहिजे होतें, तें देऊन, तो त्यांस संतुष्ट करिता झाला. या गीतींत मागील गीतीचाच विशेष खुलासा आला आहे. ८. कृष्ण, देव. ९. भावांसहवर्तमान. १०. गोटामध्यें. ११. धृतराष्ट्राची आज्ञा. १२. [तुझा] संतोष होईपर्यंत, तुझ्या मर्जीस वाटेल तोंपर्यंत. १३. अन्वयार्थः–पितर (धृतराष्ट्र) उग्र तपोग्नींत (खडतर तपश्चर्यारूप अग्नीमध्यें) कायहोमास (देहरूप हवनास) करणार [असें] कळलें; [मग] जरि (=जर) तयानिकट (त्यांच्या समीप) एक मास क्रमिला (घालविला), हो (=अहो!) तरी (=तर) [तो अवधि] अधिक [झाला] काय? एक महिनाभर त्यांच्या सान्निध्यास भ्रात्यांसह धर्मराज राहिले, हा अवधि कांहींच नाहीं, असें त्यांस वाटणें उचितच आहे. १४. त्या वेळीं. १५. अन्वयार्थः–तदा बैसाया, बोलाया, जाया, त्या ज्ञात्या नृपा, तदाज्ञा (तत्+आज्ञा=धृतराष्ट्राची परवानगी) लागे. धृतराष्ट्राच्या सांगण्यावांचून नित्य गोष्टीही तो करीत नसे.–असा भाव. १६. ब्राह्मणश्रेष्ठ.

[1]कीं शोकश्येन न करु त्या दीना व्यसनपात लाव्यास. ॥ १०
नारद, पर्वत, देवल, तुंबरु, इत्यादि आश्रमीं आले; ।
ताताज्ञेनें धर्में ते प्रेमें पूजिले सुखें धाले[2]. ॥ ११
व्यासाज्ञेनें सत्सुत पांडव, सर्वांहि त्या वधू[3] बसल्या; ।
श्वशुराश्रमांत गमल्या कीं देवी[4] नंदनीं वनीं बसल्या. ॥ १२
व्यास म्हणे, "त्यजुनि नवा, जीर्णा मलिना शिवे कवण[5] वासा[6]? ।
[7]अघ जाळाया झाला कीं दीप्त तपें विवेक वणवासा? ॥ १३
पांडुसुतांच्या ठायीं क्षोभ नसे[8] कीं तुझा नृपा[9]! आतां? ।
लागति गोड तनुजगुण, पुत्रा[10]! किंवा मुकुंदगुण, गातां?॥ १४
शोक[11]मळें न मळावें; अंतर्बाह्य स्वपाप सुतपातें, ।
विदुरें जितिलें तैसें त्वांहि जितावें करूनि सुतपातें. ॥ १५
धर्म, विदुर; विदुर अनरि[12]; मद्वचनें जाण बा! सनातन[13] या; ।
याच्या स्मरणेंहि सदा वाढाव्या पुण्यवासना तनया! ॥ १६
मांडव्यें[14], सुतपोव्यय करुनि, दिला ज्या सनातना शाप; ।
तो हा यमधर्म प्रभु, ज्याच्या स्मरणें जळे महापाप. ॥ १७

---

१. अन्वयार्थः—कीं (कारण) शोकश्येन (शोकरूपी ससाणा) त्या दीना लाव्यास (त्या दीन धृतराष्ट्ररूपी लाव्या पक्ष्यास) व्यसनपात न करु (संकटांत न घालो). 'लावा' हा कबूतराच्या जातीचा लहान पक्षी असून, ससाणा त्यावर झडप घालतो व त्यास मारितो, हें प्रसिद्ध आहे. २. तृप्त झाले. ३. सुना, नातसुना, वगैरे. ४. देवस्त्रिया. ५. कोण. ६. वस्त्रास. ७. अन्वयार्थः—अघ जाळाया विवेक वणवासा (दावाग्नीप्रमाणें) तपें (तपश्चर्येनें, पक्षीं उष्णतेनें) दीप्त (प्रज्वलित) झाला कीं (झाला ना)? ८. नाहीं ना? ९. धृतराष्ट्रा! १०. धृतराष्ट्र हा व्यासवीर्यज होता. ११. अन्वयार्थः—शोकमळें (पुत्रशोकरूप मळानें) न मळावें, सुत-पातें (आतां ज्याअर्थीं तुझे मुलगे वारले आहेत, त्याअर्थीं), [जैसें] विदुरें सुतपातें (उत्तम तपश्चर्येतें) करुनि (आचरून) अंतर्बाह्य स्वपाप जितिलें (जिंकिलें अर्थात् नाहींसें केलें), तैसें त्वांहि जितावें. १२. अजातशत्रु धर्म, युधिष्ठिर. १३. अक्षय्य ब्रह्मरूप परम पुराणपुरुष. १४. हा महातपस्वी होता. बाल्यावस्थेंत त्यानें एका कीटकास कांटा टोंचिला होता; त्या दोषामुळें ह्याजवर चोरीचा आळ आला व राजानें त्यास शूलावर चढविलें. तेव्हां असा दंड होण्याजोगा कोणता दोष घडला असावा, हें जाणण्याकरितां लिंगदेहानें तो यमधर्माकडे गेला व यमधर्मानें त्याला त्याचें पूर्वजन्मींचें बाल्यावस्थेंतील कर्म सांगितलें. तेव्हां "अज्ञानामुळें घडलेल्या शुभाशुभाचें पुण्यपाप नसतां, तूं तें मजवर घातलेंस, तेव्हां तुला शंभर वर्षेपर्यंत शूद्रयोनींत मृत्युलोकीं वास करावा लागेल"—असा शाप त्यानें यमधर्मास दिला. या शापामुळेंच यमधर्म पुढें विदुर झाला. धर्मराजाही यमधर्माचाच अंश होता. तेव्हां विदुर व धर्मराज हे वस्तुतः एकाचींच भिन्न रूपें होत.

ब्रह्म[1]वचें, स्वबळेंही, केला उत्पन्न, अष्टयामहि म्यां ।
चिंता वाहुनि, व्हाया पात्र, न पावोनि कष्ट, या महिम्या. ॥ १८
श्रेय[2] तुझेंहि कराया आलों मी वरद[3] आज, यां[4]मागें ।
कोणीं ऋषिनें कोणा न दिलें, तें इष्ट[5] राजया[6]! मागें. ॥ १९
तूं, त्वद्भार्या, कुंती, कृष्णादि तव स्नुषा समग्रा वा, ।
मागा; चिंता[7]मणि हो जात्या, न गुणें, परासम ग्रावा. ॥ २०
हे गंधर्व, महर्षी, सुर, होउ[8]त हर्ष[9]मत्त पाहून; ।
मा[10]नूत मनीं केवळ तुच्छ अ[11]मृतवर्ष म[12]त्तपाहून." ॥ २१
धृतराष्ट्र म्हणे, "ताता! झालों विश्रांत आजि मी धन्य[13], ।
हाचि अ[14]नुग्रह दुर्लभ, याहुन बहु काय मागणें अन्य? ॥ २२
वदलासि तूं वचन शुचि, सत्य, श्रित[15]सर्वजनसुरद्रो! हें; ।
मा[16]झें या साधूंच्या पुत्रकृतें फाटलें उर द्रोहें. ॥ २३
मारविले बहु, पडलें मंदिर कोणा न ओस रा[17]याचें? ।
जन्मांतरींहि हें या न[18] मनांतुनि दुःख ओसरे रायाचें. ॥ २४
मारविला म्यां सतनय वृद्ध महाराज बा[19]ल्हिक रणांत, ।

---

१. अन्वयार्थः—ब्रह्मवचें (ब्राह्मण मुनि मांडव्य ह्याच्या शापानुसार) [व] स्वबळेंही (माझ्या स्वतःच्या प्रभावानें), अष्टयामही (आठ प्रहरसुद्धां अर्थात् रात्रंदिवस) चिंता वाहुनि, कष्ट न पावोनि या महिम्या पात्र व्हाया (ह्या दिगंतकीर्तीस योग्य व्हावा म्हणून), म्यां [ह्या =विदुर] उत्पन्न केला. २. कल्याण. ३. वर देणारा. ४. ह्यापूर्वी. ५. आवडतें, अभिवाञ्छित. ६. राजा धृतराष्ट्रा! ७. अन्वयार्थः—चिंतामणि हा जात्या परासम (इतर पाषाणासारखा) ग्रावा, [परंतु] गुणें न (नाहीं). चिंतामणि (इच्छित वस्तु देणारें रत्न) ह्याचा वर्ग पाषाणाचाच खरा, पण ह्यांच्या अंगचे गुणधर्म मात्र इतर पाषाणाहून फार वेगळे आहेत. तसा मी दिसण्यांत इतर ऋषींसारखाच आहें, परंतु दानशक्तींत व औदार्यांत इतरांहून फारच निराळा म्हणजे श्रेष्ठ आहें.—हा व्यासाचा भाव. ८. होवोत. ९. आनंदानें बेहोष. १०. गणोत. ११. अमृताचा पाऊस. १२. मत्+तपाहून= माझ्या तपश्चर्येपेक्षां. १३. कृतार्थ. १४. प्रसाद. १५. आश्रित जे अखिलजन त्यांच्या कल्पवृक्षा! अर्थात् कल्पवृक्षाप्रमाणें त्यांच्या इच्छा सफल करणाऱ्या! १६. अन्वयार्थः—या (ह्या) साधूंच्या (सज्जन पांडवांच्या) पुत्रकृतें (माझ्या मुलांनीं केलेल्या) द्रोहें (शत्रुत्वानें) माझें उर (हृदय) फाटलें. १७. राजाचें. १८. कमी होणार नाहीं. 'ओसरणें' हा शब्द प्रायः नदीला आलेल्या पुराचें पाणी अथवा अंगास आलेली सूज हीं 'हटणें, कमी होणें' या अर्थीं योजतात. १९. हा प्रतीप राजाचा पुत्र, शंतनूचा धाकटा भाऊ व सोमदत्ताचा बाप.

[1]तातहि, गुरुहि, [2]न ज्यांच्या तेज वयाचें शतांश करणांत. ॥ २५
[3]इत्यादि शोक होतो आठवितां नित्यही नव, शमेना; ।
शांति मतीस, कराया [4]तनयेसि जसी [5]शके न वश [6]मेना". ॥ २६
[7]ज्येष्ठस्नुषा म्हणे, "हें पुत्रवियोगासि वर्ष [8]सोळावें, ।
रात्रिभरि [9]नृपें शयनीं या कुशिचें त्या कुशीस लोळावें. ॥ २७
[10]शय्येंत तसा, ग्रीष्मीं तळमळतो [11]काय जेविं रेतींत, ।
[12]वांटे सुतस्मृति नदी, मन ढेंकुळ काय जें विरे तींत. ॥ २८
यास्तव ज्यां देखाया नृप इच्छितसे, तयांसि दाखीव; ।
सदया! [13]सुता सुतता [14]हस्तींचें अमृत लेश चाखीव. ॥ २९

---

१. भीष्म. २. ज्यांच्या वयाचें (तरुण वयाचें, यौवनाचें) शतांश तेज करणांत (इंद्रियांत) न; ज्यांचीं इंद्रियें जरेनें जीर्ण व शिथिल होऊन, त्यांत तरुणपणची तडफ राहिली नव्हती. जरेनें जीर्ण होऊन, स्वस्थ बसण्याचे ज्यांचे दिवस होते, त्या वृद्ध भीष्मद्रोणांनाही लढायाला लावून मीं मारविलें.—हा धृतराष्ट्राचा भाव. 'वयांत येणें' या नेहमींच्या प्रचारांतील प्रयोगांतही 'वय' याचा अर्थ 'तारुण्य, उमेद' असाच आहे. सर्वसंग्रहांत 'करणांत' ह्यावर 'कर्णाचे ठायीं' अशी टीप आहे, परंतु ती योग्य आहे, असें वाटत नाहीं. ह्या गीतींत 'वयाचें' ह्या शब्दानें आलेलें अर्थगांभीर्य सरस आहे. ३. अन्वयार्थः—इत्यादि (हें व इतर गोष्टी) आठवितां नित्यही शोक नव होतो, शमेना (कमी होत नाहीं). जेव्हां जेव्हां या गोष्टींची आठवण होते, तेव्हां तेव्हां शोकाचें भरतें भरपूरच येतें, ह्यावरून शोक सदा नवाच वाटतो, हें उघड आहे. ४. पार्वतीस. ५. समर्थ नव्हती. ६. हिमालयपत्नी. शंकर पति मिळावा म्हणून पार्वती तप करीत असतां, तिला 'तप करूं नकोस' असें आईनें पुष्कळ वेळां सांगितलें. पण तें जसें सर्व व्यर्थ गेलें, त्याप्रमाणें माझी स्थिति आहे; मनास शांत ठेवण्याचे माझे सर्व प्रयत्न निष्फळ होतात.—असा भाव. (पंतकृत हरिवंश अ० २, गी० ३५–३७ पहा). ७. गांधारी. ८. भारती युद्धानंतर १५ वर्षें धृतराष्ट्र धर्मासन्निध हस्तिनापुरांत होता. त्यानंतर त्यानें एक वर्ष आश्रमवास केला. तेव्हां दुर्योधनास मरून एकंदर १६ वर्षें झालीं. ९. धृतराष्ट्रानें. ह्या गीतींतील विध्यर्थी प्रयोग ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. त्याचा अर्थ येथें रीतिभूतकाळासारखा होतो. दुःखी मनुष्याच्या अथवा अस्वस्थचित्ताच्या मनुष्याच्या रात्रभर तळमळण्याचें हुबेहुब चित्र येथें काढिलेलें आहे. १०. पाठभेद.—'शयनांत तसा'. ११. देह. १२. अन्वयार्थः—सुतस्मृति (मुलांची आठवण) [ही] नदी; [व] तींत जें काय विरे (विरघळून जातें), [तें] मन ढेंकूळ, [असें] वाटे (गमतें). १३. तुझा मुलगा धृतराष्ट्र त्याला. १४. हस्त नक्षत्रामध्यें पडलेल्या पावसाचें पाणी. हें पाणी निरोगी असतें व नदी इत्यादिकांस जो पाण्याचा पुरवठा पडतो तो ह्याच पाण्यामुळें होय.

स्वतपें समर्थ असती तूं विश्व असें नवेंचि निर्मा[१]या, ।
काय तुला लोकांतर[२]गत दावाया अशक्य? निर्माया[३]! ॥ ३०
[४]हेंहि हतज्ञातिसुता कृष्णा, मी जेविं काय शोचितसें, ।
प्रभुजी! हें दुःख जसें, दग्ध करीनाच का[५]य [६]शोचि तसें. ॥ ३१
सर्वां स्नुषांत द[७]यिता कृष्णा [८]गुरुजनमनें धरुनि आहे, ।
तव सु[९]प्रसादमुदिरा इच्छितसे चातकी, करुनि 'आ,' हे. ॥ ३२
ऐसीच हे सुभद्रा पुत्रवधें न सुख तापली लाहे; ।
बाधा इचीच गुरु, बा! निपट लघु म्हणेल [१०]आपलीला हे[११]. ॥ ३३
[१२]भूरिश्रवःप्रिया हे, दुःख इला जें, [१३]दवीं [१४]नवें [१४]लतेतें, ।
[१५]तव यश पिवुनि, म्हणु[१६]तें, जे अमृत स्तवितें, 'नव्हे नवल' ते 'तें', ॥
[१७]पुत्रांसि दिले होते जे शत सुत, या [१८]समग्र त[१९]ज्जाया ।
इच्छिति तव प्रसादा, [२०]मीनी डोहासि जेविं म[२१]ज्जाया. ॥ ३५
[२२]अनुभविलें शत हर्षद, शत शोकद तेंचि आर्तव मनानें, ।
होतो अभोजनें जन न तसा, बहु जेविं [२३]आर्त वमनानें. ॥ ३६

---

१. उत्पन्न करावयास. २. परलोकीं गेलेले. ३. मायारहिता, ज्ञात्या! ४. अन्वयार्थ:—मी जेविं काय शोचितसें (मी ज्या कांहीं प्रकारचा शोक करितें), [तेवींच] हेंही (हीसुद्धां) कृष्णा (द्रौपदी) हतज्ञातिसुता (मारले गेले आहेत जातभाई व मुलगे जीचे अशी) [शोचितसे]. माझ्याप्रमाणेंच हिनेंही धाय मोकलण्याची परमावधि केली आहे.—असा भाव. 'जेविं काय' हें क्रियाविशेषण आहे. ५. देह. ६. अग्नीची ज्वाला. सर्वसंग्रहपाठ 'शोचितसें' असा असून 'ज्वालेसारिखें' अशी त्यावर टीप आहे. ७. आवडती. ८. वडिलांच्या मनास संतोषवीत. 'मन धरणें'=मनाप्रमाणें वर्तन करून संतोष देणें. ९. उत्तम अनुग्रहरूप मेघ त्याला. १०. स्वतःच्या बाधेला. ११. ही मी स्वतः गांधारी. १२. सोमदत्ताची स्नुषा. १३. वणव्यांत. १४. कोंवळ्या वेलीस. १५. अन्वयार्थ:—जे अमृत स्तवितें (अमृताची तारीफ करणारे), ते तव यश पिवुनि, 'तें (अमृत) नवल (अपूर्व) नव्हे,'-[असें] म्हणुत (म्हणोत). अमृतापेक्षांही तज्ज्ञांस तुझें यश अधिक रुचेल, असा भाव. १६. पाठभेद—म्हणतसे. १७. धृतराष्ट्रास. १८. अवघ्या. १९. त्या शंभर पुत्रांच्या स्त्रिया. 'इच्छिति' ह्या क्रियापदाचा कर्ता. २०. मासळी, मत्स्यी. २१. बुडी मारून विहार करण्याकरितां. २२. अन्वयार्थ:—आर्तवशत (वसंतादि ऋतुषट्क त्यांचें शत) हर्षद (सुखाचें) अनुभविलें, तेंचि शोकद (दुःखाचें) [असें] [आमच्या] मनानें [अनुभवीत आहों]. जे ऋतुकाळ आम्हांला पूर्वीं रमणीय भासत, तेच आतां आम्हांला केवळ असह्य झाले आहेत.—हा भाव. २३. पीडित, हळक.

मामाजी! न सुतविरह हा हे साहेल गद नवा सून.” ।
‘दावा **कर्ण** मज,’ असें विनवी **कुं**तीहि वदन वासून. ॥ ३७
व्यास म्हणे, “**गां**धारि! स्वप्नसम वियोगदु:ख लेखाल, ।
सर्वा स्त्रिया तुम्हीं या प्रभुसह सर्वां मृतांसि देखाल. ॥ ३८
अवतरले होते मुनिराक्षसदेवासुरादि जे आर्य, ।
ते स्वस्थाना गेले संपादुनि कीर्ति, करुनि सुरकार्य. ॥ ३९
गंधर्वराज तव पति, याचें पहिलेंहि नाम हेंचि असे, ।
पांडु मरुद्गणज म्हणे, ‘रिपु वधुनि करीं यश प्रकाम,’ असें. ॥ ४०
तो **विदुर**, हा **युधिष्ठिर**, **धर्मा**चे अंश साध्वि! हे दोघे, ।
कलि दुर्योधन, **शकुनि द्वा**पर, लोकांत फट म्हणुनि जो घे. ॥ ४१
दु:शासनादि राक्षस; बळसागर **भीम** अंश **प**वनाचा; ।
अरिदुर्गव्यूह जया, जेविं गजा कुंजें दंशपवनाघा. ॥ ४२
अर्जुन नर, **नारायण यदु**पति, सति! ते पुराण ऋषि तर, तो ।
तैसा प्रताप केला, कीं स्वयशीं सर्व अमृततृषित रतो. ॥ ४३
साक्षान्निजतेजोंशें **दि**नकर तो काय **क**र्ण वर्णावा? ।
लंघिति **पा**र्थेषु तया तदनुमतें, जेविं अर्णवा नावा. ॥ ४४
कर्ण जसा अर्क, तसा **सो**मचि **अ**भिमन्यु तो महाभाग; ।
धृष्टद्युम्नहि होय ज्व**ल**नाचा सति! महामहा भाग. ॥ ४५
राक्षस होय **शिखंडी**; आचार्य **द्रोण** अंश **जी**वांचा, ।

---

१. पुत्रवियोगरूपी नवीनच–अद्भुत–रोग. २. मी गांधारी. ३. तोंड पसरून, दीन वा-
णीनें. ४. गणाल, मानाल. ५. इहलोकीं जन्मास आले होते. ६. देवाची कामगिरी
बजावून. ७. धृतराष्ट्र हा गंधर्वांचा अंश होता. या गंधर्वाचेंही नांव धृतराष्ट्रच होतें.
या धृतराष्ट्र गंधर्वाचा उल्लेख मागें अश्वमेधपर्वांत आलेला आहे. (मोरोपंती अश्वमेधपर्व
१।८२, ९५ व १०० पहा). ८. मरुद्गणापासून झालेला. ९. पुष्कळ. १०. मोरोपंती
आदि० १५,७१ पहा. ११. छीः थुः करून घे; फजीत पावला. १२. लताच्छादित प्रदेश;
झाडी. १३. वनमक्षिकांचें संरक्षण करणाऱ्या अरण्यांतील. १४. अमृताची तहान लागलेला.
१५. रममाण होवो, सुख पावो. १६. प्रत्यक्ष आपल्या तेजाचा जो अंश त्यायोगें. १७. किती.
१८. वाखाणावा. १९. त्याजवर येते झाले. २०. अर्जुनाचे बाण. २१. त्याच्याच संमतीनें.
२२. समुद्रातें. २३. नौका. २४. सूर्य. २५. चंद्र. २६. अग्नीचा. २७. अत्यंत आहे तेज
ज्याचें असा, मोठा तेजस्वी. २८. अंश. २९. गुरु. ३०. बृहस्पतीचा.

येथेंहि[1] तीच, नाकीं निवडी निःशेष दंश जी वाचा. ॥ ४६
वसुभाग[2] **भी**ष्म होय. प्राज्ञे[3] ! कथिलें यथार्थ तुजला हें, ।
गांधारि! स्वमनांत स्वास्थ्यातें[4], आयकोनि गुंज[5], लाहें[6]. ॥ ४७
कार्य करुनि, सर्व पुन्हा गेले स्वर्गी, तयांसि सुख मोटें, ।
न कळोनि तुम्ही म्हणतां, 'मेले; झालें अहा! महा खोटें[7].' ॥ ४८
गंगेप्रति सर्व चला; त्या समरहतांस, व्हा अमत्त[8], पहा, ।
शरणागताननांतुनि[9] येऊं देइल कधीं न मत्तप '[10]हा!' " ॥ ४९
कविस जडा[11] सुरतरुसीं[11] श्रीमुनिचा काय बोल तोलवतो[12]? ।
वायुमिषें[13] या सुयशें आजुनि [14]**मां**दार डोलतो, लवतो. ॥ ५०
उठतां **व्यास**, गुरु[15] उठे रवें[15] [16]मुनिभटनायकाननांतून, ।
वाटे, उठला बहुशत सिंहध्वनि काय काननांतून! ॥ ५१
पाउनि सर्व जन म्हणे, "तव अमृत[17] अमृत **सु**[18]रापगे! लागे, ।
सुगतिस[19] सुखें, करुनि भवदुदरीं, मज्जन सुराप गेला गे!" ॥ ५२
गंगातीरीं [20]धरिती, जाऊनि पुढें, जपूनि[21] जन जागा; ।
दिन होय वर्षशतसम म्हणती; 'भगवन्[22]! रवे[22]! त्वरित जा, गा!' ॥ ५३
परमोदार श्रीमान् **व्यास** प्रभु मुदिर[23] वोळला[24] हो! तो, ।
भक्त[25] **मयू**र जयाचा मुदित भवदवांत पोळला होतो. ॥ ५४

---

१. अन्वयार्थः—[बृहस्पतीचा अंश द्रोण असल्यामुळें, बृहस्पतीची] जी वाचा (वाणी) नाकीं दंश (डास, त्रास, जाच) निःशेष निवडी (दूर करी, निराळा करी), तीच येथेंही (या मृत्युलोकींही) दंश निःशेष निवडी. २. वसूचा अंश. ३. हे सुज्ञ स्त्रिये! ४. शांतीला. ५. गुप्त गोष्ट, रहस्य. ६. पावें. ७. वाईट, गैर. ८. मोहानें ग्रासलेले नाहींत असे, स्थिर. ९. शरण आलेल्याच्या तोंडांतून. १०. 'हाय' असा दुःखोद्गार. ११. जड [=निर्जीव, (पक्षीं) विवेकहीन] कल्पद्रुमाबरोबर. १२. तुलनेंत टाकतां येतो. १३. सुरतरु वाऱ्यानें हलतो, त्यावर अशी उत्प्रेक्षा केली कीं तो व्यासांच्या कीर्तीस मान डोलवितो, व खालींही वांकवितो अर्थात् व्यासयश आपल्या यशाहून अधिक आहे, असें कबूल करतो. १४. कल्पवृक्षपंचकापैकीं एक वृक्ष. १५. मोठा घोष, महाशब्द. १६. मुनि, योद्धे व अग्रणी ह्यांच्या मुखांतून. १७. उदक. १८. गंगे! १९. अन्वयः—गे भवदुदरीं (तुझ्या पोटीं—पाण्यांत) सुखें मज्जन करुनि, सुराप (दारूबाजही) सुगतिस गेला. २०. जागा पटकवितो, जागा आडवून ठेवतो. २१. मोठ्या काळजीनें. २२. भगवन् सूर्या! २३. घन. २४. वळला. २५. अन्वयार्थः— जयाचा (ज्या व्यासरूप मेघाचा) भक्त (चाहता) मयूर भवदवांत (संसारदावाग्नींत) पोळला (होरपळलेला) मुदित (आनंदित) होतो.

अध्याय सहावा.

श्रीव्यास, रात्रि होतां, गंगेंत शिरोनि नेत्र[1] तो लावी; ।
[2]शुद्धतपोयोगबळें भीष्मद्रोणादिकांसि बोलावी. ॥ १
[3]चुंबक लोहासि जसा, मुनि परलोकस्थितांसि आकर्षी; ।
[4]तैं तन्मुखाकडेचि प्रेक्षित होते महर्षि [5]नाकर्षी. ॥ २
जाणों रणमरणाचें करवुनि, पुनरपि हरी [6]भगल; [7]बाहे, ।
गंगेंत लपुनि, उठले करितचि [8]भटरथहरीभ [9]गलबा हे. ॥ ३
गंगेंतुनि गंगा[10]सुत [11]सबळ, जसा अब्धितूनि भानु, निघे, ।
सर्वहि जन तद्दर्शन, पूर्वमरण तें वृथाचि मानुनि, घे. ॥ ४
द्रोणाचार्य निघे; तो पावे हो! तीर; विप्र[12] [12]भासेना; ।
मरणभयें तीच तया वेष्टुनि होती रविप्रभा सेना. ॥ ५
द्रुपद, विराट, निघाले; तत्परिवारहि तयांसह निघाला; ।
[13]जेविं क्षेम पहावें, पडला परिसुनि मृषा गहनिं घाला. ॥ ६
[14]षट्‌ पुत्र पांडवांचे, त्यांसि घटोत्कच पहात मायेनें ।
गंगेंतूनि निघाला, जाणों लपवुनि रणांत मायेनें. ॥ ७
सुर म्हणति कर्ण निघतां, 'त्यजुनि निघे [15]जळजनाभ यमुनेतें, ।
स्मरलें तव प्रसादें हाही दे खळजना भय मुने! तें.' ॥ ८
सानुज, ससुत, सुयोधन, तन्मातुळ शकुनि, अन्यही राजे, ।

---

१. समाधि लाविता झाला. २. पवित्र तपश्चर्या व चित्ताची समाधि यांच्या सामर्थ्यानें. ३. लोहचुंबक. ह्या संबंधानें संस्कृतांत व प्राकृतांत जागोजाग उपमा आढळतात. ४. तेव्हां. ५. स्वर्गांत राहणारे मुनि. ६. ढोंग. अन्वयः—जाणों (जसें काय) [तो व्यास त्या भीष्मद्रोणांकडून] रणमरणाचें भगल (ढोंग) करवुनि, पुनरपि [तें] हरी; [व त्यांना परत] बाहे (बोलावी). ७. सर्वसंग्रहपाठः—वाहे. ८. योद्धे, रथ, घोडे आणि हत्ती. ९. गोंधळ, ओरडाआरड. १०. भीष्म. ११. सैन्यासह. १२. त्याच्या ठायीं क्षत्रिय वीरासारखें तेज दिसत होतें व ब्राह्मणपणाची सौम्य मुद्रा दृष्टीस पडत नव्हती. १३. अन्वयार्थः—घाला पडला [असें] गहनिं (अरण्यामध्यें) मृषा (खोटेंच) परिसुनि, जेविं क्षेम पहावें, [तेविं हें ह्यांचें निघणें होय]. १४. अन्वयार्थः—षट्‌पुत्र पांडवांचे; त्यांसि जाणों मायेनें (आसुरी विद्येनें) रणांत लपवुनि, [आतां] मायेनें (ममतेनें) [त्यासि] पहात, घटोत्कच गंगेंतुनि निघाला. १५. कमल आहे नाभीमध्यें ज्याच्या असा भगवान् विष्णु.

आले, लाजविते निजसुदृढत्वें सुखनिजन्यहीरा[1] जे. ॥ ९
जलसंध[2], जयद्रथ, भगदत्त, ससुतपौत्र बाल्हिक ज्ञाती, ।
आले; सर्व रणकथा जीजी, वाटे मृषाचि अज्ञा[3] ती. ॥ १०
धृतराष्ट्रासि दिली त्यां सर्वांतें[4] दिव्य[5] दृष्टि देखाया, ।
अमृतप्रदा[6] म्हणावें नलगे, 'रसना मुखांत दे खाया.' ॥ ११
दिव्यज्ञानबळें ती गांधारीही सुतादिकां पाहे, ।
पावे तत्साधुत्वें सात्विकभावेंकरूनि कांपा हे. ॥ १२
ते संपन्न समस्तहि पहिले होते तसेचि सर्वगुणें; ।
मत्सरवैरक्रोधाहंकार नसे, तयांत हेंच उणें. ॥ १३
भेटुनि पितरांचें मन केलें परम प्रहृष्ट तनयशतें, ।
श्रीव्यासाचें एकें वदनें गाईल काय जन यश तें? ॥ १४
भेटे सखा सख्याला हर्षें, भ्राताहि हर्षद भ्राता; ।
प्रेमाश्रुवृष्टि त्यांच्या बहु लज्जित करिति वर्षदभ्रा[9] त्या. ॥ १५
देती स्त्रियांसि सुख पति, जाउनि, येऊनि, जे विदेशाला. ।
[10]श्रीमुनिकरुणा चिंतामणिरचिता सर्व जेविं दे शाला. ॥ १६

---

१. उत्तम खाणींत पैदा होणारा जो हिरा त्यातें. कठीणपणांत हिऱ्याची आख्या पहिल्या प्रतीची आहे व आधुनिक शास्त्रवेत्त्यांसही ही गोष्ट संमत आहे. 'मृतांविषयीं वाईट बोलूं नये' अशी ह्मण आहे व तदनुरूप वर्तन करणें हेंच योग्य. आतां दुर्योधनादिकांच्या अंगीं उज्ज्वल गुण तर नाहींत व त्यांस नांवें तर ठेवावयाचीं नाहींत, अशा नाजुक प्रसंगीं पंत मोठ्या शिताफीनें पार झालेले आहेत. त्यांनीं त्यांच्या दृढनिश्चयाचीच वाखाणणी केली आहे. तो दृढनिश्चय चांगल्या कामांत आहे किंवा वाईट कामांत आहे, इकडे दुर्लक्ष करून, अवगुणांतून गुणाचीच तेवढी निवड करून तोच त्यांनीं वर्णिला आहे. २. धृतराष्ट्राच्या शत पुत्रांपैकीं एक. ३. जे शहाणे नाहींत त्यांस, भोळ्यांस. ४. 'देखाया' याचें कर्म. ५. अलौकिक. ६. अन्वयार्थः—अमृतप्रदा (अमृत देणाऱ्यास) खाया मुखांत रसना (जिव्हा) दे [असें] म्हणावें नलगे. जो अमृत देईल, तो जिव्हेची योजना करीलच करील. हें सुभाषित आहे. ७. कमी. ८. स्नेही. ९. वृष्टि करणाऱ्या मेघांस. १०. अन्वयार्थः—जेविं चिंतामणिरचिता शाला (चिंतामणिनामक इष्टद मण्यांनीं बांधिलेलीं घरें) [तेविं] श्रीमुनिकरुणा (श्रीमद्व्यासांची दया) सर्व दे. वर्णनसादृश्यः—(१) चिंतामणिची तापा जसि न, करुनि शर्महानि, दे शाला, । सत्संगति तसि, न तुझ्या उल्लंघिल धर्म हा निदेशाला. ॥ (अनुशासन, ८।३२). (२) प्रीति प्रभुची, चिंतामणिची जसि सर्व काम दे शाला. । यदुपतिस पुसुनि, तेथुनि गेला गांधारनाम देशाला. ॥ (अश्वमेध. ६।१३८).

भेटे भ्रात्यांसि[1] महाशोकीं तारावयासि तो कर्ण; ।
अभिमन्यु गमे आला भेटुनि वारावयासि तोकर्ण[2]. ॥ १७
स्वप्नचि[3] मानी कृष्णा शोका, विसरुनि सुखें वदे 'हा' तें, ।
पंचप्राण तसे सुत जेव्हां देती सुखेंव देहातें[4]. ॥ १८
भेटुनि सुतासि झाली पार्थाची साश्रु यादवी[5] रमणी, ।
अंकीं[6] घेतां, वाटे ती सरसी, तोहि याद वीरमणी. ॥ १९
आलि[7] म्हणे, 'गे! कुमुदिनि! वैराटि! कलाप हा सुखेंव, दया ।
करुनी, घाया येतो, वैरा टिकला, पहा, सुखें वद या.' ॥ २०
कुरुदार[8] ललाटांहीं धरिति बहु नवि प्रभा सतिलकांहीं[9], ।
मंत्रविरहितमुखांहीं सुंदरहि न विप्र भासतिल कांहीं. ॥ २१
सर्व स्त्रीजन पतिंनीं प्रेमें भेटोनि सुखविला साचा. ।
केला सफळ मनोरथ, होता जो वंध्य[10] सुखविलासाचा. ॥ २२
ऐसे प्रिय[11] भेटविले, जे जे ज्यांहीं मनांत आठविले, ।
प्रातःकाळीं मुनिनें त्या त्यां[12] लोकांसि सर्व पाठविले. ॥ २३
झालें तसें स्त्रियांला पति जातां दुःख, जेविं वाढविलीं[13] ।
सहसा[14] सदन्नपात्रें[15], तृप्ति न होतां, पुढोनि काढविलीं. ॥ २४

---

१. पांडवांसि. २. तोकर्ण वारावयासि आला=पुत्रकर्तव्यरूप ऋण फेडण्यास आला. मनुष्याचीं ऋणें तीन प्रकारचीं मानिलीं आहेत. पितृऋण, देवऋण व ऋषिऋण. हीं अनुक्रमें पुत्रोत्पत्ति, यज्ञविधान व तपश्चरण यांनीं फेडलीं जातात. ३. जेव्हां पंचप्राण तसे [द्रौपदीचे पंच] सुत [तिच्या] देहातें सुखेंव [दृढ आलिंगन, वट्ट मिठी] देती, [तेव्हां] कृष्णा (द्रौपदी), [जें पूर्वी दुःखानें] 'हा' वदे, तें सुखानें (आतां होणाऱ्या सुखाच्या योगानें) विसरुनि, शोका स्वप्नचि मानी (शोकाला स्वप्नाप्रमाणें खोटा मानूं लागली). ४. या गीतीचा सर्वसंग्रहांतील पाठः—स्वप्नचि मानुनि कृष्णा शोका विसरुनि सुखें वदे हातें । पंच प्राण तसे तुज जेव्हां देती सुखेंव देहातें. ॥ ५. यदुकुलोत्पन्ना स्त्री सुभद्रा. ६. [त्यातें सुतातें] अंकीं घेतां, ती (सुभद्रा) सरसी (सरोवर), तो (अभिमन्यु) ही वीरमणि याद (जलचर), वाटे. ७. अन्वयार्थः—आलि (सखी म्हणे), 'गे वैराटि (विराटपुत्रि व अभिमन्युपत्नि) मुकुदिनि (नलिनि, चंद्रविकासिनि कमलिनि) हा कलाप (अभिमन्युरूप चंद्र) दया करुनि सुखेंव घाया येतो. हा वैरा टिकला (युद्धांतून बचावला) पहा, या सुखें वद. या गीतींतील बोलणें उत्तरेच्या दासीचें आहे. ८. कुरुस्त्रिया. ९. कुंकवाचे टिकले ज्यांवर आहेत अशांनीं. आज कुरुस्त्रियांच्या कपाळीं कुंकू लागल्यानें, त्यांना अपूर्व शोभा प्राप्त झाली. ह्या तिलकभूषणापुढें इतर भूषणें तुच्छ, एवढेंच नव्हे, तर तदभावीं इतर अलंकार शोभाच देत नाहींत, हें उघड आहे. १०. निष्फल. ११. पति, पुत्र, बंधु, इत्यादि आवडतीं माणसें. १२. [ज्या ज्या स्थानाहून आले होते] त्या त्या स्थानांप्रत. १३. पदार्थ घालून मांडलेलीं. १४. एकदम. १५. उत्कृष्ट पक्वान्नांनीं भरलेलीं पानें.

त्यांसि मुनि म्हणे, "[1]मुलिहो! घालील सरांत याद, या, गे! हा; ।
तप दुःखितावनार्थचि घडलें, न स्वार्थ, या दयागेहा. ॥ २५

तुमच्या पतिलोकाप्रति पाठवितों मी तुम्हांसि; यों[2], गे! यो[2]. ।
होतिलें[3], ज्या साधुसभा[4], त्यांत कथा सत्कवींसि या गेया. ॥ २६

म्हणतों, 'वेंचेलें[5] सुतप, वेंचो, परि सर्व धन्य मज्जन[6] हो[7]. ।
साधन दुर्घट नाहीं, एक करा सुरनदींत[8] मज्जन[9], हो[10]!" ॥ २७

[11]श्वशुरातें जोडुनि कर, म्हणती, "देतो सुनाकदान[12] [13]मुनी; ।
सुखितां[14] होतिल, पुनरपि यां[15] चरणा[15] या सुना कदा[16] नमुनी? ॥ २८

वंदुनि **गां**धारीतें, **कुं**तीतें, **ना**रदादि सन्मुनितें, ।
नमिति **अ**नरिपदयुग[17], जें वंदावें लक्षदाहि जन्मुनि, तें. ॥ २९

[18]कृष्णादिका स्त्रियांतें, रोमांचित करुनियां जनवपुस, त्या ।
निघत्या झाल्या हर्षें, दावुनि अत्युत्सव स्व नव, पुसत्या. ॥ ३०

शिरल्या **गं**गेंत, तयां पाहुनि, कोणीहि आलि[19] न वदे 'हां[20]!'; ।
स्थानींच पावल्या त्या अद्भुतलावण्यशालिनवदेहा[21]. ॥ ३१

---

१. अन्वयार्थः–मुलिहो! या (मजबरोबर चला); गे! हा (मी स्वतः व्यास) याद (जलचरास) सरांत घालील. या दयागेहा (या कृपेच्या घरास अर्थात् सदयव्रतास) दुःखितावनार्थचि (दुःखित+अवन+अर्थ=दुःखितांच्या रक्षणाकरितांच) तप घडलें; न स्वार्थ (आपलपोटेपणानें, केवळ स्वतःच्या सुखासाठीं, नव्हे). अर्थात् पीडितांवर दया करण्यांत स्वतपाचा व्यय व्हावा, ह्मणूनच तें आचरिलें असून, स्वकार्यसाधनाचा ह्या कृपासागरास वारासुद्धां नाहीं. २. ह्या द्विरुक्तीवरून आग्रह व्यक्त होतो. ३. अन्वयार्थः–ज्या साधुसभा [आहेत], त्यांत (त्या सभांत) या कथा सत्कवींस गेया (गाण्यास योग्य) होतील. मी तुमच्यावर जी कृपा करणार आहें, ती उत्तम कवि आपल्या प्रासादिक वाणीनें गाऊन साधुमंडळांना आनंदित करतील.–हा भाव. ४. सर्वसंग्रहपाठः–साधु सभा. ५. खर्च होईल. ६. माझें गोत. ७. होवो. ८. गंगेंत. ९. स्नान. १०. अहो! ११. धृतराष्ट्रातें. १२. स्वर्गप्राप्तिरूप उत्कृष्ट दान. १३. व्यास. १४. सुखी. १५. तुमच्या पदातें. १६. केव्हां. १७. अजातशत्रु धर्मराज त्याचें पादद्वय. १८. अन्वयार्थः–जनवपुस (लोकांच्या शरीरास) रोमांचित करुनियां, कृष्णादिका स्त्रियांतें पुसत्या त्या (द्रौपदीप्रभृति स्त्रीजनांचा निरोप घेणाऱ्या त्या), [पतिलोकप्राप्तीमुळें झालेला] स्व (आपला) नव (अपूर्व) अत्युत्सव (मनाचा उल्हास) दावुनि (प्रदर्शित करून), निघत्या झाल्या (निघाल्या). या गीतीचा पुढीलप्रमाणें पाठ असता, तर दूरान्वयाच्या दोषांतून ती मुक्त झाली असतीः–कृष्णादिका स्त्रियांतें, दावुनि अत्युत्सव स्व नव, पुसत्या। निघत्या झाल्या हर्षें, रोमांचित करुनियां जनवपुस, त्या. ॥ १९. सखी. २०. हाय. २१. अलौकिक सौंदर्यानें शोभणाऱ्या अपूर्व शरीरातें.

त्या जेविं गो[1]प्रतारीं केल्या श्रीराघवें प्रजा धन्या; ।
बैसुनियां सुविमानीं गेल्या स्वर्गासि, जेविं सुरकन्या. ॥ ३२
लाभ स्त्रीततिसे[2] तसा, रतिसे[3] जसा, [4]कामपुरविलासाचा; ।
यापरि जो जो ज्यांचा, तो प्रभुनें[5] काम[6] पुरविला साचा[7]. ॥ ३३
ऐकुनि हें जनमेजय[8] त्या वैशंपायना[9] म्हणे, "मांजा[10] ।
तात[11] मला जरि दाविल, जो केला भस्म तक्षकें राजा; ॥ ३४
तरि मज अत्यद्भुत हें त्वत्कथित चरित्र सत्य वाटेल. ।
मृततातदर्शनें मम संशयशोकाब्धि[12] सर्व आटेल[13]. ॥ ३५
[14]भस्म खळतक्षकानें तनु केली, करुनि हानि, पण ज्याची; ।

---

१. या सरयूनदीसंबंधी तीर्थीं रामाचे प्रजाजन स्नान करितांच धन्य झाले व त्याबरोबर वैकुंठास गेले. (पहा. वा० रा० उत्तरकांड सर्ग ११०). २. स्त्रीसमूहास. ३. मदनपत्नीस. ४. मदनस्था-नामध्यें मौज मारण्याचा. ५. व्यासानें. ६. इच्छा. ७. खरोखर. ८. अभिमन्यूचा पौत्र व परिक्षिताचा पुत्र. ९. व्यासशिष्याला. इतिहास सांगण्यांत ह्याची फार प्रख्याति होती. १०. माझा. ११. परिक्षित. हा अभिमन्यूचा पुत्र. ह्याच्या वयाच्या ३६ वें वर्षीं ह्यास राज्याभिषेक करून, त्याजवळ सुभद्रेस ठेवून, पांडव निजधामास गेले. (पहा महाप्रस्थानपर्व). हा राजा नीतिमान् असतांही, प्रारब्धयोगानें त्यास दुर्बुद्धि उत्पन्न होऊन, त्यानें समाधिस्थ शमीक ऋषीच्या गळ्यांत एक मेलेला साप घातला. ह्यामुळें शमीक ऋषीच्या शृंगीनामक पुत्रास क्रोध येऊन, 'सर्पदंशानें तूं आजपासून ७ वे दिवशीं मरशील,' असा शाप त्यानें याला दिला; व शापानुसार तक्षकदंश होऊन हा मरण पावला. १२. शंका व दुःख ह्यांचा समुद्र. १३. नाहींसा होईल. १४. अन्वयार्थः—पण (परंतु) खळतक्षकानें ज्याची तनु भस्म करुनि हानि केली, त्या स्वपित्याच्या निपणजाची कीर्ति करावयासि हा (मी जनमेजय) पाहें (इच्छितों). माझा बाप व्यासाच्या कृपेनें भेटेल, तर माझा विश्वास आपण सांगितलेल्या गोष्टीवर बसेल. इतकेंच नव्हे, तर ह्या योगें माझ्या बापाच्या निपण-जाची, व्यासाची, कीर्तिही वाढेल, व हें मला इष्ट आहे. गुरूसारख्या आप्तजनांच्या वचनांचे ठायीं अविश्वास दाखविणें, हें कुशिष्यलक्षण होय; हें जाणूनच, संशयशोकाब्धि असे शब्द घातले आहेत व ह्या गीतींत 'पण' ह्या पक्षान्तरबोधक उभयान्वयी अव्ययाचा प्रयोग केला आहे. 'चक्षुर्वै सत्यं' हा न्याय भरंवसा बसण्यास योग्य तर खराच, पण ह्या ठिकाणीं अर्थात् तातदर्शन-प्रसंगांत संशयास गौणत्व देऊन, शोकास प्राधान्य दिलें आहे, व 'निपणजाची कीर्ति करावया पाहें' असे शब्द जनमेजयाच्या तोंडांत पंतांनीं घातले आहेत. अशा व ह्यासारख्या स्थलांवरून व्यवहारास व विचारसरणीस बाध न येईल, अशाच रीतीनें कोणत्याही गोष्टीचें निरूपण करण्याचें चातुर्य पंतांच्या अंगीं होतें, हें स्पष्टपणें सिद्ध होतें. व्यास हा जनमेजयाच्या बापाचा निपणजा कसा हें पुढील वंशवेलावरून स्पष्ट होईल:—(१) व्यास. (२) धृतराष्ट्र. (२) पांडु. (२) विदुर. (३) धर्म. (३) भीम. (३) अर्जुन. (३) नकुल (३) सहदेव. (४) अभिमन्यु. (५) परिक्षित्. (६) जनमेय.

त्या स्वपित्याच्या पाहें कीर्ति करायासि हा निपणज्याची." ॥ ३६
राजमनोरथ गुरुला[1] त्या वैशंपायनेंचि जाणविला; ।
व्यासें सिद्धिसि[2] आज्ञा करुनि परिक्षिन्नृपाळ आणविला. ॥ ३७
जनमेजयासि त्याचा तात परिक्षिन्नरेंद्र भेटविला. ।
जेविं घृतें वन्हि, तसा मुनिचा सुतपें प्रताप[3] पेटविलें[4]. ॥ ३८
सत्सुत वांटी पाटीभरि, द्यावी मुष्टि शर्करा ज्याला; ।
वदले[5] कवि 'तम' दुःखा, सर्वजना 'पद्म,' 'अर्क' राजाला. ॥ ३९
ऐसा मुनिप्रसादें जनमेजय भूपही सुखी झाला. ।
होउनि कृतकृत्य, पुन्हां तो धृतराष्ट्रहि निजाश्रमीं आला. ॥ ४०
व्यास म्हणे, "धृतराष्ट्रा! पुत्रादि जसे[6] विलोकिले काय[6], ।
आहेत सुखी स्वर्गीं; त्यांच्या शोकें म्हणों नको 'हाय.' ॥ ४१
दे आज्ञा धर्माला[8] धर्में सर्वप्रजांसि रक्षाया. ।
येऊनि मास अधिकचि झाला कीं स्वगुरु भक्तिदक्षा[7] या." ॥ ४२
धृतराष्ट्र म्हणे, "दिधलें पुत्रफळ तुवांचि सज्जना! सत्य. ।
मज भेटलासि जेविं च्यवना[9] गदशमनसज्ज[10] नासत्य[11]. ॥ ४३
कथिलें[12] भीष्में कांहीं तुज रक्षाया महाभुजा! महि, म्यां; ।
जाणसि उपाय[13] तूंही; बहुतचि गाती प्रजा तुझ्या महिम्या. ॥ ४४
होतो उपरोध[14] तपा; उरलें आयुष्य अल्प, नगरा जा,

---

१. व्यासाला. २. सिद्धि आठ प्रकारच्या आहेत:—अणिमा, लघिमा, गरिमा, महिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व. ह्यांपैकीं ईशित्व सिद्धीस व्यासांनीं आज्ञा केली. ३. बल, सामर्थ्य. ४. वाढविला, देदीप्यमान केला. ५. कवि (ज्ञाते) दुःखा तम (अंधकार), सर्वजना पद्म (सूर्यविकासि कमल) आणि राजाला अर्क (सूर्य) वदले. [कारण राजानें सर्व दुःखें दूर करून, सर्व लोकांचीं तोंडें आनंदानें टवटवीत केलीं]. ६. जसे कांहीं, ज्या कांहीं स्थितींत. ७. आपल्या वडिलांच्या ठिकाणीं सद्भाव ठेवण्यांत तत्पर अशास. ८. धर्मराजास. ९. च्यवन हा वारुणी भृगूच्या सात पुत्रांपैकीं ज्येष्ठ पुत्र होता. हा तपश्चरण करीत असतां ह्याचे अंगावर वारूळ वाढलें. पुढें शर्यातिराजाच्या सुकन्यानामक कन्येचे हातून अजाणत ह्याचे डोळे फुटले. पण त्यांचा विवाह झाल्यावर, सुकन्येनें आपल्या तपोबलाच्या जोरावर अश्विनीकुमारांकडून आपल्या पतीस नेत्र व तारुण्य देवविलें. ह्या गोष्टीचे उतराई होण्याकरितां म्हणून च्यवन ऋषींनीं अश्विनीकुमारांस यज्ञामध्यें हविर्भाग मिळत नसे तो मिळावा असें केलें. १०. रोग निवारण्याविषयीं तयार असे. ११. अश्विनीकुमार. १२. अन्वयः—महाभुजा! (हे बाहुप्रतापशाली धर्मा!) महि रक्षाया तुज भीष्में कांहीं कथिलें [व] म्यां [सुद्धां कथिलें]. १३. राजनीति. १४. अडथळा.

हो गजपुरांत, झाला साकेतीं[1] जेविं कल्पनग[2] राजा[3]." ॥ ४५
धर्म म्हणे, "बा! कोठें, कैसें, वातें त्यजूनि नभ जावें? ।
जाणुनि[4] धर्म, गुरुपदा कैसें, राज्या भजूनि, न भजावें ? ॥ ४६
जातिल सर्वेहि; करितों, करयुग जोडून, दास मी नमनें. ।
बा[5]! इच्छी ना, पंकहि उरतां, सोडूं नदास मीन मनें. ॥" ४७
गांधारी त्यासि म्हणे, "'हूं' म्हण[6] बा! वासवप्रभा[7]! वढिला[8]. ।
कां शेवटील आज्ञा मोडिसि? करिसी निजप्रभाव ढिला?" ॥ ४८
धर्म म्हणे कुंतीतें, "माते! मत्तनु न तातपद सोडी. ।
सोसिल[9] हे, पटलग्ना जैसी हिम, वृष्टि, आतप, दसोडी; ॥ ४९
ज्येष्ठपितां[10] म्हणतो 'जा'. मज गांधारीहि म्हणतसे 'जाच'. ।
दु:सह[11] मुलिस जसे, मम मतिस श्रीभोग पण तसे जाच. ॥ ५०
राजा राज्ञी म्हणती, 'राज्य करा गजपुरांत; जा[12], वर्तो. ।
परि मति तुझ्या पदाला सोडीना, जेविं नावे[13] आवर्ता[14]. ॥ ५१
काळें आप्तजन बहुत गिळिले; दुर्लभ मनुष्यजनु[15] ठावें; ।
तप सुख वाटे; येथुनि सोडुनि तव पादपंकज नुठावें[16]. ॥ ५२
एक श्रीकृष्णप्रभु आहे, निज वृष्णिचक्र[17] रक्षून; ।

---

१. अयोध्यापुरांत. २.[प्रजाजनांच्या इच्छा पुरविणारा] कल्पवृक्ष. ३. रामराजा. ४. अन्वयार्थः—धर्म जाणुनि (कर्तव्य समजून), राज्या भजुनि (राज्यभोगार्थ हपापून) गुरुपदा कैसें न भजावें? ५. अन्वयार्थः—बा! पंकही उरतां (नुसता चिखल राहिला असतांही) मीन नदास मनें (मनानेंही) सोडूं इच्छी ना. नदास सोडून जाणें त्यांच्या मनांत देखील येत नाहीं.—असा भाव. येथील, 'वृद्धशिथिल झालेला धृतराष्ट्र' व 'उन्हाळ्यांत आटून पंकशेष झालेले तळें', यांतील साम्य फार चमत्कारजनक आहे. ६. वडिलातें रुकार दे. ७. इंद्राप्रमाणें तेज आहे ज्याचें अशा. ८. सैल, कमजोर. ९. अन्वयार्थः—जैसी पटलग्ना [वस्त्रासी जडलेली] दसोडी (दशी) [हिम, वृष्टि व आतप सोसते], [तैसी] हे (मत्तनु) [वडिलांच्या संगतीनें] हिम (थंडी), वृष्टि (पाऊस), [व] आतप (ऊन्ह) सोशील. १०. धृतराष्ट्र. ११. अन्वयार्थः— जसे मुलिस (लहान सासुरवासणीस), तसे मम मतिस श्रीभोग पण (राजलक्ष्मीचे उपभोगही) दु:सह (सोसण्यास कठीण असे) जाच (क्लेश) [होत]. लहान मुलींस सासरीं जाणें आवडत नाहीं. तेथें सुखसोहळे व ऐश्वर्योपभोग असतात हें खरें; पण त्या मुलीस ते क्लेशप्रद भासतात व मातृसहवासच तिला सुखप्रद भासतो. त्याप्रमाणें माझ्या मतीस तुमच्या सहवासापेक्षां राज्योपभोग रुचत नाहीं.—असा धर्मोक्तीचा भाव. १२. नांदा. १३. नौका. १४. पाण्याच्या भोवऱ्याला. १५. मनुष्यजन्म. १६. न+उठावें=उठूं नये. १७. यादवकुल.

धरिले या संसारीं म्यां प्राण, तयासि मात्र [1]लक्षून." ॥ ५३
सहदेव म्हणे, "माते! मी त्वत्सेवा करीत राहेन; ।
पाहेन चकोर चरण[2]नखचंद्रातें; हिमाद्रि साहेन." ॥ ५४
कुंती म्हणे, "तपा तूं ज्ञाता करितोसि अंतरा[3]यातें; ।
[4]जें प्रियसान्निध्य, करी नियमाचा स्पष्ट अंत राया! तें. ॥ ५५
विघ्न तपस्विजनाच्या बाधों देति न तपासि [5]केवि राजे. ।
त्यांच्या सत्कीर्तिपुढें शतयज्ञाचीहि कीर्ति न वि[6]राजे. ॥ ५६
निजमातेच्याचि कसा विघ्न कराया तपा पहातोस?
त्यजुनि प्रजाव[7]नातें, नसतां [8]मत्तोष, कां रहातोस? ॥ ५७
वत्सा! सहदेवा! तुज घडली सेवा, अशी न इतरांतें. ।
मजचि न, आनंदविलें त्वां त्या स्वर्गस्थितांहि पितरांतें. ॥ ५८
[9]पांडु, युधिष्ठिर; याची सेवा करिसील, होय हे माद्री; ।
धर्माज्ञा जी, ती मी; येणें होइल निवास हेमाद्री. ॥ ५९
[10]स्नेहें चळेन सुतपोयोगापासून मी, सुता! पाहें. ।
पहिलेंतसेंचि होइल पात्र मम हृदय पुन्हा [11]सुतापा हें." ॥ ६०
कुंती, सहदेवातें पोटासीं धरुनियां, असें वदली. ।
धैर्यें निरोप दे, परि कांपे ती [12]मारुतें जसी [13]कदली. ॥ ६१
[14]सोडी, गळा पृथेचा धेनूची धरुनि जेविं सास्ना, न. ।

---

१. पाहून, दृष्टि देऊन, भरंवसा ठेवून. २. पायाच्या नखांना चंद्राची उपमा दिली आहे, तेव्हां ह्यांत पूर्ण बिम्ब न घेतां अर्ध बिम्ब घ्यावयाचें. ३. विघ्नातें. ४. अन्वयः—जें प्रियसान्निध्य (आवडत्या माणसांचा निकट रहिवास), तें, राया! नियमाचा अंत स्पष्ट करी. स्पष्ट=स्पष्टपणें. हें उघड आहे कीं आवडत्या माणसाचें जवळ असणें नियमाचरणास विघ्न करितें. ५. ज्ञाते, सुजाण. ६. शोभे. प्रत्यक्ष इंद्राच्या यशापेक्षांही ह्यांचें यश अधिक, असा भाव. ७. प्रजापालनातें. ८. मत्+तोष=माझें समाधान. ९. अन्वयार्थः—युधिष्ठिर [हाच] पांडु [होय]; याची [युधिष्ठिराची जी] सेवा करिसील, हे माद्री होय (हीच सेवा तुला स्वमातेप्रमाणें सांभाळील); जी धर्माज्ञा, ती मी (धर्माची आज्ञा ही मजप्रमाणें होय). येणें (ह्या योगानें) हेमाद्री (मेरुपर्वत) [तुझा] निवास (वसतिस्थान) होईल. धर्मराजाची सेवा केल्यानें व त्याची आज्ञा पाळल्यानें तुझा सांभाळ होईल, येवढेंच नव्हे, तर तुला कांहींएक कमी पडणार नाहीं.—असा भाव. १०. मायापाशामुळें. ११. पराकाष्ठेच्या दुःखास. १२. वाऱ्यानें. १३. केळ. १४. अन्वयार्थः—जेविं धेनूची सास्ना (गळकांवळी, पोळी,) [तेवीं] पृथेचा गळा (गळा) धरुनि, [तीतें] न सोडी.

भिजला अश्रुभरानें केला गंगेंत तो [1]जसा स्नान. ॥ ६२
समजाविला प्रयत्नें बहु तो, कीं पात्र परम लाडास; ।
[2]माय म्हणे, "स्नेह सुखद, वाटे अहिचाचि पर मला डास." ॥ ६३
प्रेमें मस्तक हुंगुनि, आलिंगुनि, त्या सुतासि दे आज्ञा; ।
धर्मादिकांवरि करी बहु [3]आशीरमृतवृष्टि ती प्राज्ञा. ॥ ६४
नृप, गांधारी, कुंती, यांतें नमुनि, प्रदक्षिणा करुनी, ।
[4]ते सस्त्रीक निघाले, चरण मनीं, अश्रु लोचनीं धरुनी. ॥ ६५
आला [5]पुरासि [6]देहें, परि चित्तें आश्रमींच तो बसला; ।
[7]नृप, [8]बद्ध वत्स [9]गोष्ठीं, नगरीं सिंहासनीं तसा बसला. ॥ ६६

अध्याय सातवा.

[10]अब्दद्वय झाल्यावरि, नारद भेटे नृपासि येऊन; ।
बहु सुखद होय दर्शन तें, [11]हेमंतांतें जेविं ये ऊन. । १
पूजन केलें, आसन देउनि बैसावयासि कनकाचें; ।
[7]धर्में प्रार्थुनि पुसिलें त्या सर्वज्ञासि वृत्त [12]जनकाचें. ॥ २
"गंगावटवासी द्विज कथिती नृप परम उग्र तप करितो, ।
सर्वज्ञा! मुनिवर्या! मज सांग, असेल देखिला जरि तो." ॥ ३
देवर्षि म्हणे, "धर्मा! श्रवण करीं, धैर्य धरुनि, [13]तद्वृत्ता; ।
तूं आल्यावरि गेला [14]गंगाद्वारासि भूप, [15]सद्वृत्ता! ॥ ४

---

१. जणूं कांहीं. २. अन्वयः—माय म्हणे 'स्नेह सुखद, पर (परंतु) [तो] मला अहिचाचि (सर्पाचाच) डास (चावा) वाटे. शेंडेफळावर—शेवटच्या अपत्यावर—आयांचें विशेष प्रेम असावें, हें सुप्रसिद्ध आहेच. ३. आशीर्वादरूप अमृताची वृष्टि. ४. अन्वयः—ते सस्त्रीक (स्त्रियांसह) चरण (वडिलांचे पाय) मनीं धरुनि, [व] लोचनीं अश्रु धरुनि, निघाले. ५. हस्तिनापुरीं. ६. धर्माचा देहमात्र हस्तिनापुरांत होता, पण मन आश्रमामध्येंच होतें. ७. धर्मराज. ८. डांबलेलें वासरूं. ९. गोठ्यांत. अन्वयः—[जसा गाईपासून वियुक्त केलेला] बद्ध वत्स गोष्ठीं [बसतो], तसा नृप नगरीं सिंहासनीं बसला. तें गोठ्यांतील वासरूं जसें गाईचा ध्यास घेऊन तिच्यासाठीं एकसारखें हंबरत राहतें, तद्वत्च राजाची बेचैन स्थिति झाली होती. १०. दोन वर्षें. ११. थंडीच्या दिवसांत, मार्गशीर्ष व पौष महिन्यांत. १२. धृतराष्ट्राचें. १३. तत्+वृत्ता=त्याचा (धृतराष्ट्राचा) वृत्तान्त. १४. मेरुपर्वतावरून येत येत भारतवर्षांत ज्या स्थळीं गंगा प्रथम प्रकट होते, तें स्थळ. ह्याची तीर्थांत गणना आहे. १५. शुद्ध आचरणाच्या!

तो अग्निहोत्रयाजक गांधारीत्वत्प्रसूसहित[1] राहे; ।
यासि तपस्या घडली जी, केवळ दुष्कराचि इतरा हे. ॥ ५
वाताशन[2], वीटामुख[3], होता तप उग्र करित सा[4] मास[5]; ।
सुस्नात[6] जसा वपुवरि, न उरों दे अस्थिवरि तसा मास. ॥ ६
गांधारी जळ सेवी; दुसरी मासोपवास करि देवी[7]; ।
तिसरे दिवसीं रात्रौ संजय मुन्यन्न[8] अल्पसें सेवी. ॥ ७
वनगोचर नृप झाला, संजय अवलंब[9] त्यासि दे हातें; ।
गांधारीच्या चालवि कुंती, होऊनि नेत्र, देहातें. ॥ ८
एके दिवसीं होता स्त्रीकुंतीसहित भूप तोकच्छीं[10]. ।
ये[11] स्वाश्रमाकडे जों, स्नान करुनि सुरनदीह्रदीं अच्छीं[12], ॥ ९
तों आश्रममार्गींचें वेष्टुनि सर्वत्र तें महागहन[13], ।
भस्म करीतचि आला, कल्पांतींचा[14] जसा, तसा दहन[15]. ॥ १०
सर्पमृगकुळें[16], जळतां वन, त्या दावानळीं बहु जळालीं. ।
शिरलीं वराहयूथें डोहांत, प्रथम जीं द्रुत पळालीं. ॥ ११
तो देव, त्याहि देवी, केवळ अक्षम तिघेंहि अपसरणीं[17]; ।
[18]त्यांत अनशन तसें तें लंघूं देईल काय तपसरणी? ॥ १२
नृप सूतासि म्हणे, "तूं व्यसनांतुनि[19] शीघ्र संजया! निघ रे. ।
प्रभुहृदय[20] आश्रितार्थचि[21] तापें तत्काळ तूपसें विघरे[22].' ॥ १३

---

१. गांधारी व तुझी माता जी कुंती यांच्या सहवर्तमान. २. वायु आहे भक्ष्य ज्याचें असा. ३. मागें अ० ४, गी० ४४, पहा. ४. सहा. ५. महिने. ६. यज्ञापूर्वी व नंतर स्नान केलेला. अन्वयार्थः—जसा सुस्नात (यज्ञ करणारा) [यज्ञपशूच्या] वपुवरि मास (मांस) न उरों दे, तसा धृतराष्ट्र [निराहार तप करून] [आपल्या] अस्थिवरि मास न उरों दे. धृतराष्ट्र तपश्चरणाच्या योगें केवळ मांस-हीन हाडांचा पिंजरा झाला होता, असा भाव. ७. कुंती. ८. देवभात. ९. आश्रय. १०. पर्वताच्या जवळच्या प्रदेशांत. ११. गीती ९, १० ह्यांचें युग्मक करावें. १२. स्वच्छ अशामध्यें. हें 'सुरन-दीह्रदीं' ह्याचें विशेषण. १३. विस्तीर्ण अरण्य. १४. प्रलयकालचा. १५. अग्नि. १६. साप वगैरे जिवाणूं व हरणें वगैरे श्वापदें, यांचे समूह. १७. पळून जाण्यास. १८. अन्वयार्थः—त्यांत (शिवाय) तसें (वर निर्दिष्ट केल्या प्रकारचें) अनशन (उपोषण); तें तपसरणी (वणव्याची चाल) लंघूं देईल (सोडून पलीकडे जाऊं देईल) काय? १९. संकटांतून. २०. स्वामीचें अंतःकरण. २१. पदरच्या माणसांकरितां. २२. पाघळतें, पातळ होतें.

संजय म्हणे, 'प्रभो! तुज रक्षाया संकटीं नसे शक्ती. ।
सोडुनि जावें कैसें? व्याकुळ करिती मना तुझी भक्ती. ॥ १४
होतां वृथाग्निनें[1] तुज मृत्यु, नृपा! हा अनिष्ट मज वाटे. ।
फाटे उर शोकानें, पाहुनि हे गति तुझी, गळा दाटे.' ॥ १५
भूप म्हणे, 'प्रार्थावें हेंचि जनें प्राप्त तापसत्वानें; ।
आम्हां घडेले सद्गति[2], सोसूं क्षण दाहताप सत्वानें[3].” ॥ १६
ऐसें वदोनि बसला प्राङ्मुख[4] नृप, तत्समीप त्याहि सती; ।
प्राणव्यसनीं[5] निश्चळ ते त्यांचे देह चित्रसे दिसती[6]. ॥ १७
संजय म्हणे, “प्रभो! त्वां निजयोगें[7]करुनि देह सोडावा; ।
श्रवण बहु तुला घडलें, ऋषिपुत्रा[8]! पुण्यलोक जोडावा[9].' ॥ १८
कथुनि असें भूपातें, संजय करुनि प्रदक्षिणा जाय; ।
'हाय' न म्हणुनि करी, जें अवसानीं[10] उचित होय, तें रायें[11]. ॥ १९
केला क्षिप्रें[12] तिघांचा त्या दवदहनें तृणासम ग्रास[13]. ।
गेलीं[14] परलोकाप्रति, यापरि वारुनि ऋणा[15] समग्रास[15]. ॥ २०
गेली परलोकाप्रति गांधारी, तसिच ती पृथा; न रडें; ॥
ज्ञात्यांनीं नच द्यावें शोकव्याघ्राननीं वृथा नरडें. ॥ २१

---

१. संस्कारहीन अग्नीनें. २. मोक्षाचा लाभ होईल. ३. धैर्यानें. ४. पूर्वेकडे तोंड करून. ५. जीवावरील अरिष्ट आल्या वेळीं. ६. भूतार्थीं वर्तमान काल. ७. स्वतःच्या योगसामर्थ्यानें, प्राणवायूचा निरोध करून. योगाचें लक्षण 'चित्तवृत्तिनिरोधः' हें आहे. अशा प्रकारें देह विसर्जन करण्याचा प्रघात पूर्वीं होताच. पहा, 'योगेनान्ते तनुत्यजाः' (रघुवंश, सर्ग १). ८. व्यासपुत्रा! ९. साधावा. १०. अंतकाळीं. ११. धृतराष्ट्र. १२. सत्वर. १३. घांस. १४. अन्वयः—यापरि (ह्याप्रमाणें), समग्रास ऋणा वारुनि (सर्व ऋणें फेडून, सर्व ऋणांतून मुक्त होतसाते,), परलोकाप्रति गेलीं. ऋणें तीन प्रकारचीं आहेत. तीं पितृ, देव आणि ऋषि ह्यांचीं होत व हीं ऋणें फेडणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. १५. 'द्वितीयान्त नाम असून, त्याचें गुण दाखविणारें विशेषण असल्यास, विशेषणाची प्रत्ययाभाव द्वितीया करण्याचा प्रघात आढळतो, पण नामाच्या रूपाचा विभक्तिप्रत्ययाचा लोप करून, विशेषणास तो प्रत्यय कायम ठेवलेला आढळत नाहीं'; असा प्रचलित मराठीचा सामान्य नियम आहे. परंतु पंतांच्या काव्यांत येथील 'समग्रास ऋणा' या प्रयोगाप्रमाणें विशेषणास विभक्तिप्रत्यय लावून विशेष्याचें नुसतें सामान्यरूप योजलेलें मधून मधून आढळतें.

जेविं खळ्यांत[1] वृषांचा घेरा सर्वत्र मेढिला होतो, ।
मुनिंनीं सूत[2] सुरनदीतीरीं तैसाचि वेढिला हो ! तो. ॥ २२
म्यां पाहिला, तदास्यें[3] हें वृत्त श्रवण जाहलें कांहीं; ।
दहनें केला, जैसा करिजे[4] तो कायदाह[5] लेकांहीं. ॥ २३
हें वृत्त तापसांला सांगुनि संजय हिमालया गेला; ।
वृत्तांत तुम्हांला श्रुत तेथुनि येऊनि तोचि म्यां केला." ॥ २४
ऐसें ऐकुनि, सांतःपुर[6] पांडव शोकसागरीं पडले; ।
परम प्रबुद्ध[7], परि ते सर्वहि चिरकाळ बाळसे रडले. ॥ २५
होय व्याकुळ जळतां सर्वस्व वही मनांत साव[8] जसा, ।
धर्म म्हणे, "हा! हा! प्रभु[9] व्यर्थ जळाला वनांत सावजसा[10]. ॥ २६
रे! दहना! तूं निर्दय, केवळ घातक, कृतघ्न, कळलास. ।
हा! मंदा[11]! या कर्में[12] अयशें केलीं; वृथाचि मळलास; ॥ २७
केला भस्म पृथेचा देह वनीं वाळला[13] जसा पाला; ।
तुजहि[14] नसे, जसि होतां दुग्धप्रदकाळ लाज सापाला. ॥ २८

---

१. शेतांमध्यें आलेल्या पिकांच्या धान्यांचीं कणसें मळण्याकरितां जी वर्तुळाकार जागा तयार करितात तिला 'खळें' म्हणतात. या खळ्याचे मध्यभागीं एक मेढ (खांब) पुरतात, व दोरीनें त्या मेढीस गायरांची किंवा म्हसरांची दावण जुंपितात; आणि मग ही दावण त्या खांबाभोंवतीं फिरून आपल्या पायाखालीं धान्याचीं कणसें मळते. त्यायोगें दाणा तणापासून अलग निराळा होतो. या धान्याच्या मळणीच्या क्रियेवर येथें कविकटाक्ष आहे. २. संजय. हा धृतराष्ट्राचा सारथि होता. ३. त्या संजयाचे तोंडून. सर्वसंग्रहपाठः—सदास्यें. ४. केला जातो. सर्वसंग्रहपाठः—करिजेतो. ५. [मृताच्या] शरीराचें दहन. सर्वसंग्रहपाठः—काय दाह. ६. सर्व स्त्रियांसहवर्तमान. ७. ज्ञाते. ह्या गीत्यर्धांत मायेचा जोर किती आहे हें व्यक्त केलें आहे. मायेपुढें शहाणपणसुद्धां बाजूस राहतें. ८. सावकार. सहा 'व'कार ज्याला आहेत, तो सावकार अशी या शब्दाची व्युत्पत्ति कांहींनीं केली आहे. हे सहा 'व'कार येणेंप्रमाणें, वस्त्र, वपु, विद्या, विनय, वाणी आणि वित्त. ही सावकार शब्दाची व्युत्पत्ति काल्पनिक पण मोठी खुबीदार आहे. सावकाराचें लिहिणें वगैरे सर्व कांहीं चोपडीमध्यें असतें. तेव्हां चोपडीचा नाश म्हणजे सर्वस्वाचाच नाश असें वाटून, सावकारास दुःख होणें विहितच आहे. ९. धृतराष्ट्र. १०. पारधीच्या जनावराप्रमाणें. ११. मूर्खा! १२. अन्वयः—या कर्में अयशें केलीं (अपकीर्ति संपादिलीस) [आणि] वृथाचि (व्यर्थ, निष्कारण) मळलास (दोषास पात्र झाला आहेस). १३. वाळलेला. हें 'देह' व 'पाला' या दोहोंचें विशेषण. १४. अन्वयः—दुग्धप्रदकाळ होतां (दूध पाजणाऱ्याचा नाशकर्ता होतां) जेविं सापाला (सर्पाला) लाज नसे, [तशीच] तुजही [नसे].

रोगांत[1] तुझी पुरवी जो वांछा खांडवास खायाची, ।
'माता खावी,' म्हणुनी स्वमुखें या पांडवा सखा याची. ॥ २९
विजया! जो वांचविला तोचि तुझी माय खाय हा कशि रे! ।
सहदेवा! तव कानीं का नीट निघुनि तिची न हाक शिरे? ॥ ३०
भीमा! दहनासि दिलें कैसें होउनि सहाय बळ वातें[3]? ।
नकुळा! दैवंत कोठें, ज्याला जाया स्वदुःख कळवा, तें[4]? ॥ ३१
गांधारी प्रेतांहीं वंध्या झाली असोनि हीनांहीं[5]; ।
कुंतीस पांच पंडित, पुत्र, परम पटु, असोनिही नाहीं. ॥ ३२
वेचिति[6] रक्त स्तन्यें[7], काळजिनें व्यर्थ बायका मांस[8]; ।
सुज्ञ समर्थ असोनिहि, आलों आम्हींच काय कामास? ॥ ३३
मज हेंचि दुःख वाटे, ज्या यावज्जीव पूजिलें दहना, ।
तोहि न कामा आला; हा! कर्मा! गति तुझी महागहना. ॥ ३४
हें परम श्लाघ्य तुला, गडबडुनि भयें न जें पळालास, ।

---

१. श्वेतकेतुराजानें अपरिमित यज्ञ केले त्यांतील हविभक्षणानें अग्नीस जाड्य झालें; तें घालविण्यास्तव कृष्णार्जुनांपासून त्यानें खांडव वन खावयास मागून घेतलें व तें पंधरा दिवस खाल्ल्यावर त्याचें अजीर्ण मोडलें; (आदिपर्व पहा). अन्वयार्थः—रोगांत जो तुझी खांडवास (खावयाची) वांछा (इच्छा) पुरवी (पूर्ण करिता झाला), या पांडवा (त्या ह्या अर्जुनास) [तूं हा] सखा (स्नेही) 'माता खावी' म्हणुनि स्वमुखें याची (प्रार्थना करिता झालास) 'जो—तो' व 'जसा—तसा' या जोड्यांऐवजीं 'जो—हा किंवा असा' व 'जसा—असा' या जोड्या पंत वारंवार योजितात. (मोरोपंती स्त्रीपर्व ५।१८२, ६।८; शांतिपर्व १।२५; अनुशासन ३।३२–३३; ३।३९–४१.) २. भक्षिता झाला. ३. भीम हा वायूचा अंश होता, म्हणून, वाऱ्यानें अग्नीस मदत कशी केली? असा प्रश्न आश्चर्यामुळें विचारिला आहे. ४. 'दुःख सांगावें वैद्याला,' अशी एक म्हण आहे; व देवांचे वैद्य अश्वनीकुमार यांच्या अंशानें नकुलाची उत्पत्ति झाली होती. तेव्हां धर्म म्हणतो, 'हे नकुला, जो तुझा पिता आहे व जो वैद्य असल्यामुळें आपलें दुःख ऐकून दूर करण्यास समर्थ आहे, तो देव—अश्विनी कुमार—आज कोठें लपला आहे बरें?' ५. दुष्टांमुळें. गांधारीचे पुत्र कुपुत्र असून तिच्यापूर्वींच मृत झाले होते, तेव्हां ती पुत्रवती असूनही वंध्या झाली. कुंतीचे पुत्र पंडित असून व जिवंत असूनही ते तिच्या अंतकाळीं तिच्याजवळ नसल्यामुळें तिचें पुत्रवतीत्व व्यर्थ झालें,—असा भाव. ६.खर्चीं घालतात. ७. अंगावरील दुधाच्या रूपानें. ८. मांस. बायकांच्या अंगांतील रक्त दुधाच्या रूपानें मुलांप्रीत्यर्थ खर्चीं पडतें व पुढें त्यांची काळजी वाहण्यानें त्या बिचाऱ्या सुकतात. असें असूनही व आम्ही संकट टाळण्यास समर्थ असूनही, आईच्या अंतकाळीं आमचे हातून तिची सेवा कांहींएक झाली नाहीं, तेव्हां धिक्कार असो आम्हांस.—असा धर्मोक्तीचा भाव.

गुरु शोक हाचि कीं तूं सस्त्रीक वृथाग्निनें[1] जळालास.” ॥ ३५
देवर्षि[2] म्हणे, “**धर्मा**! न जळाला तो वृथाग्निनें[1] राजा, ।
जेव्हां उपोषणांहीं केवळ असमर्थ जाहला काजा[3], ॥ ३६
तेव्हां ईष्टि[4] करुनि, त्या अग्नीतें हस्त तव पिता जोडी; ।
वनवास स्वीकारी; उटजीं करणें निवास तें सोडी. ॥ ३७
त्या अग्नीतें याजक विप्रवर विजनवनांत सोडून, ।
स्वस्थानाप्रति गेले, बहु कष्टें स्नेहबंध तोडून. ॥ ३८
तेचि अनळ अनिळानें त्या निर्जनकाननांत पेटविले, ।
समयीं आणुनि **कोळें** रायाला आयतेच भेटविले. ॥ ३९
हें म्यां कथिलें **गं**गातटवासितपस्विजनसभाकथित; ।
सर्वांसि सुगति झाली; **धर्मा**! होऊं नकोचि तूं व्यथित. ॥ ४०
घडला संस्कार उचित, जो त्यां[5] सुतपांत[6] होय देहातें. ।
आतां सदार सानुज तूं त्या सर्वांसि तोय[7] दे हातें.” ॥ ४१
उत्तरकार्य तयांचें करि नृप कथिलें तसेंचि[8] **वे**दानें; ।
सकळेंहि तदुद्देशें[9] गोभूशय्यागृहादि दे दानें. ॥ ४२
श्रीरामसुत[10] **मयूरें** शुभ **आश्रमवासिकाख्य** हें पर्व ।
भावें समर्पिलें **श्री**पतिचरणीं दोष जावया सर्व. ॥ ४३

---

१. नारद. २. मंत्रहीन अग्नीनें. ३. स्वकर्तव्यास. ४. दर पौर्णिमेस व अमावास्येस गृहस्थ जो होम करितात तो. ५. यमानें, मृत्यूनें. ६. त्या मंत्रयुक्त अग्नींत. ७. जलाञ्जलि, उत्तरक्रियेचें पाणी. ८. वेदानें कथिलें तसेंचि, वेदोक्त, यथाशास्त्र. ९. त्यांच्या नांवानें संकल्प करून. १०. पंतांनीं हें पर्व श्रीकृष्णचरणीं अर्पण केलें आहे व त्याचें कारण दोषनिरसन व्हावें–हें त्यांनीं दिलें आहे. ह्या पर्वांत निधनवार्ता वगैरे गोष्टी आल्या आहेत म्हणून तें वाचण्याचा प्रघात नाहीं. कांहीं पर्वांविषयीं अशाच विलक्षण समजुती आहेत. उदाहरणार्थ, वनपर्व व शांतिपर्व घरीं वाचणें श्रेयस्कर नाहीं, असें मानितात.

१ मोरोपंती आश्रमवासिक पर्वांतील शुद्धाशुद्ध, मुख्यमुख्य अलंकार, पाठभेद आणि टीपा यांचें परिशिष्ट.

पृष्ठ.	पद्य.	टीप.
१	२	'बोध' ऐवजीं 'बोधें' असा पाठभेद.
१	३	"शोकाग्निहेति" ह्याचा अर्थ टीपांत "शोकरूपी अग्नि व हत्यारें" असा दिला आहे. त्याच्यापेक्षां "शोकरूपी अग्नीची ज्वाला" असा अर्थ अधिक सयुक्तिक होईल. हेति=ज्वाला.
२	४	"आर्यातें" व "राजकार्यातें" ऐवजीं "आर्याच्या" व "कार्याच्या" अशीं पाठांतरें.
२	६	"सर्वथा" ऐवजीं "सर्वदा" असें पाठांतर. **अर्थान्तरन्यासालंकार.** ह्या अलंकार पुढें लिहिलेल्या पद्यांतही आहे. २।१०,४७,४८,६०, ६१,८८,९२. २।१,१२,२१,९५,९८,१००,१०६,११०,११४,११७. ३।३,१८.
,,	७	'श्वश्रूच्या' बद्दल 'श्वशुराच्या' असें पाठांतर. **दृष्टान्त.** हा अलंकार पुढें लिहिलेल्या पद्यांतही आहे. १।२९,६५.२।७६,१०७.३।१४,३८, ४१,६६.४।३.
२	९	'या रायाला' ऐवजीं 'या रायाला' असें पाठांतर.
३	१२	अर्थसादृश्य—आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया । **रघुवंश.**
,,	१३	'वेंचा' ऐवजीं 'वेंचो' पाठांतर.
,,	१४	उ० अ०—**परिसंख्या.**
,,	१६	'जो' ऐवजीं 'जें' असें पाठांतर.
,,	१७	एका हस्तलिखित पोथींत या गीतीच्या अंत्य चरणावर अशी टीप आहे—"राजा निंदकास दिगंतीं पाठवील".
४	१८	उ० अ०—**व्यतिरेक.** हा अलंकार पुढें लिहिलेल्या पद्यांतही आहे. १।२६,२८,४४.२।७३.
,,	१९	पू० अ०— **विभावना.**
,,	२०	'पुत्रातें विषकंदातें' बद्दल 'निजपुत्रातें विषकंदा' असा पाठभेद.
,,	२२	पू० अ०—**विशेषोक्ति.**

पृष्ठ.	पद्य.	टीप.
४	२२	उ० अ०–'अतिदारुणा' यापुढें स्वल्पविराम आहे तो 'अघा' यापुढें समजावा.
५	३०	उ० अ०–यांत पुढीलप्रमाणें विराम समजावे— भुजहो ! केला गिरि, जो होता हा निपट पांडुसुत राई. ॥ याचा अन्वय–भुजहो ! जो हा पांडुसुत (भीम) राई होता [तो तुम्हीं] गिरि केला. हीन व दुर्बळ अवस्थेंत असलेला भीम तुह्मीं उन्नत व बलिष्ठ स्थितीस आणिला.
६	३४	पू० अ०–**चेतनगुणोक्ति.**
,,	३७-३९	**निदर्शना.**
७	४२	'करितो' बद्दल 'करिता' असा पाठभेद.
,,	४५	उ० अ०–**तद्गुण.**
८	५०	'मेलें' 'गेलें' 'तें' 'केलें', या शब्दांऐवजीं 'मेले', 'गेले', इत्यादि निरनुस्वार पाठ.
९	६०	पू० अ०–**विभावना.**
१०	६३	उ० अ०–'व्हावा' ऐवजीं 'व्हाया' पाठ घेतला तर उत्तरार्धांत अशीं विरामचिन्हें असावींत—कीं तो येता, होता तरि कां व्हावा सुयोधनाश रण ? ॥ अन्वयः—कीं (किंवा) तो येता (तो दुर्योधन मला शरण आला असता) तरि सुयोधनाश व्हाया (वीरनाश हा ज्याचा परिणाम आहे असा) रण कां होता ?
,,	६४	उ० अ०–धर्मज्ञा हें विशेषण साभिप्राय असल्यामुळें **परिकरालंकार.**
,,	६७	पू० अ०–**विभावना.** उ० अ०–**अनुमान.**
११	६९	उ० अ–**अप्रस्तुप्रशंसा, दीपक.**
,,	७६-७७	**विषम.**
१२	७८	उ० अ०–**अपह्नुति.**
,,	८०	पूर्वार्धाच्या शेवटीं अवतरणचिन्ह आहे तें उत्तरार्धाच्या शेवटीं समजावें.
,,	८१	उ० अ०–**स्वरूपनिदर्शना** व **श्लेष.**
१३	८७	**उत्प्रेक्षा.**
,,	८९	उ० अ०– **विशेषोक्ति.**
१४	१	पू० अ०–'करिता' ऐवजीं 'करितां' पाहिजे.
,,	३	पू० अ०–'सपादू' ऐवजीं 'संपादू' पाहिजे.

पृष्ठ.	पद्य.	टीप.
१५	९	उ० अ०- **प्रहर्षणालंकार.** आपले इच्छेपेक्षां ज्यास्त प्राप्ती झाली असें वर्णिलें असतां हा अलंकार होतो.
१७	१९	उ० अ०-गरिबांचें लग्न करून देणें, हें पूर्वकाळीं हिंदुस्थानांत फार पुण्यकृत्य समजत असत, इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष राज्यकर्त्यांनेंही या कामीं दक्षता ठेविली पाहिजे अशी कल्पना होती, असें मुक्तेश्वराच्या पुढील ओव्यांवरून सिद्ध होतें. तरुण वरातें कन्यादान । क्षुधिता मिष्टान्न-भोजन । दरिद्रियातें ओपिजे धन । परमधर्म या नांव. ॥ (आदि. ३९); दरिद्र ब्राह्मणाची जाया । तारुण्यकाळीं अंतरे, राया ! । ऐकोनी त्याचिया विवाहकार्या । साह्य संपूर्ण करिसी कीं ? । (सभा ५९).
,,	२०	उ० अ०-**असमालंकार.**
१९	३६	उ० अ०-**अतिशयोक्ति.**
,,	३८	या गीतींत पंतांनीं जी उपमा योजिली आहे, तींत त्यांच्या स्वतःच्या अनुभवाचेंच प्रतिबिंब वठलें आहे, असें अनुमान होतें.
२०	४१	**असमालंकार.**
,,	४२।४३	**समुच्चय.**
२०	४४	**विषमालंकार.**
२२	५३	उ० अ०-**लेशालंकार.**
,,	५४	पू० अ०-**समुच्चय.**
,,	५७	**रूपकालंकार.**
२३	६८	उ० अ०-**उपमालंकार.**
२४	६९	उ० अ०-दुर्योधनानें मिळविलेलें राज्य अन्यायानें संपादित झालें होतें. तेव्हां धर्माकडून राज्यांत दंगेधोपे होतील अशी दुर्योधनाला धास्ती पडून, त्यानें लोक संतुष्ट व्हावे म्हणून धर्मापेक्षांही जास्ती सुख आपल्या कारकीर्दींत प्रजाजनास व्हावें, अशी व्यवस्था केली होती. चोरी करून सत्यनाराण पूजणें व दानधर्म करणें, अशांतलाच हा प्रकार होता.
,,	७०	पू० अ०-**काव्यलिंग.**
,,	७१	पू० अ०-कास धरणें ही **लोकोक्ति.**
२५	७९	**अप्रस्तुतप्रशंसा.**
,,	८२	उ० अ०-**प्रतीप.**
,,	८७	उ० अ-**उत्प्रेक्षा.**
२६	९०	पूर्वार्ध व उत्तरार्ध यांत **दामयमक** आहे.

पृष्ठ.	पद्य.	टीप.
२६	९१	'संदेह' ऐवजीं 'संदेश' वाचावें. संदेश=निरोप.
,,	९४	**विषम.**
२८	१०८	**अप्रस्तुतप्रशंसा.**
२८	११०	'जनका' ऐवजीं 'जनका!' वाचावें.
२९	११७	उ० अ०–**परिसंख्या.**
,,	१२२	उ० अ०–**परिवृत्तिध्वनि.**
३०	२	उ० अ०–**प्रतीपालंकार.**
,,	४	दोन्ही अर्धांत **सहोक्ति आहे.**
३१	७	**विषम.**
,,	११	उ० अ०–**परिसंख्या.** हिचा परिणाम व्यतिरेकांत होतो.
,,	१२	या गीतीच्या उत्तरार्धाचा पुढील अन्वयार्थही संभवतो.—[जेवीं] शरशब्द चातकाचा रव न करी (चातकाला जल देऊन त्याची याचना पूर्ण करीत नाहीं), तेवीं [आग्रहानें वनवासास निघणारा हा] राजा (धृतराष्ट्र) माझा रव न करी (माझी विनंति मान्य करीत नाहीं.)
,,	१३	पू० अ०–'माते' ऐवजीं 'माते!' पाहिजे. उ० अ०–**स्वरूप-निदर्शना.**
३३	२७	उ० अ०–**मिषापह्नुति.** टीपेंत उत्प्रेक्षा लिहिलें आहे तें बरोबर नाहीं.
३४	३३	उ० अ०–**मिथ्याध्यवसिति.**
३६	५२	पू० अ०–**विभावना.**
३७	६०	पू० अ०–**दीपक.**
३८	६२	उ० अ०–**काव्यार्थापत्ति.**
,,	६७	उ० अ०–पंकप्रसूति हें विशेषण सहेतुक आहे ह्मणून **परिकर.**
३९	४	उ० अ०–**अपह्नुति.**
४०	८	उ० अ०–अंध व हतसुत हीं विशेषणें साभिप्राय असल्यामुळें **परिकर.**
,,	१०	अर्थसादृश्य–शोकदहनभारतगजयूथपनृप मुक्तसायकासारा । गेला तापहराखिलधर्मामृतपूर्णभीष्मकासारा. ॥ मोरो. स्फु. का. भीष्मभक्तिभाग्य.
,,	१२	पू० अ०–**उत्प्रेक्षा.**
४१	२०	पू० अ०–**रूपकातिशयोक्ति.**
,,	२१	पू० अ०–**निदर्शना.**
४२	२५	पू० अ०–**श्लेषमूलक विरोधाभास.**

पृष्ठ.	पद्य.	टीप.
४२	२६	**विषम.**
,,	२७	**अधिक.**
४३.	३९	**अप्रस्तुतप्रशंसा.**
४४	४१	दत्तात्रेयासारखें येणें म्हणजे दत्त ह्मणून उभें राहणें. दत्त असें नांव घेतलें कीं तें उच्चारणाऱ्याजवळ दत्त तत्काल उभे राहतात अशी समजूत आहे, म्हणूनच 'दत्त' हें नांव उच्चारतांक्षणींच नमस्कार करण्याची चाल आहे.
४५	२	उ० अ०–**विभावना.**
,,	३	उ० अ०–**स्मरणध्वनि.**
४८	२०	उ० अ०–**अप्रस्तुतप्रशंसा.**
,,	२१	उ० अ०–**प्रतीप.**
४९	२८	उ० अ०–**रूपक व उत्प्रेक्षा** यांचा संकर.
५०	३०	**काव्यार्थापत्ति.**
,,	३४	पू० अ०–येथें **निदर्शना** अलंकार आहे. या अलंकाराचें नेहमीं उपमेंत पर्यवसान होतें.
५१	३७	उ० अ०–वदन वासणें ही **लोकोक्ति.**
५२	५०	उ० अ०–**मिषापह्नुति.**
५४	९	उ० अ०–**प्रतीप.**
,,	१५	उ० अ०–**प्रतीप.**
५५	२०	हींत सबध तिसऱ्या व चौथ्या चरणाचें **अंत्ययमक** आहे.
६१	६३	उ० अ०–**विषम.**
६४	२५	उ० अ०–**विभावना.**
६५	३४	**विषम.**